

श्रीरघुपतिकृत

श्रीरामकृष्णकथामृत

ओवीबद्ध



श्रीरामकृष्णकथामृत

(ओवीबद्ध)

लेखक : रघुपति

रामकृष्ण मठ, पुणे

श्रीरामकृष्णकथामृत

(ओवीबद्ध)

लेखक : रघुपति

प्रकाशक

स्वामी श्रीकान्तानंद, अध्यक्ष,

रामकृष्ण मठ

१३१/१अ, दांडेकर पुलाजवळ, पुणे - ४११०३०

दूरभाष: (०२०) २४३३३७२७, २४३२५१३२, २४३२०४५३

E-mail : rkmpune@gmail.com Website : www.rkmpune.org

© प्रकाशकाधीन

मुद्रण स्थळ

संवाद ट्रेडप्रिंटस् प्रा. लि.,

५९५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

दूरभाष : ०२० - २४४८५६३२

रंगीत चित्रे : चंद्रशेखर जोशी


आर्ट वर्क : हनुमंत तोडकर


द्वितीय आवृत्ती - २८ ऑगस्ट २०११ (प्रती - ३०००)

तृतीय आवृत्ती - १ जून २०१२ (प्रती - ३०००)

मूल्य - ₹ १५०/-

भगवान श्रीरामकृष्णांच्या १७५ व्या जयंतीनिमित्त विशेष सवलतीत





प्रकाशकाचे मनोगत

पुण्याच्या रामकृष्ण मठात भगवान श्रीरामकृष्ण परमहंसदेव यांच्या १७५व्या जयंतीचा महोत्सव विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे विशेष श्रद्धेने व उत्साहाने साजरा होत आहे. या उत्सवाच्या निमित्ताने पुण्याच्या या मठाने जनहितकल्याणकारक अशा काही योजना तर हाती घेतलेल्या आहेतच, पण त्याचबरोबर भक्तजनांचे श्रीठाकुरांप्रती प्रेम वृद्धिंगत होत राहावे आणि त्यांनी आत्मोन्नतीस सन्मुख व्हावे या दृष्टीने काही विशेष पुस्तकांच्या प्रकाशनांचा कार्यक्रमही हाती घेतलेला आहे. बुद्धपौर्णिमेच्या सुमुहूर्तावर म्हणजे दि. १७ मे २०११ रोजी श्रीठाकुरांनी भक्तांना सांगितलेल्या बोधकथांपैकी काही निवडक कथांचे 'एक गोष्ट सांगतो ....' हे सचित्र पुस्तक प्रकाशित केले गेले. तदनंतर गुरुपौर्णिमेचा मुहूर्त साधून १५ जुलै २०११ ला डॉ. स्वर्णलता भिशीकर लिखित 'चैतन्यसागर श्रीरामकृष्ण' हे श्रीठाकुरांचे संक्षिप्त चरित्र कथन करणारे पुस्तक प्रकाशित केले गेले. या दोन पुस्तकांच्या पाठोपाठ श्री.(कै.) रघुपति लिखित 'श्रीरामकृष्णकथामृत' या ४२ अध्याय असणाऱ्या ओवीबद्ध सुदीर्घ चरित्रग्रंथाचे द्वितीय (विशेष) आवृत्तीचे प्रकाशन करताना आम्हास अतीव आनंद होत आहे.

श्री. रघुपति यांनी लिहिलेल्या 'श्रीरामकृष्णकथामृत' या ओवीबद्ध चरित्राच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन स्वामी आत्मानंद, तत्कालीन सचिव, रामकृष्ण मिशन विवेकानंद आश्रम, रायपूर यांच्या शुभहस्ते नागपूर येथे १९८४-८५ च्या सुमारास झाले होते. श्रीठाकुरांचे भक्तांसाठी प्रेरक असे दिव्य सुचरित्र कथन करणारी ही ओवीबद्ध पोथी लिहिण्याची प्रेरणा पोथीकार श्री. रघुपति यांना कशी झाली, ते आजवर ज्ञात नव्हते. 'रामकृष्ण वचनामृत'कार श्री. 'म', यांच्याप्रमाणे श्री. रघुपति यांनीही स्वत:ला झाकून ठेविले होते. त्यांची माहिती आम्हास मोठ्या प्रयत्नांनी मिळवावी लागली. श्री. रघुपति यांचे संपूर्ण नाव नारायण लक्ष्मण हेटे असे आहे. कै. श्री. हेटे यांचे घराणे विदर्भातील तळाळे गावचे. ही हेटे मंडळी वतनदार होती. श्री. ना. ल. हेटे यांची मन:प्रकृती आध्यात्मिक होती. त्यांच्या मनावर भारतीय संतांच्या विचारांचा प्रभाव होता. याच्या परिणामी त्यांनी आपले जीवन अत्यंत साधेपणाने व सत्प्रवृत्तीने व्यतीत केले. कै. श्री. हेटे हे शिक्षणासाठी अमरावतीस वास्तव्याला असताना त्यांच्या जीवनात एक सुयोग आला. तो म्हणजे भगवान श्रीरामकृष्ण परमहंस यांचे चरित्र प्रथमत:च मराठीत लिहिणारे श्रीरामकृष्णांचे नि:सीम भक्त श्री. न. रा. परांजपे यांचा त्यांना सहवास घडला. याच्या परिणामी जगद्गुरु स्वामी विवेकानंद आणि त्यांचे गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांची दिव्याद्भुत चरित्रे त्यांच्या वाचनात आली; स्वामी विवेकानंदांचे समग्र वाङ्मयही वाचण्याची प्रेरणा प्राप्त झाली. ठाकुर व स्वामीजी यांची चरित्रे आणि स्वामीजींचे धगधगते व प्रेरक वाङ्मय यांची छाप संस्कारक्षम वयातच कै. श्री. हेटे यांच्या मनावर व आचरणावर पडली. स्वामी विवेकानंदांच्या ग्रंथावलींच्या परिशीलनाने त्यांच्या जीवनाची बैठक तयार झाली.



कै. श्री. हेटे यांनी राज्य शासनाच्या राजस्व विभागात रेव्हेन्यू इन्स्पेक्टर म्हणून नोकरी पत्करली. आपल्या कर्तृत्वाने ते डेप्युटी कलेक्टरच्या पदापर्यंत पोहोचले. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे हैदराबाद संस्थानाच्या विलिनीकरणानंतर त्यांना तिकडे अधिकारपदावर पाठविले गेले. तेथे त्यांनी अत्यंत सचोटीने व निःस्पृहतेने काम केले; समाजातील सर्व घटकांना आणि त्यातही विशेषतः दुर्बलांना न्याय मिळेल हे पाहिले. त्यांच्या शासकीय कार्यप्रणालीत त्यांच्यावरील स्वामीजींच्या विचारांची छाप जाणवत असे. स्वामीजींच्या समग्र ग्रंथावलींच्या डोळस वाचनामुळे त्यांची जी वैचारिक बैठक तयार झाली होती, ती आध्यात्मिक व धार्मिक अवश्य होती, पण तीत अंधश्रद्धा वा धर्मरूढींना जराही थारा नव्हता.

धार्मिक ग्रंथाचे वाचन व अध्ययन यांचा परिपाठ श्री. हेटे यांनी जीवनभर ठेवला होता. सेवानिवृत्तीपूर्वी आणि नंतरही त्यांनी महाराष्ट्रातील काही महापुरुषांची व संतांची ओवीबद्ध चरित्रे लिहिली. ती प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांना ओळखणारे श्री.पद्माकर तऱ्हाळकर लिहितात, 'श्रीरामकृष्ण परमहंसांच्या अवतारी जीवनावरील 'श्रीरामकृष्णवचनामृत' हा ओवीबद्ध चरित्रग्रंथ म्हणजे त्यांच्या ग्रंथरचनेतील सर्वोच्च प्रतीची रचना होय.' कै. श्री. ना. ल. हेटे यांनी श्रीरामकृष्णदेवांचे दिव्याद्भुत चरित्र मराठीत ओवीबद्ध करण्याचे विस्मयकारक असे कार्य प्रसिद्धीची यत्किंचितही हाव न ठेवता, स्वतःला अज्ञात ठेवून केले. त्यामुळे आम्हास ते बहुधा महाराष्ट्रातील श्री. 'म'च वाटतात. कै. श्री. हेटे यांचे उदारधी चिरंजीव श्री. नरेंद्र हेटे यांनी ही पोथी पुनर्मुद्रित करण्यास अनुमती तर दिलीच, पण स्वतः होऊन भरीव असे अर्थसाहाय्यदेखील केले. हे सुचरित पित्याचे मुलावरील संस्कार होत. आम्ही त्यांना अंतःकरणापासून धन्यवाद देतो.

आता या पोथीसंबंधीचे चार शब्द सांगणे आम्हास अत्यंत गरजेचे वाटते. कै. श्री. रघुपति यांनी ही पोथी श्रीरामकृष्णांवर आपल्या स्वतःच्या परमश्रद्धेच्या परिणामी रचली हे मुद्दाम सांगावयास नकोच. त्यांच्या श्रद्धायुक्त अंतःकरणाच्या व रामकृष्ण शरणतेच्या खाणाखुणा या पोथीत जागोजागी दिसतात. विशेषतः प्रत्येक अध्यायाची समाप्तीची म्हणून त्यांनी पुढील एकच ओवी लिहिलेली आहे :-

श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।।

ही ओवी म्हणजे श्रीरामकृष्णांनी निवेदिलेला समत्वभाव पोथीकार रघुपति यांनी किती अंतस्थ केला होता, त्याचे एक सुंदर उदाहरण आहे.



भगवान श्रीरामकृष्णांच्या दिव्य चरित्रातील एकूणएक प्रसंगांची गुंफण या पोथीत अत्यंत बहारीने केलेली आहे. त्यानंतर ठाकुरांच्या जीवनातील विविध घटनाप्रसंगांचा अन्वयार्थ भारतीय अद्वैतवादी तत्त्वज्ञानाच्या प्रकाशात, पण अत्यंत सोपेपणाने लावून दाखविलेला आहे आणि त्याहीपुढे जाऊन रघुपति यांनी त्यात स्वतःच्या चिंतनाची भर घातलेली आहे. ही भर घालताना मूळ घटनाप्रसंग विकृत होणार नाहीत किंवा त्यामुळे

उदित होणारा भात मोडला जाणार नाही, याचीही दक्षता रघुपति यांनी घेतलेली आहे. त्यामुळे प्रत्येक अध्याय वाचताना किंवा पठण करताना भक्त अधिकाधिक उन्नत व प्रमुदित होत जातो. पुन्हा एक पोथी म्हणूनही रघुपति यांची ही रचना आदर्शच आहे. प्रत्येक अध्यायाच्या आरंभी रामकृष्णस्तव असणारी एक ओवी आहे. ती मंगलाचरणही आहे आणि त्याचवेळी श्रीरामकृष्णांचे गुणवर्णन करणारीही आहे. श्रीरामकृष्णांच्या अभूतपूर्व अवतारी चरित्राचे कथन झाल्यावर वास्तविक पोथीलेखन संपते. पण रघुपति यांनी परंपरेप्रमाणे समाप्तीच्या ओव्या लिहिलेल्या आहेतच. त्यात त्यांनी प्रथम प्रत्येक अध्यायात काय काय सांगितले गेले आहे, ते अत्यंत संक्षेपाने सांगितलेले आहे. आपल्या पोथीचा संक्षेप अखेरीस सांगणे, ही भारतीय परंपरा येथे राखली गेली आहे. त्यानंतर रघुपति यांनी फलागदान मागितले आहे. हेही पुन्हा त्यांनी सर्वांसाठीच मागितलेले आहे. पोथीलेखनात 'फलश्रुती' निर्देशित करण्याचा प्रघात असतो. म्हणजे त्या पोथीचे वाचन, पठण वा पारायण केले असता कोणते फळ मिळेल त्याचा निर्देश असतो. रघुपति यांनी येथे फलश्रुती सांगितलेली आहे, तीही परत सर्व भक्त पूर्णकाम होवोत या स्वरूपाचीच आहे.

आम्ही भक्तांना हे आग्रहाने सांगू इच्छितो की, ही पोथी वैयक्तिक व सामुदायिक पारायणासाठी अत्यंत उपयुक्त आहेच; शिवाय या पोथीचे वाचन आपली उन्नती घडविणारेही आहे. अशी ही एक सर्वांगसुंदर पोथी श्रीठाकुरांच्या या विशेष जन्मोत्सवाच्या काळात भक्तांच्या व वाचकांच्या हाती देता आली, याचे आम्हास अतीव समाधान आहे. हे सर्व योग श्रीठाकुरांनीच जुळवून आणलेले आहेत. कर्तेकरविते तेच आहेत, हेच खरे.

पोथीच्या प्रकाशनास अनुमती दिल्याबद्दल रामकृष्ण मठ व मिशनचे अधिकारी संन्यासी यांचे आम्ही कृतज्ञ आहोत. या पोथीच्या प्रकाशनासाठी अनुमती दिल्याबद्दल प्रथम आवृत्तीच्या प्रकाशक श्रीमती मनीषा देशपांडे व कै. श्री. दिनकर देशपांडे नागपूर, यांचे मन:पूर्वक आभार. पोथीच्या प्रकाशनासाठी केवळ अनुमती देऊन न थांबता आर्थिक भारही उचलल्याबद्दल कै. श्री. रघुपति यांचे सुविद्य व सुसंस्कारसंपन्न पुत्र श्री.नरेन्द्र हेटे यांच्याबद्दल जेवढी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी कमीच आहे. हेटे उद्योग समूहातील अधिकारी श्री.विवेक वैद्य यांनी आम्हास दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांना धन्यवाद देतो. या पोथीच्या निर्मिती व मांडणीच्या संदर्भात सौ. शकुंतला पुंडे व डॉ. द. दि. पुंडे यांनी खूप परिश्रम घेतले. श्रीरामकृष्णांची कृपा त्यांच्यावर राहो, असा आम्ही त्या उभयतांना आशीर्वाद देतो. चित्रकार श्री.चंद्रशेखर जोशी, मुखपृष्ठ चित्रकार श्री. हनुमान तोंडकर व मुद्रक संवाद ट्रेडप्रिंट्स प्रा. लि., पुणे यांनी घेतलेल्या विशेष परिश्रमाबद्दल त्यांचेही मनापासून आभार.

ही पोथी भक्तांच्या हाती देताना त्यांना तिच्या वाचन-पारायणाचा लाभ होवो आणि श्रीरामकृष्णांप्रतीचा त्यांचा प्रेमभाव अधिकाधिक उत्कट होवो, अशी इच्छा करतो.

स्वामी श्रीकान्तानंद

(स्वामी श्रीकान्तानंद)
अध्यक्ष

पुणे
२८ ऑगस्ट २०११



पहिल्या आवृत्तीचे टायटल पेज

श्रीरामकृष्णकथामृत

रघुपति

सप्रर्पण

कर्ते करविते रामकृष्ण । तयांनी स्फूर्ति देवून ।
कथामृत घेतले लिहवून । यास्तव अर्पण तयांप्रति ।।

'रघुपति'



लेखकाचे मनोगत
(पहिल्या आवृत्तीतून)

मानवजातीच्या उद्धारासाठी ईश्वर युगायुगी अवतार घेतो. सांप्रत भगवान श्रीरामकृष्णदेवांनी सर्व धर्ममार्गांवर प्रकाश टाकून त्यांचा समन्वय साधला. ईश्वरप्राप्तीचे सर्व मार्ग त्यांनी सुलभ करून सांगितले. निरनिराळ्या धर्ममार्गांचे स्वत: साधन करून त्यात कोठेही विरोध नाही, सर्व मार्ग सत्य आहेत, हे त्यांनी सिद्ध केले. रामकृष्णांचे शिष्य स्वामी सारदानंद यांनी 'श्रीश्रीरामकृष्णलीलाप्रसंग' या नावाने त्यांचे चरित्र लिहिलेले आहे. त्यात सर्वत्र सत्यकथन केलेले आहे. कोठेही अतिशयोक्ती अथवा कल्पनाविलास केलेला नाही. कालौघाबरोबर येणाऱ्या दंतकथांचा त्यात प्रवेश झालेला नाही. जसे घडले तसेच वर्णन आहे. श्री. नरहर रामचंद्र परांजपे यांनी रामकृष्णांचे मराठी भाषेतील पहिले चरित्र लिहिले. मी अमरावतीस विद्यार्थी असताना मला त्यांच्या सहवासाचा लाभ घडला व त्यांनी लिहिलेले चरित्र वाचून मी फार प्रभावित झालो. नंतरच्या काळात रामकृष्णांच्या जीवनावर लिहिलेली, रामकृष्ण मठातर्फे प्रसिद्ध झालेली व इतरही अनेक पुस्तके माझ्या वाचनात आली. त्या सर्वांचा प्रभाव प्रस्तुत श्रीरामकृष्णकथामृतावर पडलेला आहे. मी त्या सर्व लेखक व प्रकाशकांचा ऋणी आहे.

श्रीरामकृष्णदेवांचे जीवन दिव्यत्वाने ओतप्रोत भरलेले आहे. त्यांच्या चरित्राचे वाचन, श्रवण, मनन घडल्यास मानवजन्माचे सार्थक होईल. व्यक्तिश: आणि सामुदायिकरीत्या वाचनास सुलभ व्हावे या हेतूने या महान अवतारी पुरुषाचे चरित्र ओवी छंदात सादर केले आहे. श्रीरामकृष्णकथामृताच्या वाचनाने जनकल्याण होवो.

रघुपति

परवानगी पत्र



अनुक्रमणिका

अध्याय	विषय	पृष्ठ

||०१|| प्रथमाध्यायी केले कथन । अवतारकारणाचे कारण । ०११

||०२|| दुसऱ्यात मातापित्यालागुन । दृष्टान्त झालेले सांगितले ।।
भगवंतांचे झाले जनन । गदाधर ठेविले अभिधान । ०२३

||०३|| तिसऱ्यात बाळलीला कथन । वियोग झाला पितयाचा ।। ०३९

||०४|| चवथ्यात व्रतबंध होउनी । महाशिवरात्रीच्या दिनी ।
समाधीच गेली लागुनी । कलकत्त्यास गमन केले ।। ०५३

||०५|| पाचव्यामाजी कथन केले । साधनेविषयी सांगितले । ०६९

||०६|| सहाव्यात कालीमंदिर झाले । ठाकुर आले दक्षिणेश्वरा ।। ०८०

||०७|| सातव्यात पूजकपदग्रहण । जगन्मातेचे झाले दर्शन । ०९५

||०८|| आठव्यात दिले दाखवुन । गौरीहररूप मथुरला ।। १११

||०९|| कथिले नवव्या अध्यायाला । भावसमाधी मथुरला । १२५

||१०|| पूजावर्णन दहाव्याला । रासमणीला शिक्षा दिली ।। १४०

||११|| अकराव्यात रामोपासन । जानकीचे झाले दर्शन ।
हलधारीचा शाप होउन । मुखातुनी रुधिर आले ।। १५३

||१२|| बाराव्यात झाले लग्न । १६६

||१३|| तेराव्यात ब्राह्मणी येउन । गात्रदाह केला शमन ।
विपरित क्षुधा थांबविली ।। १८०

||१४|| चवदाव्यात तंत्रसाधन । ब्राह्मणी घेई करवुन । १९६

||१५|| पंधराव्यात केली कथन । वात्सल्यभक्ती ठाकुरांची ।।
आले पंडित पचलोचन । नारायणशास्त्री विद्वज्जन ।
तयांनी सभेत केले कथन । ठाकुर अवतार ईश्वराचा ।। २०९



अध्याय	विषय	पृष्ठ
॥१६॥	सोळाव्यात मधुराभक्ती ।	२२४
॥१७॥	सतराव्यात तोतापुरि येती । निर्विकल्प समाधीची प्राप्ती । तोतापुरि मानी सगुणाला ॥	२३८
॥१८॥	अठराव्यात केले कथन । मथुरपत्निचा रोग हरुन । केले इस्लामधर्मसाधन । ब्राह्मणीने गमन केले ॥	२५४
॥१९॥	तीर्थयात्रा एकोणिसाव्यात ।	२६६
॥२०॥	सांगितली विसाव्या अध्यायात । हृदयरामाची हकिकत । वृत्तान्त मथुरच्या मृत्यूचा ॥	२८३
॥२१॥	एकविसाव्यात केले कथन । सारदादेवींचे आगमन । संयम एकशय्या करुन । ख्रिस्तधर्मसाधन सांगितले ॥	२९५
॥२२॥	बाविसाव्यात सर्वात्मभाव । वर्णिला निरहंकार स्वभाव । पंडिताचा हरला गर्व । तो स्तवी परमात्मा मानुनी ॥	३०८
॥२३॥	तेविसाव्यात केला कथन । कामकांचन त्याग पूर्ण ।	३२२
॥२४॥	चोविसाव्यात परीक्षा करुन । करिती प्रेम भक्तांवर ॥	३३७
॥२५॥	पंचविसाव्यात शिष्यशिक्षण ।	३५१
॥२६॥	सव्विसाव्यात केशवसेन । मणिमल्लिकाकडिल महान । उत्सव ब्राह्मसमाजाचा ॥	३६५
॥२७॥	सत्ताविसाव्या अध्यायात । रामचंद्रदत्त महेन्द्रनाथ । रामकृष्णांचे थोर भक्त । त्यांची हकिकत सांगितली ॥	३७९
॥२८॥	अठ्ठाविसाव्या अध्यायात । राखालचंद्र मानससुत । नागमहाशयांची हकिकत । संक्षिप्तात सांगितली ॥	३९२
॥२९॥	पुढिल चार अध्यायांत । वर्णिला नरेन्द्रनाथ दत्त । पुढे झाले जगद्विख्यात । विवेकानंद या नावाने ॥	४०८
॥३०॥		४२२
॥३१॥		४३६



अध्याय	विषय	पृष्ठ
॥३२॥	.....	४४९
॥३३॥	तेहतिसाव्यात निरंजन । बाबूराम आणि योगिन ।	४६४
॥३४॥	चवतिसाव्यात शशिभूषण । तारक काली शरद लाटू ॥	४७८
॥३५॥	पस्तिसाव्यात हरिनाथ । गंगाधर सारदाभक्त । हरिप्रसन्न शिष्य समस्त । त्यांची हकिकत सांगितली ॥	४९३
॥३६॥	पूर्णचंद्र घोष गृहस्थ । छत्तिसाव्या अध्यायात । बलराम बोस सुरेन्द्रनाथ । शंभुनाथ मल्लिक वर्णिले ॥	५०७
॥३७॥	सदतिसाव्यात पंडित थोर । ईश्वरचंद्र विद्यासागर । त्याच्याकडे गेले ठाकुर । ज्ञानदान करावया ॥	५२०
॥३८॥	अडतिसाव्या अध्यायात । गिरीशचंद्राची हकिकत । गोपाळाच्या आईस होत । दर्शन बालकृष्णाचे ॥	५३५
॥३९॥	एकोणचाळिसाव्यात योगिनमा । लक्ष्मीदेवी गोलापमा । विख्यात विदुषी गौरीमा । उत्सव पानिहाटीचा ॥	५५०
॥४०॥	अध्याय चाळिसाव्यात । रोग वाढला अपरिमित । ठाकुर आले कलकत्यात । औषधोपचार घ्यावयाला ॥	५६४
॥४१॥	एकेचाळिसाव्या अध्यायात । काशीपुरच्या बगीच्यात । कृपा लाभले भक्त समस्त । लाभ झाला दर्शनांचा ॥	५७९
॥४२॥	बेचाळिसाव्यात केले कथन । सिद्धींचे नरेन्द्राला दान । महासमाधी घेती भगवान । कथा पावन सांगितली ॥	५९३



श्रीरामकृष्णस्तवन

धर्माची विकलांग पाहुनि गती चित्ती व्रवे श्रीपती
नाना पंथ निघूनि होइ सकला तत्त्वाचिही विस्मृती ।।
वादा व्यर्थ करूनि द्वेष करिती हिंसाहि होई यदा
घेऊनी हरि रामकृष्ण स्वरुपा विश्वात येई तदा ।।१।।

आश्चर्या नच पार थोर महिमा श्रीरामकृष्णा तुझा
ज्ञानी योगि सुभक्त नाहि असला विश्वात झाला तुजा ।।
तू ब्रह्म स्वयमेव होसि तरिही घेसी तनू मानवी
तारावया सदया जनास जगती येसी तुझी थोरवी ।।२।।

केला नाहि कधीहि स्पर्श प्रभुजी कामासवे कांचना
केले साधन जाहलास जगती आदर्श साऱ्या जना ।।
वाणी धन्य करी पवित्र वसुधा वर्षाव शांतीसुधा
त्वत्तेजी दिसला सुमार्ग सकला अज्ञान ज्ञानीबुधा ।।३।।

तापाते हरिते सुनाम तव ते वारी पिडा सत्वरी
पापांच्या जळतात राशि सकला अग्नी जसा कापुरी ।।
ऐसे पावन नाम नाथ तव ते चित्तास पावित्र्य दे
मोक्षप्राप्तिप्रती नसेचि अवधी नामे सदा जो वदे ।।४।।

कामक्रोध नको अहंपण नको द्रव्याभिलाषा नको
भक्ति ज्ञान विराग शांति सुमती यांचीच शेती पिको ।।
दे प्रीती मज भूति तेवि दिसुदे सर्वत्र नारायण
सेवाभाव वसो सदैव हृदयी अंती तुझे दर्शन ।।५।।



श्रीरामकृष्णांची आरती

ओवाळू आरती रामकृष्ण देवा ।
विनवी तव चरणासी मज आश्रय द्यावा ।।धृ.।।

ज्ञानि जयाला वदती ब्रह्म सनातन
आत्मा ऐसे योगी करिती वर्णन
भक्त जयाला प्रेमे म्हणती भगवान
प्रकटे तो परमात्मा नररुप घेऊन ।।१ ।।

नानाविध पंथांचे केले आचरण
क्रिस्तीइस्लामांचे ध्येयहि साधून
दाखविले सकलांचे एकचि ते स्थान
नामे होउ शकेना सद्वस्तू भिन्न ।।२ ।।

नम्रत्वे श्रुतिशास्त्रे निघति मुखातून
दिधले सुलभ करूनी कर्मभक्तिज्ञान
शरणागत जन कितितरि नेले उद्धरुन
भगवंताला भावे रघुपतिचे नमन ।।३ ।।



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय पहिला

श्रीगणेशाय नमः । नमो भगवते रामकृष्णाय ।

नमो ॐकार गजानन । तुजपासुनी प्रभवे ज्ञान ।
सकल विद्या कला गहन । तुजपासुनी उद्‌भवती ।। १ ।।

तुजपासुनी झाले वेद । शास्त्रे पुराणे प्रसिद्ध ।
विज्ञान साहित्य प्रबंध । तुजपासुनी जाहले ।। २ ।।

किंबहुना हे समस्त । तुजपासुनी झाले जगत ।
भासत असे तुझिया रूपात । दृश्यादृश्य चराचर ।। ३ ।।

बुद्धिमाजी न सामावे । ऐसे स्वरूप तुझे स्वभावे ।
कैसे आकळून वर्णावे । मती कुंठित जाहली ।। ४ ।।

परब्रह्म तू साक्षात । कोण जाणू शके मात ।
अरूपाचे शब्दाआत । स्वरूप केवी वर्णवे ।। ५ ।।

सत्कर्म घडे जे हातुन । तेच असे तव पूजन ।
मौनचि तुझे संकीर्तन । तुजला नमन गणराया ।। ६ ।।

ज्यावरि तुझी कृपा होई । कळती शास्त्रार्थ सकळही ।
वैराग्य उगवे तयाच्या हृदयी । प्रभा ज्ञानाची फाकतसे ।। ७ ।।

बोल निघताच मुखातुन । शास्त्रार्थ प्रकटती तयातुन ।
अध्यात्मबोध तो परिपूर्ण । अनुभवासी येत असे ।। ८ ।।

अगाध असे तव महिमान । मंगलमूर्ति नामाभिधान ।
प्रार्थना तुजला गजानन । कृपा करावी माझ्यावर ।। ९ ।।



आता वंदिली सरस्वती । कैवल्यविद्या जियेची मूर्ती ।
बुद्धी देउनी मजप्रती । वदवो चरित्र प्रभूंचे ।। १० ।।
अवतार वरिष्ठ भगवान । परमहंस श्रीरामकृष्ण ।
परब्रह्म हे मूर्तिमान । केले नमन तयांप्रती ।। ११ ।।
भगवंताचे महिमान । जगी जाणू शके कोण ।
काय अंतराळालागुन । मिती कोणी करू शके ।। १२ ।।
चरित्र अपार अगाध । कैसा होईल पूर्ण बोध ।
हे कळताहि झालो सिद्ध । वर्णन कराया चरिताचे ।। १३ ।।
प्रभो चरित तुझे सिंधू । जगास मिळता एक बिंदू ।
भवपीडेचा तरी संबंधू । दूर होईल निश्चये ।। १४ ।।
अमृताच्या सागरातुन । पळीभर सुधा घेता काढुन ।
तेणे पीडा निवारे पूर्ण । तैसे महिमान चरिताचे ।। १५ ।।
कथा अल्पहि पडता कानी । मानव जाईल उद्धरुनी ।
शांती लाभेल अंत:करणी । कल्याण होईल जगताचे ।। १६ ।।
ऐसा धरुनी मनी विश्वास । प्रवृत्त झालो लेखनास ।
किंचित कथा श्रवणास । मिळता उद्धार होईल ।। १७ ।।
भगवंत होउनी साकार । अवतार घेई अवनीवर ।
ग्लानी येता धर्मावर । दूर कराया लीलेने ।। १८ ।।
ऐसी धर्मग्लानी आली । इतिहासाने नाही पाहिली ।
यास्तव धावली माउली । रक्षण कराया जगताचे ।। १९ ।।
नाहीतर हे बुडते जन । यांना आश्रय होणार कोण।
यास्तव दयार्द्र होउन । आला धाउनी जगदात्मा ।। २० ।।
बुडत्यालागी द्यावया हात । अंधालागी मार्ग दावित ।
मर्त्यालागी परमामृत । पाजावयासी पातला ।। २१ ।।



धर्मग्लानी आली भारी । अर्थसंपन्न दुराचारी ।
झाले बलवान भ्रष्टाचारी । मिरविती थोरी स्वत:ची ।। २२ ।।
संस्कृतीचे अध:पतन । चैतन्य लोपले जीवनातुन ।
विवेक गेला झाकाळुन । उद्दिष्ट विकृत जाहले ।। २३ ।।
खरा धर्म न कळे कोणा । आम्ही करू तीच उपासना ।
म्हणती थोतांड अन्य मतांना । केवळ माझाच पंथ खरा ।। २४ ।।
हिंदू ख्रिश्चन मुसलमान । बुद्ध पारसी यहुदी जैन ।
म्हणती एकच अमुचा जाण । धर्ममार्ग खरा असे ।। २५ ।।
स्वधर्माची तत्त्वे नेणती । परी दुसऱ्याचा द्वेष करिती ।
आपुले खरे करण्याप्रती । युद्ध करिती संहारक ।। २६ ।।
मानव नच ओळखे मनुजा । की ही भगवंताची प्रजा ।
म्हणती वंश श्रेष्ठ माझा । इतरां योग्यता सेवकांची ।। २७ ।।
वंशजातिधर्माभिमान । यांनी लोक गेले भारुन ।
करावयासी रणकंदन । सुसज्ज होती अविलंबे ।। २८ ।।
मारावयास धाविती लोक । तरीही म्हणविती धार्मिक ।
अनाचार करुनी एक । म्हणविती स्वत:स सदाचारी ।। २९ ।।
न जाणे निजधर्म ख्रिश्चन । न कळे येशूची शिकवण ।
आदित्यवारी प्रार्थना करुन । धर्म पाळतो वाटतसे ।। ३० ।।
मशिदीस जाई मुसलमान । प्रार्थना करी हप्त्यातुन ।
परंतु जाणत नसे खूण । महंमदाने कथिलेली ।। ३१ ।।
आणि हिंदू न जाणे वेद । वायाच वागवी ज्ञानमद ।
मताभिमान धरुनी वाद । करिती अपव्यय काळाचा ।। ३२ ।।
अनेक जाहले धर्मवादी । आपुला धर्महि न कळे आधी ।
तथापि बनती वितंडवादी । आकलन होइना तत्त्वाचे ।। ३३ ।।



बाह्योपचार केवळ करुन । वाटे प्राप्तव्य मिळाले पूर्ण ।
तथापि हृदय राहिले मलिन । बोध होइना सत्याचा ।। ३४ ।।
कोणी म्हणती जगतावर । आमुचाच असे अधिकार ।
इतरे जन केवळ चाकर । आमुची सेवा करावया ।। ३५ ।।
विज्ञानावर देउनी भर । जडसृष्टीवर अधिकार ।
मग मेळविल्या अपरंपार । वस्तु सुखोपभोगाच्या ।। ३६ ।।
विज्ञानाचा एकेक शोध । करू लागला श्रद्धा विद्ध ।
मग जन होती हतबुद्ध । धर्मभावना लोपतसे ।। ३७ ।।
जडाच्या मागे असे शक्ती । मूढ न जाणिती तिजप्रती ।
सुखोपभोग मिळुनही शांती । मनास तयांच्या लाभेना ।। ३८ ।।
विज्ञानाने भोग मिळाले । सुख शरिराला अपार झाले ।
तथापि मन मात्र राहिले । अशान्त अध्यात्मावाचुन ।। ३९ ।।
विज्ञानाची वाढ जाहली । संहारक साधने निघाली ।
वाटे विनाशाची आली । पाळी सकळ जगतावर ।। ४० ।।
त्या साधनांचा दुरुपयोग । होता विनाश पावे जग ।
जैसी काननालागी आग । लागता काही उरेना ।। ४१ ।।
अध्यात्माविण विज्ञान । सर्वनाशास होते कारण ।
नीतिमूल्ये अध्यात्माविण । कोणालाही नाकळती ।। ४२ ।।
नसता यथार्थ धर्माचरण । अध्यात्म जाणू शके कोण ।
यास्तव धर्माचे अधिष्ठान । अवश्य असले पाहिजे ।। ४३ ।।
सद्धर्माचा गाभा त्याग । परी जन शोधू लागले भोग ।
तेणे लुप्त जाहला योग । विनाशासन्निध जग गेले ।। ४४ ।।
धर्मज्ञान लोपले सगळे । मानव संदेहवादी जाहले ।
बहुत वाद उदयास आले । विरोध वाढला सर्वत्र ।। ४५ ।।



तेथुनी जगताला ओढुन । सन्मार्गावर आणिल कोण ।
नातरी विनाश संपूर्ण । निश्चित ठरला जगताचा ।। ४६ ।।

एवढा गडद अंधकार । पसरला सर्व जगतावर ।
कोण ज्ञानाचा दिनकर । करणार निवारण विघ्नांचे ।। ४७ ।।

एवढी सकळ जगतावरी । धर्मग्लानी आली भारी ।
अविद्येचिया महापुरी । वाहू लागले सकळीक ।। ४८ ।।

पाश्चात्त्यांच्या समवेत । जडवाद आला भारतात ।
ऐहिक पारलौकिक समस्त । कार्याकार्य विसरला ।। ४९ ।।

आसेतुहिमाचलपर्यंत । भारत पडला दास्यात ।
अस्मिता जाहली अस्तंगत । विवेकभ्रष्ट लोक जाहले ।। ५० ।।

न कळे कोणा राजकारण । धर्म कला लोपले पूर्ण ।
अर्थव्यवस्था कोसळुन । दिङ्मूढ जाहले जन सारे ।। ५१ ।।

निष्क्रियता आली जनात । भिकारी जाहला भारत ।
निरर्थक विधिसंकेत येत । भोळ्या श्रद्धा वाढल्या ।। ५२ ।।

शुद्धाशुद्धता क्रिया कर्म । ऐशा जडात पडला धर्म ।
सत्तत्त्व जे गाती निगम । विसर पडला तयाचा ।। ५३ ।।

काही विचारी सरसावले । म्हणती कोठे तरी चुकले ।
म्हणुनी अवनतीला गेले । राष्ट्र आपुले त्याकारणे ।। ५४ ।।

पुरातन आपुल्या धर्मश्रद्धा । वाटू लागल्या त्या आपदा ।
यज्ञक्रियाही नानाविधा । वाटु लागल्या निरर्थक ।। ५५ ।।

भारताचे ध्येय त्याग । विसरुनी येऊ लागले भोग ।
परकीयांचे विचार मग । सत्य वाटती सर्वही ।। ५६ ।।

मुसलमानांनी भली भली । मोठमोठी देउळे पाडिली ।
देखताच मूर्ती तोडिली । केले बहुत अत्याचार ।। ५७ ।।



परि हिंदूंची धर्मभावना । तयांना मोडता येइना ।
होतसे मूर्तीची स्थापना । पाठ फिरताच तयांची ।। ५८ ।।
आता ख्रिश्चन राजे आले । त्यांनी देउळ नाही पाडिले ।
परंतु ऐसे शिक्षण दिधले । श्रद्धा लोपली धर्माची ।। ५९ ।।
बहुत पातले पाद्रीलोक । म्हणती देव कैचे अनेक ।
दगडास भजता निःशंक । देव म्हणुनी मूर्खांनो ।। ६० ।।
लोकांचे त्या मानुनी सत्य । देवालयात न जाती बहुत ।
गेली अस्मिता अस्ताप्रत । खरेच वाटे परक्यांचे ।। ६१ ।।
मूर्ती तयांनी नाही फोडिली । भावना तथापि मोडिली ।
पाश्चात्त्यांची ऐसी शैली । पडिले पुढारी भ्रमामधे ।। ६२ ।।
अनेक देवांचे उपासन । आणिक पूजणे पाषाण ।
काय लाभ यांच्यापासुन । वाटे कारण पतनासी ।। ६३ ।।
व्रतवैकल्ये उपवास । जपतपादि क्रिया विशेष ।
तिलांजली द्यावया त्यांस । पुढारी पुरुष सरसाविले ।। ६४ ।।
पाश्चात्त्यांच्या धर्तीवर । समाजरचनेचा विचार ।
करू लागले थोर थोर । म्हणती अगती तयाविना ।। ६५ ।।
अनेक देवतांचे पूजन । वाटू लागले मूर्खपण ।
वाटे एकाच देवालागुन । पाश्चात्त्यांपरी प्रार्थावे ।। ६६ ।।
करूनिया विचारमंथन । ब्राह्मोसमाज केला स्थापन ।
मूर्तिपूजेचा अव्हेर करुन । अव्यक्तासी उपासती ।। ६७ ।।
आर्यसमाज स्थापन झाला । प्रार्थना समाजही निघाला ।
अनेक पंथ ते उदयाला । आले भारतदेशामधे ।। ६८ ।।
म्हणती करू तीच प्रार्थना । आम्ही करू ती उपासना ।
येर पंथ जे असती नाना । व्यर्थ सर्व ते समजावे ।। ६९ ।।



अनेक धर्म आणि पंथ । भांडू लागले आपसांत ।
हिंसाचार मातले बहुत । नावाखालीच धर्माच्या ।। ७० ।।
बळाचा करुनी वापर । धर्माचे सत्यत्व ठरणार ।
अनवस्था ऐसी जगभर । विचारधारा लोपली ।। ७१ ।।
वाढली साधने यांत्रिक । सुखोपभोग शारीरिक ।
मिळू लागल्यामुळे अनेक । कृतार्थ झालो वाटतसे ।। ७२ ।।
एवढी जडवादाची लाट । प्रचंड उठली भारतात ।
धर्मश्रद्धा जुन्या समस्त । लोप पावती वाटतसे ।। ७३ ।।
कलकत्तानगरी तयातुन । राजधानीचे मोठे ठिकाण ।
भारताचे केन्द्रस्थान । जडवादाचे आगर ते ।। ७४ ।।
सर्वत्र जडवाद तेथुनी पसरे । व्यापुनी टाकी भारत सारे ।
संदेहव्याळे महाघोरे । केवढी मिठी घातली ।। ७५ ।।
ऋषीमुनी जे करिती जतन । परंपरेने दिव्य ज्ञान ।
जडवादाच्या खाली दबुन । वाटे जाईल विलयाला ।। ७६ ।।
कलकत्ता विद्यापीठातुन । विद्यार्थी पदवी घेउन ।
प्रतिवर्षी नेमेकरुन । समाजामधे मिसळती ।। ७७ ।।
निरीश्वरवाद स्वीकारुन । करू लागती प्रतिपादन ।
म्हणती सुखे जी इंद्रियजन्य । ती मात्र सत्य समजावी ।। ७८ ।।
परस्परांचे विरोधक । समजती धर्म सकळीक ।
सर्व शोधिती तत्त्व एक । विसर पडला तयांलागी ।। ७९ ।।
एकचि सत्य सांगावयासी । धर्ममते आली उदयासी
हे न जाणता जन मानसी । करिती द्वेष दुसऱ्यांचा ।। ८० ।।
सनातन धर्माचा वास । आहे सकळही धर्मांस ।
जसा प्रत्येक वस्तुमात्रास । वास असे ईश्वराचा ।। ८१ ।।



एकाच सनातन धर्माचे । सकळही धर्म पंथ साचे ।
सहोदर एकमेकांचे । सर्व धर्मपंथ असती ।। ८२ ।।
ऐसा येता मनी विचार । न राहेच द्वेष अणुमात्र ।
विभिन्न धर्मी सकळ नर । त्याच सत्याचे उपासक ।। ८३ ।।
भिन्न प्रकारे करिता स्तवन । ईश्वराला होई अर्पण ।
जशा अनेक नद्या असुन । मिळतात महासागराला ।। ८४ ।।
ऐसे प्रतिपादावयालागी । अनुभवी आणि महात्यागी ।
पुरुषोत्तम तो यावा जगी । वाट मेदिनी पाहतसे ।। ८५ ।।
अशा वेळी परमेश्वराला । प्रत्यक्ष जयाने पाहिला ।
परमेश्वरासी बोललेला । अवश्य होता महापुरुष ।। ८६ ।।
आचरूनिया घोर तपाला । अनुभव जयाने घेतला ।
जगास सांगण्या समर्थ झाला । हवा होता पुरुष असा ।। ८७ ।।
यास्तव अवतार घेतला । कार्य केले कलकत्त्याला ।
कारण तोच बालेकिल्ला । असे निरीश्वर वादाचा ।। ८८ ।।
तेथूनच जडाचा विचार । पसरत होता भारतभर ।
तोच करावयाला सर । कार्यस्थळ केले कलकत्ता ।। ८९ ।।
जैसा मुळी घालिता कुठार । सर्व शाखांसह तरूवर ।
संपूर्ण पडतो धरणीवर । तैसा जडवाद पडावा ।। ९० ।।
यास्तव अति पवित्र महान । अति अद्‌भुत चरित संपूर्ण ।
करुनी कलकत्ता केन्द्रस्थान । पेढी स्थापिली ज्ञानाची ।। ९१ ।।
तया ज्ञानप्रकाशात । जडवाद वितळेल समस्त ।
परमामृताच्या पुरात । विश्व डुंबेल स्वसुखाने ।। ९२ ।।
सकळ धर्मांचे साधन । आचरोनिया परिपूर्ण ।
जाणुनी तेथील तत्त्वज्ञान । करील प्रदान जगताला ।। ९३ ।।



कर्म ज्ञान उपासना । साधना भेदे पंथ नाना ।
परी सत्य द्विधा होइना । सर्व धर्मांचे सारच ते ।। ९४ ।।
एकाच सत्याचे उपासक । सर्व धर्मांचे असती लोक ।
यास्तव आपण सकळ एक । अवनीवरले मानव ।। ९५ ।।
तत्त्वाची या करण्या पूर्ती । सर्व धर्मांची प्रत्यक्ष मूर्ती ।
अवतरली या अवनीवरती । रामकृष्ण रूप घेऊनिया ।। ९६ ।।
त्यांनी एकाच धर्मावर । सांगितला नाही अधिकार ।
उद्ध्वस्त नाही केला अपर । धर्म या महापुरुषाने ।। ९७ ।।
सत्य असती धर्म सकळ । एकाच्याच शाखा केवळ ।
ऐसी दृष्टी अति विशाळ । दिधली तयांनी जगतास ।। ९८ ।।
सर्व धर्मांचे करुनी साधन । अंतिम ध्येय संपादुन ।
राहिले सर्वांस आदर्श होउन । जगद्गुरूपण भूषविले ।। ९९ ।।
लौकिक शिक्षणाला काही । पुस्तकी विद्येला अल्पही ।
अध्यात्ममार्गी किंमत नाही । प्रमाण येथे अनुभूती ।। १०० ।।
हेच प्रत्यक्ष दावण्यासाठी । अशिक्षित राहिला जगजेठी ।
आणि निजनिश्चयापाठी । आत्मानुभव प्राप्त केला ।। १ ।।
पाश्चात्त्यांचे सकळ भोग । कलकत्त्यात झाले सवंग ।
वाटे भोगीजनांचा स्वर्ग । कलकत्ता शहर जाहले ।। २ ।।
पैशावाचुनी कोणी कोणा । आप्त नोळखे आप्तजना ।
तेथे त्यागिले धनकांचना । अपूर्व केले भगवंते ।। ३ ।।
मुद्रांची ती काय मात । न लावितो धातुपात्रास हात ।
त्याग महान अत्यद्भुत । स्वत: आचरुनी दाखविला ।। ४ ।।
कामिनी जवळ असुनी काम । जिंकिला, ऐसा केला विक्रम ।
ठेविला आदर्श अप्रतिम । जगतापुढे या काळी ।। ५ ।।



बुद्धदेव हा पुनरागत । काय पुनरपी आला ख्रिस्त ।
महंमद परतला जगतात । झरथुष्ट्र जुहुवा पातले ।। ६ ।।
सर्वहि धर्म असती सत्य । जगताला हे सांगण्याप्रत ।
परिषद धर्मांची समस्त । मूर्तिमंत येथे अवतरली ।। ७ ।।
येथे प्रत्यक्ष झाले वेद । लोपती सर्वहि विवाद ।
प्रकाशिले ज्ञान विशुद्ध । अज्ञानतम ते लोपले ।। ८ ।।
प्राचीन काळी होउनी राम । जन्मास आला मेघःश्याम ।
होउनि श्रीकृष्ण पुरुषोत्तम । द्वापारयुगात अवतरला ।। ९ ।।
तोचि पुनरपी भगवान । सांप्रत काळी कृपाघन ।
होउनि आला रामकृष्ण । जगतालागी तारावया ।। १० ।।
सर्व धर्मांचे करुनी साधन । धर्म उजळिले परिपूर्ण ।
प्रकाश दिधला जगालागुन । नवाच उत्साह संचारला ।। ११ ।।
रुढीचे विकृत रूप गेले । सत्यत्व धर्माला लाभले ।
तीर्थत्व तीर्थाला मिळाले । मानवा लाभली मानवता ।। १२ ।।
ज्ञान मिळाले ज्ञानार्थ्याला । योगार्थ्याला योग मिळाला ।
भक्ति लाभली भक्तजनांला । कर्मिया मिळाला कर्मयोग ।। १३ ।।
येथे वेदान्त जाहला सिद्ध । शास्त्रांस आला यथार्थ बोध ।
पुराणे कथिती नानाविध । सत्यत्व कळले तयांचे ।। १४ ।।
बायबल कुराण धर्मग्रंथ । सकळ सत्यत्व पावती येथ ।
प्रयोगशाळा मूर्तिमंत । सर्व धर्मांची उघडली ।। १५ ।।
शिष्यांस मिळाला श्रीसद्गुरू । जगतास मिळाला जगद्गुरू ।
मानवालागी परमेश्वरू । कलियुगामाजी सापडला ।। १६ ।।
अध्यात्मज्ञानाची ही मूर्ती । कर्मयोगाची सहजस्फूर्ती ।
मूर्तरूप जाहली भक्ती । योगमार्ग हा प्रकटला ।। १७ ।।



तेजांचे जे महातेज । विश्वकल्याण करुनी काज ।
घनवट होउनिया आज । प्रकट जाहले भूमीवर ।। १८ ।।

बुद्धिलागी नसे रिघाव । कुंठित होई मनाची धाव ।
परेचाहि जेथे अभाव । कुठले नाव इंद्रियांचे ।। १९ ।।

जेथे भाव आणि अभाव । दोहोंचाही नसेचि ठाव ।
सगुण निर्गुण भेदभाव । मुळिच लोपती ज्या स्थानी ।। १२० ।।

नाही प्रकाश अंधकार । नाही चर वा नाही स्थिर ।
सकळ जगत हे चराचर । माया जयाची चालवी ।। २१ ।।

ऐसे असे जे केवळ शुद्ध । अनिर्वाच्य म्हणुनी प्रसिद्ध ।
जयास पावता ऋषी सिद्ध । अध्यात्म बोध मिळविती ।। २२ ।।

जयाच्या तेजाने दिनकर । प्रकाशवितो जगत् समग्र ।
जयाच्या शक्तीमुळे समीर । मेदिनीवरती फिरत असे ।। २३ ।।

पाणी होतसे प्रवाहित । दाहकत्व येई अग्नीप्रत ।
शक्तिने जयाच्या फिरतात । अंतराळात ग्रहतारे ।। २४ ।।

जयाच्या तेजे उजळे प्रकाश । प्राणत्व येतसे प्राणास ।
विश्व येतसे आकारास । लय पावतसे कल्पांती ।। २५ ।।

ऐसे परात्पर जे ब्रह्म । अनिर्वाच्य वदती निगमागम ।
अगम्य अनंत निरूपम । सार्वभौम जे आहे ।। २६ ।।

परब्रह्म ते सनातन । जगाचे करण्या कल्याण ।
सांप्रत होउनी रामकृष्ण । अवनीवरती अवतरले ।। २७ ।।

पूर्वी श्रीनरनारायण । आचरुनी तपे महान ।
पावन केले बदरीवन । कराया कल्याण जगताचे ।। २८ ।।

सांप्रत ते नरनारायण । विवेकानंद रामकृष्ण ।
पुनरपि अवतार घेउन । साधती कल्याण जगताचे ।। २९ ।।



श्रीरामकृष्णांचे चरित्र । अतीव मंगल अत्यंत पवित्र ।
शांतिसुखाचा सर्वत्र । करील वर्षाव निश्चये ।। १३० ।।
परम पुरुष श्रीनारायण । येत असे अवतार घेउन ।
पवित्र करुनी अंत:करण । कथा पावन परिसावी ।। ३१ ।।
भगवंताच्या कथेचे श्रवण । सदैव मनाने करिता मनन ।
शक्त्यनुसार अनुसरण । करिता होतसे महालाभ ।। ३२ ।।
भगवंताचे नामस्मरण । करुनी पवित्र करावे मन ।
भक्तिने भरावे अंत:करण । सहज सद्गती मिळवा हो ।। ३३ ।।
ही तर महापर्वणी पातली । पावन करण्या गंगा आली ।
आळस सोडुनी अशा वेळी । हित आपुले साधा हो ।। ३४ ।।
मोक्षाचे अति सोपे साधन । सांगते झाले रामकृष्ण ।
जिवांना शिव समजून । सेवा तयांची करावी ।। ३५ ।।
अहंकार तो द्यावा सोडुन । मिळेना मोक्ष त्यागावाचुन ।
नित्य करावे सत्य भाषण । हीच तपस्या कलीयुगी ।। ३६ ।।
करावे नामसंकीर्तन । एकान्त स्थळी कधी जाउन ।
करावे हरिचे गुणगान । ध्यान एकाग्र करावे ।। ३७ ।।
रामकृष्णांची बोधवचने । शांतिदायक विश्वाकारणे ।
वेदोपनिषदे नम्रत्वाने । मुखातुनी पडती बाहेर ।। ३८ ।।
सोडुनी द्या हो सकळ दंभ । करू नका आता विलंब ।
भगवच्चरित्र अमृतकुंभ । सेवन करा हो तयाचे ।। ३९ ।।
रामकृष्ण अवतारवरिष्ठ । कथा ही त्यांची अतीव श्रेष्ठ ।
तेथे रघुपति होता भाट । साफल्य समजतो जन्माचे ।। १४० ।।
श्रीरामकृष्ण कथामृत । रघुपति प्रेमाने सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १४१ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा पहिला अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय दुसरा

जयजयाजी रामकृष्णा । मना लागली दर्शन तृष्णा ।
भक्तजनांच्या जीवना । जीवन होउनी शांतवी ।। १ ।।

धर्मास जेव्हा ग्लानी येई । तेव्हा मी अवतार घेई ।
ऐसी भगवंताने ग्वाही । दिधली गीतोपनिषदात ।। २ ।।

जडक्रियाच रूढ होती । धर्मतत्त्वे नच जाणती ।
यासचि धर्मग्लानी म्हणती । येती अवतार निवारया ।। ३ ।।

इंद्रदेव वायू हुताशन । धरिता शक्तीचा अभिमान ।
केले तयांचे गर्वहरण । प्रकट होउनी परमेश्वरे ।। ४ ।।

रावणादि होती मत्त । लाविती वेदार्थ विपरीत ।
वाढले अनाचार अनर्थ । सीताकांत ये तेधवा ।। ५ ।।

उपनिषदांचा नेणोनि अर्थ । वाद करू लागले पंडित ।
विरुद्ध मते प्रतिपादित । काय सत्य ते कळेना ।। ६ ।।

कोणी म्हणती श्रेष्ठ ज्ञान । कोणी योगक्रिया महान ।
म्हणती कोणी उपासन । पडिले विद्वान संभ्रमात ।। ७ ।।

तेधवा येउनी श्रीकृष्ण । श्रुतींचे ऐक्य ते दाखवुन ।
सकलांचाच केला मान । ज्ञानउपासन योगांचा ।। ८ ।।

यज्ञक्रियाच जाहल्या रूढ । त्याच धर्म मानिती मूढ ।
तेधवा दयाधर्माचे गूढ । बुद्ध देवाने सांगितले ।। ९ ।।

येशुख्रिस्त आणि महंमद । धर्मतत्त्वे करण्या विशद ।
यहुदी अरबांस करुनी बोध । सांगती सत्तत्त्व जगताला ।। १० ।।



आता रामकृष्ण येउन । सांगती सर्वहि धर्म महान ।
एकचि सत्य करिती कथन । विरोध येथे नसे मुळी ।। ११ ।।
अवतार अनेक जाहले । भागवतात व्यासे वर्णिले ।
पुढे होतील ऐसे लिहिले । साच जाहले येधवा ।। १२ ।।
ते बोल करावयाला सार्थ । वाढवावयाला परमार्थ ।
श्रीरामकृष्ण भगवंत । अवतरले भूतलावरी ।। १३ ।।
धर्मग्लानि आता जाइल । पाखंड नाहीसे होइल ।
जडवाद विनाश पावेल । परमेश्वराच्या इच्छेने ।। १४ ।।
अनेक पंथ धर्म भिन्न । त्यांचे होईल रहस्यकथन ।
सकळांचे एकसूत्रीपण । कळुनी येइल जगताला ।। १५ ।।
निरीश्वरवाद तो लोपेल । मूर्तिपूजा मान्यता पावेल ।
अध्यात्माचा लाभ होइल । दिसेल सन्मार्ग स्पष्टपणे ।। १६ ।।
पदरजे जयाची लागुन । पूर्वी मेदिनी झाली धन्य ।
पुनरपि तो श्रीभगवान । शुभागमन करितसे ।। १७ ।।
अविद्याडोही बुडती जन । पाहुनी कळवळे अंतःकरण ।
अमित गुणराशिसंपन्न । दयार्द्र होउनी येतसे ।। १८ ।।
सहस्रावधि वर्षांचे अनुभव । आत्मसात करुनी सर्व ।
वाढविला शास्त्रांचा गौरव । सत्यता पावली पुराणे ।। १९ ।।
निघाले युगप्रयोजन । म्हणुनी आले श्रीभगवान ।
पेठचि मुक्तिची उघडुन । उदार होउनि दान दिले ।। २० ।।
रक्षिला धर्म सनातन । सकळ मेदिनी केली पावन ।
सन्मार्गगामी केले जन । केला उद्धार बहुतांचा ।। २१ ।।
पूर्वी घेउनी अवतार । करी जो सृष्टिचा उद्धार ।
तो परमात्मा अति उदार । करुणार्द्र होउनी पातला ।। २२ ।।



सांगितले सकल जगास । मते तितुके मार्ग खास ।
अंत:करणे अनुष्ठानास । करिता होतसे ईशलाभ ।। २३ ।।

कामगंधहीन हे चित्र । प्रभुवराचे अमोघ चरित्र ।
गाता जन होती पवित्र । कल्याण होतसे सकलांचे ।। २४ ।।

पूर्वीही अवतार जाहले । साधनेतिहास नाही लिहिले ।
आत्मोन्नत ते कसे झाले । कशी आचरिली तपस्या ।। २५ ।।

त्यांना आल्या ज्या अडचणी । कशा दूर केल्या तयांनी ।
यापरी माहिती लिहुनी । नाही ठेविली तयांची ।। २६ ।।

परी यावेळी साधनेतिहास । उपलब्ध जाहला जगतास ।
मागे सारिले गांभीर्यास । निरभिमानाने प्रभूंच्या ।। २७ ।।

रामकृष्णांचा बालक भाव । उत्कट असल्यामुळे सदैव ।
तिऱ्हाइतपणे शब्द सर्व । सहज येती मुखातुनी ।। २८ ।।

परमावधि निरभिमानाची । हीच असे सर्वथा साची ।
की परक्याप्रमाणे स्वत:ची । गोष्ट येई आपोआप ।। २९ ।।

रामकृष्ण अवतारवरिष्ठ । साधनेतिहास त्यांचा श्रेष्ठ ।
या काळी कळला चोखट । लाभ जाहला जगताला ।। ३० ।।

त्या प्रकाशामाजी तत्त्वता । आपुला मार्ग चोखाळिता ।
परमशान्ती लाभे चित्ता । साफल्य होतसे जन्माचे ।। ३१ ।।

आता ऐका कथा निर्मळ । जैसे सहस्रदल कमळ ।
अथवा पवित्र गंगाजळ । शुद्ध रविकरासारिखे ।। ३२ ।।

पुण्यभू भरतखंडात । प्रसिद्ध बंगाल प्रांतात ।
हुगळी नामक जिल्ह्यात । कामारपुकुर गाव असे ।। ३३ ।।

बरद्वान नगराहुन । जगन्नाथपुरीलागुन ।
जाणारा मार्ग तेथुन । होता तया काळाला ।। ३४ ।।



त्या मार्गाने साधुसंत । यात्रा करणारे भक्तिमंत ।
पायी तीर्थे करित करित । जाती जगन्नाथपुरीला ।। ३५ ।।
कामारपुकुरच्या आसमंतात । धानाची शेते असती अमित ।
खेड्यामधे असे बहुत । सुखसमृद्धि त्या काळासी ।। ३६ ।।
जमीन सुपिक अत्यंत । मुबलक असती खाद्य पदार्थ ।
त्या निर्मळ वातावरणात । आनंद मनात वसतसे ।। ३७ ।।
शेतात करिती अपार कष्ट । शरिरे जनांची धष्टपुष्ट ।
येता कुणावर अरिष्ट । वारिती सकळ गावकरी ।। ३८ ।।
शेतात पिके धान बहुत । शतदल पद्मे असती तळ्यात ।
आम्रवृक्षे शोभिवंत । गुरांस चारा चरावया ।। ३९ ।।
काही कोणास नसे भीती । परस्परात अत्यंत प्रीती ।
जनात वसतसे आनंद शांती । सुखाने नांदती गावकरी ।। ४० ।।
गावास असे जमिनदारी । कोणी कुणाचा नसे वैरी ।
तथापि क्वचित दुराचारी । असती वस्तीस गावाच्या ।। ४१ ।।
कामारपुकुरच्या पश्चिमेस । देरे गाव एक कोस ।
त्या गावी ब्राह्मणवंशास । चतर्जी नामक कुळ होते ।। ४२ ।।
असे चतर्जी माणिकराम । पुत्र तयाचे क्षुदिराम ।
निधीराम कानईराम । रामशीला कन्यका ।। ४३ ।।
रामभक्ती परंपरागत । असे त्यांच्या घराण्यात ।
क्षुदिराम भाविक रामभक्त । पूजेविण अन्नही सेविना ।। ४४ ।।
कन्याविक्रय करिता ब्राह्मण । न करी तेथे उदकपान ।
न घेई शूद्रांकडचे दान । निष्ठावान असा असे ।। ४५ ।।
पितयाच्या निधनानंतर । क्षुदिरामावर पडला भार ।
योगक्षेम तो चालविणार । एक श्रीराम म्हणत असे ।। ४६ ।।



प्रथम पत्नी निवर्तली । मग दुसरी पत्नी केली ।
चंद्रामणी साध्वी आगळी । परम भाविक पतिव्रता ।। ४७ ।।
रामकुमार कात्यायनी । पुत्र आणि कन्या दोन्ही ।
अपत्ये झाली तिजलागुनी । मग घोर अनर्थ ओढवला ।। ४८ ।।
सत्यधर्माप्रमाणे वागुन । संसार करणे असे कठिण ।
याचा क्षुदिरामालागुन । लवकर आला अनुभव ।। ४९ ।।
देरेगावचा जमिनदार । रामानंद राय निष्ठुर ।
खोटी फिर्याद कुळावर । करिता झाला एकदा ।। ५० ।।
आपुल्यातर्फे क्षुदिरामास । खोटी साक्ष द्यावयास ।
नेऊ पाहता त्या विप्रास । पडिले मोठेच संकट ।। ५१ ।।
जो सत्याचीहि धरुनी कास । जाऊ न इच्छी कोर्टास ।
तेथे असत्य सांगावयास । काय जाई न्यायालया ।। ५२ ।।
जमिनदाराचे न मानिता वचन । होईल तो क्रोधायमान ।
समग्र घेईल हिरावुन । घोर विघ्न आणील तो ।। ५३ ।।
क्षुदिरामाने हे जाणिले । परि साक्ष देणे नाकारिले ।
खरोखर संकटकाळी कळे । सत्पुरुषाची परीक्षा ।। ५४ ।।
जमिनदार होता बंड । क्षुदिरामावर रचे कुभांड ।
क्षुदिरामास म्हणे भांड । न्यायालयात मजसवे ।। ५५ ।।
प्रकरण गेले न्यायालयात । क्षुदिराम झाला पराजित ।
जमिनदार घेई समस्त । मालमत्ता तयाची ।। ५६ ।।
त्यावेळी देरेगावास । टिचभरही क्षुदिरामास ।
जागा न राहे राहण्यास । थोर अनर्थ ओढविला ।। ५७ ।।
दीडशे बिघे होती जमिन । सर्वस्व बसला गमावुन ।
क्षुदिराम होउनी विषण्ण । गाव सोडिता जाहला ।। ५८ ।।



कामारपुकुरास राहणार । सुखलाल गोस्वामी थोर ।
तयाने दिधला आधार । बोलाविले क्षुदिरामाला ।। ५९ ।।
क्षुदिराम आणि सुखलाल । दोघे असती समान शील ।
मैत्री तयांची अति उज्ज्वल । म्हणुनी धावला संकटी ।। ६० ।।
आपुल्या घराचा काही भाग । रिकामा करुनी सवेग ।
क्षुदिरामास दिधला मग । वास्तव्यासाठी तयाने ।। ६१ ।।
दीड बिघा शेतजमिन । क्षुदिरामाला केली दान ।
म्हणे पावला श्रीभगवान । अचिंत्य लीला प्रभूची ।। ६२ ।।
दीडशे बिघे जमिन जाउन । दीड बिघा मिळाली जमिन ।
पूर्व स्थिती आपुली स्मरुन । अंधार सर्वत्र दिसतसे ।। ६३ ।।
अतिशय मोठे संकट येता । भवाची पटते अशाश्वतता ।
उदित क्षुदिरामाच्या चित्ता । भक्ति वैराग्य जाहले ।। ६४ ।।
संसारातही राहुन । उदासिन झाले त्याचे मन ।
करू लागला पूजा ध्यान । ईश्वरचिंतन सर्व काळ ।। ६५ ।।
एकदा क्षुदिराम गावास गेला । परत येताना अतिशय थकला ।
झाडाखाली विसावला । झोप लागली त्या ठायी ।। ६६ ।।
तयास तेथे स्वप्न पडले । बालवेषात श्रीराम आले ।
एक जागा दाखवुनी वदले । उपाशी असे मी या स्थानी ।। ६७ ।।
तुजसमवेत आता येइन । तुझी सेवा ग्रहण करिन ।
प्रभुची कृपा ती पाहुन । हृदय मोदे भरे त्याचे ।। ६८ ।।
नंतर क्षुदिराम जागा झाला । एक जागा दिसली त्याला ।
म्हणे हीच दाविली मजला । जागा श्रीरामचंद्राने ।। ६९ ।।
पाहिली शालिग्राम शिला । भुजंग तिजवर डोलु लागला ।
चाहुल लागता निघुनी गेला । उचलली शिला क्षुदिरामे ।। ७० ।।



पाहताच आश्चर्य पावला । म्हणजे ही असे रघुवीरशिला ।
प्राणप्रतिष्ठा करुनी तिजला । पुजू लागला भक्तीने ।। ७१ ।।

शीतला देवीचे पूजन । करित असे तो प्रतिदिन ।
ईश्वरावर भार घालुन । शांतपणाने वर्ततसे ।। ७२ ।।

कधी कधी धान्य नसावे घरी । चंद्रादेवी निवेदन करी ।
म्हणे राम राहे उपाशी जरी । आपण राहू त्याच्यासवे ।। ७३ ।।

परी त्या दिवसाची अडचण । होतसे कशीतरी निवारण ।
जगत्पालक जगज्जीवन । भार वाहतो सकलांचा ।। ७४ ।।

लवकरचि संपले दुर्दिन । होती दीड बिघा जी जमिन ।
तीतुनी येत असे उत्पन्न । योगक्षेम चालतसे ।। ७५ ।।

तथापि क्षुदिरामाच्या चित्ती । शांती संतोष प्रीती वसती ।
भक्तिभराने प्राप्त होती । दिव्य दर्शने तयाला ।। ७६ ।।

गायत्रीचे करिता ध्यान । होई हृदय आरक्त पूर्ण ।
प्रेमाश्रु येती नयनांतुन । अंत:करणात आनंद असे ।। ७७ ।।

तयाला प्रत्यक्ष दिसावे । शीतळादेवीने आपुल्यासवे ।
फुले तोडावयाला यावे । साह्य करावे परोपरी ।। ७८ ।।

उत्साह वाढला हृदयात । अंत:करणात भक्ती बहुत ।
तेजस्वी वदनमंडळ होत । झाली वृत्ती अति गंभीर ।। ७९ ।।

सद्गुण तयाचे पाहुन । लोक देऊ लागले मान ।
क्षुदिरामाचा सन्मान । करिती ऋषीमुनीसारिखा ।। ८० ।।

क्षुदिराम करित असता स्नान । तळ्यात न शिरे कोणी अन्य ।
मागती तयाचे आशीर्वचन । जन सुखदु:ख प्रसंगी ।। ८१ ।।

श्रीमती चंद्रामणी सती । स्नेहसरलता यांची मूर्ती ।
मातेसमान मान देती । जन गुण पाहुनी तियेचे ।। ८२ ।।



भिकारी साधू संन्यासी । विन्मुख न करी कोणासी ।
शेजाऱ्यांच्याहि बालकांसी । हट्ट कादुनी शांतवी ।। ८३ ।।
भरलेले सदा शांतीने घर । चंद्रा क्षुदिराम मानिती थोर ।
नित्य येती नारीनर । घ्यावया दर्शन तयांचे ।। ८४ ।।
क्षुदिरामाचा असे भाचा । पुत्र भगिनी रामशीलेचा ।
रामचंद या नावाचा । मेदिनीपुरासी वसत असे ।। ८५ ।।
वकिली तो करू लागला । संकटात पाहुनी मामाला ।
पंधरा रुपये प्रतिमासाला । पाठवू लागला निश्चयाने ।। ८६ ।।
क्षुदिरामास भाचा आवडे । नित्य जाउनी त्याच्याकडे ।
भेट घेता मन बापुडे । शांत होतसे तयाचे ।। ८७ ।।
रामचंदाची भगिनी । नाम तियेचे हेमांगिनी ।
श्रीकृष्णचंद्र मुखर्जीलागुनी । दिधली होती शिहडला ।। ८८ ।।
तिजला जाहले चार सुत । हृदयराम त्यांत विख्यात ।
तयाने केली अत्यद्भुत । सेवा श्रीरामकृष्णांची ।। ८९ ।।
कानइराम या नावाचा । भाऊ होता क्षुदिरामाचा ।
रामतारक नामे तयाचा । फार विद्वान पुत्र असे ।। ९० ।।
रामतारकास हलधारी । म्हणत असे जनता सारी ।
परि विद्येचा अहंकारी । पुढती येइल ती कथा ।। ९१ ।।
क्षुदिरामाचे शुद्ध हृदय । जाहले संपूर्ण भक्तीमय ।
भगवद्भाव होता उदय । विसर पडतो ऐहिकाचा ।। ९२ ।।
एकदा फाल्गुन महिन्यात । मेदिनीपुरास असता जात ।
आठ कोस क्रमिता पथ । बिल्ववृक्ष तयाला आढळले ।। ९३ ।।
पानझड होती त्या काळात । म्हणुनी तयाला दिवस बहुत ।
अर्पावयाला शिवाप्रत । मिळाली नव्हती बिल्वपत्रे ।। ९४ ।।




तेथील बिल्ववृक्षाप्रती । कोवळी पाने फुटली असती ।
पाहता क्षुदिरामाच्या चित्ती । अपार आनंद दाटला ।। ९५ ।।
भक्तिभराने अंत:करण । भरुनी आले परिपूर्ण ।
म्हणे पूजीन मदनदहन । बिल्वपत्रांनी सत्वर ।। ९६ ।।
हर्ष न मावे मनात । गेला जवळच्या गावात ।
परडी फडके आणिले विकत । तोडिली पाने बेलाची ।। ९७ ।।
फडके पाण्यात भिजवून । बिल्वपत्रांना केले वेष्टन ।
मेदिनीपुरास करणे गमन । गेला विसरुनी सर्वथा ।। ९८ ।।
मग कामारपुकुरालागुन । आठ कोस आला परतुन ।
महादेवाची पूजा करुन । पाने वाहिली बेलाची ।। ९९ ।।
चंद्रादेवीला कळता मात । झाली अत्यंत आश्चर्यचकित ।
भक्तिचा पुतळा मूर्तिमंत । श्रद्धावंत क्षुदिराम ।। १०० ।।
रामकुमार ज्येष्ठ नंदन । अध्ययन तयाने करुनी पूर्ण ।
करू लागला द्रव्यार्जन । क्षुदिरामास जाहला आधार ।। १ ।।
विवाह त्याचा दिधला करुन । कात्यायनी त्याचे कन्यारत्न ।
तियेचे करुनी टाकिले लग्न । केनाराम बंद्योपाध्यायाशी ।। २ ।।
जेष्ठ पुत्र रामकुमार । चालवू लागला संसार ।
तेव्हा क्षुदिराम रामेश्वर । तीर्थास गेला दक्षिणेकडे ।। ३ ।।
बाणलिंग तेथुनी आणिले । पूजना देव्हारी स्थापिले ।
पुत्ररत्न नंतर झाले । नाव ठेविले रामेश्वर ।। ४ ।।
त्यावर नऊ वर्षे लोटिली । यात्रेस जावे इच्छा झाली ।
गयेस जाउनी त्या काळी । पिंडदान करी क्षुदिराम ।। ५ ।।
वाटे फिटले पितृऋण । ईश्वरे सेवा घेतली करुन ।
श्रद्धासंपन्न तयाचे मन । भरिले अपार आनंदे ।। ६ ।।




रात्री तयाला स्वप्न पडले । गदाधरपदी पिंड अर्पिले ।
आपुले सकळ पितर पातले । धारण करुनी दिव्य देह ।। ७ ।।
पितर करितात पिंडग्रहण । आपणा देती आशीर्वचन ।
क्षुदिराम तयांना करी नमन । धन्य जाहलो वाटतसे ।। ८ ।।
नवल इतुक्यात वर्तले । दिव्य ज्योतिने मंदिर भरले ।
आपुले पितर बाजुस झाले । हात जोडिती तेधवा ।। ९ ।।
दिसले तेथे सिंहासन । दिव्य पुरुष विराजमान ।
पितर दोन ओळी करुन । उभे राहुनी स्तवतात ।। ११० ।।
तेजस्वी तो श्यामसुंदर । हास्यवदन पुरुष थोर ।
क्षुदिरामास पाहुनी सत्वर । आपुल्याजवळी तो पाचारी ।। ११ ।।
क्षुदिराम जणू आकर्षिला । त्याच्यासमोर उभा राहिला ।
नमस्कारुनी स्तवू लागला । पुरुषोत्तमाला नानापरी ।। १२ ।।
दिव्य पुरुष तोषुनी वदला । तुझ्या भक्तिने संतोष जाहला ।
ग्रहण करीन तव सेवेला । पुत्ररूपाने अवतरुनी ।। १३ ।।
क्षुदिराम चेवुनी बोलिला । गदाधराने दृष्टांत दिधला ।
महद्भाग्य आमुच्या उदराला । जन्म घेणार परमेश ।। १४ ।।
महापुरुष घेती जनन । तेव्हा माता पित्यालागुन ।
आध्यात्मिक अनुभव महान । दिव्य दर्शने प्राप्त होती ।। १५ ।।
क्षुदिराम परतला यात्रेहुन । दिसले पत्नीत परिवर्तन ।
मानवी चंद्रा असामान्य । देवीसारखी जाहली ।। १६ ।।
परक्यांचीही काळजी करी । सहानुभूती वाटे अंतरी ।
कोणी वस्तू मागता सत्वरी । देउनि टाकी तयाप्रती ।। १७ ।।
बसण्यापूर्वी जेवणाला । शेजाऱ्यांच्या जाई घराला ।
कोणी उपाशी दिसता तयाला । घरी नेउनी भरवीतसे ।। १८ ।।





क्षुदिराम यांना गयाधामी स्वप्नात झालेलं भगवान विष्णूचं दर्शन व
त्यांच्या घरी जन्म ग्रहण करण्याचं आश्वासन.



निद्रस्त बालक गदाधराच्या जागी
माता चंद्रामणींना झालेले दिव्य दर्शन.



चंद्रामणीदेवींना शिवमंदिरासमोर उभे असताना शिवलिंगातून ज्योती निघून स्वत:च्या शरीरात प्रवेश करीत आहे असा आलेला अनुभव.



चंद्रामणीदेवींना गदाधर पोटी असताना झालेलं चतुर्भुज ब्रह्मदेवाचं दर्शन.

स्वत: थोडे अन्न सेवुन । घालवावा अवघा दिन ।
या परी उदार झाले मन । आत्मवत प्रेम भूतमात्री ।। १९ ।।

अत्युच्च प्रकृतिसंपन्न नर । मातापिता जे असती थोर ।
तेथेच जन्मती अवतार । आदर्श जयांचा जगताला ।। १२० ।।

चंद्रामणीला पाहुनी देव । उचंबळू लागे वात्सल्यभाव ।
श्रीरामचंद्र देवाधिदेव । वाटे आपुले बालक ते ।। २१ ।।

आपुल्या प्राणापेक्षाहि प्रेम । देवावरी करी निष्काम ।
सुखी करावयाला राम । तनमनधनाने झटत असे ।। २२ ।।

वासनामय संसारातुन । तियेचे अलिप्त झाले मन ।
भूतमात्रांच्या प्रेमेकरुन । अंत:करण भरले असे ।। २३ ।।

चंद्रामणिचा सरळ स्वभाव । वक्रतेचे नसेचि नाव ।
स्त्रियांपाशी बोलता सर्व । गोष्टी सांगे मनातील ।। २४ ।।

गुह्य ते मनात ठेवावे । सत्य असत्य मिसळावे ।
चंद्रामणिला हे नसे ठावे । सकळ सांगावे सरळपणे ।। २५ ।।

शुद्धता ऐसी असल्याविण । केवी ये उदरी भगवान ।
चंद्राक्षुदिराम पुण्यवान । म्हणुनी परमेश जन्म घेई ।। २६ ।।

चंद्रादेवी सांगे पतिला । तुम्ही गेले असता गयेला ।
अद्‌भुत स्वप्न पडिले मजला । पाहिला दिव्य पुरुष मी ।। २७ ।।

अदृष्टपूर्व रूप सुंदर । निजलेला अंथरुणावर ।
झोपमोड माझी झाल्यावर । दिसला मजला तसाच तो ।। २८ ।।

मग मात्र भीती वाटली । दिवा लाविला त्या वेळी ।
तयाला ती पाहु लागली । तव तो कोठेचि दिसेना ।। २९ ।।

द्वारहि होते बंद केले । अडसर होते लाविलेले ।
तेव्हा भीतीने मन भरले । झोप नंतर येईना ।। १३० ।।



सकाळी येता शेजारणी । तयांना कथन केली कहाणी ।
त्या म्हणती तुज म्हातारपणी । वेड लागले वाटतसे ।। ३१ ।।
अगे ते तर असे स्वप्न । त्याने इतुकी गेलीस भिउन ।
इतरांना जर करिसी कथन । भलते बोलेल जग तुजला ।। ३२ ।।
ऐसी बोलणी परिसून । मना वाटले असेल स्वप्न ।
मनात निश्चय केला कथन । करू नये हे कोणाला ।। ३३ ।।
आणिक घडले एके दिनी । शिवमंदिराच्या संन्निधानी ।
दिसले शिवाच्या अंगामधुनी । दिव्य ज्योती निघे एक ।। ३४ ।।
दिव्य ज्योतिने मंदिर भरले । तरंगाकार ती झाली दिसले ।
आश्चर्य फार मज वाटले । तव ती आली मजसमीप ।। ३५ ।।
ज्योति माझ्या अंगात शिरली । विस्मये मज मूर्च्छा आली ।
पाणी शिंपुनी माझ्या कपाळी । मजला सावध करिती स्त्रिया ।। ३६ ।।
वाटते त्या दिवसापासुनी । ज्योती उदरात राहिली भरुनी ।
गर्भसंचार मजलागुनी । जाहला ऐसे वाटतसे ।। ३७ ।।
हेही स्त्रियांना सांगितले । त्यांनी मजला वेडी म्हटले ।
भ्रमाने तुज पछाडिले । वायुगुल्म झाला तुजलागी ।। ३८ ।।
परंतु माझी खात्री पटली । मजवर देवे कृपा केली ।
गर्भसंचार या काळी । जाहला माझ्या उदरात ।। ३९ ।।
क्षुदिरामे घातली समजूत । देवाने दाखविले गयेत ।
पुत्रप्राप्ती वृद्धपणात । निश्चित होईल आपणाला ।। १४० ।।
परी कृपा करुनी घननीळ । तुजला जे जे दाखवील ।
एक माझ्यावाचुनी केवळ । अन्य कोणाला वदू नको ।। ४१ ।।
यावर काही लोटता दिन । सकळांस आले आढळून ।
चंद्रामणिचे रूप लावण्य । गर्भारपणाने वाढले ।। ४२ ।।



शेजारणी म्हणती तिज । वृद्धपणी एवढे तेज ।
ठीक चिन्ह हे नाही समज । प्रसुत होउनी मरसील ।। ४३ ।।
सांगितले हे पुराणात । गर्भास जइ ये भगवंत ।
येती देवदेवता अनंत । दर्शनासाठी तयाच्या ।। ४४ ।।
असंख्य देव दर्शना येती । सुगंध पसरे आसमंती ।
जवळ येऊनी गुप्त होती । प्रत्यक्ष दिसती मातेला ।। ४५ ।।
दिसे देव जवळ येती । आपणासी भाषण करिती ।
अपत्यप्रेम देवावरती । फारच वाढले तियेचे ।। ४६ ।।
जे जे स्वये अनुभवावे । पतीला सर्व ते सांगावे ।
क्षुदिरामाने शांतवावे । ईश्वरकृपा ती म्हणुनी ।। ४७ ।।
इतुक्या देवांचे होई दर्शन । नाही पाहिले चित्रातुन ।
आज हंसावरी बसुन । देव आला ती सांगे ।। ४८ ।।
वदन उन्हाने लाल झाले । बघता मजला कारुण्य आले ।
मग मी तयाला विनविले । घेइ कण्हेरी थोडी तरी ।। ४९ ।।
उन्हाने तू फार तापला । पिउनी शांतवी जिवाला ।
ऐसे ऐकुनी तो हासला । मिळुनी गेला वायुरूपी ।। १५० ।।
ऐसे दिसता अनंत देव । घेउनी येती स्वरूपे अपूर्व ।
कधी घेउनी रूप मानव । जवळ येउनी गुप्त होती ।। ५१ ।।
क्षुदिराम समजावी तियेला । महापुरुष जो उदरी आला ।
त्याच्या पवित्र स्पर्शाने तुजला । होतात ही दिव्य दर्शने ।। ५२ ।।
सुशील गरीब हे दांपत्य । देवावर भार घालुनी समस्त ।
महापुरुषाची होते करित । प्रतिक्षा उत्सुक चित्ताने ।। ५३ ।।
ईश्वरावतार पुरुष महान । सकळ जगा जे करिती पावन ।
पुरुष श्रेष्ठ ते घेती जनन । बहुधा दारिद्र्यामधे ।। ५४ ।।



श्रीकृष्ण जन्मला कारागृहात । येशु ख्रिस्त गुरांच्या गोठ्यात ।
शंकराचार्य महंमद प्रेषित । दारिद्र्यातचि जन्मले ।। ५५ ।।

श्रीराम आणि बुद्धगौतम । राजकुळात घेउनी जन्म ।
सोडिते झाले निजधाम । मिसळले सामान्य जनांमाजी ।। ५६ ।।

धर्मग्लानि येई जगती । परि दारिद्र्याच्या कुटीप्रती ।
थोडी फार तरी राहती । धर्मविधाने सदैव ।। ५७ ।।

धर्मसंप्रदायांची माहिती । अवश्य तयांच्या कार्याप्रती ।
तरीच ग्लानी दूर करिती । उन्नतीस नेती धर्माला ।। ५८ ।।

कार्य तयांचे देणे शांती । दु:खी कष्टी मनुजाप्रती ।
दूर करुनी मनाची अशांती । भरावा हृदयात आनंद ।। ५९ ।।

बहुत जनांमाजी मिसळुन । अवस्था तयांची जाणुन ।
भक्ति प्रेम त्यांना देउन । आत्मोन्नत जन करावे ।। १६० ।।

यास्तव ईश्वरावतार थोर । जन्म घेती जेथे दारिद्र्य ।
परी नि:स्वार्थता ईशनिर्भर । शांती प्रेम असे जेथे ।। ६१ ।।

यासाठी श्रीगदाधर । क्षुदिरामाचे दरिद्री घर ।
पाहुनी घेतसे अवतार । संतुष्ट होउनी भक्तीने ।। ६२ ।।

ऋतुराज वसंत पातला । शीतोष्णांचा संगम झाला ।
मधुमय फाल्गुनमास आला । चेतवित नव प्राणांसी ।। ६३ ।।

ब्रह्मानंदाचा एकच कण । सर्व पदार्थ करी रसवान ।
आनंदकणांचे ते प्रमाण । सांप्रत वाढले वाटतसे ।। ६४ ।।

म्हणुनी उत्साह फार वाढला । जगात सर्वत्र आनंद भरला ।
सकळ संसार उल्हासला । शुभागमन श्रीप्रभूंचे ।। ६५ ।।

फाल्गुन शुक्ल प्रतिपदा दिनी । आसन्नप्रसवा चंद्रामणी ।
विचार करू लागली मनी । करित असता स्वयंपाक ।। ६६ ।।



जर आताच होईल प्रसुती । नैवेद्याची मग काय गती ।
क्षुदिरामास सांगता भीती । वदला तो धीर देउनी ।। ६७ ।।

महापुरुष जो असामान्य । तव उदरी करी आगमन ।
पूजासेवेत करुनी विघ्न । येणार नाही तो संसारी ।। ६८ ।।

ऐकुनी पतीच्या वचनाला । संशय तियेचा पळाला ।
मग तो दिवस निघुनी गेला । होउ लागली प्रभात ।। ६९ ।।

शके सतराशे सत्तावनास । फाल्गुन शुक्ल द्वितीयेस ।
पूर्वाभाद्रपदा नक्षत्रास । बुधवार होता त्या दिनी ।। १७० ।।

सन अठराशे छत्तीस । फेब्रुवारी असता मास ।
महिन्याचा सतरावा दिवस । पाश्चात्त्य कालगणनेचा ।। ७१ ।।

अर्ध घटिका रात्र राहिली । चंद्रादेवी प्रसुत जाहली ।
पुत्र प्रसवली त्या काळी । अवतार परमेश्वराचा ।। ७२ ।।

धनी लोहारिण दाई आली । बाळ उचलुनी ठेवी खाली ।
चंद्रादेविची नीट लाविली । तियेने व्यवस्था आस्थेने ।। ७३ ।।

बालकाकडे आली दाई । मूल न दिसे ठेविल्या ठायी ।
भयभीत होउनी सर्वत्र पाही । दीपक मोठा करूनिया ।। ७४ ।।

दिव्य बालक नाळेसहित । जाउनी सरकत सरकत
पडले चुलीच्या राखेत । अंग सर्वही माखले ।। ७५ ।।

संसारपाशामध्ये न राहे । थोर त्यागी होईन स्वये ।
दावण्यास काय प्रभुराये । राख माखली जन्मता ।। ७६ ।।

धनी दाई जाई धावुन । बालकास घेई उचलुन ।
पाहु लागली राख पुसुन । अत्यंत सुंदर स्वरूप ते ।। ७७ ।।

जणू षण्मांसाचे मूल । एवढे तयाचे रूप विशाल ।
विस्मय वाटुनी तिने बाळ । दाखविले सकळ स्त्रियांना ।। ७८ ।।



क्षुदिरामाने ज्योतिषाकडुन । जातक घेतले वर्तवून ।
पूर्वाभाद्रपदा जनन । नक्षत्र होते बाळाचे ।। ७९ ।।
रवि चंद्र बुध जन्मलग्नी । शुक्र मंगळ आणि शनी ।
ग्रह असती उच्चस्थानी । त्यावर दृष्टी गुरूची ।। १८० ।।
या जन्मलग्नाचे सकळ । भृगुसंहितेत कथिले फळ ।
ऐसी व्यक्ती अति निर्मळ । धर्मज्ञ मान्य होत असे ।। ८१ ।।
पुण्यकर्मानुष्ठान करुनी । संप्रदाय नवा तयापासुनी ।
परमेश्वराचा अवतार म्हणुनी । पूज्य होतसे सकलांसी ।। ८२ ।।
गयेत जे का स्वप्न पडिले । प्रत्यक्षात ते सत्य जाहले ।
म्हणुनी मानस आनंदिले । क्षुदिरामाचे तेधवा ।। ८३ ।।
गदाधराने दृष्टांत दिधला । पुत्र होउनी येइन तुजला ।
म्हणुनी नाम नंदनाला । ठेविले तयाने गदाधर ।। ८४ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १८५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा दुसरा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय तिसरा

भगवान रामकृष्णांला । ज्ञानप्रकाश जो प्रकटला ।
उजळले संपूर्ण वसुधातला । नमू तयाला स्वहितार्थ ।। १ ।।

मातापित्यांना दर्शने होती । ईश्वरावतार ते जाणती ।
परंतु काळजी उपजे चित्ती । पुत्रमुखाते पाहूनिया ।। २ ।।

पूर्व काळी असेच झाले । जेव्हा रामचंद्र कृष्ण आले ।
बाळ समजुनी करू लागले । पितर चिंता तयांची ।। ३ ।।

विश्वामित्र मागता रामाला । चिंता पडिली दशरथाला ।
कसा मारिल राक्षसांला । कसा करिल मखरक्षण ।। ४ ।।

अक्रुर येता न्यावयाला । गोकुळी चिंता पडली सकला ।
कंस करिल अपाय याला । बाळे बलराम श्रीकृष्ण ।। ५ ।।

तेवि चिंता करिती पितर । जाणती बालक गदाधर ।
परमेश्वराचा अवतार । विसर परि पडे थोरवीचा ।। ६ ।।

पुत्रमुखाते अवलोकिता । पालनाची लागली चिंता ।
रामचांदने बाळाकरिता । एक गाय पाठविली ।। ७ ।।

यापरी गरज भागत गेली । एकेक वस्तू प्राप्त झाली ।
सकळ जगताला जो पाळी । काय काळजी तयाची ।। ८ ।।

बाळ पितरांचे जीव की प्राण । लळा लाविला सकळांलागुन ।
स्त्रिया कामे करिता मधुन । येती बाळास घ्यावयाला ।। ९ ।।

विचारिता येण्याचे कारण । म्हणती तुझा लबाड जाण ।
वेड लाविले आम्हालागुन । घेतल्यावाचुनी नच करमे ।। १० ।।



यापरी पाच महिने लोटले । उष्टावणाचे दिवस आले ।
क्षुदिरामाने मनी ठरविले । केवळ विधी उरकावा ।। ११ ।।
तथापि ग्रामवासी लोक । म्हणती येऊ सकळीक ।
धर्मादास लाहा भाविक । साह्य करितसे परोपरी ।। १२ ।।
उष्टावणाचा समारंभ झाला । थोर होउनी पार पडला ।
भोजन दिधले बहुत जनांला । आनंद केला उत्सवात ।। १३ ।।
गदाधराची लीला धन्य । घटना घडती असामान्य ।
काय समजेल सामान्य । चमत्कृतिजन्य कथानक ।। १४ ।।
एके दिवशी गदाधराला । दूध पाजुनी निजविला ।
थोड्याच वेळाने घ्यावयाला । आली माता चंद्रामणी ।। १५ ।।
तेथे न दिसेचि गदाधर । दिसला दिव्य पुरुष थोर ।
तिजला भीती वाटुनी सत्वर । क्षुदिरामाला पाचारिले ।। १६ ।।
तो लगबगे येऊन पाहे । तव गदाधर निजलेला आहे ।
परि चंद्रादेवी सांगे स्वये । प्रत्यक्ष पुरुष तो पाहिला ।। १७ ।।
देवऋषी तुम्ही बोलवा । आणि हे लवकर शांत करवा ।
क्षुदिराम बोलला तेधवा । न धरी भीती मनामाजी ।। १८ ।।
आजपर्यंत अद्भुत गोष्टी । बहुत याच्या पाहिल्या असती ।
ही एक त्यांतील निश्चिती । समज चित्ती भिऊ नको ।। १९ ।।
रघुवीर आहे आपुल्या घरी । चिंता तयाला सर्वतोपरी ।
सकळ संकटे तोच निवारी । संदेह न धरी मनामधे ।। २० ।।
परिसुनी पतीच्या वचनाला । चंद्रामणीला धीर आला ।
प्रार्थु लागली परमेश्वराला । कल्याण कराया बाळाचे ।। २१ ।।
गदाधराच्या पाठीवरी । क्षुदिरामाला झाली पुत्री ।
सर्वमंगला ऐसे पितरी । नाम ठेविले कन्यकेचे ।। २२ ।।



कळले क्षुदिराम पित्याप्रती । अलौकिक गदाधराची मती ।
अति अद्‌भुत धारणाशक्ती । ऐकताच होतसे मुखपाठ ।। २३ ।।

काही विषय ते आवडती । काही मनातुनी नावडती ।
उजळणीच्या पाढ्याप्रती । काही केल्या तो म्हणेना ।। २४ ।।

क्षुदिरामाने विचार केला । का शिणवावे बाळकाला ।
आणखी थोर होता तयाला । शिकवू घाई कशासाठी ।। २५ ।।

करितसे खोड्या गदाधर । मग शाळेस धाडिला सत्वर ।
तेथे मित्र मिळाले फार । जाहला आनंद तयाला ।। २६ ।।

अभ्यास नव्हता सान मुलांना । उपस्थिती अवश्य होती त्यांना ।
हळुहळु शिक्षक सोबत्यांना । गदाधर फार आवडला ।। २७ ।।

गदाधर नित्य खोड्या करी । क्षुदिराम कोमल अंतरी ।
न रागवे कधी त्यावरी । ताडण कधिही करीना ।। २८ ।।

दृष्टांत झाला होता गयेला । वाटे महापुरुष हा आला ।
यास्तव सदैव गदाधराला । बोध करी मृदु शब्दांनी ।। २९ ।।

कधी शाळेलाहि न जावे । मित्र बाळाने जमवावे ।
कीर्तनभजनादि ऐकावे । यात्रेस जावे कधी कधी ।। ३० ।।

परंतु पुसता तयाप्रत । गदाधर सदैव सांगे सत्य ।
जेणे दुजांचे होई अहित । ऐशा खोड्या टाळितसे ।। ३१ ।।

सांगता करू नये ऐसे । त्वरित तयाचे कारण पुसे ।
न पटता मान्य करित नसे । करितसे स्वतंत्र विचार तो ।। ३२ ।।

प्रत्येक गोष्टीचे कारण । समजून घेणे असे छान ।
यास पटेल ऐसी कोण । प्रत्येक गोष्ट सांगू शके ।। ३३ ।।

गोष्ट न पटता याच्या मनाला । अव्हेरिल हा पूर्व रूढिला ।
हा न पाळी धार्मिक विधिला । न पटता मनाला सत्यता ।। ३४ ।।



ऐसी क्षुदिरामाला चिंता । योग्यच ती होती सर्वथा ।
परिसता पुढे दिलेली कथा । खात्री मनाची पटत असे ।। ३५ ।।
कामारपुकुराच्या सभोवती । अनेक सुंदर तलाव असती ।
हालदारपुकुर तळ्याप्रती । स्नानास जाती नारीनर ।। ३६ ।।
तळ्यास असती घाट दोन । एक पुरुषांना करण्या स्नान ।
स्त्रियांसाठी असे अन्य । स्नानार्थ वस्त्रे धुवावया ।। ३७ ।।
गदाधरासम बाळे सान । स्त्रियांच्या घाटी करिती स्नान ।
एकदा बहुत बाळके मिळुन । धिंगाणा फार घालिती ।। ३८ ।।
एकमेकांच्या अंगावरी । तळ्यातील उडविती वारी ।
शिंतोडे जाती स्त्रियांवरी । महिला बहुपरी त्रासल्या ।। ३९ ।।
एक महिला रागावुन । म्हणू लागली मुलांलागुन ।
कारट्यांनो धिंगाणा घालुन । का त्रासविता आम्हाला ।। ४० ।।
पुरुषांच्या जा घाटावरी । तेथे गोंधळ घाला भारी ।
वस्त्रे नेसताना नारी । पाहू नये हे न कळे का ।। ४१ ।।
सरल स्वभावी गदाधर । तिजला प्रश्न करी सत्वर ।
स्त्रिया नेसत असता वस्त्र । सांग का बरे पाहू नये? ।। ४२ ।।
प्रश्न ऐकुनी महिला सगळ्या । मुलांवर अधिकच रागावल्या ।
तयांना हाकुनी देत्या झाल्या । निघुनी गेली मग बालके ।। ४३ ।।
गदाधर थोडा विचार करुन । म्हणे शोधिले पाहिजे कारण ।
का न पाहावे स्त्रियांलागुन । काय होतसे तयामुळे ।। ४४ ।।
गदाधर रोज तेथे जाउन । स्त्रिया करित असता स्नान ।
पाहु लागला नेसता वसन । तीन दिन केला उपक्रम ।। ४५ ।।
बोलली होती त्या महिलेला । गदाधर नम्रपणाने वदला ।
परवा मी चार स्त्रियांला । पाहिले स्नाने करिताना ।। ४६ ।।



काल पाहिल्या सहा जणी । आज देखिल्या आठ जणी ।
का हो काकू मजला अजुनी । वाईट काही घडले नसे ।। ४७ ।।
गदाधराचे ऐकता वचन । कौतुक वाटले तिजलागुन ।
मग तयाचा हात धरुन । नेई ती चंद्रामणीकडे ।। ४८ ।।
तियेने हासत हासत । साद्यन्त कथिला वृत्तान्त ।
जवळ घेउनी बाळाप्रत । माता तयाला समजावी ।। ४९ ।।
पाहता स्त्रियांस नेसता वसन । न होई वाईट तुझे जाण ।
परि होतसे तयांचा अपमान । यास्तव उचित नसे ते ।। ५० ।।
ऐकुनी मातेचे मधुर वचन । गदाधर पावला समाधान ।
अशी गोष्ट मग तयाकडुन । घडली नाही पुनरपी ।। ५१ ।।
अशी गोष्ट दिसे लहान । परंतु तिच्यात आशय महान ।
कोणत्याहि गोष्टीचे कारण । प्रयत्न करुनी जाणतसे ।। ५२ ।।
सामान्य वस्तूत सत्यशोध । कराया प्रयत्न नानाविध ।
ऐसी सत्यासाठी अगाध । तळमळ तयाच्या अंतरी ।। ५३ ।।
वृत्ती ही साधकावस्थेत । प्रकर्षाने झाली व्यक्त ।
शोधावयासाठी सत्य । कष्ट अगणित सोसले ।। ५४ ।।
गदाधरास पाठशाळेत । येउ लागला अभ्यास त्वरित ।
वाचन लेखन करण्याप्रत । अल्प काळात तो शिकला ।। ५५ ।।
गदाधराची बुद्धी तीक्ष्ण । त्वरित होतसे आकलन ।
बहुत आवडी वाटे नविन । गोष्टी तयाला शिकण्याची ।। ५६ ।।
गणित विषयाचा कंटाळा । मनापासुनी असे त्याला ।
अगणित जाणावयाला निघाला । काय उपयोग गणिताचा ।। ५७ ।।
अनुकरण करावयाची शक्ती । दिनानुदिन झाली वाढती ।
कुंभार देवतांच्या मूर्ती । करिताना करी निरीक्षण ।। ५८ ।।



तयाची कृती निरखावी । स्वत: मूर्ती बनवावी ।
आवडता खेळ सर्वस्वी । गदाधराचा तो झाला ।। ५९ ।।
नव्या वस्त्राच्या घडीवरिल । निरीक्षण करुनी चित्र सकळ ।
तैसेच मग काढी कुशल । सान चितारी गदाधर ।। ६० ।।
कोठे असता कथापुराण । जातसे तेथे हटकून ।
ऐकतसे ते लक्ष देउन । बघतसे धाटणी वक्त्याची ।। ६१ ।।
स्मरणशक्ती गदाधराची । असामान्य असे साची ।
जे जे पाहे परिसे तयाची । सदैव आठवण राहतसे ।। ६२ ।।
मधुर स्वभाव आनंदी वृत्ती । तशीच परानुकरणप्रीती ।
सरलता आणि भगवद्भक्ती । वाढत असती वयासवे ।। ६३ ।।
क्षुदिराम पिता भक्तिमान । जननी साध्वी सरल महान ।
करू लागला अनुकरण । परिणाम छान जाहला ।। ६४ ।।
गदाधर साहसी निर्भय । थोरांस जेथे वाटे भय ।
ऐशा निर्जन स्थळी जाय । भीती ठाउक तया नसे ।। ६५ ।।
तयाची आत्या रामशीला । तिच्या अंगात येई शीतला ।
हातवारे बडबडण्याला । पाहुनी सकळ घाबरती ।। ६६ ।।
गदाधराचे निर्भय मन । तियेच्या सन्निध जाउन ।
अवस्था तिची अवलोकुन । सांगता झाला मातेला ।। ६७ ।।
असेच माझिया अंगात । येता मजा येईल बहुत ।
ऐकुनि झाले आश्चर्यचकित । माता पिता बंधू जन ।। ६८ ।।
कामारपुकुरच्या उत्तरेस । भुरसुबो गाव एक कोस ।
माणिकराजा नामे पुरुष । उदार श्रीमंत असे तेथे ।। ६९ ।।
तयाने अनेक तळी बांधिली । आमराई लोकोपयोगा दिली ।
लक्षब्राह्मण भोजने झाली । तयाच्या घरी अनेकदा ।। ७० ।।



ऐसा माणिकराजा उदार । क्षुदिरामाचा करी आदर ।
पाहुनी तयाचा सदाचार । आपुल्या गावास बोलावी ।। ७१ ।।
एकदा क्षुदिराम तेथे गेला । सवे घेउनी गदाधराला ।
सहावे वर्ष बालकाला । नुकतेच लागले तेधवा ।। ७२ ।।
गदाधर तेथे खेळला । परिचितापरी व्यवहार केला ।
मधुर स्वभावाने सकला । वेडच लाविले तयाने ।। ७३ ।।
माणिकबंधू रामजयाला । बाळास पाहुनी हर्ष झाला ।
वदता झाला क्षुदिरामाला । सामान्य मुलगा हा नसे ।। ७४ ।।
गदाधर असे असामान्य । याच्यात दैवी अंश महान ।
मुखचंद्रमा याचा पाहुन । होतसे मन आनंदित ।। ७५ ।।
यावर लोटता काही दिन । माणिकराजास पडेना चैन ।
एका खियेला पाठवुन । गदाधराला आणविले ।। ७६ ।।
संध्याकाळपर्यंत खेळुन । आनंदित केले सर्वजण ।
अलंकार खाऊ त्याला देउन । परत नंतर पाठविले ।। ७७।।
गदाधर तेथे आवडला । काही दिवस न येता त्याला ।
पाठवुनी कोणा माणसाला । घरी आणवी माणिकराजा ।। ७८ ।।
अद्‌भुत गदाधराची मोहिनी । वेड लाविले सर्वांलागुनी ।
मिष्टान्न घरी होता स्त्रियांनी । आणुनी तयाला भरवावे ।। ७९ ।।
गोपिका वेड्या पाहुनी कृष्ण । विसरती संसार देहभान ।
सांप्रत गदाधराला पाहुन । वेड लागले त्यासारिखे ।। ८० ।।
स्त्रिया कामे करिता मधुन । चंद्रादेवीकडे येउन ।
करिती आपुले समाधान । पाहुनी बाळ गदाधरा ।। ८१ ।।
गदाधराचे मित्र लहान । खाऊ मिळता तयांलागुन ।
त्यातील काही भाग काढुन । देती आणुनी गदाधरा ।। ८२ ।।



गदाधराचे आनंदी मन । गोड कंठ मधुर भाषण ।
गंधर्वतुल्य त्याचे गायन । जाती मोहुनी नरनारी ।। ८३ ।।
गदाधराचे दृढ शरीर । गुटगुटीत भव्य सुंदर ।
आरोग्यसंपन्न वृत्ती स्वैर । अपार आनंद मनामधे ।। ८४ ।।
कधी कधी कोणा विषयात । अत्यंत एकाग्र होई चित्त ।
मन तन्मय होउनी रमत । विसरुनी जाई देहभान ।। ८५ ।।
निसर्गरम्य दृश्य दिसता । होतसे मनाची एकाग्रता ।
बाल्यातही भावप्रवणता । असे अद्‌भुत तयाची ।। ८६ ।।
एकदा जाता माळावरुन । देखिला नभात कृष्णघन ।
शुभ्र बगळे उडती खालुन । दिसला विरोध रंगांचा ।। ८७ ।।
पाहता पाहता तन्मय झाला । देहभान विसरुनी गेला ।
बेशुद्ध होउनी खाली पडला । सावध केले दुसऱ्यांनी ।।। ८८ ।।
गदाधराचे मातापितर । काळजी करू लागले फार ।
मूर्च्छारोग दुर्निवार । वाटुनी उपचार आरंभिती ।। ८९ ।।
गदाधर सांगे तयाप्रती । ही रोगाची मूर्च्छा नव्हती ।
तेधवा वाहिला माझ्या चित्ती । पूर अपार आनंदाचा ।। ९० ।।
मूर्च्छा काय म्हणावी तिजला । भावसमाधी लागली त्याला ।
कशी कळावी इतर जनांला । उच्च अवस्था तयाची ।। ९१ ।।
बिघाड नाही प्रकृतीला । थकवा तयाला नाही आला ।
तथापि औषधोपचार केला । न यावी मूर्च्छा म्हणोनिया ।। ९२ ।।
न लागावी दृष्ट तयाला । म्हणुनी मातेने बाळाला ।
धाडिले नाही पाठशाळेला । चैनच झाली मग त्याची ।। ९३ ।।
दिवसभर त्याने हिंडावे । मित्रांसह खेळ खेळावे ।
खोड्या कराव्या बागडावे । मौज करावी दिवसभर ।। ९४ ।।



रामचंद वकिल सेलामपुरी । शारदोत्सव प्रतिवर्षी करी ।
उत्सवासाठी तो पाचारी । प्रिय क्षुदिराम मामाला ।। ९५ ।।

क्षुदिरामाची तेधवा प्रकृती । आजारामुळे बरी नव्हती ।
संग्रहणीचा तयाप्रती । आजार होता झालेला ।। ९६ ।।

तथापि आपुले वय झाले । आयुष्यमान कुणाला कळले ।
यास्तव जाण्याचे ठरविले । सेलामपुराला क्षुदिरामे ।। ९७ ।।

क्षुदिराम गेला उत्सवाला । परि षष्ठीपासुनी अष्टमीला ।
रोग आणखी वाढत गेला । कष्ट तयाला पडले बहुत ।। ९८ ।।

मग नवमीची ती रजनी । जागुनी काढिली सकलांनी ।
विजयादशमीच्या शुभ दिनी । शक्ति न उरली अंगामधे ।। ९९ ।।

रामचंद जाणता झाला । मामांचा अंत समीप आला ।
फार दु:ख झाले तयाला । केली प्रतिमा विसर्जन ।। १०० ।।

मग क्षुदिरामाला वदला । जपता सदैव रघुवीराला ।
आता का बरे स्तब्ध झाला । न घेता नाम रघुवीराचे ।। १ ।।

ऐकुनी रघुवीराचे नाम । सावध जाहला क्षुदिराम ।
शब्द काढुनी खोल परम । बोलू लागला कष्टाने ।। २ ।।

केली काय प्रतिमा विसर्जन । मग मज बसवा उठवून ।
रामचंदने आधार देउन । हळुच उठवुनी बसविले ।। ३ ।।

त्रिवार केला नामोच्चार । रघुवीर रघुवीर रघुवीर ।
मग प्राण सोडिला सत्वर । पुण्यात्मा क्षुदिरामाने ।। ४ ।।

बिंदू सिंधूत मिळुनी गेला । रामरायाने भक्त नेला ।
क्षुदिराम चतर्जी जाहला । परम शांतिचा अधिकारी ।। ५ ।।

रात्री झाले संकीर्तन । सर्व गाव गेले हालुन ।
नदीस दुसऱ्या दिवशी नेउन । अग्निसंस्कार उरकिला ।। ६ ।।



रामचंद रामकुमाराला । क्षुदिरामाच्या श्राद्धाला ।
पाचशे रुपये देता झाला । प्रेम तयाचे मामावर ।। ७।।
क्षुदिरामाची निधनवार्ता । कामारपुकुरालागी येता ।
दुःखित झाली सर्व जनता । हाहाकार झाला घरी ।। ८ ।।
क्षुदिरामाचा अंत ऐकुन । गावचि गेले हळहळून ।
रामकुमारा दुःख महान । संसारभार तयावरी ।। ९ ।।
परंतु चंद्रादेवीप्रत । दुःख जाहले अपरीमित ।
शून्य वाटू लागले जगत । उदास मानस होय तिचे ।। ११० ।।
तिजला असती बाळे सान । गदाधर सर्वमंगला दोन ।
पतिनिधनाचे दुःख दारुण । त्यांकडे पाहुनी साहतसे ।। ११ ।।
गदाधराच्या शोकाला । पारावार नाही राहिला ।
वाईट वाटेल स्वमातेला । यास्तव दुःख लपवीतसे ।। १२ ।।
कोणास दुःख ना दिसावे । म्हणुनी जनशून्य स्थानी जावे ।
इतर लोकांना परि वाटावे । मुलगा अवखळ भटकतसे ।। १३ ।।
पित्याच्या निधनापासुन । असुनी तयाचे वय लहान ।
एकांतप्रिय विचारवान । जाहला बाळ गदाधर ।। १४ ।।
बुद्धी तयाची असामान्य । प्रीती मातेवरी अनन्य ।
जाणे जवळ असता आपण । माता दुःख विसरतसे ।। १५ ।।
यास्तव बाळ जवळ बसे । कामात साह्य करितसे ।
कधीही हट्ट न धरितसे । वाईट वाटेल मातेला ।। १६ ।।
जरी जातसे पाठशाळेत । तथापि पुराण भजनात ।
देवांच्या मूर्ती घडविण्यात । अत्यंत लक्ष असे त्याचे ।। १७ ।।
ऐकिले होते पुराणात । संसार असे अशाश्वत ।
पितृवियोगाने मनात । ती जाणीव दृढ झाली ।। १८ ।।



आधीच त्याने ऐकिले होते । साधू सांडुनी संसाराते ।
सदैव सेविती परमेश्वराते । कृतार्थ करिती स्वजीवन ।। १९ ।।
साधुजनांची संगती करता । अपार शांती लाभते चित्ता ।
जन्मचि पावतो सफलता । हेही ऐकिले होते तये ।। १२० ।।
गावाच्या आग्नेय दिशेला । एक होती धर्मशाला ।
साधु बैरागी त्या स्थानाला । येती राहती बहुत दिवस ।। २१ ।।
आता गदाधर मधुन मधुन । जातसे धर्मशाळेलागुन ।
साधूंची कर्मे मन लावुन । निरीक्षण तो करीतसे ।। २२ ।।
प्रभाती आणि अस्तमानी । प्रज्वलित ते करिती अग्नी ।
होती मग्न भगवच्चिंतनी । देहभान ध्यानी विसरती ।। २३ ।।
ते आणिती भिक्षा मागुन । इष्ट देवाला समर्पुन ।
शेष आनंदाने ग्रहण । करिती समजुनी प्रसाद ।। २४ ।।
कुशाग्र बुद्धीचा गदाधर । लक्षात ठेवी सर्व प्रकार ।
गदाधराच्या मनावर । थोर परिणाम जाहला ।। २५ ।।
बघुनी साधूंचा विचित्र वेष । भीती वाटते बहुधा मुलांस ।
परी असामान्य गदाधरास । साधुसंतांची प्रीती वाटे ।। २६ ।।
गदाधर जाई धर्मशाळेला । सेवा तयांची करू लागला ।
इंधन पाणी देउ लागला । मिसळू लागला त्यांच्यामधे ।। २७ ।।
गदाधराचे मधुर वर्तन । पाहुनी तुष्टती साधूजन ।
शिकला तो त्यांच्यापासुन । भजने गाणी कित्येक ।। २८ ।।
कधी साधूंनी भिक्षान्नातुन । प्रसाद द्यावा बाळालागुन ।
मग मातेला घरी येउन । सांगावे मज भूक नसे ।। २९ ।।
प्रथम वाटे चंद्रामणिला । यावर साधू करिती कृपेला ।
काही काळ लोटता आला । संशय मनाला जननीच्या ।। १३० ।।



गदाधराला विभूती चर्चुन । टिळे लंगोटी देती लावुन ।
कधी कधी पंचा गुंडाळुन । साधू तयाला सजविती ।। ३१ ।।
मग तो आपुल्या घरी येउन । सांगत असे मातेलागुन ।
बघ साधूंनी सजवून । कैसे दिधले मजलागी ।। ३२ ।।
पाहुनी तयाच्या वेषाला । मातेस संशय वाटू लागला ।
वाटले माझ्या बालकाला । नेतील फसवुनी बैरागी ।। ३३ ।।
घाबरली मग चंद्रामणी । नयनामधे आणुनी पाणी ।
म्हणे नेतील फूस लावुनी । तुजला बालका संन्यासी ।। ३४ ।।
गदाधराने आपणाकडुन । बहुत पाहिले समजावुन ।
तरिही संशयाचे निरसन । नाहीच जाहले मातेच्या ।। ३५ ।।
दु:खी पाहुनी जननीला । गदाधर नम्रपणाने वदला ।
आजपासुनी साधुसेवेला । जाणार नाही त्या ठायी ।। ३६ ।।
मग जाउनी धर्मशाळेला । वृत्तान्त साधूंना सांगितला ।
आजपासुनी मी सेवेला । येऊ शकेना कदापिही ।। ३७ ।।
मग साधू घरासी येउन। करिती मातेचे समाधान ।
अल्पवयी बाळास फसवुन । नेणार नाही आम्ही कधी ।। ३८ ।।
तसे कृत्य तर पाप होय । मनात न धरावा संशय ।
चंद्रामणिचे गेले भय । देतसे अनुज्ञा बाळाला ।। ३९ ।।
आणिक एक गोष्ट ऐकता । उद्‌भवे चंद्रामणिच्या चित्ता ।
गदाधराविषयी चिन्ता । मूर्च्छा आली पुन्हा तया ।। १४० ।।
कामारपुकुराहुन कोसावर । एक गाव असे आनुर ।
विशालाक्षी देवीचे मंदिर । जागृत स्थान ते असे ।। ४१ ।।
एकदा देवीच्या दर्शनास । काही नवस फेडावयास ।
बहुत स्त्रिया त्या स्थानास । जावयासाठी निघाल्या ।। ४२ ।।



धर्मादास लाहाची भगिनी । प्रसन्न नामे विधवा रमणी ।
भक्तिमती ती सदाचरणी । निघाली स्त्रियांच्या समवेत ।। ४३ ।।

प्रसन्नदेवी धर्मशील । श्रद्धावती पवित्र सरल ।
चारित्र्य तियेचे उज्ज्वल । भक्ती थोर असे तिची ।। ४४ ।।

गदाधर तल्लीन होउन । देवादिकांची भक्तिपूर्ण ।
गाणी म्हणताना ऐकुन । आनंद तिजला होतसे ।। ४५ ।।

म्हणतसे ती गदाधरला । प्रत्यक्ष देव तू गमसी मजला ।
काही असो परि वाटे मनाला । माणुस खचित नव्हेस तू ।। ४६ ।।

गदाधराने हट्ट घेतला । येईन देविच्या दर्शनाला ।
स्त्रिया म्हणती बाळकाला । कसा चालसी आम्हासवे ।। ४७ ।।

चालता चालता थकशील । ऐसे सांगुनी पाहिले पुष्कळ ।
तथापि आयकेना बाळ । नेती स्त्रिया मग तयाप्रती ।। ४८ ।।

प्रसन्नदेवीचे अप्रतिम । गदाधरावर असे प्रेम ।
मग लक्षुनी आनुग्राम । चालु लागला मेळावा ।। ४९ ।।

गदाधरास आनंद झाला । गाणी गात तो देवीला ।
भक्तिभराने तन्मय झाला । चालु लागला स्त्रियांसवे ।। १५० ।।

गदाधराची गाणी ऐकित । आक्रमिती महिला पंथ ।
गदाधरला देती साथ । वाजवित टाळ्या आनंदे ।। ५१ ।।

नवल तव घडे अकस्मात । गदाधराचे थांबले गीत ।
अश्रु वाहती नयनांत । शरीर रोमांचित जाहले ।। ५२ ।।

गदाधर संज्ञाशून्य होउन । धरणीवर गेला पडुन ।
महिला गेल्या घाबरून । पाणी आणुनी शिंपडिती ।। ५३ ।।

कोणी स्त्रिया वारा घालिती । तरी होईना संज्ञा प्राप्ती ।
प्रसन्नदेवीच्या मग चित्ती । विचार एक उद्भवला ।। ५४ ।।



स्त्रियांना ती सांगु लागली । वाटे यावर कृपा केली ।
जगज्जननी अंगात आली । भक्ति बाळाची पाहुनिया ।। ५५ ।।
आता करावा तिचा धावा । हे ऐकुनी तो मेळावा ।
धावा नामस्मरण तेधवा । करितसे प्रार्थना देवीची ।। ५६ ।।
प्रार्थना करिता त्या वेळी । आश्चर्याची गोष्ट घडली ।
गदाधराला अल्प काळी । प्राप्त जाहले देहभान ।। ५७ ।।
गदाधर सावध होउन । झडकरी मग बसला उठुन ।
ग्लानीचे मुळीच नसे चिन्ह । उत्साह अपार अंतरी ।। ५८ ।।
भावसमाधी लागली त्यास । विश्वास वाटला वनितांस ।
म्हणती बाळाच्या अंगास । खचित आली जगदंबा ।। ५९ ।।
मेळावा मग जाउनी आला । वृत्त कळविती चंद्रामणिला ।
अधिकच काळजी मनाला । वाटु लागली मातेच्या ।। १६० ।।
तिने बाळाची दृष्ट काढिली । रघुवीराची प्रार्थना केली ।
विशालाक्षीदेवी स्तविली । कल्याणास्तव तयाच्या ।। ६१ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । रघुपति प्रेमाने सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६२ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा तिसरा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय चवथा

जय जय श्रीयुगावतारा । रामकृष्ण जगदुद्धारा ।
विवेकसागरा करुणाकरा । ज्ञानभास्करा नमोऽस्तुते ।। १ ।।

गदाधर नऊ वर्षांचा झाला । रामकुमारे विचार केला ।
याच्या करावे उपनयनाला । विचार कथिला सर्वांसी ।। २ ।।

जाणुनी धनीच्या प्रेमाला । गदाधराने शब्द दिधला ।
प्रथम मी घेइन तव भिक्षेला । व्रतबंध समयी निश्चये ।। ३ ।।

जाणतसे ती गदाधर । बोललेले सत्य करणार ।
मग कष्टाने पैसे चार । भिक्षेस्तव तिने जमविले ।। ४ ।।

धनीने यापरी केला बेत । गदाधर बोले बंधूप्रत ।
धनी लोहारिणीप्रत । वचन दिले मी भिक्षेचे ।। ५ ।।

रामकुमार पडे चिंतेत । ऐसी कुळात नव्हती रीत ।
परि तो पक्के होता जाणत । गदाधर वचन सत्य करी ।। ६ ।।

गदाधर म्हणे असत्य वचन । करता दोष लागे दारुण ।
यज्ञोपवितही करणे धारण । अयोग्य असत्यवाद्याला ।। ७ ।।

रामकुमार असा चिंतेत । धर्मादासास कळली मात ।
तो म्हणे तुमच्या वंशात । चाल ऐसी नसे जरी ।। ८ ।।

तथापि काही घराण्यांत । मी जाणे ही असे रीत ।
पटविण्या बाळाची समजूत । नाही हरकत चालीस या ।। ९ ।।

धर्मादास वडिलांसमान । उपदेश तयाचा परिसून ।
रामकुमारा समाधान । वाटले, निमाली ती चिंता ।। १० ।।



सुमुहूर्त तयाने पाहुन । व्रतबंध घेतला उरकून ।
सोहळा पार पडला छान । जाहला द्विज गदाधर ।। ११ ।।
गदाधर सत्यपरायण । भिक्षा घेतली धनीकडुन ।
भिक्षामातेचा मिळता मान । धनीला धन्यता वाटली ।। १२ ।।
एकदा धर्मादासाच्या घरी । पंडित मंडळी जमली सारी ।
कोणी पंडित प्रश्न करी । उत्तरे कोणी देतसे ।। १३ ।।
पूर्वपक्ष उत्तरपक्ष । विद्वान वादविवादी दक्ष ।
श्रुतिस्मृतिपुराणांची साक्ष । रंग चढला विवादाला ।। १४ ।।
एका विद्वानाने सभेला । अतिशय बिकट प्रश्न केला ।
उत्तर न सुचेचि कोणाला । विचार करिती विद्वज्जन ।। १५ ।।
बाळ गदाधर तेथे होता । उत्तर सुचवी एका पंडिता ।
तो दुसऱ्याला झाला सांगता । उत्तर पटले सकळांना ।। १६ ।।
पंडित लोक करिती विचार । प्रश्न होता कठिण फार ।
हे एकच तयाचे उत्तर । म्हणती कोणी सुचविले ।। १७ ।।
तव कळले पंडिताकारणे । नऊ वर्षांच्या बालकाने ।
उत्तर सुचविले तयांची मने । आश्चर्यचकित मग झाली ।। १८ ।।
म्हणती बालक असामान्य । दैवी शक्तिने असे संपन्न ।
प्रशंसा करिती पंडितजन । आशिर्वचन देती तयास ।। १९ ।।
धर्मादासाच्या गृहाप्रती । पंडितांच्या सभा भरती ।
वादविवाद सर्व समजती । गदाधराला बाळपणी ।। २० ।।
यापरी तयाला बाळपणात । शास्त्रार्थ झाले अवगत ।
अवश्यचि होते युगकार्यात । ज्ञान शास्त्रांचे तयाला ।। २१ ।।
उपनयनानंतर त्याला । पूजेचा अधिकार मिळाला ।
तयाच्या भक्तियुक्त चित्ताला । पूजेत आनंद वाटतसे ।। २२ ।।




संध्यावंदन कर्मे करुन । बहु काळ करी पूजा ध्यान ।
पित्याप्रमाणे दिव्य दर्शन । स्वप्ने पडावी इच्छितसे ।। २३ ।।
बाळ गदाधर निष्काम । देवावर प्रेम अकृत्रिम ।
शुद्ध मन भक्ती अप्रतिम । करितसे सेवा मनोभावे ।। २४ ।।
परम पवित्र गदाधर । कृपा देवांची तयावर ।
भावसमाधी दर्शने थोर । होऊ लागती तयासी ।। २५ ।।
एकदा महाशिवरात्रीला । गदाधराने उपवास केला ।
यथाविधी अर्चिता झाला । महादेवाला भक्तीने ।। २६ ।।
प्रथम प्रहराची पूजा करुन । करित असता शिवाचे ध्यान ।
बाळमित्र त्याच्याकडे येउन । म्हणती नाटक आज असे ।। २७ ।।
शिवभूमिका होती जयाला । अकस्मात ताप आला तयाला ।
आता तयाची भूमिका तुजला । केलीच पाहिजे गदाधरा ।। २८ ।।
तथापि गदाधर त्यांना वदला । व्यत्यय येइल माझ्या पूजेला ।
शिवभूमिका ती करणे मजला । आजला अशक्य असे रे ।। २९ ।।
बाळास सांगती मित्र सकळ । शिवभूमिका तू करशील ।
तर शिवाचे विचार येतिल । पूजेहुनि हे कमी नसे ।। ३० ।।
नाटकास जन येतिल बहुत । वेळेवर ते होता रहित ।
निराश होउनि जाती समस्त । ऐकुनि गदाधर मान्य करी ।। ३१ ।।
नाटकाची झाली वेला । गदाधर महादेव सजला ।
पडद्याच्या तो बाहेर आला । पाहती तयाला प्रेक्षकजन ।। ३२ ।।
रुद्राक्षधारी जटामंडित । सदाशिव विभूति भूषित ।
पाहुनि म्हणती लोक समस्त । हा खरा शंकर शोभला ।। ३३ ।
गदाधराचे शिवध्यानात । अत्यंत तन्मय झाले चित्त ।
बंद पडली भाषणे गीत । भावसमाधी लागली ।। ३४ ।।



गदाधराला नेले आत । गोंधळ उडाला मंडपात ।
नाटक राहिले जेथच्या तेथ । विपरित घटना घडली ही ।। ३५ ।।
गदाधराच्या अंगावरी । पाणी शिंपिती कारभारी ।
मग कितीतरी वेळानंतरी । सावध झाला गदाधर ।। ३६ ।।
तेव्हापासुनी गदाधराला । समाधि भाव लागू लागला ।
स्तुतिपर गाता गीत तयाला । संज्ञाशून्यता लाभतसे ।। ३७ ।।
देवादिकांचे करिता ध्यान । इतुके तन्मय होतसे मन ।
नष्ट होतसे देहभान । शरीर काष्ठवत होत असे ।। ३८ ।।
पुनरपि येता बाह्यज्ञान । होतसे उत्साह वर्धमान ।
सांगे मजला झाले दर्शन । इष्ट देवाचे त्या अवस्थेत ।। ३९ ।।
ऐसी तयाची अवस्था पाहुनी । चिंताक्रांत झाली जननी ।
परंतु लवकर आले कळुनी । स्वास्थ्य न बिघडे बाळाचे ।। ४० ।।
गदाधराची धर्मप्रवृत्ती । उत्तरोत्तर होई वाढती ।
कोठे होता उत्सव जयंती । भाग घेतसे निष्ठेने ।। ४१ ।।
गदाधर अत्यंत बुद्धिमान । सूक्ष्म तयाचे निरीक्षण ।
भक्ति आपुल्या पित्यासमान । अन्यत्र दिसेना कोठेही ।। ४२ ।।
थोर थोर विद्वान पंडित । बहुत विद्या करुनी प्राप्त ।
तर्कालंकार पदवी भूषित । धडपडतात भोगसुखा ।। ४३ ।।
तयांचे विद्यासंपादन । केवळ कराया द्रव्यार्जन ।
समाजात मिळविण्या सन्मान । अभिमान वाहती विद्येचा ।। ४४ ।।
पितयाप्रमाणे धर्मनिष्ठा । औदार्य धर्मपरायणता ।
न आढळे पाहता पंडिता । उपयोग काय मग विद्येचा ।। ४५ ।।
पित्याच्या गुणांच्या कसोटीवरी । पंडितांची किंमत करी ।
म्हणतसे विद्या अर्थकरी । अनर्थकरी अर्थ असे ।। ४६ ।।





शिवरात्रीला गावातील नाटकामध्ये शिवाचा अभिनय करताना
गदाधराला आलेला भावसमाधीचा अनुभव.



'काशीयात्रेला न जाता भागीरथीच्या तीरावर माझं एक सुंदर देवालय बांध',
असा राणी रासमणीला कालीमातेचा स्वप्नात आदेश.

ऐसे विचार मनात येउन । संसार विद्या धन मान ।
यांस्तव झाला उदासीन । ईश्वरलाभ ध्येय केले ।। ४७ ।।

अल्पवयातहि बाळाप्रती । कैसे गंभीर विचार येती ।
असती मानसिक संस्कार मती । प्रतिभा तयाची अलौकिक ।। ४८ ।।

मनात ऐसा उदास असुन । जातसे पाठशाळेलागुन ।
सुधारले त्याचे वाचन । समजू लागले धर्मग्रंथ ।। ४९ ।।

ठाउक होते शिक्षकाला । भावसमाधि लागे तयाला ।
म्हणुनी त्रास गदाधराला । दिधला नाही कधी त्याने ।। ५० ।।

गदाधराला वर्ष बारावे । रामेश्वराला बाविसावे ।
सर्वमंगलेलागी नववे । रामकुमार मग काय करी ।। ५१ ।।

दिधली भगिनी सर्वमंगला । रामसदय बंद्योपाध्यायाला ।
तयाची भगिनी रामेश्वरला । करुनी उरकिले लग्नविधी ।। ५२ ।।

रामकुमारास त्या काळी । सिद्धी प्राप्त होती झाली ।
भविष्यातिल गोष्ट सगळी । आधीच तयाला कळत असे ।। ५३ ।।

तयाने जाणिले आपुली पत्नी । पुत्ररत्न ते प्रसवूनी ।
लवकरच जाईल मरुनी । लागली चिंता तयाप्रती ।। ५४ ।।

भीती तयाची खरी ठरली । पत्नी बालकाला प्रसवली ।
आणि ती पंचत्व पावली । पसरली छाया शोकाची ।। ५५ ।।

कुटुंबाची आर्थिक स्थिती । दिवसेंदिवस पावे अवनती ।
विघ्ने एकएकामागे येती । दुःखे बहुतचि वाढली ।। ५६ ।।

कर्ज वाढले दिवसेंदिवस । काय उपाय करावा यास ।
करुनिही बहुत प्रयास । स्थिती तथापि सुधरेना ।। ५७ ।।

ज्या घरात केला वास । पत्नीसमवेत वर्षे वीस ।
न करमे रामकुमारास । शांति मनाला वाटेना ।। ५८ ।।



मग तयाने बेत केला । जाउनि राहावे कलकत्त्याला ।
रामेश्वरावर त्याने टाकिला । सर्व भार प्रपंचाचा ।। ५९ ।।
रामकुमार कलकत्त्याला । झामापुकुर नामे पेठेला ।
काढिता झाला पाठशाला । चालवू लागला स्वप्रयत्ने ।। ६० ।।
इकडे गावास रामेश्वर । चालवू लागला संसार ।
परि संसारास पुरेपूर । पैसा मिळवू शकेना तो ।। ६१ ।।
बैरागी साधू संन्यासी । काही वस्तू लागता त्यांसी ।
असता ती आपुल्या घरासी । देतसे तत्काळ तयांना ।। ६२ ।।
आयापेक्षा जास्त व्यय । करुनी कर्ज वाढते होय ।
चालविल कसेही रामराय । म्हणुनी स्वस्थ बसत असे ।। ६३ ।।
तयाचे गदाधरावर । प्रेम होते अपरंपार ।
तथापि तयाच्या विद्याभ्यासावर । रामेश्वराचे लक्ष नसे ।। ६४ ।।
वाटे रामेश्वरालागुन । धर्मप्रवृत्ती त्याची पाहुन ।
होईल पुरुष हा असामान्य । वर्तुदे तयाला स्वच्छंदे ।। ६५ ।।
रामकुमार गेल्यापासुन । कोणी न आवरी बाळालागुन ।
धर्मपरायण त्याचे मन । करविल तसे तो करितसे ।। ६६ ।।
कामारपुकुरच्या स्त्रियांप्रती । गदाधराची असे प्रीती ।
चंद्रामणिच्या घरास येती । गदाधराला पहावया ।। ६७ ।।
गदाधर असता गृहकृत्यात । स्त्रिया कामे करुनी समस्त ।
मोकळा करिती तयाप्रत । सांगती गाणी गावयाला ।। ६८ ।।
स्त्रिया त्या धर्मपरायण । त्यांना वाचून दाखवी पुराण ।
कथाकथन गाणी गाउन । मनोरंजन करी त्यांचे ।। ६९ ।।
प्रसिद्ध व्यक्तीचे अनुकरण । करी त्यासम भाव भाषण ।
कधी नकला विनोद करुन । हासवी सकळ स्त्रियांप्रती ।। ७० ।।



गदाधराचा आवाज मधुर । गाण्यात तन्मय होई फार ।
स्त्रियांनाही पडतसे विसर । क्षणभर देहभानाचा ।। ७१ ।।

कधी कधी तो करिता गायन । भावसमाधी जाई लागुन ।
स्त्रिया अत्यंत भक्ती धरुन । पाहती समाधी बाळाची ।। ७२ ।।

मातापित्यांना पडलेली । स्वप्ने त्यांनी होती ऐकली ।
स्वप्नास तंतोतंत जुळली । गदाधराची धार्मिकता ।। ७३ ।।

आकर्षक व्यक्तिमत्त्व भक्ती । पाहुनी वाटे स्त्रियांप्रती ।
हा होईल महान विभुती । प्रेम करिती तयावरी ।। ७४ ।।

धर्मादास भगिनी प्रसन्न । आणि कित्येक स्त्रियांलागुन ।
श्रीकृष्णाचे झाले दर्शन । पाहुनी गदाधराकडे ।। ७५ ।।

गदाधराला मानुनी देव । स्त्रिया धरिती भक्तिभाव ।
वात्सल्यवेड्या झाल्या सर्व । दुसरे गोकुळ अवतरले ।। ७६ ।।

कधी कधी गदाधराने । स्त्रीवेष घेउनी करावी भाषणे ।
स्त्रियांसारखाच तयाने । अभिनय करावा हुबेहुब ।। ७७ ।।

गदाधर घेता स्त्रीवेष । ओळखू येइना कोणास ।
की ही वनिता अथवा पुरुष । नटवर ऐसा गदाधर ।। ७८ ।।

एकदा त्याने स्त्रीवेष घेउन । इतर स्त्रियांसमवेत जाउन ।
पाणी आणिले तळ्यावरुन । परि कोणी नाही ओळखिले ।। ७९ ।।

गुजरगल्लीत एक श्रीमंत । सीतानाथ पाईन गृहस्थ ।
करितसे प्रीती अत्यंत । बाळ गदाधरावरी ।। ८० ।।

तयाच्या पत्नी कन्यांप्रती । गदाधरावर असे प्रीती ।
तयाला घरास घेउनि जाती । पदे गावया देवांची ।। ८१ ।।

घरी त्याच्या जाण्याला । प्रतिबंध नव्हता गदाधराला ।
पूर्ण मोकळिक असे त्याला । सीतानाथगृहा जाण्याची ।। ८२ ।।



वसतसे त्याच गल्लीत । दुर्गादास पाईन गृहस्थ ।
तोही होता प्रेम करित । मनोमन गदाधरावर ।। ८३ ।।
तथापि त्याच्या घराप्रती । गोषाची चाल कडक होती ।
मिसळू देइना कोणाप्रती । कधीहि आपुल्या स्त्रियांमधे ।। ८४ ।।
ज्या सज्जनांच्या घरात । नसे कडक पडदापद्धत ।
मानी हलके तयांप्रत । अभिमान बाळगी गोषाचा ।। ८५ ।।
एकदा तो दुर्गादास । बढाई मारुनी सांगे कुणास ।
माझ्या घरी गोषा विशेष । कोणी न पाहिले महिलांना ।। ८६ ।।
तव गदाधर तेथे अवचित । येउनी जाहला उपस्थित ।
बढाईची ऐकता मात । दुर्गादासास बोलिला ।। ८७ ।।
स्त्रियांचे पावित्र्य रक्षण । गोषाने करणे मूर्खपण ।
देवभक्ती योग्य शिक्षण । यानेच रक्षण होत असे ।। ८८ ।।
जरी मी आणेन मनात । पाहिन तुमच्या स्त्रिया समस्त ।
जाणेन संपूर्ण हकिकत । अभिमान काय तो गोषाचा ।। ८९ ।।
दुर्गादास म्हणाला बाळ । बघतो कैसा पाहशील ।
गदाधर म्हणे येईल वेळ । तेव्हाच कळेल तुम्हासी ।। ९० ।।
यावर काही काळ लोटला । संध्याकाळच्या समयाला ।
गदाधराने स्त्रीवेष केला । वदन झाकले पदराने ।। ९१ ।।
काखेमधे घेतली टोपली । दुर्गादासाच्या घराजवळी ।
सांगे दुर्गादासास, सकाळी । बाजारा आले खेड्यातुन ।। ९२ ।।
बाजारामधे सुत विकता । होउनि गेली संध्या आता ।
बरोबरच्या मैत्रिणी समस्ता । निघुनी गेल्या वाटतसे ।। ९३ ।।
आता खेड्यात जावयाला । कोणीही सोबत नसे मला ।
आजची रात्र काढावयाला । शोधात असे मी जागेच्या ।। ९४ ।।



आज रात्रभर केवळ । राहावयाला जागा द्याल ।
तरी पुष्कळ उपकार होतिल । ऐसे बोलला नम्रपणे ।। ९५ ।।

दुर्गादास मग पुसे गाव । आणि विचारी तिचे नाव ।
म्हणाला खात्री पटता सर्व । जाई घरात स्त्रियांकडे ।। ९६ ।।

स्त्रिया देतील जागा तुजला । तेथे थांब तू रात्रीला ।
आणि प्रभात होता उद्याला । जाई गावाला अपुल्या तू ।। ९७ ।।

गदाधराने मग त्याला । कृतज्ञतेने प्रणाम केला ।
घरात जाउनि महिलांना । सांगितला तोच वृत्तान्त ।। ९८ ।।

गदाधराचे मधुर भाषण । गप्पागोष्टी चातुर्यपूर्ण ।
ऐकता स्त्रिया गेल्या मोहुन । आस्था उपजली मनामधे ।। ९९ ।।

निजावयाला खोली देउन । खावयासहि दिधले अन्न ।
घेतल्या गदाधराने पाहुन । गोष्टी घरातील सर्वही ।। १०० ।।

इकडे गदाधर नाही आला । रात्री नेहमीच्या वेळेला ।
काळजी वाटली जननीला । पाठविले रामेश्वरासी ।। १ ।।

रामेश्वराने शोध केला । गदाधर नाही आढळला ।
फिरत फिरत तो पातला । दुर्गादासाच्या घरापुढे ।। २ ।।

सहज तेथे उभा राहुन । हाका मारिल्या दोन तीन ।
बंधुचा आवाज ओळखुन । आलो म्हणाला गदाधर ।। ३ ।।

दुर्गादासाच्या लक्षात । तेव्हाच प्रकार आला समस्त ।
फसवुनी शिरे हा गोषात । फार राग आला तयाला ।। ४ ।।

स्त्रीवेष त्याचा आठवुन । हुबेहूब स्त्रियांसारिखे वर्तन ।
म्हणे फसविले चाणाक्ष असुन । म्हणुनी विस्मय वाटला ।। ५ ।।

राग मग त्याचा निमाला । फार हासू लोटले त्याला ।
दुसरे दिवशी सकलाला । गोष्ट कळली गावभर ।। ६ ।।



तेव्हापासुनी दुर्गादास । जाऊ देई आपुल्या स्त्रियांस ।
सीतानाथाच्या घरास । गदाधर येतसे त्यावेळी ।। ७ ।।
गदाधराची बहुत प्रीती । सकळ स्त्रीवर्गाला होती ।
तो न आल्यास तयाप्रती । मुद्दाम नेती बोलावुन ।। ८ ।।
गदाधराला गाणी गाता । भावसमाधी लागे अवचिता ।
भक्तिभाव स्त्रियांचा वाढता । अधिकच होतसे तेधवा ।। ९ ।।
भावसमाधित त्याने असावे । स्त्रियांनी श्रीकृष्ण गौरांगभावे ।
पूजन गदाधराचे करावे । समजुनी प्रत्यक्ष परमेश ।। ११० ।।
तयाला श्रीकृष्णाचा वेष । दिसतसे खुलुनी विशेष ।
सुवर्ण मुरली मुकुट तयास । करुनि ठेविला स्त्रियांनी ।। ११ ।।
गदाधराची धर्मनिष्ठा । सदाचार सद्बुद्धी सरलता ।
गंधर्वासमान स्वरमधुरता । अत्यंत गोड स्वभाव त्याचा ।। १२ ।।
ऐसे सद्गुण पाहूनिया । ध्यास तयाचा लागे हृदया ।
अपार प्रेम करिती स्त्रिया । कल्पना तयाची करवेना ।। १३ ।।
एवढी श्रद्धा भक्ती प्रेम । कोठे न आढळे निष्काम ।
कामारपुकुर घेउनी नाम । काय गोकुळ अवतरले ।। १४ ।।
कथा तयाने सांगाव्या । नकला स्त्रियांच्या कराव्या ।
चेष्टा करुनी हासवाव्या । आनंद द्यावा महिलांना ।। १५ ।।
तयाच्या गोष्टी ऐकत ऐकत । स्त्रिया कामे करिती समस्त ।
न कळे वेळ कसा संपत । गदाधर जवळ असताना ।। १६ ।।
कधी तो असता अनुपस्थित । काळजी करिती स्त्रिया समस्त ।
वार्ता त्याची कळेपर्यंत । जीवही जिवात नसावा ।। १७ ।।
आणि तयाची प्रत्येक गोष्ट । अमृताप्रमाणे वाटे मिष्ट ।
गात गात गुण त्याचे श्रेष्ठ । संसारकष्ट त्या विसरती ।। १८ ।।



आवडे जसा तो स्त्रियांस । तसाच आवडे पुरुषांस ।
गदाधराच्या सद्गुणांस । तेही फार प्रशंसिती ।। १९ ।।

सीतानाथास कोणी म्हणता । मुली मोठ्या झाल्या आता ।
गदाधरास का मिसळू देता । त्यांच्यात तर तो उत्तर देई ।। १२० ।।

काळजी त्याची नको तुम्हाला । परम पवित्र गदाधराला ।
ओळखीत असे मी चांगला । उज्ज्वल चारित्र्य तयाचे ।। २१ ।।

गावामधली सर्व मंडळी । एकत्र जमतसे संध्याकाळी ।
भागवत पुराण त्या वेळी । वाचिती करिती आनंद ।। २२ ।।

तेथे असता गदाधर । आनंदाला येतसे पूर ।
पुराणवाचन त्यासम मधुर । अन्य कोणी न करू शके ।। २३ ।।

गातसे तो भक्ती गाणी । आशयात तन्मय होउनी ।
सकळ देहभान विसरुनी । नृत्य करितसे गदाधर ।। २४ ।।

बघत असता तयाचे नृत्य । जन तल्लीन होती समस्त ।
अश्रु दाटती नयनात । प्रेम हृदयात उचंबळे ।। २५ ।।

गोष्टी सांगुनी विनोदपूर्ण । अभिनय करुनी स्त्रियांसमान ।
करितसे जनमन रंजन । पोट धरुनी हासवीतसे ।। २६ ।।

ऐसिया गुणांनी सकळ नर । गदाधरास चाहती फार ।
होउनि उत्कंठेने अधिर । वाट पाहती वेळ होता ।। २७ ।।

गदाधराचे कोमल मन । असे सहानुभूतिसंपन्न ।।
कळवळे जनांची दुःखे पाहुन । तळमळ दूर ती करण्याची ।। २८ ।।

जनांना भक्ती शिकवून । करावे दुःखनिवारण ।
सुखी करावे सकळ जन । तयाला अंतरी वाटतसे ।। २९ ।।

एकदा जमुनी सर्व मुले । नाटके करण्याचे ठरविले ।
गदाधराने काम घेतले । शिकवावयाचे पात्रांना ।। १३० ।।



वडिल जनां न कळावी मात । गावाबाहेर आंबराईत ।
जमू लागली बाळे समस्त । भाषणे पाठ करावया ।। ३१ ।।
गदाधर मुख्य भूमिका करुन । कामे शिकवी मुलांलागुन ।
नाटके जमू लागली छान । तयांना थोड्याच दिवसांत ।। ३२ ।।
गदाधर जत्रेस जाउनी । येतसे नाटके पाहुनी ।
गावात सोबती जमवुनी । तशीच नाटके वठवितसे ।। ३३ ।।
कामे करिताना नाटकात । भूमिकेस एकरूप होई चित्त ।
तन्मयता वाढुनी अत्यंत । भावसमाधी लागे कधी ।। ३४ ।।
एकदा मित्राच्या बरोबरी । जाउनी कुंभाराच्या घरी ।
अवलोकन मूर्तीचे करी । माहिती सांगे कुलालासी ।। ३५ ।।
अशी कशी बनविशी मूर्ती । देवचक्षु का असे असती ।
सांगता झाला कुलालाप्रती । प्रत्यक्ष माहिती नेत्रांची ।। ३६ ।।
भुवई किती लांब असावी । कशी डोळ्यांची घडण करावी ।
अंतर्मुख दृष्टी दिसावी । मूर्ती भासावी देवापरी ।। ३७ ।।
म्हणजे करुणा शक्ती महान । अंतर्मुखता आनंद गहन ।
एकवटुनी सर्वही गुण । मूर्ती जिवंत भासतसे ।। ३८ ।।
माहिती सकळ ती ऐकुन । कुंभार विस्मित गेला होउन ।
आश्चर्यचकित झाले जन । करिती प्रशंसा तयाची ।। ३९ ।।
मित्रांसवे असता खेळत । पूजन करावे येता मनात ।
स्वत: मृत्तिकेची बनवित । मूर्ती पूजन करावया ।। १४० ।।
सुंदर मूर्ती ती पाहुनी । पाहणारास वाटे मनी ।
कुशल कारागिराने कोणी । तयारी केली असावी ती ।। ४१ ।।
कल्पनाही नसता काही । वाक्य असे तो बोलुनी जाई ।
बहुत दिवसांच्या प्रश्नाचा होई । उलगडा कुणाच्या मनातिल ।। ४२ ।।



बाळपणातिल काही गोष्टी । उच्च भावारोहण दाविती ।
काही अद्‌भुत स्मरणशक्ती । नि:स्वार्थता दाविती तयाची ।। ४३ ।।
दाविती विश्वास पवित्रता । अपार साहस विनोदप्रियता ।
त्याग निश्चय करुणार्द्रता । रंगरसप्रियता प्रेम काही ।। ४४ ।।
वाटे धनी लोहारणीला । माझी जात हलकी मजला ।
केवि ये भरवता गदाधराला । यास्तव मनात कष्टी असे ।। ४५ ।।
गदाधराला गोष्ट कळली । भीती मनात नाही धरली ।
तिच्या हातचे खाउनि केली । धन्य ती धनी लोहारीण ।। ४६ ।।
सरळ प्रेमळ स्वभाव पाहुन । तिच्या हातचे खाई खाद्यान्न ।
काय पुनरपी सीतारमण । बोरे खातसे शबरीची ।। ४७ ।।
गावामधले सामान्य जन । पुराणिकास पाचारुन ।
ऐकती भागवतादि पुराण । सन्मान करती बुवाचा ।। ४८ ।।
देती पायधुण्याला पाणी । रुमाल पाय पुसण्यालागुनी ।
व्यासपीठही श्रृंगारुनी । करिती तयाचा अत्यादर ।। ४९ ।।
सन्मानाने बुवा तोषुनी । बृहस्पती स्वत:स समजुनी ।
श्रोतृगणास ऐटिने पाहुनी । हातवारे करितसे ।। १५० ।।
चाळिशीच्या भिंगामधुनी । पोथीतिल अक्षरे वाचुनी ।
चाळिशी भुवया यांच्यामधुनी । पाहुनी पुराण सांगतसे ।। ५१ ।।
कधी चष्मा कपाळी ठेवुन । उघड्या नयनी बघावे जन ।
गांभीर्य मुखावर आणुन । ऐटिने निरूपण करावे ।। ५२ ।।
गदाधराची दृष्टी तीक्ष्ण । समग्र करुनी अवलोकन ।
कधी बुवाची नक्कल करुन । पोट धरुनि जन हासवावे ।। ५३ ।।
सर्वसामान्य मुलांप्रती । वाटते गोसाव्याची भीती ।
कारण लांब चिमटा हाती । भस्म चर्चित अंग त्याचे ।। ५४ ।।



तथापि गदाधराप्रती । मुळीही ठाउक नसे भीती ।
बैराग्यावर अपार प्रीती । खुशाल त्यांच्यात मिसळतसे ।। ५५ ।।
धर्मशाळेत नेहमी जाई । राहणी त्यांची निरखुनी पाही ।
गोसाव्यासम स्वत:लाही । सजविता गंमत वाटे तया ।। ५६ ।।
बुद्धी तयाची असामान्य । संन्याशाचे भगवे वसन ।
निर्वाह भिक्षान्न करुनी सेवन । पवित्र हुताशन सन्निधी ।। ५७ ।।
सर्वत्र नि:संग त्यांचे फिरणे । भजन पूजन पदे गाणे ।
ईश्वराची प्रार्थना करणे । गदाधराने अवलोकिले ।। ५८ ।।
साधूस पाहुनी येती विचार । खचित नश्वर हा संसार ।
संन्याशासम ईश्वरावर । भार समर्पुनी असावे ।। ५९ ।।
मनात असे विचार येउन । राहतसे तो उदासीन ।
वाटे साधुसंतांसमान । प्रपंचातुन अलिप्त असावे ।। १६० ।।
इकडे वाटे कर्तव्य त्यास । मदत करावी कुटुंबास ।
यापरी द्विधा होतसे मानस । काय करावे कळेना हे ।। ६१ ।।
शेवटी ठरविले ईश्वरचरणी । असावे चित्त समर्पुनी ।
आदेश येइल त्याच्याकडुनी । म्हणुनी वाट तो पाहतसे ।। ६२ ।।
असाच काही काळ लोटला । ज्येष्ठ बंधुची कलकत्त्याला ।
ऊर्जितावस्थेस आली शाळा । तयाच्या विशेष प्रयत्नांनी ।। ६३ ।।
वर्षांतुनि ते काही दिवस । राहतसे कामारपुकुरास ।
पाहुनि गदाधराला उदास । वाटे काळजी तयाप्रती ।। ६४ ।।
सर्वांनी मग विचार केला । विद्याभ्यास करावयाला ।
पाठवावे गदाधराला । रामकुमाराबरोबर ।। ६५ ।।
गदाधराला कळता विचार । मनात आनंद झाला फार ।
अपार प्रेम रामकुमारावर । असे बाळ गदाधराचे ।। ६६ ।।



पितृतुल्य थोर भावाला । साह्य करावे वाटे त्याला ।
पाहुनि एक मुहूर्त चांगला । केली तयारी गमनाची ।। ६७ ।।

थोर जनांना मातेला । नमस्कारुनी निरोप घेतला ।
जावयासाठी कलकत्त्याला । सोडिले कामारपुकुरास ।। ६८ ।।

काय उद्देश जगदंबेचा । कलकत्त्याला न्यावयाचा ।
कोण जाणू शके साचा । अतर्क्य करणी तिची असे ।। ६९ ।।

इकडे कामारपुकुरचे जन । आठविती गदाधराचे गुण ।
विनोद नकला पुराणवाचन । सदैव करिती स्मरण त्याचे ।। १७० ।।

राजधानी कलकत्ता शहर । तेथिल पेठ झामापुकुर ।
तेथे राहे रामकुमार । पाठशाळा चालवितसे ।। ७१ ।।

आणि यजमानांच्या घरी । रामकुमार पूजा करी ।
आता पूजेची जबाबदारी । गदाधराने उचलली ।। ७२ ।।

यजमानांना गदाधर । नवा पुजारी आवडे फार ।
कार्यदक्ष भाषण मधुर । व्यवहार सरळ असे त्याचा ।। ७३ ।।

तेथेही आपुल्या भवताल । जमवी तो बालगोपाल ।
कंठु लागला आपुला काळ । आनंदाने त्या ठायी ।। ७४ ।।

रामकुमार बंधूपासुन । करू लागला अध्ययन ।
विद्यार्जनी परी नसे मन । रामकुमार चिंता करी ।। ७५ ।।

रामकुमार एके दिवशी । उपदेश करी गदाधरासी ।
अभ्यास कर म्हणाला त्यासी । व्यर्थ जीवन विद्येविना ।। ७६ ।।

रामकुमाराचे बोलणे । ऐकुनी घेतले शांतपणे ।
प्रत्युत्तर ते गदाधराने । स्पष्टपणे दिले मग ।। ७७ ।।

मिळवुनी देई भातभाकरी । नको रे विद्या ती संसारी ।
विद्यार्जन जे अर्थकारी । करणे नावडे मजलागी ।। ७८ ।।



विद्या अशी मी मिळवीन । ज्ञानप्रकाश हृदयात पडुन ।
कृतार्थ करी मानवजीवन । जन्मसाफल्य जिच्यामुळे ।। ७९ ।।
रामकुमारास ते भाषण । आले नाही नीट कळुन ।
गदाधरावर प्रीती महान । म्हणुनी दुखविना तयाप्रती ।। १८० ।।
दोन वर्षे अशी लोटली । नंतर स्थिती खालावली ।
संख्या मुलांची कमी झाली । रामकुमाराच्या शाळेत ।। ८१ ।।
परिश्रम त्याने फार करुन । मिळवू शकेना पुरेसे धन ।
वाटे शाळा बंद करुन । दुसराच उद्योग करावा ।। ८२ ।।
यजन याजन अध्यापन । याविण करण्या द्रव्यार्जन ।
रामकुमार नेणे साधन । काळजी थोर पडली तया ।। ८३ ।।
देवावर मग घालुनी भार । वाट पाहे रामकुमार ।
म्हणतसे समर्थ परमेश्वर । तोच आधार मजलागी ।। ८४ ।।
ईश्वराची अचिन्त्य लीला । तशी संधी रामकुमाराला ।
अवचित लाभली ते वेळा । कळेना करणी देवाची ।। ८५ ।।
रामकुमार चिंतेत मग्न । तिकडे दक्षिणेश्वरालागुन ।
भगवती काली देविचे महान । मंदिर बांधुनी होतसे ।। ८६ ।।
रामकृष्णांचे साधनास्थान । कार्यक्षेत्र ते लीलास्थान ।
जेथुनी मिळावयाचा महान । संदेश संपूर्ण जगताला ।। ८७ ।।
अवतारश्रेष्ठ रामकृष्ण । महत्त्वपूर्ण तयाचा क्षण ।
जगन्माता अविलंबे करुन । साधनास्थानास नेतसे ।। ८८ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । रघुपति प्रेमाने सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १८९ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा चवथा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय पाचवा

वंदिले भगवान रामकृष्ण । चरणरज जयांचे लागुन ।
भक्तोत्तमांगे झाली धन्य । शान्ति मिळाली सकलांना ।। १ ।।
साधने म्हणजे काय असती । कळेना सामान्य जनांप्रती ।
विचित्र कल्पना वावरती । अनेक जनांच्या मनामधे ।। २ ।।
शरीरास फार पीडा देणे । दुष्प्राप्य वस्तूमागे लागणे ।
विशिष्ट क्रियाचि अनुष्ठिणे । यालाच साधन मानती ।। ३ ।।
ईश्वर ध्येय हे न जाणिती । अनुराग मुळिही नसता चित्ती ।
विशिष्ट अक्षरे उच्चारिती । म्हणती तयाप्रती साधने ।। ४ ।।
नसता विवेकवैराग्यवान । भोगसुखाला कवटाळुन ।
केवळ काही मंत्र म्हणुन । वश करू पाहती परमेश ।। ५ ।।
तरी मंत्रमुग्ध सर्पासमान । ईश्वर काय असे अज्ञान ।
मनाचा उमाळा नच जाणुन । करिल कृपा तो भलत्यावर ।। ६ ।।
न कळती साधने जनाप्रती । उगिच देहास कष्ट देती ।
व्यर्थचि कालापव्यय करिती । धावती मागे मृगजळाच्या ।। ७ ।।
कामकांचन त्याग करुन । होउनी विवेकवैराग्यवान ।
जेणे उपाये आत्मज्ञान । होइ ते साधन समजावे ।। ८ ।।
सांगत असती रामकृष्ण । भूतमात्रात ब्रह्मदर्शन ।
होणे हीच अवस्था पूर्ण । अंतिम फल ते साधनांचे ।। ९ ।।
ऐसी अवस्था व्हावया प्राप्त । जी क्रिया होतसे साह्यभूत ।
साधना तियेला म्हणतात । साधक क्रिया ती करणारा ।। १० ।।



स्थूळ सूक्ष्म जड चेतन । जी जी वस्तू भासमान ।
ब्रह्मावाचुनि नसे आन । अद्वैत भरले सर्वत्र ।। ११ ।।
अद्वितीय एका वस्तूप्रती । वेगवेगळी नावे देती ।
निरनिराळी दृष्टी ठेविती । म्हणती वस्तु या अनेक ।। १२ ।।
जन्मापासुनि मृत्युपावेतो । ब्रह्माशीच संबंध येतो ।
अज्ञान जीव न ओळखी तो । म्हणतो भिन्न भिन्न वस्तु या ।। १३ ।।
जगाविषयी ऐसी धारणा । आणि विचित्र अनुभव नाना ।
बहुत काळाची ही कल्पना । फळ पूर्वीच्या अभ्यासाचे ।। १४ ।।
नामरूपकालांनी बद्ध । भासतसे जग हे समृद्ध ।
नामरूप कालातीत शुद्ध । परब्रह्म मात्र एक असे ।। १५ ।।
म्हणुनि साधका सद्वस्तुचे । जर ज्ञान प्राप्त करावयाचे ।
तर नामरूपकाल यांचे । निराकरण करणे आवश्यक ।। १६ ।।
उपाधींचे निराकरण । ब्रह्मज्ञान प्राप्तिचा प्रयत्न ।
तयाला म्हणतात साधन । साधक तो यत्न करणारा ।। १७ ।।
जगत्कारणाचे ज्ञान । प्राप्त करण्याचे मार्ग दोन ।
ज्ञानमार्ग एकास अभिधान । दुसरा भक्तिमार्ग असे ।। १८ ।।
ज्ञानमार्गी तो ध्येय जाणे । भक्तिमार्गी ते बहुधा नेणे ।
तरी आक्रमिता मार्गाकारणे । भक्तास उच्चावस्था मिळे ।। १९ ।।
शेवटी भक्तिमार्गियाप्रत । जगदतीत वस्तु अद्वैत ।
साक्षात्कार तियेचा घडत । असे निश्चये समजावे ।। २० ।।
सर्व साधारण जे मत । जगासंबंधी सामान्य समजुत ।
दोन्ही मार्गांच्या साधकांप्रत । सोडुनि द्यावी लागतसे ।। २१ ।।
ज्ञानमार्ग जो करी आक्रमण । जगत्कल्पना तो त्यागे पूर्ण ।
भक्तिमार्गी अर्धी राखुन । अंशत: तियेचा त्याग करी ।। २२ ।।



शेवटी मात्र भक्ताचीही । जगत्कल्पना लया जाई ।
सद्वस्तुचा तयाला होई । साक्षात्कार पूर्णपणे ।। २३ ।।

जगताची स्वार्थपरायणा । भोगसुखैकलक्षधारणा ।
तियेच्या त्यागास असे संज्ञा । वैराग्य ऐसी शास्त्रामधे ।। २४ ।।

असे वैराग्य असल्यावाचुन । मुमुक्षुस न येई साधकपण ।
भक्तज्ञान्यास वैराग्याविण । मार्गक्रमण अशक्य असे ।। २५ ।।

क्षणभंगुर हे मानवजीवन । याचे यथार्थ होउनी ज्ञान ।
शोधतात मग जगत्कारण । नेतिनेति मार्ग तो असे ।। २६ ।।

मानव जाणे देह मनानी । संबंध जगासी येई घडुनी ।
यास्तव त्यांचेच साह्य घेउनी । जगत्कारणास जाणावे ।। २७ ।।

जगत्कारण मिळता स्वत:त । सहजच मिळे बाह्य वस्तूत ।
मग मी कोण या प्रश्नाप्रत । उत्तर शोधे ज्ञानमार्गी ।। २८ ।।

जगताची कल्पना सोडुन । सकळ वृत्तिरहित होउन ।
मनाचेही लोपे मनपण । निर्विकल्प समाधी ती असे ।। २९ ।।

भक्तिमार्गाला दुसरे नाव । इति इति मार्ग बोलती सर्व ।
भक्त जाणतसे हे विश्व । क्षणभंगुर असे जरी ।। ३० ।।

जगत्कारण जो परमेश । त्यावर भक्त करी विश्वास ।
तयाने निर्मिले जगतास । म्हणुनी जगास सत्य समजे ।। ३१ ।।

ईश्वर निर्मिती असे सर्वत्र । वस्तु व्यक्ती प्राणिमात्र ।
सर्वच त्यास वाटती पवित्र । ममता वाटे सकलांची ।। ३२।।

या अनुभवाच्या मार्गात । वाटे जो जो अडथळा येत ।
तो तो नाहिसा करण्याप्रत । प्रयत्नशील भक्त असे ।। ३३ ।।

ईश्वराच्या कोणत्या तरी । रूपावर भक्त प्रेम करी ।
अपार प्रेम वसे अंतरी । ध्यानात तन्मय होतसे ।। ३४ ।।



कर्म जे घडे आपुल्याकडुन । सर्व ते देवास करी अर्पण ।
आपुले निष्काम करुनी मन । ध्यान हरीचे करितसे ।। ३५ ।।
प्रथम आरंभ करिता ध्यान । तयाच्या मनःचक्षूलागुन ।
साजरी सर्वांगसंपूर्ण । मूर्ती दिसुनी येत नसे ।। ३६ ।।
कधी कधी दिसती हातपाय । कधी एखादा दिसे अवयव ।
तोही दिसताच नाहिसा होय । जास्त वेळ स्थिर नसे ।। ३७ ।।
अभ्यासाने जमता ध्यान । मूर्ती ती सर्वांगपूर्ण ।
मानसचक्षूपुढे येउन । स्थिर होउनी राहतसे ।। ३८ ।।
तन्मयतेने लागता ध्यान । मूर्तीत आढळे जिवंतपण ।
हासते बोलते येई दिसुन । भक्त मूर्तीस स्पर्शू शके ।। ३९ ।।
तेधवा मूर्ती असे जिवंत । याची शंका न उरे मनात ।
नयन उघडे अथवा मिटोत । स्मरताच मूर्ती दिसत असे ।। ४० ।।
माझ्या इष्ट देवतेप्रती । सकळ रूपे घेता येती ।
या श्रद्धेच्या बळावरती । दिव्य दर्शने होती तया ।। ४१ ।।
रामकृष्णदेव म्हणती । जिवंतभावे अशा रीती ।
पाहता एका स्वरूपाप्रती । सकळ रूपे सुलभ तया ।। ४२ ।।
ज्यापरी जागृती वाटे सत्य । त्यापरी मूर्ती ध्यानकालात ।
जो जो बोध हा दृढ होत । तो तो कल्पित विश्व भासे ।। ४३ ।।
मग गंभीर ध्यानकालात । भावानुभव प्रबळ मनात ।
बाह्य जगाची यत्किंचित । जाणीव न राहे भक्तासी ।। ४४ ।।
शास्त्रे अशा अवस्थेप्रती । सविकल्प समाधी असे म्हणती ।
विकल्पसंयुक्त नाम देती । भावसमाधी म्हणती कुणी ।। ४५ ।।
अशा या भावसमाधीत । बाह्यजग जरी लोपे समस्त ।
परी भावराज्य भक्ताप्रत । अनुभवावयास उरत असे ।। ४६ ।।



बाह्य व्यक्तीशी संबंध येता । सुखदु:खानुभव येतसे चित्ता ।
इष्ट मूर्तिचा तैसाच भक्ता । समाधीत अनुभव येत असे ।। ४७ ।।

संकल्प विकल्प मनी उठती । हेहि इष्टाविषयीच असती ।
विकल्पसंयुक्त समाधी म्हणती । वास्तव अशा समाधीला ।। ४८ ।।

भावराज्यात रमे मन । अविरत भावाचेच चिंतन ।
बाह्य जग लोपे मनातुन । ऐसी अवस्था लाभता ।। ४९ ।।

निर्विकल्प समाधी साधकाला । उशीर न लागे लागावयाला ।
जगाच्या अस्तित्वज्ञानाला । पूर्णपणे जो नष्ट करी ।। ५० ।।

शक्तिसंपन्न तयाचे मन । सकळ सामर्थ्य एकवटुन ।
अविरत करुनी प्रयत्न । निर्विकल्प होऊ पाहतसे ।। ५१ ।।

सद्गुरू आणि परमेश्वर । करिती कृपा साधकावर ।
मग तो अत्युच्च भूमीवर । सहज आरोहण करू शके ।। ५२ ।।

अद्वैत ज्ञानाचा तयाप्रत । साक्षात अनुभव होई प्राप्त ।
साधक चिरशांतीचा होत । अधिकारी या मार्गाने ।। ५३ ।।

अथवा इष्टावरचे तयाला । प्रेम प्रकाशवी मार्गाला ।
इष्टाची प्रेरणाच तयाला । एकरूप करिते इष्टासी ।। ५४ ।।

भक्त ज्ञानी प्रवासी दोन । मार्ग आपुला आक्रमून ।
एकाच अंतिम ध्येयालागुन । शेवटी पावती निश्चये ते ।। ५५ ।।

भक्तिमार्ग तथापि सुरेख । सहज सुलभ स्वाभाविक ।
कलियुगी आचरण्यालायक । विशेषे सामान्य जनांना ।। ५६ ।।

ज्ञानमार्ग त्यापेक्षा गहन । अनेक साधक पावती शीण ।
अव्यक्ताचे आकलन । करणे कठिण व्यक्तीला ।। ५७ ।।

कित्येक साधक आपुला यत्न । साधनकालात देती सोडुन ।
ज्ञानमार्गात धोका महान । अध:पतन व्हावयाचा ।। ५८ ।।



सांगती भगवान रामकृष्ण । सुंदर सोपा दृष्टान्त देउन ।
ज्ञानभक्ती मार्ग हे दोन । स्पष्ट कराया साधकासी ।। ५९ ।।
एका जणाची बालके दोन । कडेवरती घेतला लहान।
मोठा पित्याचे बोट धरुन । मार्ग आक्रमू लागतसे ।। ६० ।।
चालत असता माळावरुनी । अद्‌भुत दृश्य पाहिले त्यांनी ।
हात सोडुनी बालके दोन्ही । टाळ्या पिटती आनंदे ।। ६१ ।।
कडेवर बाळ जो बसलेला । पतनाची भीती नसे त्याला ।
धरी जो पित्याच्या बोटाला । तयालाच भीती पडण्याची ।। ६२ ।।
भक्त कडेवर तयापरी । ईश्वर त्याला स्वये धरी ।
ज्ञानी आपुल्याच बळावरी । मार्ग आक्रमण करितसे ।। ६३ ।।
ऐसा दोन मार्गांत भेद । दिसतसे बाहातः विरोध ।
तथापि ध्येय मात्र विशुद्ध । दोघांचेही एक असे ।। ६४ ।।
परंतु देव आणि मानव। एकत्र वसती दोनही भाव ।
अवतारांचा असा स्वभाव । असामान्य ते साधक ।। ६५ ।।
दोनही भावांचे संमेलन । असल्याकारणे विद्यमान ।
कधी कधी साधनकाळी पूर्ण। शक्ति सिद्धांची दिसत असे ।। ६६ ।।
देव मानव दोहि भूमीवर । असेल शक्ती करण्या विहार ।
मानवभावावरण दूर । करता प्रकटे देव भाव ।। ६७ ।।
अवताराच्या लावणे यथार्थ । जीवनचरित्राचा अर्थ ।
समग्र स्वरूप आकलनार्थ । असमर्थ बुद्धी मनुजाची ।। ६८ ।।
तरी चरिताचा श्रद्धेने । विचार करिता मनुष्याने ।
कल्याण होइल निश्चयाने । अणुमात्र संशय नसे येथे ।। ६९ ।।
प्राचीन काळी वर्णन केला । देवभाव त्यांच्या जीवनातला ।
मानवभाव उपेक्षिला । जीवनातिल महापुरुषांच्या ।। ७० ।।



संदेहशील काळ सांप्रती । देवभावाची उपेक्षा करिती ।
मानवभावाचाच करिती । विचार महापुरुषांच्या ।। ७१ ।।

आता प्रस्तुत चरित्रात । महापुरुषांच्या जीवनात ।
देवमानवभाव वसतात । एकच ठायी दिसेल हे ।। ७२ ।।

रामकृष्णदेव सांगती । नरदेह धारण केल्यावरती ।
ईश्वराला करावी लागती । कर्मे मानवाप्रमाणे ।। ७३ ।।

पुरुषोत्तमाला पुरुषासमान । सुखदु:खाचा भोग घेउन ।
उद्योग आणि प्रयत्न करुन । पूर्णत्व मिळवणे लागतसे ।। ७४ ।।

गौरांग बुद्धदेवाविण । अवतार जे झाले महान ।
त्यांची नाही ठेविली लिहुन । माहिती साधनकाळातिल ।। ७५ ।।

कशी ध्येयावर ठेवुनी दृष्टी । अंतर्बाह्य जिंकिली सृष्टी ।
साधना सिद्धीस नेण्यासाठी । अपार कष्ट जे भोगिले ।। ७६ ।।

ठेवुनी हरिवरी विश्वास । दूर करुनी अडथळ्यास ।
कसे ते पावले पूर्णतेस । याचा इतिहास नसेची ।। ७७ ।।

भक्तांची महापुरुषांवर । असल्यामुळे श्रद्धा अपार ।
तयांना वाटते लोकांसमोर । अपूर्णता त्यांची येऊ नये ।। ७८ ।।

त्यांना वाटते मनापासुन । महापुरुषांचा सर्वांगपूर्ण ।
जनांच्या पुढे भाव ठेवुन । अधिक कल्याण होत असे ।। ७९ ।।

यासाठीच भक्तजन । महापुरुषांची साधनकालिन ।
अपूर्णता झाकावी म्हणुन । करिती प्रयत्न पूर्व काली ।। ८० ।।

ते भक्त मुळी नच मानिती । नरदेह धारण केल्यावरती ।
मानवोचित दुर्बलता ती । अवतारिकांतही येत असे ।। ८१ ।।

अवतारांच्या शैशवातिल । ज्या असंबद्ध चेष्टा केवळ ।
त्यातही ते धुंडिती सकळ । दूर दृष्टी उदारता ।। ८२ ।।



चेष्टांत शोधिती शक्तिमत्ता । अगाध प्रेम सर्वज्ञता ।
पूर्ण बुद्धी असामान्यता । सत्ता सरलता विवेकादी ।। ८३ ।।
यास्तव त्यांचे भक्त म्हणती । ईश्वररूप लपविण्याप्रती ।
सामान्यासम आचरिती । साधनभजन अवतारिक ।। ८४ ।।
तयांचे क्लान्ति निद्राआहार । सामान्य जनासारखे विकार ।
उगीच सोंग मानिती समग्र । स्वरूप आपुले झाकावया ।। ८५ ।।
भक्त काढी असे सिद्धान्त । दुर्बलता तयाची दिसे यात ।
इष्टास मानता मानववत । भक्ति हानी होइल वाटतसे ।। ८६ ।।
भक्ती तयांची अपक्व म्हणुन । अर्थ काढी तो हुडकून ।
नरदेहाचे सामान्य गुण । तेही लपवित इष्टांचे ।। ८७ ।।
भक्तीच्या प्रथमावस्थेत । ईश्वरास करुनी ऐश्वर्यरहित ।
भक्ती करणे तयाप्रत । चिंतन करणे जमेचि ना ।। ८८ ।।
तथापि भक्ती परिपक्व होता । ईश्वरप्रेम भक्तास लाभता ।
वाटे ऐश्वर्यचिंतन मोठा । अडथळा भक्तिमार्गातिल ।। ८९ ।।
ऐसे समजता भक्ताला । दूर करू त्या कल्पनेला ।
ऐश्वर्यरहित तो इष्टाला । अनन्य भावे भजे मग ।। ९० ।।
ही गोष्ट भक्तिशास्त्रात । सांगितली असे वेळा बहुत ।
ठाउक अवतार आपुला सुत । चिंता करी तरी कौसल्या ।। ९१ ।।
यशोदेला ठाउक पूर्ण । विष्णूचा अवतार कृष्ण ।
परि पाहुनी बालवदन । चिंता करितसे तयाची ।। ९२ ।।
गोपींस आले होते कळुन । श्रीकृष्ण प्रत्यक्ष भगवान ।
खेळती हा सवंगडी म्हणुन । रागलोभ धरिती तयाचा ।। ९३ ।।
स्पष्ट सांगितले ग्रंथात । इष्टांच्या ऐश्वर्यचिंतनात ।
प्रेमभाव नाही उरत । भरविणे सजविणे घडेना ।। ९४ ।।



ईश्वराने नरदेह घेता । मानवासारखी अल्पज्ञता ।
थोडीफार तरी अपूर्णता । अनुभवावी लागे तया ।। ९५ ।।

मानवासारखा करुनी प्रयत्न । पार पडती या दोषातुन ।
जोवर होइना प्रयत्न पूर्ण । दूर होइना अपूर्णता ।। ९६ ।।

तोवर स्वस्वरुपाची जाणिव । अवतारिका न राहे सदैव ।
परी देवभाव त्यांचा स्वभाव । प्रकट होतसे कधी कधी ।। ९७ ।।

त्यांनाही जीवांसम सामान्य । आशानिराशांशी झगडुन ।
अंधकारमय मार्गातुन । गमन करावे लागतसे ।। ९८ ।।

साधकांसाठी देहधारण । नातरी आदर्श होई कोठुन ।
उद्देश होणार नाही पूर्ण । सोंग समजता साधनेचे ।। ९९ ।।

स्वार्थ बुद्धीचा अवतारिकांत । नसे लवलेश यत्किंचित ।
इतरांपेक्षा प्रकाश बहुत । मार्गात तयांना दिसतसे ।। १०० ।।

म्हणुनी शक्ती एकवटुन । जीवनसमस्या करिती पूर्ण ।
मग साधिती लोककल्याण । अवतारकार्य जे तयांचे ।। १ ।।

मानवाप्रमाणे अपूर्णता । रामकृष्णांत होती प्रथमता ।
विचार या दृष्टीने करिता । चरित्रचिंतने लाभ घडे ।। २ ।।

यास्तव त्यांचा मानवभाव । दृष्टीपुढे ठेवुनी सदैव ।
सिद्धावस्था ईश्वरभाव । पाहता लाभ घडत असे ।। ३ ।।

जर त्यांचा बाल्यापासुन । देवभाव पाहू संपूर्ण ।
तर तपस्या साधन गहन । वाटेल सोंगचि तयांचे ।। ४ ।।

मग ईश्वरलाभासाठी । आचरली जी तपस्या मोठी ।
तीही आपणा वाटेल खोटी । सोंगचि उद्योग त्याग त्यांचा ।। ५ ।।

आपुल्या मनाला वाटेल । मूळचेच जे पूर्ण केवळ ।
खटाटोप कशाला पाहिजेल । तयांना सत्यलाभास्तव ।। ६ ।।



आपणाला वाटेल त्यांचे । यत्न जे केले तनुमनवाचे ।
सोंगच जनांना दावायाचे । देवत्व स्वत:चे लपवाया ।।७ ।।
तपश्चर्या त्यांची पाहुन । निष्ठा त्याग साधने कठिण ।
होणार नाही स्फूर्ति उत्पन्न । सोंगच वाटेल सगळे ते ।।८ ।।
वाचुनि त्यांचे चरितामृत । बोध होणार नाही प्राप्त ।
वाटेल सोंगच हे समस्त । आदर्श होऊ ते शकेना ।।९ ।।
मानवभावापन्न मानुन । अवताराचे करिता पूजन ।
निश्चये होईल जनकल्याण । आदर्श मिळेल मनुजाला ।। ११० ।।
नरदेह ते धारण करुन । घेती सुखदु:खे समजावुन ।
नंतर अपार करुनी यत्न । निवारिती दु:खे जनांची ।।११ ।।
अवतारिकांचा मानवभाव । जाणू शकेल थोडा मानव ।
तथापि तयांचा ईश्वरभाव । जाणता येइना बुद्धिबळे ।।१२ ।।
निर्विकल्प समाधी होउनी प्राप्त । लीन होऊ ब्रह्मरूपात ।
आम्ही जेधवा होऊ मुक्त । तेधवा जाणू ईश्वराला ।।१३ ।।
जगत्कारण परमेश्वर । जाणू न शके सामान्य नर ।
कृपा कराया सकळांवर । दयार्द्र होउनी जन्म घेई ।।१४ ।।
याकारणे जनांसाठी । नरदेह घेतसे जगजेठी ।
अपार कृपेची करुनी वृष्टी । सकळ सृष्टी तारितसे ।।१५ ।।
सामान्यांचे ध्यावया पूजन । ईश्वर करितो देहधारण ।
जयांना सुलभ भजणे सगुण । येइना निर्गुण ध्यानामधे ।।१६ ।।
ईश्वर करितसे देहधारण । करितसे साधन भजन पूजन ।
राहतो तो आदर्श होउन । मार्ग दावी तो सकलांना ।।१७ ।।
पूर्व काळी साधकभाव । अपूर्णतेचा मानिती ठाव ।
सिद्धभाव वाटे नाव । होय भवाब्धी तरावया ।।१८ ।।



म्हणुनी तयांचे भक्तजन । साधकभाव न करिती कथन ।
यास्तव चरित्रे साधनकालिन । गेली लोपुनी कालोदरी ।। १९ ।।

रामकृष्णांचा साधनेतिहास । या काळी कळला जगास ।
जसाचा तसाच शिष्यांस । वृत्तान्त त्यांनी सांगितला ।। १२० ।।

शिष्य अधिकारी सत्यनिष्ठ । जाणती गुरू अवतारवरिष्ठ ।
जाणती जगाचे अभीष्ट । साधनेतिहास करिल हा ।। २१ ।।

यास्तव तयांनी साद्यंत । साधनकाळाचा वृत्तान्त ।
ग्रथित केलासे ग्रंथात । कल्याणार्थ जगताच्या ।। २२ ।।

म्हणुनी सांप्रत जगताला । कल्याणप्रद इतिहास कळला ।
चरित्राचा प्रकाश पडला । मार्ग उजळले मोक्षाचे ।। २३ ।।

अद्‌भुत अशा या प्रकाशात । मार्गक्रमण करावे त्वरित ।
करा साधावयासी हित । चिंतन नित भगवंताचे ।। २४ ।।

श्रीरामकृष्णकथामृत । रघुपति प्रेमाने सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १२५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा पाचवा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय सहावा

रामकृष्णपदपद्म निर्मळ । वंदुनी कृतार्थ झाले भाळ ।
थांबली मनाची तळमळ । श्रीपदे हृदयी साठविता ।। १ ।।
रामकृष्णांचे साधनस्थान । लीलाभिनयाचे ठिकाण ।
तिकडे होतसे निर्माण । अगाध लीला ईश्वराची ।। २ ।।
राणी रासमणी चतुर । भक्तिमती महिला उदार ।
बांधत होती कालीमंदिर । दक्षिणेश्वर विभागात ।। ३ ।।
कलकत्त्याच्या दक्षिणेस । जानबाजार नामे पेठेस ।
वसत होता रामचंद्रदास । कोळी ज्ञाती असे त्याची ।। ४ ।।
रासमणी तयाची पत्नी । कन्या तयांना चौघी जणी ।
अपार संपत्ती मागे ठेवुनी । रामचंद्र सोडी इहलोक ।। ५ ।।
घरी वैभव असुनी थोर । राणीच पाहे कारभार ।
व्यवहारदक्ष अत्यंत चतुर । वैभव वाढवी स्वप्रयत्ने ।। ६ ।।
ईश्वरभक्त तेजस्विनी । साहसी बुद्धिमती राणी ।
दु:खितदु:खनिवारिणी । मानी सद्गुणी ती असे ।। ७ ।।
जनकल्याण कर्माचरणी । सदैव तत्पर असे राणी ।
नद्यांना कित्येक ठिकाणी । घाट तियेने बांधिले ।। ८ ।।
रस्ते बांधिले काही स्थळी । विहिरी खोदल्या दुष्काळी ।
अन्नसत्रेसुद्धा उघडिली । कित्येक ठिकाणी राणीने ।। ९ ।।
तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करुन । बहुत धन दिधले दान ।
अनेक थोर कर्मे करुन । राणी नाम सार्थ केले ।। १० ।।



राणीच्या मुलींची त्या काळी । आधीच लग्ने होती जाहली ।
तृतीय कन्या निवर्तली । करुणामयी नाम तियेचे ।। ११ ।।

दिधले होते करुणामयिला । गरीब घराण्यातिल मुलाला ।
मथुरनाथ विश्वासाला । हुषार शिक्षित तो होता ।। १२ ।।

करुणा पावता पंचत्वास । जगदंबादासी चवथ्या मुलीस ।
दिधली मथुरनाथास । विवाह करुनी तियेने ।। १३ ।।

जन्मला जरी गरिब कुळात । कुलीन चतुर मथुरनाथ ।
साह्य करितसे राणीप्रत । व्यवस्था पाहण्यात धनाची ।। १४ ।।

आपुल्या गुणांनी रासमणीला । मथुर फार प्रिय झाला ।
त्याच्यावर मग सोपविला । कारभार सगळा राणीने ।। १५ ।।

पुष्कळ दिवसांपासून । तिजला वाटे मनातून ।
काशियात्रा करावी म्हणुन । तयारी केली गमनाची ।। १६ ।।

सर्व खर्चाचा अंदाज करुन । वेगळे काढुनी ठेविले धन ।
नौका शंभर ठरवून । भरिले सामान तयांमधे ।। १७ ।।

मुहूर्तही ठेविला पाहुन । दुसऱ्या दिवशी करावे गमन ।
आदल्या रात्री स्वप्नी येउन । दृष्टान्त दिधला देवीने ।। १८ ।।

देवी म्हणाली रासमणीस । काशीस आता जाऊ नकोस ।
माझे भागिरथीच्या तीरास । सुंदर मंदिर बांधी गे ।। १९ ।।

पूजाव्यवस्था करी पूर्ण । मग मी त्या ठिकाणी राहुन ।
घेत जाईन तुझे पूजन । यातच कल्याण असे तुझे ।। २० ।।


आदेश देवीचा ऐकुन । राणी स्वत:स मानी धन्य ।
काशियात्रेस करणे गमन । रहित करुनी टाकिले ।। २१ ।।


भागिरथीच्या तीरावरिल । कलकत्त्याच्या उत्तरेकडिल ।
दक्षिणेश्वर खेड्याजवळिल । पसंत केली एक जागा ।। २२ ।।



पन्नास बिघे तेथील जमिन । राणी घेई खरेदी करुन ।
मुसलमानांचे कबरस्थान । होते काही विभागात ।। २३ ।।
कासवाच्या पाठीपरी । भूमिचा आकार गंगातिरी ।
सांगितले तंत्रशास्त्राभीतरी । अशीच जागा ती असे ।। २४ ।।
शक्तिप्रतिष्ठा करावयाला । साधकांच्या साधनेला ।
ग्रंथात प्रकार सांगितला । तशीच जागा ती असे ।। २५ ।।
मग त्या ठायी विस्तृत थोर । राणी बांधी कालीमंदिर ।
सतत सात संवत्सर । काम चालले देवळाचे ।। २६ ।।
रासमणीने केला विचार । देह असे हा क्षणभंगुर ।
पूर्ण होताच मुख्य मंदिर । प्राणप्रतिष्ठा करावी ।। २७ ।।
मूर्ती तिने आणिल्यापासुन । ती करी कठोर तपाचरण ।
प्रतिदिनी करुनी त्रिकाल स्नान । हविष्यान्न भक्षीतसे ।। २८ ।।
भूमीवरच तिने निजावे । जप तप ध्यान आचरावे ।
परमेशचिंतनामधे रमावे । काल क्रमावा अशा रीती ।। २९ ।।
ठेविले होते मूर्तीप्रत । कुलुपबंद एका पेटीत ।
प्राणप्रतिष्ठा करण्याप्रत । मुहूर्त पाहू लागली ती ।। ३० ।।
तव एके रात्री अकस्मात । जगन्माता ये स्वप्नात ।
वदली रासमणीप्रत । कोंडुनी ठेविले मजलागी ।। ३१ ।।
तुझ्या त्या बंदिखान्यात । मजला त्रास होतो बहुत ।
प्राणप्रतिष्ठा करी त्वरित । आता विलंब लावू नको ।। ३२ ।।
आदेश देवीचा मानुन । मुहूर्त पाहण्या आणवी ब्राह्मण ।
परि विष्णुपर्वकालावाचुन । अन्य मुहूर्त जवळ नसे ।। ३३ ।।
देवीच्या प्रतिष्ठापनेला । दुसरा दिवस नसे चांगला ।
म्हणुनी विष्णुपर्वकाळाला । प्रतिष्ठापना ठरविली ।। ३४ ।।







रामकृष्णांचे साधनस्थान । कालीने करविले निर्माण ।
इकडे गदाधराला आणुन । ठेविले कलकत्ता नगरीस ।। ३५ ।।
भगवल्लीला अगाध भारी । आता तयांना दक्षिणेश्वरी ।
आणावयासाठी सत्वरी । घाई करी प्रतिष्ठापनेची ।। ३६ ।।
राणीस दिसती विघ्ने फार । कालीमंदिर झाले तयार ।
कसा मिळावा सुयोग्य विप्र । देवीची पूजा करावया ।। ३७ ।।
आपण कोळी शूद्रवर्ण । सेवेस ब्राह्मण मिळेल कोण ।
समाजाची फार कठिण । रीती असे त्या काळास ।। ३८ ।।
ब्राह्मण असती कर्मठ बहुत । पूजेची तर राहो गोष्ट ।
शूद्रांच्या ते देवालयात । नमन न करिती मूर्तीला ।। ३९ ।।
कधी तियेला विचार यावा । पूजेस कशाला ब्राह्मण हवा ।
मीच करिता पूजासेवा । घेणार नाहि का जगन्माता ।। ४० ।।
परंतु लगेच तिला वाटावे । जरी हे खरे असे आघवे ।
शास्त्राविरुद्ध म्हणुनी नावे । ठेवितील जन मम पूजेस ।। ४१ ।।
ब्राह्मण साधुसंतमंडळी । जर येणार नाही देउळी ।
न घेती प्रसाद कदाकाळी । तर काय उपयोग मंदिराचा ।। ४२ ।।
ऐसे वाटुनी रासमणीला । पंडितांचा घेतला सल्ला ।
तथापि व्यवस्था जुळण्याला । चिन्हही तिजला दिसेना ।। ४३ ।।
बांधिले एवढे भव्य मंदिर । काय व्यर्थ ते होणार ।
ऐसा मनी येउनी विचार । चिन्ता लागली राणीला ।। ४४ ।।
राणीस ऐसी पडता चिंता । रामकुमार सुचवी व्यवस्था ।
म्हणे देवालयाची मत्ता । दान करावी ब्राह्मणासी ।। ४५ ।।
नित्यसेवेची तो ब्राह्मण । सर्व व्यवस्था देता करुन ।
न होता शास्त्रांचे उल्लंघन । प्रसाद घेतिल सकळीक ।। ४६ ।।



ते ऐकुनी बोलती पंडित । कोठेहि ऐसी नसे रीत ।
साधु ब्राह्मण येणार नाहित । मंदिरात प्रसाद घ्यावया ।। ४७ ।।
परंतु न म्हणती विद्वान । रामकुमाराचे वचन ।
अशास्त्र असे ते संपूर्ण । सांगु न शकती शास्त्रार्थ ।। ४८ ।।
पंडितांच्या विरुद्ध मत । रामकुमार स्पष्ट सांगत ।
म्हणुनी राणीच्या मनात । आदर तयांचा उद्‌भवला ।। ४९ ।।
तियेच्या पदरी शिहडचा । महेशचंद्र चतर्जी नावाचा ।
ब्राह्मण कारभारी साचा । तयाला तियेने सांगितले ।। ५० ।।
कोणी सदाचारसंपन्न । शोधुनि आण सुविद्य ब्राह्मण ।
शास्त्रज्ञ आणि निष्ठावान। पूजेस्तव जगन्मातेच्या ।। ५१ ।।
महेशचंद्र करी विचार । कार्य जर हे पाडले पार ।
तर बक्षीस मिळेल थोर । संधी ऐसी दवडू नये ।। ५२ ।।
तयाने आपुल्या भावाला । क्षेत्रनाथ चतर्जीला ।
राधागोविंदपूजनाला । नेमविले राणीकडुन ।। ५३ ।।
तथापि कालीच्या पूजनाला । योग्य ब्राह्मण मिळेना त्याला ।
जाणतसे रामकुमाराला । संकोच परंतु वाटतसे ।। ५४ ।।
रामकुमाराची स्थिती । तो जाणे चांगली नव्हती ।
उदरनिर्वाह करण्याप्रती । पाठशाळा तो चालवी ।। ५५ ।।
पिता जयाचा निष्ठावान । दान घेइना शूद्राकडुन ।
कसे म्हणावे तयालागुन । तेथे चाकरी करिसी का ।। ५६ ।।
मग राणीला वदता झाला । रामकुमार विप्र चांगला ।
योग्य देवीच्या पूजनाला । तुम्हीच विनवा तयाप्रती ।। ५७ ।।
शास्त्रार्थ करण्यात असे निपुण । विद्वान सुशील सूज्ञ ब्राह्मण ।
तो जर करू लागे पूजन । सकल समस्या सुटतील ।। ५८ ।।



रासमणीला विचार पटला । तत्काळ तियेने लखोटा लिहिला ।
पाठविले महेशचंद्राला । रामकुमाराकडे मग ।। ५९ ।।
रामकुमारे पत्र पाहुन । साधक बाधक विचार करुन ।
रासमणीच्या इच्छेस मान । द्यावयाचे ठरविले ।। ६० ।।
कोण जाणे भविष्याला । जगदंबेची अतर्क्य लीला ।
नेमिले रामकुमाराला । पूजकपदाला राणीने ।। ६१ ।।
यापरी रामकुमाराचा । त्याच्यामुळेच गदाधराचा ।
संबंध कालीभगवतीचा । जुळुनी आला दक्षिणेश्वरी ।। ६२ ।।
कालीदेवीच्या पूजनाला । योग्य ब्राह्मण वाटे मिळाला ।
राणीस फार आनंद झाला । चिन्ता निमाली तियेची ।। ६३ ।।
देवीच्या प्रतिष्ठापनेप्रत । तियेने खर्च केला बहुत ।
वाराणसीहुनी विख्यात । ब्राह्मण तियेने आणविले ।। ६४ ।।
आलेल्या सर्व ब्राह्मणालागुन । रेशमी वस्त्रे केली अर्पण ।
दक्षिणा दिधली एकेक होन । उपरणी दिधली सकलांसी ।। ६५ ।।
सर्व लोकांच्या दिवसभर । उठल्या पंक्ती अपार ।
नव लाख रुपये एकंदर । रासमणीने खर्च केला ।। ६६ ।।
प्राणप्रतिष्ठा देवीची झाली । अठराशे पंचावन साली ।
मे महिन्याचा त्या वेळी । एकतीस होता दिनांक ।। ६७ ।।
देवीच्या पूजाव्यवस्थेलागुन । दोन लक्षांवर खर्च करुन ।
शालवाडी परगणा पूर्ण । खरेदी करुनी टाकिला ।। ६८ ।।
गदाधरही पितयासमान । असे अत्यंत निष्ठावान ।
समारंभ होउनी एवढा महान । भोजन करिना गदाधर ।। ६९ ।।
उत्सवात तथापि मिसळुन । गदाधर परिसे भजन कीर्तन ।
कार्यक्रम सर्वही पाहुन । आनंद केला दिवसभर ।। ७० ।।



दिवसा निराहारी राहुनी । रात्री एका दुकानातुनी ।
एका पैशाचे पोहे खाउनी । झामापुकुरा परतला ।। ७१ ।।
पुनरपि प्रातः समयाला । गदाधर जाई दक्षिणेश्वराला ।
विधी उरलेले पाहावयाला । भाग घ्यावया समारंभी ।। ७२ ।।
रामकुमार तेधवा तेथुन । परतावयाचे न दिसे चिन्ह ।
गदाधर होताच माध्यान्ह । झामापुकुरास परतला ।। ७३ ।।
कार्यक्रम तेथिल आटोपुनी । अग्रज येइल परतूनी ।
ऐसी आशा मनात धरुनी । गदाधर वाट पाहतसे ।। ७४ ।।
दिवस लोटले पाच सात । रामकुमार न येई परत ।
यास्तव दक्षिणेश्वराप्रत । पुनरपि गेला गदाधर ।। ७५ ।।
तेथे जाता कळिले सत्वर । पुजारी झाला रामकुमार ।
सरल स्वभावी गदाधर । दुःखित झाला मनामधे ।। ७६ ।।
शूद्राकडली स्वपित्याने । कधीही घेतली नाही दाने ।
आता रामकुमाराने । सेवाच तयांची स्वीकारिली ।। ७७ ।।
मग विनविले अग्रजाला । सोडुनी देई चाकरीला ।
रामकुमारे तद्वचनाला । ऐकुनी घेतले शांतपणे ।। ७८ ।।
शास्त्रार्थ सांगे रामकुमार । परी मानीना गदाधर ।
मग चिठ्ठ्या टाकिता सत्वर । निघाले कुमारे ठीक केले ।। ७९ ।।
चिठ्ठीमधे जेव्हा निघाले । रामकुमारे बरे केले ।
तेव्हाच गदाधराचे झाले । समाधान पटली समजूत ।। ८० ।।
चिंता करितसे गदाधर । येथे राहता रामकुमार ।
पाठशाळा बंद होणार । काय गती मग आपुली ।। ८१ ।।
परत फिराया उशीर झाला । रामकुमार म्हणे तयाला ।
येथेच घेई प्रसादाला । न माने तथापि गदाधर ।। ८२ ।।



रामकुमार त्याला म्हणाला । गंगोदकाने पाक केला ।
ब्राह्मणांनी तयार केला । त्यातही प्रसाद देवीचा ।। ८३ ।।
ऐशा पवित्र अन्नालागुन । सेवन करिता दोष कोण ।
मनाच्या सकळ शंका सोडुन । प्रसाद ग्रहण करी आता ।। ८४ ।।
तरीही न माने गदाधर । प्रसाद घ्यावया देई नकार ।
वदता झाला रामकुमार । तर मग करी असे आता ।। ८५ ।।
शिधा घेउनी कोठीतुन । गंगापात्रामधे जाउन ।
स्वहस्ताने पाक करुन । भोजन करावे सत्वरी ।। ८६ ।।
गंगापात्रातील समस्त । वस्तू पवित्र असतात ।
गदाधर परम गंगाभक्त । वचन तयाचे मान्य करी ।। ८७ ।।
आहारनिष्ठा तयाची समस्त । गंगाभक्ती करी पराजित ।
तेव्हापासुनी असे करित । गंगापात्रात स्वयंपाक ।। ८८ ।।
जी गोष्ट शास्त्रार्थ सांगुनी । पटवू शकला नाही कोणी ।
सहज गोष्ट ती आली घडुनी । श्रद्धाभक्तिने गंगेच्या ।। ८९ ।।
रामकृष्णांची गंगेवर । श्रद्धाभक्ती असे अपार ।
ब्रह्मवारी म्हणती प्रभुवर । आदराने गंगोदका ।। ९० ।।
म्हणती गंगातिरालागुन । मानव वसता त्याचे मन ।
जाई अत्यंत पवित्र होउन । धर्मबुद्धी त्यात उपजतसे ।। ९१ ।।
गंगानदीचा पवित्र वारा । जोवर वाहे दोन्ही तीरा ।
तोपर्यंत प्रदेश सारा । पवित्र होउनी जातसे ।। ९२ ।।
गंगादेविच्या कृपेकरुन । तपभक्तीची इच्छा होउन ।
सदैव राहते विद्यमान । अंत:करणात जनांच्या ।। ९३ ।।
विषयी जनांत मिसळून । सांसारिक गप्पा करुन ।
कोणी येता घ्यावया दर्शन । तर ते तयाला सांगती ।। ९४ ।।



गंगातीरावरी जाउनी । थोडे तरी ये पिउनी पाणी ।
विषयासक्त पापी कोणी । नास्तिक येता दर्शनासी ।। ९५ ।।
निघुनी जाता तत्काळ । बसला होता तेथे सकळ ।
शिंपडिती ते गंगाजळ । पवित्र स्थळ ते करावया ।। ९६ ।।
गंगोदकाचा प्रातर्विधीस । उपयोग करिता कोणी माणुस ।
होतसे तयांच्या चित्तास । अत्यंत दुःख ते पाहुनी ।। ९७ ।।
असो गदाधर तेव्हापासुन । स्वहस्ताने पाक करुन ।
गंगापात्रात करुनी भोजन । राहु लागला दक्षिणेश्वरी ।। ९८ ।।
पंचवटीने शोभित वन । गंभीर गंगाप्रवाह पाहुन ।
किलबिलाट पक्ष्यांचा परिसुन । हळूहळू मन रमू लागले ।। ९९ ।।
जगन्मातेचे विशाल मंदिर । अहर्निश देवसेवा थोर ।
पाहुनी तयास दक्षिणेश्वर । अतिशय आवडू लागले ।। १०० ।।
थोड्याच काळात कामारपुकुर । आठवेना झामापुकुर ।
मग आनंदे गदाधर । राहु लागला त्या ठायी ।। १ ।।
सुंदर स्वरूप धर्मनिष्ठा । सुश्राव्य कंठ वाणीत मधुरता ।
विनयी वृत्ती स्वभावी सरलता । पाहताच आदर वाटतसे ।। २ ।।
पाहुनी गदाधराप्रत । आकर्षित झाला मथुरनाथ ।
अनुकूल ग्रह झाला त्वरित । मर्जी बसली तयावरी ।। ३ ।।
ऐसे अनेक वेळा घडे । जिव्हाळ्याचा संबंध पडे ।
तयाचे प्रेमाकर्षण गाढे । उपजे पहिल्याच भेटीत ।। ४ ।।
शास्त्रे सांगती याचे कारण । पूर्व जन्मीचे संस्कार म्हणुन ।
मथुरनाथाचा संबंध पाहुन । सत्यता पटते शास्त्रांची ।। ५ ।।
मथुरबाबूच्या आले मनात । कालीमातेच्या पूजनात ।
साह्यास रामकुमाराप्रत । गदाधराला नेमावे ।। ६ ।।



आपुल्या मनातिल ही मात । सांगे रामकुमाराप्रत ।
परि तो पूर्णपणे जाणत । मनःस्थिती आपुल्या भावाची ।। ७ ।।

रामकुमार तयाला वदला । जाणतो मी गदाधराला ।
स्वीकारणार नाही सेवेला । ऐसे मजला वाटतसे ।। ८ ।।

मथुरनाथे त्या वेळेला । विशेष आग्रह नाही केला ।
वाट मात्र पाहू लागला । योग्य संधी मिळण्याची ।। ९ ।।

रामकृष्णांच्या जीवनात । निकट संबंध ज्याचा येत ।
व्यक्ती ती दक्षिणेश्वराप्रत । अकस्मात तेधवा पातली ।। ११० ।।

गदाधराची आतेबहिण । हेमांगिनी तिचे अभिधान ।
हृदयराम तिचा नंदन । मुखर्जी उपनाम तयाचे ।। ११ ।।

काही काम मिळावे म्हणुन । आला दक्षिणेश्वरालागुन ।
मामा तेथेच असतो पाहुन । राहू लागला तयासवे ।। १२ ।।

हृदयराम गदाधर दोन । समान त्यांचे वयमान ।
परस्परांची प्रथमपासुन । माहिती होती तयांप्रती ।। १३ ।।

उंच देखणा पुरुष हृदय । बलिष्ठ सुदृढ तयाचा देह ।
उद्योगी धाडसी निर्भय । संकटकाळी डगमगेना ।। १४ ।।

कसेही संकट होता प्राप्त । हृदय न सोडी धीर तयात ।
त्यातुनी पार पडण्याप्रत । मार्ग शोधुनी काढितसे ।। १५ ।।

धाकटा मामा गदाधर । प्रीती उपजली तयावर ।
कितिही कष्ट सोसण्या तयार । गदाधरासाठी सदैव ।। १६ ।।

हृदयराम खटपटी पुरुष । तयास ठाउक नसे आळस ।
केव्हाही पाहता तयास । आढळे कामात गुंतलेला ।। १७ ।।

परी तो स्वार्थपरायण । भक्तिभाव नसे मुळीहुन ।
परमार्थात न रमे मन । लक्ष नसेचि देवाकडे ।। १८ ।।



तयाची स्वार्थपरायणता । कधीहि पावली नाही नष्टता ।
थोडीफार दिसे जी भाविकता । परिणाम असे तो संगतीचा ।। १९ ।।
रामकृष्णांचे आचरण । विपरित मानिती सामान्य ।
आहारविहारी उदासीन । देहधारण व्हावे कसे ।। १२० ।।
वृत्ती तयांची विचारशील । स्वार्थगंधशून्य केवळ ।
यास्तव कोणी उद्यमशील । साह्य करणारा अवश्य असे ।। २१ ।।
हृदय उद्योगी धैर्यवान । मामावर प्रेम करी अनन्य ।
काय जगदंबा तयालागुन । म्हणून आणुनी ठेवितसे ।। २२ ।।
जगदंबेची अगम्य लीला । कोण जगात जाणू शकला ।
साधनसमयी हृदयरामाला । आणुनी ठेविले तियेने ।। २३ ।।
जर का साधनसमयाला । हृदयराम नसता आला ।
रामकृष्णांच्या शरीराला । कठीण होते टिकणेही ।। २४ ।।
रामकृष्णांच्या चरितात । हृदयराम अमर होत ।
सेवा करुनी अति अद्‌भुत । पूज्य जाहला सकलांला ।। २५ ।।
विसावे संपता गदाधराला । हृदय दक्षिणेश्वरी आला ।
उभयतांना आनंद झाला । परस्परांच्या संगतीत ।। २६ ।।
स्नानसंध्यादी समग्र । एकत्र करिती व्यवहार ।
गदाधराविरुद्ध अणुमात्र । हृदय वर्तन करित नसे ।। २७ ।।
गदाधराचे निरर्थक वर्तन । जरी मानिती सकळ जन ।
हृदय पंचाइत न करी पाहुन । प्रिय झाला गदाधराला ।। २८ ।।
हृदयराम असे सांगत । तेव्हापासुनि माझ्या मनात ।
प्रेमाकर्षण वाढले बहुत । धाकुट्या मामांसंबंधी ।। २९ ।।
वाटे त्यांच्यासवे असावे । छायेप्रमाणे सदा राहावे ।
त्यांना कधीही न सोडावे । जिवेभावे वाटतसे ।। १३० ।।



दृष्टिआड मामा होता । चित्तात उपजे अस्वस्थता ।
दोघांच्याही गोष्टी समस्ता । एकत्र होती त्याकाळी ।। ३१ ।।

दुपारी काही वेळपर्यंत । दोघांची होतसे ताटातुट ।
स्वहस्ते मामा पाक करित । मी मात्र प्रसाद सेवितसे ।। ३२ ।।

स्वयंपाकाची त्यांची तयारी । मीच पंचवटीमाजी करी ।
मामा पाक करिती स्वकरी । भोजन करिती तेथेच ।। ३३ ।।

दुपारी स्वये पाक करिती । परंतु रात्री प्रसाद घेती ।
प्रसाद सेविता भरुनी येती । नयन तयांचे अश्रूंनी ।। ३४ ।।

रडत जगदंबेला म्हणावे । कोळ्याचे अन्न लागे खावे ।
आई मज ना वाटे बरवे । मजकरवी का करविसी ।। ३५ ।।

हृदयराम असे सांगत । मामांची आहाराबाबत ।
निष्ठा बलिष्ठ असे बहुत । न सेविती अन्न ते कोणाचे ।। ३६ ।।

रामकृष्णांनी स्वत: म्हणावे । कोळ्यांचे अन्न लागे खावे ।
मनात यास्तव वाटावे । अत्यंत वाईट मजलागी ।। ३७ ।।

कोळ्यांचे ते देउळ म्हणुन । प्रथम प्रथम काही दिन ।
कंगाल भिकारी भिक्षान्न । घ्यावयाला नाकारिती ।। ३८ ।।

अन्न घ्यावया न मिळे कोणी । कित्येकदा निरुपाय होउनी ।
चारिती सारे गुरांलागुनी । अथवा सोडिती गंगेत ।। ३९ ।।

दोन तीन महिने पर्यंत । स्वये पाक करुनी सेवित ।
पूजकपद परि होता प्राप्त । प्रसाद घेतसे गदाधर ।। १४० ।।

आहारनिष्ठा ऐसी पाहुनी । कदाचित जन म्हणती कोणी ।
काय अनुदारतेवाचुनी । आध्यात्मिक उन्नति होत नसे ।। ४१ ।।

अनुदारता दृढ निष्ठा पाही । एक नसती भिन्न दोही ।
अनुदारता उत्पन्न होई । अहंकारात शंका नसे ।। ४२ ।।



अहंकारात जिची उत्पत्ती । केवी करिल ती आत्मोन्नती ।
अनुदारतेने अधोगती । प्राप्त होईल सहजची ।। ४३ ।।
आपण म्हणतो तेच ज्ञान । जे करितो ते योग्य वर्तन ।
ऐसे माने जयाचे मन । हारवून बसे तो उन्नतीला ।। ४४ ।।
परी शास्त्रांच्या श्रद्धेत । आप्तवाक्यांच्या विश्वासात ।
दृढ निष्ठा जी उत्पन्न होत । तियेने उन्नती होत असे ।। ४५ ।।
जव निष्ठेचा उदय होई । अहंकार तव विलया जाई ।
कार्याकार्य ते कळुनी येई । प्रकाश पडतसे पंथात ।। ४६ ।।
प्रथम निष्ठेच्या समवेत । अनुदारता दिसे वर्तनात ।
परि ती लोप पावे समस्त । उज्ज्वल स्वमार्ग दिसे मग ।। ४७ ।।
निष्ठेवरिल ते आवरण । अनुदारतेचे पडे गळुन ।
अहंकारशून्य होई मन । प्रेम अंतरी फाकतसे ।। ४८ ।।
संकुचितता विलया जाई । उदार विशाल दृष्टी येई ।
अध्यात्मशास्त्र ग्वाही देई । एवढे महत्त्व निष्ठेचे ।। ४९ ।।
बाळगुनी दृढ निष्ठा मनी । शास्त्राप्रमाणे वागुनी ।
तर अध्यात्ममार्गालागुनी । निश्चये होऊ अग्रेसर ।। १५० ।।
कंटकाने काटा काढिती । निष्ठा तशीच वापरिती ।
मग अवश्य होतसे प्राप्ती । उदारतेची मानवाला ।। ५१ ।।
उदारता उपजता सारी । प्रेमे उपजे भूतमात्री ।
शांतिसुखाचा अधिकारी । कालेकरुनी होत असे ।। ५२ ।।
शासनानुसरणे शासनातीत । नियम पाळुनी नियमातीत ।
ऐसी अवस्था होतसे प्राप्त । यास्तव निष्ठा अवश्य असे ।। ५३ ।।
यौवनारंभी रामकृष्णात । अपूर्णता काही प्रमाणात ।
होती संशय नसे यात । पूर्णता मग ते पावले ।। ५४ ।।



कोणी होईल विचारिता । रामकृष्णांना अवतार म्हणता ।
तर पूर्वीची अपूर्णता । कशास मांडता जगापुढे ।। ५५ ।।
म्हणता त्यांना प्रत्यक्ष ईश्वर । तर असंपूर्णतेचा प्रकार ।
झाकुनी ठेवावा तो समग्र । करावा जगाच्या दृष्टिआड ।। ५६ ।।
रामकृष्णांचे शिष्य म्हणती । आमुच्याही आयुष्याप्रती ।
एक वेळा अशी होती । नव्हतो मानित अवतार ।। ५७ ।।
ईश्वर देह धारण करी । अवतीर्ण होई अवनीवरी ।
आमुची या गोष्टीवरी । श्रद्धा अणुमात्र नव्हती हो ।। ५८ ।।
रामकृष्णांची कृपा होउनी । कळले तो ये नरदेह घेउनी ।
त्यांच्याच प्रसादे आली कळुनी । अवतारांची सत्यता ।। ५९ ।।
जव नरदेह घेतसे ईश्वर । तव शरिराच्या बरोबर ।
मनाची सुद्धा थोडीफार । अपूर्णता येत असे ।। १६० ।।
रामकृष्णदेव सांगत । सुवर्णादि धातुमात्रात ।
दागिना न घडू शके नीट । मिसळ घातल्यावाचुनी ।। ६१ ।।
स्वजीवनाची अपूर्णता । रामकृष्णांनी कथिली स्वतः ।
प्रयत्न ती लपविण्याकरिता । कधी नाही केला तयांनी ।। ६२ ।।
जर दडपुनी टाकिले सत्य । केवी जनांचे होईल हित ।
उघड करुनी दाविता येथ । कल्याण होईल जगताचे ।। ६३ ।।
तसेच उघड दाविती म्हणुन । झाला जो राम रघुनंदन ।
द्वापारात झाला कृष्ण । रामकृष्ण होउनी तो आला ।। ६४ ।।
अवतार जयाने घेतले पूर्वी । तोच पुनरपी आला ऊर्वी ।
राजा जैसा येतसे गावी । वेष बदलुनी पाहावया ।। ६५ ।।
गुप्तरूपाने या देहात । तोच आला आहे सांप्रत ।
आदर्श मानुनी तयाप्रत । जीवने घडवा आपुलाली ।। ६६ ।।



भगवंताचे केवळ स्मरण । निश्चित साधेल जनकल्याण ।
अल्पहि गाता कथेतुन । श्रवण करिता चरितामृत ।। ६७ ।।
तरी भाग्य ये उदयास । साफल्य येई जीवितास ।
मनोरथ जाती सिद्धीस । कृतार्थ होतसे नरजन्म ।। ६८ ।।
यास्तव या हो या हो समस्त । सेवन करा हो परमामृत ।
आपुले जीवन करा कृतार्थ । उत्तमोत्तम असे हा मार्ग ।। ६९ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १७० ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा सहावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय सातवा

जय जय श्रीरामकृष्णा । विश्वव्यापी तुमची करुणा ।
सखोलपणा कळेल कोणा । यथार्थत्वे त्वत्कृपेचा ।। १ ।।

यास्तव कृपादृष्टिने पाही । मस्तक ठेविले तुमच्या पायी ।
नभ तुटताहि भीती नाही । भगवत्कृपेच्या सावलीत ।। २ ।।

हृदयराम होता जाणत । त्यावर गदाधराची प्रीत ।
त्याच्यासमोर सगळे होत । व्यवहार धाकुट्या मामांचे ।। ३ ।।

हृदय रामकुमाराला । साह्य करण्यात असता गुंतला ।
वामकुक्षी माध्यान्हाला । आरतीस जाता सायान्ही ।। ४ ।।

हृदयला ठाउक नसे मुळी । सकाळ दुपार संध्याकाळी ।
आपणा सोडुनी तिन्ही वेळी । जातसे कोठे गदाधर ।। ५ ।।

इकडे तिकडे तये शोधावे । परंतु प्रयत्न व्यर्थ व्हावे ।
तीनचार घटकांनी यावे । गदाधराने परतून ।। ६ ।।

हृदयरामला नव्हते माहित । मामा जाती पंचवटीत ।
जपध्यान करावयाला तेथ । पाळत एकदा ठेवली ।। ७ ।।

तेधवा पंचवटीच्याकडुनी । मामा येतात आले दिसुनी ।
वाटले बहिर्दिशेलागुनी । गेले असतील रानामधे ।। ८ ।।

एके दिवशी गदाधराला । वाटले पूजावे शंकराला ।
बाळपणापासुनी त्याला । मूर्ती येती अति सुंदर ।। ९ ।।

मनात येताच त्या क्षणी । गंगेतिल मृत्तिका आणुनी ।
शिवनंदीच्या मूर्ती करुनी । निमग्न झाला पूजेमधे ।। १० ।।



मथुरनाथ तेवढ्यात । अवचित तेथे आला फिरत ।
पाहे गदाधर पूजा करित । तन्मयतेने शंकराची ।। ११ ।।

उत्कृष्ट ती प्रतिमा पाहुन । मथुरनाथ गेला मोहुन ।
निरखिता ती जवळ घेउन । आश्चर्यचकित तो झाला ।। १२ ।।

कौतुकाने मग राणीला । मूर्ती पाठवी पहावयाला ।
रासमणी पाहुनी प्रतिमेला । पावली अत्यंत आश्चर्य ।। १३ ।।

गदाधराला नोकरीवर । ठेवावयास इच्छी मथुर ।
आता कला पाहुनी थोर । तयाची इच्छा बळावली ।। १४ ।।

रामकुमारांच्या मार्फत । नोकरीची काढली मात ।
गदाधराने स्पष्ट शब्दांत । उत्तर दिधले विनयाने ।। १५ ।।

मजला भगवानावाचुन । सेवा कुणाची नसे मान्य ।
अपेक्षित उत्तर ते ऐकुन । तयाने कळविले मथुरला ।। १६ ।।

तेव्हापासुनी मथुरबाबूला । गदाधर टाळावया लागला ।
जरी तो पाळी सत्यधर्माला । भीड कुणाची धरित नसे ।। १७ ।।

तरीही उगीच एखाद्याला । नाराज करणे नावडे त्याला ।
यास्तव मथुरच्या भेटीला । टाळु लागला प्रयत्नांनी ।। १८ ।।

काही आशा न धरिता मनात । सद्गुणांचा आदर करित ।
आदरणीय व्यक्तीप्रत । मान देणे स्वभाव त्याचा ।। १९ ।।

पूजकपद ते देवालयी । स्वीकारावे अथवा नाही ।
जोवर निश्चय न ठरे काही । काय सांगावे मथुरला ।। २० ।।

रुचेना ऐसे देता उत्तर । मथुर दु:खित होइल फार ।
ऐसा करुनी मनी विचार । टाळु लागला बाबूला ।। २१ ।।

दक्षिणेश्वरी त्याचा काळ । आनंदाने जाई सकळ ।
आवडू लागले निवांत स्थळ । आवडे देउळ देवीचे ।। २२ ।।



आवडे भागिरथीचे तीर । आवडे पवित्र गंगानीर ।
आवडू लागले दक्षिणेश्वर । पंचवटीवन आवडले ।। २३ ।।
वाटे येथुनी न जावे दूर । ठाम जोवर न ठरे विचार ।
मथुरनाथबाबूसमोर । वाटे तोवर जाऊ नये ।। २४ ।।
भीत होते ज्या गोष्टीला । तिचीच आज आली वेळा ।
सहज देवीच्या दर्शनाला । मथुर पातला देवळास ।। २५ ।।
दुरुनि पाहिला गदाधर । पाचारण्यासाठी पाठवी नोकर ।
गदाधर करित होता विचार । टाळून जावे मथुरला ।। २६ ।।
इतुक्यात सेवक तेथे येउन । गदाधरास बोले वचन ।
मथुरबाबू तुम्हालागुन । बोलावताती सत्वरी ।। २७ ।।
गदाधराचा नव्हता विचार । जावयाचा बाबू समोर ।
मग हृदय बोलला सत्वर । मामा बाबू बोलाविती ।। २८ ।।
तव गदाधर म्हणे त्याला । बाबू निश्चित म्हणेल मजला ।
करितोस काय नोकरीला । काय तयाला सांगू मग ।। २९ ।।
हृदयराम तयाला म्हणे । थोरामोठ्यांच्या आश्रयाने ।
काय वाईट असे राहणे । गदाधर सांगे तयाप्रती ।। ३० ।।
आजन्म चाकरी करावयाला । इच्छा नाही माझ्या मनाला ।
आणि देवीच्या दागिन्यांला । जबाबदार होईन मी ।। ३१ ।।
भानगड असली मजकडुन । होणे अशक्य असे जाण ।
जबाबदारी तू उचलून । घेशील काय दागिन्यांची ।। ३२ ।।
तर नोकरी करण्या काही । माझी तशी हरकत नाही ।
नोकरीसाठीच हृदयनाथही । आला होता दक्षिणेश्वरा ।। ३३ ।।
तयाने गदाधराचे म्हणणे । मान्य केले आनंदाने ।
दोघेजण मग उत्साहाने । गेले मथुरनाथाकडे ।। ३४ ।।



गदाधराच्या तर्काप्रमाणे । नोकरीविषयी पुशिले तयाने ।
गदाधराने आपुले म्हणणे । स्पष्टपणाने निवेदिले ।। ३५ ।।
नेमिले मथुरनाथे तयाला । देविच्या वेषकारी पदाला ।
दोनही भावांच्या मदतीला । नेमिले हृदयला तेधवा ।। ३६ ।।
प्रतिष्ठापना झाल्यापासुन । झाले नव्हते महिने तीन ।
गदाधर नोकरी धरी म्हणुन । रामकुमार झाला निश्चिंत ।। ३७ ।।
गदाधराची तन्मयता । मधुर आवाज आणि सरलता ।
पाहुनी मथुरबाबुच्या चित्ता । आदर उत्पन्न जाहला ।। ३८ ।।
जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिनी । क्षेत्रनाथाच्या हातातुनी ।
गोविंदमूर्ती खाली पडुनी । पाय भंगला मूर्तीचा ।। ३९ ।।
क्षेत्रनाथ पडला लागले । बिचाऱ्याचे कोठेच गेले ।
तयाचे आंग कापू लागले । मथुरबाबूच्या भीतीने ।। ४० ।।
भंगलेल्या मूर्तीचे पूजन । शास्त्रनिषिद्ध समजून ।
शास्त्रीपंडित विद्वज्जन । बोलावुनी सभा भरविली ।। ४१ ।।
सांगते झाले विद्वज्जन । भग्न मूर्ती द्यावी टाकुन ।
दुसरी मूर्ती घडवुन । प्रतिष्ठापना तिची करा ।। ४२ ।।
मूर्ती होती सुंदर । ऐकुनी दु:खित झाला मथुर ।
उद्विग्न होउनी पुसे विचार । गदाधराला आदराने ।। ४३ ।।
अत्यादर वाटे मथुरला । म्हणतसे बाबा गदाधराला ।
तुमचा निर्णय सांगा मजला । काय मूर्तीचे करायचे ।। ४४ ।।
तव बाबा वदती त्याला । जर राणीच्या जामाताला ।
अपघात होउनी पाय मोडला । तर काय दुसरा आणायचा ।। ४५ ।।
पाय दुरुस्त करावयाची । व्यवस्था करणे योग्य त्याची ।
येथेहि उचित करणे तसेची । सरळ गोष्ट ही आहे ।। ४६ ।।



ऐकुनि बाबांचा तो निर्णय । पंडितांना वाटे विस्मय ।
कोणी नाही कोणी होय । निर्णयासंबंधी बोलती ।। ४७ ।।

ऐकुनि बाबांच्या निर्णयाला । मथुरनाथ आनंदला ।
वाटले कुणाला नाही सुचला । सरळ साधा विचार हा ।। ४८ ।।

गोविंदजींचा आविर्भाव । होउनि मूर्ती भासे सजिव ।
काय एक तुटता अवयव । लोपावा आदर क्षणामधे ।। ४९ ।।

काय एकच भंगता पाय । सकळ श्रद्धा लुप्त होय ।
जियेचा घेत होतो आश्रय । पूजनामाजी श्रीहरीच्या ।। ५० ।।

काय चरण भंगता क्षणी । भक्ती प्रेम जे होते मनी ।
सद्भक्ताच्या मनातुनी । नष्ट होईल तत्काळ ।। ५१ ।।

काय प्रेमही भक्तजनांचे । असे मूर्तिच्या आकाराचे ।
की अवयव तुटता मूर्तीचे । कमी होतसे तयासवे ।। ५२ ।।

गदाधराने भंगलेला । बेमालुम तो पाय जोडिला ।
न कळू शके पाहणाऱ्याला । चरण भंगलेला असे ।। ५३ ।।

नवीन मूर्ती बनविलेली । मंदिरात बाजूस ठेविली ।
जुन्या मूर्तीचीच केली । पुनरपि प्राणप्रतिष्ठा ।। ५४ ।।

मथुरने क्षेत्रनाथाला । कामावरुनी कमी केला ।
तेथे नेमिले गदाधराला । पूजावयाला राधाकृष्ण ।। ५५ ।।

पूजा करिता गदाधर । पाहण्यालायक असे फार ।
पूजनात मन एकाग्र । पाहता नारीनर मोहती ।। ५६ ।।

सुश्राव्य तयाचे गायन । ऐकता जाइना स्मरणातुन ।
गीतोक्त विषयात तन्मय होउन । हृदय हालवी श्रोत्यांचे ।। ५७ ।।

ऐकता त्याचे मधुरगायन । पटे भाव संगिताचा प्राण ।
ताल लयांची असाधारण । असे गाण्यात विशुद्धता ।। ५८ ।।



प्रशंसा ऐकता गायनाची । गमे तद्गत विषयाची ।
ती नसे नादमाधुर्याची । असे तयांना वाटतसे ।। ५९ ।।
राणी रासमणीप्रती । गाणी तयांची आवडती ।
येता देवीच्या दर्शनाप्रती । सांगे गाणी गावयाला ।। ६० ।।
गदाधर आपुल्या गायनात । तन्मय होतसे अत्यंत ।
गाउनी दावितो दुसऱ्याप्रत । याचाही विसर पडत असे ।। ६१ ।।
चित्त रंगे म्हणता गान । हारपुनि जाई देहभान ।
बाहेर काय येई घडुन । त्याकडे ध्यानच नसावे ।। ६२ ।।
मोठे मोठे गायक गाती । तेही प्रशंसा अपेक्षिती ।
बाबांची तशी गोष्ट नव्हती । सर्वथा वृत्ती निरपेक्ष ।। ६३ ।।
कोणी समोर प्रशंसिती । तरिही बाबास वाटे चित्ती ।
गीतोक्त विषया वाखाणिती । नसे स्तुती ही स्वत:ची ।। ६४ ।।
देवीपुढती गाता गाणी । अश्रुधारा वाहती नयनी ।
इतुके तल्लिन होती गायनी । जातसे भिजुनी वक्षस्थळ ।। ६५ ।।
पूजेत तन्मय जाती होउन । कोण करी मग आगमन ।
याची दखल घेईल कोण । भान संपूर्ण लोपतसे ।। ६६ ।।
रामकृष्ण सांगती स्वत: । अंगन्यासादी करीत असता ।
मंत्रवर्ण दिसती उमटता । प्रत्यक्ष माझ्या देहावर ।। ६७ ।।
मज प्रत्यक्ष अनुभवा येई । कुंडलिनी ती जागृत होई ।
आणि सुषुम्नामार्गे जाई । सहस्रारकमलाकडे ।। ६८ ।।
देहाचा जो भाग सोडुनी । पुढे जातसे कुंडलिनी ।
तत्काळ तो नि:स्पंद होउनी । मृतवत होतो दिसतसे ।। ६९ ।।
'रं इति जलधारया । वन्हिप्राकारं विचिन्त्य' या ।
मंत्रोच्चारांते करूनिया । चिंतावयाचे पूजकाने ।। ७० ।।



की भोवती चोहीकडुन । अग्निने केले आहे वेष्टण ।
पूजास्थानी कसलेहि विघ्न । येउ शकेना चिंतावे ।। ७१ ।।
मंत्रोच्चार करिता तत्क्षणी । मजला प्रत्यक्ष येई दिसुनी ।
शंभर जिव्हांचा कोट करुनी । वेष्टिले अग्निने मजलाही ।। ७२ ।।
तेज:पुंज झाले शरिर । पाहुनी विस्मित होती फार ।
ब्रह्मण्यदेव होउनी नर । वाटे बसला पूजनास ।। ७३ ।।
रामकुमारे दक्षिणेश्वरी । धरल्यापासुनी नोकरी ।
सांसारिक अडचणी दूरी । झाल्या होत्या कुटुंबाच्या ।। ७४ ।।
परी गदाधर उदासीन । निर्जनप्रियता त्याची पाहुन ।
रामकुमारा चिंता महान । त्याच्याविषयी वाटतसे ।। ७५ ।।
यास कशाचा हुरूप नाही । नच बोले हा कोणासिही ।
स्वभावात परिवर्तन होई । कारण काही कळत नसे ।। ७६ ।।
नोकरी त्याने धरिल्यापासुन । जाहले होते समाधान ।
वाटे पूजाकर्मे शिकवुन । मिळवता करावा तयासी ।। ७७ ।।
रामकुमाराची प्रकृती । त्या काळी चांगली नव्हती ।
सदैव वाटे त्याच्या चित्ती । भरवसा काय या देहाचा ।। ७८ ।।
बरेवाइट आपुले होइल । घराची स्थिती बिघडेल ।
यास्तव पूजाकर्मे सकळ । शिकवु लागला गदाधरा ।। ७९ ।।
गदाधराची स्मरणशक्ती । अत्यंत अलौकिक होती ।
जे जे पाठ श्रवणी पडती । लक्षात राहती सदैव ।। ८० ।।
जे जे पाठ केले मंत्र । पाहिले जे जे क्रियातंत्र ।
पूजा देवीची करिता स्वतंत्र । उपयोग करिती तयांचा ।। ८१ ।।
रामकुमार संतोषला । विचारुनी मथुरनाथाला ।
कालीदेवीच्या पूजकपदाला । गदाधराला नेमिले ।। ८२ ।।



शक्तिदीक्षा घेतल्याविण । अयोग्य करणे कालीपूजन ।
केनाराम भट्टाचार्याकडुन । यास्तव दीक्षा घेतली ।। ८३ ।।
शक्तिदीक्षा घेता क्षणी । भावावेश बाबांलागुनी
केनाराम तोषला मनी । पाहुनि भक्तोत्तम ऐसा ।। ८४ ।।
राधागोविंद पूजनाला । नेमिले हृदयरामाला ।
रामकुमारे विचार केला । जाउनि यावे गावासी ।। ८५ ।।
कलकत्त्याच्या उत्तरेला । श्यामनगर नामक पेठेला ।
रामकुमार असता गेला । प्राप्त जाहली देवाज्ञा ।। ८६ ।।
ज्येष्ठ बंधूचा होता अंत । बाबा उदास झाले बहुत ।
सर्वदा पूजाध्यानादित । निमग्न राहू लागले ।। ८७ ।।
ईश्वराचे दर्शन होय । हे खरेच असते काय ।
याविण कोणी अन्य विषय । सुचतच नव्हता तयांना ।। ८८ ।।
आपण इतक्या व्याकुळतेने । करितो धावा अंत:करणे ।
कोणी जो करितसे ऐकणे । ऐसा खरोखर असे काय ।। ८९ ।।
जो सकळ जगाचा नियंता । आपुली पूजा ग्रहणकर्ता ।
कोण असे ही उत्सुकता । तयांच्या चित्ता वाटतसे ।। ९० ।।
ऐसे विचार येता सकळ । शोधण्याची लागे तळमळ ।
ईश्वराच्या चिंतनी वेळ । कैसा जातसे कळेना ।। ९१ ।।
श्रीबाबा तेव्हापासुनी । बसुनी देवीच्या सन्निधानी ।
तन्मय होउनी गाती गाणी । सकळ दिवस घालविती ।। ९२ ।।
रामप्रसाद कमलाकांत । यांची गाणी गात गात ।
प्रेमभक्तिने विव्हळ होत । हारपत भानही देहाचे ।। ९३ ।।
देवीच्या मंदिराचे द्वार । बंद होई होता दुपार ।
तेव्हा लोकांपासुनी दूर । जाती पंचवटीमधे ।। ९४ ।।



तेथे अश्वत्थ बेल आवळी । वट अशोक झाडे उगवली ।
जाउनि तेथे मध्यान्हकाळी । चिंतन करिती अंबेचे ।। ९५ ।।

हृदयरामा त्यांचे वर्तन । नसे आवडत मनातून ।
स्वभाव तयांचा जाणे पूर्ण । वृत्ती निर्भिड निर्भय ।। ९६ ।।

वास्तव येथे आपुले काही । मुळीही चालावयाचे नाही ।
ऐसे जाणुनी स्वस्थ राही । काय करावे कळेना ।। ९७ ।।

लोक असता निद्राधीन । बाबा कोठे जाती निघुन ।
पूजेचे श्रम दिवसा होउन । जागरण रात्री होतसे ।। ९८ ।।

आहार फार कमी झाला । कसा रहावा देह चांगला ।
काही उपाय पाहिजे केला । ऐसा विचार हृदय करी ।। ९९ ।।

पंचवटीच्या जमिनीत । खाचखळगे असती बहुत ।
झाडझुडपांनी असे व्याप्त । जमीन तेथिल सर्वही ।। १०० ।।

आधीच होते कबरस्थान । त्यात अपार वाढले रान ।
भुताखेतांचे भय वाटुन । धजेना कोणी जाण्याला ।। १ ।।

दिवसा भयद भासे स्थान । रात्रीची तर गोष्ट आन ।
वास्तव तो भाग निर्जन । अपार वन ते वाढले ।। २ ।।

तेथे होती एक आवळी । सपाट जागा तियेच्या खाली ।
झाडे झुडपे होती वाढली । आजुबाजुला अगणित ।। ३ ।।

कोणी बसता तया स्थळी । कोणालाही न दिसे मुळी ।
बाबा रात्री आवळीखाली । बसुनी करिती जपध्यान ।। ४ ।।

नित्याप्रमाणे तया स्थानी । बाबा जातात हे पाहुनी ।
न कळविता त्यांच्यामागुनी । हृदय निघाला तत्काळ ।। ५ ।।

बाबा कराया बसता ध्यान । हृदय रानाबाहेरुन ।
ढेकळे फेकी अनुलक्षुन । बाबांना भय दावावया ।। ६ ।।



तरिही मामा गदाधर । आले नाही वनाबाहेर ।
कंटाळुनि मग आपुले घर । जवळ केले हृदयने ।। ७ ।।
उजाडताच दुसऱ्या दिनी । पुसू लागला बाबांलागुनी ।
इतुक्या रात्री जाउनी रानी । काय करितसा सांगावे ।। ८ ।।
बाबा सांगती तयालागुनी । आवळीवृक्ष असे रानी ।
त्याच्याखाली मी बैसुनी । जपध्यान रात्री करितसे ।। ९ ।।
सांगितले असे शास्त्रांनी । आवळिच्या खाली बसुनी ।
जो जी इच्छा धरितो मनी । पूर्ण ती इच्छा होत असे ।। ११० ।।
न कळू देता गदाधराला । एकदा हृदय तेथे गेला ।
वाट तेथे पाहु लागला । आपुले मामा येण्याची ।। ११ ।।
बाबा आले तये स्थानी । आपुले धोतर टाकिले सोडुनी ।
जानवे गळ्यातुनी काढुनी । ध्यान कराया बैसले ।। १२ ।।
ध्यानाभ्यास गदाधराला । तेव्हा जमला होता चांगला ।
बसल्याबरोबर ध्यानाला । हारपले त्यांचे देहभान ।। १३ ।।
पाहुनी हृदयच्या मनाला । अतिशय विस्मय वाटला ।
लगेच उठुनी समोर गेला । हाक मारिली बाबांना ।। १४ ।।
दहापाच हाका दिल्यावर । गदाधर येउनी शुद्धीवर ।
शांतपणाने बोलणे समग्र । ऐकुनी घेतले हृदयचे ।। १५ ।।
म्हणे काय हो झाला वेडे । करिता ध्यान, करा बापुडे ।
परंतु ऐसे उघडे नागडे । होणे अनुचित वाटतसे ।। १६ ।।
बोलणे तयाचे परिसुनी । बाबा म्हणती तयालागुनी ।
काय जाणसी तू अज्ञानी । ध्यान कसे ते करायचे ।। १७ ।।
धोतर आणि जानवे काढुन । संस्कारबंधने सर्व तोडुन ।
सकळ पाशातुन मुक्त होउन । ध्यान करावे लागतसे ।। १८ ।।



लज्जाघृणा भीती मान । कुलशील जाती अभिमान ।
अष्ट पाशांनी जन्मापासुन । मानव बांधलेला असे ।। १९ ।।

यज्ञोपवितसुद्धा आपण । ब्राह्मण श्रेष्ठ इतरांहुन ।
या अभिमानाचे चिन्ह । यास्तव तेही पाश असे ।। १२० ।।

जगन्मातेचे करिता ध्यान । पाश द्यावे लागती फेकुन ।
ध्यान संपल्यावर नेसेन । धोतर घालीन जानवे ।। २१ ।।

हृदयने ऐसी तऱ्हा कुठेही । ऐकिली देखिली नसे कधिही ।
यावर बोलता न ये काही । उपदेश करणे थांबविले ।। २२ ।।

रामकृष्णांची साधनरीती । त्याग करावयाची पद्धती ।
अत्यंत अभिनव ती होती । समजणे अवश्य असे तिला ।। २३ ।।

त्याग जयाचा करावयाचा । मनाने तर करिती त्याचा ।
परी प्रयत्न करुनी तयाचा । त्याग करिती शरिराने ।। २४ ।।

अहंकारनाश व्हावयाला । नम्रता अंगी बाणावयाला ।
अत्यंत गलिच्छ जमिनीला । स्वच्छ करिती हातांनी ।। २५ ।।

मी जातीने असे ब्राह्मण । गळुनी पडावा हा अभिमान ।
यास्तव शूद्रगृही जाउन । शौचकूप साफ करिती ।। २६ ।।

न करिता कांचनाचा त्याग । न सोडिता देहसुखोपभोग ।
कधिही साधणार नाही योग । न लागे मन देवाकडे ।। २७ ।।

हे बाबांनी घेतले जाणुन । एका हातात नाणी घेउन ।
दुसऱ्यात ढेकळे साठवून । जाती तीरावर गंगेच्या ।। २८ ।।

मृत्तिका म्हणती नाण्यांप्रत । मातीला सोने म्हणत म्हणत ।
समजुनी त्यांची समान किंमत । देती फेकुनि गंगेमधे ।। २९ ।।

शिवस्वरूप जीव असती । हे तत्त्व बिंबवावयास चित्ती ।
भिकाऱ्यांच्या उठता पंक्ती । जाती तेथे अविलंबे ।। १३० ।।



उच्छिष्टान्न प्रसाद मानुन । बाबा मस्तकी करिती धारण ।
त्यातिल काही करिती ग्रहण । पत्रावळी टाकिती गंगेत ।। ३१ ।।
झाडुनि काढिती पंक्तीचे स्थान । आपुल्या नश्वर देहाकडुन ।
शिवसेवा ही घडली मानुन । धन्य झालो समजती ते ।। ३२ ।।
ईश्वरलाभाच्या प्रतिकूल । विषयभोग असती सकळ ।
मने न करिती त्याग केवळ । परंतु करिती इंद्रियांनिही ।। ३३ ।।
विषयाविरुद्ध इंद्रियांप्रती । वर्तन मुद्दाम कराया लाविती ।
मग केल्याने असली कृती । लोपती संस्कार पूर्वीचे ।। ३४ ।।
उलट संस्कार उद्‌भवती । देहमनात दृढमूल होती ।
तयांच्या देहमनाप्रती । विपरीत कृती ती जमेना ।। ३५ ।।
यावर कोणी म्हणती जन । शरिराने का करावे साधन ।
मनाने विषयत्याग करुन । फळ नाही का मिळायचे ।। ३६ ।।
तर मन एके मार्गे जाता । शरीर तयाचे विरुद्ध पंथा ।
तेव्हा लाभ होइल कोणता । केवी व्हावी कार्यसिद्धी ।। ३७ ।।
गोष्ट ही सामान्य कर्मात । ईशलाभाची काय मात ।
भोगसुखेच्छू मानवाप्रत । गोष्ट कशी ही समजावी ।। ३८ ।।
किंवा कळाली तरी न वळे । वाटे मनाने विषय त्यागिले ।
पूर्व संस्कार तथापि राहिले । वर्तन करितसे तदन्वये ।। ३९ ।।
शरीरे केला नाही त्याग । म्हणे मनाने सोडिले भोग ।
परी दूर न होई भवरोग । फसवणूक करितसे स्वत:ची ।। १४० ।।
प्रकाश अंधकारासमान । योग भोग हे विरुद्ध दोन ।
एकाच वेळी करणे ग्रहण । अशक्य सर्वथा मनुजाला ।। ४१ ।।
कामासक्ती आणि विरक्ती । दोन्ही एकाच काळी येती ।
आध्यात्मिक पंथ ऐसा जगती । कोणी कदा न काढू शके ।। ४२ ।।



यास्तव शास्त्रांची शिकवण । कायावाचामनेकरुन ।
करावा त्याग अथवा ग्रहण । तरीच होतसे ईशलाभ ।। ४३ ।।
अग्रजाच्या मृत्यूपासुन । बाबा अत्यंत तन्मय होउन ।
जगदंबेच्या ध्यानात मग्न । राहु लागले बहुकाळ ।। ४४ ।।
पूजा होताच जगदंबेची । रामप्रसादादी भक्तांची ।
पदे तयांनी म्हणावयाची । पूजांग जणू ते जाहले ।। ४५ ।।
गाता पदे जगदंबेप्रती । अपार उत्साह भरे चित्ती ।
म्हणती रामप्रसादाप्रती । दर्शन दिधले जगदंबे ।। ४६ ।।
मग मलाच तेवढे का गे । दर्शन देत नाहीस सांगे ।
मी धनसुख भोग न मागे । मजला फक्त दर्शन दे ।। ४७ ।।
नित्य प्रार्थना ऐसी करिती । नयनातुनी अश्रू वाहती ।
रडुनी भार हलका करिती । म्हणती गाणी पुनरपि ते ।। ४८ ।।
पूजा ध्यान सदैव करिती । दिवसामागे दिवस जाती ।
अति व्याकुळता वाढे चित्ती । तळमळ लागली दर्शनाची ।। ४९ ।।
जगन्मातेच्या पूजनाला । अधिकच वेळ लागू लागला ।
एकत्व भासुनी स्वशीर्षाला । वाहती कुसुमे पूजेची ।। १५० ।।
प्रहर प्रहर देहभान । विसरुनी करीत बसती पूजन ।
देवी नैवेद्य करिते ग्रहण । म्हणुनी थांबती बहु काळ ।। ५१ ।।
पहाटेला लवकर उठुनी । सुंदर सुंदर फुले तोडुनी ।
जगन्मातेस माळा करुनी । सजविण्यात वेळ घालविती ।। ५२ ।।
आरतीनंतर गाता पदाला । न कळे केवढा वेळ गेला ।
जन आणिती मग भानाला । प्रकार होती नित्य असे ।। ५३ ।।
ऐसी निष्ठा विलक्षण । भक्तिवैराग्य त्यांचे पाहुन ।
चकित झाले सगळे जन । दृष्टि वेधिली बाबांकडे ।। ५४ ।।




सोडुनी पंथ साधारण । कोणी धरिता मार्ग अन्य ।
तयाची लोक चेष्टा करुन । करिती सळो की पळो तया ।। ५५ ।।
परंतु कित्येक दिवस लोटता । जर सोडिना आपुल्या पंथा ।
तर सकळ जनांच्या चित्ता । आदर तयाचा उपजतसे ।। ५६ ।।
बाबांचीही तया काळी । जनांनी प्रथम चेष्टा केली ।
मने तयांची पालटली । आदर वाढला कालांतरे ।। ५७ ।।
बाबांची पूजा निरखुन । मथुर गेला आनंदुन ।
राणीला म्हणे असाधारण । पुजारी मिळाला देवीला ।। ५८ ।।
देविचा पुजारी अति अद्‌भुत । मी पूजन पाहिले समस्त ।
जगदंबा होइल जागृत । संशय यात मला नसे ।। ५९ ।।
मग व्याकुळता वाढली फार । कमी झाली निद्रा आहार ।
परिणाम झाला शरिरावर । वक्षस्थळ झाले आरक्त ।। १६० ।।
इतरही वेळी पूजेवाचुनी । अश्रुधारा वाहती नयनी ।
प्रचंड व्याकुळता ती मनी । चित्त अशांत दिसत असे ।। ६१ ।।
तन्मय होउनि एके दिनी । जगदंबेला गाता गाणी ।
म्हणती माते तुजलागुनी । इतुक्या हाका मारितसे ।। ६२ ।।
इतुकी करितो तुझी विनवणी । का न येई हाक कानी ।
रामप्रसादा दर्शन देउनी । का गे देसीना मजलागी ।। ६३ ।।
प्रचंड आक्रोश केला रडुन । परि देइना आई दर्शन ।
भयंकर वेदना उत्पन्न । जाहल्या तयांच्या हृदयात ।। ६४ ।।
जसे पिळावे ओले वसन । हृदय निघाले पिळवटून ।
काय होणार नाही दर्शन । वाटुनी प्राण घाबरला ।। ६५ ।।
बाबा मनात म्हणती आता । जिवंत राहावे कशाकरिता ।
देवीच्या चरणापाशी आता । क्षणार्धात प्राण सोडावा ।। ६६ ।।





श्रीरामकृष्ण व्याकुळतेने भवतारिणीला आळवीत असता त्यांच्या विरह वेदना असह्य होणं, आईच्या दर्शनाशिवाय जीवन निरर्थक वाटून देवीच्या पायापाशी प्राण देण्यास सिद्ध होणं आणि आईचे दर्शन होणं



मथुरनाथांना श्रीरामकृष्णांमध्ये झालेलं शिव आणि कालीमातेच दर्शन.

इतुक्यात त्या गाभाऱ्यात । दिसली तलवार लटकत ।
जाउनि उन्मत्तापरी धावत । घेतली हातात तलवार ।। ६७ ।।

वाटे एकचि घाव मारुन । शरीर करावे छिन्न भिन्न ।
छातीत घेणार भोसकून । इतुक्यात अपूर्व वर्तले ।। ६८ ।।

अपूर्व अद्‌भुत दर्शन जाहले । देहाचे भानही हरपले ।
बाहेर काय होउनी राहिले । न कळे बाबा सांगती ।। ६९ ।।

कैसे गेले दिवस दोन । कळले नाही मजलागुन ।
आनंदाचा प्रवाह पूर्ण । अंत:करणात वाहिला ।। १७० ।।

बाबा आणिक सांगती मात । घरे मंदिरे लोपली समस्त ।
काहीच नाही उरले तेथ । 'एक' मात्र उरले त्या ठायी ।। ७१ ।।

असीम अनंत सचेतन । ज्योति:समुद्र भरला पूर्ण ।
उज्ज्वल लाटा चोहीकडुन । शब्द करितची पातल्या ।। ७२ ।।

अति वेगाने माझ्यापाशी । धावुनि आल्या बुडवायासी ।
आदळल्या माझिया अंगासी । बुडुनी गेलो तयांमधे ।। ७३ ।।

गुदमरुनी गेलो तयात । बसलो गटांगळ्या खात ।
मग दोन दिवसपर्यंत । संज्ञारहित राहिलो मी ।। ७४ ।।

नंतर चिन्मयीचे उदंड । दर्शन व्हावे वाटे अखंड ।
व्याकुळतेने आक्रोश प्रचंड । सर्वकाळ करू लागलो ।। ७५ ।।

सदा बाबांच्या अंत:करणी । ख ळबळ प्रचंड जाई वाढुनी ।
मग वेदना असह्य होउनी । लोळण घेती भूमीवरी ।। ७६ ।।

रडता ओक्साबोक्सी भारी । म्हणती अंबे कृपा करी ।
दर्शन देई मजला सत्वरी । करिती आकांत जोराने ।। ७७ ।।

आरडा ओरड जन ऐकती । लोक जमती सभोवती ।
कोण काय आपणा म्हणती । इकडे लक्ष नसे त्यांचे ।। ७८ ।।



चारी बाजूस लोक जमती । बाबांस चित्रे सावल्या भासती ।
यास्तव लज्जा संकोच भीती । मनामधे उद्‌भवेना ।। ७९ ।।
यापरी असह्य वेदना होउनी । पडती देहभान जाउनी ।
वराभयकरा चिन्मयी जननी । ज्योतिर्मयि मूर्ती दिसतसे ।। १८० ।।
मग दिसावी देवी हासत । मृदु शब्दांनी बोध करित ।
नाना प्रकारे समजावित । शिकवित आहे दिसत असे ।। ८१ ।।
रामकृष्ण सदा म्हणती । जव लज्जा घृणा भय असती ।
तोवर परमेश्वराची प्राप्ती । होउ शकेना मानवाला ।। ८२ ।।
अत्यंत व्याकुळ होउन । करा धावा मनापासुन ।
मग पाहू कसा भगवान । नाही दर्शन देणार तो ।। ८३ ।।
पाण्यात बुडता देह सकळ । प्राण जैसा होई व्याकुळ ।
तैसा ईश्वरासाठी होइल । तरीच दर्शन घडत असे ।। ८४ ।।
पतीवरचे प्रेम सतीचे । अपत्यावरचे जननीचे ।
विषयावरचे विषयी जनाचे । एकत्र करिता ईशलाभ ।। ८५ ।।
ईशदर्शनाची व्याकुळता । केवळ तीन दिवस असता ।
अथवा साठ घटिका टिकविता । ईश्वरप्राप्ती होत असे ।। ८६ ।।
ईश्वरदर्शन घेता येई । आपण करितो गोष्टी पाही ।
त्याहुनी स्पष्ट बोलता येई । देवासी, सांगतो शपथेने ।। ८७ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १८८ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा सातवा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय आठवा

श्रीरामकृष्णा देवाधिदेवा । माझे नमन सारदाधवा ।
वाटे चरित्रवृत्तान्त गावा । घडावी सेवा भगवंता ।। १ ।।

वडिलांनी ठेविले अभिधान । गदाधर अत्यंत पावन ।
संन्यासाश्रमी रामकृष्ण । नाम ठेविती तोतापुरी ।। २ ।।

शिष्य तयांना म्हणती ठाकुर । महाशय गुरुदेव प्रभुवर ।
बाबा सदैव बोले मथुर । नामे श्रीरामकृष्णांची ।। ३ ।।

भट्टाचार्य लहान थोर । देवळातील म्हणती नोकर ।
भगवंताचा पूर्णावतार । जाणिती सकळ ज्ञानीजन ।। ४ ।।

अवतीर्ण होता भगवान । तेथवा अनेक देवगण ।
आचार्य भक्त घेती जनन । साह्या लीलेस करावया ।। ५ ।।

आपआपुले काम चोख । करावया असती उत्सुक ।
ऐसे जन्मास येती अनेक । साह्यास अवतारलीलेच्या ।। ६ ।।

रामकृष्णांच्या साधनकाळी । अपूर्व सेवा जयाने केली ।
मथुरनाथ विश्वास या काळी । अमर जाहला सेवेने ।। ७ ।।

मथुरबाबूची श्रद्धा भक्ती । रामकृष्णांवर अनन्य होती ।
ऐसी दिव्य अलौकिक प्रीती । क्वचित इतरत्र दिसत असे ।। ८ ।।

सामान्य मानव निष्काम । दुसऱ्यावरती अप्रतिम ।
एवढे करू शकतो प्रेम । असाधारण आश्चर्य हे ।। ९ ।।

वास्तविक करिता विचार । बाबा पुजारी सामान्य नर ।
श्रेष्ठ असती राणी मथुर । धनमान विद्यासत्तांनी ।। १० ।।



ज्यास्तव झटती साधारण । पदवी विद्या धनमान ।
तेथे तर पूर्ण उदासीन । भाव असे ठाकुरांचा ।। ११ ।।
शिखरावर करिता आरोहण । खालील उंच हवेल्या जमिन ।
विशाल वृक्ष आणि तृण । दिसती एका पातळीत ।। १२ ।।
अगदी बाळपणापासुन । सत्यनिष्ठा भक्ती करुन ।
बाबांचे मन आरोहण । उच्चावस्थेस करीतसे ।। १३ ।।
अत्युच्च त्या ठिकाणाहुन। विद्या पदवी धन मान ।
ज्यास्तव खपती सामान्य । सकळ हीन ते वाटती ।। १४ ।।
शिक्षणाला आरंभ करुन । पदवीमागे लागती जन ।
महामहोपाध्याय न्यायरत्न । तर्कालंकार वांच्छिती ।। १५ ।।
परंतु बाबांना आले दिसुन । पदवीभूषित विद्वज्जन ।
श्रीमंताचा अनुनय करुन । माध्यान्ह वेळा भागविती ।। १६ ।।
सांसारिक भोगसुखावर । सामान्यांची जाई नजर ।
बाबांस वाटे क्षणभंगुर । सांसारिक सुखे सर्व ही ।। १७ ।।
सकळांस वाटे पैसा थोर । मिळविता येती सुखे अपार ।
बाबांस वाटे परमेश्वर । मिळू शकेना पैशाने ।। १८ ।।
गरिब जनांवर दया करुन । दाता म्हणुनी मिरवती जन ।
बाबांस वाटे करुनी दान । अभाव मिटेना जगताचा ।। १९ ।।
अशा मन:स्थितीलागुन । ओळखिणे हे फार कठिण ।
विद्याभिमानी आणि श्रीमान । केवी जाणू शकती तया ।। २० ।।
व्यवहारातहि स्पष्ट भाषण । न मिळे तयांना करण्या श्रवण ।
सहनशीलता ती आटुन । जात असे मग धनिकांची ।। २१ ।।
बाबा करिती स्पष्ट भाषण । हृद्‌गत जाणू न शकती जन ।
मानिती असभ्य आचरण । आश्चर्य यात काही नसे ।। २२ ।।



यास्तव राणीचे प्रेम पाहुन । मथुरची भक्ती असामान्य ।
आश्चर्यचकित होतसे मन । वाटे योजना ईश्वराची ।। २३ ।।
प्रीती तयांची असे गहन । अधिकाधिक झाली वर्धमान ।
गुरुभाव प्रत्यक्ष आला दिसुन । श्रीचरणशरण मानिती ।। २४ ।।
नातरी भाऊ पूजक असुन । त्यानेहि केले प्रसादग्रहण ।
ठाकुर शूद्रान्न समजुन । स्वकरे करुनी जेविती ।। २५ ।।
मथुरला विषयी समजुन । बाबा टाळिती त्यासी भाषण ।
पूजकपद नच केले ग्रहण । विनवणी करिता बहुपरी ।। २६ ।।
बाबांविषयी मथुरच्या मनात । प्रथम दर्शनी उद्‌भवे प्रीत ।
दिवसेंदिवस होई वृद्धिंगत । नवल थोडे हे नसे ।। २७ ।।
ठाकुर म्हणती जगन्मातेसी । माझी अवस्था केलीस ऐसी ।
पुरविल आवश्यक वस्तुसी । ऐसा देइ गे कोणीतरी ।। २८ ।।
यास्तव अंबेने साधनकाली । मथुरची नियुक्ती केली ।
उगीच का चौदा वर्षे केली । अनन्य सेवा मथुरने ।। २९ ।।
मथुर संशयी बुद्धिमान । वर्तन ठाकुरांचे पाहुन ।
शंकित होई तयाचे मन । करितसे परीक्षा परोपरी ।। ३० ।।
रामकृष्णांची प्रेमावर्तिनी । अदृष्टपूर्व विज्ञानवाहिनी ।
ओजस्विनी भावमंदाकिनी । संदेह वाहुनी नेत असे ।। ३१ ।।
मथुरनाथाचे सर्व संशय । अल्प काळात लुप्त होय ।
भगवत्पदकमलास जाय । अनन्य शरण होउनी ।। ३२ ।।
गदाधराचे मधुर भाषण । सरळ स्वभाव रम्य दर्शन ।
यांनीच मथुरबाबुचे मन । वेधिले प्रथम त्यांच्याकडे ।। ३३ ।।
ठाकुर जगज्जननी पूजिती । पूजेत अत्यंत तन्मय होती ।
दिव्योन्मादाची झाली प्राप्ती । प्रथमावस्थेत साधनेच्या ।। ३४ ।।



कधी कधी आपुल्या देहात । दिसावी देवी आविर्भुत ।
मग पुष्पे घेउनी समस्त । वाहुनि घ्यावी स्वत:ला ।। ३५ ।।

अनुरागाचा वेग महान । वैधीभक्ति गेले उल्लंघुन ।
लोकांस दिसे ते विचित्र वर्तन । निंदा जन करू लागले ।। ३६ ।।

परंतु मथुरने ठरविले । ज्यांना पाहुनी प्रेम उपजले ।
त्यांच्या विरुद्ध काही कळले । तरी खात्री आपुली करावी ।। ३७ ।।

अनेकदा बाबांचे वर्तन । मथुरने केले निरीक्षण ।
संशय गेला नष्ट होउन । वाटले श्रेष्ठ पुरुष हे ।। ३८ ।।

कळुनी चुकले मथुरला । ठाकुर अनुरागाचा पुतळा ।
श्रद्धा भक्ती कारण याला । विचित्र वर्तन म्हणुनी घडे ।। ३९ ।।

मथुरनाथ बुद्धिमान । बाबांस पाहे समजावुन ।
श्रद्धा भक्ती असणे छान । बेहोष परंतु होऊ नये ।। ४० ।।

खावे जेवढे अन्न पचेल । नातरी जन हे निंदितील ।
चारचौघांचे न ऐकाल । तर होईल बुद्धिभ्रंश ।। ४१ ।।

वरवर ऐसे बोले वचन । मनात वाटे पुरुष महान ।
पूर्वीच्या भक्तांचेहि वर्तन । ऐसेच होते विपरीत ।। ४२ ।।

गदाधर पुजारी सामान्य । मथुर विषयी संशयी सधन ।
सखोल विचार त्याचे पाहुन । आश्चर्यमग्न मन होते ।। ४३ ।।

शारीरिक विचारांचे जैसे । संक्रमण होतसे आपैसे ।
मानसिक भावांचेही तैसे । संक्रमण होतसे संगतीने ।। ४४ ।।

म्हणुनी एकाच्या हृदयात । भक्तिभाव होता जागृत ।
दुसऱ्याच्या चित्तातिल निद्रित । भाव जागृत होत असे ।। ४५ ।।

यास्तव सत्संगाची महती । शास्त्रपुराणे वाखाणिती ।
वाटे मथुरबाबुचे सांप्रती । थोर भाग्य उद्भवले ।। ४६ ।।



जसजसे ठाकुरांचे वर्तन । करू लागला निरीक्षण ।
तसतसा त्याच्या हृदयातुन । जागृत झाला भक्तिभाव ।। ४७ ।।
परी जोवरी विषयी मन । होइना संशयनिर्मूलन ।
क्षणात भक्ती उत्पन्न होउन । क्षणात नष्ट ती होत असे ।। ४८ ।।
भक्तिने बाबांचे आचरण । विपरीत होतसे हे जाणुन ।
पुनरपि संशयित होई मन । बुद्धिभ्रंश असेल का ।। ४९ ।।
मथुरनाथा चिंता वाटुनी । तयाने चांगल्या वैद्याकडुनी ।
बाबांची परीक्षा करवुनी । औषधोपचार आरंभिला ।। ५० ।।
मथुर इंग्रजी शिकलेला । स्वतंत्र विचार असती त्याला ।
यास्तव कधी कधी ठाकुरांला । उपदेश करू पाहतसे ।। ५१ ।।
एकदा दोघांत वाद रंगला । मथुर म्हणाला ठाकुरांला ।
ईश्वराने जो नियम केला । पाळणे तयाला भाग असे ।। ५२ ।।
एकदा का नियम झाला । रद्द करवेना तयाला ।
लाल फुलांच्या झाडाला । फूल पांढरे येत नसे ।। ५३ ।।
बाबा मग वदती त्याला । वेड्यासारिखा बोलसी बोला ।
अरे जयाने नियम केला । काय बदलू शकेना तो ।। ५४ ।।
ईश्वर मनात जर आणिल । करू शकतो जे वाटेल ।
पांढरे आणि लाल फूल । यांची काय कथा तेथे ।। ५५ ।।
परी मथुर मानिना बोला । वाद अर्ध्यावर थांबला ।
दुसरा दिवस उजाडला । शौचास गेले रामकृष्ण ।। ५६ ।।
परतुनि येता त्यांना दिसला । एक वृक्ष वाढलेला ।
आढळुनि आले ठाकुरांला । लाल जास्वंदीचे झाड असे ।। ५७ ।।
तयाच्या एका फांदीवर । दोन फुले होती सुंदर ।
एक लालभडक समग्र । पांढरे शुभ्र असे दुजे ।। ५८ ।।



बाबा तोडुनि डहाळीला । गेले मथुरला दाखविण्याला ।
आश्चर्यचकित मथुर झाला । म्हणाला बाबा हरलो मी ।। ५९ ।।
भक्तिविश्वास असा वाढला । बाबा सर्वस्व झाले त्याला ।
तयांची व्यवस्था ठेवण्याला । राहु लागला तत्पर तो ।। ६० ।।
अनुरागाचा वेग महान । गोष्टी घडुनि येती नविन ।
अंतर्यामी होई दर्शन । जगदंबेचे बाबांला ।। ६१ ।।
साहित्य आणिले पूजेप्रती । स्वत:लाच वाहुनी घेती ।
तीन तास आरती करिती । त्रासती नोकर सर्वही ।। ६२ ।।
जेव्हा न होई देवीदर्शन । आक्रोश करिती घेती लोळण ।
लोक जमती चोहीकडुन । काय जाहले पाहावया ।। ६३ ।।
प्रकार ऐसे होती बहुत । दिनानुदिन गेले वाढत ।
केवी अज्ञान जनांप्रत । ती दिव्य अवस्था कळावी ।। ६४ ।।
एकदा शिवाच्या मंदिरात । महिम्न स्तोत्र असता गात ।
असितगिरिसमं स्यात । श्लोक म्हणू ते लागले ।। ६५ ।।
शिवमहिम्याची अकस्मात । जाणिव उपजली हृदयात ।
अत्यंत व्याकुळ झाले चित्त । बोलु लागले शंकरासी ।। ६६ ।।
सदाशिवा महादेवा । अपार महिमा तुझा शिवा ।
अनाकलनीय मानवा, देवा । कसा गावा मी कळेना ।। ६७ ।।
अश्रु वाहती नयनातुन । वक्ष:स्थळ गेले भिजुन ।
दीर्घ स्वराने करिती रुदन । आले धाउनि जन सारे ।। ६८ ।।
वेड्यापरि रडणे ऐकुन । उन्मत्तापरि त्यांचे वर्तन ।
म्हणती वेडाची लहर महान । आली भट्टाचार्याप्रती ।। ६९ ।।
कोणी म्हणतसे रंगात । स्वारी आली वाटे बहुत ।
ओढुनि काढा नातर निश्चित । स्वार होईल शिवावर ।। ७० ।।



चौघाजणांची तोंडे चार । बडबड करू लागले नर ।
आपुल्यापरीने ते पामर । तारे तोडू पाहती ।। ७१ ।।

कशाचीही ठाकुरांप्रती । बाह्य जगाची शुद्ध नव्हती ।
मन गेले उच्चपदाप्रती । भान काय मग जगताचे ।। ७२ ।।

मथुर तेथवा देवळात । आला होता सहज फिरत ।
गडबड ऐकुनी मंदिरात । घाइघाइने प्रवेशिला ।। ७३ ।।

बाबांची तन्मयता पाहुन । भक्तिने भरले अंत:करण ।
आदराने हृदय भरुन । आले मथुरनाथाचे ।। ७४ ।।

इतुक्यात मथुरनाथाला । एक जण विचारू लागला ।
काय भट्टाचार्याला । ओढुनि बाहेर काढायचे ।। ७५ ।।

प्रश्न ऐकताच तत्काळ । क्रोधाने मथुर झाला लाल ।
म्हणे खबरदार लावाल । हात जर त्यांच्या अंगासी ।। ७६ ।।

थोड्याच वेळात रामकृष्ण । सावध होउनि बसले उठुन ।
गर्दी सभोवती पाहुन । विचारू लागले मथुरला ।। ७७ ।।

बेहोष होऊनिया काही । भलते तर मी केले नाही ।
यावर मस्तक ठेवुनि पायी । मथुर बोलला बाबांना ।। ७८ ।।

बाबा भलते सलते काही । आपणाकडुनी घडले नाही ।
नेणुनी कोणी त्रास देई । यास्तव इथे मी उभा असे ।। ७९ ।।

एकदा ठाकुर पडवीत । येरझारा होते करित ।
पंचवटीकडिल बंगल्यात । मथुर होता बसलेला ।। ८० ।।

येरझारा त्यांच्या स्पष्ट । मथुरला होत्या दिसत ।
मथुरबाबूच्या मनात । विचार घोळती बाबांचे ।। ८१ ।।

बघता चमकून अकस्मात । उभा राहिला मथुरनाथ ।
येउनी मग धावत धावत । लोटांगण घातले बाबांना ।। ८२ ।।



त्यांचे पाय घट्ट धरुन । मथुर करू लागला रुदन ।
बाबा म्हणती थोर असुन । त्वा काय हे आरंभिले ।। ८३ ।।
राणीचा जामात भाग्यशील । तूच असे जर करशील ।
लोक काय मग म्हणतील । जरा विचार याचा करी ।। ८४ ।।
शांत हो आता ऐसे म्हणुन । बाबांनी बसविले उठवून ।
बऱ्याच वेळाने शांत होउन । ठाकुरांना तो वदला ।। ८५ ।।
बाबा दर्शन झाले अद्‌भुत । येरझारा असता करित ।
तुम्ही पुढे असता जात । दिसावी साक्षात जगदंबा ।। ८६ ।।
जेव्हा मागे येऊ लागला । साक्षात सदाशिव दिसावे मजला ।
प्रथम वाटले भ्रम जाहला । पाहिले डोळे चोळूनिया ।। ८७ ।।
किती वेळा डोळे चोळिले । दृश्य तथापी तेच दिसले ।
पुनरपि रुदन आरंभिले । रडणे तयाचे थांबेना ।। ८८ ।।
ठाकुर म्हणती मथुरला । यात काही न कळे मजला ।
कितीतरी समजाविले तयाला । तेव्हाच झाला तो शांत ।। ८९ ।।
रामकृष्ण असती सांगत । मथुरनाथास या शरिरात ।
जगदंबेने अति अद्‌भुत । कितीतरी गोष्टी दाखविल्या ।। ९० ।।
उगीच काय एवढी भक्ती । मथुर करितसे सेवा प्रीती ।
जगन्मातेने तयाप्रती । अगणित चमत्कार दाखविले ।। ९१ ।।
बाकी मथुरच्या पत्रिकेत । लिहिले होते सांगत ।
इष्ट देवतेची तयाप्रत । एवढी कृपा राहील की ।। ९२ ।।
प्रत्यक्ष करुनी देहधारण । संगतीत तयाच्या राहुन ।
करील तयाचे संरक्षण । भाकित होते पत्रिकेत ।। ९३ ।।
तेव्हापासुनी मथुरची भक्ती । सहस्रपट झाली वाढती ।
ठाकुर सामान्य मानव नसती । खात्रीच पटली तयाची ।। ९४ ।।



कळले तयाला मनोमन । नरदेहाचा आश्रय करुन ।
अंबा करितसे लीला महान । कृपा मजवरी करावया ।। ९५ ।।
मथुर खरोखर भाग्यवंत । संशय येथे नसे किंचित ।
सांगितले आहे शास्त्रात । नरदेह जोवर असे हा ।। ९६ ।।
तोवर कर्मे येती घडुन । साधारणांची कथा कोण ।
मुक्तपुरुष जे असामान्य । तेही कर्मे करितात ।। ९७ ।।
साधारण जे असती मानव । कर्मफळे भोगिती स्वयमेव ।
कर्मे करिती मुक्त सर्व । भोगिती कोण त्यांची फळे ।। ९८ ।।
जीवन्मुक्त नरांच्या ठायी । अहंकाराचा नसे लेशही ।
यास्तव मुक्त पुरुष न होई । कर्मफळांचा उपभोक्ता ।। ९९ ।।
परंतु कर्मे घडती तयांची । फळे अवश्य यावयाची ।
मुक्त कर्मे करिती त्यांची । भोगणार कोण कर्मफळे ।। १०० ।।
यास्तव धर्मशास्त्रे सांगती । मुक्त पुरुषावर करिती प्रीती ।
तयांची अनन्य सेवा करिती । तयांना मिळती शुभफळे ।। १ ।।
मुक्तांचा जे द्वेष करिती । मुक्त पुरुषाला जे निंदिती ।
उगिच तयांना त्रास देती । ते भोगिती अशुभ फळे ।। २ ।।
एवढे मुक्तांच्या सेवेचे फल । ईश्वरावतारांची सेवा घडेल ।
तयाला केवढे फल मिळेल । भाग्यवान मथुर यासाठी ।। ३ ।।
मथुरनाथाचा दिवसेंदिवस । वाढता झाला भक्तिविश्वास ।
इच्छा होताच ठाकुरांस । झटे पूर्ण ती करावया ।। ४ ।।
मिळता सेवा करावयाला । परमभाग्य तो मानु लागला ।
बिघाड बाबांच्या प्रकृतीला । होताच उपाय करवितसे ।। ५ ।।
प्रसिद्ध वैद्य बोलावुन । परीक्षा बाबांची करवून ।
अनन्य भावे सेवा करुन । स्वत:स धन्य मानितसे ।। ६ ।।



ठाकुरांनी त्याला म्हणावे । वाटे देवीस दागिने घालावे ।
मथुरबाबुने मग बनवावे । अलंकार बाबा इच्छिति ते ।। ७ ।।
करावया सखीभावसाधन । पाहिजे होता स्त्रीवेष पूर्ण ।
मथुरबाबुने आणवून । तत्काळ दिधला स्त्रीवेष ।। ८ ।।
हिरेजडित ते अलंकार । बनारसी साडी सुंदर ।
स्त्रीवेषाचे सामान समग्र । आणुनि देई ठाकुरांना ।। ९ ।।
इच्छा होताच ठाकुरांसी । पानिहाटीच्या उत्सवासी ।
जावे, कळता मथुरबाबुसी । करितसे तत्काळ व्यवस्था ।। ११० ।।
गर्दीत होऊ नये त्रास । यास्तव शिपाई दिमतीस ।
आपण उपस्थित राहे खास । संरक्षणास ठाकुरांच्या ।। ११ ।।
एवढे अगाध प्रेम असुन । परीक्षा परी पाहे कसुन ।
वारांगनांत एकटे सोडुन । उपजे काय असद्भाव ।। १२ ।।
देवालयाची मत्ता अलोट । नावे करितो, काढुनी गोष्ट ।
लोभ सुटे का पाहे स्पष्ट । करितसे परीक्षा परोपरी ।। १३ ।।
बाबा शंभर टक्के सुवर्ण । परीक्षेत पावले उत्तीर्ण ।
विश्वास कसास लागला पूर्ण । प्रेम जाहले वृद्धिंगत ।। १४ ।।
मथुर मनात करी विचार । मोहवू न शकती ललना सुंदर ।
पदी ठेविता संपत्ती अपार । वैराग्य ढळेना बाबांचे ।। १५ ।।
लोक अत्यंत देती मान । पूजिती समजुनी भगवान ।
बाबांच्या मनात अभिमान । तथापि उत्पन्न होत नसे ।। १६ ।।
ऐहिक विषयात संपूर्ण । ठाकुर असती उदासीन ।
अनंत दोष माझे जाणुन । प्रीती करिती मजवरती ।। १७ ।।
वारंवार संकटांमधुन । बाहेर काढिती मजलागुन ।
सर्व बाजूंनी मम कल्याण । ठाकुर चिंतिती सदैव ।। १८ ।।



ठाकुर असती पुरुष महान । मथुरवर प्रेम असामान्य ।
मथुरबाबू खरोखर धन्य । सेवा अनन्य करित असे ।। १९ ।।
ईश्वराची अलौकिक शक्ती । ठाकुरांत पूर्ण प्रकटली होती ।
पाच वर्षांचे बालक शोभती । अहंकार अल्पही असेना ।। १२० ।।
आपुल्या अंत:करणात । जो जो भाव होतसे उदित ।
सरलतेने इतरांस सांगत । लपवाछपवी काही नसे ।। २१ ।।
जेणे दुसऱ्यास होईल त्रास । न करिती असल्या कृत्यास ।
आपण सहन करावयास । तत्पर त्रास दुसऱ्यांचा ।। २२ ।।
मथुरकडे हालदार म्हणुन । असे एक पुरोहित ब्राह्मण ।
मथुर बाबांना चाहतो पाहुन । द्वेष करितसे बाबांचा ।। २३ ।।
म्हणतसे जादुटोणा करुन । बाबूंना वश केले म्हणुन ।
याच्याच योगे माझे वजन । बसले नाही मथुरवर ।। २४ ।।
बालकाप्रमाणे सोंग करी । इतुका सरळ असे हा जरी ।
वशीकरणाची विद्या सारी । सांगुनि द्यावी याने मला ।। २५ ।।
बाबूजी माझ्या घेऱ्यात । येणार होते एवढ्यात ।
कोठुनी ही ब्याद झाली प्राप्त । आता काय करावे मी ।। २६ ।।
याचे उट्टे कोणेपरी । काढावे तो विचार करी ।
ऐसी संधी तयाला सत्वरी । मिळाली हालदार तोषला ।। २७ ।।
जानबाजार वाड्यात । सायंकाळ होता प्राप्त ।
ठाकुर भगवच्चिंतनात । अर्धबाह्य दशेत पडलेले ।। २८ ।।
हळुहळु समाधी उतरून । येत असता देहभान ।
हालदार त्या स्थानालागुन । अकस्मात एकटा पातला ।। २९ ।।
जवळपास कोणी नाही । याची खात्री करुनी घेई ।
अत्यानंद झाला हृदयी । संधी अलभ्य लाभली ।। १३० ।।



बाबास धक्के देत वदला । वश कराया तू बाबूला ।
सांग भटा कसा केला । जादुटोणा मजप्रती ।। ३१ ।।
ठाकुर होते समाधीत । भावसमाधी होती उतरत ।
बोलण्याची अवस्था प्राप्त । झाली नव्हती बाबांना ।। ३२ ।।
बाबा काही न बोलती बोला । मग हालदार फार चिडला ।
म्हणे ढोंग करणे तुजला । पूर्ण अवगत असे रे ।। ३३ ।।
नकोस बोलू जरी ना बोलत । ऐसे बोलुनी अकस्मात ।
ठाकुरांना मारुनी लाथ । निघाला तेथुनी झडकरी ।। ३४ ।।
निरभिमानी रामकृष्ण । वाटले मथुरास येता कळुन ।
भलताच प्रसंग ओढवून । बिचाऱ्यावर यावयाचा ।। ३५ ।।
दुर्जनाचेही हित चिंतिती । रागद्वेष नसती चित्ती ।
भूतमात्री अपार प्रीती । ऐसा स्वभाव ठाकुरांचा ।। ३६ ।।
म्हणुनी काही नाही बोलले । पुढे काही कारण घडले ।
मथुरनाथे दूर केले । हालदाराला कामाहून ।। ३७ ।।
पुढती सहज एके दिनी । गोष्टीवरुनी गोष्ट निघुनी ।
मथुरबाबूला कळली कहाणी । ऐकुनी संतप्त तो झाला ।। ३८ ।।
मथुर क्रोधाने लाल होउन । म्हणे आधीच येते कळुन ।
तर खात्रीने तो ब्राह्मण । राहत नव्हता जिवंत ।। ३९ ।।
मथुरास सदैव वाटे चित्ती । ठाकुरांची मिळावी संगती ।
आपुल्या वाड्यात राहण्याप्रती । तयांना घेउनी जात असे ।। १४० ।।
फिरावयाला जाऊ म्हणुनी । कलकत्त्यातिल रम्य ठिकाणी ।
ठाकुरांना सवे घेउनी । मथुरनाथ जात असे ।। ४१ ।।
भोजनास त्यांच्या सुवर्णपात्रे । ल्यावया देई उत्तम वस्त्रे ।
आणि बाबांस म्हणावे मथुरे । तुम्हीच मालक अवघ्यांचे ।। ४२ ।।



सुवर्णपात्री भोजन करुन । न बघता तिकडे ढुंकुन ।
घासण्याची व्यवस्था करुन । सुरक्षित ठेवणे भाग मला ।। ४३ ।।
एकदा हजार रुपये खर्चुन । मथुरने आणिली शाल छान ।
विचार करी मौल्यवान । जिन्नस कोणास द्यावयाचा ।। ४४ ।।
मग श्रीरामकृष्णांलागुन । शाल ती केली समर्पण ।
ठाकुर अत्यंत आनंदुन । दाखवू लागले सकलांना ।। ४५ ।।
अंगावर ती शाल घेउनी । डौलाने इकडे तिकडे फिरुनी ।
म्हणती हजार रुपये खर्चुनी । मथुरने आणिली मजसाठी ।। ४६ ।।
तथापि थोड्याच वेळात । आनंद लोप पावे समस्त ।
वेगळा विचार शिरला मनात । म्हणती गंभीर होउनी ।। ४७ ।।
या शालीत काय विशेष । पंचभूतांचे सकल जिन्नस ।
निवारण करिते ही थंडीस । काम ते घोंगडी करू शके ।। ४८ ।।
इतर सर्व वस्तूंप्रमाणे । सच्चिदानंद न लाभे हिने ।
अंगावर ही घेतल्याने । अहंकार मात्र येत असे ।। ४९ ।।
अहंकार होताच उत्पन्न । ईश्वराकडे न लागे मन ।
हा तर हिच्यात दोष महान । आपणाला ही शाल नको ।। ५० ।।
ऐसा मनी करुनी विचार । शाल फेकिली जमिनीवर ।
पायाखाली तुडवली सत्वर । थुः थुः करुनी थुंकती ।। ५१ ।।
पेटवुनी द्यावी इतुक्यात । कोणी येउनी अकस्मात ।
सोडविली मथुराला कळता मात । म्हणे बाबांनी ठीक केले ।। ५२ ।।
बाबांस सुखात आरामात । ठेवण्यासाठी मथुर इच्छित ।
परंतु अत्युच्च विचारात । बाबांचे मन मग्न असे ।। ५३ ।।
मथुरची पत्नी बाबांलागुनी । भजे भगवंत समजूनी ।
बाबांपासुनी ते पतिपत्नी । काही लपवुनी न ठेविती ।। ५४ ।।



दोघांनाही असे माहित । बाबा सामान्य माणुस नव्हेत ।
मनातल्याही कळतात । सर्वच गोष्टी बाबांना ।। ५५ ।।
जेवणखाण उठणे बसणे । एवढेच काय पण झोपणे ।
बाबांस घेउनी त्यांनी करणे । अलौकिक श्रद्धा दोघांची ।। ५६ ।।
वाड्यात कोठेही जावयास । पूर्ण मुभा असे बाबांस ।
खात्रीच होती दंपतीस । सकळ कळतसे बाबांना ।। ५७ ।।
स्त्रियांत न मिसळू द्याया कारण । मनोविकार केवळ जाण ।
त्याबाबतीत तर अचेतन । ठाकुर पाषाणपुतळाच ।। ५८ ।।
कोणत्याही स्त्रियेच्या मनात । लज्जा नसे उद्‌भवत ।
आपल्यातिलच ते वाटत । किंवा अजाण बालकची ।। ५९ ।।
करिताना सखीभावसाधन । बाबा स्त्रीवेष करिती धारण ।
सगळ्या महिलांत मिसळून । ढाळिती चामर देवीवर ।। १६० ।।
कोणा स्त्रियेचा येता रमण । ठाकुर तियेला सजवून ।
वेणीफणी तियेची करुन । कसे बोलावे शिकविती ।। ६१ ।।
ठाकुर कामगंधहीन । भक्ति विश्वास स्त्रियांचा पाहुन ।
नि:संकोच वृत्ती त्यांची बघुन । चकित होउनी मन जाई ।। ६२ ।।
धन्य स्त्रियांच्या विश्वासाची । धन्य तयांच्या आचरणाची ।
धन्य संगती ठाकुरांची । पूर्वपुण्याने लाभली ।। ६३ ।।
काय भगवंतांची थोरवी । सामान्य मानवे जाणावी ।
यास्तव मी चरणी ठेवी । मस्तक अत्यंत नम्रपणे ।। ६४ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा आठवा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय नववा

रामकृष्णांचे वंदिता चरण । विशुद्ध होई अंत:करण ।
भगवंताचे नामस्मरण । अशेष जनकल्याणकारी ।। १ ।।

यंदा मथुरच्या घराचा । उत्सव दुर्गापूजनाचा ।
कडाक्याने होता व्हायचा । देवीची प्रतिमा मांडिली ।। २ ।।

कारण गेले काही दिवस । मथुरनाथच्या घरास ।
बाबा होते वास्तव्यास । राहणार होते उत्सवास्तव ।। ३ ।।

जैसे आईच्या जवळ बाळ । निर्भयपणे खेळते खेळ ।
रामकृष्णांचा भाव सकळ । तैसाचि होता अंबेसी ।। ४ ।।

वाटे जगदंबेची मूर्त । प्रत्यक्ष जाहली जागृत ।
वातावरण तेथिल समस्त । पवित्र प्रसन्न जाहले ।। ५ ।।

मथुरची राजसिक भक्ती । बहुत शृंगारी वाड्याप्रती ।
तन्हेतन्हेने भगवतीमूर्ती । सजविली होती तयाने ।। ६ ।।

मंगलवाद्ये वाजविण्यास । लाविली होती रात्रंदिवस ।
पत्रे पुष्पे फळे पूजेस । आणुनी केली रेलचेल ।। ७ ।।

पूजेच्या बाह्य प्रकारांत । न्यून नव्हते यत्किंचित ।
सर्व व्यवधाने सांभाळित । होती उभयता पतिपत्नी ।। ८ ।।

बाबा सखीभावाभिनिविष्ट । पुरुष आहोत विसरले गोष्ट ।
स्त्रियांसारखे त्यांचे थेट । होती सर्वही व्यवहार ।। ९ ।।

जणु जन्मोजन्मी आपण । जगदंबेची असू मैत्रिण ।
देवीच त्यांचे जीवप्राण । सर्वस्व जाहली जगदंबा ।। १० ।।



जणु देवीच्या सेवेकारणे । तयांचा जन्म तयांचे जगणे ।
मुखमंडल भावावेशाने । अपूर्व तेजे झळकतसे ।। ११ ।।
जणु अंगात न समावुन । रूप बाहेर पडे गळुन ।
भावावेशात वर्धमान । होतसे लावण्य अधिकची ।। १२ ।।
सुवर्णाचे इष्टकवच । अंगकांती होती तशीच ।
दृष्टी खिळतसे पाहताच । ठाकुरांच्या स्वरूपावर ।। १३ ।।
वक्षस्थळ आणि वदन । राहू लागले रक्तवर्ण ।
दिव्य ज्योती शरिरातुन । वाटे बाहेर फाकतसे ।। १४ ।।
अत्यंत सुंदर स्वरूपावर । ज्यांची ज्यांची पडे नजर ।
विसरुनी देहभान समग्र । रूप पाहावे वाटतसे ।। १५ ।।
लोक पाहाया गर्दी करिती । बाबा आपुले आंग झाकिती ।
जगन्मातेची प्रार्थना करिती । बाहा स्वरूप मला नको ।। १६ ।।
बाहा स्वरूप हे घेउनी जाई । मजला आतले स्वरूप देई ।
हात शरीरावर सर्वही । फिरवित म्हणती आत जा ।। १७ ।।
ऐसी प्रार्थना करिता त्यांनी । पुढे कितीतरी दिवसांनी ।
दिव्य स्वरूप गेले लोपुनी । जाहले सामान्यासारखे ।। १८ ।।
स्वरूपाविषयी रामकृष्ण । होते अत्यंत उदासीन ।
एकदा कामारपुकुरालागुन । गेले होते राहावया ।। १९ ।।
त्यांचे दर्शन घ्यावयाला । शब्द तयांचे ऐकावयाला ।
बहुत उत्कंठा लोकांला । गर्दी करिती जन फार ।। २० ।।
महिला कामे आटोपुन । हालदारपुकुर तळ्यालागुन ।
स्नान करुनी घेती दर्शन । श्रीरामकृष्णदेवांचे ।। २१ ।।
घरी होता काही मिष्टान्न । अग्रभाग करिती समर्पण ।
गप्पागोष्टी तयांसी करुन । कामास जाती आपापल्या ।। २२ ।।



सकाळही जो झाली नाही । तोच स्त्रियांची गर्दी होई ।
विनोदप्रिय श्रीठाकुरही । चेष्टा करिती महिलांची ।। २३ ।।

ते म्हणती वृन्दावनात । कृष्णदेवासी गोपी समस्त ।
नाना ठायी मीलन करित । नाना प्रकारे भक्तिभरे ।। २४ ।।

यमुनेस जाता गोष्ठमीलन । सायंकाळी गोधुलीमीलन ।
रात्री होतसे रासमीलन । स्नानमीलन तुमचे तसे ।। २५ ।।

ठाकुरांचे ऐकुनी भाषण । विनोदगर्भ अर्थपूर्ण ।
सर्व स्त्रियांची हासुन हासुन । होउनी जाई पुरेवाट ।। २६ ।।

सकाळी तिसरे प्रहरासी । महिला जमती बाबांपाशी ।
मध्यान्ही सायंकाळासी । येती पुरुष त्यांच्याकडे ।। २७ ।।

भाषण बाबांचे परिसुन । तयांचा बोध श्रवण करुन ।
आनंद करू लागले जन । कार्यक्रमच हा दिवसाचा ।। २८ ।।

एकदा कामारपुकुराहुन । शिहडला करणे होते गमन ।
बसण्यासाठी शिबिका आणुन । व्यवस्था केली गमनाची ।। २९ ।।

ठाकुर सदैव समाधिमग्न । आंग कोमल गेले होउन ।
जणू भासती बालक सान । म्हणुनी पालखी लागतसे ।। ३० ।।

बाबा रेशमी वस्त्र नेसले । इष्ट कवच धारण केले ।
तांबुल खात बाहेर आले । बसावयाला शिबिकेत ।। ३१ ।।

स्त्रीपुरुषांची गर्दी पाहुन । त्यांनी हृदयला केला प्रश्न ।
हृदु कशाला इतुके जन । येथे जमले या समयी ।। ३२ ।।

हृदयराम देई उत्तर । गावास आपण जाणार ।
काही दिवस नाही दिसणार । म्हणुनी आले पाहावया ।। ३३ ।।

सरळ स्वभावी बाबा म्हणत । मजला रोज हे पाहतात ।
आजच विशेष काय त्यात । ऐकुनी हृदय उत्तरला ।। ३४ ।।



लाल रेशमी वस्त्र नेसुन । तोंड रंगले खाउनी पान ।
तुमचे रूप दिसे छान । यास्तव जमले जन सर्व ।। ३५ ।।
आपुल्या सुंदर रूपावर । आकृष्ट जाहले नारीनर ।
बाबांस वाईट वाटले फार । धक्काच बसला तयांना ।। ३६ ।।
तयांना वाटे हाय हाय । क्षणभंगुर हे सौंदर्य बाह्य ।
लक्ष जनांचे तिकडेच जाय । न बघती कोणी अंतरात्मा ।। ३७ ।।
रूपाविषयी पूर्वीपासुन । भाव बाबांचा उदासीन ।
आज बहुतची वर्धमान । होउनी बोलू ते लागले ।। ३८ ।।
य:कश्चित या शरीराला । जमतसे गर्दी पाहावयाला ।
काय जाईन त्या गावाला । होईल गर्दी लोकांची ।। ३९ ।।
आज कोठेच नाही जात । सांगुनी आपुल्या खोलीत ।
दु:खित होउनी कोपऱ्यात । जाउनी स्वस्थ ते बसले ।। ४० ।।
त्या दिनी गमन नाही केले । बहुतांनी जरी समजाविले ।
प्रयत्न जनांचे वाया गेले । केवढे औदास्य स्वरूपासी ।। ४१ ।।
काय ही अलौकिक पुरुषाची । तुच्छ बुद्धी देहावरची ।
न वाटे ममता नश्वराची । स्वशरीराची तिळभरही ।। ४२ ।।
असो मथुरचा घरचा अभिनव । दुर्गापूजेचा होता उत्सव ।
कार्यक्रमात दंग सर्व । नसेचि फुरसत कोणाला ।। ४३ ।।
बाबा सखीभावात मग्न । स्त्रीवेष केला होता धारण ।
भावोपशम होण्याचे चिन्ह । येइना दिसुनी सर्वथा ।। ४४ ।।
आता जगदंबेची आरती । सुरू होण्याची वेळ होती ।
जगदंबादासी म्हणे चित्ती । कसे न्यावे आरतीला ।। ४५ ।।
बाबांना या ठिकाणी सोडुन । बरे नसे जाणे आपण ।
नाद आरतीचा ऐकुन । येतील धाउनी निश्चित ते ।। ४६ ।।



बाबांस भावावस्थेत । देहभान नसे राहात ।
एकदा अशाच अवस्थेत । पडले होते बिस्तवावर ।। ४७ ।।
बरे व्हावया भाजलेले । कितीतरी दिवस लागले ।
आताही जर तसेच झाले । तर काय करावे आपण ।। ४८ ।।
इतुक्यात तिला सुचला विचार । बहुमूल्य काढिले अलंकार ।
घालित बाबांच्या अंगावर । कानात बोलली तयांच्या ।। ४९ ।।
आरती आता होईल सत्वर । चवरी ढाळा देवीवर ।
ऐसे सांगता वारंवार । भानावर ठाकुर पातले ।। ५० ।।
भावावेशात रामकृष्ण । असोत कितिही संज्ञाशून्य ।
बाह्य जगत हे सोडुनी मन । कितिही दूर असो त्यांचे ।। ५१ ।।
ज्या भावाच्या आश्रयेकरुन । मन होतसे समाधिमग्न ।
भावानुकूल शब्द उच्चारुन । नाम स्मरुनी त्या दैवताचे ।। ५२ ।।
ठाकुरांची अल्प काळात । समाधी ती असे उतरत ।
कथिले पातंजल योगसूत्रात । एकाग्र मनाचा धर्म हा ।। ५३ ।।
आपुले चित्त एकाग्र करणे । साधले जयांना भाग्याने ।
अनुभव ऐसे तयाकारणे । निश्चितपणे यावयाचा ।। ५४ ।।
येउनी लवकर भानावर । आरतीला गेले ठाकुर ।
जगदंबादासीबरोबर । देवीवर चवरी ढाळिती ।। ५५ ।।
कार्यक्रम हा होता पूर्ण । ठाकुर स्त्रीवेष बदलून ।
पुरुषमंडळींमध्ये येउन । बैसले गप्पा करावया ।। ५६ ।।
मथुरनाथ आत जाउन । विचारू लागला पत्नीलागुन ।
चवरी ढाळणारी कोण । महिला होती तुझ्यासवे ।। ५७ ।।
जगदंबादासी हासुन । म्हणे न कळली तुम्हाला खूण ।
स्त्रीवेष बाबांनी घेउन । ढाळिली चवरी देवीवर ।। ५८ ।।



मथुर बोलला होउनी चकित । जयांनी सामान्य विषयात ।
न कळू दिले आपणाप्रत । कोण तयांना जाणू शके ।। ५९ ।।
सदैव असुनी संगतीत । ओळखू शकलो नाही सांप्रत ।
मग अधिकार कोणाप्रत । समजू शकेल बाबांना ।। ६० ।।
विजया दशमीचा दिवस आला । मथुरला अत्यंत आनंद झाला ।
भानहि राहिले नाही त्याला । विसर्जन देवीचे करण्याचे ।। ६१ ।।
पुरोहिताने निरोप केला । विसर्जनाची झाली वेला ।
नमस्कार करण्यास देवीला । येउनी जावे झडकरी ।। ६२ ।।
निरोप ऐकुनी धक्का बसला । म्हणे काही न उणे मजला ।
का करू विसर्जन प्रतिमेला । पूजन नित्य हे चालवीन ।। ६३ ।।
मनात ऐसा विचार करुन । निरोप दिधला पाठवून ।
नाही करणार विसर्जन । जगन्मातेचे कदापि मी ।। ६४ ।।
निरोप ऐसा परिसून । चिंतेत पडिले सर्वजण ।
मथुर जयाचा ठेवी मान । तयांनी सांगुनी पाहिले ।। ६५ ।।
हट्ट सोडिना मथुरनाथ । सकळ टेकविती तेथे हात ।
जगदंबादासी ठाकुरांप्रत । विनवी बोध करावया ।। ६६ ।।
ठाकुर सत्वर तेथे गेले । मथुरचे मुख आरक्त दिसले ।
नयनही होते लाल झाले । गर्क होता विचारात ।। ६७ ।।
ठाकुरांना पाहुनी मथुर । जवळ येउनी बोले सत्वर ।
विसर्जन नाही करणार । जिवंत जोवर मी असे ।। ६८ ।।
आताच मी टाकिले सांगुन । मातेची नित्य पूजा करिन ।
जगन्मातेला सोडुनी देउन । कैसे आपण राहायचे ।। ६९ ।।
छातीस त्याच्या लावुनी हात । बाबा वदले बाबूप्रत ।
एवढीच भीती तव चित्तात । नकोस सोडू मातेला ।। ७० ।।



आणि तू केलेस विसर्जन । तर ती काय जाईल निघुन ।
काय आई मुलांना सोडुन । जाईल निघुनी दुसरीकडे ।। ७१ ।।
दालनामधे दिवस तीन । पूजा घेतली तुजकडून ।
आता हृदयामधे राहुन । घेईल पूजन या पुढती ।। ७२ ।।
ठाकुरांचा स्पर्श अद्‌भुत । मथुरास दर्शन झाले प्राप्त ।
आविर्भाव देविचा हृदयात । प्रत्ययास आला तयाच्या ।। ७३ ।।
प्रतिमापूजनाचा समस्त । आग्रह तयाचा झाला लुप्त ।
प्रतिमेचे थोड्याच वेळात । विसर्जन केले यथाविधी ।। ७४ ।।
बाबांच्या संगतीत राहुनी । असीम आनंद त्यांचा पाहुनी ।
काय प्रकार हा जाणुनी । घ्यावे वाटले मथुरला ।। ७५ ।।
बाबांनी आणिताच मनात । वाटेल ते करू शकतात ।
ऐसा दृढ विश्वास मनात । धरणे धरुनी तो बसला ।। ७६ ।।
मथुरनाथ बाबांस वदला । भावसमाधी द्यावी मजला ।
ठाकुर समजाविती तयाला । घाई ऐसी करू नये ।। ७७ ।।
अरे जेव्हा येईल वेळ । सर्व ठीक तेव्हा होइल ।
काय बी पेरता तत्काळ । येतसे फळ झाडावर ।। ७८ ।।
समाधीमधे राहशील । कैसा प्रपंच चालवशील ।
मन संसारी न राहील । उधळली जाईल संपत्ती ।। ७९ ।।
परंतु हे सर्व ऐकेल कोण । मथुर बैसला हट्ट घेउन ।
मग पुनरपी रामकृष्ण । समजूत घालती तयाची ।। ८० ।।
ऐश्वर्यरूपात परमेशाला । पाहावे न वाटे भक्ताला ।
एकच इच्छा असते तयाला । घडावी सेवा ईश्वराची ।। ८१ ।।
ईश्वराचे ऐश्वर्यदर्शन । करितसे भीती उत्पन्न ।
घटतसे प्रेम तेणेकरुन । कथा सांगतो ऐक आता ।। ८२ ।।



मथुरेस जाई गोपाळ । गोपी विरहे झाल्या व्याकुळ ।
उद्धवास पाठवी घननीळ । समजूत त्यांची करावया ।। ८३ ।।
असुनही उद्धव ज्ञानवान । वात्सल्यभाव नेणे म्हणुन ।
त्यासही भक्तीचे महिमान । कळावे उद्देश श्रीहरिचा ।। ८४ ।।
उद्धव वृन्दावनास जाउन । बोलला सकळ गोपींलागुन ।
अशा काय गे कृष्ण कृष्ण । साऱ्याजणी करित असा ।। ८५ ।।
तो तर प्रत्यक्ष भगवान । चराचराला असे व्यापुन ।
कसे समजता त्याच्यावाचुन । हे वृन्दावन शून्य असे ।। ८६ ।।
हताश होऊ नका सगळे । ध्यान करा गे मिटा डोळे ।
म्हणजे तत्काळ तुम्हा कळे । हृदयात प्रत्यक्ष वसे तो ।। ८७ ।।
गोपी म्हणती ते ऐकुनी । कृष्णसखा तू उद्धवा ज्ञानी ।
ऐसा असुनी आम्हालागुनी । कसा गोष्टी या करितोस ।। ८८ ।।
काय आम्ही करुनी ध्यान । करुनी जपतप अनुष्ठान ।
पाहिला होता तो श्रीकृष्ण । नवनीरद श्याम वनमाळी ।। ८९ ।।
अरे जयाला प्रत्यक्ष पाहिले । खेळविले खाऊ घातिले ।
नाना परीने सजविले । काय ध्यान करू त्याचे ।। ९० ।।
कसे तयाचे करणे ध्यान । आता घडावे आम्हाकडुन ।
सर्व व्यापारी करी चिंतन । ते मन आमुचे असे काय ।। ९१ ।।
ते मन श्रीकृष्णाच्या पायी । कधीच अर्पण केले सर्वही ।
आमुचे वदण्या आता काही । शिल्लक नाही उरलेले ।। ९२ ।।
उद्धव ऐकुनी संपूर्ण मात । आश्चर्यचकित झाला मनात ।
स्वरूप गंभीर अत्यद्भुत । कळले गोपींच्या प्रेमाचे ।। ९३ ।।
मग गोपींना गुरू मानुन । उद्धवाने केले नमन ।
मथुरला सांगती रामकृष्ण । बोध यावरुनी घेई तू ।। ९४ ।।



जो असे खरा भगवद्भक्त । प्रभुला ऐश्वर्य स्वरूपात ।
कधिही पाहू नाही इच्छित । आनंद सेवेत मानितसे ।। ९५ ।।
ऐश्वर्य स्वरूपात पाहण्यासी । इच्छाच होइना भक्तासी ।
कारण ठाउक असे तयासी । हानी भावासी होत असे ।। ९६ ।।
यावरही न ऐके मथुर । मग काढिले निर्वाण अस्त्र ।
म्हणती मजला अणुमात्र । यात काही कळत नसे ।। ९७ ।।
परि आईला सांगुन पाहिन । तिला जे योग्य येईल दिसुन ।
ते ती करील ऐसे बोलुन । बाबा भाषण संपविती ।। ९८ ।।
यानंतर थोड्याच दिवसांत । मथुरबाबूला अकस्मात ।
भावसमाधी झाली प्राप्त । बोलविले रामकृष्णांना ।। ९९ ।।
रामकृष्ण जाउनी पाहती । नयन आरक्त झाले असती ।
अश्रुधारा नयनी वाहती । जणू मथुर मानव नसे ।। १०० ।।
ईश्वराच्या गोष्टी बोलत । रडुनी देह भिजला समस्त ।
वक्षस्थळ थरथर कापत । भानही नव्हते शरिराचे ।। १ ।।
पाहताच श्रीरामकृष्णांला । मिठी मारली चरणांला ।
म्हणाला बाबा घात झाला । लोटले असे दिवस तीन ।। २ ।।
कितिही जरी केले प्रयत्न । प्रपंचाकडे न लागे मन ।
सर्वत्र गोंधळ गेला उडुन । सहन होइना हा भाव ।। ३ ।।
हा भाव तुमचाच तुम्हाला । लखलाभ असो तो बोलला ।
ठाकुर वदते झाले तयाला । तूच मागितला होतास ।। ४ ।।
तो म्हणे मी वदलो खरा । आनंदातही असे पुरा ।
परंतु नाश होतसे सारा । काय करू या सुखाचे ।। ५ ।।
बाबा, भाव नको मजला । तुम्ही परत घ्यावा आपुला
हसे लोटले ठाकुरांला । वदले तयाला प्रेमाने ।। ६ ।।



आधीच हे मी सांगितले । तथापि तुजला नाही पटले ।
मथुर नम्रपणाने बोले । नव्हते ठाउक मजलागी ।। ७ ।।
की हा कोणा भुतासमान । मानगुटीवर बसेल म्हणुन ।
करावे लागेल मला वर्तन । जैसा फिरविल तैसेची ।। ८ ।।
मनामधे आले काही । तरी ते करिता येत नाही ।
ऐसे ऐकता लवलाही । भाव शमविला ठाकुरांनी ।। ९ ।।
ऐसा मथुरसी संबंध मधुर । साधनास काही पडता जरुर ।
मथुर आणुनी देई सत्वर । इच्छित वस्तू ठाकुरांना ।। ११० ।।
बाबांना जी दर्शने होती । जे जे भाव मनी उपजती ।
सांगती सकळ ते बाबूप्रती । विचारती मग मत त्याचे ।। ११ ।।
बाबांच्या बालकभावात । कृत्रिमता नसे किंचित ।
वाटे आत्मसंरक्षणार्थ । असमर्थ असती खरोखर ।। १२ ।।
सांसरिक विषयात अनभिज्ञ । ऐसे लहान बालक पाहुन ।
कोणाचे न उचंबळे मन । प्रेम न वाटेल कोणाला ।। १३ ।।
ऐसे बालक असता जवळ । करीत असता खोड्या खेळ ।
कोण न जपे सर्वकाळ । इजा न व्हावी तयाप्रती ।। १४ ।।
यास्तव मथुरनाथाच्या मनात । रक्षण बाबांचे सर्व गोष्टींत ।
करावे वाटे तयाप्रत । तसाच वागला त्यांच्याशी ।। १५ ।।
बाबांच्या दैवी शक्तीवर । मथुरची श्रद्धा असे अपार ।
बाह्यत: मानुनी सान किशोर । सदैव तत्पर रक्षावया ।। १६ ।।
सर्वज्ञ बाबांचा गुरुभाव । बाह्य विषयांत बालस्वभाव ।
झाले मिश्रण मधुर अपूर्व । मथुर जाणे ते पूर्णपणे ।। १७ ।।
ऐहिक सकळही गोष्टींत । देहरक्षणादि कार्यात ।
बाबांचे रक्षण करणे प्राप्त । आपणास वाटे मथुरला ।। १८ ।।



मानवी शक्तीच्या बाहेर । पारमार्थिक विषय जे थोर ।
आपुले रक्षण करणार । ठाकुर विश्वास तयाचा ।। १९ ।।
सरल बालक भावाविष्ट । बाबा असुनही उपास्य दैवत ।
तयांचीही कधी समजुत । घालणे पडावे मथुरला ।। १२० ।।
एकदा बाबा शौचावरुन । परतले चिंताक्रांत होउन ।
मथुरला म्हणू लागले, कोण । पंचाइत झाली आजला ।। २१ ।।
मजला पडला थोरला जंत । कोणास एवढा नाही पडत ।
काही केल्या नाही कळत । मलाच का बरे असे व्हावे ।। २२ ।।
एका घटकेपूर्वी मथुरला । आध्यात्मिक विषय सांगितला ।
तेच आश्वासन मागावयाला । बाबा पातले मथुरकडे ।। २३ ।।
मथुर त्यांना सांगे हासुन । बाबा हे तर घडले छान ।
कामकीट तो गेला पडुन । कुविचार उपजवी मनी ।। २४ ।।
तोच लोकांकडुनी समस्त । अनिष्ट कृत्ये करवी बहुत ।
तुमचा पडला अकस्मात । जगदंबेची कृपाच ही ।। २५ ।।
ऐकुनी मथुरचे भाषण । ठाकुर पावले समाधान ।
म्हणती ही गोष्ट तुजलागुन । बरेच झाले सांगितली ।। २६ ।।
एकदा बाबा मथुरला वदले । आईने मजला सांगितले ।
तुझे अंतरंग भक्त सगळे । जमतील पुढे या ठिकाणी ।। २७ ।।
सर्व ते तुझ्याकडे येउनी । ईश्वरीय विषय समजावुनी ।
घेतील समग्र तुझ्याकडुनी । ऐकतील पाहतील प्रत्यक्ष ।। २८ ।।
या शरिराचा आश्रय करुन । आई खेळ खेळेल महान ।
करील उपकृत बहुत जन । देह म्हणुनि हा रक्षियला ।। २९ ।।
यास्तव तिने हा जतन केला । देहपिंजरा नाही मोडला ।
काय वाटते सांग तुजला । भ्रमच अथवा सत्य असे ।। १३० ।।



मथुरनाथ तयांना वदला । बाबा भ्रम का होइल असला ।
जगन्मातेने कधिही तुम्हाला । दाखविले नाही असत्य ।। ३१ ।।
हेही असलेच पाहिजे सत्य । मजला वाटते तुमचे भक्त ।
लवकर लवकर ते यावेत । आनंद करू मग सर्वजण ।। ३२ ।।
ऐकुनी ठाकुर त्याला वदले । आईनेच मजला सांगितले ।
केव्हा येतील येवोत सगळे । मर्जी तियेची यावरी ।। ३३ ।।
पुढे लोटता काही दिवस । मथुरने पुसले ठाकुरांस ।
अंतरंग भक्त या ठायास । अजुन का बरे न येती ।। ३४ ।।
रामकृष्ण तयाला म्हणती । काय सांगावे कधी येती ।
आईनेच सांगितले मजप्रती । निश्चित येणार वाटतसे ।। ३५ ।।
तियेने सांगितलेल्या गोष्टी । एकेक सर्वही घडुनी येती ।
का बरे मग हीच एकटी । नाही घडुनी यावयाची ।। ३६ ।।
असत्य होइ का शंका येउन । ठाकुर जाहले चिंतामग्न ।
वदन तयांचे झाले म्लान । पाहुनी मथुर दुखावला ।। ३७ ।।
तयाच्या मनाला वाटले । बोललो हे बरे न केले ।
चतुर मथुर मग ते वेळे । समजूत घाली ठाकुरांची ।। ३८ ।।
ते येवोत अथवा न येवोत । मी तर तुमचा अनन्य भक्त ।
आईची नसे असत्य मात । शंभर भक्तासमान मी ।। ३९ ।।
म्हणुनी मातेने दाखविले । पुष्कळ भक्त येतील इथले ।
ठाकुर म्हणती असेल तसले । समजुत पटली अविलंबे ।। १४० ।।
रासमणीने जिवंतपणी । मुलींत तंटे न व्हावे म्हणुनी ।
संपत्तीच्या वाटण्या करुनी । दिधल्या होत्या तयांप्रती ।। ४१ ।।
मथुरपत्नी जगदंबादासी । भगिनीच्या भागातिल पुष्करणीसी ।
गेली स्नान करावयासी । भाजी घेतिली त्या ठायी ।। ४२ ।।



बाबांनी ते पाहता कृत्य । अनेक विचार आले मनात ।
जगदंबादासी घेउनी जात । न पुसता वस्तू का दुसऱ्यांची ।। ४३ ।।
न विचारता वस्तू नेणे । हे तर आहे चोरी करणे ।
मोठाच अपराध केला हिने । कसे कळेना तिजलागी ।। ४४ ।।
पुष्करणी जियेच्या भागात । तिथे ती आली तेवढ्यात ।
बाबांनी तिजला साद्यंत । हकिकत कथिली घडलेली ।। ४५ ।।
एवढी क्षुल्लक गोष्ट असुन । गंभीर भाव तयांचा पाहुन ।
हसे लोटले तिजलागुन । मथुरपत्निही आली तिथे ।। ४६ ।।
हासण्याचे कारण ऐकुन । विनोदे म्हणे बाबांलागुन ।
भाजी नेतसे छपवून । सांगुनी फजिती केली माझी ।। ४७ ।।
रामकृष्णांकडे पाहुनी । हासू लागल्या दोघी बहिणी ।
बाबा म्हणती मजलागुनी । हे काय ठाउक असे बुवा ।। ४८ ।।
मज वाटले वाटली दौलत । वस्तु घेणे न करिता माहित ।
बरे नव्हे, मग केले विदित । यावर मर्जी तिची असो ।। ४९ ।।
वचन बाबांचे परिसुनी । अधिकच हासती दोघी बहिणी ।
म्हणती अति आदर वाटुनी । सरळ स्वभाव बाबांचा ।। १५० ।।
असा बाबांचा बालकावत । सरळ स्वभाव अत्यंत ।
परंतु कर्तुमकर्तुं समर्थ । अपूर्व मिश्रण भावांचे ।। ५१ ।।
एकदा मथुरच्या आज्ञेवरुन । जमिनदारासी झाले भांडण ।
मारामारी झाली भीषण । खून पडला जमिनदाराचा ।। ५२ ।।
मथुर त्या संकटसमयाला । बाबांकडे आश्रया आला ।
चरणांस घट्ट धरुनी वदला । बाबा मजला वाचवा हो ।। ५३ ।।
बाबा निर्भर्त्सना करुन । म्हणती येसी झेंगट घेउन ।
म्हणतोस बाबा मजलागुन । संकटातुनी या वाचवा ।। ५४ ।।



काय हवे ते करण्याला । मूर्खा सामर्थ्य असे मजला ।।
आता इकडे आला कशाला । निस्तर आपुले आपण तू ।। ५५ ।।
तथापि मथुर न सोडी चरण । ठाकुरांस येउनी कारुण्य ।
वदले नीघ आता येथुन । पुनरपि ऐसे करू नको ।। ५६ ।।
आईच्या जे मनी असेल । घडुनी तैसे येई सकळ ।
संकट टळले घडले नवल । विश्वास वाढला मथुरचा ।। ५७ ।।
कर्तुमकर्तुं असुनी शक्ती । कर्तृत्व स्वत:कडे न घेती ।
आईच सकळ कर्त्री करविती । आपण केवळ बाळ तिचे ।। ५८ ।।
बुद्धिमान हिशेबी मथुर । बाबांस्तव करी खर्च फार ।
यात्रोत्सवास जाता ठाकुर । मथुर बरोबर जात असे ।। ५९ ।।
गाणे ऐकता रामकृष्ण । गायकांस करावयाला दान ।
दहा दहा रुपयांच्या बांधुन । पुरचुंड्या मथुर ठेवितसे ।। १६० ।।
एखाद्या गायकाचे गान । जर बाबांना वाटले छान ।
अवघ्या पुरचुंड्या देउन । टाकिती एकदम तयासी ।। ६१ ।।
मथुर काही न आणी मनी । म्हणे बाबांसमान थोरांनी ।
मोठेच दान करावे म्हणुनी । आणिक रुपये ठेवितसे ।। ६२ ।।
पुन्हा एखादे गाणे ऐकुन । बाबा पावता समाधान ।
समोरिल सर्व द्रव्य दान । करुनी टाकित गवयाला ।। ६३ ।।
तेवढ्याने तृप्त न होउन । नेसले किमती वसन ।
तेहि तयाला करुनी दान । आपण समाधिमग्न होती ।। ६४ ।।
संपत्तीचे सार्थक दाने । झाले मानुनिया मथुरने ।
बाबांना अति आनंदाने । वारा घालित असावे ।। ६५ ।।
मथुरचा विश्वास वाढला । कृपेनेच बाबांच्या आपुला ।
कळले मान प्रताप टिकला । भजतसे ईश्वरभावाने ।। ६६ ।।



आई दाखवी बाबांना । चौघांस त्यांच्या देहरक्षणा ।
साह्य परोपरी करण्या त्यांना । त्यांच्याच बरोबर पाठविले ।। ६७ ।।

त्या चौघा देहरक्षकांत । श्रेष्ठतम असे मथुरनाथ ।
ईश्वरी योजना म्हणुनी टिकत । संबंध अलौकिक दोघांचा ।। ६८ ।।

अवतारश्रेष्ठ रामकृष्ण । साधनकालात तयालागुन ।
साह्य करावयाचा मान । मिळाला मथुरला धन्य तो ।। ६९ ।।

विचार करिता अधिकाधिक । संबंध भासे अलौकिक ।
आश्चर्यचकित होतसे देख । मन विवेकी पुरुषांचे ।। १७० ।।

आराध्यासी प्रेममय । दिव्य अलौकिक भक्तिमय ।
एवढा संबंध विश्वासमय । ना देखिला ना ऐकियला ।। ७१ ।।

मग असंशय वाटे मनाला । भगवंताच्या दिव्य लीलेला ।
परोपरी साह्य करावयाला । मथुरास धाडिले अंबेने ।। ७२ ।।

साधनांच्या सुरुवातीला । मथुरबाबूचा संबंध आला ।
साधनकाल जेव्हा संपला । देह सोडला मथुरने ।। ७३ ।।

तेधवा तयाचे काम जाहले । परि ते तयाने चोख केले ।
इतिहासात अतुल ठरले । धन्य सद्‌भाग्य मथुरचे ।। ७४ ।।

श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १७५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा नववा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय दहावा

श्रीरामकृष्णचरणकमळ । वंदू वानू चरित रसाळ ।
ज्यांनी धवळिला ब्रह्मांडगोल । आपुल्या अध्यात्मतेजाने ।। १ ।।
जगदंबेचे दर्शन झाले । आनंदार्णवात बाबा बुडाले ।
पूजन करणे अशक्य झाले । तयांना जगज्जननीचे ।। २ ।।
विचारुनी मथुरनाथाला । ब्राह्मण घेउनी मदतीला ।
हृदयराम करू लागला । पूजन कालीदेवीचे ।। ३ ।।
हृदयरामाच्या वाटे मनाला । वायुरोग झाला मामांला ।
औषधोपचार सुरू केला । तयाने प्रसिद्ध वैद्याचा ।। ४ ।।
कित्येक दिवस औषध देउन । काहीच दिसुनी येइना गुण ।
वायुरोग मग झाला म्हणुन । कामारपुकुरी कळविले ।। ५ ।।
ठाकुर दर्शनासाठी ज्या दिनी । न पडती बेहोष होउनी ।
स्वत: पूजा करिती त्या दिनी । जगज्जननीची भक्तिभरे ।। ६ ।।
कधी कधी ठाकुर सांगती । मंडपात असे जी भैरवमूर्ती ।
पाहुनी म्हणतसे मनाप्रती । ध्यान करावे तुवा असे ।। ७ ।।
असेच शांत स्तब्ध बसुन । मना मातेचे करी चिंतन ।
करावयाला बसता ध्यान । स्पष्टपणे ऐकू येतसे ।। ८ ।।
सर्वही सांधे पायापासुनी । खटखट असा आवाज होउनी ।
बंद होती जणू आतुनी । कुलुपचि कोणी लावितसे ।। ९ ।।
जोवरी मी करी ध्यान । देह हालविणे बदलणे आसन ।
मध्येच सोडुनि देणे ध्यान । मजलागुनी अशक्य असे ।। १० ।।



पुनरपि आवाज होउनी खटखट । मोकळे होती सांधे समस्त ।
जणु तोवर एकाच स्थितीत । कोणी बळाने बसवितसे ।। ११ ।।

प्रथम प्रथम करिता ध्यान । काजव्यांच्या पुंजक्यासमान ।
ज्योतिबिंदूंचे पुंजके दिसुन । येती मजला कधी कधी ।। १२ ।।

कधी दिशा दिसाव्या समस्त । धुक्यासमान ज्योतिने व्याप्त ।
रौप्यसमुद्रासम चकचकीत । ज्योतिस्समुद्र दिसे कधी ।। १३ ।।

असे दिसावे डोळे मिटता । कधी दिसावे उघडे असता ।
कळेना काय पाहिले आता । दर्शन वाईट अथवा बरे ।। १४ ।।

मग अत्यंत व्याकुळ होउनी । प्रार्थित असे जगज्जननी ।
काय होतसे मजलागुनी । कल्पना करिता न ये मला ।। १५ ।।

प्रार्थना करावयाचे मजप्रत । मंत्रतंत्र माहित नाहीत ।
कशाने तव दर्शन होत । अविलंबे सांगे जगदंबे ।। १६ ।।

तू जर हे ना सांगशील । दुसरे कोण मज शिकवील ।
ऐसी प्रार्थना करुनी व्याकुळ । होउनी रडती रामकृष्ण ।। १७ ।।

तेधवा बाबांचे पूजाध्यान । होउ लागले विलक्षण ।
तन्मय भाव समजणे कठिण । अन्य जनांना तयांचा ।। १८ ।।

त्या अद्‌भुत भावात रमुन । जगदंबेचा आश्रय करुन ।
बालकाप्रमाणे झाले मन । सरलता विश्वास बाणले ।। १९ ।।

देशकालपात्राप्रमाणे । विधिनिषेध मानुनी चालणे ।
दोही पक्षी व्यवहार करणे । जाहले तयांना अशक्य ।। २० ।।

वाटतसे बाबांस पाहुन । इच्छामयीच्या इच्छेत मन ।
बुद्धिचित्त अहंकार बुडवुन । तिच्या हातचे यंत्र झाले ।। २१ ।।

बाबा मन:पूर्वक म्हणती । शरणागत या बालकाप्रती ।
करणे सांगणे जे मजप्रती । ते ते माते तूचि करी ।। २२ ।।



निरहंकार स्वभावाने । कर्मे करिती जी भावाने ।
अशक्य जाहले मेळ पडणे । विश्वासाशी इतरांच्या ।। २३ ।।
व्यवहारासी उपजला विरोध । जन आपसांत नानाविध ।
स्पष्टपणे ठाकुरांविरुद्ध । चर्चा मग करू लागले ।। २४ ।।
जगन्मातेच्या बालकाला । ऐकू येइना तो गलबला ।
स्वप्नभासच त्यांना झाला । जगात असुनही जगताचा ।। २५ ।।
एकमात्र सत्यप्रतीती । जगदंबेची चिन्मयी मूर्ती ।
इतर सकळ वस्तू भासती । तयांना सर्वथा काल्पनिक ।। २६ ।।
पूर्वी करिता पूजाध्यान । हातच कधी येई दिसुन ।
एखादाच जननीचा चरण । वदनकमळ दिसे कधी ।। २७ ।।
परंतु आता पूजेवाचुन । इतर वेळी सुद्धा पूर्ण ।
जगन्मातेचे होई दर्शन । हासते बोलते दिसत असे ।। २८ ।।
दिसे माता करी उपदेश । काय करावे सांगे तयास ।
आपुल्या बरोबर आसपास । प्रत्यक्ष फिरते दिसत असे ।। २९ ।।
पूर्वी बाबांस येई दिसुन । जगदंबेच्या नेत्रातून ।
दिव्य ज्योति बाहेर पडुन । नैवेद्याला स्पर्श करी ।। ३० ।।
आता प्रत्यक्ष येतसे दिसुन । नैवेद्य करण्यापूर्वी अर्पण ।
मंदिर प्रभेने प्रकाशवून । जेवण्यास बसली जगन्माता ।। ३१ ।।
एकदा पूजा करीत असता । जेवावयाला बसली माता ।
ठाकुर म्हणती थांब आता । मंत्र म्हणू दे अगोदर ।। ३२ ।।
मग तितुकेच सोडुनी पूजन । नैवेद्य करिती समर्पण ।
तन्मय होउनी रामकृष्ण । भरविती जगज्जननीला ।। ३३ ।।
पूर्वी पूजा असता करित । समोरील पाषाण मूर्तीत ।
देवीचा आविर्भाव साक्षात । जाहला ऐसे दिसत असे ।। ३४ ।।



आता तयांना मंदिरात । पाषाण मूर्तीच नसे दिसत ।
सदैव तेथे जिवंत जागृत । चिन्मयी जननी दिसत असे ।। ३५ ।।

हात लाविता नासिकाग्रास । प्रत्यक्ष लागे श्वासोच्छ्वास ।
दिव्यांच्या प्रकाशात रात्रीस । देवीची साउली दिसेना ।। ३६ ।।

खोलीत असता ऐकू येई । पायात पैंजणे घालुनी आई ।
छुमछुम करीत जिन्याने जाई । आनंदात बालिकेप्रमाणे ।। ३७ ।।

आई दिसत असे सज्जात । केश सोडुनी उभी राहत ।
मधेच कलकत्त्याकडे पाहत । मधेच पाहे गंगेकडे ।। ३८ ।।

हृदयराम असे सांगत । मामा असता मंदिरात ।
तेव्हाची तर काय मात । परंतु इतर वेळातही ।। ३९ ।।

प्रवेश करिताच मंदिरात । आंग होतसे रोमांचित ।
यास्तव मी जातसे नित्य । पूजा तयांची पाहावया ।। ४० ।।

जो जो तयांची पूजा पहावी । भक्ती मनात उपजावी ।
बाहेर येताच शंका यावी । वेड तर नसेल मामांना ।। ४१ ।।

नाहीतर ते पूजनात । भ्रष्टाचार का करितात ।
मथुरबाबूस कळता मात । अनिष्ट परिणाम होईल ।। ४२ ।।

मनात भीती उत्पन्न होई । परि मामांच्या गाविही नाही ।
तयांना सांगताहि काही । लक्ष देती ना लवमात्र ।। ४३ ।।

मामांस सांगावयास जावे । संकोच भय उत्पन्न व्हावे ।
जणु कोणी तोंड दाबावे । तैसा उपदेश करवेना ।। ४४ ।।

तेधवा माझ्या मनात यावे । यथासाध्य तयांना सेवावे ।
परंतु लगेच मज वाटावे । न घडो काही भलतेच ।। ४५ ।।

एकदा बिल्वार्घ्य तयार करुन । आपुल्या पायालाही स्पर्शुन ।
वाहते झाले रामकृष्ण । जगदंबेच्या चरणावरी ।। ४६ ।।



अंतर्बाह्य दिसतसे देवी । स्वत:स कुसुमे वाहुनी घ्यावी ।
पूजासामग्री अर्पण करावी । स्वत:स जगदंबाज्ञानाने ।। ४७ ।।
एके दिवशी श्रीठाकुर । आरक्त होउनी छाती नेत्र ।
चढले सिंहासनावर । हनुवटी धरिली अंबेची ।। ४८ ।।
जगदंबेला कुरवाळिती । मधेच हासती गाणे गाती ।
नृत्यच बाबा करू लागती । हात धरुनिया मातेचा ।। ४९ ।।
एकदा नैवेद्य असता अर्पित । घास घेतला निज हस्तात ।
घालुनी जगदंबेच्या मुखात । म्हणती चांगले नीट खा ।। ५० ।।
मजला तू खा म्हणतेस । बरे तर मीही घेतो घास ।
ऐसे बोलुनी अन्नांशास । सेवन करिती रामकृष्ण ।। ५१ ।।
म्हणती जगज्जननीला । मी तर सेविले अन्नाला ।
ग्रहण करी तू नैवेद्याला । विलंब आता करू नको ।। ५२ ।।
अंबेसि संबंध दिव्य मधुर । प्रत्यक्ष बोलती ऐकती स्वर ।
जगदंबा आपुल्याबरोबर । व्यवहार करिता दिसत असे ।। ५३ ।।
एकदा नैवेद्य असता करित । मांजरी पातली अवचित ।
बाबांनी खा आई म्हणत । नैवेद्य घातला तियेला ।। ५४ ।।
बाबांस प्राणिमात्रांमधुन । जगदंबेचे होतसे दर्शन ।
जनांस वाटे विचित्र आचरण । वेडच तयांना लागले ।। ५५ ।।
रुपेरी पलंग टाकिलेला । त्यावर निजविले अंबेला ।
म्हणती आई निजावयाला । बालकाला सांगसी तू ।। ५६ ।।
बरे तर मीही निजतो आई । बोलुनि ऐसे लवलाही ।
रौप्य पलंगावर वेळ काही । निजुनि राहिले रामकृष्ण ।। ५७ ।।
करित असता देवीचे पूजन । तन्मय होती विसरती भान ।
बाहा जगताचे मुळिही ज्ञान । ठाकुरांना तेव्हा नसे ।। ५८ ।।



सकाळी देवीच्या हाराप्रती । बाबा बागेत फुले तोडिती ।
जगज्जननी ठाकुरांप्रती । साह्य करितसे तोडावया ।। ५९ ।।
मग अंबेसी बोलत बोलत । हासत खेळत गप्पा करित ।
फुले तोडावी आनंदात । जगज्जननीच्या पूजेस्तव ।। ६० ।।
रात्री निद्रासुद्धा न यावी । सदैव भावावस्था असावी ।
सकळ रजनी निघुनी जावी । बोलत बोलत मातेसी ।। ६१ ।।
संसारासक्त सामान्य नर । केवी जाणती अवस्था थोर ।
ऐसे रोज घडती प्रकार । उन्माद झाला वाटे तया ।। ६२ ।।
आपण देवीच्या मंचकी निजणे । पूजाद्रव्य स्वत:स अर्पिणे ।
नैवेद्यातील अन्न खाणे । बडबड करणे रात्रभर ।। ६३ ।।
रामकृष्णांची कृती पाहुन । भयभीत होई हृदयचे मन ।
तयास वाटे परिणाम कठिण । होइल कळता मथुरला ।। ६४ ।।
बातमी तरी ती पसरली । खजिनदारबाबूला कळली ।
एकदा तयाने येउनी देउळी । कारभार पाहिला बाबांचा ।। ६५ ।।
ठाकुरांचे वर्तन अद्‌भुत । जणू संचार जाहला अंगात ।
नि:संकोच व्यवहार पहात । होइना हिंमत बोलावया ।। ६६ ।।
वाटाघाटी करिता ठरले । भट्टाचार्यां भूते झडपिले ।
अथवा त्यांना वेड लागले । विपरित वर्तन होत असे ।। ६७ ।।
भट्टाचार्यांनी आता पूजेत । मांडिला भ्रष्टाचार समस्त ।
कळविली मथुरबाबुला मात । तो म्हणे स्वत: पाहीन मी ।। ६८ ।।
चर्चा करिती मंडळी सकळ । भट्टाचार्यांची नोकरी जाइल ।
काली किती सहन करिल । पूजेत भ्रष्टाचार असा ।। ६९ ।।
एकदा मथुरनाथ आला । कार्यकलाप अवलोकिला ।
ठाउक नसे ते ठाकुरांला । लक्ष तयांचे देवीकडे ।। ७० ।।



मंदिरात येतसे कोण । कोण बाहेर जाई निघुन ।
यत्किंचितही नसे भान । असती तन्मय पूजेमधे ।। ७१ ।।
मथुरच्या आले लक्षात । वरवर दिसतसे विपरीत ।
ते बाबांचे वर्तन समस्त । प्रेमभक्तिने झाले असे ।। ७२ ।।
निष्कपट भक्ती विश्वासाने । न व्हावे प्रसन्न जगदंबेने ।
तरी कोणत्या उपायाने । प्रसन्न होईल जगदंबा ।। ७३ ।।
पूजा करिती तन्मय होउनी । अश्रुधारा वाहती नयनी ।
ठाकुरांचा उल्हास पाहुनी । मथुरनाथ आनंदला ।। ७४ ।।
खरोखर भासले तयाला । देवप्रकाश मंदिरी भरला ।
वाटले दर्शन आचार्यांला । खास जाहले अंबेचे ।। ७५ ।।
कितीतरी दिवसांनी यावेळी । देवीची प्रतिष्ठापना झाली ।
इतुक्या दिवसांनी होउ लागली । खरीखरी पूजा अंबेची ।। ७६ ।।
नमस्कार करुनी जगदंबेला । तियेच्या अपूर्व पूजकाला ।
न बोलताच मथुर गेला । परत आपुल्या वाड्यास ।। ७७ ।।
देवळाच्या कारभाऱ्याला । दुसऱ्या दिवशी हुकुम आला ।
पूजा करुद्या आचार्यांला । करतिल तैशी स्वेच्छेने ।। ७८ ।।
वैधी भक्ती उल्लंघुनी । प्रेमभक्तीच्या मार्गावरुनी ।
बाबा जाती वेगे करुनी । क्रान्ती घडली जीवनात ।। ७९ ।।
दुसऱ्यांची तर राहोच मात । त्यांनाहि कळेना काय होत ।
सापडलो प्रेमप्रवाहात । इतुकेच त्यांना कळत असे ।। ८० ।।
भक्तिप्रेमप्रवाह प्रबळ । नेइल तिकडे जाणे केवळ ।
मार्ग वाकुडा अथवा सरळ । हेही कळुनी येत नसे ।। ८१ ।।
यास्तव जननीला प्रार्थिती । शिकविणे ते शिकव मजप्रती ।
चालव मजला धरुनी हाती । दावी उचित मार्ग मला ।। ८२ ।।




ऐसी अंत:करणापासुन । बालकाची प्रार्थना ऐकुन ।
करुणामयी करी संरक्षण । पुरवी इच्छा परोपरी ।। ८३ ।।
जी जी वस्तू साधनकाळी । लागे ती ती पुरवी काली ।
योग्य माणसे पाठविली । साह्य बाबांना करावया ।। ८४ ।।
देउनि शुद्ध भक्तिज्ञान । योग्य गुरूंची योजना करुन ।
आपुल्या साधक बाळालागुन । पूर्णतेस नेई जगदंबा ।। ८५ ।।
गीतेत भगवंताचे वचन । करिता माझे अनन्य चिंतन ।
योगक्षेम वाहतो आपण । ते सत्य प्रत्यक्ष साकारले ।। ८६ ।।
साधक जन सांगती समस्त । त्याग करिता ईश्वरार्थ ।
कधिही अभाव नाही भासत । साधकास अवश्य वस्तूंचा ।। ८७ ।।
संशयग्रस्त मानव मनी । श्रद्धा नुपजे या विधानी ।
यास्तव बाबांस हाती धरुनी । लीला करितसे जगदंबा ।। ८८ ।।
शास्त्रविधानांची सत्यता । सांप्रत दाविण्यासाठी जगता ।
रामकृष्णरूपे आता । भगवंत स्वत: अवतरला ।। ८९ ।।
रामकृष्णदेव म्हणती । जेव्हा मानवाच्या चित्ती ।
ईश्वरप्रेमाच्या लाटा उठती । हटविता न येती त्या प्रयत्ने ।। ९० ।।
वेग तयांचा अत्यंत प्रबळ । धारण्या असमर्थ देह स्थूल ।
अशा प्रकारे साधक पुष्कळ । पडती मृत्युमुखामधे ।। ९१ ।।
पूर्ण भक्ती वा पूर्ण ज्ञान । यांचा उद्दाम वेग दारुण ।
अवतारिक करिती सहन । शरिरे टिकतात तयांची ।। ९२ ।।
यास्तव म्हणती तयालागुन । शुद्धसत्त्वविग्रहवान ।
शास्त्रे सांगती रजतमगुण । नसती लेशही त्यांच्यात ।। ९३ ।।
शुद्ध सत्त्वगुण उपादान । तेचि त्यांच्या देहासि कारण ।
सर्व आध्यात्मिक भाव सहन । यास्तव ते करू शकतात ।। ९४ ।।



यापरी करुनही देहधारण । ईश्वरीय भावाच्या वेगे करुन ।
अवतारिकांच्याहि देहालागुन । अत्यंत दारुण कष्ट होती ।। ९५ ।।
तथापि तयांना कालेकरुन । मानसिक वेग होई सहन ।
विकृति लोप पावे पूर्ण । शरिरातुनी मग तयांच्या ।। ९६ ।।
रामकृष्णांच्या शरीरात । भावभक्तिचा वेग अद्‌भुत ।
होउनि विकार झाले उद्‌भुत । साधनेस आरंभ करिताना ।। ९७ ।।
तयांच्या शरिरात विलक्षण । गात्रदाह जाहला उत्पन्न ।
अधिकच झाला वर्धमान । अतिकष्ट होती देहाला ।। ९८ ।।
गात्रदाह होता ठाकुरांला । वाटे रोग कसला जाहला ।
वाढत असह्य होउनि गेला । उपाय थकले सकलांचे ।। ९९ ।।
पुढे ते पंचवटीखाली । बसले असता निवांत स्थळी ।
त्यांच्या शरिरातुनी निघाली । मूर्ती भयंकर काळीकुट्ट ।। १०० ।।
नेत्र तयाचे लालगुंजार । रूप तयाचे अत्यंत उग्र ।
झिंगत झिंगत ये बाहेर । उभा राहिला समोर तो ।। १ ।।
दुसरा भगवे नेसलेला । त्रिशूल धारण जयाने केला ।
सौम्याकृती पुरुष निघाला । मागोमाग पहिल्याच्या ।। २ ।।
तो पहिल्याशी युद्ध खेळला । काळा पुरुष तो ठार जाहला ।
आंगाचा मग दाह निमाला । दग्ध जाहला पापपुरुष ।। ३ ।।
रामकृष्णांची पूजा पाहुन । मथुर अत्यंत खुष होउन ।
राणीस सांगे वर्तमान । बाबांच्या अद्‌भुत पूजनाचे ।। ४ ।।
रासमणीला आनंद जाहला । वाटले थोर पुजारी मिळाला ।
मग तियेने निश्चय केला । पूजन त्यांचे पाहण्याचा ।। ५ ।।
आज स्वत: कालीमंदिरी । रासमणीची आली स्वारी ।
चुकारतट्टही मंडळी सारी । काळजी करिती कामाची ।। ६ ।।





मंदिरातही संसाराचेच चिंतन करणाऱ्या
राणी रासमणीला श्रीरामकृष्ण शिक्षा करतात.



साधनाकाळी श्रीरामकृष्णांना सीतादेवीचं झालेलं दर्शन.

राणी करुनी गंगास्नान । देवालयात प्रवेश करुन ।
जगन्मातेला नमस्कारुन । सन्निध बैसली अंबेच्या ।। ७ ।।
पूजा तेधवा संपलेली । ठाकुर होते उभे जवळी ।
रासमणीने सांगितली । तयांना पदे म्हणावया ।। ८ ।।
रामकृष्ण तेथे बसुन । गाउ लागले तन्मय होउन ।
साधक भक्तांची भक्तिपूर्ण । पदे गाउनी दाखविती ।। ९ ।।
काही पदे गाउनी ठाकुर । गायन बंद करिती सत्वर ।
म्हणती रासमणीला विचार । येथेहि करितेस प्रपंचाचे ।। ११० ।।
ऐसे बोलुनी रासमणीला । दोन चापट्या त्यांनी मारिल्या ।
जणू चुकताच बालकाला । माता प्रेमे शिक्षा करी ।। ११ ।।
नोकर लोक पाहती दुरुन । सर्वत्र गोंधळ गेला उडुन ।
विपरित प्रकार केला म्हणुन । बाबांस धराया धावले ।। १२ ।।
म्हणू लागली चाकरमंडळी । प्रत्यक्ष राणिला चापटी दिधली ।
आताच शंभर वर्षे भरली । वेड्यापिराची निश्चित हे ।। १३ ।।
ठाकुर आणि रासमणी । दोघे असती मग्न चिंतनी ।
गोंधळ उडाला त्या ठिकाणी । तरिही लक्ष नसे त्यांचे ।। १४ ।।
आश्चर्य करितसे रासमणी । काय चालिले माझिया मनी ।
ओळखिले भट्टाचार्यांनी । नवल केवढे असे हे ।। १५ ।।
गडबड भोवती वाढली । रासमणी मग सावध झाली ।
वाटले आचार्यांला मंडळी । करितिल ताडण निश्चितची ।। १६ ।।
आज्ञा करी ती लवलाही । भट्टाचार्यांचा दोष नाही ।
त्रास तयांना तुम्ही कोणीही । करुलाही आता देऊ नका ।। १७ ।।
वृत्तान्त कळता मथुरला । राणिचा हुकुम कायम केला ।
देवळातिल काही मंडळीला । दु:ख जाहले परिसून ।। १८ ।।



मग ते विचार करिती पोक्त । थोरामोठ्यांची ही मात ।
आपणास कशाला पंचाइत । म्हणुनी स्वस्थ ते राहिले ।। ११ ।।
जरी बाबांचा भक्त मथुर । मनी तयाच्या असे आदर ।
ऐकुनि राणीस दिधला मार । शंकित झाले मन त्याचे ।। १२० ।।
कितिही झाले तरी सामान्य । मथुर विषयबुद्धिसंपन्न ।
आध्यात्मिक अवस्था महान । ओळखू न शके बाबांची ।। २१ ।।
वाटु लागले त्याच्या मनाला । ठाकुरांस वायुरोग जाहला ।
आणवुनी प्रसिद्ध वैद्याला । सुरू केला उपचार ।। २२ ।।
जगदंबेच्या चिंतनी मग्न । सर्वकाळ राहिल्यापासुन ।
रामकृष्णदेवांचे मन । भरिले अपार आनंदे ।। २३ ।।
कर्मे नित्यनैमित्तिक । पूजाविधिही झाले अशक्य ।
उन्नति होता आध्यात्मिक । वैधी कर्मे गळतात ।। २४ ।।
रामकृष्णदेव अत्यंत । समपर्क देती दृष्टान्त ।
सांगती सून जोपर्यंत । गर्भवती राहात नसे ।। २५ ।।
तोवर कामे करावयाची । सुनेने सर्व प्रकाराची ।
गर्भ तिजला राहताची । तियेची कामे कमी होती ।। २६ ।।
प्रसूतीचे दिवस येती । गर्भ दुखावेल वाटे भीती ।
सासुबाई तेव्हा तिजप्रती । काहीच कामे सांगेना ।। २७ ।।
प्रसुतीनंतर तिजप्रत । बाळाचीच शुश्रुषा प्राप्त ।
रामकृष्णांच्या बाबतीत । घडला प्रकार त्यापरी ।। २८ ।।
पूजा करीत असता तयांना । काळाचेही भान असेना ।
करिती जगदंबेच्या चिंतना । तन्मय होउनी सर्वकाळ ।। २९ ।।
जेधवा जैसे इच्छी आई । तेधवा तैसीच सेवा होई ।
कधी तर पूजनापूर्वीही । नैवेद्य अर्पिती मातेला ।। १३० ।।



साहजिक सामान्य जनांला । विपरीत प्रकार तो वाटला ।
विधिपूर्वक पूजनाला । ताळमेळ त्याचा बसेना ।। ३१ ।।
सद्गुरूच्या साह्यावाचुन । बाबांस झाले प्रथम दर्शन ।
आंतरिक तळमळ झाली कारण । मार्गदर्शन करावया ।। ३२ ।।
स्पष्ट दिसतसे यावरून । बाह्य साह्य घेतल्यावाचुन ।
घेता येतसे ईश्वरदर्शन । तळमळीच्या बळावर ।। ३३ ।।
परि तळमळीच्या साह्याने । जर ईश्वरप्राप्ती करणे ।
अंत:करणात साधकाकारणे । लागे प्रचंड व्याकुळता ।। ३४ ।।
रामकृष्ण असती सांगत । स्त्रीपुरुष विरह होता प्राप्त ।
अश्रुधारा गाळती समस्त । जन आपुल्या डोळ्यांतून ।। ३५ ।।
परी दर्शन नाही झाले । म्हणुनी नयनात पाणी आले ।
ऐसे न होता म्हणती सगळे । दर्शन देइना परमेश ।। ३६ ।।
व्हावे भगवंताचे दर्शन । यास्तव अत्यंत व्याकुळ होउन ।
थोडे तरी स्वनयनांमधुन । पाणी येउद्या बाहेर ।। ३७ ।।
मग पाहू कैसा परमेश्वर । दर्शन नाही तो देणार ।
स्वानुभवाने वारंवार । सांगती ठाकुर भक्तजना ।। ३८ ।।
अंत:करणात व्याकुळता । प्रचंड तीव्रतेने लागता ।
तत्काळ देई जगन्माता । दर्शन आपुल्या भक्ताला ।। ३९ ।।
रामकृष्णदेवांलागुन । केवढी तळमळ विलक्षण ।
आराम निद्रा भोजन पान । गेले होउनी अनियमित ।। १४० ।।
लक्ष नव्हते जिवाकडेस । किंमत काय शरिरस्वास्थ्यास ।
ध्यानी मनी वसे जगदीश । त्याविण सुचेना अन्य काही ।। ४१ ।।
डोक्यावरील वाढले केस । धूळमाती लागली त्यास ।
बनू लागल्या सावकाश । जटा सहजच केसांच्या ।। ४२ ।।



ध्यान करावयाला बसता । इतकी होतसे एकाग्रता ।
देह काष्ठवत पावे स्थिरता । पक्षी बसती डोक्यावर ।। ४३ ।।
केस चोचीने विसकटून । शोधिती भक्षावयाला कण ।
करिती प्रार्थना ध्यान भजन । आत्मनिवेदन सर्वदा ।। ४४ ।।
दिवस उगवला मावळला । भान राहिना ठाकुरांला ।
सायान्ही आरतिनादाला । ऐकुनी वेदना होती बहू ।। ४५ ।।
वाटे दिवस फुकट गेला । देइना देवी दर्शनाला ।
पीळ पडतसे हृदयाला । प्राणहि व्याकुळ होत असे ।। ४६ ।।
सदा मन अस्वस्थ असावे । गडबड भुईवर लोळावे ।
मोठमोठ्याने ओरडावे । रडावे दर्शन व्हावयाला ।। ४७ ।।
तो प्रचंड आक्रोश ऐकुन । लोक जमावे चोहीकडुन ।
सकळ म्हणती बिचाऱ्यालागुन । वेदना होती उदरात ।। ४८ ।।
विरहे व्याकुळ होई मन । घेउनी गडबडा लोळण ।
मातीमध्ये तोंड खुपसुन । ओक्साबोक्सी रडती ते ।। ४९ ।।
अत्यंत मोठा आक्रोश करुन । एक करावे पाताळ गगन ।
रक्तबंबाळ होई वदन । लक्ष कोण देइल त्याकडे ।। १५० ।।
न कळे पडता पाण्यात । अथवा आपटता चिखलात ।
किंवा भाजता विस्तवात । भानहि नसावे तयाचे ।। ५१ ।।
मग बाबांस अल्पकाळात । जगन्मातेचे अत्यद्‌भुत ।
दर्शन होऊनिया प्राप्त । आनंदसागर भरे मनी ।। ५२ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५३ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा दहावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय अकरावा

रामकृष्णांची कृपादृष्टी। ज्ञानामृताची करी वृष्टी।
निववी सकळ तप्त सृष्टी। वंदितो तयांचे पदपद्म।। १ ।।

जगदंबेच्या दर्शनानंतर। आपली कुळदेवता रघुवीर।
त्यांच्या दर्शनासाठी फार। इच्छा लागली बाबांना।। २ ।।

हनुमानाप्रमाणे भक्ती असेल। तरीच श्रीराम भेटेल।
यास्तव आपणा अंजनीबाळ। मानुनी केली दास्यभक्ती।। ३ ।।

स्वत:स मानिता हनुमान। तन्मयता त्यासि पावले पूर्ण।
वेगळे अस्तित्व विसरुन। गेले आपुले सर्वथैव।। ४ ।।

आहार निद्रा कर्मे समस्त। हनुमंताप्रमाणे तयांची होत।
मुद्दाम तैसे नव्हते करीत। आपोआप ते घडत असे।। ५ ।।

शेपटासारखा आकार करुन। कमरेस गुंडाळावे वसन।
न खावे फलमूलावाचुन। चालावे उड्या मारितची।। ६ ।।

झाडावर पुष्कळ वेळ बसावे। रघुवीर नाम मुखे जपावे।
वानराप्रमाणे चंचल दिसावे। नेत्र तयांचे त्या काळी।। ७ ।।

टरफले काढण्या फळे खाताना। प्रवृत्तिच तयांची होईना।
नवल तयांच्या पाठिचा कणा। वाढला होता इंचभर।। ८ ।।

दास्यभावाने करिता भक्ती। जाहली अद्‌भुत दर्शन प्राप्ती।
प्रकटली अनुपम स्त्रीमूर्ती। पंचवटीत बसले असताना।। ९ ।।

तेव्हा करीत नव्हते ध्यान। अवस्था असता साधारण।
ज्योतिर्मयी स्त्री प्रकटून। केले स्थान ते प्रकाशित।। १० ।।



झाडेझुडुपे दिसत होती । प्रवाह भूमी सकळ दिसती ।
सर्व पदार्थ आणि ती मूर्ती । दिसती एकाच समयाला ।। ११ ।।
ती स्त्री केवळ मानवी भासे । त्रिनयनादी लक्षण नसे ।
तिजसम अन्यत्र कोठे न दिसे । प्रेम दुःख दया शांती ।। १२ ।।
प्रसन्न दृष्टिने बाबांस पाहत । हळुहळु पुढे ती असे येत ।
ठाकुर होउनी आश्चर्यचकित । म्हणती कोण असावी ही ।। १३ ।।
इतुक्यात भला मोठा वानर । लोळला तियेच्या चरणांवर ।
बाबास कळुनी आले सत्वर । जगज्जननी जानकी ही ।। १४ ।।
जन्मदुःखिनी जनकदुहिता । राममयजीविता सीता ।
ऐसी मनाची खात्री पटता । घालु पाहती लोटांगण ।। १५ ।।
इतुक्यात ती होउनी चकित । प्रवेशली तयांच्या शरिरात ।
होउनि आनंदविस्मय भरित । संज्ञा लोपली बाबांची ।। १६ ।।
करीत नसता ध्यानचिंतन । अवस्था असता साधारण ।
यापरी झाले नव्हते दर्शन । प्रथमच झाले जानकीचे ।। १७ ।।
पुढे सांगती ते हासुन । जन्मदुःखिनीचे झाले दर्शन ।
म्हणुनि वाटते जन्मापासुन । तिजसम दुःखे भोगितसे ।। १८ ।।
पंचवटीजवळची जमिन । नीट केली भर घालुन ।
तयामुळे पूर्वी करिती ध्यान । आवळी ती नष्ट जाहली ।। १९ ।।
यास्तव श्रीरामकृष्णांनी । अश्वत्थवृक्ष स्वतः लावुनी ।
लावुनी घेतले हृदयकडुनी । बेल वट आवळी अशोक ।। २० ।।
लावली पंचवटीच्या भोवती । तुळस अपराजितांची रोपटी ।
रोपे घनदाट झाली वाढती । शोभा आली पंचवटीला ।। २१ ।।
परंतु भोवती नव्हते कुंपण । गुरे रोपे टाकिती मोडुन ।
याला काय करावे म्हणुन । काळजी करिती श्रीठाकुर ।। २२ ।।



तव गंगेच्या प्रवाहातुन । काट्याकुट्यांचा ढीग महान ।
जात असताना वाहून । रामकृष्णांनी पाहिला ।। २३ ।।

भर्ताहरी नामक माळ्याला । तत्काळ तयांनी बोलाविला ।
तयाने ओढुनी तो काढिला । ढीग नदीच्या तीरावर ।। २४ ।।

ढीग जो सोडुनी पाहतात । तव अवश्य कुंपण करण्याप्रत ।
सकळ सामग्री होती त्यात । दोरी कुऱ्हाड इत्यादी ।। २५ ।।

दोघेही झाले आश्चर्यचकित । आनंद झाला त्यांच्या मनात ।
म्हणती रोपांच्या रक्षणार्थ । जगदंबेने पाठविले ।। २६ ।।

भर्ताहरिने कुंपण केले । रोपट्यांचे रक्षण जाहले ।
रामकृष्ण निश्चिंत झाले । निबिड वाढली रोपटी ।। २७ ।।

मग बाबांनी मथुरकडुन । निरनिराळ्या क्षेत्रांवरुन ।
पवित्र मृत्तिका आणवून । पंचवटीमधे पसरविली ।। २८ ।।

रासमणीने दक्षिणेश्वरी । मंदिर बांधले मोठे भारी ।
कीर्ती पसरली दिगंतरी । माहिती कळली साधुसंता ।। २९ ।।

राहण्याची सोय होई । भोजनव्यवस्था केली जाई ।
स्नान कराया गंगामाई । दिशा फिराया रान असे ।। ३० ।।

म्हणुनी तीर्थक्षेत्रे करित । साधु बैरागी तेथे येत ।
राहुनी काही दिनपर्यंत । जाती तेथुनी दुसरीकडे ।। ३१ ।।

येणाऱ्या त्या मंडळींत । सर्व दर्जाचे असती संत ।
साधक सिद्धपुरुष महंत । भक्त जपी तपी संन्यासी ।। ३२ ।।

हठयोगी आला त्या ठायास । त्याच्याजवळ करुनि अभ्यास ।
जाणुनि घेतले सर्व क्रियांस । अनुभव घेतला बाबांनी ।। ३३ ।।

प्रत्यक्ष अनुभव स्वतः घेउन । म्हणती हठयोगाने साधन ।
असे या काळी अयोग्य जाण । अल्पायु जन कलीयुगी ।। ३४ ।।



हठाने देह दृढ करून । करणे राजयोगाचे साधन ।
करणे ईश्वरभक्ति ज्ञान । इतुका वेळ नसे येथे ।। ३५ ।।
नियमात घडता थोडिही चूक । उद्भवतात रोग अनेक ।
मृत्युमुखीही पडे साधक । हठयोगसाधन कठिण असे ।। ३६ ।।
आणिक प्राणायाम करुन । उद्देश निरोधावा प्राण ।
करुनी ईश्वराचे ध्यान । प्राण मन निरुद्ध होतात ।। ३७ ।।
कलीत अल्प आयुष्यमान । अल्प शक्ती जीव म्हणुन ।
भगवंतांनी कृपा करुन । ईश्वरलाभ सुलभ केला ।। ३८ ।।
स्त्रीपुत्रांच्या वियोगे प्राण । जैसा राहे व्याकुळ होउन ।
दाही दिशा वाटती शून्य । अंत:करण तळमळतसे ।। ३९ ।।
तशीच प्रचंड व्याकुळता । ईश्वरलाभासाठी करिता ।
केवळ साठ घटिका टिकविता । ईश्वरदर्शन होत असे ।। ४० ।।
कालिदेवीचे नित्य पूजन । होणे अशक्य बाबांकडुन ।
मथुरनाथे जाणिले म्हणुन । वेगळी व्यवस्था करुनी दिली ।। ४१ ।।
ठाकुरांच्या चुलत भावाला । नेमिले देवीच्या पूजकपदाला ।
रामतारक नाम तयाला । ठाकुर म्हणती हलधारी ।। ४२ ।।
हलधारी चांगला विद्वान । साधक अत्यंत निष्ठावान ।
भागवत अध्यात्मरामायण । सदैव पठण करित असे ।। ४३ ।।
कालीपेक्षा विष्णूवर । तयाची भक्ती असे फार ।
तथापि नव्हता अनादर । तयाच्या अंतरी देवीचा ।। ४४ ।।
जगदंबेच्या पूजकपदाला । हलधारी स्वीकारता झाला ।
परी विनविले मथुरनाथाला । शिधाच मजला मिळावा ।। ४५ ।।
मथुर वदे हरकत घेउन । गदाधर तुझाच भाऊ असुन ।
प्रसाद घेतात तव आप्तजन । तू का करितोस स्वहस्ते ।। ४६ ।।



हलधारी देई प्रत्युत्तर । मम बंधू जरी गदाधर ।
आध्यात्मिक अवस्था थोर । अत्यंत उच्च असे त्याची ।। ४७ ।।
यास्तव तयाने करिता काही । दोषास्पद ते होणार नाही ।
तथापि मजला दोषार्ह होई । होइल निष्ठाभंग माझा ।। ४८ ।।
ऐसे तयाचे ऐकुनी उत्तर । अत्यंत संतुष्ट झाला मथुर ।
आज्ञा देता झाला सत्वर । स्वहस्ते करुनी खाण्याची ।। ४९ ।।
तेव्हापासुनी हलधारी । स्वहस्तांनी पाक करी ।
पंचवटीत भोजन करी । निष्ठा भारी असे त्याची ।। ५० ।।
हलधारीचा देवीप्रत । जरी अनादर नव्हता मनात ।
पशुबळी द्यावयाची रीत । तथापि नावडे तयाला ।। ५१ ।।
दक्षिणेश्वराला पर्वकाळी । देवीच्या पूजनाच्या वेळी ।
चाल होती देणे बळी । त्या वेळी तो खिन्न असे ।। ५२ ।।
मग त्या दिवशी आनंदाने । न जमे तयाला पूजा करणे ।
राहत असे तो उदासवाणे । म्हणुनि कोपली जगदंबा ।। ५३ ।।
करीत असता संध्यावंदन । हलधारीपुढे उभी राहुन ।
अत्युग्र रूप धारण करुन । बोलली होई तू चालता ।। ५४ ।।
मनापासुनी न करिसी पूजन । घेणार नाही तुजकडून ।
या अपराधे तव संतान । लवकर पंचत्व पावेल ।। ५५ ।।
नंतर थोड्याच दिवसांत । तयाचा पुत्र झाला मृत ।
ठाकुरांस ते सांगुनी वृत्त । सोडिले पूजकपद त्याने ।। ५६ ।।
हृदयराम तेव्हापासुन । करू लागला कालीपूजन ।
राधा गोविंदजीलागुन । पुजू लागला हलधारी ।। ५७ ।।
हलधारी अत्यंत निष्ठावान । चांगला वैष्णव विद्वान ।
तंत्रोक्त वामाचारसाधन । तथापि तो करित असे ।। ५८ ।।



गोष्ट लोकात कळल्यावर । कुजबुज करू लागले नर ।
बोलावयाची त्याच्या समोर । हिंमत कोणीही करिना ।। ५९ ।।
हलधारी असे वाक्सिद्ध । ही गोष्ट जनात होती प्रसिद्ध ।
शाप देइल होता क्रुद्ध । जनांस भीती वाटतसे ।। ६० ।।
स्पष्टवक्ते रामकृष्ण । बोलले हलधारीलागुन ।
करिसी वामाचारसाधन । म्हणुनी जन तुज हासती ।। ६१ ।।
हलधारी संप्तप्त होउन । म्हणाला धाकटा भाऊ असुन ।
करितोस माझा अपमान । रक्त मुखातुन पडेल तुझ्या ।। ६२ ।।
रामकृष्ण तयाला म्हणती । अवज्ञा करावयाची नव्हती ।
जनापवाद कळावा तुजप्रती । म्हणुनी सहज हे सांगितले ।। ६३ ।।
पुष्कळ पाहिले समजावुन । हलधारी न होई प्रसन्न ।
एके रात्रीस मुखातुन । रक्त निघाले अकस्मात ।। ६४ ।।
रक्त असे ते कृष्णवर्ण । अविरत येई तोंडातुन ।
लोंबे दातास चिकटून । जणू वडाच्या पारंब्या ।। ६५ ।।
तोंडामधे बोळा घालुन । थांबविण्याचा केला प्रयत्न ।
निष्फळ झाले सकळ यत्न । जीवितास धोका उद्भवला ।। ६६ ।।
वृत्त कळताच चोहीकडुन । धावुन आले बहुत जन ।
हलधारी तेव्हा सायंपूजन । करीत होता मंदिरात ।। ६७ ।।
घाबरला तो वृत्त ऐकुन । तेथे त्वरित आला धावुन ।
त्याचेहि नेत्र आले भरुन । अवस्था पाहुनी बाबांची ।। ६८ ।।
बाबा वदले तयालागुन । दादा मजला शाप देउन ।
केवढी दशा केलीस कठिण । तोही ऐकुनी कळवळला ।। ६९ ।।
त्या दिवशी तेथे चांगला । एक योगी होता आला ।
परीक्षा करुनी बाबांस वदला । भीतीचे कारण नसे काही ।। ७० ।।



बाहेर येउनी पडिले रुधिर । ही तर गोष्ट छान फार ।
योगसाधनेमुळे वक्त्र । मोकळे झाले सुषुम्नेचे ।। ७१ ।।
त्या योगाने तेथील रक्त । चालले असता मस्तकात ।
मध्येच मुखावाटे समस्त । निघाले चांगले हे झाले ।। ७२ ।।
जाते जरी ते मस्तकात । तर जडसमाधि होउनी प्राप्त ।
कधीही नव्हती ती भंगत । उपाय नसे ती उतरावया ।। ७३ ।।
मला वाटते तुझ्याकडुन । जगदंबेचे कार्य महान ।
व्हायचे म्हणुनी संकटातुन । तुजला तियेने वाचविले ।। ७४ ।।
साधुचे बोलणे ऐकल्यावर । ठाकुरांना वाटला धीर ।
येणेपरी तो झाला वर । शाप हलधारीदादाचा ।। ७५ ।।
हलधारी होता विद्वान । अवगत अध्यात्मरामायण ।
करितसे वेदान्त चर्चा गहन । परि नेणे अधिकार बाबांचा ।। ७६ ।।
हलधारी अत्यंत निष्ठावान । सदाचारसंपन्न ब्राह्मण ।
भावावेशात बाबांचे वसन । पडे गळुन नावडे तया ।। ७७ ।।
आपुला भाऊ वाटे तयाला । स्वेच्छाचारी असे झाला ।
म्हणुनी म्हणे हृदयरामाला । बोध तयाला करी तू ।। ७८ ।।
हा टाकतो जानवे काढुन । सोडतो नेसलेले वसन ।
अत्यंत अयोग्य गोष्ट ही जाण । विपरीत वर्तन याचे असे ।। ७९ ।।
अनेक जन्मे पुण्य करुन । जिवास मिळतसे ब्राह्मण्य ।
दुर्लभ ब्राह्मण जन्म असुन । द्यावा टाकुन यास वाटे ।। ८० ।।
करावे स्वच्छंद आचरण । असा याचा अधिकार कोण ।
तुझेच घेइल हा ऐकुन । समजावुनी सांग त्याला ।। ८१ ।।
करणार नाही चाळा भलता । याकडे लक्ष देई आता ।
उपयोग होईल यास बांधता । तर त्वा तेही करावे ।। ८२ ।।



दादास वाटे शास्त्राविरुद्ध । याचे वर्तन असे अशुद्ध ।
तयास करावयाला रोध । उपाय शोधिला पाहिजे ।। ८३ ।।
कधी कधी येई त्याच्या मनात । रामकृष्णांची अवस्था अद्‌भुत ।
ईश्वरावेश असावा खचित । दुःसाध्य अवस्था असावी ।। ८४ ।।
रामकृष्णांचे तन्मय होउन । प्रेमाश्रुपूर्ण नयन पाहुन ।
उल्हास भगवद्‌गुण ऐकुन । पाहुनी विस्मय वाटे तया ।। ८५ ।।
हृदयरामाची निष्ठा पाहुन । म्हणे तयाला चकित होउन ।
गदाधराविषयी तुजलागुन । साक्षात्कार झाला असावा ।। ८६ ।।
नाहीतर तू मनापासुन । न करितास सेवा अशी अनन्य ।
यापरी हलधारीचे मन । सदैव द्विधा होत असे ।। ८७ ।।
रामकृष्ण काली मंदिरात । देवीची पूजा असता करित ।
तन्मयभाव पाहुनी विस्मित । होउनी म्हणे हलधारी ।। ८८ ।।
गदाधर आता तुजला । पूर्णपणे मी ओळखला ।
ठाकुर विनोदे म्हणती तयाला । गोंधळ होईल पुनरपी ।। ८९ ।।
तयाने म्हणावे ठाकुरांस । आता फसणार नाही खास ।
तुझ्यात ईश्वरी आवेश । असे कळले मजलागी ।। ९० ।।
तथापि पूजा आटोपुन । चिमुटभर तपकिर घेउन ।
हलधारी अध्यात्मरामायण । गीता भागवत सांगतसे ।। ९१ ।।
विद्वत्तेच्या अभिमानात । जाई बदलुनी अजिबात ।
वाटे आपुल्याएवढा पंडित । जगतात दुसरा कोणी नसे ।। ९२ ।।
श्रीरामकृष्ण तेथे जाती । पुराण तयाचे परिसती ।
मग आपुला अनुभव सांगती । हलधारीला कधी कधी ।। ९३ ।।
दादा वाचसी तू शास्त्रात । त्या त्या अवस्थांचा समस्त ।
अनुभव घेतला मी साक्षात । अवगत मजला सर्व असे ।। ९४ ।।



परि हलधारी ऐकुनी बोला । म्हणे आहा रे मूर्खा तुजला ।
शास्त्रातिल या अवस्था सकला । कैच्या समजती यथार्थ ।। ९५ ।।
रामकृष्ण म्हणती तयाप्रत । वसतसे जो या शरीरात ।
तोच मजला अवस्था समस्त । समजावुनी सांगतसे ।। ९६ ।।
मघाच तर तू म्हणालास । माझ्यात ईश्वरी आवेश ।
इतुक्यात ते तू विसरलास । जे वदलास ते सर्वही ।। ९७ ।।
हलधारी म्हणे रागावुन । जा जा मूर्ख अससी महान ।
कलियुगात एका कल्किवाचुन । दुसरा अवतार कोणता ।। ९८ ।।
उन्माद जाहला तुजलागुन । भलताच समज गेला होउन ।
ठाकुर त्यास म्हणती हासुन । तू तर मघाच वदलास ।। ९९ ।।
गदाधरा मी जाणिले तुजला । फसणार नाही काही केल्या ।
परि हलधारी त्या वेळेला । काहीही केल्या मानेना ।। १०० ।।
ऐसा नव्हे एक दोनदा । प्रकार घडत असे सदा ।
त्यांच्या अवस्थेविषयी द्विधा । मन होतसे हलधारीचे ।। १ ।।
यावरुनी हे कळे निश्चित । ग्रंथ वाचुनी होवो पंडित ।
परि अनुभूती न होता प्राप्त । न लोपती शंका मनाच्या ।। २ ।।
एकदा वृक्षशाखेवरुन । लघुशंका करिताना पाहुन ।
म्हणे गदाधरालागुन । ब्रह्मसमंध लागला असे ।। ३ ।।
देवीची अवकृपा होउन । पुत्र तयाचा पावला निधन ।
भावना झाली तेव्हापासुन । तमोगुणमयी काली असे ।। ४ ।।
मग म्हणे रामकृष्णांप्रती । उपासून अशी तामसी मूर्ती ।
तुझी आध्यात्मिक उन्नती । कधीतरी होऊ शकेल का ।। ५ ।।
तामसी देवीची उपासना । कशाला करितोस आराधना ।
कालीच्या निंदेने रामकृष्णांना । अतिशय वाईट वाटले ।। ६ ।।



रडत जाउनी मंदिरात । ठाकुर म्हणाले कालीप्रत ।
हलधारी विद्वान पंडित । तमोगुणी म्हणतो तुजलागी ।। ७ ।।
जगन्माते सांग मजसी । खरेच तू अससी का तशी ।
ऐकुनी आईने बालकासी । यथार्थ तत्त्व समजाविले ।। ८ ।।
आनंदित होउनी रामकृष्ण । हलधारीकडे आले धावुन ।
खांद्यावर तयाच्या चढुन । सांगु लागले तयाप्रती ।। ९ ।।
म्हणतोस तामसी माझी आई । ती तर आहे सर्वकाही ।
माता असुनही त्रिगुणमयी । शुद्धसत्त्वगुणी ती आहे ।। ११० ।।
हलधारी करित होता पूजन । भावाविष्ट होते रामकृष्ण ।
दिव्य स्पर्श तयांचा होउन । उघडले डोळे दादाचे ।। ११ ।।
तयाला पटला तो सिद्धांत । पाहिला त्याने रामकृष्णांत ।
आविर्भाव देविचा साक्षात । बाबांस वाहिली गंधफुले ।। १२ ।।
पूजित असता तो बाबांला । हृदयराम सहज आला ।
पाहुनी आश्चर्यचकित झाला । हलधारीला वदला तो ।। १३ ।।
मामा तुम्ही असता म्हणत । गदाधराला लागले भूत ।
मग का हो तयांना सांप्रत । पूजाद्रव्य समर्पिले ।। १४ ।।
पिशाच्च झडपे तयांलागुन । काय उपयोग पूजा करुन ।
हलधारी बोलला तुजलागुन । हृदु काय सांगू आता ।। १५ ।।
कालीमंदिरातुनी येउन । माझ्या देहास स्पर्श करुन ।
करुनी टाकिली विलक्षण । तयाने माझी अवस्था ।। १६ ।।
सर्व मग गेलो विसरुन । ईश्वरी आवेश आला दिसुन ।
गंध फुले करुनी अर्पण । पूजा केली मी त्याची ।। १७ ।।
जेव्हा देवीच्या मंदिरात । जावे लागतसे मजप्रत ।
अशीच विलक्षण असे करित । माझी अवस्था गदाधर ।। १८ ।।



वाटतो मोठाच चमत्कार । न उलगडे कोडे अणुमात्र ।
ईश्वरी आवेश परम पवित्र । प्रत्यक्ष वाच्यात दिसत असे ।। १९ ।।
असा अनुभव येउनी पूर्ण । जेव्हा बसतसे तपकिर घेउन ।
सांगावयालागी पुराण । गर्वाने येतसे मूळपदा ।। १२० ।।
कामकांचनी असता मन । तरी शौचाचार शास्त्रज्ञान ।
यांनी होइना कार्यसाधन । होइना धारणा तत्त्वाची ।। २१ ।।
बाबांनी आदरे एक दिन । भिकारी नारायण समजून ।
तयांचे उच्छिष्ट केले भक्षण । प्रसाद मानुनी देवाचा ।। २२ ।।
हलधारी ते कृत्य पाहुन । बाबांस बोलला रागावुन ।
बाटलास मूर्खा तू खाउन । उच्छिष्ट भलत्या लोकांचे ।। २३ ।।
मुली झाल्या म्हणजे तुजसी । पाहीन कैसा लग्ने करिसी ।
ऐकुनी तयाच्या वचनासी । प्रत्युत्तर देती श्रीठाकुर ।। २४ ।।
शास्त्रे जगन्मिथ्या म्हणती । ब्रह्मदृष्टी असावी भूती ।
ऐसे जाणुनही मजप्रती । होतील काय मुलेबाळे ।। २५ ।।
धिक्कार असो तव शास्त्रज्ञाना । तुझ्या वेदान्त ज्ञानाभिमाना ।
वेदशास्त्रे पुराणे नाना । वाचुनी कळेना तुज काही ।। २६ ।।
तयाच्या पांडित्याने फसुन । बालकस्वभाव रामकृष्ण ।
किंकर्तव्यमूढ होउन । कधी अंबेला विचारिती ।। २७ ।।
एकदा म्हणाला हलधारी । सांगितले आहे शास्त्रांतरी ।
भावाभावाच्या पैलीवरी । ईश्वर आहे म्हणूनिया ।। २८ ।।
तुला जी भावावस्थेत । ईश्वरीय रूपे दिसतात ।
ती आहेत मिथ्या समस्त । भावातीत परमेश्वर ।। २९ ।।
हलधारीचे ऐकुनी वचन । गोंधळुनी गेले रामकृष्ण ।
म्हणती भावात मजलागुन । मिथ्या भास झाला का ।। १३० ।।



तर मग आईने फसविले । वाटुनी मन व्याकुळ झाले ।
रडत रडत राउळी गेले । म्हणू लागले अंबेसी ।। ३१ ।।

निरक्षर मजला पाहुन । फसविसी का गे मूर्ख म्हणुन ।
काही केल्या त्यांचे रुदन । नव्हते थांबत तेधवा ।। ३२ ।।

इतुक्यात तेथे जमिनीतुनी । धुराचा लोट ये उसळुनी ।
तयाने ते सर्व स्थळ व्यापुनी । टाकिले एका निमिषात ।। ३३ ।।

त्या धुरात गौरवर्ण । दिसले अत्यंत सुंदर वदन ।
रामकृष्णांस टक लावुन । पाहती झाली ती मूर्ती ।। ३४ ।।

गंभीर स्वराने त्या काळी । भावमुखी तू राहा वदली ।
त्रिवार उच्चारुनी तत्काळी । धुरात मिळाली पुनरपी ।। ३५ ।।

मग धूरही क्षणार्धात । नाहिसा होउनी गेला समस्त ।
रामकृष्णांचे चित्त शांत । जाहले त्यामुळे तेधवा ।। ३६ ।।

दर्शनाची तळमळ लागुन । होतसे व्याकुळ अंत:करण ।
म्हणुनी बाबांचे आचरण । बेफाम होऊ लागले ।। ३७ ।।

ऐसे विचित्र असाधारण । रामकृष्णांचे पाहुनी वर्तन ।
म्हणू लागले सामान्य जन । तयांना उन्माद जाहला ।। ३८ ।।

परी तो नसेचि उन्माद । नि:संशय तो दिव्योन्माद ।
विषयासक्त जन मतिमंद । केवी जाणती तयांना ।। ३९ ।।

ईश्वर दर्शनाची चिंता । प्रचंड लागली व्याकुळता ।
हृदयामधे झाला पेटता । धगधगीत विरहाग्नी ।। १४० ।।

सभ्यपणा जो साधारणात । कैसा राहिल आचरणात ।
लौकिक शिष्टाचार समस्त । कोणी मग तेथे पाळावा ।। ४१ ।।

उच्च अवस्था न जाणता । अज्ञ वदती उन्मादावस्था ।
कैसा अज्ञजनांच्या चित्ता । दिव्योन्माद त्यांचा कळावा ।। ४२ ।।



कोणी म्हणती आंगरोग । वैद्याकडे न्यावे सवेग ।
परीक्षा चांगली करवुनी मग । करावी योजना औषधाची ।। ४३ ।।
कोणी म्हणती कर्मभोग । सकळांस भोगणे आहे भाग ।
कोणी म्हणती मांत्रिक सवेग । बोलावुनी करा उपचार ।। ४४ ।।
उपाय जनांनी जे सुचविले । ठाकुरांनी करू दिले ।
उपचार जरी बहुत केले । उपयोग तथापी होईना ।। ४५ ।।
कोणी म्हणती कामारपुकुरी । आईच्याकडे न्यावे सत्वरी ।
हवा पालट केल्यावरी । ठीक होइल त्यांची प्रकृती ।। ४६ ।।
ऐसे अनेक तर्क करिती । आपुली बुद्धी चालविती ।
तरी तयांची सत्य परिस्थिती । काय जाणतील संसारी ।। ४७ ।।
जेथे होतसे भजनकीर्तन । जेथे होतसे कथापुराण ।
ठाकुर त्या स्थळी जाउन । भक्तजनांत मिसळती ।। ४८ ।।
नावडे विषयी जनांची संगती । सांसारिक कथा नावडती ।
बाह्य विषयात नसे प्रीती । चिंतन चित्तात ईश्वराचे ।। ४९ ।।
जरी अज्ञ जन नव्हते जाणत । जाणती ज्ञानी योगी भक्त ।
दिव्योन्माद झाला बाबांप्रत । महापुरुष मानती तयांना ।। १५० ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५१ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा अकरावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय बारावा

श्रीरामकृष्ण गाता नाम । मन होई निर्मळ निष्काम ।
अंत:करण पवित्र परम । कृतार्थ होतसे नरदेह ।। १ ।।

घालवायला कांचनासक्ती । अपूर्व साधन बाबा करिती ।
एका हातात घेती माती । नाणी ठेविती दुसऱ्या करी ।। २ ।।

गंगाकिनारी जाउनी । म्हणती याला म्हणतात नाणी ।
ऐहिक सुखे याजपासुनी । प्राप्त होऊ शकतात ।। ३ ।।

मिळतात याने गाडीघोडे । नोकरचाकर किमती कपडे ।
मिष्टान्न जे जे आपणा आवडे । ते ते याने मिळत असे ।। ४ ।।

परोपकार पैशाने होती । विहिरी तलाव खोदता येती ।
धर्मशाळेच्या इमारती । बांधता येती दवाखाने ।। ५ ।।

परंतु याच्या देवघेविने । जनात उत्पन्न होती भांडणे ।
रक्षावा लागतो प्रयत्नाने । दु:ख होतसे हारपता ।। ६ ।।

जवळ असता, अभिमान । मनामाजि होई उत्पन्न ।
वाटे थोर मी श्रीमान । इतर जन तुच्छ वाटती ।। ७ ।।

सच्चिदानंदाचा लाभ जाण । होउ शकेना यापासुन ।
सत्यलाभात याची अडचण । म्हणुनी त्याज्य असे हा ।। ८ ।।

ईश्वरलाभाच्या दृष्टीतुन । सोने माती असती समान ।
मग सोन्याला माती म्हणुन । सोने म्हणती मृत्तिकेला ।। ९ ।।

माती पैसा पैसा माती । ऐसे पुष्कळ वेळा म्हणती ।
दोन्ही वस्तू एकत्र करिती । फेकती मग त्या गंगाजळी ।। १० ।।



ऐसे साधन केल्यावर । त्यांनी कांचनासक्तीवर ।
मिळविला विजय एवढा थोर । अनुपम झाला जगामाजी ।। ११ ।।
अलोट संपत्ती आणुन । अर्पितो म्हणती धनवान ।
तथापि तयाते धिक्कारुन । अव्हेर करिती द्रव्याचा ।। १२ ।।
बाबांच्या नावाने ब्यांकेत । मथुर पैसा ठेवू इच्छित ।
बाबा म्हणती विषयासक्त । करितोस काय मजलागी ।। १३ ।।
मनाने कांचन त्याग केला । वळण ते लागले देहाला ।
स्पर्श होताच पैशाला । वाकुडे होती अवयव ।। १४ ।।
धातुपात्रास लागता हात । अंगास वेदना होती बहुत ।
वृश्चिक जणू दंश करित । शरीराप्रत बाबांच्या ।। १५ ।।
कायावाचामनेकरुन । कांचनत्याग झाला पूर्ण ।
मातीची भांडी आणवुन । वापरू लागले श्रीठाकुर ।। १६ ।।
कामावर विजय मिळवायाला । लोकविलक्षण उपाय केला ।
धारण करुनी स्त्रीवेषाला । स्त्रियांत राहती सर्वदा ।। १७ ।।
स्त्रियांप्रमाणे करिती भाषण । त्यांच्याच सारिखे आचरण ।
विसरुनि गेले आठवण । आपण पुरुष असल्याची ।। १८ ।।
त्यांना स्त्रियांकडे पाहुन । मातृभाव होतसे उत्पन्न ।
उपजत नव्हता भाव अन्य । रामकृष्णांच्या मनामधी ।। १९ ।।
गळुनि पडावा अभिमान । यास्तव अभिनव केले साधन ।
केरसुणी हातामधी घेउन । झाडिति आवार देवळाचे ।। २० ।।
रस्ते बोळ आणि अंगण । आपुल्या केसांनी झाडुन ।
झाडताना म्हणती अभिमान । जननी नष्ट करी माझा ।। २१ ।।
उठुनी अंधारात प्रभाती । शौचकूप ते साफ करिती ।
नको अभिमान मला म्हणती । भंग्याहुनही श्रेष्ठ असा ।। २२ ।।



कनिष्ठ सर्वांपेक्षा आपण । यास्तव भिकाऱ्यांचे उच्छिष्टान्न ।
भक्षण करिती प्रसाद म्हणुन । पंगत उठता तयांची ।। २३ ।।
ऐसे करिता श्रेष्ठ साधन । समूळ गळाला अभिमान ।
स्वतंत्र व्यक्ती आहोत आपण । भान याचेही विसरले ।। २४ ।।
अहंकार त्यांचा लोपला सकळ । जगन्मातेच्या हातातिल ।
आपण आहोत बाहुले केवळ । दृढ झाली ही भावना ।। २५ ।।
ईश्वरलाभासाठी प्रचंड । मनास तळमळ लाभे अखंड ।
साधने करिती ते उदंड । कायावाचामनोभावे ।। २६ ।।
हृदयात असे जी व्याकुळता । तिच्या योगे प्रयत्न करिता ।
कोणाचेही साह्य न घेता । घेतले दर्शन अंबेचे ।। २७ ।।
संयमाचा अभ्यास करुन । वश केली इंद्रिये मन ।
पवित्र जाहले अंत:करण । मन गुरू जाहले तयांचे ।। २८ ।।
मनी उपजता शुद्ध तरंग । साधक कदापि न चुके मार्ग ।
आक्रमू शके पंथ सवेग । आपुले ध्येय गाठतसे ।। २९ ।।
रामकृष्णदेवांचे मन । घेउनी बैसले गुरुस्थान ।
त्यांना आधीच देई सांगुन । साधन कोणते करावे ।। ३० ।।
करुनी अन्य देह धारण । शरीराबाहेर येई मन ।
जणू कोणी व्यक्ती अन्य । समोर उभी ठाकतसे ।। ३१ ।।
कधी देउनी उत्तेजन । करावयास लावी साधन ।
कधी कधी भीती दाखवुन । लावी साधन करावया ।। ३२ ।।
देहधारी तयांचे मन । आधीच टाकतसे सांगुन ।
का करावे विशिष्ट साधन । कोणते फळ त्याचे मिळे ।। ३३ ।।
एकदा करित असता ध्यान । ठाकुरांच्या शरिरामधुन ।
हातामधे त्रिशुळ घेउन । एक संन्यासी निघाला ।। ३४ ।।



म्हणाला विषय मनातून । तू टाक सर्वही काढुन ।
इष्ट देवतेचे करी चिंतन । नातर हाणीन त्रिशूल हा ।। ३५ ।।
एकदा त्यांना आले दिसुन । देहात वसे संन्यासी तरुण ।
देवदेवतांचे घ्यावया दर्शन । इच्छा जाहली तयाला ।। ३६ ।।
ऐकण्याची कीर्तन भजन । इच्छा होउनी उत्पन्न ।
दिव्यरूप धारण करुन । बाहेर पडला देहाच्या ।। ३७ ।।
घेउनि त्याने देवदर्शन । ऐकिले कीर्तन भजन ।
बराच वेळ आनंद करुन । देहात पुन्हा प्रवेशला ।। ३८ ।।
स्वरूपाने तो यती तरुण । जणू दुसरे रामकृष्ण ।
देहातुनी तो बाहेर येउन । मार्गदर्शन करितसे ।। ३९ ।।
जेव्हा शरिराबाहेर येई । बाह्य ज्ञान तयांचे जाई ।
देहात प्रवेशता लवलाही । बाह्यज्ञान होई बाबांना ।। ४० ।।
बाह्यसंज्ञा जरी गेली । तरिही तयाच्या हालचाली ।
स्पष्ट दिसती तये काळी । कळे बोलणे स्पष्टपणे ।। ४१ ।।
त्याच्याकडुनी जे जे ऐकिले । ब्राह्मणीने ते सांगितले ।
तोतापुरिने उपदेशिले । तेच पुनरपी एकदा ।। ४२ ।।
शास्त्रमर्यादेचे रक्षण । करण्यास आले दोघेजण ।
गुरुस्थानी त्यांना मानुन । घेती ठाकुर उपदेश ।। ४३ ।।
नातरी जे आधी माहित । तेच पुनरपी सांगण्याप्रत ।
प्रयोजन काही नाही दिसत । गुरुरूपे तयांनी येण्याचे ।। ४४ ।।
ईश्वरदर्शनाची बाबांस । तळमळ जेव्हा लागली विशेष ।
मथुरनाथा वाटले तयास । विकार उद्‌भवला असावा ।। ४५ ।।
अखंड ब्रह्मचर्य धारण । विकाराचे असावे कारण ।
मस्तकात विकार होउन । झाली असावी अशी स्थिती ।। ४६ ।।



मथुरचे असे प्रेम गाढे । तयांच्या सुखासाठी धडपडे ।
पडू देइना उणे थोडे । चिंता करितसे बाबांची ।। ४७ ।।
मथुरनाथे विचार केला । ब्रह्मचर्याचा भंग झाला ।
तर उतार पडेल रोगाला । घेउनि गेला शहरात ।। ४८ ।।
वारांगनांच्याकडे नेउन । मोह पाडण्याचा करी प्रयत्न ।
बाबांस जगदंबेचे दर्शन । साक्षात झाले वेश्यांमधी ।। ४९ ।।
मग आई आई म्हणत । निमग्न झाले समाधीत ।
समाधी उतरता बालकवत । व्यवहार पाहुनी बाबांचा ।। ५० ।।
वारांगनांच्याही मनात । वात्सल्यभाव झाला उदित ।
वाटले पुण्यपुरुषाप्रत । व्यर्थच आपण कष्टविले ।। ५१ ।।
मोह उत्पन्न करावा म्हणुन । मोठाच अपराध केला आपण ।
वारंवार त्या करिती नमन । क्षमा याचिती बाबांची ।। ५२ ।।
देहभावना जेथे अल्पही । अवशिष्ट काही उरली नाही ।
वासनेचा उदय कधिही । नाही त्याठायी व्हावयाचा ।। ५३ ।।
नाही उरले देहभान । निमाले मनाचे मनपण ।
भेदाभेद लोपले पूर्ण । रंगली वृत्ती स्वरूपात ।। ५४ ।।
कोटिसूर्यप्रकाशालागुन । लागू शके केवी अंजन ।
केवलस्वरूप श्रीभगवान । अज्ञजन कैसे जाणती ।। ५५ ।।
होता तयांचे किंचित स्मरण । कामवासना जळे पूर्ण ।
पवित्र होती काया मन । कृपाप्रसादे तयांच्या ।। ५६ ।।
कळले चंद्रादेवीलागुन । गदाधराने सोडिले पूजन ।
न राहे तयाला देहभान । ऐकुनि माता चिंता करी ।। ५७ ।।
तिने गदाधरला सत्वरी । आणविले कामारपुकुरी ।
मंत्र तंत्र आणि शांती करी । उपाय बहुपरी केले तिने ।। ५८ ।।




देवऋषीला बोलविले । तयाच्या अंगामधी आले ।
स्पष्टपणे त्याने सांगितले । काही न झाले गदाधरा ।। ५९ ।।
यास न झडपे कोणी भूत । यास रोग नसे किंचित ।
ईश्वराचे वेड सांप्रत । लागले आहे गदाधरा ।। ६० ।।
मग तो गदाधराला वदला । साधू व्हावयाचे आहे तुजला ।
खातोस सुपारी कशाला । काम वाढतो सुपारीने ।। ६१ ।।
गदाधराला मनापासुन । आवडे सुपारीचे सेवन ।
तथापि त्या दिवसापासुन । सोडिले सेवन सुपारीचे ।। ६२ ।।
कामारपुकुरी असे स्मशान । तेथे पिंपळ पुरातन ।
शंकरासमान करिती ध्यान । बसुनी वृक्षाखाली त्या ।। ६३ ।।
तेथिल कोल्हीपिशाच्चालागुन । अर्पिती फलमूल मिष्टान्न ।
भूतांनी ते खाता अन्न । भांडेहि उडुनी जाई वरी ।। ६४ ।।
मध्यरात्र होईपर्यंत । बाबा बसती ध्यान करित ।
बाबांनी स्वत: स्मशानात । लाविले झाड बेलाचे ।। ६५ ।।
होतसे जगदंबेचे दर्शन । तिच्या इच्छेने करिती वर्तन ।
अंतरीची तळमळ म्हणुन । कमी जाहली त्या काळी ।। ६६ ।।
मग जनांनी तर्क केला । वायुरोग यांचा शमला ।
उदासीन भाव राहिला । कळेना औषध त्यावरती ।। ६७ ।।
चंद्रामणी करी चिंतन । संसारी याचे नसे मन ।
करितो सर्वकाळ जपध्यान । उपाय यावर शोधावा ।। ६८ ।।
वाटे विवाह द्यावा करुनी । सुंदर सुशील मिळता पत्नी ।
प्रेम उपजेल अंत:करणी । औदासीन्य नाहिसे होइल ।। ६९ ।।
स्त्रीपुत्रांचा पडता भार । गदाधराच्या शिरावर ।
अंत:करण होईल स्थिर । अन्य विचार मावळती ।। ७० ।।



रामेश्वरदादा चंद्रामणी । ऐसा विचार करुनी मनी ।
वधू शोधावयालागुनी । आरंभ करिती झडकरी ।। ७१ ।।
पुष्कळ ठिकाणी मुली पाहुन । दिसेना कोठे येता जुळुन ।
चंद्रामणी झाली चिंतामग्न । काय करावे न कळे तिला ।। ७२ ।।
एके दिवशी ठाकुरांस । प्राप्त जाहला भावावेश ।
वदले वधू पाहावयास । व्यर्थ शिणता कशाला ।। ७३ ।।
जाउनि जयरामवाटीस । रामचंद्र मुखोपाध्यायास ।
एक कन्या असे तियेस । वधू निश्चित करा बरे ।। ७४ ।।
तिच्याशी माझे होणार लग्न । कधीच गेले आहे ठरुन ।
माझ्यासाठी वेगळी काढुन । ठेवी तिजला जगदंबा ।। ७५ ।।
रामकृष्णांनी विवाहाला । मुळीच विरोध नाही केला ।
पूर्णपणे तयांनी लग्नाला । दर्शविली आपुली संमती ।। ७६ ।।
ठाकुरांच्या पवित्र मना । आजन्म न शिवे स्त्रीकल्पना ।
काय म्हणुनि त्यांनी लग्ना । संमती आपुली दाखविली ।। ७७ ।।
त्यांच्या संपूर्ण आयुष्यात । अनेक घटना घडती नित्य ।
तथापि एखादीहि तयात । निरर्थक घटना असेना ।। ७८ ।।
घटना कितिही असो लहान । सर्वथा असे ती अर्थपूर्ण ।
विवाह होणे ही तर महान । आयुष्यातिल घटना असे ।। ७९ ।।
ठाकुरांना होते माहित । आपुला विवाह होणार निश्चित ।
मुळीच घेतली नाही हरकत । यास्तव त्यांनी लग्नाला ।। ८० ।।
विवाह होणार कोणासी । हेहि ठाउकी होते तयासी ।
त्यांचे बोलणे जगदंबेसी । झाले होते याविषयी ।। ८१ ।।
ठाकुर सांगती ब्राह्मणास । एकुण संस्कार असती दश ।
पावण्या आचार्य पदवीस । विवाह हा एक संस्कार ।। ८२ ।।







परमहंस जे पूर्ण ज्ञानी । ते तर झाडुवाल्यापासुनी ।
घेती अवस्था उपभोगुनी । सार्वभौम राजापर्यंत ।। ८३ ।।
जर असे न येई घडुन । वैराग्य कसे येईल पूर्ण ।
पाहिले नाही तिकडे मन । संभव आहेच जाण्याचा ।। ८४ ।।
कोणी म्हणती होता लग्न । करावे होते पुत्रोत्पादन ।
शास्त्राज्ञा तशी आहे म्हणुन । वैवाहिकाचे कर्तव्य ते ।। ८५ ।।
शास्त्रे झाली उत्पन्न । असती जन जे साधारण ।
त्यांना कराया मार्गदर्शन । उन्नती त्यांची करावया ।। ८६ ।।
व्यक्तींचा अधिकार पाहुन । निरनिराळ्या भूमीवरुन ।
निरनिराळे आज्ञापन । शास्त्रामधे केले असे ।। ८७ ।।
सर्व जनांस उपयुक्त होती । शास्त्रे ऐशा आज्ञा देती ।
जिवांचे हित करण्याप्रती । शास्त्रे ऋषींनी निर्मिली ।। ८८ ।।
लोक झाल्यावरी लग्न । विषयोपभोगात होतिल मग्न ।
यास्तव उच्च ध्येय संलग्न । केले विवाहसंस्कारासी ।। ८९ ।।
उपजवा गुणवान संतान । उच्च उद्देश पुढे ठेवुन ।
कमी करावे इंद्रियलालन । ऐसा उद्देश शास्त्रांचा ।। ९० ।।
विषयासक्ती कमी करुन । लावावे ईश्वराकडे मन ।
यास्तव शास्त्रे करिती प्रयत्न । नियम लाविले त्यासाठी ।। ९१ ।।
सद्गुरुपाचा लागुनी ध्यास । कामकल्पनेचा झाला ऱ्हास ।
सांगण्यासारिखे तया पुरुषास । काय असे मग शास्त्रांना ।। ९२ ।।
जर सर्व वैवाहिकांप्रती । विषयत्याग शास्त्रे सांगती ।
तर ती गोष्ट अशक्य होती । सकळांस आचरण करावया ।। ९३ ।।
अशक्य असे जे आचरण्यास । काय उपयोग सांगुनी त्यास ।
यास्तव दुष्कर नियमास । शास्त्रे मुद्दाम टाळिती ।। ९४ ।।



वास्तव सामान्य केले नियम । पुत्रोत्पतीसाठीच काम ।
परी पशुहुनी मानव अधम । तेही पाळणे होत नसे ।। ९५ ।।
इंद्रिये सोडुनि देणे स्वैर । नसे हे विवाहाचे सार ।
अक्षता पडताच डोक्यावर । भोग मंगल केवी होती ।। ९६ ।।
पत्नी सहधर्मचारिणी । जीवनात दोघांनी मिळुनी ।
एकमेकांना साह्य करुनी । करुनि घ्यायचा धर्मलाभ ।। ९७ ।।
पवित्रोत्तम हा उद्देश । सांगावयाला जगतास ।
पशुवृत्तीचा व्हावया नाश । विवाह करिती रामकृष्ण ।। ९८ ।।
ते म्हणती शिष्यांलागुन । जेव्हा मी सोळा प्रकार करिन ।
तेव्हा एखादा तुम्हाकडुन । करण्याची करिन अपेक्षा ।। ९९ ।।
जगापुढे उच्च आदर्श । ठेवण्या विवाह केला खास ।
नातर विवाहित जनांस । म्हणण्यास जागा राहती ।। १०० ।।
विवाह केला नाही म्हणुनी । ब्रह्मचर्य सांगती आम्हालागुनी ।
जर का केली असती पत्नी । तर कैचे टिकते ब्रह्मचर्य ।। १ ।।
असाहि कोणाचा आक्षेप । जगद्गुरुत्वा नसावा अल्प ।
म्हणुनी चरित्र शुद्ध निष्पाप । आचरुनी स्वये दाखविले ।। २ ।।
लग्न करुनी नाही थांबले । पत्नीलाही जवळ आणिले ।
एकशय्याशयन केले । कित्येक दिवस तयांनी ।। ३ ।।
परि किंचित विषयवासना । शिवली नाही तयांच्या मना ।
संसारातहि अलिप्तपणा । पद्मपत्र जेवी जळामधी ।। ४ ।।
ऐसा असामान्य संयम । आचरुनी दाविला निरुपम ।
असिधाराव्रत असे परम । कोण अन्य आचरू शके ।। ५ ।।
लोखंडाचे खाउनी चणे । होईल कधीकाळी पचविणे ।
परंतु ऐसा संयम करणे । अशक्य असे सर्वथैव ।। ६ ।।



असाध्य असे तेही साधुन । साधावयास जनकल्याण ।
स्वये दाखविले आचरून । भगवंतांनी या काळी ।। ७ ।।

प्राचीन काळी अवतार झाले । त्यांनी दिव्य हे नाही केले ।
या काळी ते करावे लागले । सांप्रत युगावतारासी ।। ८ ।।

विषयप्रवण जाहले जन । ध्येय झाले इंद्रियलालन ।
यास्तव आचार अति कठिण । दाविला आचरुनी या काळी ।। ९ ।।

रामकृष्णदेव सांगत । साचा तयार झाला सांप्रत ।
घालुनी आदर्श साच्यात । घडवा जीवने आपुलाली ।। ११० ।।

ऐसे अद्‌भुत आचरण । आचरू शकेना साधारण ।
तरी त्या दिशेने प्रयत्न । आपुल्यापरीने करावया ।। ११ ।।

घालुनी द्यावया उदाहरण । रामकृष्णांनी केले लग्न ।
आणि अपूर्व लीला महान । आपण आचरुनी दाखविली ।। १२ ।।

असो बाबांनी सांगितलेली । मुलगी सर्वांस पसंत पडली ।
जयरामवाटीस त्या काळी । समारंभ झाला विवाहाचा ।। १३ ।।

मुलीचे नाव सारदादेवी । पाच वर्षे वया आघवी ।
सवे घेउनी नवरी नवी । परतले कामारपुकुराला ।। १४ ।।

आपुल्या मुलाचे लग्न जाहले । चंद्रामणीला बरे वाटले ।
आशाळभूत मन झाले । संसारात पडेल हा ।। १५ ।।

लग्नास जमिनदाराकडुन । आणिले होते दागिने मागुन ।
परत करणे भाग म्हणुन । चिंता चंद्रामणी करी ।। १६ ।।

सासूची ती लाडकी सून । नुकतेच आटोपले लग्न ।
अंगावरील दागिने काढुन । कसे घ्यावे न कळे तिला ।। १७ ।।

गदाधराच्या लक्षात । आईची चिंता आली त्वरित ।
सारदा असता निद्रेत । दागिने समस्त काढिले ।। १८ ।।



मातेपुढे दागिने ठेविले । तिने धन्याला परत केले ।
सकाळी सुनेने विचारिले । काय झाले अलंकार ।। १९ ।।
मांडीवर तिजला घेउन । चंद्रादेवी करी सांत्वन ।
यापेक्षही तुजला छान । दागिने करील गदाधर ।। १२० ।।
मुलीचा चुलता भेटावयाला । त्याच दिवशी तेथे आला ।
वृत्तांत कळता रागावला । सारदेस नेले माहेरी ।। २१ ।।
चंद्रामणीला दुःख जाहले । गदाधराने सांत्वन केले ।
एकदा लग्न हे झालेले । रद्द कोणी न करू शके ।। २२ ।।
यावर ठाकुर सहा मास । राहिले कामारपुकुरास ।
मग जाण्याचा कलकत्त्यास । बेत ठरविला ठाकुरांनी ।। २३ ।।
परि हा विचार मातेला । मुळीच पसंत नाही पडला ।
वाटे रोग याचा शमला । उचल खाईल पुनरपी ।। २४ ।।
करुनी निज जननीचे सांत्वन । दक्षिणेश्वरा आले परतुन ।
ते कामावर रुजू होउन । थोडेच दिवस उलटले ।। २५ ।।
पुनरपि पूजनामाजी रंगले । संसार घरदार विसरले ।
ठाकुर अविरत करू लागले । जपध्यान नामस्मरणादी ।। २६ ।।
राहु लागले हृदय आरक्त । वाटु लागले विषय विषवत ।
नाहिसी झाली झोप समस्त । होउ लागला गात्रदाह ।। २७ ।।
गात्रदाह अनिद्रेवर । मथुरने करविले उपचार ।
गंगाप्रसाद वैद्य चतुर । औषध तयाचे सुरू केले ।। २८ ।।
एकदा वैद्याकडे असता । पूर्व बंगालातील जाणता ।
एक वैद्य आला होता । लक्षणे पाहिली तयाने ।। २९ ।।
तो म्हणे हा देवोन्माद । येथे काय करिल औषध ।
त्याने प्रथमच केले विशद । खरे खरे कारण रोगाचे ।। १३० ।।



पारखिले तयाने रोगास । व्याधिचे कारण योगाभ्यास ।
तयाच्या सांगण्यावर विश्वास । बसला नाही कोणाचा ।। ३१ ।।
प्रयत्नांची करुनी शिकस्त । आला नाही गुण किंचित ।
हळुहळु रोग गेला वाढत । कामारपुकुरास ते कळले ।। ३२ ।।
मुकुंदपुरच्या शिवालयात । चंद्रादेवी धरणे धरत ।
तीन दिवसांनी तिला स्वप्नात । दृष्टांत देई सदाशिव ।। ३३ ।।
तुझ्या पुत्राला वेड नाही । झाला नसे रोगहि काही ।
ईशदर्शनाची व्याकुळता ही । जाहली अवस्था तयामुळे ।। ३४ ।।
रामकृष्णांना सर्वकाळ । अंतरी लागली तळमळ ।
चतुर्थांशहि तिचा केवळ । जर का लागेल इतरांस ।। ३५ ।।
तर खळबळिने त्याचे शरिर । नष्ट होउनी जाईल सत्वर ।
एवढा दुर्धर भक्तिभर । समर्थ कोण साहण्याला ।। ३६ ।।
जगन्मातेचे होई दर्शन । तोवर स्वस्थ राहे मन ।
नातरी कासाविस होउन । प्राण जाऊ पाहातसे ।। ३७ ।।
सहा वर्षांत एक दिवसही । निद्रा तयांना आली नाही ।
पापण्या निर्जिव झाल्या दोही । मिटविणे झाले अशक्य ।। ३८ ।।
वेळेचेहि न राहे भान । जाणीव गेली नष्ट होउन ।
फक्त जगन्मातेचे चिंतन । अहोरात्र होऊ लागले ।। ३९ ।।
कधी कधी त्यांच्या मनात यावे । असे काय हे वेड आघवे ।
आरशापुढे उभे राहावे । बोट घालावे डोळ्यात ।। १४० ।।
बुबुळाला बोटे लागती । तरिही पापण्या नच मिटती ।
मनामाजी वाटुनी भीती । रडत म्हणती मातेला ।। ४१ ।।
एवढी एकाग्र चित्ताने । भक्ति करितो तनुमनाने ।
तयाचे ऐसे फळ देणे । शोभते काय तुजला गे ।। ४२ ।।



येउनि लगेच आठवण । म्हणे माते देई दर्शन ।
जाऊ नकोस मज टाकुन । जाणार देह तर जाऊ दे ।। ४३ ।।
आई मजवर कृपा करुन । मजला त्वरित देई दर्शन ।
दुसरे कोण तुजवाचुन । असे मजला जगन्माते ।। ४४ ।।
यापरी मी रडता रडता । पुनरपि उत्साह येई चित्ता ।
दर्शन देतसे जगन्माता । शांतवी बोध करित असे ।। ४५ ।।
भव्य कालीमंदिर बांधुनी । व्यवस्था चालवी रासमणी ।
चालावी पूजाव्यवस्था म्हणुनी । दानपत्र करी जमिनीचे ।। ४६ ।।
दानपत्र जे राणिने केले । कनिष्ठ कन्येने स्वीकारिले ।
थोरल्या मुलीने नाकारिले । त्यावर स्वाक्षरी करण्यास ।। ४७ ।।
म्हणुनी रासमणीच्या चित्ता । लागुनी राहिली होती चिंता ।
मनात उद्‌भवे अशांतता । मृत्यू समीप दिसत असे ।। ४८ ।।
त्या काळी रासमणीला । संग्रहणीचा विकार जडला ।
गंगातीरावरिल वाड्याला । येउनी राहिली भक्तिमती ।। ४९ ।।
दिव्यांच्याकडे लक्ष जाउनी । एके रात्री म्हणाली राणी ।
सर्व दिवे हे काढा येथुनी । रोषणाई मजला नको ।। १५० ।।
प्रत्यक्ष काली जगन्माता । पहा या स्थळी आली आता ।
तिच्या अंगाची प्रभा फाकता । अंधार नाहिसा जाहला ।। ५१ ।।
बरे झाले आलीस आई । पद्मेने सही दिधली नाही ।
माते आता होईल काई । मज लवलाही सांग तू ।। ५२ ।।
ऐसे नित्य करितसे चिंतन । तियेचा रोग गेला वाहुन ।
एके दिवशी प्राणोत्क्रमण । जाहले राणी रासमणीचे ।। ५३ ।।
रामकृष्ण सांगती लोका । जगदंबेच्या अष्ट नायिका ।
आहेत ज्या का प्रमुखा । रासमणी त्यांतील एक असे ।। ५४ ।।



रासमणीच्या निधनानंतर । कारभार सर्वच पाहे मथुर ।
देवालयाची व्यवस्था समग्र । आली होती त्याच्याकडे ।। ५५ ।।
रामकृष्णांचा आर्धाच भक्त । अधिकार आता मिळाला समस्त ।
पूर्ण संधी जाहली प्राप्त । सेवा तयांची करावया ।। ५६ ।।
रामकृष्णांची सेवा करुन । मथुरनाथ झाला धन्य ।
आपण तयांचे करुनी स्मरण । आपुले कल्याण साधावे ।। ५७ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५८ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा बारावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय तेरावा

जय जय आदर्श अवतारा । ज्ञानियांच्या ज्ञानकोठारा ।
योगिजनांच्या योगागारा । भक्तिसागरा भक्तांच्या ।। १ ।।
निरनिराळ्या धर्मपंथांस । मार्गदर्शन करावयास ।
आदर्श तयांचा व्हावयास । साधने करिती रामकृष्ण ।। २ ।।
न करिता पंथाचे साधन । केंवि करते मार्गदर्शन ।
राहावे केवी आदर्श होउन । म्हणुनी साधने आचरती ।। ३ ।।
स्वत: अफाट प्रयत्न करुन । देहाने अनंत कष्ट सोसुन ।
साधनांत पूर्णत्व मिळवुन । साधकास आदर्श जाहले ।। ४ ।।
सर्व धर्म आणि पंथ यांस । मार्गदर्शन करावयास ।
पावले जगद्गुरू पदवीस । उद्धार कराया जगताचा ।। ५ ।।
यासाठीच रामकृष्ण । करिते झाले तांत्रिक साधन ।
त्यामधे पूर्णत्व मिळवुन । तांत्रिकास आदर्श जाहले ।। ६ ।।
तसेच तंत्रोक्त साधनाप्रत । जन समजत होते विपरित ।
त्यांना महत्त्व देउनी यथार्थ । मान तयांचा वाढविला ।। ७ ।।
जन मानिती तंत्रसाधनात । स्त्रीग्रहण करणे असे प्राप्त ।
तेथे मातृभावच सांप्रत । भगवंतांनी आचरिला ।। ८ ।।
वीरभावात अध:पतन । साधकाचे होईल म्हणून
मातृभावे पहावे स्त्रीजन । रामकृष्णांनी शिकविले ।। ९ ।।
येणेपरी शुचिता अद्भुत । आणिली तंत्रसाधनात ।
साधकजनांचे अपरिमित । केले हित दयासिंधूने ।। १० ।।



असो तेथवा दक्षिणेश्वरी । भागिरथीच्या तीरावरी ।
एक फुलबाग होती साजिरी । बकुलवृक्ष होता बागेत ।। ११ ।।
म्हणुनी त्या घाटाप्रती । बकुलतलाचा घाट म्हणती ।
ठाकुर फुले तोडत असती । जगदंबेच्या हारास्तव ।। १२ ।।
एकदा प्रभाती बागेत । बाबा असता फुले तोडित ।
तेथवा एक नौका अवचित । लागली बकुलतलघाटाला ।। १३ ।।
एक स्त्री उतरली तीतुन । तियेचे होते भगवे वसन ।
पुस्तकांचे गाठोडे घेउन । मार्ग आक्रमू लागली ।। १४ ।।
लांबसडक मोकळे केश । रुळत होते तिच्या पाठीस ।
असे भैरवीचा वेष । वय चाळीस वर्षांचे ।। १५ ।।
रूपलावण्य असे आगळे । ठाकुरांनी तिला पाहिले ।
वाटले आपुले माणुस आले । वाटला आनंद अंतरी ।। १६ ।।
तत्काळ आले परतुनी । हृदयरामाला हाक मारुनी ।
म्हणिती आताच संन्यासिनी । आली तिजला घेऊन ये ।। १७ ।।
हृदय म्हणे ती नवखी महिला । काय सांगावे मी तियेला ।
उगीच इकडे येईल कशाला । संकोच मजला वाटतसे ।। १८ ।।
ठाकुर म्हणती हृदयला । बोलिवले मी सांग तिजला ।
हृदयराम आश्चर्य पावला । आग्रह पाहुनी बाबांचा ।। १९ ।।
हृदयराम तेथुनी निघाला । संन्यासिनीकडे तो आला ।
नम्रपणे वदला तियेला । माझा मामा भक्त असे ।। २० ।।
तुम्हास करिती पाचारण । घ्यावयाला तुमचे दर्शन ।
भैरवी ब्राह्मणी हे ऐकुन । निघाली हृदयबरोबर ।। २१ ।।
काही एक न पुसता प्रश्न । भैरवी येतसे हे पाहुन ।
हृदय जाहला आश्चर्यमग्न । दोघेहि पातले मंदिरास ।। २२ ।।



हृदयबरोबर संन्यासिनी । ठाकुरांच्या खोलीस येउनी ।
रामकृष्णदेवांना पाहुनी । झाली अतिशय आनंदित ।। २३ ।।
न मावे आनंद गगनात । आनंदाश्रु आले नेत्रांत ।
कंठहि झाला सद्गदित । सांगु लागली बाबांना ।। २४ ।।
गंगातिरी तू असशी म्हणुन । आधीच आले होते कळुन ।
इतुके दिवस शोध करुन । भेटलास आज या ठायी ।। २५ ।।
सांगु लागली भैरवी ब्राह्मणी । जगदंबेच्या कृपेकरुनी ।
आले होते मजला कळुनी । होतील भेटी तिघांच्या ।। २६ ।।
पूर्वीच पाहिले दोघांसी । तूही आता भेटलासी ।
साह्य करावया तिघांसी । आज्ञापी मज जगदंबा ।। २७ ।।
जसे एखादे लहान मूल । बसुनि आपुल्या आईजवळ ।
गप्पा करितसे लडिवाळ । तैसीच अवस्था बाबांची ।। २८ ।।
ते सांगती स्वानुभव । प्राप्त झालेली दर्शने सर्व ।
लाभलेल्या अवस्था अभिनव । सकळ तियेला निवेदिल्या ।। २९ ।।
ईश्वराचे करिता चिंतन । नष्ट होतसे बाह्यज्ञान ।
अंगाचा तो दाह भीषण । निद्रा नाहिशी झालेली ।। ३० ।।
आपुल्या सर्व गोष्टी सांगुन । विचारू लागले तिजलागुन ।
काय असे हे वेड महान । अथवा रोग मज जाहला ।। ३१ ।।
रामकृष्णांच्या मुखातुन । सकळ गोष्टी तिने ऐकुन ।
आनंदाने अंत:करण । उचंबळू लागले तियेचे ।। ३२ ।।
वात्सल्याने म्हणे ती बाबांला । कोण वेडा म्हणतो तुजला ।
महाभाव तुज प्राप्त झाला । त्यामुळे अवस्था ही होय ।। ३३ ।।
अत्यंत उच्च अवस्था ती । सामान्य जन केवी जाणती ।
म्हणुनी तुजला वेडा म्हणती । खरोखर पामर नर सारे ।। ३४ ।।





भैरवी ब्राह्मणीला श्रीरामकृष्णांमध्ये स्वत:ची इष्टदेवता भगवान श्रीरामचंद्रांचं झालेलं दर्शन.



श्रीरामकृष्णांना जगन्मातेची झालेली विविध दर्शने

ऐसी अवस्था श्रीराधेला । आणि चैतन्यमहाप्रभूला ।
लाभली होती आता तुजला । लाभली दुर्लभ अवस्था ती ।। ३५ ।।
भैरवी घेई देवदर्शन । शिधा घेतला कोठीतुन ।
गंगास्नान आटोपुन । पंचवटीत केला स्वयंपाक ।। ३६ ।।
रघुवीरशिला तोंडातली । पूजेसाठी तिने काढिली ।
नैवैद्य करुनी त्या काळी । ध्यानस्थ बैसली शांतपणे ।। ३७ ।।
ध्यानात झाले अपूर्व दर्शन । समाधीच गेली लागुन ।
प्रेमाश्रू वाहती नेत्रातुन । बाह्यज्ञान लोपले ।। ३८ ।।
इकडे ठाकुर खोलीतुन । पंचवटीस कराया गमन
निघता भावावस्था होउन । देहभान तयांचे हारपले ।। ३९ ।।
पंचवटीत ते येउन । रघुवीराचा नैवेद्य घेउन ।
स्वत: सेविती रामकृष्ण । समाधि उतरली भैरवीची ।। ४० ।।
रामकृष्णांची पाहुनी कृती । भैरवी विस्मित झाली चित्ती ।
रोमांच उठले अंगावरती । हृदय भरले भक्तिभरे ।। ४१ ।।
काही वेळाने रामकृष्ण । प्राप्त होउनी देहभान ।
म्हणती गोष्ट विलक्षण । मजकडुनी घडली कशी ।। ४२ ।।
ब्राह्मणीने ते परिसुनी । आईप्रमाणे धीर देऊनी ।
म्हणे तुझ्यात असे जो कोणी । नैवेद्य सेवन तो करी ।। ४३ ।।
ध्यानस्थ असता मजलागुन । आताच घडले जे दर्शन ।
त्यामुळे मज आले कळुन । नैवेद्य ग्रहण कोण करी ।। ४४ ।।
इतुके दिवस पूजन केले । आज तयाचे सार्थक जाहले ।
अवशिष्ट अन्न भक्षण केले । प्रसाद समजुनी भैरवीने ।। ४५ ।।
रामकृष्णांच्या शरीरात । साक्षात पाहुनी सीतानाथ ।
भक्तिभाव अंत:करणात । दाटुनि आला ब्राह्मणीच्या ।। ४६ ।।



कंठ जाहला सद्‌गदित । आनंदाश्रु येती नयनात ।
रघुवीरशिला त्या अवस्थेत । दिधली गंगेत सोडून ।। ४७ ।।
पहिल्याच दिवशी अनुपम । दोघांत उत्पन्न झाले प्रेम ।
वात्सल्यभाव वाढला परम । बाबांविषयी ब्राह्मणीचा ।। ४८ ।।
ईश्वरीय कथा करिता कथन । दिवस जाती दिवसामागुन ।
दोघांनाही न राहे भान । निमग्न आत्मनिवेदनात ।। ४९ ।।
सांगती तिजला रामकृष्ण । आध्यात्मिक अनुभव दर्शन ।
नाना ग्रंथांचा निर्देश करुन । समाधान भैरवी करितसे ।। ५० ।।
सांगितले तिने बाबांप्रत । अवतारिकांच्या देहमनात ।
लक्षणे अशी उद्‌भवतात । पूर्वावतारी घडले असे ।। ५१ ।।
ऐसे होतसे निवेदन । दिव्यानंदाचे उठे तुफान ।
बाबांचे संशय संपूर्ण । भैरवी नाहिसे करितसे ।। ५२ ।।
ब्राह्मणी असे अत्यंत पवित्र । रामकृष्णांस मानुनी पुत्र ।
वात्सल्य भक्ती करी थोर । जाणे अवतार कृष्णाचा ।। ५३ ।।
भैरवी जरी निष्कलंक । कामकांचनासक्त लोक ।
उगीच व्हायचे साशंक । यास्तव बि-हाड हलविले ।। ५४ ।।
जवळ जेथुनी दक्षिणेश्वर । देवमंडल घाटावर ।
भैरवी ब्राह्मणी भक्त थोर । राहु लागली आनंदे ।। ५५ ।।
ब्राह्मणी तेथे झाली प्रिय । भिक्षेचीही झाली सोय ।
नित्यनेमाने येत जाय । रामकृष्णांच्या दर्शनास ।। ५६ ।।
खाद्यपदार्थ स्त्रियांकडुन । आणितसे भिक्षा मागुन ।
वात्सल्यभाव मनी धरुन । रामकृष्णांना भरवितसे ।। ५७ ।।
हातात नवनीत घेउन । गोपाल गोपाल ऐसे म्हणुन ।
हाका मारिता अंत:करण । येतसे भरुनी भैरवीचे ।। ५८ ।।



जैसे एखादे बाळ लहान । जननीकडे जाई धावुन ।
त्यापरी भक्षिती रामकृष्ण । लोणी तिच्या हातातिल ।। ५९ ।।

म्हणत असती रामकृष्ण । वात्सल्यभाव तिचा पाहुन ।
गोपालविरहे व्याकुळ होउन । वाटे पातली नंदराणी ।। ६० ।।

रामकृष्णदेवांकडुन । अनुभव त्यांचे ऐकून ।
खात्रीच तिची गेली पटुन । रामकृष्ण असती अवतार ।। ६१ ।।

अशी अवस्था असाधारण । ईश्वरप्रेमे होई उत्पन्न ।
ईश्वराच्या कथा परिसुन । ठाकुरांस होतसे आनंद ।। ६२ ।।

लोपे देहाचेही भान । नसती हे साधक सामान्य ।
वाटे पुनरपि श्रीचैतन्य । आले जीवांस उद्धराया ।। ६३ ।।

चैतन्यभागवतातिल वर्णन । रामकृष्णांसी जुळते पाहुन ।
तिजला वाटे आश्चर्य महान । समाधान तिजला वाटले ।।६४ ।।

चैतन्यदेवांचा गात्रदाह । तयांची क्षुधा अनुपमेय ।
ज्या साधनांनी नाहिसे होय । ते उपाय तिने आरंभिले ।। ६५ ।।

त्या उपायांनी गुण आला । सीमा न राहिली आनंदाला ।
म्हणे चैतन्यदेवे केला । वास बाबांच्या शरीरात ।। ६६ ।।

ती म्हणे अवतारी पुरुषात । जी जी लक्षणे असतात ।
रामकृष्णांच्या देहात । सर्व ती असती स्पष्टपणे ।। ६७ ।।

ही गोष्ट मथुरनाथाप्रती । बालकस्वभावे बाबा सांगती ।
मथुर बोलला बाबांप्रती । अवतार असती फक्त दहा ।। ६८ ।।

भैरवी ब्राह्मणी तितुक्यात । घेउनि मिष्टान्न हातात ।
स्वहस्ते बाबांस भरविण्याप्रत । जाहली प्राप्त त्या ठायी ।। ६९ ।।

कारण तिचा वात्सल्यभाव । रामकृष्ण बालस्वभाव ।
मानुनी तयांना कृष्णदेव । प्रेमभरे ती भरवितसे ।। ७० ।।



मथुरनाथास तिने पाहुन । भाव घेतला आवरून ।
हृदयच्या जवळ ताट देउन । उभी राहिली बाजूला ।। ७१ ।।
जसे कोणाचे गाऱ्हाणे । बालक सांगे मातेकारणे ।
तसे मथुरबाबूचे म्हणणे । सांगती ठाकुर भैरवीला ।। ७२ ।।
मला तू म्हणतेस अवतार । दहाच असती म्हणतो मथुर ।
मथुर करुनी नमस्कार । म्हणे हे आपण बोललो ।। ७३ ।।
भैरवी बोले भागवतात । चोविस अवतारांचे वृत्त ।
लिहिले पुढे होतील बहुत । पाहुनि घ्या तो ग्रंथराज ।। ७४ ।।
चैतन्यदेवांचा अवतार । पुनरपि होइल अवनीवर ।
वैष्णवग्रंथात असे विचार । पुसावे कोणाहि पंडिताला ।। ७५ ।।
चैतन्यदेवांचे अनुभव । यांच्यात विद्यमान सर्व ।
दोघांत साम्य असे अपूर्व । वादास सिद्ध मी यासी ।। ७६ ।।
बाबा जणू बालक सान । अत्यंत सरल तयांचे मन ।
म्हणती मथुर घे बोलावुन । विद्वान पंडित शास्त्रज्ञ ।। ७७ ।।
ब्राह्मणीचे विधान खरे । अथवा असे ते खोटे सारे ।
निकाल लागला पाहिजे त्वरे । भरव सभा तू पंडितांची ।। ७८ ।।
मथुरनाथे कौतुकाने । पंडितास धाडिली आमंत्रणे ।
विद्वज्जनांची त्वरेने । सभा भरविली दक्षिणेश्वरी ।। ७९ ।।
त्या आमंत्रित पंडितांत । वैष्णवचरण महापंडित ।
विद्वान असुनही सद्भक्त । कीर्ति तयाची चोहीकडे ।। ८० ।।
श्रीमद्भागवत ग्रंथावर । तो पुराण सांगे सुंदर ।
वैष्णवसमाजाचा थोर । पुढारी असे तो त्या काली ।। ८१ ।।
अनेक साधक भक्तजन । इच्छिती त्याचे मार्गदर्शन ।
उद्भवता धर्माविषयी प्रश्न । सर्वजण त्याचे मत मानिती ।। ८२ ।।



विद्वज्जनांच्या त्या सभेत । विदुषी ब्राह्मणी उपस्थित ।
मथुर आणि मंडळी बहुत । आली होती सभेसाठी ।। ८३ ।।
वैष्णवचरणास उद्देशुन । ब्राह्मणी करी विवेचन ।
पूर्वी अवतार झाले महान । शास्त्रात वर्णन असे त्यांचे ।। ८४ ।।
सर्व त्या अवस्था परिपूर्ण । रामकृष्णांत विद्यमान ।
आपुले मत जर असे अन्य । तर कारण सांगा तयाचे ।। ८५ ।।
रामकृष्ण त्या मंडळीत । बसलेले साध्या वेषात ।
निमग्न आपुल्या आनंदात । झळकत हास्य मुखावर ।। ८६ ।।
बाबा असती सरल शुद्ध । लक्ष देउनी ऐकती वाद ।
जणू आपुला नसे संबंध । तिऱ्हाइतापरि वृत्ती असे ।। ८७ ।।
मध्येच वैष्णवचरणाप्रती । स्पर्श करुनी ठाकुर सांगती ।
ऐसे होतसे मजप्रती । वर्णन करिती अवस्थेचे ।। ८८ ।।
दिव्य दृष्टिचा वैष्णवचरण । जाणे पाहताच रामकृष्ण ।
की हे असती पुरुष महान । भरसभेत मत तो सांगे ।। ८९ ।।
एकोणिस प्रकारचे भाव । एकत्र होता महाभाव ।
राधा आणि चैतन्यदेव । दोघांस प्राप्त झाला असे ।। ९० ।।
त्या सर्व अवस्था यांच्यात । आहेत पूर्ण प्रकाशित ।
मानवदेह असे असमर्थ । वेग तयांचा सहावया ।। ९१ ।।
ब्राह्मणीसारिखे आपुले मत । वैष्णवचरण स्पष्ट देत ।
मथुरनाथ मंडळी समस्त । चकित झाली परिसून ।। ९२ ।।
बाबा मथुरला म्हणती पाही । तुमचे तिकडे असो काही ।
परी मज रोग झाला नाही । ऐकुनी वाटते समाधान ।। ९३ ।।
रामकृष्णांची पवित्रता । ईश्वरनिर्भर नि:स्वार्थता ।
भावसमाधी त्यांची पाहता । वैष्णवचरण भारावला ।। ९४ ।।



रामकृष्णांना सर्वांसमोर । म्हणू लागला ईश्वरावतार ।
श्रद्धा भक्ती ठाकुरांवर । उत्तरोत्तर वाढू लागली ।। ९५ ।।
घडावया त्यांचा सहवास । नित्य येई दक्षिणेश्वरास ।
आणिक अनेक साधकांस । आणु लागला दर्शनाला ।। ९६ ।।
हाही दिवस लोटल्यावरी । गौरीपंडित दक्षिणेश्वरी ।
आला तांत्रिक साधक भारी । कीर्ती दिगंती तयाची ।। ९७ ।।
तपस्या करुनी तयाप्रत । सिद्धि झाल्या होत्या प्राप्त ।
वादासाठी येताच सभेत । उच्चार करितसे मंत्राचा ।। ९८ ।।
।।मंत्र ।। हा रे रे रे निरालंबो लंबोदरजननि कं यामि शरणम् ।
आन्तरिक शक्ति होई जागृत । वादास बसता वीरासनात ।
प्रतिस्पर्धी होती बलहत । गौरीपंडित अजिंक्य असे ।। ९९ ।।
प्रवेशला कालीमंदिरात । हा रे रे रे मंत्र गर्जत ।
श्रीरामकृष्ण होते तेथ । त्यांनीही मंत्र उच्चारिला ।। १०० ।।
त्यांच्यापेक्षा दीर्घ स्वर । गौरीपंडित काढी सत्वर ।
त्यापेक्षाही थोर उच्चार । करिती ठाकुर मंत्राचा ।। १ ।।
आरडा ओरड ती ऐकुनी । पहारेकरी आले धाउनी ।
काठ्या सोटे हाती घेउनी । पाहुनि हासू लागले ते ।। २ ।।
रामकृष्णांहुनी उच्च स्वर । काढण्या असमर्थ झाल्यावर ।
गौरीपंडित पडला गार । उद्विग्न झाला मनामधी ।। ३ ।।
ठाकुर सांगती त्यानंतर । ज्या सिद्धीच्या बळावर ।
विजय मिळवी दुसऱ्यावर । सहज लीलेने पंडित तो ।। ४ ।।
त्या सिद्धीचा पराभव । झाला त्याच्याच हितास्तव ।
जगन्माता घडवी सर्व । सिद्धी तयाची नष्ट केली ।। ५ ।।



ठाकुरांच्या देहात । ती सिद्धि झाली आकर्षित ।
तेव्हापासुनी गौरीपंडित । भक्त झाला ठाकुरांचा ।। ६ ।।
आणखी गौरीपंडिताप्रत । एक सिद्धी असे प्राप्त ।
त्या सिद्धीची हकीकत । ठाकुर सांगती कधी कधी ।। ७ ।।
तांत्रिक साधक करिती होम । गौरीपंडित करी अनुपम ।
तयास मृत्तिका वेदीचे काम । नसे काष्ठे रचावया ।। ८ ।।
वामहस्त पुढे करुन । काष्ठे तयावर एक मण ।
करी प्रज्वलित हुताशन । आहुती त्यात तो टाकितसे ।। ९ ।।
बराच वेळ चाले हवन । तोवर काष्ठांचे भारी वजन ।
अग्निच्या ज्वाळा करी सहन । आपुल्या सिद्धिच्या बळावर ।। ११० ।।
गौरीपंडित आल्यावर । मथुरबाबूने केला विचार ।
याही पंडिताबरोबर । शास्त्रीय वाद घडवावा ।। ११ ।।
बाबांची काय असे अवस्था । कळली पाहिजे जना समस्ता ।
शास्त्रिय रीतीने वाद होता । न राहे थारा संशयाला ।। १२ ।।
गौरीपंडिताला घेउन । सभेला निघाले रामकृष्ण ।
जगदंबेचे होताच दर्शन । भावावेश प्राप्त झाला ।। १३ ।।
अर्धबाह्य दशेत रामकृष्ण । असता पातला वैष्णवचरण ।
चरणांवर मस्तक ठेवुन । नमस्कारिले ठाकुरांस ।। १४ ।।
भावावेशात रामकृष्ण । होउनि गेले समाधिमग्न ।
खांद्यावर बैसले चढुन । वैष्णवचरण पंडिताच्या ।। १५ ।।
कृपेने कृतार्थ झालो आपण । ऐसे समजे वैष्णवचरण ।
आनंदाने अंत:करण । भरले झाला रोमांचित ।। १६ ।।
संस्कृत श्लोक तत्काळ रचुन । ठाकुरांचे करी स्तवन ।
ऐसे अपूर्व दृश्य पाहुन । स्तंभित जाहली मंडळी ।। १७ ।।



रामकृष्ण समाधिमग्न । प्रसन्नमूर्ती तेजोघन ।
वैष्णवचरणास वाटे पावन । जाहले पादस्पर्शाने ।। १८ ।।
ठाकुरांची समाधी उतरली । मग सभेला मंडळी गेली ।
कामास आरंभ करितेवेळी । विनविले गौरीपंडिताने ।। १९ ।।
आताच वैष्णवचरणावर । अपार कृपा वर्षिले ठाकुर ।
वाद नाही मी करणार । आज वैष्णवचरणासी ।। १२० ।।
आताच वाद करिता तयात । माझा पराभव असे निश्चित ।
वैष्णवचरणांच्या अंगात । दैवी बळ असे संचारिले ।। २१ ।।
शिवाय त्यांच्या माझ्या मतात । वाटे भेद नसावा किंचित ।
वादविवादासाठी तुरत । एकमतात काही जागा ।। २२ ।।
गप्पागोष्टी होउनी तेथ । सभा झाली विसर्जित
वादास न भ्याला गौरीपंडित । विवाद अनेक जिंकिले तये ।। २३ ।।
रामकृष्णांच्या सहवासात । राहुनि जाणे गौरीपंडित ।
महापुरुष हे साक्षात । विवाद यास्तव टाळतसे ।। २४ ।।
एक दिवस मग गमतीने । ठाकुर म्हणती गौरीकारणे ।
वैष्णवचरण अवतार म्हणे । काय तुम्हाला वाटतसे ।। २५ ।।
गौरी बोलला ठाकुरांला । केवळ अवतार वदणे तुम्हाला ।
कमीपणाचे वाटते मजला । यथार्थ तुम्हाला जाणितो मी ।। २६ ।।
जयाच्या केवळ अंशाने । युगायुगी अवतार होणे ।
अवतारकार्य ज्याच्या बळाने । चाले आपण स्वत: ते ।। २७ ।।
रामकृष्ण म्हणती हासत । तुम्ही आणखी पुढे गेलात ।
असे काय पाहिले माझ्यात । म्हणुनी ऐसे बोलतसा ।। २८ ।।
पंडित म्हणे बाबांलागुनी । अनेक शास्त्रे अवलोकुनी ।
प्रत्यक्ष माझ्या अनुभवातुनी । निश्चित विधान मी केले ।। २९ ।।



या संबंधी जर कोणाला । इच्छा असे वादावयाला ।
तर माझी त्या विवादाला । तयारी आहे याच क्षणी ।। १३० ।।
बाबा बोलती बालकवत । इतुक्या गोष्टी सांगता समस्त ।
परी मज काही न कळे त्यांत । म्हणे पंडित योग्यच हे ।। ३१ ।।
स्वत:च कोणी आपणाला । जाणु शकेना शास्त्रार्थ झाला ।
मग दुसऱ्याने कसे तुम्हाला । जाणावे ते सांगा बरे ।। ३२ ।।
तथापि आपण कोणावर । केवळ कृपाच केली तर ।
खचित जाणू शके तो नर । शंका यात नसे मला ।। ३३ ।।
गौरीपंडिताची सत्वर । भक्ती वाढली बाबांवर ।
शास्त्राध्ययन साधना समग्र । फळास आली संगतीने ।। ३४ ।।
रामकृष्णांच्या सहवासात । हृदयात वैराग्य झाले उदित ।
तनमनधन ईशसेवेत । लावण्याचा निश्चय करी ।। ३५ ।।
गौरीपंडिताच्या घराला । दक्षिणेश्वरचा वृत्तान्त कळला ।
पंडित लागले नादाला । गोसाव्याच्या दक्षिणेश्वरी ।। ३६ ।।
घरी या ऐसी पत्रे येती । पंडितास पडली भीती ।
घरची मंडळी येथे येती । संसारात ओढावया ।। ३७ ।।
सोडिले पाहिजे दक्षिणेश्वर । ऐसा तयाने करुनी विचार ।
रामकृष्णांच्या चरणांवर । मस्तक ठेविले भक्तीने ।। ३८ ।।
म्हणे मज द्या आशीर्वचन । ईश्वरदर्शन झाल्यावाचुन ।
न यावे संसारी परतुन । एवढे मागणे मज द्यावे ।। ३९ ।।
गौरीपंडित गेला निघुन । उग्र तपस्या करावी म्हणुन ।
कोणास कळले नाही स्थान । पंडिताच्या तपस्येचे ।। १४० ।।
रामकृष्णांचे आचरण । विपरित मानिती साधारण ।
केवि अवस्था असामान्य । सामान्य जनांनी जाणावी ।।४१ ।।



तथापि पंडित विद्वज्जन । गौरीपंडित वैष्णवचरण ।
साधक शास्त्रज्ञ असामान्य । यथार्थ जाणिती ठाकुरांस ।। ४२ ।।
ते अधिकारी असती थोर । अवस्था तयांची अत्युच्च फार ।
ईश्वराचा ते अवतार । आधार त्यांचा जगताला ।। ४३ ।।
इकडे भैरवी ब्राह्मणीला । आणखी एक मुद्दा मिळाला ।
गात्रदाह रामकृष्णांला । होउ लागला असह्याची ।। ४४ ।।
सकाळी सूर्योदयापासुन । अंगाची तलखी जाई वाढुन ।
वेदना होती अति दारुण । मध्यान्हकाळी तयांप्रती ।। ४५ ।।
भागिरथीत अंग बुडविती । मस्तकी ओले वस्त्र ठेविती ।
तीन तास पाण्यात राहती । तरिही दाह तो शमेना ।। ४६ ।।
जास्त वेळ बसता पाण्यात । व्याधी होइल उपस्थित ।
ऐसी भीती वाटे मनात । बाहेर येती अनिच्छेने ।। ४७ ।।
परत येउनी फरशीवर । ओले वसन टाकिती ठाकुर ।
बंद करुनी घेती द्वार । गडबडा भूवर लोळिती ।। ४८ ।।
गात्रदाह तो भयंकर । कोण साहू शकेल नर ।
बहुत उपचार करवी मथुर । औषधे दिधली वैद्याची ।। ४९ ।।
तथापि येइना काही गुण । भैरवी मथुरास करी कथन ।
काय फायदा औषध देउन । रोग नसे हा बाबांचा ।। १५० ।।
ईश्वरप्रेमे यांच्या मनात । खळबळ उठली असे अद्‌भुत ।
व्याकुळतेने होतसे प्राप्त । ऐसी अवस्था साधकांना ।। ५१ ।।
ऐशीच अवस्था राधेची । जाहली होती चैतन्यांची ।
तीच अवस्था रामकृष्णांची । सोपा उपाय याचा असे ।। ५२ ।।
घालणे सुगंधपुष्पमाला । चंदन चर्चिणे सर्वांगाला ।
यापरि करिता उपायाला । निश्चित शमतो गात्रदाह ।। ५३ ।।



भैरवीच्या म्हणण्यावर । विश्वास ठेविना बाबू मथुर ।
वाटे केले बहुत उपचार । हा एक करुनी पहावा ।। ५४ ।।

भैरवीने करिता उपाय । आश्चर्याची गोष्ट होय ।
गात्रदाह शमून जाय । चवथ्याच दिवशी पूर्णपणे ।। ५५ ।।

यावर थोड्याच दिवसांत । क्षुधा उद्‌भवली अत्यद्‌भुत ।
कितिही भक्षण केले पदार्थ । तरिही क्षुधा ती शमेना ।। ५६ ।।

एकसारखी रात्रंदिवस । खा खा सुटली ठाकुरांस ।
काय भानगड ही विशेष । तयांना वाटे उद्‌भवली ।। ५७ ।।

ब्राह्मणीलागी सांगितले । धीर देउनी तिने म्हटले ।
पूर्व काळी साधक जाहले । अशीच अवस्था तयांची ।। ५८ ।।

शास्त्रात याचे असे कथन । आता यावर उपाय करिन ।
व्यथा ही निमेल संपूर्ण । नाही कारण भ्यावयाचे ।। ५९ ।।

मथुरनाथास सांगुनी । ताटे खाद्यपदार्थ भरुनी ।
खोलीत ठेविली मांडुनी । बाबांस म्हणे बसा येथे ।। १६० ।।

जे जे येती तुमच्या मनात । ते ते खुशाल खावे पदार्थ ।
ऐसे करिता तीन दिवसांत । विपरीत क्षुधा ती थांबली ।। ६१ ।।

आणिक एकदा साधन काळी । ऐसीच क्षुधा उद्‌भवली ।
कामारपुकुरास त्या काळी । गेले होते रामकृष्ण ।। ६२ ।।

तयांची काया मजबूत असुन । अत्युग्र तपश्चर्या करुन ।
प्रकृति गेली ढासळून । नाजुक झाला देह तयांचा ।। ६३ ।।

प्रतिवर्षी चातुर्मासात । जाती कामारपुकुराप्रत ।
एकदा भूक लागली बहुत । मध्य रात्रीस बाबांना ।। ६४ ।।

अग्निमांद्य झाले म्हणुन । घेत होते हलके अन्न ।
रात्रीस थोडेसेच खाउन । ठाकुर होते झोपलेले ।। ६५ ।।



आता भूक लागली फार । मग उघडिले खोलिचे दार ।
ठाकुर येउनी बाहेर । हाका मारिती महिलांना ।। ६६ ।।

आताच काय गे निजलात । मजला भूक लागली बहुत ।
महिला म्हणती इतुक्यात । तुम्ही तर जेवुनी झोपले ।। ६७ ।।

बाबा म्हणती मजलागुन । केव्हा तुम्ही दिले भोजन ।
मी तर दक्षिणेश्वरावरुन । आताच आलो या ठाया ।। ६८ ।।

काय द्यावे ठाकुरांला । स्त्रियांलागी विचार पडला ।
थोडे पोहे ठाकुरांला । खाण्यास दिले बायांनी ।। ६९ ।।

बाबा म्हणती बायांप्रत । नुसते पोहेच नाही खात ।।
तव त्या म्हणती तब्येत । तुमची चांगली असेना ।। १७० ।।

जास्त तुम्ही काही खाल । पोटदुखी मग उद्भवेल ।
झाल्याबरोबर आता सकाळ । खावयाला करू आम्ही ।। ७१ ।।

परि न मानिती बाबा बोला । मग रामलाल दादा उठला ।
उठवुनी तयाने हलवायाला । आणिली मिठाई शेरभर ।। ७२ ।।

बाबांनी मिठाई शेरभर । आणिक पोहे केले पार ।
सर्वांस वाटले वाढणार । आता तयांची पोटदुखी ।। ७३ ।।

तथापि ठाकुरांना मुळिही । अपाय झाला नाही काही ।
जणु खाणारे ठाकुर नाही । अन्न भक्षिले अन्याने ।। ७४ ।।

ऐसा येता भावतरंग । बदलुनि जातसे त्यांचे अंग ।
ओसरल्यावर भावावेग । विकार उत्पन्न होत नसे ।। ७५ ।।



एकदा असता दक्षिणेश्वरी । उत्तर रात्री तिसऱ्या प्रहरी ।
म्हणती भूक लागली भारी । खावयास काही आणावे ।। ७६ ।।

लगेच उठला रामलाल । माताजींस सांगुनी तत्काळ ।
करविला हलवा पुष्कळ । त्वरित भक्षिला बाबांनी ।। ७७ ।।

जी स्त्री आली शिरा घेउन । तिजला पुसती रामकृष्ण ।
सांग शिरा हा खातो कोण । मी अथवा अन्य कोणीतरी ।। ७८ ।।
ती म्हणे तुमच्या अंतर्यामी । वास करुनी असे जो कोणी ।
शिरा भक्षण केला तयांनी । बाबा म्हणती ठीक असे ।। ७९ ।।
जैसा भाव होई उदित । तैसे शरीर बदले समस्त ।
आपुले मनचि असे देत । आकार प्रतिक्षणी शरिराला ।। १८० ।।
रामकृष्णांचे जीवन पाहता । शास्त्रवाक्याची सत्यता ।
निश्चित पटते आपुल्या चित्ता । विचार करिता थोडाही ।। ८१ ।।
भैरवीच्या उपायांनी । दाह क्षुधा निमाले दोन्ही ।
यास्तव मथुरबाबूच्या मनी । आदर तियेचा उद्भवला ।। ८२ ।।
शंकाच नव्हती भैरवीस । रामकृष्ण अवतारी पुरुष ।
प्रत्यक्ष जगदंबेने तियेस । साह्यास तयांच्या पाठविले ।। ८३ ।।
उज्ज्वल चरित्र भगवंताचे । स्मरता मने गाता वाचे ।
निश्चित कल्याण मानवाचे । व्हावयाचे अविलंबे ।। ८४ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १८५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा तेरावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय चौदावा

रामकृष्णा जगदुद्धारा । शुद्धा कारुण्यसागरा ।
जगत्पावना परमेश्वरा । साष्टांग नमन करितसे ।। १ ।।

रामकृष्णांना गुरूचा कधिही । शोध करावा लागला नाही ।
त्यांच्याकडे आले सर्वही । साधनकाळी योग्य गुरू ।। २ ।।

तंत्रोक्त साधनेच्या काळी । वात्सल्यभावसाधना वेळी ।
वेदान्तमताच्या साधनकाळी । आले सिद्ध त्या मतांचे ।। ३ ।।

ठाकुर म्हणती ईश्वरावर । समर्पण करुनी सर्व भार ।
व्याकुळतेने प्रार्थिता ईश्वर । तोच काळजी करित असे ।। ४ ।।

तोच सर्व व्यवस्था करुन । सुलभ करुनी देई साधन ।
निज भक्ताला दर्शन देउन । कृतार्थ करितसे परमेश ।। ५ ।।

भैरवी ब्राह्मणी थोर विदुषी । पाहताच कळे पाहणाऱ्यासी ।
थोर कुळात जन्म तियेसी । मिळाला असावा निश्चित ।। ६ ।।

तथापि तियेचे जन्मस्थान । संन्यास घ्यावया काय कारण ।
एवढी विद्या मिळविली कोठुन । कोणती साधने आचरिली ।। ७ ।।

भ्रमण कराया काय कारण । अध्यात्मविद्येचा गुरू कोण ।
कैसी उन्नती घेतली करुन । माहिती अज्ञात ही असे ।। ८ ।।

भैरवी गुणांनी असामान्य । अलौकिक लावण्यसंपन्न ।
स्वतंत्रवृत्ती निर्भयपूर्ण । अवलंबुनि नसे कोणावर ।। ९ ।।

रूपलावण्य तिचे पाहुन । शंकित झाले मथुरचे मन ।
चेष्टेने तये केला प्रश्न । भैरवी, भैरव कोण तुझा ।। १० ।।



प्रश्न आला अकस्मात । परि गडबडली नाही किंचित ।
न कोपे, ठेविले शांत चित्त । शिवमूर्ति दाविली बोटाने ।। ११ ।।
मथुर म्हणे तो अचेतन । ती म्हणे एवढी भैरवी होउन ।
अचेतनासही सचेतन । करिता येइना जरी मला ।। १२ ।।
तरि मी भैरवी झाले कशाला । उत्तर ऐकुनी मथुर लाजला ।
वाइट वाटले त्याच्या मनाला । भलतीच थट्टा केली तिची ।। १३ ।।
तंत्रशास्त्रात अधिकार विशेष । म्हणुनी अंबा पाठवी तियेस ।
करावया साह्य ठाकुरांस । काळात तंत्रसाधनेच्या ।। १४ ।।
यापूर्वीच तिच्याकडुन । उपदेशिले होते शिष्य दोन ।
चंद्र गिरीजा भक्तिमान । साधक अत्युच्च दर्जाचे ।। १५ ।।
उच्च दर्जाचे साधक असुन । साधनात प्रगती होउन ।
होउ न शकले ईश्वरदर्शन । जन्मभरात दोघांसही ।। १६ ।।
चंद्र प्रेमळ भक्तिमान । ईश्वरभक्त असे महान ।
गुटिका सिद्धी प्राप्त होउन । अहंकार मनात उद्भवला ।। १७ ।।
मंतरलेली गुटिका धारण । करिता न दिसे कोणालागुन ।
त्याने सिद्धिचा दुरुपयोग करुन । अवनति केली आपुली ।। १८ ।।
अहंकारासमवेत नाना । मनी उत्पन्न होती वासना ।
वासनापाशात पडता जना । ध्येयच्युती निश्चित असे ।। १९ ।।
अहंकार करी पुण्यनाश । समृद्ध करितसे पापास ।
अहंकाराने धर्मनाश । स्वार्थपरता प्राप्त होय ।। २० ।।
अहंकार भोगवी नाना भोग । साधका लावी प्रपंचरोग ।
आणि अहंकार नाशवी योग । सर्वनाश करी साधकाचा ।। २१ ।।
रामकृष्णदेव म्हणती । अहंकार असे चिज्जडग्रंथी ।
आत्म्याप्रती चित् बोलती । शास्त्रे देहास म्हणती जड ।। २२ ।।



चित् आणि जड भिन्न असुन । एकत्र करी हा गाठ पाडुन ।
मनात भ्रम करी उत्पन्न । देहेंद्रियादि मी असे ।। २३ ।।
न सुटता चिज्जडांची ग्रंथी । जिवास कैसी मिळावी मुक्ती ।
यास्तव अहंकारत्याग निश्चिती । केला पाहिजे साधकाने ।। २४ ।।
साधना करिता मिळे सिद्धी । वापरावया होतसे बुद्धी ।
अहंकाराची होउनी वृद्धी । उन्नती खुंटते साधकाची ।। २५ ।।
बाबा म्हणती विष्ठेसमान । सिद्धी असती घ्यावे जाणुन ।
त्याकडे जाऊ न द्यावे मन । तरीच उन्नती होत असे ।। २६ ।।
चंद्रास गुटिकासिद्धी प्राप्त । होता अहंकार शिरला मनात ।
गुप्त होउनी असे तो जात । श्रीमंताच्या कन्येकडे ।। २७ ।।
करुनी सिद्धिचा दुरुपयोग । घेउ लागला अयोग्य भोग ।
सिद्धी झाली नष्ट सवेग । फजिती झाली मग त्याची ।। २८ ।।
ब्राह्मणीने उपदेशित । दुसरा शिष्य गिरिजानाथ ।
तयास झाली सिद्धी प्राप्त । साधना करीत असताना ।। २९ ।।
गिरिजास एकदा सवे घेउन । फिरावया गेले रामकृष्ण ।
जवळच होते एक उद्यान । मल्लिकाच्या मालकीचे ।। ३० ।।
ईश्वरीय कथाप्रसंगात । तन्मय झाले तीनही भक्त ।
एक प्रहर झाली रात । परत यावया निघाले ।। ३१ ।।
अंधकार दाटला फार । मार्ग दिसेना अणुमात्र ।
ठेचा लागती वरचेवर । त्रास होतसे ठाकुरांना ।। ३२ ।।
गिरिजानाथ बाबांस वदला । दादा उजेड देतो तुम्हाला ।
पाठमोरा उभा राहिला । प्रकाश निघाला पाठीतुन ।। ३३ ।।
प्रकाशकिरणे बाहेर पडुन । उजळुनी गेला मार्ग पूर्ण ।
बाबा सांगती आलो निघुन । त्या प्रकाशात मंदिराला ।। ३४ ।।



मग थोडे हासुनी सांगती । गिरिजाची ती अद्भुत शक्ती ।
कृपा तयावर करण्याप्रती । नष्ट करी जगदंबा ।। ३५ ।।
गिरिजाचे करावयाला हित । आकर्षिली या देहात ।
नष्ट होता सिद्धी त्वरित । उन्नति झाली गिरिजाची ।। ३६ ।।
रामकृष्णांचे होता दर्शन । होतसे सिद्धीचे आकर्षण ।
साधकाचे कराया कल्याण । सिद्धी नष्ट होत असे ।। ३७ ।।
असुनही सिद्धींचा मेळावा । असुनही सकळ शक्तिचा ठेवा ।
ठाकुरांच्या नसेच गावा । बालक भावे ते वर्तती ।। ३८ ।।
एवढे असुनी सामर्थ्य सर्व । कधिही केला नाही गर्व ।
आणि दृश्य चमत्कार लाघव । कधिही नाही दाखविले ।। ३९ ।।
सच्छिष्य मिळता गुरुलागुन । होतसे अत्यंत समाधान ।
अलौकिक शिष्य रामकृष्ण । आनंद झाला भैरवीला ।। ४० ।।
वाटे साधनांचे सकल । आपुल्या तपश्चर्येचे फळ ।
कसे बाबांना देता येइल । अत्यंत अल्प काळामधी ।। ४१ ।।
ठाकुरांनी मंदिरी जाउन । जगन्मातेची अनुमती घेउन ।
अति उल्हासे तंत्रसाधन । पंचवटीत आरंभिले ।। ४२ ।।
ब्राह्मणी देतसे उत्तेजन । ठाकुरांना साधनेवाचुन ।
न सुचे आणिक काही अन्य । तळमळ लागली मनामधे ।। ४३ ।।
भैरवी आणू लागली जिन्नस । जे जे लागती साधनेस ।
दिवसभर करुनी प्रयास । ठाकुरांस साह्य करित असे ।। ४४ ।।
गंगा नसे त्या प्रदेशातुनी । नृमुंडादि मुंडे आणुनी ।
पंचवटीत ठेविली गाडुनी । वेदिका दोन बनविल्या ।। ४५ ।।
जप ध्यान आणि पुरश्चरण । यांतच बाबा गेले गढुन ।
रात्र संपली संपला दिन । याचेहि भान नच राहे ।। ४६ ।।



भैरवी फार लांब लांबुनी । दुष्प्राप्य वस्तू मिळवुनी ।
पंचवटीत त्या सर्व ठेउनी । ठाकुरांस पाचारण करितसे ।। ४७ ।।
बाबा म्हणती माझ्याकडुन । जगन्मातेचे करवी पूजन ।
भैरवी ब्राह्मणी जपध्यान । करावयाला सांगतसे ।। ४८ ।।
न करी जप मी फार वेळ । एकच वेळा फिरविता माळ ।
लागतसे समाधी तत्काळ । दर्शने होती अत्यद्भुत ।। ४९ ।।
चौसष्ट तंत्रांतील गहना । मजकडुनी ती करवी साधना ।
ज्या साधनात साधक नाना । पथभ्रष्ट होती त्या काली ।। ५० ।।
अनुभव दर्शने विलक्षण । साधनसमयी होती प्रतिदिन ।
जगज्जननीच्या कृपेकरुन । साऱ्यांतून पार पडलो मी ।। ५१ ।।
एकदा संध्याकाळी ब्राह्मणी । घेउनि आली सुंदर तरुणी ।
मला म्हणाली देवी समजुनी । हिचे पूजन करी आता ।। ५२ ।।
संपूर्ण पूजन संपल्यावर । ब्राह्मणी तिला करुनी विवस्त्र ।
मज म्हणे हिच्या मांडीवर । बसुनी जप करी आता ।। ५३ ।।
ऐकुनी धडकी भरली मनात । व्याकुळ होउनी बोललो रडत ।
अंबे तुझ्या या बालकाप्रत । एवढे सामर्थ्य कसे काय ।। ५४ ।।
इतुक्यात माझ्या हृदयात । बळ संचरले अकस्मात ।
मंत्रोच्चारण करित करित । बसलो तियेच्या मांडीवर ।।५५ ।।
मांडीवर बसता तत्क्षणी । मला समाधी गेली लागुनी ।
शुश्रुषा करू लागली ब्राह्मणी । शुद्धीवर मज आणावया ।। ५६ ।।
जेधवा शुद्धी झाली प्राप्त । धीर देउनी भैरवी मजप्रत ।
म्हणाली बाबा क्रिया समस्त । पूर्ण जाहली भिऊ नको ।। ५७ ।।
इतर साधक या अवस्थेत । कसातरी थोडा जप करतात ।
तू तर विसरुनी भान समस्त । समाधीत मग्न झालासी ।। ५८ ।।



तिचे भाषण ऐकुनी मजला । अंत:करणात धीर आला ।
कृतज्ञतेने जगदंबेला । नमस्कार केला पुन:पुन्हा ।। ५९ ।।
आणिक भैरवी एक दिन । शवाच्या कवटीत मासे तळुन ।
बोलती झाली मजलागुन । नैवेद्य करी अंबेला ।। ६० ।।
म्हणे प्रसाद करी ग्रहण । भक्षिला नैवेद्य आज्ञेवरुन ।
परंतु मनात घृणा उत्पन्न । नाही झाली यत्किंचित ।। ६१ ।।
ब्राह्मणी आली एक दिनी । नरमांसाचा तुकडा घेउनी ।
जगदंबेला नैवेद्य करुनी । सांगु लागली मजलागी ।। ६२ ।।
जिव्हेने यास करी स्पर्श । परंतु उत्पन्न झाली किळस ।
स्वमुखात तिने घालुनी घास । म्हणाली घृणा करू नये ।। ६३ ।।
चंडिकामूर्ती भयंकर । दिसली माझ्या डोळ्यासमोर ।
आई आई म्हणत सत्वर । भावाविष्ट होउनी पडलो मी ।। ६४ ।।
भैरवीने त्याच स्थितीत । तुकडा घातला माझ्या मुखात ।
परि तयावेळी यत्किंचित । घृणा मनात आली नसे ।। ६५ ।।
पूर्णाभिषेक होईपर्यंत । तांत्रिक साधना केल्या बहुत ।
आईच्या कृपेने झालो समर्थ । क्रिया समस्त करावया ।। ६६ ।।
युगुलाच्याही आनंदास । समर्थ झालो पाहावयास ।
मानवबुद्धीचा लवलेश । नाहीच मनात उद्भवला ।। ६७ ।।
ईश्वरभाव उद्दीप्त होउन । होउनि गेलो समाधिमग्न ।
तेव्हा ब्राह्मणी मजलागुन । म्हणे सिद्धकाम झालास ।। ६८ ।।
वीरभावाची अखेरीस । हीच तंत्रोक्त साधना खास ।
आता मात्र तू बसलास । आनंदासनी अढळपणे ।। ६९ ।।
तंत्रोक्त साधना असता करित । स्त्रीजातीचा माझ्या मनात ।
मातृभावच असावा नित्य । महिलात माता दिसत असे ।। ७० ।।



तंत्रसाधनी मद्यसेवन । करणे अगदी अवश्य असुन ।
कधी न केले मद्यपान । टिळाच लावी कपाळाला ।। ७१ ।।
मद्याचे नाव कारण । ऐकुनी अथवा वास घेउन ।
जगत्कारणाचे स्मरण । होउनी समाधी लागतसे ।। ७२ ।।
साधनेस करुनी सुरुवात । फळ तियेचे व्हावया प्राप्त ।
जगज्जननीजवळी हट्ट । धरिताच होई कार्यसिद्धी ।। ७३ ।।
साधनेचे साध्य प्राप्त । होतसे तीनच दिवसांत ।
अधिक वेळ नसे लागत । सांगत असती रामकृष्ण ।। ७४ ।।
स्त्रियांच्या ठायी मातृभाव । माझ्या मनात पावे उद्भव ।
विश्वामधल्या स्त्रिया सर्व । मातेप्रमाणे वाटती ।। ७५ ।।
म्हणुनी आपुल्या सहचारिणीत । जगन्मातेचे रूप दिसत ।
पूजिले प्रत्यक्ष पत्नीप्रत । मातृरूप पाहुनी तिच्यामधी ।। ७६ ।।
आपुले देह मन प्राण । जगदंबेला केले अर्पण ।
दिसले ज्ञानाग्नीने व्यापुन । आत बाहेर गेलो मी ।। ७७ ।।
प्रत्यक्ष दिसू लागले मजप्रत । कुंडलिनी शक्ती झाली जागृत ।
मूलाधारचक्रापासुनी निघत । जातसे सहस्रार कमलाकडे ।। ७८ ।।
कमले होताच उन्मीलित । अद्भुत अनुभव हृदयात ।
उदित होत आहेत अनंत । प्रत्यक्ष ऐसे दिसे मला ।। ७९ ।।
ऊर्ध्वमार्गे ती असता जात । कमले अधोन्मुख मुकुलित ।
होतात ऊर्ध्वमुख उन्मीलित । ऐसे प्रत्यक्ष दिसत असे ।। ८० ।।
दिसे सुषुम्ना नाडीमधुन । माझ्याच वयाचा तेजोघन ।
एक पुरुष कमळास जाउन । जिभेने स्पर्श करित असे ।। ८१ ।।
स्पर्श होताच कमळालागुनी । प्रस्फुटित ते कमल होउनी ।
पूर्ण विकास पावे तत्क्षणी । कधी कधी ऐसे दिसत असे ।। ८२ ।।



विश्वातिल निरनिराळे ध्वनी । सर्व जाती एकवटुनी ।
जगात प्रचंड प्रतिक्षणी । होती ध्वनी हे पाहिले ।। ८३ ।।
बेलाखाली करिता साधन । ब्रह्मयोनिचे झाले दर्शन ।
पाहिले प्रसवी ती प्रतिक्षण । विलक्षण अनंत ब्रह्मांडे ।। ८४ ।।
त्या काळात मजलागुन । पशुपक्ष्यांचे कळे भाषण ।
हृद्गत येऊ लागले कळुन । सकळहि जीवजंतूंचे ।। ८५ ।।
साधनाकाळ येता संपत । अणिमादि प्रमुख सिद्धि अष्ट ।
आविर्भुत झाल्या शरिरात । येती अनुभव नानापरी ।। ८६ ।।
हृदय म्हणाला मधुन मधुन । सिद्धिचा प्रयोग घ्यावा करुन ।
जगन्मातेकडे जाउन । तिचे मत मी विचारिले ।। ८७ ।।
माता देई समजावुन । सिद्धी त्याज्य विष्ठेसमान ।
माझ्या मनात तेव्हापासुन । किळस उद्भवली सिद्धींची ।। ८८ ।।
एकदा इच्छा करी मन । मोहिनीमायेचे व्हावे दर्शन ।
मग प्राप्त झाले एक दिन । विलक्षण दर्शन मजलागी ।। ८९ ।।
प्रकट झाली भागिरथीत । लावण्यवती स्त्री अत्यंत ।
पंचवटीस ती असता जात । माझ्या समीप पातली ।। ९० ।।
दिसले स्त्री ती गर्भवती । लगेच झाली तिची प्रसुती ।
अतिशय सुंदर पुत्राप्रती । जन्म दिधला त्या स्त्रीने ।। ९१ ।।
ममतेने बाळ पदराखाली । घेउनी ती पाजु लागली ।
थोड्या वेळात बदलुनि गेली । काया तियेची पूर्णपणे ।। ९२ ।।
विक्राळ झाले तिचे वदन । भयंकर रूप केले धारण ।
ताडकन मग तिने उठुन । बालक तोंडात टाकिले ।। ९३ ।।
तिने चघळून चघळून । बालक पूर्ण टाकिले गिळुन ।
आलेल्याच मार्गे परतुन । अदृश्य झाली गंगेत ।। ९४ ।।



आणिक सांगती रामकृष्ण । जगन्मातेचे होतसे दर्शन ।
तिच्या द्विभुजा मूर्तीपासुन । मूर्ती दशभुजा पाहिल्या ।। ९५ ।।
त्यांच्यामधल्या काही मूर्ती । ठाकुरांना उपदेश करिती ।
कित्येक असती सौंदर्यवती । वर्णन करणे अशक्य त्यांचे ।। ९६ ।।
सर्वांत लावण्यवती भारी । असे श्रीराजराजेश्वरी ।
षोडशी त्रिपुरासुंदरी । वैखरी वर्णू न शके तिला ।। ९७ ।।
सौंदर्य एवढे असे अद्‌भुत । लावण्य न सामावे अंगात ।
वाटे सौंदर्य गळुन पडत । पसरतसे दश दिशांना ।। ९८ ।।
त्या काळात दिसती भैरव । दिसती अनेक देवता देव ।
येउ लागती अपूर्व अनुभव । अलौकिक दर्शने प्राप्त होती ।। ९९ ।।
मोकळे झाले सुषुम्नाद्वार । अवस्था झाली जणु किशोर ।
यज्ञोपवित नेसलेले धोतर । केव्हा गळे तेहि कळेना ।। १०० ।।
जगदंबेच्या चरणी मन । एवढे तन्मय गेले होउन ।
देहाचेहि न राहे भान । काय कथा मग वस्त्रांची ।। १ ।।
इतर कोणी परमहंस । प्रयत्ने त्यागिती वसनास ।
केला नाही तसा अभ्यास । बाबांनी नग्न राहण्याचा ।। २ ।।
रामकृष्णदेव सांगत । माझी साधना होता समाप्त ।
अद्वैतभाव झाला उदित । बुद्धीत पक्का तो बाणला ।। ३ ।।
ज्या वस्तू पूर्वी मजप्रत । त्याज्य अपवित्र वाटत ।
त्या वस्तू पवित्र अत्यंत । वाटु लागल्या मजलागी ।। ४ ।।
तेधवा माझी अंगकांती । तेज:पुंज झाली होती ।
लोक टकमका पाहु लागती । आश्चर्य करिती सकळिक ।। ५ ।।
रामकृष्ण निरभिमानी । वाईट वाटे तयांच्या मनी ।
प्रर्थिती जगज्जनीलागुनी । व्याकुळ होउनी तेधवा ।। ६ ।।



आई मज नको बाह्यरूप । देई आध्यात्मिक स्वरूप ।
आत जा तेजास म्हणता खूप । सामान्य स्वरूप मग झाले ।। ७ ।।
ब्राह्मणीविषयी बाबा म्हणत । योगमाया ती साक्षात ।
भैरवी होउनी अवतरत । नाम घेउनी योगेश्वरी ।। ८ ।।
तंत्रसाधनांनी बाबांला । दिव्यदृष्टिचा लाभ झाला ।
धर्मलाभ तेथे घ्यावयाला । कळले येतिल बहुत जन ।। ९ ।।
ही गोष्ट सांगता मथुरला । मोदे वदे तो बाबांला ।
आम्ही भक्तजनांचा मेळा । आनंद करू तुमच्यासह ।। ११० ।।
रासमणीच्या मृत्यूनंतर । संपत्ती तिची होती अपार ।
व्यवस्थापक झाला मथुर । ठाकुरांवर श्रद्धा असे त्याची ।। ११ ।।
बाबांशी संपर्क आल्यापासुन । जे काम होई त्याच्याकडुन ।
सिद्ध होई अविलंबे करुन । प्राप्त होतसे यश त्याला ।। १२ ।।
तयाची झाली दृढ समजुत । आपणास यश जे होतसे प्राप्त ।
ठाकुरांची ती कृपा समस्त । असे निश्चित आपणावर ।। १३ ।।
संपत्तीचे धनी ठाकुर । आपण तयांचे मुखत्यार ।
संकटातुनि तेच सोडविणार । काळजी घेणार आपुली ते ।। १४ ।।
आपुले सर्वस्व तेच असती । आपुली एकच कर्तव्यपूर्ती ।
मिळावी सेवा करण्याप्रती । तयांची तनमनधनांनी ।। १५ ।।
रामकृष्णांच्या सेवेवाचुन । सुचेना काही तयाला अन्य ।
शब्द निघताच तोंडातुन । वरचेवर मथुरने झेलावा ।। १६ ।।
बाबांस ज्या कार्यापासुन । आनंद होई मनापासुन ।
मथुरबाबुने ते जाणुन । कार्य करावे अविलंबे ।। १७ ।।
अन्नमेरुव्रतानुष्ठान । केले पंडितास बोलावुन ।
सुवर्णपात्रेहि केली दान । तांदुळ तीळ त्याने वाटले ।। १८ ।।



हरिदास गवई बोलावुन । रात्रंदिवस भजनकीर्तन ।
करावे मग तेथे आपण । अवश्य राहावे उपस्थित ।। १९ ।।
रामकृष्णांची उत्सवात । बालकाप्रमाणे होई गत ।
मंगलकार्य असता घरात । उल्हास हृदयात न सामावे ।। १२० ।।
ऐकता पदे ती भक्तिपूर्ण । होती ते भावावेशापन्न ।
आनंदाचे हृदयी तुफान । उठुनि समाधी लागतसे ।। २१ ।।
बाबांस समाधी लागता गान । सर्वोत्तम ते समजून ।
मथुर देतसे मूल्यवान । वस्तु बिदागी गायकाला ।। २२ ।।
तेधवा साधु संत संन्यासी । येत असती दक्षिणेश्वरासी ।
तेथूनचि जगन्नाथपुरीसी । रस्ता होता जावयाचा ।। २३ ।।
दक्षिणेश्वरी दिशाजंगल । अन्नपाण्याची सोय सकळ ।
यास्तव साधू काहि काळ । राहती गंगातीरावर ।। २४ ।।
रामकृष्णांच्या आले मनात । जे जे इच्छिती साधुसंत ।
मिळता तयांना साधनात । निमग्न होउनी जातील ।। २५ ।।
मथुरास गोष्ट ही सांगितली । तयाने सर्व व्यवस्था केली ।
लोटे कमंडलू शिधा कांबळी । मिळती साधूंस वसनेही ।। २६ ।।
तांत्रिक साधकासाठी म्हणुन । भांग गांजा मद्यपान ।
सर्व व्यवस्था दिधली करुन । ज्यास जे हवे मिळत असे ।। २७ ।।
श्रीचक्राच्या अनुष्ठानास । वस्तु लागली साधकांस ।
त्याची सुद्धा व्यवस्था विशेष । करुनी देती रामकृष्ण ।। २८ ।।
त्या वस्तूंचा उपयोग करुन । जगदंबेचे करिता पूजन ।
यथार्थ साधकांना पाहुन । समाधान होई बाबांचे ।। २९ ।।
कोणी श्रीचक्राचे साधन । करिता नेती बाबांलागुन ।
म्हणती करा मद्यग्रहण । आग्रह करिती ठाकुरांस ।। १३० ।।



परी कळता तयालागुन । बाबा न करिती मद्यपान ।
आग्रह मग देती सोडुन । लाविती टिळा कपाळाला ।। ३१ ।।

काही साधू मद्य सेवुन । कराया बसती ईशचिंतन ।
देहभान जाती विसरुन । होती तन्मय चिंतनात ।। ३२ ।।

परंतु तयांतिल काही लोक । पिण्याचा करुनी अतिरेक ।
झिंगुनि पडती बहुतेक । मद्य देणे मग थांबविले ।। ३३ ।।

साधुलोकांचे नाना प्रकार । येती लक्षुनी दक्षिणेश्वर ।
ईश्वरीय गोष्टींत गोडी फार । आनंद अपार चित्ती वसे ।। ३४ ।।

येती संन्यासी परमहंस । नसती ते पोटभरू पुरुष ।
निशिदिनि बाबांच्या खोलीस । चालतसे ये जा तयांची ।। ३५ ।।

चालती वेदान्ताच्या गोष्टी । सदैव प्रिय अस्ति भाति ।
गोष्ट निघेना तयापरती । अहर्निश चर्चा चालतसे ।। ३६ ।।

बाबा सांगती रक्त अमांश । भोगत इकडे मी भोगास ।
तिकडे ऐके चर्चा विशेष । वादविवाद साधुपुरुषांचा ।। ३७ ।।

काही नियता प्रश्न गहन । मिटत नाही वाद पाहुन ।
जगज्जननी माझ्याकडुन । सोपीशी गोष्ट वदवितसे ।। ३८ ।।

माझे उत्तर परिसून । मंडळी पावे समाधान ।
वादविवाद जाई संपुन । कितीतरी दिवस गेले असे ।। ३९ ।।

संन्यासी येणे जेव्हा थांबले । रामायतपंथी येउ लागले ।
भक्त बैराग्यांचे मेळे । येउ लागले दक्षिणेश्वरा ।। १४० ।।

पूर्वी सख्य दास्य शांत । भक्तिसाधना झाल्या समाप्त ।
ठाकुरांच्या आले मनात । वात्सल्यभक्ती ती करावी ।। ४१ ।।

भक्तिमार्गाचे सर्व पंथ । बाबा आणिती आचरणात ।
जगतास झाले आदर्शभूत । वृत्तान्त पुढे तो परिसावा ।। ४२ ।।



भगवंतांची कथा अद्‌भुत । श्रोत्यास करो ती शुद्धचित्त ।
भक्तिभाव अंत:करणात । होवो उदित सकलांच्या ।। ४३ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १४४ ।।


।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा चवदावा अध्याय ।।

❖ ❖ ❖





वात्सल्यभावाची साधना करताना श्रीरामकृष्णांना झालेलं बाल रामचंद्राचं दर्शन.



मधुरभावाची साधना करताना श्रीरामकृष्णांना श्रीराधाराणी व भगवान श्रीकृष्णाचं झालेलं दर्शन.

ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय पंधरावा

नमन माझे रामकृष्णा । सदैव चिंतन लागो मना ।
भक्ति व्यापो अंत:करणा । गावो रसना नाम तुझे ।। १ ।।
मग रामायतपंथवाले । भक्त बैरागी चेउ लागले ।
ठाकुरांच्या मनात आले । वात्सल्य भक्ती आचरावी ।। २ ।।
रामयतपंथी त्या साधूंत । जटाधारी नामे संत ।
रामचंद्राचा परम भक्त । वात्सल्य बालरामावरी ।। ३ ।।
त्याच्याजवळ एक होती । रामचंद्राची बालमूर्ती ।
आराध्य देवतेवरी प्रीती । भक्तिभराने भजे तिला ।। ४ ।।
मूर्तिचे तो करी पूजन । त्यात अत्यंत तन्मय होउन ।
मग एकाग्र जाहले मन । अंत:करण शुद्ध जाहले ।। ५ ।।
यापरी तो करी पूजन । उलटुनि जाता बहुत दिन ।
समोर दिसू लागली सान । ज्योतिर्मय मूर्ती रामाची ।। ६ ।।
दिसू लागले भगवान । करिती प्रत्यक्ष पूजा ग्रहण ।
ऐसे करिता तयाचे मन । विषयावरुनी उडाले ।। ७ ।।
प्रथम प्रथम करिता पूजन । तयास होत असे दर्शन ।
भक्तिप्रेम जाता वाढुन । अहर्निश दर्शन होत असे ।। ८ ।।
दिसे आपुल्या सभोवती । रामचंद्राची बालमूर्ती ।
बाबाजी त्या मूर्तिप्रती । रामलाला म्हणत असे ।। ९ ।।
रामलाला असे खेळत । उडे बागडे आनंदात ।
जटाधारीच्या हृदयात । सर्वदा आनंद वसतसे ।। १० ।।



रामलालाची घेउनी मूर्त । बाबाजी आला तीर्थे करित ।
पातला दक्षिणेश्वराप्रत । अवचित फिरत जटाधारी ।। ११ ।।
तो रामलालाच्या सेवेत । तन्मय होतसे सदोदित ।
ठाउक नव्हते इतरांप्रत । दर्शन तयाला होत असे ।। १२ ।।
भगवंताची बालमूर्ती । दिसतसे जटाधारीप्रती ।
कोणासही याची माहिती । सांगितली नव्हती तयाने ।। १३ ।।
लोक इतुकेच जाणती । बाबाजी पुजितो बालमूर्ती ।
अत्यंत तन्मय होई चित्ती । पूजनात रामलालाच्या ।। १४ ।।
भावराज्यातिल अधीश्वर । असामान्य विभूती ठाकुर ।
जाणते झाले सर्व सत्वर । रहस्य जटाधारीबाबाचे ।। १५ ।।
आदर उपजुनी रामकृष्ण । व्यवस्था तयाची देती करुन ।
पूजनास लागे जे सामान । जटाधारिला ते देती ।। १६ ।।
बाबाजी करिताना पूजन । निरखुनी पाहती रामकृष्ण ।
पुष्कळ वेळ ते दिवसातुन । राहती जटाधारीसवे ।। १७ ।।
या पूर्वी रामकृष्णांनी । जगदंबेची सखी म्हणुनी ।
स्वत: स्त्री वेष घेउनी । केली होती सख्यभक्ती ।। १८ ।।
त्याकाळी तन्मय होउन । पुष्पमाला गुंफुनी छान ।
स्वत: पंख्याने वारा घालुन । सेवा केली अंबेची ।। १९ ।।
तेधवा मथुरनाथाकडुन । करविले दागिने मौल्यवान ।
जगन्मातेस ते लेववून । निमग्न राहती पूजेत ।। २० ।।
तत्काळ जाणती रामकृष्ण । जटाधारी भक्त महान ।
बालरामाच्या सेवेत मग्न । सदा बाबाजी राहतसे ।। २१ ।।
बालरामाची मूर्ती पाहुनी । तत्क्षणी ठाकुरांच्या मनी ।
वात्सल्यभाव उदित होउनी । वाटले साधना करावी ही ।। २२ ।।



श्रीरघुवीर कुळदैवत । पिता क्षुदिराम रामभक्त ।
वात्सल्यभाव झाला उदित । हृदयात रामकृष्णांच्या ।। २३ ।।

रामलालाचे होता दर्शन । अंत:करणात आकर्षण ।
उत्पन्न होउनी रामकृष्ण । इच्छिती संगती तयाची ।। २४ ।।

दिवसातील पुष्कळ वेळ । बाबा असती रामाजवळ ।
जटाधारिकडुनी तत्काळ । घेतला त्यांनी राममंत्र ।। २५ ।।

कितितरि दिवस जटाधारी । रामलालाची सेवा करी ।
त्यास सदैव बरोबरी । घेउनी करी तीर्थे तो ।। २६ ।।

जी का भिक्षा मिळे तयाला । नैवेद्य करी रामलालाला ।
प्रत्यक्ष दिसतसे बाबाजीला । नैवेद्य खातसे रामचंद्र ।। २७ ।।

रामलाला हट्ट करुन । पदार्थ खावया मागे छान ।
म्हणे बाहेर येऊ फिरुन । बाबाजीला स्पष्ट दिसे ।। २८ ।।

रामलालाच्या सहवासात । जटाधारी असे आनंदात ।
देहभानही असे विसरत । प्रेमळ सद्भक्त बाबाजी ।। २९ ।।

रामलालाच्या लीला समस्त । ठाकुरांना दिसती स्पष्ट ।
मग त्या लीला पाहत पाहत । दिवस घालविती रामकृष्ण ।। ३० ।।

जसजसे दिवस जाती । तसतसी रामलालाची प्रीती ।
ठाकुरांवर झाली वाढती । तयांच्या जवळ राहे सदा ।। ३१ ।।

ठाकुर असता बाबाजीजवळ । रामलाला खेळुनी खेळ ।
मौज करितसे सर्वकाळ । नाचे बागडे आनंदे ।। ३२ ।।

ठाकुर निघुनी येता तेथुन । रामलाला येई मागुन ।
सांगता येऊ नकोस म्हणुन । तरिही धावत येत असे ।। ३३ ।।

रामकृष्णांना प्रथम वाटे । जटाधारिचे प्रेम गोमटे ।
त्यांना सोडुनि हा एकटे । इकडे येतो कासयास ।। ३४ ।।



ठाकुरांनः स्पष्ट दिसत । रामलाला नाचत नाचत ।
त्यांच्या पुढे मागे चालत । बरोबर येत असताना ।। ३५ ।।
कधी बसाया मांडीवरी । रामलाला हट्ट धरी ।
मांडीवर घेताच सत्वरी । करितसे घाई उतरण्याची ।। ३६ ।।
मांडीवरुनी उतरे त्वरित । लगेच धूम ठोकी उन्हात ।
मग जाउनी काट्याकुट्यात । फुले तोडित असे तो ।। ३७ ।।
गंगेत जाई तो अवखळ । पाण्यात डुंबे पुष्कळ वेळ ।
तयाने असले करावे खेळ । सांगितले तरी ऐकू नये ।। ३८ ।।
बाळ फिरू नकोस उन्हात । पायास फोड येतील बहुत ।
पुरे कर डुंबणे पाण्यात । होईल सर्दी तुजलागी ।। ३९ ।।
परि हे सगळे ऐकतो कोण । पद्मपत्रवत् सुंदर नयन ।
ठाकुरांकडे पाही रोखुन । आणिक हासे खदखदा ।। ४० ।।
तयाला म्हणती रामकृष्ण । थांब आता मार देइन ।
म्हणजे राहिल आठवण । उन्हातुनि त्याला आणती ।। ४१ ।।
आल्यावरही तो खोलीत । खोड्या चालू असती नित्य ।
मग एखादी तयाप्रत । चापट द्यावी ठाकुरांनी ।। ४२ ।।
मार तयाला बसता मात्र । भरून येती राजीवनेत्र ।
बाबांकडे मग कोमलगात्र । केविलवाणे पाहातसे ।। ४३ ।।
पाहुनी तयाचे दीनवदन । दुःखित होती रामकृष्ण ।
मांडीवर मग त्यास घेउन । समजुत तयाची काढिती ।। ४४ ।।
ठाकुर सांगती एक दिन । जात असता कराया स्नान ।
मी येतो हा हट्ट धरुन । मागे लागला रामलाला ।। ४५ ।।
रामलालाला सवे घेउन । गेलो केले गंगास्नान ।
परी रामलाला नदीतुन । बाहेर येइना पाचारिता ।। ४६ ।।



त्याला बहुत पाहिले सांगुन । पाहिले पुष्कळ समजावुन ।
परंतु सारे ऐकतो कोण । थांबेना डुंबणे तयाचे ।। ४७ ।।

मग तयाचा राग येउन । पाण्यात स्वत: मी उतरुन ।
धरिले तयाला दडपुन । म्हणालो आता डूब कसा ।। ४८ ।।

मग खरोखर त्याचा प्राण । कासाविस गेला होउन ।
उभा राहिला खाडकन । धाप लागली तयाप्रती ।। ४९ ।।

ती तयाची अवस्था पाहुन । पिळवटले मम अंत:करण ।
भरुनी आले माझे नयन । म्हणालो काय मी केले हे ।। ५० ।।

अत्यंत दु:खित झाले मन । मांडीवर तयाला घेउन ।
समूजत तयाची काढुन । रामलालाला शांतविले ।। ५१ ।।

आणिक एकदा रामलाला । हट्ट करी द्या खावयाला ।
फोलकटांसह दिधल्या त्याला । खावयाला लाह्या मी ।। ५२ ।।

परी लाह्यांच्या फोलकटांनी । जीभ तयाची गेली चिरुनी ।
ती अवस्था त्याची पाहुनी । दु:खित झाले मन माझे ।। ५३ ।।

मांडीवर मग त्याला घेउन । रडत बसलो गळा काढुन ।
वाटे अविचार घडला महान । दरिद्री लाह्या मी दिधल्या ।। ५४ ।।

कौसल्या माता ज्या रामाला । मऊ पदार्थ दे खावयाला ।
दूध लोणी मिष्टान्नाला । घेउनी भरवी प्रेमाने ।। ५५ ।।

अशा अरविंदवदनाला । लाह्या खाऊ घालता मजला ।
कसा संकोच नाही वाटला । म्हणत रडले रामकृष्ण ।। ५६ ।।

अन्न शिजवुनी जटाधारी । नैवेद्याची तयारी करी ।
तथापि रामलालाची स्वारी । नसावी तेथे उपस्थित ।। ५७ ।।

मग बाबाजी वाट पाहुनी । फार वेळ झाला म्हणुनी ।
शोध करिता ये आढळुनी । ठाकुरांजवळ रामलाला ।। ५८ ।।



रामकृष्णांच्या खोलीत । खुशाल बसे खेळ खेळत ।
बाबाजी बोले तयाप्रत । नैवेद्य करुनी ठेविला ।। ५९ ।।
मी तर तुझी पाहतो वाट । तू खेळिसी निश्चिंत येथ ।
अशीच असे रे तुझी रीत । स्वच्छंद वर्तन तुझे असे ।। ६० ।।
तुजला दयामाया काही । कशी ती मुळिही ठाउक नाही ।
सोडुनि आईवडिलांनाही । वनात निघुनी तू गेलास ।। ६१ ।।
मग इकडे धाय मोकलुनी । दशरथराजा गेला मरुनी ।
न येसी तरिही परतुनी । नाही दर्शन त्यास दिले ।। ६२ ।।
यापरी कितीतरी बोलुनी । रामलालाचा हात धरुनी ।
जटाधारी तयास ओढुनी । स्वस्थानाला नेत असे ।। ६३ ।।
ऐसे लोटले पुष्कळ दिन । कारण बाबांना सोडुन ।
रामलाला जाण्यास तेथुन । तयार होइना काही केल्या ।। ६४ ।।
जटाधारी भक्त महान । वात्सल्यभाव हृदयात पूर्ण ।
न जाववे दक्षिणेश्वराहुन । सोडुनि तेथे रामलालाला ।। ६५ ।।
पुढे तो बऱ्याच दिवसांनी । रामकृष्णांकडे येउनी ।
अश्रु भरलेल्या नयनांनी । पाहात बोलू लागला ।। ६६ ।।
रामलालाने मजलागुन । पाहिजे तसे दिले दर्शन ।
आता शांत झाले मन । तळमळ समूळ थांबली ।। ६७ ।।
मजला आता कसली काही । इच्छा मनात उरली नाही ।
रामलालाला सोडतानाही । दुःख मुळीही नसे मला ।। ६८ ।।
तुम्हाला सोडुनी जावयाला । माझ्याबरोबर यावयाला ।
तयार नाही रामलाला । आनंदात येथे असे तो ।। ६९ ।।
रामलालास तुम्हाला देउन । आनंदाने जातो येथुन ।
सुखी तो असे ऐसे ध्यान । करित कंठिन काळ मी ।। ७० ।।



रामलालास तेथे ठेवुन । जटाधारिने केले गमन ।
मग रामलाला तेव्हापासुन । राहिला जवळ ठाकुरांच्या ।। ७१ ।।
येणेपरी श्रीरामकृष्ण । करिती वात्सल्यभाव साधन ।
आपण स्वये ते आचरुन । आदर्श झाले भक्तजना ।। ७२ ।।
चरित्र असुनही अलौकिक । सामान्यांना मार्गदर्शक ।
त्यांचे अनुकरण करुनी अनेक । निश्चित तरती भवजलधी ।। ७३ ।।
नाना तऱ्हेचे येती लोक । भिन्न संप्रदायांचे साधक ।
सर्व पंथांचा सिद्ध एक । लाभ सकळिक उठविती ।। ७४ ।।
म्हणत असती रामकृष्ण । फूल उमललेले पाहुन ।
भ्रमर धावती चोहीकडुन । रसास्वाद तयाचा घ्यावयाला ।। ७५ ।।
त्यापरी अवतारिक पुरुष । जेधवा पावतो पूर्णत्वास ।
तेधवा जिज्ञासू साधकास । वाटतसे आकर्षण तयाचे ।। ७६ ।।
तयाचे करुनी अनुसरण । तयाचा अनुभव प्राप्त करुन ।
मार्ग आपुला सुधारुन । भक्तजन स्वहित साधती ।। ७७ ।।
वर्तमान युगाचे अवतार । अनंत भावमय ठाकुर ।
सिद्ध होताच साधक थोर । येउ लागले त्यांच्याकडे ।। ७८ ।।
एकदा तेथे आला संत । तेज:पुंज मुख अत्यंत ।
एकसारखा असे हासत । बसुनी एकाच ठिकाणी ।। ७९ ।।
फक्त एकदा तो सकाळी । आणि पुनरपी संध्याकाळी ।
बाहेर येउनिया न्याहाळी । वृक्ष आकाश भागीरथी ।। ८० ।।
दोनही हात वरती करुनी । नाचत असे बेहोष होउनी ।
गडबडा लोळतसे हासुनी । म्हणे माया कशी केली ।। ८१ ।।
कसा बनविला प्रपंच । तयाची उपासना असे हीच ।
आनंदलाभ प्राप्त तसाच । जाहला होता तयाप्रती ।। ८२ ।।



आणिक एक साधू आला । ज्ञानोन्माद असे तयाला ।
पिशाच्चासारखा दिसावयाला । नागडा उघडा फिरत असे ।। ८३ ।।
नखे हाताची वाढलेली । केसात धूळ भरलेली ।
कळकट फाटकी घेतलेली । चादर तयाने अंगावर ।। ८४ ।।
येउनि मंदिराच्या समोर । जगन्माता स्तविली फार ।
जणू डोलु लागले मंदिर । प्रसन्न झाली जगदंबा ।। ८५ ।।
काही अन्न मिळावे म्हणुन । भिकाऱ्यांमधे बसला जाउन ।
परंतु पाहुनी तयाचे ध्यान । पहारेकऱ्याने हाकलिले ।। ८६ ।।
जेथे उष्टी पाने फेकिती । तेथे गेली महान विभुती ।
एक कुत्रे खरकटी ती । चाटित होते त्या ठायी ।। ८७ ।।
त्या कुत्र्याच्या अंगावर । साधू ठेवुनी आपुला कर ।
प्रेमाने म्हणे तू खाणार । आम्ही का राहावे उपवासी ।। ८८ ।।
साधू पानातिल ते अन्न । खाउ लागला गोळा करुन ।
रामकृष्णांचे अंत:करण । ते पाहुनी कळवळले ।। ८९ ।।
तेथुनि गेले धावत धावत । हृदयच्या गळा मिठी मारित ।
म्हणती हदू माझीही गत । अशीच होइल काय रे ।। ९० ।।
हा नसे पिसाट अशुद्ध । याचा असे हा दिव्योन्माद ।
पाहावयास तो साधू विशुद्ध । हृदय धावला त्यामागे ।। ९१ ।।
त्याच्या मागे हृदयराम । चालत गेला दूरपर्यंत ।
म्हणाला महाराज ईश्वर प्राप्त । कसा होतसे सांगावे ।। ९२ ।।
परंतु प्रथम साधुने काही । लक्ष त्याकडे दिधले नाही ।
त्याच्या मागे हृदय जाई । पिच्छा न सोडी तयाचा ।। ९३ ।।
काही काळ क्रमिता पंथ । साधु बोलला अकस्मात ।
पाणि असे जे या नाल्यात । आणि गंगेत असे जे ।। ९४ ।।



दोन्ही उदके समान शुद्ध । ऐसा जेधवा होईल बोध ।
जेधवा लोपती सकळ भेद । तेधवा ईश्वर लाभतसे ।। ९५ ।।

त्याने अधिक वदावे म्हणुन । हृदयराम करी प्रयत्न ।
परंतु साधुने मुखातून । शब्दहि नाही उच्चारिला ।। ९६ ।।

हृदय वदे महाराज मजला । करुनी घ्यावा आपुला चेला ।
परंतु साधु न बोले बोला । हृदय चालला त्यामागे ।। ९७ ।।

साधुने मग दगड घेतला । मारण्याचा आव आणिला ।
हृदयराम मग घाबरला । पळू लागला माघारी ।। ९८ ।।

पुनरपि मागे पाही वळुनी । न दिसे साधू तयालागुनी ।
हृदय आश्चर्यचकित होउनी । परत पातला मंदिराला ।। ९९ ।।

उगीच लोक देतात त्रास । म्हणुनी असा धरितात वेष ।
अत्यंत उच्च परमहंस । अवस्था होती त्या साधूची ।। १०० ।।

एक साधू रामायतपंथी । आला दक्षिणेश्वराप्रती ।
प्रभुच्या नामावरच होती । अविचल निष्ठा तयाची ।। १ ।।

केवळ लोटा आणि पोथी । दोनच वस्तू जवळी असती ।
पोथीवर असे त्याची भक्ती । करितसे पूजन पोथीचे ।। २ ।।

मध्येच पोथी उघडून । साधू करी तिचे वाचन ।
ऐसी श्रद्धा असाधारण । पोथीवर होती तयाची ।। ३ ।।

बाबांस उत्कंठा वाटुनी फार । पोथी पाहाया मागती सत्वर ।
अतिशय आग्रह झाल्यावर । साधुने पोथी दाखविली ।। ४ ।।

'ॐ राम' हीच अक्षरे तीत । अथपासून इतिपर्यंत ।
ठाकुर होता आश्चर्यचकित । साधू सांगे समजावुनी ।। ५ ।।

सटरफटर ग्रंथ वाचुन । काय उपयोग त्यापासुन ।
वेदशास्त्रे पुराणे संपूर्ण । भगवंतापासुनी उद्भविली ।। ६ ।।



जे काय असे वेदशास्त्रात । ते असे तयाच्या नामात ।
भेद नसे तन्नामरूपात । नामास धरुनी असे मी ।। ७ ।।

एवढा प्रचंड विश्वास । वसतसे साधूच्या मनास ।
धरुनी प्रभुच्या नामास । करितसे तो उपासना ।। ८ ।।

ठाकुरांकडे येती साधक । संन्यासदीक्षा घेती अनेक ।
आत्मकल्याण बहुत लोक । साधिती येउनी दक्षिणेश्वरी ।। ९ ।।

नारायणशास्त्री पंडित । सर्व शास्त्रांत पारंगत ।
गुरुगृही त्याने अध्ययनात । पंचवीस वर्षे घालविली ।। ११० ।।

जो ज्या शास्त्रात विद्वान । त्याकडे राहुनी नारायण ।
त्या त्या शास्त्रात प्राविण्य । मिळवुनी पंडित जाहला ।। ११ ।।

पंडित म्हणुनी तयाची ख्याती । दिगंतरी पसरली होती ।
जयपूरच्या नृपाची विनंती । अव्हेरिली होती तयाने ।। १२ ।।

महाराजा इच्छी मनात । यास करावा सभापंडित ।
अध्ययन न्यायशास्त्रात । करण्यासाठी नाकारिले ।। १३ ।।

शास्त्रज्ञानाने अंतरात । तीव्र वैराग्य झाले उदित ।
पंडित जाणतसे वेदान्त । अनुभवावयाचे शास्त्र असे ।। १४ ।।

ज्ञानानुभव आपणाला । व्हावा तळमळ लागे मनाला ।
वाटे परतता स्वगृहाला । निमग्न व्हावे साधनेत ।। १५ ।।

अशा विलक्षण मन:स्थितीत । दक्षिणेश्वरा आला पंडित ।
प्रेमादर तयाच्या मनात । ठाकुरांस पाहुनी उद्‌भवला ।। १६ ।।

दक्षिणेश्वरी होते माहित । नारायणशास्त्री महापंडित ।
म्हणुनी त्याची व्यवस्था समस्त । मंदिरात सहज लागली ।। १७ ।।

रामकृष्णांची आवडे संगती । सदा ईश्वरकथा चालती ।
दिवस आनंदात जाती । तयाचे दक्षिणेश्वराला ।। १८ ।।



वाटतसे पूर्वी पंडिताला । करुनी पांडित्य प्रदर्शनाला ।
चकित करावे सर्व जनांला । कीर्तिप्रतिष्ठा वाढवावी ।। १९ ।।
त्या गोष्टी तर आता त्याला । अगदी तुच्छ वाटू लागल्या ।
श्रवण करावे वाटे तयाला । शब्द श्रीरामकृष्णांचे ।। १२० ।।
वाटे आपण चर्चा करितो । समाधि आदी शब्द बोलतो ।
त्या अवस्थांचा अनुभव घेतो । महापुरुष हा प्रत्यक्ष ।। २१ ।।
वेदान्तोक्त भूमिका सात । वाचल्या होत्या शास्त्रात ।
रामकृष्णांच्या संगतीत । मिळाल्या साक्षात पहावया ।। २२ ।।
पंडित म्हणे जे जे जाणणे । ते जाणिले या पुरुषोत्तमाने ।
मृत्युही भय दाखवू नेणे । ऐसी अवस्था ठाकुरांची ।। २३ ।।
सर्वोपनिषदे सांगतात । सिद्धसंकल्प हे नर सत्य ।
अशांची कृपा होता प्राप्त । सुलभ होतसे ब्रह्मज्ञान ।। २४ ।।
वाटे यांनाच जावे शरण । मग चुकवावे जन्ममरण ।
आता रामकृष्णांपासुन । ब्रह्मज्ञान मिळवावे ।। २५ ।।
ऐसे वैराग्य कडकडीत । तयाच्या मनी झाले उदित ।
लागली तळमळ अंतरात । रामकृष्णांची कृपा व्हावी ।। २६ ।।
शास्त्रातिल गूढार्थाला । कोण अन्य सांगावयाला ।
यांच्याचपासुनी पाहिजे केला । साक्षात्कार ब्रह्माचा ।। २७ ।।
विनविले मग रामकृष्णांला । संन्यास दीक्षा द्यावी मजला ।
पाहुनी तयाच्या वैराग्याला । दीक्षा देती रामकृष्ण ।। २८ ।।
शास्त्री स्वत:स मानुनी धन्य । वसिष्ठाश्रमात राहिला जाउन ।
अत्युग्र तपस्या तेथे करुन । देह ठेविला त्या ठायी ।। २९ ।।
वार्ता कळताच बाबांप्रत । असे कोणी शास्त्रज्ञ पंडित ।
यथार्थ साधक भगवद्भक्त । जाती ठाकुर तयाकडे ।। १३० ।।



काय ते लोक म्हणतील । मान अथवा अपमान होइल ।
विचार याचा बिलकुल । येइना त्यांच्या मनामधे ।। ३१ ।।
न्याय वेदान्तशास्त्र निपुण । असे पंडित पद्मलोचन ।
कीर्ती तयाची परिसून । रामकृष्ण भेटू इच्छिती ।। ३२ ।।
बरद्वानाच्या महाराजांनी । अगाध विद्वता त्याची पाहुनी ।
मुख्य सभापंडित नेमुनी । सन्मान तयाचा केला असे ।। ३३ ।।
सहज एकदा राजसभेत । उत्पन्न झाला वाद अद्‌भुत ।
शिव आणि विष्णू यांच्यांत । अधिक श्रेष्ठ कोण असे ।। ३४ ।।
पद्मलोचन नसे सभेत । शब्दांचा कीस काढिती पंडित ।
म्हणती श्रेष्ठ गिरिजाकांत । लक्ष्मीकांत म्हणती कित्येक ।। ३५ ।।
स्वपक्षाचे समर्थन । करू लागले विद्वज्जन ।
सभेत वाद रंगला पूर्ण । निर्णय होइना काही केल्या ।। ३६ ।।
इतुक्यात पंडित पद्मलोचन । करिता झाला आगमन ।
वादाचा विषय येता कळुन । बोलु लागला उत्तर तो ।। ३७ ।।
मी न देखिले सदाशिवाला । नाही पाहिले श्रीविष्णूला ।
कसे सांगावे आता तुम्हाला । दोघांत श्रेष्ठ कोण असे ।। ३८ ।।
शैव शास्त्रात श्रेष्ठ शिव । वैष्णव शास्त्रात रमामाधव ।
ज्याचा असे जो इष्ट देव । तो मानावा सर्वश्रेष्ठ ।। ३९ ।।
शिव विष्णू असती समान । सांगे अनेक दाखले देउन ।
त्वरित मिटला वाद पूर्ण । प्रशंसा करिती तयाची ।। १४०।।
पद्मलोचन विद्वान असुन । असे सद्‌गुणी श्रद्धावान ।
तप:पूत उदार अंत:करण । वैराग्यवान भक्त असे ।। ४१ ।।
बरद्वान नगरास जाउन । भेटू इच्छिती रामकृष्ण ।
मथुर व्यवस्था देई करुन । तयारी झाली गमनाची ।। ४२ ।।



तव तयांना कळले वृत्त । कलकत्त्यास आला पंडित ।
औषधोपचार करण्याप्रत । हवा पालट करण्याला ।। ४३ ।।

हृदयराम बघुनी तेथ । येउनि म्हणे वार्ता सत्य ।
अत्यंत उत्सुक असे पंडित । रामकृष्णांना भेटावया ।। ४४ ।।

भेटिस जाता रामकृष्ण । पंडित पावला समाधान ।
तत्काळ तयाला आले कळुन । महापुरुष हे असती ।। ४५ ।।

रामकृष्णांच्या मुखातुनी । भक्तीपदे परिसूनी ।
समाधी तयांची अवलोकुनी । पद्मलोचन भारावला ।। ४६ ।।

बाबांचे अनुभव ऐकुनी । भावतन्मयता अवलोकुनी ।
बाह्य चैतन्य लोपे देखुनी । अलौकिकत्व कळले बाबांचे ।। ४७ ।।

पंडित पद्मलोचनाप्रत । झाली होती सिद्धी प्राप्त ।
त्यामुळे पंडितांच्या सभेत । सदैव विजयी होत असे ।। ४८ ।।

हातात घेउनी उदक पात्र । फिरतसे म्हणत काही मंत्र ।
त्या उदकाने धूतसे वक्त्र । पुसुनि घेतसे रुमालाने ।। ४९ ।।

नंतर वादाप्रती प्रवृत्त । होता अजिंक्य होई सभेत ।
तथापि सिद्धीची हकीकत । नव्हती माहिती कोणासही ।। १५० ।।

परंतु सर्वज्ञ रामकृष्ण । वस्त्र पात्र ठेविती दडवुन ।
शोध करी मग पद्मलोचन । न दिसती वस्तू तयाप्रती ।। ५१ ।।

मग तो तसाच गेला सभेत । परी न चाले मति वादात ।
पुनरपि त्याने येउनी परत । केला शोध त्या वस्तूंचा ।। ५२ ।।

तेथवा तयाला आले कळुन । वस्तू दडविती रामकृष्ण ।
पंडित झाला आश्चर्यमग्न । केले स्तवन ठाकुरांचे ।। ५३ ।।

महापंडित पद्मलोचन । रामकृष्णांना तेव्हापासुन ।
परमेशाचा अवतार मानुन । त्यांची भक्ती करित असे ।। ५४ ।।



म्हणे मी सभा भरवीन । बोलावुनी पंडित विद्वान ।
तेथे करिन मी प्रतिपादन । रामकृष्ण ईश्वरी अवतार ।। ५५ ।।
जर कोणाची असे हिंमत । तये खोडावे माझे मत ।
सांगेन शास्त्रार्थ यथार्थ । ईश्वर साक्षात रामकृष्ण ।। ५६ ।।
पद्मलोचन आचारवान । शूद्राकडुनी घेइना दान ।
एकदा काही घडले कारण । मथुरने सभा बोलाविली ।। ५७ ।।
मथुरला वाटले पद्मलोचन । न करील सभेस आगमन ।
सहज म्हणाला बाबांलागुन । पंडित सभेस येइल का ।। ५८ ।।
रामकृष्ण पुसती पंडिताला । तो म्हणे तुम्ही असता मजला ।
भंग्याच्या घरी जेवावयाला । वाटणार नाही संकोच ।। ५९ ।।
मग कोळ्याची काय मात । अवश्य येईन सभेप्रत ।
एवढी श्रद्धा अत्यद्भुत । रामकृष्णांवर असे त्याची ।। १६० ।।
प्रकृतीत बिघाड होउन । ठाकुरांचा निरोप घेउन ।
काशीस गेला पद्मलोचन । पावला निधन त्या ठायी ।। ६१ ।।
आर्यमतप्रवर्तक असती । स्वामी दयानंद सरस्वती ।
ठाकुर तयास पाहुनी म्हणती । लाभली होती शक्ती तया ।। ६२ ।।
वक्षःस्थळ तयांचे आरक्त । शास्त्रचर्चा करी सतत ।
वैखरी अवस्था झाली प्राप्त । पंडित विख्यात गाजला ।। ६३ ।।
जयनारायण पंडित थोर । भट्टाचार्य कृष्णकिशोर ।
ईश्वरचंद्र विद्यासागर । देवेन्द्रनाथ महर्षी ।। ६४ ।।
ऐसे भक्त आणि पंडित । ठाकुरांस त्यांचे कळता वृत्त ।
त्यांच्या भेटीस जाती त्वरित । करिती कृपा अहेतुक ।। ६५ ।।
ऐसे उदार भगवान । अवतारवरिष्ठ रामकृष्ण ।
साधा साधा आत्मकल्याण । कथा गाउनी ही त्यांची ।। ६६ ।।



श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६७ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा पंधरावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय सोळावा

अविद्यापट जावो जळुन । शुद्ध होवो अंत:करण ।
श्रीरामकृष्ण भगवान । विराजमान तेथ होवोत ।। १ ।।

श्रीकृष्ण सांगती गीतेत । कोणी उपासती अव्यक्त ।
व्यक्त उपासत काही भक्त । दोघेहि पावती ईश्वराला ।। २ ।।

तथापि अव्यक्ताचा पंथ । आचरावया कठिण बहुत ।
व्यक्ताचा मार्ग त्या तुलनेत । सोपा बहुत आचरण्या ।। ३ ।।

अव्यक्ताचा मार्ग गहन । असीम निराकार निर्गुण ।
सामान्याचे सीमित मन । कैसे आकलन करू शके ।। ४ ।।

व्यक्ताची जी करिती भक्ती । पाच प्रकारे उपासती ।
शांत दास्य सख्य भक्ती । वात्सल्य आणि मधुर भाव ।। ५ ।।

कोणताही भाव घेउन । करुनी प्रभूचे आराधन ।
आपुला संबंध तयी जोडुन । साधक मार्ग क्रमितसे ।। ६ ।।

तो पूर्ण मी त्याचा अंश । ऐसा भाव धरुनी मनास ।
आचरिता भक्ति विशेष । सिद्ध होतसे शांतभाव ।। ७ ।।

तो स्वामी मी त्याचा दास । ऐसा भाव आणिता मनास ।
जैसा रामी हनुमंतास । दास्यभाव तो समजावा ।। ८ ।।

मित्र माझा परमेश्वर । मजला प्रिय असे फार ।
सख्यभक्तिचा तो प्रकार । अर्जुनाची सख्यभक्ती ।। ९ ।।

माता अथवा पिता आपण । ईश्वर माझे बालक सान ।
जैसी यशोदा मानी कृष्ण । वात्सल्य भाव तो समजावा ।। १० ।।



परमेश्वराला पती मानुन । तयाची पत्नी आहो आपण ।
जैसी राधा मानी कृष्ण । मधुरभाव तो जाणावा ।। ११ ।।
रागद्वेषाची करुनि निवृत्ती । कोण्याहि भावे करिता भक्ती ।
भगवंताची होतसे प्राप्ती । निश्चयेकरुनी भक्तजना ।। १२ ।।
सर्वसाधारण साधकाला । भजणे भाग भगवंताला ।
सगुण स्वरूपी सर्वेश्वराला । अनाकलनीय अव्यक्त ।। १३ ।।
प्रेम साधकाचा आधार । प्रेमे झाकुनी परमेश्वर ।
त्याच्या साकार स्वरूपावर । लक्ष केंद्रित करित असे ।। १४ ।।
परमेश्वराचे ऐश्वर्यज्ञान । मनात भीती करी उत्पन्न ।
प्रेम भीतीला नाहिसे करुन । ऐश्वर्यज्ञान लोपवितसे ।। १५ ।।
यास्तव प्रेम हे पायाभूत । असे सकळ भक्तिपंथात ।
प्रेमात असे शक्ती अद्‌भुत । निर्गुणा सगुण करित असे ।। १६ ।।
मग त्या साकार रूपावर । मन आपुले करुनी स्थिर ।
प्रेमभराने सेवा अपार । करितसे सद्‌भक्त इष्टाची ।। १७ ।।
संसारात जे अनुभव येती । ईश्वराविषयी तीच प्रतीती ।
यास्तव अतिशय सोपा म्हणती । भक्तिपंथ सकलांसाठी असे ।। १८ ।।
संसारात जी असती नाती । तीच कल्पिती ईश्वराप्रती ।
आपुल्या सकळही प्रवृत्ती । वळविती परमेश्वराकडे ।। १९ ।।
परमेश्वर तर असे आपुला । कशास भ्यावयाचे त्याला ।
राक्षससुद्धा स्वबालकाला । न इच्छी अपाय करावया ।। २० ।।
ईश्वर तर मग दयाघन । काय भय असे त्यापासुन ।
प्रेम देउनी प्रेम घेइन । सेवा करीन म्हणे भक्त ।। २१ ।।
प्रेमभाव मनात धरुन । अहर्निश त्याची सेवा करुन ।
भक्तास मिळतसे भगवान । आनंदघन परमात्मा ।। २२ ।।



कोणाहि एकाच भावात । भक्तास लाभतो भगवंत ।
भक्ताचार्य म्हणती सर्वांत । मधुरभाव श्रेष्ठ असे ।। २३ ।।
प्रेमास्पदाला आनंद ज्यात । सुख भक्ताला वाटे त्यात ।
एवढा एकरूप होतो भक्त । मधुरभावात ईश्वरासी ।। २४ ।।
परमेश्वराचे ऐश्वर्यज्ञान । संपूर्ण लोपते मनातुन ।
जेवि पतिपत्नी एक होउन । दुजाभाव मुळिही नाठविती ।। २५ ।।
विरहकाली चिंतनात । इतुका तन्मय होतसे भक्त ।
देहभान हारपे समस्त । विसरे अस्तित्व स्वत:चे ।। २६ ।।
गोकुळामाजी ऐसी स्थिती । गोपिकांची झाली होती ।
पूर्ण विसरुनी स्वत:प्रती । समजू लागती श्रीकृष्ण ।। २७ ।।
अत्यंत उच्च अवस्थेत । साधक तन्मय होउनी जात ।
पृथगस्तित्व विसरे चित्त । घेइ अद्वैतभावानुभव ।। २८ ।।
तथापि ही गोष्ट अत्यंत कठिण । पूर्व संस्कार जागृत होउन ।
बळाने साधकाचे मन । बहिर्मुख करू पाहतात ।। २९ ।।
साध्यावरचा मग विश्वास । कधी कधी जातसे लयास ।
बाह्य जगातिल रूप रस । सार समजुनी सेवू पाहे ।। ३० ।।
अंत:संस्काराशी दारुण । करावे लागते रणकंदन ।
जन्मभर करिता करिता प्रयत्न । भाव एखादा साधतसे ।। ३१ ।।
रामकृष्णांनी अल्पकाळात । पूर्ण साधिले भाव समस्त ।
पाहुनी मन होतसे चकित । अतिमानवी ही शक्ती असे ।। ३२ ।।
भावराज्यातिल तत्त्वे गहन । मानवाला कळण्यास कठिण ।
यास्तव नसावे ठेविले लिहुन । अनुभव अवतारिकांचे ।। ३३ ।।
रामकृष्णांनी करिता साधन । प्रथमच जगास आले कळुन ।
भावविकास पावता मन । तन्मय होतसे साध्यासी ।। ३४ ।।



मीतूपण ते हारपोनी । अद्वयभाव ठसतो मनी ।
अद्वैतात तो विलीन होउनी । साधक निराळा उरत नसे ।। ३५ ।।
सर्व धर्मांचे संप्रदाय । अंती पावती एकच ठाय ।
जगताला हे ठाउक होय । श्रीरामकृष्णांपासुनी ।। ३६ ।।
भगवंताचे ऐश्वर्यज्ञान । संपूर्ण लोपते मनातून ।
यास्तव मधुरभाव महान । सर्व भावांत श्रेष्ठ असे ।। ३७ ।।
अहंकाराचा होउनी लोप । दिसे केवळ भगवत्स्वरूप ।
प्रेम तयावर असे अमाप । नाठवे आपुले देहभान ।। ३८ ।।
राधाकृष्णांचा संबंध । यथार्थ तयाचा व्हावया बोध ।
नसावा कामवासनागंध । हृदयबंध असावे तुटलेले ।। ३९ ।।
इतरांस कशी कळावी राधा । परमात्म्यासी प्रेमबद्धा ।
महाभावमयी विशुद्धा । प्रत्यक्ष मूर्ती प्रेमाची ।। ४० ।।
कामकल्पनेचे वारे । मनामाजी मुळीही नुरे ।
अंतर्बाह्य प्रेम पाझरे । स्वामिनी भक्तिच्या राज्याची ।। ४१ ।।
नाठवे पतिपुत्र कुल शील । मानापमान लज्जा सकळ ।
एक कृष्ण भगवान केवळ । प्राप्तव्य केले राधेने ।। ४२ ।।
प्रेमे झाकिला परमपुरुष । त्या प्रेमाचा एक लक्षांश ।
कळणे कठीण सामान्यास । यास्तव नमिली श्रीराधा ।। ४३ ।।
अथवा एकचि भगवान । लीला दाखवावी म्हणुन ।
एक भाग झाला श्रीकृष्ण । दुसरा राधिका भक्तिमती ।। ४४ ।।
काय राधा कृष्ण दोन । थोरवी तयांची जाणे कोण ।
मधुरभाव अद्भुत साधन । भगवान अनंत लीलामय ।। ४५ ।।
आणिक गोपिकांचा भाव । राधेसारखा असे सर्व ।
पती समजुनी कृष्णदेव । भक्ती करिती श्रीहरिची ।। ४६ ।।



केवढे गोपिकांचे प्रेम । विसरुनी गेल्या कामधाम ।
भरुनी उरला भूमिव्योम । एवढा आनंद अंतरात ।। ४७ ।।
रमणसुखाच्या कोटीपट । रोमरंध्री आनंद दाट ।
तुच्छ कामकल्पनेस वाट । कुठली मिळेल त्या ठायी ।। ४८ ।।
गोकुळाच्या गोपी सामान्य । तयांचा महिमा थोर जाण ।
मग राधेची स्थिती कोण । वाणीने वर्णन करू शके ।। ४९ ।।
राधाराणी एकचि एक । पूर्वी कधीहि न झाली देख ।
पुढे होइल ऐसी भाक । सांगता येइना कोणाला ।। ५० ।।
धन्य राधा प्रेम करुन । आकळुनि घेई भगवान ।
राधिका झाली श्रीकृष्ण । अद्वैतपण आले प्रत्यया ।। ५१ ।।
चैतन्यदेव पुरुष असुन । मधुरभावाचे करिती साधन ।
त्यांच्यानंतर रामकृष्ण । मधुरभाव साध्य करिती ।। ५२ ।।
लिंगभेद मधुराभक्तीत । गौण असे हे सिद्ध होत ।
स्त्री पुरुष हा भेद समस्त । मधुर भावात लोपतसे ।। ५३ ।।
चित्त अत्यंत शुद्ध करुन । स्वतःस कामिनी कल्पुन ।
पतिभावे पूजिता भगवान । मधुरभाव साधतसे ।। ५४ ।।
सच्चिदानंदघन श्रीकृष्ण । हाच एक पुरुष जाणुन ।
इतर वस्तु ज्या स्थूल सान । सकळ जीव त्याच्या स्त्रिया ।। ५५ ।।
कारण जिवादी पदार्थ सगळे । त्याच्या प्रकृतीपासुनी झाले ।
यास्तव ते पाहिजे समजले । तयाच्या स्त्रियाच सकळिक ।। ५६ ।।
गोपिकांपैकी कोणी कोणी । एक दो भावस्वरूपिणी ।
एकोणिस भावी राधाराणी । महाभावरूपिणी एकटी ।। ५७ ।।
सुखभोगेच्छा त्याग करणे । सर्वस्वी कायावाचामने ।
श्रीकृष्णसुखात सुखी होणे । साधकाचे ध्येय असे ।। ५८ ।।



विवाहित स्त्रीपुरुषांप्रत । समाजबंधने पाळणे प्राप्त ।
यास्तव तयांचे मर्यादित । होतसे प्रेम परस्परी ।। ५९ ।।

स्वाधीन स्त्रियेचे आचरण । याहुनी सर्वथा असे भिन्न ।
ती खुशाल टाकिते तुडवुन । बंधने सर्व सामाजिक ।। ६० ।।

आपुला अधिकार देई सोडुन । सर्वस्व देतसे झुगारुन ।
प्रियकरासी करावया मीलन । जीव ओवाळुनि टाकितसे ।। ६१ ।।

अनय घोषाची पत्नी असुन । सर्वस्वाचा त्याग करुन ।
प्रेमाने आकळिला कृष्ण । यास्तव राधा श्रेष्ठ असे ।। ६२ ।।

शारीरिक सुखासी उदास । सहन करुनी कितिही त्रास ।
प्राप्त करावे परमेशास । एवढी आस असे अंतरी ।। ६३ ।।

सर्वस्वाचा करुनी त्याग । त्यागिले सकळ सुखोपभोग ।
श्रीकृष्णावर प्रेम अभंग । यास्तव राधिका श्रेष्ठतमा ।। ६४ ।।

आदर्श तियेचा ठेवुन पुढती । साधक करिती मधुराभक्ती ।
क्रमिती मार्ग ते यथाशक्ती । परमेशप्राप्ती करावया ।। ६५ ।।

सारसमष्टी सर्व भावांची । त्याहुनी मधुरभाव अधिकची ।
प्रेमिका आपुल्या प्रेमास्पदाची । दासी होउनी सेवा करी ।। ६६ ।।

सखीसारखी काळजी घेई । त्याच्या सुखात सुख पाही ।
मातेप्रमाणे मग्न होई । हित तयाचे साधावया ।। ६७ ।।

म्हणुनी महान मधुरभाव । आचरिती रामकृष्णदेव ।
आदर्श साधकांना सर्व । झाले सांप्रत युगामधे ।। ६८ ।।

ठाकुर जो का भाव घेती । तयात तन्मय होउनि रमती ।
अंतिम साध्य प्राप्त करिती । घेती अद्वैत भावानुभव ।। ६९ ।।

एक भाव असता मनात । तो सिद्ध होईपर्यंत ।
न होई दुसरा भाव उदित । ऐसा स्वभाव ठाकुरांचा ।। ७० ।।



दास्यभाव होताच पूर्ण । करिती सख्यभावसाधन ।
वात्सल्यभाव त्यामागुन । श्रीरामकृष्ण आचरिती ।। ७१ ।।
सर्व भावांत होउनी पूर्ण । मधुरभाव जो श्रेष्ठ महान ।
करू लागले त्याचे साधन । श्रीरामकृष्ण यावेळी ।। ७२ ।।
करुनि न घेता शास्त्रज्ञान । शास्त्राज्ञेचे उल्लंघन ।
झाले नाही त्यांच्याकडुन । आचरण सर्वथा शास्त्रशुद्ध ।। ७३ ।।
जे जे कार्य घडे सकळ । सर्वथा असे शास्त्रानुकुल ।
अंत:करण असता निर्मळ । शास्त्रविरोध घडत नसे ।। ७४ ।।
शुद्ध पवित्र अंतरंग । त्यात जे उठतात तरंग ।
अनुभव घेउनी घडविली सांग । शास्त्रे ऋषींनी पूर्वकाळी ।। ७५ ।।
स्वामी विवेकानंद म्हणती । शास्त्रांची सत्यता दावण्याप्रती ।
ईश्वर अवतरे अवनीवरती । निरक्षर होउनी या काळी ।। ७६ ।।
अग्निमाजी घालिता सुवर्ण । होतसे अधिकच कांतिमान ।
तसे शास्त्रांना यथार्थपण । आचरणात ठाकुरांच्या ।। ७७ ।।
स्त्रीजनोचित असता साधन । स्त्रीवेष ते करिती धारण ।
ठाकुरांची असे शिकवण । लज्जा घृणा भय सोडावे ।। ७८ ।।
कुलशील जाति अभिमान । अष्ट पाश त्यजिल्यावाचुन ।
कधिही ईश्वराचे दर्शन । होउ शकेना कोणासही ।। ७९ ।।
मधुरभाव साधनकाळी । स्त्रीवेष करावा इच्छा झाली ।
मथुरला कळताच आणिली । बहुमूल्य वस्त्रे अलंकार ।। ८० ।।
ठाकुरांस जेथे संतोष । तेथे मथुरला मोद विशेष ।
सेवेत तयांच्या मानी हर्ष । श्रद्धा अपार बाबांवरी ।। ८१ ।।
गोपिकाभावात रामकृष्ण । अत्यंत तन्मय गेले होउन ।
एक पुरुष आहोत आपण । आठवण याची विसरले ।। ८२ ।।



मधुरभावसाधनात । पूर्ण सहा महिने पर्यंत ।
रामकृष्ण राहिले स्त्रीवेषात । व्यवहार तयांचे स्त्रियांपरी ।। ८३ ।।
कधी कधी आपुल्या वाड्यात । मथुर तयांना घेउनी जात ।
तेथेहि महिलामंडळीत । उठती बसती त्या काळी ।। ८४ ।।
सर्व स्त्रियांस होते माहित । कामगंधहीन त्यांचे चरित ।
आपुल्यापैकी एक मानित । आदर देत देवापरी ।। ८५ ।।
लज्जा संकोच स्त्रियांना । ठाकुरांसमोर वाटेना ।
व्यवहार जे करणे नाना । करिती तयांच्या समक्ष ।। ८६ ।।
ठाकुर स्वहस्ते वेणीफणी । मुलींना कधी देती करुनी ।
कसे वागावे हे शिकवुनी । तयांना धाडिती पतीकडे ।। ८७ ।।
ठाकुर असता स्त्रीमंडळीत । जनांनाही अतिपरिचित ।
ओळखणे कठिण असे होत । काय मात मग इतरांची ।। ८८ ।।
हृदयराम असे सांगत । मथुर नेउनी अंत:पुरात ।
मज म्हणे ओळख स्त्रियांत । असती कोणते मामा तुझे ।। ८९ ।।
हृदय सांगे इतुके दिवस । असुनि मी तयांच्या सेवेस ।
ओळखू शकलो नाही तयांस । मेळाव्यात त्या ललनांच्या ।। ९० ।।
भैरवी ब्राह्मणी म्हणे नित्य । बाबा असता फुले तोडित ।
भासे राधाराणीच काढित । असावी कुसुमे वृक्षांची ।। ९१ ।।
बाबा गुंफुनी कुसुममाला । अर्पिती राधागोविंदजीला ।
कधी घालिती जगदंबेला । करिती प्रार्थना अंबेची ।। ९२ ।।
जेवी व्रजगोपिका करिती । तैसीच ठाकुरांची रीती ।
व्याकुळ होउनी अंबेस म्हणती । मिळावा पती श्रीकृष्ण ।। ९३ ।।
सद्गदित कंठ साश्रु नयन । विरहे व्याकुळ अंत:करण ।
प्रार्थना करिती रामकृष्ण । व्हावे दर्शन कृष्णाचे ।। ९४ ।।



एकसारखा रात्रंदिवस । श्रीकृष्णाचा ध्यास मनास ।
तो पती मिळावा आपणास । तळमळ चित्तास लागली ।। ९५ ।।
दिवसामागे जाती दिवस । मासामागे लोटती मास ।
तथापि चित्तात अविश्वास । नसे लवलेश निराशेचा ।। ९६ ।।
होइना कृष्णदर्शन म्हणुन । आकांत करिती रडुन रडुन ।
मातीत घासती आपुले वदन । बेहोष होउनी ते पडती ।। ९७ ।।
कृष्णविरह असह्य होउन । दाह जाहला निर्माण ।
तलखी होतसे विलक्षण । वेदना असह्य जाहल्या ।। ९८ ।।
विरहे प्रत्येक लोमकूपात । थेंब थेंब येतसे रक्त ।
उष्णतेने करपे समस्त । जमिन वसलेल्या जागेची ।। ९९ ।।
सांधे शिथिल जाती होउन । इंद्रियकर्मे थांबती पूर्ण ।
पडती संज्ञाशून्य होउन । शरीर निश्चेष्ट पडत असे ।। १०० ।।
ऐसे अत्यंत कठिण साधन । राधाराणी गेली करुन ।
नंतर करिती श्रीचैतन्य । रामकृष्ण तिसरे या काळी ।। १ ।।
राधा स्वदेही उदासीन । कृष्णसुखात सुखी पूर्ण ।
प्रेमे कामगंधहीन । वश श्रीकृष्ण झाले तिला ।। २ ।।
राधाप्रेमे नंदनंदन । तियेच्याच झाले स्वाधिन ।
यास्तव तिच्या कृपेवाचुन । कृष्णदर्शन दुर्लभ असे ।। ३ ।।
रामकृष्ण हे जाणून । तिच्या उपासनी झाले मग्न ।
मनाची तळमळ निवेदन । करिती राधारमणीला ।। ४ ।।
ऐसे काही लोटता दिन । श्रीराधेचे झाले दर्शन ।
बाबांच्या देहात प्रवेशुन । अंतर्धान ती पावली ।। ५ ।।
रूप राधेचे अप्रतिम । सर्वस्वाचा होम करुन ।
श्रीकृष्णावर अमाप असीम । अनंत प्रेम केले तिने ।। ६ ।।



नागकेसर पुष्पातिल । केसरासारखी कांती धवल ।
राधामूर्ती पवित्रोज्ज्वल । अवर्णनीय रूप तिचे ।। ७ ।।
बाबांना त्या वेळेपासुन । वाटे राधाच आहोत आपण ।
तन्मय होउनी ध्यानचिंतन । अविरत करिती कृष्णाचे ।। ८ ।।
पृथगस्तित्व विसरले सर्व । राधेसारखा झाला भाव ।
राधिका रामकृष्णदेव । एक अवस्था दोघांची ।। ९ ।।
करुनी मधुरभावसाधन । महाभावाची लक्षणे पूर्ण ।
झाली होती जी उत्पन्न । राधेस चैतन्य देवाला ।। ११० ।।
तीच लक्षणे परिपूर्ण । रामकृष्णांच्या अंगी पाहुन ।
वैष्णवचरणादि भक्त महान । पंडित विस्मित जाहले ।। ११ ।।
स्तविते झाले अवतार मानुन । रामकृष्णांना भक्त विद्वान ।
ब्राह्मणी वैष्णवतंत्रात निपुण । म्हणतसे भगवान साक्षात ।। १२ ।।
म्हणत असती रामकृष्ण । साधक आजन्म साधना करुन ।
अविरत करुनीही प्रयत्न । एक दोन भाव साधतसे ।। १३ ।।
परि या देही एकाधारे । एकोणिसही भाव सारे ।
प्रकाशिले ते पूर्ण प्रकारे । महाभाव अवस्था ही आहे ।। १४ ।।
कृष्णविरह न होई सहन । तळमळू लागती रामकृष्ण ।
रोमरोमात गेली भिनुन । भावना ललना आहो ही ।। १५ ।।
आपण तर आहोत पुरुष । कल्पना शिवेना मनास ।
शरिराकडुनी घडती विशेष । कर्मे स्त्रियांच्या सारखी ।। १६ ।।
स्वाधिष्ठानचक्र जेथ । तेथील सर्व रोमकूपात ।
शोणित स्राव असे होत । तीन दिवस स्त्रियांपरी ।। १७ ।।
हृदयराम असे सांगत । आपुले वस्त्र न व्हावे दूषित ।
यास्तव कौपिन धारण करित । त्या काळात रामकृष्ण ।। १८ ।।



वेदान्तशास्त्राचा सिद्धांत । मनच देहास घडवी नित्य ।
तीव्र इच्छेने प्रतिक्षणात । शरीरात बदल होत असे ।। १९ ।।
बाबांच्या साधनकालात । बदल होती जे शरिरात ।
त्यामुळे शास्त्रांचे सिद्धांत । कलियुगात सत्यता पावले ।। १२० ।।
ठाकुरांचे अनुभव महान । उपलब्धी तयांची पाहुन ।
प्रसिद्ध पंडित पद्मलोचन । ऋषीसमान मान देती ।। २१ ।।
म्हणती तुमचे अनुभव महान । मागे टाकुनी वेदपुराण ।
गेले असती पुढे निघुन । असाधारण ही उपलब्धी ।। २२ ।।
झाल्यावर राधेचे दर्शन । तिची कृपा होउनी पूर्ण ।
सच्चिदानंद भगवान । श्रीकृष्णदर्शन मग झाले ।। २३ ।।
नेहमीप्रमाणे भगवंत । प्रवेशले बाबांच्या देहात ।
अनुभवास आले अद्वैत । आपण श्रीकृष्ण स्वयमेव ।। २४ ।।
तयांचे श्रीकृष्णचिंतनात । तन्मय होउनी गेले चित्त ।
पृथगस्तित्वाचा पडत । विसर सर्वथा ठाकुरांना ।। २५ ।।
आपण स्वतःच श्रीकृष्ण । ऐसा बोध ठसला पूर्ण ।
जगातील वस्तु संपूर्ण । दिसू लागल्या कृष्णरूप ।। २६ ।।
पुढे दक्षिणेश्वरी बागेत । शिष्यजनांसह असता हिंडत ।
गवती फूल एक अकस्मात । दृष्टीस पडले ठाकुरांच्या ।। २७ ।।
हर्षभरे ते दाखवून । म्हणती करिता मधुरसाधन ।
श्रीकृष्णाचा मजालागुन । दिसला रंग या कुसुमापरी ।। २८ ।।
मधुरभावात तन्मय होउन । ईश्वरप्रेमाची गोडी चाखुन ।
करित श्रीकृष्णांचे चिंतन । बहुत दिन त्यांनी घालविले ।। २९ ।।
एक दिवस त्या काळात । श्रीविष्णूच्या मंदिरात ।
ऐकत असता भागवत । दर्शन अद्भुत लाभले ।। १३० ।।



कथा ऐकता ठाकुरांस । प्राप्त झाला भावावेश ।
ज्योतिर्मय कृष्णमूर्तीस । त्या स्थितीत त्यांनी पाहिले ।। ३१ ।।

त्या मूर्तीच्या चरणापासुन । बाहेर निघाल्या ज्योती दोन ।
एक भागवताला स्पर्शुन । दुसरी स्पर्शे ठाकुरांला ।। ३२ ।।

काही वेळ त्याच स्थितीत । ज्योती तशाच राहिल्या दिसत ।
तेव्हापासुनी दृढ होत । बाबांच्या मनाची धारणा ।। ३३ ।।

भागवत भक्त भगवान । दिसती जरी रूपे तीन ।
परंतु नसती अन्यान्य । एकरूप असती सर्वथा ।। ३४ ।।

केला विषयवासनात्याग । विषासारिखे भासती भोग ।
ईश्वरचिंतनात मन दंग । उदासीन दुसऱ्या विषयांत ।। ३५ ।।

प्राप्तव्य एक परमेश्वर । इतर सर्व वस्तु असार ।
प्रेम परमेश्वरावर । पराकाष्टेचे वाढले ।। ३६ ।।

लहान थोर सर्व गोष्टींत । जगदंबेची आज्ञा घेत ।
मग निर्भयपणाने वर्तत । नि:शंक चित्त करूनिया ।। ३७ ।।

मातेजवळ जसे बाळ । निर्भयपणे खेळे खेळ ।
ठाकुरांचे व्यवहार सकळ । होउ लागले त्यासारिखे ।। ३८ ।।

शिष्टाचार काय असती । लोक आपणा काय म्हणती ।
ठाकुरांना नसे खंती । जगत चित्रवत जाहले ।। ३९ ।।

जगदंबाच केवळ सार । इतर सर्व पसारा असार।
मनात एक जगदीश्वर । त्याविण इतर चिंतन नसे ।। १४० ।।

भावात मधुरभाव थोर । तयाची सीमा गाठल्यावर ।
अद्वैत भावावाचुनी अपर । श्रेष्ठतर भाव काही नसे ।। ४१ ।।

यास्तव आता रामकृष्ण । करितील अद्वैतभावसाधन ।
अन्यत्र कोठे तयांचे मन । त्यावाचुनी आता रमावे ।। ४२ ।।



एकामागुन साधना एक । जगदंबा करवी अनेक ।
रामकृष्ण साधक अलौकिक । व्हायचे तारक जगताला ।। ४३ ।।
वेदान्तसाधनेची मात । येईल पुढिल अध्यायात ।
हकीकत ती अत्यद्‌भुत । स्थिर चित्त करुनी परिसावी ।। ४४ ।।
दिव्यावस्थेत रामकृष्ण । वेड लागले म्हणती जन ।
वार्ता कळता विकृत होउन । चंद्रामाता चिंता करी ।। ४५ ।।
माता कामारपुकुराहुन । दक्षिणेश्वरा आली निघुन ।
मथुरनाथ देई करुन । सर्व व्यवस्था तियेची ।। ४६ ।।
नौबतखाना राहावयाला । स्त्री ठेविली तैनातीला ।
सकळ बंदोबस्त ठेविला । मथुरबाबूने अत्यादरे ।। ४७ ।।
रोज सकाळ संध्याकाळ । ठाकुर थांबती तिच्याजवळ ।
शुश्रुषा करिती काही वेळ । अपार प्रेम मातेवरी ।। ४८ ।।
मथुरनाथाची बाबांवर । श्रद्धा भक्ती असे फार ।
त्याने मनात केला विचार । व्यवस्था करावी ठाकुरांची ।। ४९ ।।
तयास वाटे द्यावे ठेवुन । बँकेत त्यांच्या नावे धन ।
कारण झाल्यास आपुले निधन । उणीव बाबांस पडू नये ।। १५० ।।
परंतु बाबांजवळ ही गोष्ट । काढावयास नसे धारिष्ट्य ।
तयास माहित होती स्पष्ट । मनःस्थिति विशिष्ट बाबांची ।। ५१ ।।
मथुरबाबुने मग ती मात । सांगितली हृदयरामाप्रत ।
तयाने सहज बोलत बोलत । रामकृष्णांना सांगितली ।। ५२ ।।
वार्ता कळताच हातात । काठी घेउनी धावले त्वरित ।
मथुरास म्हणती मजप्रत । विषयी करू तू पाहसी ।। ५३ ।।
मथुरला कळले तत्काळ । येथे शिजणार नाही डाळ ।
ठाकुर निरपेक्ष केवळ । उपाय काहीच सुचेना ।। ५४ ।।



तथापि येथे चंद्रामाता । राहावयाला आली आता ।
तयाला वाटले सफलता । पावेल मनीषा आपुली ।। ५५ ।।
मग तिजकडे जाउनी नित्य । गप्पा करितसे मथुरनाथ ।
चंद्रादेवीस थोड्या दिवसांत । मथुरनाथ प्रिय झाला ।। ५६ ।।
मथुर म्हणाला आजीबाई । घ्यावी माझी सेवा काही ।
ती म्हणे येथे कमी नाही । ठेविसी सर्व व्यवस्था तू ।। ५७ ।।
मथुर म्हणे मज म्हणता आपुला । काहीतरी मग मागा मजला ।
जे का येईल तुमच्या मनाला । देईन तुम्हाला अविलंबे ।। ५८ ।।
चंद्रादेवी करी विचार । तिजला सर्व दिसे भरपूर ।
परंतु हट्ट न सोडी मथुर । म्हणे मागा जे आवडे ।। ५९ ।।
विचार करिता मग तिजला । आठवले तमाखू संपला ।
म्हणाली आणुनी देई मजला । तमाखू चार पैशांचा ।। १६० ।।
मथुरनाथ ते परिसून । वारंवार करी नमन ।
आसवांनी भरिले नयन । विचार मानसी करित असे ।। ६१ ।।
ऐसी माता असल्यावाचुन । ऐसे अलौकिक संतान ।
कैसे उदरी घेइल जनन । धन्य चंद्रादेवी असे ।। ६२ ।।
रामकृष्णांचे दिव्य चरित । करो सकल जनांचे हित ।
अभक्तही होवोत भक्त । अज्ञजनांना ज्ञान मिळो ।। ६३ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६४ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा सोळावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय सतरावा

भगवान रामकृष्णांची कृपा । हरिते सकळ संसारतापा ।
मुक्तिसोपान करिते सोपा । माझे प्रणाम परमेशा ।। १ ।।

आता वेदान्तसाधनेस । श्रीतोतापुरी परमहंस ।
अचानक आले दक्षिणेश्वरास । साह्य बाबांस करावया ।। २ ।।

तयास मुळीच नव्हते ठाउक । येथे असे अद्‌भुत साधक ।
तीर्थे करिता करिता अनेक । सहज पातला त्या ठायी ।। ३ ।।

जगदंबेचा काय उद्देश । आणावयाचा तोतापुरीस ।
या वेळी दक्षिणेश्वरास । ठाउक नव्हता कोणाला ।। ४ ।।

बाबांच्या वेदान्तसाधनेला । येथवा साह्य करावयाला ।
धाडिले सद्‌गुरुरायाला । योजना जगज्जननीची ।। ५ ।।

तोतापुरी परमहंस । उंच भव्य दीर्घपुरुष ।
तयाने केली वर्षे चाळिस । सतत कठोर तपश्चर्या ।। ६ ।।

अविरत यत्न करुनी बहुत । निर्विकल्प समाधि केली प्राप्त ।
नागा संप्रदायी संत । पवित्र मानिती अग्नीला ।। ७ ।।

जाता कोणत्याही ठायाप्रत । अग्नि ठेवुनी प्रज्वलित ।
सकाळ संध्याकाळ करित । पूजा आरती अग्नीची ।। ८ ।।

जे काय मिळतसे भिक्षान्न । त्याचा अग्नीला नैवेद्य करुन ।
नंतर आपण करिती ग्रहण । राहती मग्न ध्यानामधे ।। ९ ।।

गोसावी तोतापुरीची धुनी । पेटलेली असे निशिदिनी ।
होती धुनीच्या सान्निध्यानी । तयाचे सकळही व्यवहार ।। १० ।।



जेवणखाण उठणे बसणे । धुनीजवळ करावे तयाने ।
जव जग झोपे शांतपणाने । समाधी लावी तोतापुरी ।। ११ ।।

निष्कंप दीपासमान मन । होउनी जाई समाधिमग्न ।
दिवसादेखिल प्रतिदिन । समाधि लावी तोतापुरी ।। १२ ।।

वस्त्राने झाकुनी घेई शरिर । ध्यानमग्न होई सत्वर ।
जनांना वाटे साधू थोर । झोपला धुनीच्या सन्निधी ।। १३ ।।

सद्वस्तुवाचुनी अन्य काही । जगात कोणती वस्तु नाही ।
ऐसा प्रत्यक्ष प्रत्यय येई । भय कशाचे मग त्याला ।। १४ ।।

तोतापुरी निर्भय चित्त । जैसा वायू नित्यमुक्त ।
मानेल मनास तिकडे फिरत । बंधन कशाचे नसे तया ।। १५ ।।

तीन दिवसांपेक्षा जास्त । न राहे एकाच गावात ।
आसेतुहिमालयापर्यंत । तीर्थे करीत तो फिरला ।। १६ ।।

कुरुक्षेत्र विभागात । लुधियाना नामक गावात ।
तोतापुरीचे गुरू महंत । होते मठाचे नागांच्या ।। १७ ।।

जयाला संन्यासी मंडळीत । परमहंसपद होई प्राप्त ।
तयालाच करिती महंत । ऐसी रीत असे मठाची ।। १८ ।।

गुरू झाल्यावर समाधिस्थ । तोतापुरी झाला महंत ।
नंगे गोसावी असती मठात । सातशे शिष्य महंताचे ।। १९ ।।

शिष्यास गादीवर बसवून । प्रथम कराया लाविती ध्यान ।
ते जमता तयाहुनी कठिण । देती आसन बसावया ।। २० ।।

शेवटी देती चर्मासन । अथवा जमिनीवर बसवून ।
करावयाला लाविती ध्यान । संन्यासी शिष्यजनांप्रती ।। २१ ।।

हळुहळु नग्न रहावयास । करावा लागतो अभ्यास ।
लज्जाघृणादि अष्टपाश । त्यागावयास शिकविती ।। २२ ।।



साधुजनांच्या संगतीने । कराया सांगती तीर्थाटणे ।
तथापि शेवटी एकट्याने । करावी लागे तीर्थयात्रा ।। २३ ।।

त्या मठातिल मुख्य महंत । किमया विद्या असे जाणत ।
परंपरेने होतसे प्राप्त । विद्या मठाधिकाऱ्याला ।। २४ ।।

ताम्रादि काही धातूपासुन । करिता येतसे त्याला सुवर्ण ।
अवगत तोतापुरीलागुन । किमयाविद्या असे ती ।। २५ ।।

साधावयासी स्वार्थ भोग । करिता विद्येचा उपयोग ।
नष्ट होतसे ती सवेग । अकल्याण व्हायचे तयाचे ।। २६ ।।

मठात संन्याशांचा मेळा । योगक्षेम त्यांचा चालविण्याला ।
क्वचित उपयोग करावयाला । महंताला मुभा असे ।। २७ ।।

नर्मदेच्या तीरावरुन । जगन्नाथपुरीची यात्रा करुन ।
करुनी गंगासागरस्नान । परत फिरला तोतापुरी ।। २८ ।।

अवचित तोतापुरी महंत । दक्षिणेश्वरास आला फिरत ।
दोन तीन दिवसपर्यंत । राहावे विचार ऐसा त्याचा ।। २९ ।।

तयाला येथे आणण्याचा । काय हेतू जगदंबेचा ।
मागमूस या गोष्टीचा । नव्हता ठाउक तयाप्रती ।। ३० ।।

कालीमंदिरामधे जाउन । गंगेस येई करण्या स्नान ।
ईश्वरचिंतनी रामकृष्ण । होते निमग्न त्या ठायी ।। ३१ ।।

तेजःपुंज भावोज्ज्वल । पाहुनी त्यांचे मुखमंडल ।
तोतापुरी जाणे तत्काळ । असामान्य पुरुष असती हे ।। ३२ ।।

चकित झाला तोतापुरी । तंत्रप्राणवंगाभीतरी ।
वेदान्ताचा अधिकारी । थोर पुरुष आला कसा ।। ३३ ।।

बाबांस पाहता न्याहाळुन । खात्री तयाची गेली पटुन ।
थोर अधिकारी रामकृष्ण । असती वेदान्तसाधनेचे ।। ३४ ।।




विचारिले मग ठाकुरांना । करितोस का वेदान्तसाधना ।
ठाकुर उत्तर देती तयांना । ठाउक नाही मजला ते ।। ३५ ।।
ठाउक सकळ असे मातेला । तियेची आज्ञा होता मजला ।
हरकत नाही करावयाला । आदेश पाहिजे आईचा ।। ३६ ।।
तोतापुरी तयाला वदला । विचारुनी ये तव मातेला ।
जास्त दिवस राहावयाला । सवड मजला नसे बरे ।। ३७ ।।
मंदिरात जाता ठाकुरांस । प्राप्त झाला भावावेश ।
जगन्माता प्रिय बाळास । सांगु लागली प्रेमाने ।। ३८ ।।
तोतापुरीला दक्षिणेश्वरास । तुझ्यासाठीच आणिले खास ।
तुजला वेदान्त शिकवायास । शिकून ये त्याच्याकडुनी तू ।। ३९ ।।
रामकृष्ण मग आनंदले । तोतापुरीकडे ते गेले ।
म्हणती आईने आज्ञापिले । वेदान्त साधना करावया ।। ४० ।।
आता कळले तोतापुरीला । आई म्हणे हा श्रीकालीला ।
फार अचंबा वाटे तयाला । अज्ञानमूलक श्रद्धा ही ।। ४१ ।।
वाटे कुसंस्कार अज्ञान । त्याचा प्रभाव आहे म्हणुन ।
ठाकुरांची कीव येउन । हळहळ वाटली तयाप्रती ।। ४२ ।।
तोतापुरी पक्का वेदान्ती । माने केवळ ब्रह्मप्रती ।
निर्गुण ध्यानाने केली प्राप्ती । निर्विकल्प समाधीची तये ।। ४३ ।।
न माने तो ब्रह्मशक्तिला । त्रिगुणमयी त्या मायेला ।
बाबा आई म्हणती जियेला । जगदंबेला भ्रम समजे ।। ४४ ।।
तयास वाटले घाई फार । करू नये भ्रम कराया दूर ।
वेदान्तसाधना केल्यावर । भ्रम जाईल बोध होता ।। ४५ ।।
संन्यासी म्हणाला बाबांस । आता घेई तू संन्यास ।
त्यागिले पाहिजे शिखासूत्रांस । दीक्षा घेतली पाहिजे ।। ४६ ।।




उत्तर देती रामकृष्ण । वृद्ध मातेस येता कळुन ।
तिजला दुःख होइल दारुण । गुप्तपणे ते उरकावे ।। ४७ ।।
तोतापुरी वदला छान । सुमुहूर्त एखादा पाहुन ।
संन्यासदीक्षा तुजलागुन । यथाविधी देईन मी ।। ४८ ।।
शुभ मुहूर्त त्यांनी पाहुन । श्राद्धक्रिया घेतल्या करुन ।
आपुलेही श्राद्ध आपण । रामकृष्ण करिते जाहले ।। ४९ ।।
गुरूवर बाबांचा विश्वास । यथाविधी घेती संन्यास ।
पंचवटीमधिल कुटीस । साहित्य तयांनी जमविले ।। ५० ।।
पवित्र साधनाकुटिरात । ब्राह्ममुहूर्त होता प्राप्त ।
अग्नी करुनी प्रज्वलित । सर्वस्वत्यागव्रत घेतले ।। ५१ ।।
मग उच्चारिले वेदमंत्र । तो ध्वनी गंभीर पवित्र ।
मेदिनीमाजी सर्वत्र । पावन करीत पसरला ।। ५२ ।।
पवित्रसलिला भागिरथीला । काय अत्यंत आनंद जाहला ।
हर्ष ध्वनी करित जगाला । चालली वार्ता कळवावया ।। ५३ ।।
मुक्त समीरही उल्हासुन । पवित्र ध्वनिने पावन होउन ।
शुभवार्ता ती घेउनि पवन । निघाला जगाला सांगावया ।। ५४ ।।
अब्जावधीतिल एकच एक । पुरुषोत्तम शिष्य अलौकिक ।
जयाच्या स्पर्शे पावन पावक । पवित्र होउनी धगधगला ।। ५५ ।।
सद्गुरू पवित्र मंत्र म्हणत । शिष्य पुनरुच्चार करित ।
आहुती टाकिती हुताशनात । करू लागती ते प्रार्थना ।। ५६ ।।
परमानंदलक्षणोपेत । परब्रह्मतत्त्व होवो प्राप्त ।
मधुमय ब्रह्म प्रकाशित । होवो चित्तात माझिया ।। ५७ ।।
यापरी प्रार्थना मंत्र म्हणत । आहुती अर्पिल्या अग्नीत ।
त्यागिले शिखासूत्रांप्रत । होम समाप्त जाहला मग ।। ५८ ।।





गुरू तोतापुरींकडून श्रीरामकृष्णांची अद्वैत साधनेसाठी संन्यासदीक्षा व अद्वैतसाधनेत तीन दिवसांत निर्विकल्प समाधीचा अनुभव.



श्रीरामकृष्णांना अद्वैत अनुभूतीत इतरांच्या दु:खांचा अनुभव : एका कोळवाने दुसऱ्या कोळ्याला मारलेल्या रट्ट्याचा श्रीरामकृष्णांच्या पाठीवर वळ, तसंच कोवळ्या दुर्वांवर चालताना स्वत:च्या छातीवर चालत असल्याच्या वेदनांचा अनुभव.

परंपरेला अनुसरून । दिधले कौपिन काषाय वसन ।
नाम ठेविले रामकृष्ण । पावन करी जे जगताला ।। ५९ ।।
मग विभूतिभूषित होउन । उपदेश करावयाला ग्रहण ।
सन्निध बसले रामकृष्ण । परमहंस तोतापुरिच्या ।। ६० ।।
तोतापुरी सद्गुरुराव । आपुल्या उपलब्धी अनुभव ।
पटवुनी द्यावयासाठी सर्व । पराकाष्ठा करी प्रयत्नांची ।। ६१ ।।
नाना सिद्धांत उपदेशुन । सांगे निर्विकल्प कराया मन ।
आत्मध्यानात व्हावया मग्न । शिष्यास सांगे तोतापुरी ।। ६२ ।।
करावयाला बसले ध्यान । आटोकाट करिती प्रयत्न ।
नामरूपसीमा ओलांडुन । न होई मन निर्विकल्प ।। ६३ ।।
सकळ विषयांपासुनी मुक्त । मन निर्विषय झाले क्षणात ।
परंतु चिद्घन चिरपरिचित । मूर्ती दिसतसे अंबेची ।। ६४ ।।
मन रमे सुंदर रूपावर । नामरूपाचा न पडे विसर ।
ऐसे होतसे वारंवार । परि मन होइना निर्विकल्प ।। ६५ ।।
यापरी लोटता तीन दिवस । रामकृष्ण झाले निराश ।
वदते झाले गुरुरायास । निर्विकल्प होइना मन माझे ।। ६६ ।।
ऐकता श्रीगुरू रागावले । तिरस्कार त्यांचा करुनी वदले ।
मन निर्विकल्प नाही झाले । म्हणजे काय याचा अर्थ ।। ६७ ।।
मग काचेचा तुकडा घेउन । भुवयांमध्ये बळे टोचुन ।
म्हणती येथे आपुले मन । निश्चयाने एकाग्र करी ।। ६८ ।।
पुनरपी दृढ निश्चय करुन । ध्यानास बसले रामकृष्ण ।
पुन्हा चिरपरिचित चिद्घन । दिसली मूर्ती अंबेची ।। ६९ ।।
मग ज्ञानास खड्ग कल्पुन । तिचे केले तुकडे दोन ।
नामरूपसीमा ओलांडुन । मग मन गेले पलीकडे ।। ७० ।।



मनात काही नुरला विकल्प । लागली समाधी निर्विकल्प ।
तोतापुरी गुरू काळ अल्प । बसुनि राहिला त्या ठायी ।। ७१ ।।
मग कुटिराबाहेर येउन । दार बंद घेतले करुन ।
पंचवटीखाली आसन । मांडुनी बसला तोतापुरी ।। ७२ ।।
त्यास वाटले रामकृष्ण । समाधीमधुनी उतरुन ।
द्वार उघडावयालागुन । हाक देतील लवकरी ।। ७३ ।।
परंतु तो दिवस संपला । दुजा उजाडून मावळला ।
तिसरा दिवसही आला गेला । हाक न मारिती रामकृष्ण ।। ७४ ।।
तेधवा विस्मित होउनी मन । वाटले शिष्य असामान्य ।
काय अवस्था घ्यावी पाहुन । दार उघडले कुटिराचे ।। ७५ ।।
तीन दिन एकाच अवस्थेत । शिष्य बसला समाधीत ।
हालचाल काही नाही करित । पाहुनी चकित तोतापुरी ।। ७६ ।।
प्राण असल्याचे न दिसे चिन्ह । शान्त गंभीर दिसे वदन ।
बहिर्जगत हे झाले शून्य । देदीप्यमान मुखमंडळ ।। ७७ ।।
प्रदीप जैसा निष्कलंक निवांत । तैसे स्थिर झाले चित्त ।
एकमेवाद्वितीय ब्रह्मात । विलीन होउनी राहिले ।। ७८ ।।
तोतापुरी होउनी स्तंभित । स्वत:शीच बोले हृद्‌गत ।
काय शक्य असे अद्‌भुत । निर्विकल्प समाधी ही आहे ।। ७९ ।।
जी गोष्ट मजला साधावयाला । चाळीस वर्षांचा काळ लागला ।
काय ती या महापुरुषाला । साधली तीनच दिवसांत ।। ८० ।।
मनामाजी संदेह वाटुन । लक्षणे केली निरीक्षण ।
पुन:पुन्हा खात्री करुन । आश्चर्यमग्न तोतापुरी ।। ८१ ।।
थांबले होते हृदयस्पंदन । श्वासोच्छ्वास थांबला पूर्ण ।
शरीरास पाहिले डिवचुन । प्रतिसाद परंतु नसेची ।। ८२ ।।



आश्चर्य वाटले तोतापुरिला । सीमा न राहिली आनंदाला ।
मुखातुनी मग उद्‌गार निघाला । खरोखर ती तर समाधी ।। ८३ ।।
आपुल्या अलौकिक शिष्याला । समाधिमधुनी उतरावयाला ।
हरि: ॐ ध्वनिने आरंभ केला । प्रक्रियेला श्रीगुरुने ।। ८४ ।।
अतिपावन तो बीजमंत्र । ध्वनि गंभीर परम पवित्र ।
पंचवटीचे पुण्य क्षेत्र । सर्वत्र व्यापुनी टाकितसे ।। ८५ ।।
निर्विकल्पसमाधिमधे मग्न । अविरत राहती रामकृष्ण ।
तोतापुरी गुरू करुनी प्रयत्न । उतरवी समाधी बाबांची ।। ८६ ।।
श्रीगुरू तोतापुरीप्रत । सकळ प्रक्रिया असती ज्ञात ।
म्हणुनि समाधी उतरवीत । पेय तोंडात सोडावया ।। ८७ ।।
जेधवा बाबांस असे भान । वेदान्त चर्चा चाले गहन ।
गुरुशिष्य दोघे अधिकारपूर्ण । काय वर्णन होय त्यांचे ।। ८८ ।।
पहिल्या भेटीत तोतापुरिला । कळले सामान्य नसे चेला ।
अलौकिकत्वाची तयाला । खात्रीच पटली पूर्णपणे ।। ८९ ।।
परमहंस पदवी केली प्रदान । आदर प्रेम वाढले महान ।
मनाला लागले आकर्षण । घडावा लाभ संगतीचा ।। ९० ।।
जास्तीत जास्त दिवस तीन । राहतसे एका स्थानालागुन ।
परंतु सप्ताह लोटला पूर्ण । तरीहि न वाटे जावे असे ।। ९१ ।।
बाबांच्या दिव्य संगतीत । राहावे ऐसे वाटे मनात ।
वेदान्तचर्चा करावी बहुत । आनंद लुटावा वाटतसे ।। ९२ ।।
मग त्या आनंदाच्या भरात । न कळे केव्हा सरली रात ।
खाण्यापिण्याचे नसे राहात । भान अलौकिक गुरुशिष्या ।। ९३ ।।
वेदान्ततत्त्वे गूढ बहुत । स्वानुभवाच्या प्रकाशात ।
विशद करुनी सांगे यथार्थ । थोर अधिकार सद्‌गुरुचा ।। ९४ ।।



गुरू सांगे जो सिद्धांत । तत्काळ प्रकाशे हृदयात ।
अनभुव तयाचा घेई त्वरित । ऐसा अधिकार शिष्याचा ।। ९५ ।।

सद्गुरूला सच्छिष्यलाभ । ऐसा प्रसंग अति दुर्लभ ।
साद प्रतिसाद स्वयंभ । काय साकार झाले इथे ।। ९६ ।।

दर्पणापुढे जसे रूप । दर्पणी दिसे तसे स्वरूप ।
अनुभव सिद्धांत आपोआप । ठसती हृदयी ठाकुरांच्या ।। ९७ ।।

आनंदाचे सुटले तुफान । सर्वदा वेदान्त तत्त्वज्ञान ।
बोधामृताची सरिता भरून । वाहु लागली त्या ठायी ।। ९८ ।।

तोतापुरी न माने दैवत । माने केवल ब्रह्मार्पत ।
अज्ञानजन्य म्हणे नित्य । श्रद्धा साकार देवतांची ।। ९९ ।।

तोतापुरिला बाल्यापासुन । लाभले गुरूचे मार्गदर्शन ।
दूर मायाजालापासुन । राहिला होता तोतापुरी ।। १०० ।।

सद्गुरूची कृपा होउन । अविरत प्रयत्न तयाने करुन ।
करुनि घेतले ब्रह्मज्ञान । भाग्यवान खरोखर तोतापुरी ।। १ ।।

यास्तव भक्तिमार्गार्पत । दीनदुबळ्यांचा म्हणे पंथ ।
भक्तिमार्गाचा यत्किंचित । अनुभव नव्हता तयालागी ।। २ ।।

तोतापुरी नव्हता जाणत । भक्तीच्या उच्च अवस्थेत ।
साधक अनुभवतो अद्वैत । आत्मज्ञान प्राप्त करी ।। ३ ।।

करणे जप तप कीर्तन भजन । तयास साधने वाटती हीन ।
दुबळेपणाचे प्रदर्शन । मानुनी चेष्टा करित असे ।। ४ ।।

ईश्वरविरहे बेहोष होणे । व्याकुळतेने धावा करणे ।
नृत्य करणे गुण गाणे । समजे चाळेच वेड्यांचे ।। ५ ।।

तयास बाळपणापासुन । जगदंबेच्या कृपेकरुन ।
अनुकूल परिस्थिती लाभुन । सिद्धत्व मिळाले सद्भाग्ये ।। ६ ।।



मायेस मिथ्या माने चित्ती । जगदंबा जी ब्रह्मशक्ती ।
तिची मनोभावे भक्ती । करणे व्यर्थ वाटे तया ।। ७ ।।

बाबा बाळपणापासुन । संध्याकाळी करिती भजन ।
हरि हरि ऐसे नामोच्चारण । करिती टाळ्या वाजविती ।। ८ ।।

एकदा वेदान्तचर्चा करित । असता संध्यासमय होत ।
चर्चा थांबवुनी अकस्मात । भजन करिती रामकृष्ण ।। ९ ।।

नवल वाटले गुरूलागुन । वेदान्ताचा अधिकारी असुन ।
निर्विकल्पसमाधी मिळवुन । हीन साधन भजन करी ।। ११० ।।

थट्टेत म्हणाला ठाकुरांते । अब क्यो हो रोटी ठोकते।
रामकृष्ण वदले तोतापुरिते । हासत हासत त्या वेळी ।। ११ ।।

मी करीत आहे भजन । भगवंताचे नामस्मरण ।
तुम्ही थोडे स्तब्ध बसुन । नित्यक्रम पूर्ण होऊ द्या ।। १२ ।।

वाटले तोतापुरिच्या मनात । यातहि काही असावा अर्थ ।
तोतापुरी मग राहे शांत । संपेपर्यंत भजन त्यांचे ।। १३ ।।

एके दिवशी संध्याकाळी । गुरुशिष्य बैसले धुनीजवळी ।
त्या बागेतिल एक माळी । विस्तव घेई धुनीतुनी ।। १४ ।।

दोघे अद्वैतानुभवात । चर्चित होते ते वेदान्त ।
आगमन नाही झाले माहित । माळ्याचे त्या दोघांसही ।। १५ ।।

इतुक्यात तोतापुरिची दृष्टी । अवचित पडली माळ्यावरती ।
क्रोध तयाच्या आला चित्ती । पवित्र अग्नीला हा शिवला ।। १६ ।।

मग चिमटा हाती घेउन । करू पाहे त्याला ताडन ।
भावावस्थेत रामकृष्ण । हासू लागले तयाप्रती ।। १७ ।।

तोतापुरी तयांस म्हणाला । हासतोस का सांग मजला ।
या माणसाने अपराध केला । पवित्र अग्नीला शिवला हा ।। १८ ।।



तयास म्हणती रामकृष्ण । नवल वाटते कृत्य पाहुन ।
कसे हे तुमचे ब्रह्मज्ञान । आचरण ज्याचे होत नसे ।। १९ ।।
आताच तुम्ही केले कथन । एका ब्रह्मवस्तूवाचुन ।
विश्वात पदार्थ नसे अन्य । परिपूर्ण ब्रह्मांड भरले असे ।। १२० ।।
वस्तु व्यक्ती आणि जगत । सर्व त्याचा प्रकाश होत ।
सर्व विसरुनी एका क्षणात । बघतसा तयाला ताडावया ।। २१ ।।
नवल वाटुनी असे हासत । महामायेचा प्रभाव समस्त ।
तोतापुरीच्या लक्षात । आला भावार्थ बोलण्याचा ।। २२ ।।
विचार केला गंभिर होउन । म्हणे सत्य तुझे भाषण ।
क्रोध हा असे पाजी महान । आजपासुनी मी सोडिला ।। २३ ।।
तेव्हापासुनी तोतापुरी । नच रागावे कोणावरी ।
धरितसे शांतता अंतरी । स्मरुनी उपदेश बाबांचा ।। २४ ।।
तोतापुरी निर्भय चित्ती । त्यास ठाऊक नसे भीती ।
एकदा रात्र झाल्यावरती । प्रज्वलित करी तो अग्नीला ।। २५ ।।
पसरली शांतता आसमंतात । वारासुद्धा नव्हता वाहात ।
आता बसावे ध्यान करित । विचार करी मनी तोतापुरी ।। २६ ।।
इतुक्यात पंचवटीतिल । वटवृक्ष हालला खलखल ।
एक अतिभव्य उंच विशाल । पुरुष उतरला भूमीवर ।। २७ ।।
एकेक पाउल पुढे येउन । धुनीजवळ राहिला बसुन ।
गुरूकडे पाहे टक लावुन । आश्चर्यमग्न तोतापुरी ।। २८ ।।
तोतापुरी पुसे तू कोण । तो म्हणे मी भैरव असुन ।
रक्षावया हे देवस्थान । येथेच असतो झाडावर ।। २९ ।।
न गडबडता यत्किंचित । शांतपणाने गुरू बोलत ।
तू मी एकच आहोत । परब्रह्माची स्वरूपे ।। १३० ।।



येथे धुनीच्या जवळ बसुन । परब्रह्माचे करी ध्यान ।
तोतापुरिचे ऐकुनी वचन । हासुनी अदृश्य जाहला तो ।। ३१ ।।
जणू काही नाही घडले । तोतापुरीने ध्यान लाविले ।
रात्रीचे वृत्त सांगितले । दुसऱ्या दिवशी ठाकुरांना ।। ३२ ।।
तयास म्हणती रामकृष्ण । अनेकदा मज झाले दर्शन ।
भैरव सांगे मजलागुन । पुढील गोष्टी घडणाऱ्या ।। ३३ ।।
मागे पंचवटीची जमिन । घ्यावया कंपनी करी प्रयत्न ।
तेथवा मला न पडे चैन । चिंता मनाला वाटतसे ।। ३४ ।।
इतुके चांगले करण्या ध्यान । दुसरे कोठे मिळेल स्थान ।
आपुल्यापरीने करी प्रयत्न । मथुरनाथ त्यासाठी ।। ३५ ।।
तेथवा भैरव दर्शन देउन । सांगे जाणार नाही जमिन ।
कंपनीविरुद्ध कोर्टाकडुन । निकाल लागेल भिऊ नको ।। ३६ ।।
जैसे भैरवे सांगितले । तैसेचि पुढे घडुनी आले ।
पंचवटीचे क्षेत्र राहिले । मजला ध्यान करावया ।। ३७ ।।
तोतापुरिची शरीरप्रकृती । पूर्वीपासुनि निकोप होती ।
ठाउक नव्हते तयाप्रती । कधिही अस्वास्थ्य देहाचे ।। ३८ ।।
जे खावे ते पचुनी जावे । लेटताच निद्राधिन व्हावे ।
चित्त सर्वदा शांत असावे । नसावे कारण चिंतेचे ।। ३९ ।।
बंगालदेशी आल्यावर । वज्रासारखे असुनी शरिर ।
रक्तअमांशादि विकार । होउनी उदर दुखत असे ।। १४० ।।
मन तयाचे धीर गंभीर । सदैव करी ब्रह्मविचार ।
समाधिमाजी राहे स्थिर । आनंदसागर मनामधे ।। ४१ ।।
पंचभूतांच्या तडाक्यात । देह सापडता अकस्मात ।
तारावयाला कोण समर्थ । एका जगज्जननीविण ।। ४२ ।।



तोतापुरीस आले कळुन । येथिल दमट हवामान ।
न होय आपणाला सहन । बिघडेल आपुली प्रकृती ।। ४३ ।।
तयास वाटे आज जावे । इतुक्यात रामकृष्ण यावे ।
वेदान्तचर्चेमधे रमावे । वाटे जावे दुसऱ्या दिनी ।। ४४ ।।
रामकृष्णांच्या संगतीस । सोडावे न वाटे तयास ।
ऐसे लोटले बहुत दिवस । रोग फारच बळावला ।। ४५ ।।
असह्य क्लेश होती कधी । तेव्हा लावुनी बसे समाधी ।
विसरे दु:ख क्लेश व्याधी । समाधीमधे असताना ।। ४६ ।।
तथापि एका रात्रीस फार । दुखू लागले त्याचे उदर ।
वेदनेचा पडण्या विसर । समाधि लावू पाहतसे ।। ४७ ।।
परंतु अपार करुनी प्रयत्न । मन होइना समाधिमग्न ।
पोटात वेदना होती दारुण । लागे मग मन देहाकडे ।। ४८ ।।
मग देहाचा आला राग । याच्याच योगे भोगणे भोग ।
मी तर देहापासुनी अलग । कासया संग मग याचा ।। ४९ ।।
आताच जाउनी भागिरथीत । करावा देह विसर्जित ।
ऐसा विचार येता मनात । निघाला त्वरित गंगेकडे ।। १५० ।।
शिरुनी गंगाप्रवाहात । पाण्यात दूर जाई चालत ।
परंतु देह बुडे इतपत । उदक दिसेना कोठेही ।। ५१ ।।
आणखी पुढे जाता चालत । पावला पैलतीराप्रत ।
परंतु कोठेही भागिरथीत । पुरेसे पाणी आढळेना ।। ५२ ।।
मग होउनी आश्चर्यचकित । वाटले बुडुनि मरण्यास नदित
पाणी नसे हे नवल खचित । दैवी मायाच ही काय ।। ५३ ।।
तव इतुक्यामाजी आतुन । वाटले बुद्धीचे आवरण ।
कोणी टाकितो दूर करुन । प्रकाश पडला अंतरात ।। ५४ ।।



मग स्वगत बोलू लागला । जगन्मातेचा खेळ सगळा ।
तिची असे ही सगळी लीला । अंतराळी जळी स्थळी ती ।। ५५ ।।
असे देह ती तीच मन । भोग यातना ज्ञान अज्ञान ।
तीच मृत्यू तीच जीवन । दृश्यादृश्य तीच असे ।। ५६ ।।
मनबुद्धीच्या असुनि सीमेत । व्यापिला पलीकडला प्रांत ।
कर्तुमकर्तुं करण्या समर्थ । अघटनघटनापटीयसी ।। ५७ ।।
कोणीहि तियेच्या इच्छेवाचुन । सुटेना मायाजालामधुन ।
करितसे मी चिंतन ध्यान । ब्रह्म म्हणुनी ओळखितो ।। ५८ ।।
तेच असे ही जगज्जननी । ब्रह्म शक्ती नसती दोन्ही ।
तियेच्या इच्छेवाचुनी कोणी । मरण्यालाही पात्र नसे ।। ५९ ।।
ऐसा मनात आला विचार । गंगेतहि नसे पुरेसे नीर ।
अमावास्येचा अंधकार । जग झोपलेले शांतपणे ।। १६० ।।
पाण्यात चाले तोतापुरी । जगदंबेचे चिंतन करी ।
अंचित्य तियेची लीला सारी । जयघोष करी अंबेचा ।। ६१ ।।
माया म्हणुनी जगदंबेला । उपेक्षिले होते तिजला ।
आता समर्पण करुनी स्वत:ला । परत पातला पंचवटीस ।। ६२ ।।
नाहि राहिले देहभान । दु:खहि गेला विसरून ।
जगदंबेचे नामस्मरण । करुनि रात्र ती घालविली ।। ६३ ।।
प्रभाती येता रामकृष्ण । पाहती तोतापुरीलागुन ।
तव तो गेला बदलून । विलसे आनंद मुखावर ।। ६४ ।।
तोतापुरीने रामकृष्णांस । सांगितले जवळ बसावयास ।
रात्रीची हकीकत तयास । कथन केली सविस्तर ।। ६५ ।।
म्हणे आजार बंधू होउन । जगदंबेचे घडवी दर्शन ।
इतुके दिवस मी अज्ञान । नव्हतो मानित अंबेला ।। ६६ ।।



आता माझे उघडले डोळे । स्पष्टपणाने मजला कळले ।
तिचेच असती खेळ सगळे । मोह पाडला होता तिने ।। ६७ ।।
तीन दिवसांपेक्षा जास्त । न राहे एकाच गावात ।
तथापि तिचेची इच्छा समर्थ । अकरा महिने वास केला ।। ६८ ।।
आता तिजला विचारुन । दे मज आज्ञा मिळवून ।
म्हणजे येथुनी करीन गमन । तव बाबा हासत बोलती ।। ६९ ।।
मानत नव्हता जगन्माता । तिजला मिथ्या म्हणत होता ।
वाद मजसी घालित होता । आता खात्री पटली का ।। १७० ।।
तिने समजाविले मजप्रती । एकच अग्नी दाहकशक्ती ।
ब्रह्म ब्रह्मशक्ती असती । एकच त्यापरी जाणावे ।। ७१ ।।
आता तुमच्या प्रत्यया आले । खरोखर हे चांगले झाले ।
यथार्थ तत्त्व तुम्हास कळले । कळली मातेची महानता ।। ७२ ।।
मग त्या दिवशी प्रात:काळी । दोघे प्रवेश करिती देउळी ।
प्रार्थना जगदंबेची केली । नमस्कार करिती अत्यादरे ।। ७३ ।।
जगदंबेला आळवीत । साष्टांग करुनी प्रणिपात ।
निरोप घेउनि गमन करित । महाज्ञानी तोतापुरी ।। ७४ ।।
येणेपरी रामकृष्ण । भक्तिमार्ग गुरूला पटवुन ।
गुरूचेही गुरू आपण । होउनी राहिले एकेपरी ।। ७५ ।।
सर्वश्रेष्ठ जी साध्यांत । निर्विकल्पसमाधी केली प्राप्त ।
साधनामंदिर येथे समाप्त । झाले कळस ठेविला हा ।। ७६ ।।
काही न राहिले करणे प्राप्त । ठाकुर झाले जीवन्मुक्त ।
जीव जगत या वस्तु समस्त । स्वरूप भासती ब्रह्माचे ।। ७७ ।।
सर्वत्र पसरला ब्रह्मानंद । विलय पावले भेदाभेद ।
आत्मानंदात ते स्वच्छंद । करिती विहार सर्वकाळ ।। ७८ ।।



सर्व धर्मपंथांचे ध्येय । सकळ साधनांचे श्रेय ।
आत्मानंदस्थिती होय । घेती अनुभव सर्वकाळ ।। ७९ ।।
जी स्थिती प्राप्त होण्याप्रती । ऋषी मुनी तपी योगी इच्छिती ।
ब्रह्मचर्यादि व्रते आचरिती । करिती कठोर तपश्चर्या ।। १८० ।।
ती स्थिति स्वत: प्राप्त करुन । सिद्ध झाले कराया दान ।
कोण कोण ते भाग्यवान । लाभ घेउनी धन्य होती ।। ८१ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १८२ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा सतरावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय अठरावा

सदा करो मन नमन । सदैव करो चित्त चिंतन ।
सदा करो माझे वदन । भजन रामकृष्ण हरी ।। १ ।।

तोतापुरींच्या गमनानंतर । रामकृष्णांनी केला विचार ।
आता रमावे निरंतर । निर्विकल्प अद्वैत भावात ।। २ ।।

मी तू आणि चराचर जगात । विलय पावती जेथे समस्त ।
अखंड सच्चिदानंदरूपात । एकरूप होउनी राहावे ।। ३ ।।

सदैव राहती समाधिमग्न । शरीराचेहि नसे भान ।
खाईन पिईन वा झोपेन । विचारहि येइना मनामधे ।। ४ ।।

बोलणे चालणे पडले बंद । सर्वत्र केवळ आनंद ।
त्या अवस्थेत अनिर्बंध । सदैव स्वच्छंद विहरती ।। ५ ।।

नाही दिशा रूप नाम । अनिर्वचनीय निरूपम ।
परात्पर जे कैवल्यधाम । तेथे अविरत विहारती ।। ६ ।।

जेथुनी साधक साधारण । येउ शकेना परतून ।
शरीर जेवी पिकले पान । पडे एकवीस दिवसांत ।। ७ ।।

रामकृष्ण म्हणती समस्त । आईची इच्छा तैसेच होत ।
म्हणुनी सहामासपर्यंत । अवस्थेत त्या राहिलो ।। ८ ।।

न कळे केव्हा उगवे दिवस । रात्र येई होई खलास ।
न समजे काहीच मनास । नाकात माशा शिरताही ।। ९ ।।

केस वाळुनी जटा होत । विधि होती नेसल्या वस्त्रात ।
परंतु ते न होई माहित । शरीर मग कैसे टिकावे ।। १० ।।



परी तेधवा दक्षिणेश्वरास । आला होता योगीपुरुष ।
पाहताच श्रीरामकृष्णांस । अवस्था तयांची ओळखिली ।। ११ ।।
म्हणे भविष्यात यांच्याकडुन । घडणार असती कार्ये महान ।
व्हावयाचे जनकल्याण । रक्षण आपण करू यांचे ।। १२ ।।
तयाने देहास थोडे स्पर्शुन । शुद्धीस यावया करावा प्रयत्न ।
शुद्धि पावता एक दोन । कोंबावे घास घशामधे ।। १३ ।।
पोटात कधी जावा अंश । कधी बाहेरच राहावा घास ।
ऐसा प्रकार सहा मास । अविरत असे चाललेला ।। १४ ।।
मग जगदंबा दे आदेश । लोककल्याण साधावयास ।
अवतारकार्य करावयास । आता असावे भावमुखी ।। १५ ।।
मथुरबाबूचे ठाकुरांवर । भक्तिप्रेम असे फार ।
सहस्रपटिने वाढली थोर । बाबांवर श्रद्धा तयाची ।। १६ ।।
जगदंबादासी तयाची पत्नी । तिज रोग झाला संग्रहिणी ।
उपचार करुनही डॉक्टरांनी । पडेना तिजला आराम ।। १७ ।।
उलट रोग वाढत गेला । असाध्य म्हणुनी ठरविला ।
ऐकुनी मथुर घाबरला । काय करावे कळेना ।। १८ ।।
दरिद्री कुळात जन्मला मथुर । राणीने जावई केल्यावर ।
दैन्य झाले होते दूर । कारभार तो पाहे तिचा ।। १९ ।।
परंतु पत्नीचा होता अंत । जाईल वैभव मग समस्त ।
विचार ऐसे येता मनात । चिंताक्रांत झाला मथुरबाबू ।। २० ।।
रोग असाध्य हे सांगुन । वैद्य डॉक्टर गेले निघुन ।
मथुरला मात्र न पडे चैन । मानसी उद्विग्न जाहला ।। २१ ।।
आता केवळ एक आधार । रामकृष्णदेव साचार ।
लोळण घेतली पायावर । सद्गदित होउनी बोलतसे ।। २२ ।।



माझे व्हायचे होवो खुशाल । परी सेवा तुमची अंतरेल ।
दीनवाणी ऐकता कळवळ । आली श्रीरामकृष्णांना ।। २३ ।।
मग भावाविष्ट होउन । तयाला देती अभयदान ।
तुझी पत्नी या दुखण्यातुन । बरी होईल भिऊ नको ।। २४ ।।
मथुरनाथ असे जाणत । बाबांचे बोल होती सत्य ।
समाधान पावुनी मनात । आनंदित होउनी परतला ।। २५ ।।
मथुर घराला जाता परत । तयाला मात कळली त्वरित ।
पत्निचा धोका टळला समस्त । अवस्थेत पालट पडतसे ।। २६ ।।
सांगत असती रामकृष्ण । तिची प्रकृती बरी होउन ।
तिचा सारा रोग येउन । बसला माझ्या शरिरावर ।। २७ ।।
रक्तआमांशाचा नंतर । ठाकुरांस जडला आजार ।
पोटदुखीच्या वेदना फार । होउ लागल्या तयांना ।। २८ ।।
मुरडा येउनी पोटास । जावे लागे सदा शौचास ।
तो भोग भोगिला सहा मास । देहभान मग लाभले ।। २९ ।।
तरिही मधुन मधुन मन । आपोआप मोकळे सुटुन ।
बघता बघता होतसे मग्न । निर्विकल्प अवस्थेत ।। ३० ।।
प्रार्थिले होते जगदंबेला । अविच्छेद अवस्था देई मजला ।
तियेच्या कृपेने लाभ जाहला । सच्चिदानंद अवस्थेचा ।। ३१ ।।
अखंडात मन असे लीन । ऐसे कितितरी लोटले दिन ।
भक्तिभाव गेला हारपून । येइना आठवण भक्तांची ।। ३२ ।।
देवदेवतांची चित्रे छान । काढुनी टाकिली खोलीतुन ।
डोके गेले जड होउन । वाटे प्राण जाऊ पाहे ।। ३३ ।।
त्या निर्विकल्प अवस्थेतुन । जेधवा खाली उतरे मन ।
तई कासाविस होई प्राण । वाटे जगावे कशासाठी ।। ३४ ।।



सांगत असती काही जन । आम्ही पाहिले रामकृष्ण ।
तीन दिवस रात्री तीन । समाधिमग्न असलेले ।। ३५ ।।
त्यांची समाधी लांबता फार । गाइच्या तुपाने त्यांचे शरिर ।
खूप मर्दुनी शुद्धीवर । आणावे लागे तयांप्रती ।। ३६ ।।
रामकृष्ण स्वत: सांगती । मनाची असे ऊर्ध्वगती ।
समाधीतुन उतरण्याप्रती । तयाला इच्छा होत नसे ।। ३७ ।।
यास्तव तुमच्या कल्याणा । काहीतरी ठेवुनी वासना ।
खाली आणावे लागे मना । तेव्हा हळुहळु उतरतसे ।। ३८ ।।
कधी कधी खाली उतरता । पुनरपि पावे निजावस्था ।
वासना मनात घोळविता । मग ते खाली येत असे ।। ३९ ।।
ऐसे सहा मासपर्यंत । राहिले निर्विकल्प समाधित ।
इकडे शरीर भोग भोगत । संग्रहिणीच्या व्याधीने ।। ४० ।।
हृदयराम असे सतत । मग्न शुश्रुषा करण्यात ।
बंदोबस्त ठेवी मथुरनाथ । औषधोपचारांचा तयांच्या ।। ४१ ।।
इकडे भोग भोगी तन । दिव्यानंदात निमग्न मन ।
घडता कारण अतिशय सान । निर्विकल्प समाधी लागतसे ।। ४२ ।।
दक्षिणेश्वराला यावेळे । संन्याशाचे येती मेळे ।
वेदान्ताविषयी चर्चा चाले । वाद ऐकती रामकृष्ण ।। ४३ ।।
शरीराचा तो भोग भोगता । रामकृष्ण परिसती वेदान्ता ।
कठिण एखादा प्रश्न निघता । निर्णय होइना जयाचा ।। ४४ ।।
तेव्हा तयांना रामकृष्ण । दोनतीन गोष्टी सांगुन ।
करिती तयांचे समाधान । निकाल लाविती प्रश्नाचा ।। ४५ ।।
जो जो भाव जेव्हा साधला । त्या त्या भावांचा साधकमेळा ।
आपुला आदर्श पाहावयाला । येउ लागला दक्षिणेश्वरी ।। ४६ ।।



निजादर्श प्रत्यक्ष पाहुन । लाभ उठविती साधकजन ।
सकळ संशय जाती गळुन । स्वमार्गात प्रकाश दिसे ।। ४७ ।।

कोणत्याहि मताचे साधन । अद्वैतभावात होणे विलिन ।
अवस्था अंतिम ती महान । प्राप्त होतसे साधकाला ।। ४८ ।।

भक्तिच्या उच्च अवस्थेत । साधकास ती होई प्राप्त ।
अंती मिळतात अद्वैतात । सकळ मार्ग मते सारी ।। ४९ ।।

अत्यंत क्लेश भोगल्यावर । रोगास पडू लागला उतार ।
मग हळूहळू त्यांचे शरीर । व्याधिमुक्त जाहले ।। ५० ।।

अनुलक्षून दक्षिणेश्वर । हिंदु संन्यासी येती फार ।
तैसेच मुसलमान फकिर । भिक्षा सकळा मिळत असे ।। ५१ ।।

त्या मुसलमान फकिरांत । गोविंदराय आला तेथ ।
अरबी फारसी भाषा अवगत । असती तया फकिराला ।। ५२ ।।

गोविंदराय क्षत्रिय असुन । सर्व धर्मांचा अभ्यास करुन ।
इस्लामाकडे वळले मन । दीक्षा घेतली धर्माची ।। ५३ ।।

तेव्हापासुनी वाची कुराण । त्या साधनांचे अनुष्ठान ।
करू लागला मनापासुन । श्रद्धासंपन्न तो असे ।। ५४ ।।

तो आला पंचवटीखाली । भिक्षेचीही व्यवस्था झाली ।
दक्षिणेश्वरास त्या काळी । राहु लागला आनंदे ।। ५५ ।।

तयाचा स्वभाव असे सरळ । अंत:करण असे निर्मळ ।
भूतमात्रांचा तो कनवाळ । ओळख झाली बाबांची ।। ५६ ।।

गोविंदरायाच्या संगतीत । रामकृष्णांच्या आले मनात ।
ईश्वरप्राप्तीचाच पंथ । इस्लामधर्मही असावा ।। ५७ ।।

अंबा अनंत लीलामयी । याही मार्गाने दर्शन देई ।
साधक कैसा कृतार्थ होई । हेही पाहिले पाहिजे ।। ५८ ।।



अंबेने गोविंदरायास । कासया आणिले दक्षिणेश्वरास ।
कोण मातेचा उद्देश । पूर्णार्थाने जाणू शके ।। ५९ ।।

ज्ञानभक्ती आणि योग । वेदान्त साधना झाल्या सांग ।
पूर्णता पावले महाभाग । निर्विकल्प समाधी लाभली ।। ६० ।।

झाली परमहंस अवस्था प्राप्त । झाले ईश्वरमय हे जगत ।
विधी आचार लोपले समस्त । गलित कर्मावस्था लाभली ।। ६१ ।।

ऐसी अवस्था उच्चतम । झाले सर्वं खल्विदं ब्रह्म ।
का मग आता धरावा काम । इस्लामसाधना करावया ।। ६२ ।।

जगद्गुरूत्व व्हावया सार्थ । आदर्श सकळ धर्माप्रत ।
मिळावा ऐसाच असे हेत । असंशय जगज्जननीचा ।। ६३ ।।

सर्व धर्म असती सत्य । ईश्वरनिर्मित सकल पंथ ।
हे सांगण्यासी कलियुगात । धर्म समस्त आचरिले ।। ६४ ।।

युगप्रयोजनकार्य साचार । इस्लामियांस गुरू थोर ।
जयाचा असे श्रेष्ठ अधिकार । मिळावा हे असे नियोजित ।। ६५ ।।

स्वत: प्रत्यक्ष आचार करुन । जो राहील आदर्श होउन ।
प्रकाशवी जो धर्म पूर्ण । नरोत्तम ऐसा अवश्य असे ।। ६६ ।।

यास्तव आता रामकृष्ण । करिती इस्लामधर्मसाधन।
कृतार्थ होती मुसलमान । आदर्श पाहुनी स्वधर्माचा ।। ६७ ।।

गोविंदराय यांच्याकडुन । इस्लामधर्मदीक्षा घेउन ।
यथाविधी करिती साधन । श्रीरामकृष्ण अहर्निश ।। ६८ ।।

नेसु लागती विकच्छ धोतर । नमाज पढती तीन प्रहर ।
हिंदुभाव लोपती समग्र । मनामधुनी बाबांच्या ।। ६९ ।।

देवदेवतांचे घ्यावे दर्शन । हेहि न इच्छी त्यांचे मन ।
खाणेपिणे लेणे वसन । मुसलमानांच्यासारिखे ।। ७० ।।



मथुरने व्यवस्था करुन । ब्राह्मण स्वयंपाक्याकडुन ।
तयार करुन घेती अन्न । मुसलमान पद्धतीचे ।। ७१ ।।

रामकृष्ण तेव्हा मंदिरास । न जाती जगदंबा दर्शनास ।
सदैव अल्ला अल्ला ध्यास । तीन दिवस ऐसे लोटले ।। ७२ ।।

दिसला दाढीवाला भव्य । ज्योतिर्मय मानव दिव्य ।
ऐसे दर्शन झाले अपूर्व । साध्य इस्लामधर्माचे ।। ७३ ।।

ठाकुरांचे मन मग त्वरित । मिळाले अद्वैतभावात ।
अंतिम ध्येय झाले प्राप्त । तीन दिवसांत इस्लामचे ।। ७४ ।।

बुद्धियुगाच्या या काळात । संदेहवादी बनले बहुत ।
यास्तव इस्लामाची सांप्रत । सत्यता लागली पटवावी ।। ७५ ।।

आता हिंदु मुसलमान । जरी भासती धर्म भिन्न ।
तथापि विरोध मुळांतून । नसे हे कळले जगताला ।। ७६ ।।

रामकृष्णांची त्या काळी । प्रकृति झाली होती चांगली ।
आता पुनरपि वर्षाकाळी । न व्हावा बिघाड उदरात ।। ७७ ।।

यास्तव त्यांचा भक्त मथुर । मनामधे करी विचार ।
बाबांचे गाव कामारपुकुर । तेथे तयांना पाठवावे ।। ७८ ।।

मथुर आणि तयाची पत्नी । सर्व सामग्री सिद्ध करुनी ।
देती तयांची व्यवस्था करुनी । कामारपुकुरास जाण्याची ।। ७९ ।।

शुभ मुहूर्त मग पाहुनी । हृदयराम भैरवी ब्राह्मणी ।
दोघाजणांना सवे घेउनी । कामारपुकुरास पातले ।। ८० ।।

रामकृष्णांसंबंधी गावात । पसरल्या होत्या वार्ता बहुत ।
हरि हरि कधी ते म्हणतात । वेश घेउनी स्त्रियांचा ।। ८१ ।।

कधी अल्ला अल्ला करिती । काली काली कधी म्हणिती ।
जनांस उत्कंठा वाटे चित्ती । विविध वार्ता ऐकूनिया ।। ८२ ।।



परंतु पाहता प्रत्यक्षात । बदल दिसेना वर्तनात ।
पूर्वीप्रमाणे असे दिसत । प्रेमळ विनोदी स्वभाव ।। ८३ ।।
तेज तळपे वदनावर । वसे मनात ईश्वरनिर्भर ।
अंतर्मुख वृत्ती समग्र । नामस्मरणात उल्हास ।। ८४ ।।
दर्शना येती नारीनर । आनंदाचा भरे बाजार ।
मंडळी करू लागली विचार । तयांच्या भार्येस आणावे ।। ८५ ।।
सारदादेवी असता लहान । सहा वर्षांची होता पूर्ण ।
तेधवा तियेने रामकृष्ण । पाहिले होते एकदा ।। ८६ ।।
कुळामधल्या रूढीप्रमाणे । बाबा सासुरवाडीकारणे ।
करिती जयरामवाटीस जाणे । सातवे लागता पत्नीला ।। ८७ ।।
घरात येताच रामकृष्ण । कोठेतरी बसावे दडुन ।
एवढीच होती आठवण । आठ वर्षांपूर्वीची ।। ८८ ।।
हृदयने तथापि तिला शोधुन । तळ्यातिल कमळे आणुन ।
तिच्या चरणांचे केले पूजन । चरणे टाकिली झाकूनिया ।। ८९ ।।
सारदामणीदेवीलागुन । त्यावेळचे इतुकेच स्मरण ।
ती तेधवा असे लहान । त्यावर वर्षे लोटिली ।। ९० ।।
प्रथमच मोठी झाल्यावर । आताच पाहिले प्रभुवर ।
रामकृष्ण करिती विचार । सुशिक्षण तिजला देण्याचा ।। ९१ ।।
विवाह झाला कळता मात । तोतापुरि वदे बाबाप्रत ।
विवेक वैराग्य अविचलित । असावे विवाहिताचेही ।। ९२ ।।
स्त्रीपुरुषभेद ज्याच्या मनी । कशाचा तो ब्रह्मज्ञानी ।
जवळ असुनी आपुली पत्नी । ब्रह्मचर्य जो पाळतसे ।। ९३ ।।
त्याग वैराग्य आणि ज्ञान । जयाच्या पाशी विवेक पूर्ण ।
त्यालाच खरे आत्मज्ञान । लाभले ऐसे समजावे ।। ९४ ।।



बाबांस वाटले पत्नी आली । संधी ही चांगली लाभली ।
तपश्चर्या पाहिजे लाविली । कसास इतुक्या दिवसांची ।। ९५ ।।
आरंभिती द्यावया शिक्षण। सद्व्ययी खर्च करावे धन ।
जनांचा स्वभाव पारखून । व्यवहार कैसा करावा ।। ९६ ।।
यापरी करुनी सुरुवात । निर्विकल्पसमाधिपर्यंत ।
शिक्षण देउनी पत्नीप्रत । कर्तव्य पतीचे बजाविले ।। ९७ ।।
पत्नीवर कामगंधहीन । प्रेम करिती रामकृष्ण ।
पारमार्थिक उन्नती पूर्ण । करविली सारदादेवींची ।। ९८ ।।
सारदादेवी आमरण । आपुली इष्ट देवता मानुन ।
करिती रामकृष्णांचे पूजन । संबंध दिव्य तो दोघांचा ।। ९९ ।।
बाळपणीची मित्रमंडळी । बाबांभोवती जमली सगळी ।
रामकृष्णांना तये काळी । वाटला अत्यंत आनंद ।। १०० ।।
जसा का एखादा माणुस । पुष्कळ दिवसांनी यावा घरास ।
भेटावा सकळ स्वजनांस । तैसा आनंद ठाकुरांना ।। १ ।।
आठ वर्षांची तपस्या होउन । पूर्ण ज्ञानी रामकृष्ण ।
हास्यविनोदातही शिक्षण । देउ लागले भक्तीचे ।। २ ।।
तयांच्या मनात वाटावे । कल्याण जनांचे साधावे ।
ईश्वरप्राप्तीस लावावे । लक्ष या सकळ जनांचे ।। ३ ।।
त्यांच्या भोवती सदोदित । लहान थोर गरीबश्रीमंत ।
येती करिती सत्संगत । बालके पुरुष आणि स्त्रिया ।। ४ ।।
धर्मदास लाहाची भगिनी । प्रसन्नकुमारी बसे येउनी ।
आनंद तियेच्या वाटे मनी । उपदेश ऐकुनी बाबांचा ।। ५ ।।
बाळपणीचा सहकारी । गयाविष्णू येई घरी ।
भक्त श्रीनिवास शांखारी । बहुत मंडळी जमत असे ।। ६ ।।



आणिक बहुत येती जन । रामकृष्णांचे घेती दर्शन ।
बोध तयांचा परिसून । आपुले कल्याण साधिती ।। ७ ।।
काही असता विशेष सण । होतसे घरी जे पक्वान्न ।
स्त्रिया देती ते आणुन । भक्तिने श्रीरामकृष्णांस ।। ८ ।।
चाले चर्चा गायन भजन । प्रभूचे नामसंकीर्तन ।
प्रेमभक्तिचा पूर महान । कामारपुकुरात लोटला ।। ९ ।।
रामकृष्णांची कृती अद्‌भुत । ब्राह्मणीस तिचा नकळे अर्थ।
म्हणतसे अशाने परमार्थ । हानी होइल ठाकुरांची ।। ११० ।।
रामकृष्ण घेता संन्यास । असेच वाटले होते तियेस ।
परमेशप्रेम ते नि:शेष । नाहिसे होईल बाबांचे ।। ११ ।।
तसाच प्रकार आता घडला । गैरसमज तियेचा जाहला ।
श्रीरामकृष्णांच्या कृतीला । आकलन ती करू शकेना ।। १२ ।।
तिज वाटे पत्नीच्या सन्निधानी । ब्रह्मचर्याची होईल हानी ।
हृद्‌गत आपुले बोलुनी । तिने बाबांस सांगितले ।। १३ ।।
उपेक्षुनी तियेचे भाषण । पत्नीस शिकविती रामकृष्ण ।
मग ती होउनी क्रोधायमान । अभिमान जागृत जाहला ।। १४ ।।
कधी आध्यात्मिक विषयात । प्रश्न होतसे उपस्थित ।
तेधवा रामकृष्णांचे मत । घेऊ म्हणती मंडळी ।। १५ ।।
भैरवी म्हणे हे रामकृष्ण । आणिक काय करिती कथन ।
तयांनाही अध्यात्मज्ञान । मीच दिधले असे की ।। १६ ।।
विशेष काही नसता कारण । होई स्त्रियांवर क्रोधायमान ।
दुर्लक्ष करिती रामकृष्ण । ठेविती वर्तन आदराचे ।। १७ ।।
रामकृष्णांच्या सांगण्यावरुन । सारदादेवी स्वत: आपण ।
सासुसारिखा ठेविती मान । वागती आज्ञेत ब्राह्मणीच्या ।।१८ ।।



त्या काळी खेड्यात लहान । रूढीबंधने असती कठिण ।
प्रत्येक जाती असे पाळुन । काटेकोरपणे रूढीला ।। १९ ।।
कधीहि कोणी ब्राह्मण । इतर जातीचा जेवता जन ।
उचलू शकेना तयाचे पान । यापरी बंधने जातीची ।। १२० ।।
श्रीनिवास शांखारी भक्त । नव्हती उच्च तयाची जात ।
तथापि ईश्वरभक्तीत । ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ असे ।। २१ ।।
एकदा ठाकुरांच्या घरास । आला असता जेवावयास ।
रिवाजाप्रमाणे पत्रावळीस । भोजनोत्तर काढू लागला ।। २२ ।।
श्रीनिवासाची भक्ती पाहुन । ब्राह्मणीचे तुष्टले मन ।
म्हणे उष्टे मीच काढिन । तशीच असू दे पत्रावळ ।। २३ ।।
शब्द तिचा मानुनी प्रमाण । भक्त शांखारी गेला निघुन ।
स्त्रियांत पसरले वर्तमान । काढिले ब्राह्मणीने पान ते ।। २४ ।।
वाद पेटला बायकांत । हृदयरामला कळली मात ।
म्हणाला परिणाम विपरित । होईल पान काढू नका ।। २५ ।।
सोडिना हट्ट ब्राह्मणी पण । कडाक्याचे झाले भांडण ।
हृदय म्हणाला या घरातुन । काढुनी देईन तुम्हाला ।। २६ ।।
ब्राह्मणी म्हणाली घराबाचुन । काही आडणार नाही जाण ।
आताच मी जाउनी राहिन । शीतळादेवीच्या मंदिरात ।। २७ ।।
मग मंडळी मधे पडुन । मिटविती त्यांचे भांडण ।
परंतु गोष्ट राहिली लागुन । ब्राह्मणीच्या जिव्हारी ।। २८ ।।
राग ओसरल्यानंतर । शांतपणे ती करी विचार ।
वाटले घडला अविचार । झाली कलुषित स्वजनमने ।। २९ ।।
रामकृष्णांविषयी भक्ती । का कमी व्हावी आपुल्या चित्ती ।
आपुले वर्तन चुकले निश्चिती । वाटुनी झाला पश्चात्ताप ।।१३० ।।



काही दिवस जाता निघुनी । चैतन्यदेव बाबांस मानुनी ।
मनापासुनी पूजन करुनी । क्षमा तयांची मागितली ।। ३१ ।।
सहा वर्षेपर्यंत राहुन । निघे बाबांचा निरोप घेउन ।
वाराणशीला करी प्रयाण । योगिनी भैरवी ब्राह्मणी ।। ३२ ।।
खरोखर ब्राह्मणी असे धन्य । युगावतार श्रीरामकृष्ण ।
तयांच्या गुरुपदाचा मान । स्वकर्तृत्वाने मिळविला ।। ३३ ।।
सहा सात महिने पूर्ण । कामारपुकुराप्रती राहुन ।
कर्मभूमीला रामकृष्ण । दक्षिणेश्वराला परतले ।। ३४ ।।
रामकृष्णांचे जीवनचरित । प्रकाश पाडिल हृदयात ।
लागती सन्मार्गाला बहुत । करिता चिंतन चरिताचे ।। ३५ ।।
सकळ धर्मांचे साधकजन । सकळ पंथांचे भक्तगण ।
करुनी चरिताचे आलोचन । साधिती स्वहित आपुलाले ।। ३६ ।।
कलियुगी सकळ जगताला । येथे उत्तम आदर्श मिळाला ।
तयात पाहुनी प्रतिमेला । आपुले स्वरूप शुद्ध करा ।। ३७ ।।
अद्‌भुत साचा सापडला । आपुली जीवने त्यात घाला ।
म्हणजे पावित्री आकाराला । सत्यशिवसुंदरम् रूपाच्या ।। ३८ ।।
गंगाजलाचा केवळ कण । करी संपूर्ण पापक्षालन ।
थोडेहि चरित करिता मनन । नाश होतसे अविद्येचा ।। ३९ ।।
पावन भगवंताचे चरित । भक्तास भेटवो भगवंत ।
स्वकल्याण पावो समस्त । सुखी होवोत सर्वजण ।। १४०।।
श्रीरामकृष्ण कथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १४१ ।।
।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा अठरावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय एकोणिसावा

अहेतुककरुणाघना । जय जय श्रीरामकृष्णा ।
वंदितो भक्तिने तव चरणा । अंत:करणात वास करी ।। १ ।।

रविकिरणात दिसे धूळ । क्षारमिश्रित जान्हवीजळ ।
अग्निशिखेत असे काजळ । उज्ज्वल चरित रामकृष्णांचे ।। २ ।।

रामकृष्ण तीर्थयात्रा करिती । गूढार्थ त्यात असे निश्चिती ।
यथार्थ साधक तेथे असती । पूर्णादर्श त्यांना दिसावा ।। ३ ।।

सकळ भावांची पूर्ण शक्ती । रामकृष्णांजवळ होती ।
तीर्थक्षेत्री साधकांप्रती । व्हावा लाभ हा उद्देश ।। ४ ।।

जाणावयास आध्यात्मिक स्थिती । अवतारिक तीर्थास जाती ।
अवस्था सकळ जाणुनी घेती । मार्ग शोधिती तयातुनी ।। ५ ।।

काय कारण व्हावया अवनती । दूर करावी कवण्या रीती ।
उणिवा सकळ समजुनी घेती । उपाय शोधिती तयावरी ।। ६ ।।

शास्त्रग्रंथात केले कथन । परमेशाचे होउनी दर्शन ।
महापुरुष जे झाले धन्य । आगमन होताच तयांचे ।। ७ ।।

त्या स्थळी होतात उत्पन्न । ईश्वरीय भाव नविन ।
पूर्वभावही जागृत होउन । साधिती हित साधकांचे ।। ८ ।।

जाता तेथे सामान्य जन । त्यांवरही परिणाम होउन ।
आध्यात्मिक भावांचे उद्दीपन । तयांच्या ठायी होत असे ।। ९ ।।

तीर्थांचे तीर्थत्व टिकवावयास । क्षेत्रांचे पावित्र्य वाढवावयास ।
तीर्थास जाती महापुरुष । यापरी उद्देश यात्रेचा ।। १० ।।




श्रीरामकृष्णदेव म्हणती । ईशदर्शनाची तळमळ चित्ती ।
लागुनी अनेक साधक येती । करिती जप तप अनुष्ठान ।। ११ ।।
म्हणुनी तीर्थक्षेत्री विशेष । पसरे परमेशाचा प्रकाश ।
साधक जाता तया स्थानास । भक्तिभावना वाढतसे ।। १२ ।।
अति पुरातन काळापासुन । भक्त योगी ज्ञानी जन ।
तीर्थक्षेत्री तप आचरुन । घेती दर्शन ईश्वराचे ।। १३ ।।
म्हणुनी तेथिल वातावरण । ईश्वरीय भावे असे भरुन ।
तेथे करिता तपाचरण । लाभ लवकर होत असे ।। १४ ।।
जरी कोठेहि खोदिता जमिन । सर्वत्र उदक असे भरुन ।
तथापि आयते मिळते जीवन । सरोवरात न खोदिता ।। १५ ।।
ऐसे उपकारी तीर्थस्थान । टिकावे तयाचे महिमान ।
म्हणुनी करिती रामकृष्ण । यात्रा तीर्थक्षेत्रांची ।। १६ ।।
तीर्थयात्रा माघमासात । करावी इच्छी मथुरनाथ ।
रामकृष्णांना विनवित । आपुल्यासमवेत यावया ।। १७ ।।
रामकृष्ण तयाला म्हणती । माता आणि हृदय जरि येती ।
तर नसे काही हरकती । यावयास मजला यात्रेला ।। १८ ।।
रामकृष्णांची मिळता संमती । आनंद झाला मथुरच्या चित्ती ।
आपणासवे येणार निश्चिती । बाबाहि आता यात्रेला ।। १९ ।।
नोकरचाकर कारकून । आचारी कारभारी मिळुन ।
सव्वाशे माणसे एकुण । तीर्थयात्रेला निघाली ।। २० ।।
आगगाडीचे डबे चार । आरक्षित केले सत्वर ।
कोणत्याही स्टेशनावर । डबे सोडता येती ते ।। २१ ।।
कलकत्त्यावरुनी मंडळी । वैद्यनाथाच्या दर्शना गेली ।
काही दिवस तया स्थळी । राहुनी केला आनंद ।। २२ ।।



वैद्यनाथजवळिल खेड्यात । दिसले जन दरिद्री दु:खित ।
रामकृष्णांचे द्रवले चित्त । सांगु लागले मथुरला ।। २३ ।।
जगजननीचे असे धन । तू तर आईचा कोठिवान ।
लोकांस देई भोजन वसन । केसास तेल दे लावावया ।। २४ ।।
मथुर वदे या तीर्थयात्रेत । खर्च होतसे अपरीमित ।
लोक येथे असती बहुत । द्रव्य लागेल कितीतरी ।। २५ ।।
सर्वांस अन्नवस्त्र पुरविणे । मस्तका माखण्या तेल देणे ।
फारच लागेल द्रव्य खर्चिणे । ऐसा आग्रह धरू नका ।। २६ ।।
परि बाबांचे अंत:करण । लोकांचे दु:ख अवलोकुन ।
भरुनी आले नयनातुन । वाहु लागल्या अश्रुधारा ।। २७ ।।
म्हणाले मूर्खा दूर होई । मी काशीला येणार नाही ।
याच लोकांमधे मी राही । येणार नाही यात्रेला ।। २८ ।।
जाउनी मिसळले त्या लोकांत । गळा काढुनी बसले रडत ।
पाहुनी मथुर झाला स्तंभित । उपाय दुसरा दिसेना ।। २९ ।।
मग त्याने कलकत्त्याहुन । आणविले धान्य वसन ।
सकळ जनांना केले दान । समाधान झाले बाबांचे ।। ३० ।।
त्या लोकांचा आनंद पाहुन । प्रसन्न झाले रामकृष्ण ।
सकळ जनांचा निरोप घेउन । निघाले तेथुनी यात्रेला ।। ३१ ।।
आणिक एकदा मथुरकडुन । त्याच्या जमिनदारीतिल जन ।
देवविले त्यांना अन्न वसन । पाहुनी दारिद्र्य तयांचे ।। ३२ ।।
दिसता कोणी दरिद्री दु:खित । द्रवतसे ठाकुरांचे चित्त ।
अपार करुणा हृदयात । जिवाविषयी वसत असे ।। ३३ ।।
म्हणती नका उपेक्षू जिवा । शिव समजुनी करा सेवा ।
जीवसेवा प्रिय माधवा । साधन श्रेष्ठ ते भक्तीचे ।। ३४ ।।





देवघर येथे गरिबांच्या दु:खाने द्रवित होऊन श्रीरामकृष्णांनी
मथुरनाथांच्या करवी केलेलं गरिबांना अन्नवस्त्रांचं दान.



तीर्थयात्रेच्या वेळी श्रीरामकृष्णांना काशीधामी मणिकर्णिका घाटावर भगवान शिव व कालीमाता जिवांना मुक्ती देताना झालेलं दर्शन.

वैद्यनाथ करुनी मंडळी । वाराणसी क्षेत्रास गेली ।
वाटेत एक गंमत घडली । गाडी थांबली स्टेशनात ।। ३५ ।।
हृदयरामासह ठाकुर । उतरुनी त्या स्टेशनावर ।
इकडे तिकडे स्थानकावर । हिंडु लागले सहजपणे ।। ३६ ।।
इतुक्यात तेथिल वेला संपली । स्टेशन सोडुनि गाडी निघाली ।
पुढल्या स्थानकी लक्षात आली । गोष्ट ही मथुरनाथाच्या ।। ३७ ।।
ठाकुर आणि हृदय उतरले । गेल्या स्टेशनावरी राहिले ।
चित्त तयाचे अस्वस्थ झाले । आता पडली पंचाइत ।। ३८ ।।
तयाने पुढल्या स्टेशनावरुन । मास्तरास तार दिली करुन ।
आगगाडी जी येई मागुन । तीत दोघांना पाठवावे ।। ३९ ।।
तथापि बाबांस तये ठायी । फार थांबावे लागले नाही ।
राजेन्द्र बंदोपाध्याय पाही । असे रेल्वेचा अधिकारी ।। ४० ।।
तोही वारणसीप्रत । स्पेशल गाडीने होता जात ।
तयाने आपुल्यासमवेत । आणिले दोघांस काशीला ।। ४१ ।।
मथुरने केदारघाटाकडे । मोठमोठाले दोन वाडे ।
घेतले होते ठरवुनी भाडे । राजासारखा थाट तयाचा ।। ४२ ।।
मथुरनाथ निघता बाहेर । धरी रुप्याचे छत्र नोकर ।
भालदार आणि चोपदार । चालती तयाच्या मागेपुढे ।। ४३ ।।
साधुसंन्यासी आणि विद्वान । तयांचा करितसे बहुमान ।
अन्नदान दक्षिणा देउन । करितसे सन्मान तयांचा ।। ४४ ।।
आणिक मथुरने एक दिन । मुक्तद्वार दिले भोजन ।
एकेक रुपया दक्षिणा देउन । वस्त्रहि दिधले एकेक ।। ४५ ।।
रामकृष्णांच्या सांगण्यावरुन । मथुर कल्पतरू होउन ।
करी व्यवहार्य वस्तूंचे दान । मागे तयास ते देई ।। ४६ ।।



काशीसारख्या क्षेत्री महान । माधुकरीस येती ब्राह्मण ।
त्यांच्यात भांडणे होती पाहुन । बाबांस वाईट वाटतसे ।। ४७ ।।
म्हणती या पवित्र क्षेत्रात । असती जन कामकांचनासक्त ।
पाहुनी होती अति दु:खित । प्रार्थिती मग जगदंबेला ।। ४८ ।।
आणिलेस येथे मला कशाला । येथेहि आसक्त जनांचा मेळा ।
यापेक्षा मी दक्षिणेश्वराला । होतो तेच बरे होते ।। ४९ ।।
सांगत असती श्रीरामकृष्ण । येथे असे जो भक्तिमान ।
तयाची भक्ती वर्धमान । तीर्थक्षेत्रास होत असे ।। ५० ।।
तथापि ज्या कोणाठायी । भक्तिभाव मुळिही नाही ।
तीर्थस्थानी अशाला काही । होणार नाही लाभ बरे ।। ५१ ।।
बाबा रोज शिबिकेत बसुन । जाती घ्यावया देवदर्शन ।
भावाविष्ट जाती होउन । बहुधा समाधी लागतसे ।। ५२ ।।
साधुसंतांची कळता मात । जाती त्यांच्या दर्शनाप्रत ।
हृदयराम असे सोबत । काळजी त्यांची घ्यावयाला ।। ५३ ।।
स्वामी त्रैलंग परमहंस । वसती मणिकर्णिका घाटास ।
मौनव्रत होते तयास । बाबा जाती दर्शनाला ।। ५४ ।।
पुढे करुनी तपकीर । स्वामीने स्वागत केले सत्वर ।
बांधावयाचा घाट थोर । असे संकल्प स्वामींचा ।। ५५ ।।
रामकृष्णांच्या सांगण्यावरुन । काही पाट्या माती टाकुन ।
हृदयने आपुली मदत देउन । हातभार लाविला सत्कार्या ।। ५६ ।।
स्वामींचे शरीर पाहुन । सर्वहि लक्षणे अवलोकुन ।
हृदयला सांगती रामकृष्ण । विश्वेश्वरच हे साक्षात ।। ५७ ।।
यांच्या ठिकाणी असती यथार्थ । परमहंसाची लक्षणे समस्त ।
या देहाच्या आश्रये साक्षात । वाटते वसतसे विश्वेश्वर ।। ५८ ।।



दिसतसे काशीक्षेत्र सकळ । यांच्याच तेजे झाले उज्ज्वळ ।
उच्चज्ञानावस्था केवळ । लक्ष न यांचे देहाकडे ।। ५९ ।।

वाळू तापुनी गेली बहुत । तेथे पडले होते मजेत ।
विदेही ब्रह्मज्ञ महासंत । त्रैलंगस्वामी असती हो ।। ६० ।।

स्वामी मौनव्रतात असती । बाबा तयांना खुणेने पुसती ।
ईश्वर एक वा अनेक असती । तव ते सांगती खुणेने ।। ६१ ।।

पाहता होउनी समाधिमग्न । तव एक असे ब्रह्म पूर्ण ।
जोवर जीवजगताचे ज्ञान । तोवर भासती अनेक ।। ६२ ।।

रामकृष्णांनी एक दिन । स्वामीस आणिले बोलावुन ।
स्वहस्ताने घातले भोजन । आदरे त्रैलंगस्वामीला ।। ६३ ।।

रामकृष्णांना वाराणशीत । घडली अद्‌भुत दर्शने बहुत ।
शिवमहिम्याची दृढ होत । त्यामुळे धारणा तयांची ।। ६४ ।।

भावावेशात रामकृष्णांसी । सुवर्णाची दिसे काशी ।
यास्तव प्रतिदिन प्रातर्विधिसी । जाती काशीच्या बाहेर ।। ६५ ।।

अति प्राचीन काळापासुन । ऋषी मुनी महात्मे संतजन ।
घोर तपस्या तयांनी करुन । केल्या निर्माण भावराशी ।। ६६ ।।

तयांचे एकावरती एक । बसले असती थर अनेक ।
कांचनतुल्य तो थर प्रत्येक । सुवर्णमय काशी यासाठी ।। ६७ ।।

काशीचे तेच ज्योतिर्मय । भावघन सत्य स्वरूप होय ।
चर्मचक्षुला जे दिसे बाह्य । छायास्वरूप ते काशीचे ।। ६८ ।।

पंचतीर्थाला जावयाला । बरोबर घेउनी बाबांला ।
मथुरनाथे प्रवास केला । भागिरथीतुन नौकेने ।। ६९ ।।

मणिकर्णिकाघाटाजवळ । स्मशानभूमी असे विशाल ।
तेथे नौका येताच नवल । घडले दर्शन बाबांना ।। ७० ।।



चितांनी भरुनी गेले स्मशान । दृश्य ते दिसताच रामकृष्ण ।
लगबगीने आले धाउन । काठापर्यंत नौकेच्या ।। ७१ ।।
नदीत पडतील असे वाटुन । सर्व खलाशी आले धाउन ।
बाबांस धराया सावरून । त्वरेने पुढे सरसाविले ।। ७२ ।।
परि नौकेच्या काठास येउन । स्थिर राहिले रामकृष्ण ।
होउनि गेले समाधिमग्न । झळके तेज वदनावर ।। ७३ ।।
तेज पाहुनी वदनकमळी । धाउनी जी आली मंडळी ।
जेथच्या तेथेच स्थिरावली । हृदये भरली भक्तिभरे ।। ७४ ।।
बराच वेळ जाता लोटुन । बाबांस आले देहभान ।
घाटास मग नौका लावुन । मंडळी उतरली स्नानाला ।। ७५ ।।
दर्शन झाले समाधीत । अद्‌भुत शास्त्रप्रमाणित ।
रामकृष्णांनी हकीकत । सांगितली ती लोकांना ।। ७६ ।।
पिंगट जटा असलेला । एक दिव्य पुरुष दिसला ।
भव्य उंच रूप तयाला । गौरवर्ण त्याचा असे ।। ७७ ।।
प्रत्येक चितेपाशी जाउन । जिवात्म्यास धरी तो उचलुन ।
त्याच्या कानात स्वये आपण । करितसे उच्चार प्रणवाचा ।। ७८ ।।
आदिमाया महाकाली । बसुनी तया जिवाजवळी ।
स्थूळ सूक्ष्म कारण सगळी । तोडी संस्कारबंधने ।। ७९ ।।
उघडुनी निर्वाण द्वारास । अखंडाच्या सदनी प्रवेश ।
करुनी देतसे जिवांस । स्वहस्तांनी जगदंबा ।। ८० ।।
अनेक जन्म करुनी प्रयत्न । योग तपस्या साधना कठिण ।
अनायासे फळ ते महान । जिवास लाभे काशीमधे ।। ८१ ।।
वाराणशीत होता निधन । जिवास मुक्ती जाते मिळुन ।
अद्वैतानुभव तो घेई पूर्ण । भूमानंद लाभ होत असे ।। ८२ ।।



तेथे असती शास्त्री पंडित । वृत्तान्त ऐकुनी झाले चकित ।
म्हणती दर्शन हे अद्‌भुत । मागे टाकिले शास्त्रांना ।। ८३ ।।
लिहिले असे काशिखंडात । मृत्यू प्राप्त होता काशीत ।
विश्वनाथ त्या जिवाप्रत । निर्वाण पद देत असे ।। ८४ ।।
निर्वाण कैसे प्राप्त होई । ऐसे कोठेहि लिहिले नाही ।
उलगडा होतसे तयाचाही । आपुल्या या दर्शनाने ।। ८५ ।।
उपलब्धी आणि दर्शने आपुली । शास्त्रांच्याही पुढे गेली ।
कलियुगामाजी सत्यता कळली । पुनरपि एकदा शास्त्रांची ।। ८६ ।।
काशीत गल्ली चौसष्ट योगिनी । वसे तेथे मोक्षदा रमणी ।
तिच्याच घरी भैरवी ब्राह्मणी । काळ घालवी भक्तीत ।। ८७ ।।
बाबांशी तिची भेट झाली । मोक्षदा भक्तिमती दिसली ।
रामकृष्णांना त्यावेळी । जाहला अपार आनंद ।। ८८ ।।
रामकृष्णांसवे यात्रेस । ब्राह्मणी गेली वृन्दावनास ।
आमरण राहिली त्या स्थानास । आज्ञेवरुनी ठाकुरांच्या ।। ८९ ।।
तेथ पंचत्व ती पावली । परि बाबांच्या साधनकाली ।
अमोल मदत तियेने केली । आदरणीय झाली यासाठी ।। ९० ।।
काशीवरुनी सकळ मंडळी । निघुनी प्रयागक्षेत्रास आली ।
यथाविधी कर्मे केली । सकळही मथुरनाथाने ।। ९१ ।।
तेथे राहुनी तीन दिवस । मंडळी परते वाराणशीस ।
तेथे राहिली पंधरा दिवस । वृन्दावनाला मग गेली ।। ९२ ।।
प्रत्येक ठिकाणी देवासमोर । सुवर्णमुद्रा अर्पी मथुर ।
थाटमाट त्याचा फार । असे राजाच्या सारखा ।। ९३ ।।
मथुरनाथे बाबांलागुन । घ्यावयासाठी देवदर्शन ।
भेट घ्यावया साधूजन । केली व्यवस्था पालखीची ।। ९४ ।।



पालखीत आंथरुनी वसन । रुपये नाणी देई ठेवुन ।
याचकास करावयाला दान । व्यवस्था ठेवी मथुरबाबू ।। ९५ ।।
परंतु निघताच दर्शनास । बाबांस होतसे भावावेश ।
धरुनी वस्त्रांच्या टोकास । विखरिती नाणी गर्दीमधे ।। ९६ ।।
बांकेबिहारी दर्शनास । जाताच जाहला भावावेश ।
आलिंगावया श्रीकृष्णास । धावुनी गेले रामकृष्ण ।। ९७ ।।
तसेच एकदा संध्याकाळी । गुरे परतावयाच्या वेळी ।
बाबास दर्शन त्या मेळी । झाले गोपालकृष्णाचे ।। ९८ ।।
प्रेमभराने तन्मय होउन । होउनि राहिले समाधिमग्न ।
बाबांस वृन्दावनाहुन । व्रज अधिकच आवडले ।। ९९ ।।
तेथे भगवान श्रीकृष्णाची । महाभावमयी राधेची ।
दर्शने अनेक प्रकारची । घडली श्रीरामकृष्णांना ।। १०० ।।
तेथे सद्भक्त साधक पाहुन । व्रजावर जडले त्यांचे मन ।
गंगामाता नामे महान । तपस्विनी तेथे असे ।। १ ।।
भक्तिमती ती अप्रतिम । राधेवरती अलोट प्रेम ।
कृष्णभक्ती तिची अनुपम । पाहुनि वाटले बाबांना ।। २ ।।
राधादेवीची सखी ललिता । भक्ती शिकवावयास भक्ता ।
पुनरपि भूवर आली आता । रूपाने गंगामातेच्या ।। ३ ।।
रामकृष्णांस पाहता सगळी । महाभावाची लक्षणे दिसली ।
राधा समजुनी हाक मारिली । दुलाली म्हणुनी ठाकुरांना ।। ४ ।।
दुलालीचे होता दर्शन । गंगा स्वत:स मानी धन्य ।
वाटले भक्ती करिता अनन्य । दर्शन लाभले राधेचे ।। ५ ।।
तिजला पाहता रामकृष्ण । सर्वच गेले विसरून ।
संगतीत तियेच्या राहुन । आनंद लुटती भक्तीचा ।। ६ ।।



मथुरनाथास वाटली भीती । की ठाकुर तेथेच राहती ।
बाबांच्याही वाटे चित्ती । येथुनी कोठे जाऊ नये ।। ७ ।।
परंतु विचार करी मन । न जाता आपण परतुन ।
मातेस होइल दुःख दारुण । शुश्रुषा कोण करिल तिची ।। ८ ।।
ऐसे येता त्यांच्या मनात । तेथेच राहावयाचा बेत ।
रद्द करुनी टाकिला त्वरित । तयार झाले परतावया ।। ९ ।।
रामकृष्ण असती मातृभक्त । आईची सेवा करिती नित्य ।
माता पिता असता जिवंत । म्हणती आज्ञेत वर्तावे ।। ११० ।।
मातापिता पावता निधन । त्यांचे श्राद्धादि विधी करुन ।
पुत्राने त्यांचे करावे स्मरण । श्रद्धा आपुली अर्पावी ।। ११ ।।
गंगामातेची आज्ञा घेउन । परत निघाले व्रजाहून ।
काशीक्षेत्रास पुन्हा येउन । पंधरा दिवस वास केला ।। १२ ।।
मदनपुरा नामक विभागात । महेशचंद्र सरकार वसत ।
कुशल सतारवादनात । जाती प्रभुवर तयाकडे ।। १३ ।।
सतारवादन असता ऐकत । आपुला सूर मिळवती त्यात ।
भावावेश मग होता प्राप्त । करिती विनंती अंबेला ।। १४ ।।
म्हणती आई ऐकु दे सतार । मजला ठेव शुद्धीवर ।
ऐकू देई बोल मधुर । सूर सतार वादक तू ।। १५ ।।
मग दुसऱ्या दिवसापासुनी । महेशचंद्र स्वतः येउनी ।
दाखवितसे वाजवूनी । सतार पंधरा दिवसही ।। १६ ।।
मग मथुरने आणिले मनास । आता जावे गयाक्षेत्रास ।
त्रिस्थळियात्रा पूर्णतेस । पावेल पुसावे बाबांना ।। १७ ।।
पुसता श्रीरामकृष्णांप्रती । गयेस जावया नकार देती ।
विचार त्या स्थळी जाण्याप्रती । सोडुनि दिधला मथुरने ।। १८ ।।



रामकृष्ण असती सांगत । गयेस माझ्या जनकाप्रत ।
गदाधराने दिला दृष्टान्त । पुत्र होउनी येइन मी ।। १९ ।।
म्हणुनी मजला माझे पितर । नाव ठेविती गदाधर ।
प्रेमोन्मत्त होइन सत्वर । जाताच गयाक्षेत्राला ।। १२० ।।
दर्शन होता गदाधराचे । विसरेन भान स्वदेहाचे ।
मग मन माझे कायमचे । होउनि जाइल समाधिमग्न ।। २१ ।।
रामकृष्ण जाणती पूर्ण । झाला जो राम श्रीकृष्ण ।
झाला असे तो अवतीर्ण । याच शरिराने सांप्रत ।। २२ ।।
यास्तव अवतारिकांनी आपुली । इहलोक यात्रा संपविली ।
न जाती कधिही त्या स्थळी । लागेल समाधी चिरंतन ।। २३ ।।
ज्या कार्यास्तव धरिले शरीर । घेतला भूवर अवतार ।
लागता समाधी चिरगंभीर । केवी पावे ते पूर्णता ।। २४ ।।
यास्तव तेथे जाणे टाळिती । भक्तांसही हा नियम लाविती ।
तयांना विशिष्ट स्थळाप्रती । न जाउ देती ते कधिही ।। २५ ।।
दिव्य दृष्टिने बाबा जाणत । कोणत्या देवाचा अंशभूत ।
आपुला कोण आहे भक्त । कोणते लीलास्थल पूर्वीचे ।। २६ ।।
वाटे त्या स्थळी जाता भक्त । पूर्वस्मृती होइल जागृत ।
त्यागिल निजदेहाला त्वरित । नियोजित कार्य करिल कसे ।। २७ ।।
वारिती आपुल्या भक्तजना । जावया पूर्वीच्या लीलास्थाना ।
दिव्य दृष्टिने जाणती खुणा । सकळांच्या पूर्व जन्मांच्या ।। २८ ।।
रामकृष्ण अवतारवरिष्ठ । तयांची शक्ती अतीव श्रेष्ठ ।
मानवाची काय गोष्ट । जाणेल तयांना पूर्णपणे ।। २९ ।।
यात्री मग निघाले तेथुनी । पुन्हा वैद्यनाथ क्षेत्र करुनी ।
दक्षिणेश्वरला परतुनी । आले सकळ यात्रेकरी ।। १३० ।।



श्यामकुंड वृन्दावनातिल । आणि राधाकुंड तेथिल ।
यांतिल मृत्तिका आणुनी पुष्कळ । पसरली पंचवटीमाझारी ।। ३१ ।।
मग बोलती रामकृष्ण । पवित्र वृन्दावनासमान ।
आता जाहले हेही स्थान । पावेल प्रसिद्धी यापुढती ।। ३२ ।।
मथुरनाथास सांगून । घेती संतजन बोलावुन ।
पंचवटीखाली महान । उत्सव केला त्या काळी ।। ३३ ।।
रामकृष्णदेव सांगत । मथुरनाथे त्या काळात ।
लक्ष रुपयांहुनही जास्त । यात्रेसाठी खर्च केला ।। ३४ ।।
मथुरसह श्रीरामकृष्ण । चैतन्यदेवांचे जन्मस्थान ।
त्या नवद्वीपालागुन । गेले यात्रा करावया ।। ३५ ।।
गौरांगप्रभूंच्या देवालयात । मग महंताच्या घराप्रत ।
नवद्वीपात फिरले बहुत । साक्षात्कार परंतु होईना ।। ३६ ।।
बाबांस वाटले अशा स्थळाला । आपण आलो तरी कशाला ।
प्राण तयांचा व्याकुळ झाला । न घडता दर्शन गौरांगांचे ।। ३७ ।।
इतुक्यात बसावे नौकेत । तंव दर्शन घडले अद्भुत ।
दोन सुंदर बाळे दिसत । वर्ण सुवर्णासारिखा ।। ३८ ।।
चौदा वर्षे तयांचे वय । वदनांभोवती तेजोवलय ।
आकाशपंथे येता विस्मय । वाटला मनात बाबांच्या ।। ३९ ।।
तयांना पाहुनी ओरडले । आलो आलो बाबा म्हणाले ।
तव ती जवळ येउनी बाळे । शरीरात शिरली बाबांच्या ।।१४० ।।
बाळके पावली अंतर्धान । रामकृष्ण झाले समाधिमग्न ।
वाटले नदीत जातिल पडुन । परंतु हृदयने सावरले ।। ४१ ।।
आणखीहि दर्शने दृष्टांत । रामकृष्णांना झाली नदीत ।
चैतन्य देव अवतार होत । सत्य हे आले अनुभवा ।। ४२ ।।



रामकृष्णदेव सांगत । जुने नवद्वीप भागिरथीत
बुडाले म्हणुनी मज दृष्टांत । जाहली नदीत दर्शने ।। ४३ ।।
रामकृष्ण एक दिवस । बरोबर घेउनी हृदयास ।
कलुटोल्याच्या हरिसभेस । जाउनी श्रोत्यांत बैसले ।। ४४ ।।
चैतन्यभक्त वैष्णव जन । मांडुनी ठेविती उच्चासन ।
चैतन्यप्रभू तेथे बसुन । ऐकती पुराण ते मानिती ।। ४५ ।।
चैतन्यदेव असती समजुन । करिती पूजन नमस्कार ।
आसनाचा त्या बहुमान । ठेविती सकळ वैष्णव जन ।। ४६ ।।
चैतन्यदेव बसले मानुन । कधिही कोणास ते आसन ।।
न करू नेती कदापि ग्रहण । ऐसा नियम त्यांचा असे ।। ४७ ।।
ऐकतात स्वये श्रीचैतन्य । ऐसी मनात खूण बांधुन ।
पुराणिक सांगतसे पुराण । यापरी आदर आसनाचा ।। ४८ ।।
रामकृष्ण असता श्रोत्यात । भावावेश जाहला प्राप्त ।
आसनावर त्या अकस्मात । जाउनी ते उभे राहिले ।। ४९ ।।
तयांचे वरती गेले होउन । हात चैतन्यदेवांसमान ।
तेज:पुंज झाले वदन । समाधिमग्न ते झाले ।। १५० ।।
अनेक वैष्णवजनां वाटले । चैतन्यदेवचि स्वये आले ।
मग पुराणिकाचे पडले । पुराण बंद त्या गडबडीत ।। ५१ ।।
दिव्य तेजाने ती मंडळी । तेथवा दिपुनी गेली सगळी ।
जयजयकार करू लागली । भजनास केली सुरुवात ।। ५२ ।।
काही वेळाने रामकृष्ण । अर्धबाह्यदशेत येउन ।
त्या मंडळीत मिसळुन । नृत्य भजन करू लागले ।। ५३ ।।
देहभान विसरला मेळा । आवेश चढलासे सकळांला ।
जणू भक्तीचा कैफ चढला । शुद्ध कोणाला नव्हतीच ।। ५४ ।।



बराच वेळ यापरी गेला । कार्यक्रम भजनाचा संपला ।
रामकृष्ण दक्षिणेश्वरला । गेले हृदयच्या समवेत ।। ५५ ।।

रामकृष्ण गेल्यानंतर । दचकुनी जागा व्हावा नर ।
तैसा करू लागले विचार । घडुनी गेलेल्या घटनेचा ।। ५६ ।।

सुरू झाली भवति न भवती । कोणी ठीकच झाले म्हणती ।
अनिष्ट घडले कोणी बोलती । प्रखर वाद मग झाला ।। ५७ ।।

तेज:पुंज पाहुनी वदन । त्यांचे अलौकिक नृत्य भजन ।
कित्येक गेले भारावुन । म्हणती योग्यच घडले ते ।। ५८ ।।

काही म्हणती ते आसन । चैतन्यदेवांवाचुनी अन्य ।
कधिही करू शकेना ग्रहण । न लागे निर्णय वादाचा ।। ५९ ।।

हळूहळू ती हकीकत । पसरली वैष्णव समाजात ।
भगवानदासबाबा संत । पुढारी होता वैष्णवांचा ।। १६० ।।

तयाच्याही कानावर । वृत्त पोहोचले समग्र ।
बाबाजीसहि राग फार । आला घडल्या प्रकाराचा ।। ६१ ।।

म्हणे आपुले ढोंग करुन । चैतन्यदेवांचे पवित्र आसन ।
त्याचाहि करी जो अवमान । ढोंगी तो निश्चित समजावा ।। ६२ ।।

लोटता काही दिवसांला । योगायोग विचित्र आला ।
सवे घेउनी मथुरबाबूला । खुलन्यास गेले रामकृष्ण ।। ६३ ।।

चैतन्यदेवपदस्पर्शाने पुनित । खुलना झाले गत काळात ।
शिवमंदिरेही अष्टोत्तर तेथ। असती विख्यात त्या ठायी ।। ६४ ।।

वैष्णव तेथे असती बहुत । भगवानदास वसे तेथ ।
वैष्णव मान देती समस्त । मानिती वचन बाबाजीचे ।। ६५ ।।

ऐशी वर्षांवर त्याचे वय । अशक्त होउनी गेले पाय ।
तरिही उत्साह अनुपमेय । असे भगवानदासाचा ।। ६६ ।।



करीत असता नामस्मरण । विसरुनि जातसे देहभान ।
बाबाजीचेच उदाहरण । साधक समोर ठेविती ।। ६७ ।।
भगवानदासबाबाचे मत । ग्राह्य मानिती वैष्णव समस्त ।
पुढारीपणा तयाला प्राप्त । झाला होता वैष्णवांचा ।। ६८ ।।
हृदयला आपणासवे घेउन । मठात गेले रामकृष्ण ।
कळविण्यास आपुले आगमन । पुढे पाठविले हृदयास ।। ६९ ।।
कळले आधीच बाबाजीस । कोणीतरी महान पुरुष ।
आला असावा आश्रमास । भगवानदास असे ज्ञानी ।। १७० ।।
परंतु हृदयरामावाचुन । न दिसे कोणी माणुस अन्य ।
नित्यक्रम मग आरंभुन । रमला तयात बाबाजी ।। ७१ ।।
हृदयराम होउनी समोर । बाबाजीस करुनी नमस्कार ।
म्हणे मामा भक्त थोर । येतसे आपुल्या दर्शनाला ।। ७२ ।।
बाबाजी वदे येई घेउन । तव काही मंडळी येउन ।
आपण करीत असता साधन । अडचणी येती त्या निवेदिती ।। ७३ ।।
रामकृष्ण सगळीकडे जाती । तथापि संकोच वाटुनी चित्ती ।
वसन आंगास लपेटिती । बरोबर ठेविती कोणाला ।। ७४ ।।
पातले तेथे रामकृष्ण । सर्वांग वस्त्राने झाकुन ।
हृदयरामला सवे घेउन । नमस्कारिला बाबाजी ।। ७५ ।।
बाबाजीस हृदयराम म्हणत । हेच माझे मामा भक्त ।
इतरांसी बंद करुनी मात । कुशल विचारिति बाबाजी ।। ७६ ।।
आणिक मंडळी तेथ येउन । कोणा साधूचे दुर्वर्तन ।
बाबाजीला करिती कथन । ऐकुनि कोपला बाबाजी ।। ७७ ।।
म्हणे मी त्या साधूलागुन । काढुन देइन संप्रदायातुन ।
माळ तयाची हिसकावुन । घेईन आताच निश्चये ।। ७८ ।।



इतरांबरोबर करिता मात । माला असे तो फिरवित ।
हृदयराम तयासी विचारित । माळ तुम्ही का ठेवावी ।। ७९ ।।
बाबाजी तुम्ही सिद्ध झाला । मग माळ ठेविता कशाला ।
बाबाजी उत्तर देइ तयाला । स्वत:साठी माळ नसे ।। १८० ।।
परंतु माझे अनुकरण । करिती सकळ वैष्णव जन ।
गिरविति माझे उदाहरण । यास्तव माळ ही ठेविली ।। ८१ ।।
श्रीरामकृष्ण निरहंकार । बाबाजीचे ऐकुनी उत्तर ।
तयांना राग आला फार । अहंकार पाहुनी एवढा ।। ८२ ।।
पाळावया सभ्यता सामान्य । राग ठेवतात लपवून ।
सत्यपरायण रामकृष्ण । ताडकन उभे राहिले ।। ८३ ।।
बाबाजीकडे पाहून । म्हणती मीपण एवढे अजुन ।
तुम्ही शिक्षण देणार कोण । हाकुनी देणार कोणाला ।। ८४ ।।
जयाचे जग तो दयाघन । तयाने शिकविल्यावाचुन ।
देऊ शकाल काय शिक्षण । अहंकार एवढा कशासाठी ।। ८५ ।।
अंगास लपेटलेले वसन । आणिक धोतर पडिले गळुन ।
मुळी नच उरले देहभान । भावसमाधी लागली ।। ८६ ।।
खाली पडू नयेत म्हणुन । हृदय तयांना राहे धरुन ।
दिव्य तेजाने झळके वदन । स्तब्ध जाहले सकळीक ।। ८७ ।।
बाबाजीप्रति आजवर । कोणीहि दिले नाही उत्तर ।
दोष काढणे तर राहो दूर । परि घडले हे अघटित ।। ८८ ।।
रामकृष्णांचे ऐकुनी वचन । बाबाजी गेला चकित होउन ।
तथापि तोहि थोर म्हणुन । स्तब्ध बैसुनी राहिला ।। ८९ ।।
शांत चित्ते तो करी विचार । मी करीन हा अहंकार ।
कळले महापुरुष ठाकुर । आपणास यांनी शिकविले ।। १९० ।।



पाहुनी अंगाची दिव्य कांती । लक्षणे आणि समाधिस्थिती ।
कळले हे सामान्य नसती । असामान्य पुरुष हे ।। ९१ ।।
महाभावाचे विवेचन । ग्रंथ पाहुनी करितो आपण ।
या पुरुषाच्या ठायी पूर्ण । सर्व लक्षणे ती असती ।। ९२ ।।
महापुरुषाचे असे दर्शन । अनायासे घडले म्हणुन ।
स्वत:स बाबाजी मानी धन्य । रामकृष्ण वाटती आदर्श ।। ९३ ।।
जेधवा समाधी त्यांची उतरली । ईश्वरचर्चा सुरू जाहली ।
आनंदसागरा भरती आली । अशक्य वर्णन तयाचे ।। ९४ ।।
तेधवा कळले बाबाजीला । कलुटोल्याच्या हरिसभेला ।
चैतन्यदेवांच्या आसनाला । ग्रहण केले ते हे परमहंस ।। ९५ ।।
वाटले या महापुरुषाला । उगीच आपण दोष दिधला ।
विषाद मनाला वाटला । क्षमा तयांची मागितली ।। ९६ ।।
बाबांनी मथुरबाबूजवळी । बाबाजींची प्रशंसा केली ।
मथुरबाबुने करुनी दिधली । व्यवस्था पूजाअर्चेची ।। ९७ ।।
तीर्थांचे कराया पुनरुज्जीवन । यात्रा करिती रामकृष्ण ।
तीर्थांस येती जे साधकजन । तयांना लाभ घडवाया ।। ९८ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १९९ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा एकोणिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय विसावा

लाभोत प्रभूची पदरजे । हृदयकमल उमलो माझे ।
मज निजदर्शनाचे खाजे । देवोत कृपाळू रामकृष्ण ।। १ ।।

तीर्थयात्रा झाली समाप्त । नंतर थोड्याच दिवसांत ।
हृदयरामाची अकस्मात । पत्नी पंचत्व पावली ।। २ ।।

हृदय मुखर्जींच्या मनात । स्मशानवैराग्य झाले उदित ।
तथापि भाविकता किंचित । नव्हती तयाच्या ठिकाणी ।। ३ ।।

राहुनी ठाकुरांच्या सेवेत । तयांच्या दिव्य संगतीत ।
कधी कधी त्याच्याहि मनात । विचार येती पारमार्थिक ।। ४ ।।

कधी वैराग्य विचार येती । परि ते येताच मावळती ।
हृदयरामाची ऐसी स्थिती । वैराग्य टिकेना मनामधे ।। ५ ।।

रामकृष्णदेवांचे सामर्थ्य । अलौकिक असे जाणे यथार्थ ।
म्हणतसे परमार्थ परमार्थ । काय कठिण मजलागी ।। ६ ।।

मामापाशी धरिता धरणे । सहज होतील देवदर्शने ।
आता संसारसुख भोगणे । परमार्थ करू वेळ येता ।। ७ ।।

पत्नी तयाची पावता निधन । विचार करितसे तयाचे मन ।
रामकृष्णांनी केले साधन । आपणहि तसेच करावे ।। ८ ।।

यज्ञोपवित धोतर सोडुन । पंचवटीत करितसे ध्यान ।
करितसे जगदंबेचे पूजन । मन लावुनी पुष्कळ वेळा ।। ९ ।।

रामकृष्णदेवांकडे गेला । हृदय हट्ट घेउनी बसला ।
वदे आध्यात्मिक अनुभव मजला । प्राप्त करुनि द्या सर्वही ।। १० ।।



रामकृष्ण देती उत्तर । केवळ माझी तू सेवा कर ।
तुजला आणिक साधना इतर । जरुर नसे रे करण्याची ।। ११ ।।
होता उभयता समाधिमग्न । आपुली काळजी घेईल कोण ।
चालले तेच योग्य जाण । हट्ट सोडुनी दे आता ।। १२ ।।
परंतु हट्ट सोडिना हृदय । ठाकुर वदती करू मी काय ।
आई इच्छिते तैसेच होय । सर्व काही या जगतात ।। १३ ।।
मजला तिनेच बुद्धी दिधली । आणिक ऐसी अवस्था केली ।
तशीच इच्छा करील काली । तर तुज देइल अनुभव ती ।। १४ ।।
काही दिवस लोटता यास । बसता ध्यान करावयास ।
अद्‌भुत दर्शने हृदयरामास । होउ लागली कधी कधी ।। १५ ।।
अर्धबाह्यदशा होतसे प्राप्त । बाबांस बोलला मथुरनाथ ।
काय ही केली हृदयची गत । तव तयास सांगती ठाकुर ।। १६ ।।
आईची प्रार्थना केली म्हणुन । थोडेफार तयाला दाखवुन ।
करिल तयाचे समाधान । शांत करील मन त्याचे ।। १७ ।।
मथुर बोलला कुठली आई । तुमचीच सर्व ही नवलाई
तुम्हीच दिली अवस्था ही । तयास आता शांत करा ।। १८ ।।
आम्ही शृंगीभृंगींपरी । लोळू तुमच्या चरणांवरी ।
आम्ही करावी सेवाचाकरी । कशास आम्हास अवस्था या ।। १९ ।।
मथुरनाथाचे ऐकुनी भाषण । हासू लागले रामकृष्ण ।
यावर लोटले काही दिन । घडले नवल रात्रीला ।।२० ।।
पंचवटीस जाती रामकृष्ण । हृदय निघाला त्यांच्यामागुन ।
अत्यद्‌भुत जाहले दर्शन । हृदयरामाला तेधवा ।। २१ ।।
तयाला दिसले रामकृष्ण । नसती मानव साधारण ।
दिव्यदेहधारी भगवान । तेजे उजळली पंचवटी ।। २२ ।।



नसती भूवर तयांचे चरण । अधांतरी ते करिती गमन ।
पाहे चोळुनि चोळुनि नयन । तरिही दृश्य तेच दिसे ।। २३ ।।
हृदय झाला आश्चर्यचकित । विचार करि तो आपुल्या मनात ।
काय बदल घडला येथ । तव पाहिले स्वशरीराला ।। २४ ।।
देखे ज्योतिर्मय आपुले शरिर । आपण आहोत दिव्य नर ।
रामकृष्ण प्रत्यक्ष परमेश्वर । स्वजन्म त्यांच्याच सेवेस्तव ।। २५ ।।
आपण केले शरीर धारण । त्यांची सेवा करावी म्हणुन ।
जीवनरहस्य कळले पूर्ण । हृदयराम आनंदला ।। २६ ।।
ओरडुनि म्हणे रामकृष्ण । सामान्य जीव नाही आपण ।
चला देशी विदेशी हिंडुन । करुया उद्धार जिवांचा ।। २७ ।।
आरडाओरड त्याची ऐकुन । तयाला वदले रामकृष्ण ।
तुझे ओरडणे परिसून । येतिल धावुनी जन सारे ।। २८ ।।
परी हृदयराम नसे ऐकत । रामकृष्ण वक्षी ठेवुनी हात ।
म्हणती आई या मूर्खाप्रत । त्वरित टाक जड करुनी ।। २९ ।।
स्पर्श करिताच हृदयला । दिव्यभाव समूळ गेला ।
त्याचा आनंद सकळ लोपला । हृदय झाला जसाच्या तसा ।। ३० ।।
हृदयला दु:ख झाले बहुत । बाबांस म्हणाला रडत रडत ।
का जड केले मजप्रत । दिव्य आनंद शमविला ।। ३१ ।।
तयास म्हणती रामकृष्ण । तुवा गप्प बसावे म्हणुन ।
तसे करावे लागले जाण । नातरी सारे जन जमती ।। ३२ ।।
एवढे तेवढे होता दर्शन । करिसी आरडाओरड महान ।
वेळ नाही आली अजुन । तुजला दर्शन घडण्याची ।। ३३ ।।
मजला यासम किती तरि नित्य । अद्‌भुत दर्शने होतात ।
कितीतरि अनुभव येतात । परंतु कल्ला न करी मी ।। ३४ ।।



तुझी जेधवा येईल वेळ । तेव्हा तुजला दिसेल पुष्कळ ।
यापरी शांतविती कृपाळ । घालिती समजूत हृदयची ।। ३५ ।।
हृदय तेधवा गप्प बसला । परि गोष्ट ती लागे मनाला ।
वाटे पुनरपि पाहिजे झाला । साक्षात्कार त्यासारिखा ।। ३६ ।।
बाबांजवळ बोलण्याची । आता हिंमत नव्हती त्याची ।
तयांना कळू न देताची । करू लागला जपध्यान ।। ३७ ।।
एकदा पंचवटीखाली बसुन । करीत असताना जपध्यान ।
बरीच रात्र गेली होउन । पडला निबिड अंधकार ।। ३८ ।।
रामकृष्ण तेधवा अवचित । फिरत गेले पंचवटीत ।
हृदयराम होता ओरडत । मामा धावा धावा हो ।। ३९ ।।
धाइने गेले रामकृष्ण । म्हणती नकोस जाऊ भिउन ।
मी येथेच आहे जाण । काय जाहले सांग मला ।। ४० ।।
तो म्हणे करित असता ध्यान । अंगाचा भडका गेला उडुन ।
जणु देहास लागला कृशान । वेदना असह्य जाहल्या ।। ४१ ।।
ठाकुर अंगास लावुनी हात । म्हणती वेदना होतील शांत ।
मी आधीच बदलो तुजप्रत । तपश्चर्या तुला नको ।। ४२ ।।
माझीच करावी सेवाचाकरी । साधनांची नाही जरुरी ।
त्यांच्या हस्तस्पर्शाने सत्वरी । शमल्या तयाच्या वेदना ।। ४३ ।।
हृदयच्या आले लक्षात । रामकृष्ण सांगती हेच हित ।
पुनरपि कधिही पंचवटीत । गेला नाही तो ध्यानाला ।। ४४ ।।
एकदा हृदयच्या आले मनात । दुर्गाउत्सव अश्विनात ।
करावा आपुल्या गावात । ठाकुरांस न्यावे समागमे ।। ४५ ।।
ऐसा विचार हृदयने केला । परंतु मथुरास नाही पटला ।
रामकृष्णांच्या जाण्याला । विरोध केला मथुरने ।। ४६ ।।



मग हृदयचा विरस झाला । तसाच निघाला गावाला ।
उदास पाहुनी हृदयला । अंत:करण द्रवले बाबांचे ।। ४७ ।।
रामकृष्ण म्हणती त्याला । वाईट वाटुनि घेसी कशाला ।
तुझी पूजा पाहावयाला । तुझ्या घराला येइन मी ।। ४८ ।।
आणिक उगाच सारा दिवस । करू नको तू उपवास ।
थोडासा तरी मध्यान्हास । फराळ नियमित करित जा ।। ४९ ।।
हर्षित झाला वचन ऐकुन । हृदयराम गावास येउन ।
आश्विन शुक्ल षष्ठीपासुन । दुर्गापूजन आरंभ करी ।। ५० ।।
सप्तमीस करिता आरती । रामकृष्णांची ज्योतिर्मय मूर्ती ।
प्रत्यक्ष हृदयरामाप्रति । दिसली वाटला आनंद ।। ५१ ।।
अत्यंत हर्षले त्याचे मन । म्हणे खरोखर झाले धन्य ।
आज जगदंबेचे पूजन । करिता जाहले सार्थक ।। ५२ ।।
परत येउनी दक्षिणेश्वरास । हकीकत सांगे ठाकुरांस ।
बाबा म्हणती त्या रात्रीस । वाटले पाहावी पूजा तुझी ।। ५३ ।।
प्राप्त झाला भावावेश । धरुनी ज्योतिर्मय देहास ।
पातलो मग तुझ्या घरास । आणि पाहिले तव पूजन ।। ५४ ।।
एकदा म्हणाले रामकृष्ण । उत्सव तू करशील तीन ।
करू पाहता चवथे पूजन । विघ्ने अनेक ओढवली ।। ५५ ।।
प्रयत्न झाले व्यर्थ सर्व । परि करु शकला नाही उत्सव ।
ऐसा असे संबंध अभिनव । हृदयचा श्रीरामकृष्णांसी ।। ५६ ।।
पहिल्या पत्निचे होता निधन । हृदयने केले दुसरे लग्न ।
भोगेच्छा त्याच्या मनातुन । न होई कधिही नाहिसी ।। ५७ ।।
तो असे कामकांचनवेडा । बाबांची साधना डोळ्यांपुढा ।
असूनहि नाही घेतला धडा । राहिला कोरडा दयार्णवी ।। ५८ ।।



रामकृष्णांचा शक्तिविकास । पडूनही प्रत्यक्ष दृष्टीस ।
घडूनही तयांचा सहवास । न आली तयाला भाविकता ।। ५९ ।।

मूळचाच स्वार्थपरायण । स्वार्थ त्याचा गेला वाढुन ।
रामकृष्णांचे घ्यावया दर्शन । बहुत जन येऊ लागले ।। ६० ।।

त्यांच्या सन्निधी असे हृदय । त्याला खूष केल्याशिवाय ।
दर्शनाचीहि न होय सोय । बोलणे मग दूर राहिले ।। ६१ ।।

द्रव्यलोभ त्याचा वाढला । कुणकुण लागली ठाकुरांला ।
नानापरिने बोध केला । व्यर्थ जाहला उपदेश ।। ६२ ।।

पुढे तर रामकृष्णांप्रत । हृदयराम लागे बोलत ।
प्रत्युत्तरे तो असे देत । श्रद्धा समस्त लुप्त झाली ।। ६३ ।।

नक्कल ठाकुरांची करावी । त्यांच्याप्रमाणे पदे गावी ।
भावावेश हृदय दाखवी । नृत्य करी बाबांसारिखे ।। ६४ ।।

भक्त मंडळीच्या समोर । बाबांस देऊ लागला उत्तर ।
करू लागला चेष्टा फार । असह्य झाले तद्वर्तन ।। ६५ ।।

हृदयने सेवा केली विशेष । शेवटी तितुकाच दिला त्रास ।
एक दिवस म्हणे बाबांस । तुमच्या नशिबी खाणे नसे ।। ६६ ।।

तुम्हास पोटशूळ होतो । बघा बरे मी कसा खातो ।
बुवाजी जर मीच नसतो । तर कैची तुमची साधुगिरी ।। ६७ ।।

एकदा फारच दिला त्रास । बाबा म्हणती जगन्मातेस ।
माझ्या तोडिले बंधनास । मग का करविसी अशी दशा ।। ६८ ।।

प्राप्त जाहला भावावेश । समाधि लागली ठाकुरांस ।
प्राप्त होता अर्धबाह्य दशेस । बोलु लागले अंबेला ।। ६९ ।।

आई हृदय अजाण नर । माझी सेवा केली फार ।
इतुके कशाला त्याच्यावर । रागाविसी तू जगदंबे ।। ७० ।।



पुनरपि झाले समाधिमग्न । इतुके सारे गेले होउन ।
तथापि हृदयचे वाकुडेपण । जशास तसेच राहिले ।। ७१ ।।
मंदिरात सुद्धा नोकरांला । त्याचा त्रास होऊ लागला ।
ठाकुर समजाविती तयाला । वाईट होइल परिणाम ।। ७२ ।।
हृदय म्हणाला बाबांलागुन । रासमणीच्या अन्नावाचुन ।
तुम्हाला गती नाही अन्य । म्हणुनी भिउनी वागतसा ।। ७३ ।।
परि नाही पर्वा मजलागुन । जा म्हणताच मला येथुन ।
तत्काळ दुसरीकडे जाइन । ऐसा अभिमान वाढला ।। ७४ ।।
मग इच्छा करिती सगळे । येथुनी हृदयने करावे काळे ।
ब्याद जाता होईल चांगले । त्रास वाचेल सकळांचा ।। ७५ ।।
रामकृष्ण साधन कालात । जगदंबा पाहुनी बालिकेत ।
तियेची पूजा असती करित । तैसेच हृदय करू गेला ।। ७६ ।।
एकदा वार्षिक उत्सवात । मथुरचा पुत्र त्रैलोक्यनाथ ।
आपुल्या कुटुंबासमवेत । कालीमंदिरात पातला ।। ७७ ।।
तयाची एक कन्या लहान । तिचेच हृदयने केले पूजन ।
त्रैलोक्यनाथाने रागावुन । नोकरीतुनी काढिले हृदयला ।। ७८ ।।
यापरी त्यांचा संबंध संपला । हृदय बाबांच्या सेवेस मुकला ।
तरिही करुणाघन बाबांला । कळवळा असे तयाचा ।। ७९ ।।
ठाकुरांना मंदिरातुन । येती प्रसादपात्रे दोन ।
हृदयकडे एक पाठवून । समाचार घेती तयाचा ।। ८० ।।
इतुके सर्व घडुनही पुराण । हृदयचे राहिले लोभी मन ।
ठाकुरांस म्हणाला मामा आपण । चला जाऊ दुसरीकडे ।। ८१ ।।
तुम्ही असता माझ्याजवळ । बांधीन कालीचे दुसरे देउळ ।
दोघेहि काढू सुखात काळ । ऐकुनी बोलती रामकृष्ण ।। ८२ ।।



मूर्खा आता मजला घेउन । दारोदारी करशील प्रदर्शन ।
याचना करुनी मिळविसी धन । धिक्कार असो तुजलागी ।। ८३ ।।

रामकृष्ण होता समाधिस्थ । पश्चात्ताप पावले त्याचे चित्त ।
वाटे महापुरुषाच्या आश्रयात । राहुनी लाभ ना घेतला ।। ८४ ।।

मग त्यांच्या शिष्यात मिसळुन । करी दु:ख कमी करण्या प्रयत्न ।
आपुले मोकळे करुनी मन । सांगे गोष्टी ठाकुरांच्या ।। ८५ ।।

रामकृष्णांच्या साधनकाळी । हृदयने थोर सेवा केली ।
म्हणुनी बाबांची शिष्यमंडळी । आदर तयाचा ठेवितो ।। ८६ ।।

बाबांचा बंधू रामेश्वर । गाव तयाचे कामारपुकुर ।
तेथे निधन पावता सत्वर । दक्षिणेश्वरास आली वार्ता ।। ८७ ।।

विचार पडला ठाकुरांला । कसे कळवावे मातेला ।
फारच दु:ख होईल तिजला । पुत्रवियोगाच्या वार्तेने ।। ८८ ।।

प्रार्थिले मग जगदंबेला । दु:ख सहन ते करावयाला ।
शक्ति दे माझ्या मातेला । नंतर गेले आईकडे ।। ८९ ।।

रामकृष्णांच्या वाटले मनात । वृत्त असे दु:खद अत्यंत ।
धक्काच बसेल मातेप्रत । पुत्रनिधनाच्या वार्तेने ।। ९० ।।

बाबांनी ती रडत रडत । मातेस कथिली हकीकत ।
ऐकुनी पुत्रवियोगवृत्त । चित्त शांत तिने ठेविले ।। ९१ ।।

केवढे महादाश्चर्य वर्तले । आईने बाबांस समजाविले ।
एक दिवस तर जाती सगळे । व्यर्थ शोक करू नको ।। ९२ ।।

ऐसा पाहुनी अद्‌भुत प्रकार । ठाकुरांस नवल वाटले फार ।
वारंवार ते नमस्कार । करू लागले जगदंबेला ।। ९३ ।।

मथुरनाथाची बाबांवर । श्रद्धा भक्ती असे फार ।
चौदा वर्षे केली अपार । तयाने सेवा ठाकुरांची ।। ९४ ।।



आपुले काम तो करी चोख । अपार संपत्तीचा मालक ।
असूनही एकनिष्ठ सेवक । झाला श्रीरामकृष्णांचा ।। ९५ ।।

वर्तमानयुगाचे अवतार । श्रीरामकृष्ण परमेश्वर ।
साह्य करावयाचा थोर । मान तयाने मिळविला ।। ९६ ।।

तयाला आले होते कळुन । आपुली सत्ता धन मान ।
वैभव सुख यांसी कारण । कृपा श्रीरामकृष्णांची ।। ९७ ।।

केवळ त्यांच्या सेवेवाचुन । कोणतेही दुसरे साधन ।
करावयाचे नाही कारण । आपणा सद्गती मिळवाया ।। ९८ ।।

मथुरनाथाच्या चित्तास । ऐसा असे दृढ विश्वास ।
एकदा गळू झाले तयास । अंथरुणास खिळला तो ।। ९९ ।।

त्याने हृदयच्या बरोबर । बाबांस निरोप धाडिला सत्वर ।
आपण येथे यावे लवकर । दर्शनास मी आसुसलो ।। १०० ।।

बाबा वदती मी नसे वैद्य । जाणत नाही काही औषध ।
नेणे उपचार नानाविध । काय उपयोग जाण्याचा ।। १ ।।

ठाकुर येत नाहीत पाहुनी । मथुर पाठवी बोलावणी ।
फार आग्रह झाला म्हणुनी । रामकृष्ण गेले भेटीला ।। २ ।।

रामकृष्ण आलेले पाहुन । आनंदाने बसला उठुन ।
म्हणाला बाबा मजलागुन । धूळ द्या तुमच्या पायांची ।। ३ ।।

ठाकुर म्हणती पायधूळ । काय गळू बरे करिल ।
मथुर म्हणाला डॉक्टर सकळ । बसले आहेत त्यासाठी ।। ४ ।।

भवसागर जावयाला तरुन । पायधूळ मी घेतो मागुन ।
भक्ति विश्वास त्याचा पाहुन । समाधि लागली बाबांला ।। ५ ।।

समाधिमग्न श्रीरामकृष्ण । मथुरनाथ त्यांचे चरण ।
आपुल्या मस्तकी करी धारण । आनंदाश्रू गाळितसे ।। ६ ।।



थोड्याच दिवसांमधे चांगले । मथुरला बरे वाटू लागले ।
ठाकुरांचे होते आगळे । प्रेम मथुरनाथावर ।।७ ।।
भावावस्थेत एके दिवशी । सांगते झाले मथुरासी ।
जोवर तू जिवंत अससी । राहिन तोवरी दक्षिणेश्वरी ।।८ ।।
मथुरनाथास होते माहित । रामकृष्णरूपाने साक्षात ।
जगदंबा असे रक्षण करित । भयभीत यास्तव जाहला ।।९ ।।
मथुर म्हणाला नम्रता धरुनी । पुत्र द्वारका आणि पत्नी ।
कुणाच्या स्वाधीन त्यांना करुनी । सांगा बाबा म्या जावे ।।१० ।।
तेहि आहेत तुमचेच भक्त । त्यांच्याहिसाठी तुम्ही येथ ।
राहावे असती तोपर्यंत । एवढी विनवणी ऐकावी ।।११ ।।
ठाकुर भावावेशात मग्न । म्हणती असती जोवर दोघेजण ।
तोवर येथे मी राहीन । समाधान आता झाले का ।।१२ ।।
आणि खरोखर तैसेचि घडले । दोघेहि जेधवा निवर्तले ।
रामकृष्ण आजारी पडले । आणि सोडिले दक्षिणेश्वर ।।१३ ।।
रामकृष्णांची सेवा अनन्य । केली दैवत समजून ।
श्रद्धा भक्ती केवढी महान । धन्य मथुरनाथ विश्वास ।।१४ ।।
सन अठराशे एकाहत्तरात । जुलै महिना असता प्राप्त ।
दुखण्यात पडला मथुरनाथ । असाध्य जाहला आजार ।।१५ ।।
बिघडली एवढी प्रकृती । बोलण्याचेही कष्ट होती ।
रामकृष्ण आधीच जाणती । आयुष्य संपले तयाचे ।।१६ ।।
मथुरनाथाच्या दुखण्यात । समाचार त्याचा घ्यावयाप्रत ।
स्वत: बाबा नव्हते जात । पाठविती नित्य हृदयला ।।१७ ।।
हृदयराम त्याचेकडे जाउन । त्याचा समाचार येई घेउन ।
बाबांस करितसे निवेदन । प्रकृतिमान मथुरचे ।।१८ ।।



शेवटच्या दिनी हृदयलाही । ठाकुरांनी धाडिले नाही ।
बाबा जाणती सर्व काही । अंतकाळ आज मथुरचा ।। १९ ।।

त्या दिवशी ते दुपारपासुन । आपुल्या खोलीत राहिले बसुन ।
भले मथुरचे करावे म्हणुन । समाधी लावुनी बैसले ।। १२० ।।

दक्षिणेश्वरी असे शरीर । परि ज्या ठिकाणी होता मथुर ।
जोतिर्मय मार्गे सत्वर । दिव्य शरीराने पातले ।। २१ ।।

मथुरनाथ भक्त महान । तयाच्या मागे उभे राहुन ।
ज्योतिर्मय मार्गाने गमन । करविले आपुल्या भक्ताचे ।। २२ ।।

पुण्याईने होइ जो प्राप्त । दुर्लभ स्वर्गलोकाप्रत ।
निज भक्ताला होते चढवित । श्रीरामकृष्ण दयाघन ।। २३ ।।

पाच वाजता सायंकाळी । ठाकुरांची समाधी उतरली ।
हृदयरामाला हाक मारली । सांगते झाले तयाप्रती ।। २४ ।।

जगदंबेच्या सख्या येउन । करुनी मथुरचा सन्मान ।
दिव्य रथात त्याला बसवुन । घेउनि गेल्या देवीलोकी ।। २५ ।।

मथुरचा घ्यावया समाचार । देवालयातील नोकर ।
कारभारी तो खजिनदार । गेले होते तयाकडे ।। २६ ।।

सकळ मथुरच्या मृत्यूनंतर । अग्निसंस्कार केल्यावर ।
रात्री नऊ वाजल्यावर । दक्षिणेश्वरला परतले ।। २७ ।।

तयांनी येउनी सांगितले । सायंकाळी पाच वाजले ।
तेव्हाच देहावसान जाहले । मथुरबाबूंचे गंगातिरी ।। २८ ।।

खरोखर मथुर अलौकिक । रामकृष्णांचा स्वेच्छा सेवक ।
अवतारलीलेस साहाय्यक । होण्याचा मान मिळविला ।। २९ ।।

मथुरचा केवढा दृढ विश्वास । बाबांची सेवाच आपणास ।
साधन होइल परमार्थास । जाणतसे तो निश्चये ।। १३० ।।

अर्पिले आपुले तनमनधन । इष्ट देवता रामकृष्ण ।
मानुनी अनन्य सेवा करुन । हित साधिले इहपरलोकी ।। ३१ ।।



कृपा बाबांची मिळवुन । परलोक लाभ घेतला करुन ।
मथुरनाथ भाग्यवान । भगवान भक्तिने वश केला ।। ३२ ।।
हृदयराम मथुरनाथ । साधनकाळी सेवा यथार्थ ।
करुनी करिती जन्म सार्थ । अमर जाहले दोघेही ।। ३३ ।।
पुढील काळी शिष्यमेळा । ठाकुरांकडे जेथवा आला ।
त्यांनी पुसले रामकृष्णांला । काय जाहले मथुरचे ।। ३४ ।।
भाग्य तयाचे केवढे थोर । सेविला साक्षात परमेश्वर ।
धन्य धन्य झाला मथुर । सार्थक केले जन्माचे ।। ३५ ।।
आम्हास वाटते गेला सुटुन । जन्ममरणांच्या फेऱ्यातुन ।
यावर सांगती रामकृष्ण । समजावुनी निजशिष्यांसी ।। ३६ ।।
कोठेतरी राजकुळात । जन्मला असावा तो निश्चित ।
जोवर वासना असे मनात । तोवर जन्ममरण असे ।। ३७ ।।
भोगवासना मनातून । गेली नसता जन्ममरण ।
मथुरने केले पुण्याचरण । म्हणुनी जन्मला थोर कुळी ।। ३८ ।।
मथुरनाथाच्या मृत्यूनंतरी । त्याच्या मागे दक्षिणेश्वरी ।
तशीच ठेविती व्यवस्था सारी । कारभारी मंदिराचे ।। ३९ ।।
रामकृष्णांचे पावन चरित । वाचता ऐकता होईल हित ।
परमार्थलाभ होई त्वरित । साधक सिद्ध होत असे ।। १४० ।।
मायामोह पडो गळुन । हृदयग्रंथी पडो तुटुन ।
परमेश्वराचे घडो दर्शन । होवो सार्थक जीवनाचे ।। ४१ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १४२ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा विसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय एकविसावा

नमन माझे परब्रह्मा । रामकृष्णा कैवल्यधामा ।
जयांनी जगद्‌हिताचे कामा । धारण केला नरदेह ।। १ ।।
वेदान्त साधनेच्या नंतर । आपुले गाव कामारपुकुर ।
तेथे राहिले होते ठाकुर । सहा सात महिनेपर्यंत ।। २ ।।
तेथवा कामारपुकुरास । आणिले होते सारदामणिस ।
रामकृष्णांनी शिक्षण तियेस । दिधले होते प्रेमाने ।। ३ ।।
द्यावयाचे तिला शिक्षण । कार्य राहुनी गेले अपूर्ण ।
कारण नंतर परतून । ठाकुर आले दक्षिणेश्वरी ।। ४ ।।
परि जो अनुभव झाला प्राप्त । त्यावरुनी सारदादेवी जाणत ।
आपुल्यावर असे अत्यंत । प्रेम आपुल्या पतीचे ।। ५ ।।
तिने माहेरी केले गमन । परि स्वभाव गेला बदलुन ।
माहेरच्यांना न कळे कारण । तथापि आश्चर्य वाटले ।। ६ ।।
गावात उठाठेवी जन । वार्ता सांगती भिन्न भिन्न ।
अस्वस्थ होतसे तियेचे मन । संशय उत्पन्न होत असे ।। ७ ।।
वेड्याची बायको म्हणुन । चिडवू लागले कित्येक जण ।
फार दुःखित होतसे मन । वाटे पाहावी खरी स्थिती ।। ८ ।।
वाटे येथे कशाला राहावे । आपण दक्षिणेश्वराला जावे ।
पतिच्या सेवेत घालवावे । आपुले आयुष्य यापुढे ।। ९ ।।
लागले असो पतीला वेड । पतिसेवेची मजला चाड ।
त्याविण अन्नहि न लागे गोड । जावे लवकर दक्षिणेश्वरा ।। १० ।।



इतुक्यात तेथुनी कलकत्त्यास । फाल्गुनमासी पौर्णिमेस ।
गंगास्नान करावयास । पुष्कळ मंडळी निघाली ।। ११ ।।
पितयास तिने सांगितले । मुखोपाध्यांनी ठरविले ।
आपण स्वत: पाहिजे गेले । प्रवासास तियेच्या बरोबर ।। १२ ।।
रेल्वेमार्ग नसे त्या काळी । पायी प्रवास करिती मंडळी ।
कोठे थांबती रात्रिच्या वेळी । करिती प्रवास दिवसास ।। १३ ।।
परंतु वाटेत उद्‌भवे विघ्न । सारदामणिला ताप येउन ।
धर्मशाळेत मुक्काम करुन । राहावे लागले तयांप्रती ।। १४ ।।
रात्री तिजला पडिले स्वप्न । प्राप्त झाले अद्‌भुत दर्शन ।
तापहि झाला वर्धमान । देहभान पूर्ण हरपले ।। १५ ।।
सारदादेवी करिती कथन । दिसली एक स्त्री कृष्णवर्ण ।
रूप तियेचे अत्यंत छान । बसली येउनि उशापाशी ।। १६ ।।
तिजलागी मी विचारिले । बाई कोठुनी येणे केले ।
तदा तियेने उत्तर दिधले । आले दक्षिणेश्वराहुन ।। १७ ।।
ऐकुनि आश्चर्यचकित मी झाले । तिजलागी मी निवेदिले ।
मी तरि तिकडेच निघाले । पतिची सेवा करावया ।। १८ ।।
तथापि या ठिकाणी येउन । मी पडले आजारी होउन ।
बाई माझ्या भाग्यात दर्शन । पतिदेवांचे असेल का ।। १९ ।।
ती स्त्री अति प्रेमळ । म्हणे तू आता बरी होशिल ।
दर्शन पतिदेवांचे घेशिल । पूर्ण होईल तुझी इच्छा ।। २० ।।
सारे ठीक येइल घडुनी । तुजसाठी तव पतीलागुनी ।
ठेविले असे मी अडकवुनी । चिंता मानसी करू नको ।। २१ ।।
तिजला पुसता तुम्ही कोण । म्हणाली मी तुझी बहिण ।
मी वदले बाई म्हणुन । येथे आलात बरे का ।। २२ ।।



एवढा होताच संवाद । मजला प्राप्त जाहली शुद्ध ।
दुसऱ्या दिवशी दुखणे बंद । झाले प्रकृति सुधारली ।। २३ ।।
यापरी सारदादेवीला । कालिदेविने दृष्टांत दिधला ।
जगज्जननीची अपार लीला । काय कोणाला कळू शके ।। २४ ।।
सारदामणिला मिळे वाहन । मग मंडळी निघाली तेथुन ।
मुक्काम करिता करिता जन । दक्षिणेश्वराला पोहोचले ।। २५ ।।
नऊ वाजता ते रात्रीस । येउनी पोहोचले मंदिरास ।
आजारी पाहुनी सारदामणीस । दुःखित झाले रामकृष्ण ।। २६ ।।
ताप न यावा उलटून । त्यांनी आपुल्या खोलीत अन्य ।
पलंग बिछाना पसरून । व्यवस्था केली औषधाची ।। २७ ।।
म्हणाले यावया केला उशिर । आता जिवंत नाही मथुर ।
राहता तो सदा तत्पर । तुझी व्यवस्था करावया ।। २८ ।।
औषधयोजना केल्यावर । दिवस लोटता तीन चार ।
हटला तयांचा ताप समग्र । आराम पडला प्रकृतीला ।। २९ ।।
मग मातेच्या सान्निध्यात । राहण्यास सारदादेवींप्रत ।
व्यवस्था नौबतखान्यात । करुनी दिधली ठाकुरांनी ।। ३० ।।
सारदादेवी तेथे राहुन । पतिसेवा करिती मन लावुन ।
सासूचीही शुश्रुषा करुन । प्रिय जाहल्या सकलांसी ।। ३१ ।।
रामचंद्र मुखोपाध्यायाला । सुखात पाहुनी कन्येला ।
मनात अति आनंद झाला । परतला आपुल्या गावास ।। ३२ ।।
सारदादेवीचा संशय पूर्ण । स्वानुभवाने गेला विरुन ।
कळले पती आपुले छान । आनंदित मन होई त्यांचे ।। ३३ ।।
रामकृष्णांनी जे जे केले । लोकहितार्थ असे ते सगळे ।
जगतापुढे आदर्श ठेविले । साधकांसाठी भिन्न भिन्न ।। ३४ ।।



शिष्यांस सांगती रामकृष्ण । जेव्हा मी सोळा प्रकार करिन ।
तरच तुम्ही एक दोन । समर्थ व्हाल करावया ।। ३५ ।।
यास्तव तुमच्या पुढे पूर्ण । आदर्श देत असे ठेवुन ।
तुम्ही करोनी अनुकरण । आत्मकल्याण साधावया ।। ३६ ।।
अगाध रामकृष्णांची कृती । पत्निला दिधली अनुमती ।
आपुल्या शय्येस निजण्याप्रती । उदारमति श्रीभगवान ।। ३७ ।।
करुनी एकशय्याशयन । अष्टमास काळ गेला लोटुन ।
तरिही कामगंधहीन । राहिले मन उभयतांचे ।। ३८ ।।
सारदा रामकृष्ण धन्य । कामकल्पनेस न शिवे मन ।
अत्यंत पवित्र आचरण । अतुल्य ठरले जगतात ।। ३९ ।।
एकदा असता पाय चेपित । सारदादेवी पुसती मात ।
काय वाटते तुम्हाप्रत । सांगा मज मी कोण असे ।। ४० ।।
ठाकुर उत्तर देती त्वरित । जगन्माता जी मंदिरात ।
असे जी नौबतखान्यात । या शरिराची जन्मदात्री ।। ४१ ।।
तीच असे ही पाय चेपित । संशय नसेच माझ्या मनात ।
आनंदमयीच्या स्वरूपात । दिसता साक्षात मजलागी ।। ४२ ।।
रामकृष्णदेव म्हणती । ती जर इतुकी पवित्र नसती ।
तर मम संयमाची गती । काय होती कोण जाणे ।। ४३ ।।
व्याकुळतेने मी त्या काळी । जगन्मातेची प्रार्थना केली ।
कामवासना हिच्यातली । नष्ट करी गे सर्वस्वी ।। ४४ ।।
जगज्जननी कृपाळू बहुत । तिने प्रार्थना ऐकली खचित ।
कामभाव तियेचा समस्त । नष्ट करी श्रीजगदंबा ।। ४५ ।।
सारदादेवी असती सांगत । दिव्यभावाच्या अवस्थेत ।
निरंतन ते निमग्न राहात । सांगती गोष्टी कितीतरी ।। ४६ ।।



केव्हा हासती केव्हा रडती । समाधिमाजी मग्न होती ।
मजला ऐसे वाटे चित्ती । केव्हा दिवस उजाडतो ।। ४७ ।।

प्रथम मजला नसे ठावे । भावसमाधी कशास म्हणावे ।
एकदा प्रयत्न करुनी आघवे । समाधी तयांची उतरेना ।। ४८ ।।

मग भीतीने रडू लागले । हृदयरामाला बोलाविले ।
तयाने नाम उच्चारिले । त्यांच्या कानात अंबेचे ।। ४९ ।।

समाधी त्यांची उतरली । परि ती गोष्ट त्यांना कळली ।
तयांनी मग मज सांगितली । प्रक्रिया समाधी उतराया ।। ५० ।।

कसा ओळखावा भाव । उच्चारावे कोणते नाव ।
बीजमंत्रादि सांगती सर्व । माहिती मजला त्यावेळी ।। ५१ ।।

भय नच वाटे तेव्हापासुन । उपाय करुनी येतसे भान ।
ऐसे लोटले बहुत दिन । दिव्य भाव पाहात तयांचा ।। ५२ ।।

केव्हा कोणती लागेल समाधी । याचीच चिंता वाटे आधी ।
रात्रभर सुद्धा कधी कधी । झोप मुळीच येत नसे ।। ५३ ।।

जेव्हा तयांना कळले वृत्त । मजला झोपहि नाही येत ।
तेधवा नौबतखान्यात । निजावयाप्रत सांगितले ।। ५४ ।।

कसे कोणासी करावे वर्तन । अशा सामान्य गोष्टीपासुन ।
कसे करावे कीर्तन ध्यान । समाधि लावणे सांगितले ।। ५५ ।।

असूनही कामगंधहीन । पत्नीसी प्रेमळ आचरण ।
ठेविते झाले रामकृष्ण । अपूर्व आदर्श ठेविला ।। ५६ ।।

सारदादेवींनी आजीवन । रामकृष्णांस ईश्वर मानुन ।
भक्ती केली मनापासुन । आदर्श जाहल्या जगताला ।। ५७ ।।

जेष्ठमासी अमावास्येस । कालिपूजेचा पुण्य दिवस ।
मोठा उत्सव दक्षिणेश्वरास । होतसे कालीच्या मंदिरी ।। ५८ ।।



मनात आणिती रामकृष्ण । आपुल्या खोलीमधे आपण ।
जगदंबेचे करावे पूजन । सकळ सामग्री आणविली ।। ५९ ।।
चौरंग सुंदर आणविला । जगदंबेच्या पूजनाला ।
हळु हळु दिवस तो मावळला । काळोख पडला सर्वत्र ।। ६० ।।
खोलीत तयारी करुनी समस्त । हृदयराम गेला मंदिरात ।
कारण विशेष पूजा तेथ । असे भगवती कालीची ।। ६१ ।।
राधाकांतजीचा पुजारी । आटोपुनी पूजा सारी ।
रामकृष्णांच्या खोली भीतरी । पातला साह्य करावया ।। ६२ ।।
एक प्रहर होता रजनी । रामकृष्णांनी आपुली पत्नी ।
बोलविली श्रीसारदामणी । सकळ सिद्धता जाहली ।। ६३ ।।
पूजासाहित्य प्रोक्षण करुन । चौरंगावर घातले आसन ।
सारदादेवीला केली खूण । चौरंगावर बसावया ।। ६४ ।।
भारल्यागत सारदामणी । न येता काय करितो कळुनी ।
अर्धबाह्यदशा प्राप्त होउनी । उत्तराभिमुख बैसल्या ।। ६५ ।।
मग करुनी मंत्रोच्चारण । कलशातिल घेउनी जीवन ।
यथाविधी श्रीरामकृष्ण । करिती सिंचन त्यांच्यावर ।। ६६ ।।
म्हणती शक्तीची अधीश्वरी । बाले माते त्रिपुरसुंदरी ।
सिद्धीचे द्वार मोकळे करी । पवित्र करि गे देहमन ।। ६७ ।।
हो आविर्भूत हिच्या ठिकाणी । दे सर्वांचे कल्याण करुनी ।
जगदंबा साक्षात समजुनी । पूजिली पत्नी अत्यादरे ।। ६८ ।।
नैवेद्य देवीला दाखवुनी । स्वहस्ते घालिती वदनी ।
मंत्र उच्चारता सारदामणी । समाधिमग्न जाहल्या ।। ६९ ।।
इकडे पूजक रामकृष्ण । तेही झाले समाधिमग्न ।
एकरूप गेले होउन । देवी पूजक अद्वैतात ।। ७० ।।





श्रीरामकृष्णांनी स्वत:ची पत्नी श्रीसारदादेवी यांची देवी भगवती समजून केलेली षोडशी पूजा.



श्रीरामकृष्णांना साधनासमयी झालेलं भगवान येशू ख्रिस्ताचं दर्शन.

दोन प्रहर झाली रजनी । समाधी गेली उतरुनी ।
अर्धबाह्य अवस्था त्या क्षणी । प्राप्त जाहली बाबांना ।। ७१ ।।
करुनी आत्मनिवेदन । आपुले सर्वस्व करिती अर्पण ।
पुन:पुन्हा मंत्रोच्चारण । करुनी नमिती सारदेला ।। ७२ ।।
सर्वमंगलेमांगल्यरूपिणी । सर्वार्थसाधिके शिवगेहिनी ।
शरण्ये त्रिनयने नारायणी । जगदंबे गौरी नमोऽस्तुते ।। ७३ ।।
येणेपरी प्रार्थना करुन । संपिवती पूजा रामकृष्ण ।
अलौकिक हे केले साधन । अपूर्व अध्यात्म जगतात ।। ७४ ।।
मानवदेहधारिणी पत्नी । प्रत्यक्ष जगन्माता मानुनी ।
केले पूजन रामकृष्णांनी । जाहला कळस साधनांचा ।। ७५ ।।
सारदामणी त्या दिवसांत । सासूसह नौबतखान्यात ।
राहती करिती सेवा बहुत । सासूची आणि स्वपतीची ।। ७६ ।।
यापरी सोळा महिने पूर्ण । सारदादेवी तेथे राहुन ।
कामारपुकुर ग्रामालागुन । कार्तिक मासात परतल्या ।। ७७ ।।
शंभु मल्लिकाच्याकडुन । बायबलातिल कथा ऐकुन ।
येशुक्रिस्ताचे पवित्र जीवन । बाबांस परिचित जाहले ।। ७८ ।।
मग बाबांच्या आले मनास । ईश्वरास जाणावयास ।
हाही पंथ असावा खास । साधना आपण करावी ही ।। ७९ ।।
बालकाच्या येता मनी । त्वरेने श्रीजगज्जननी ।
इच्छापूर्ती देतसे करुनी । आचिन्त्य लीला अंबेची ।। ८० ।।
मंदिराच्या आवाराबाहेर । यदु मल्लिकाचे असे घर ।
रामकृष्णांचा भक्त थोर । जाती ठाकुर तयाकडे ।। ८१ ।।
तयाच्या दिवाणखान्यात । सुंदर चित्रे असती बहुत ।
एका चित्रात असे क्रिस्त । आईने जवळ घेतलेला ।। ८२ ।।



एकदा दिवाणखान्यात । सहजच बसले भगवंत ।
तन्मय होउनि होते पाहात । चित्र श्रीयेशुक्रिस्ताचे ।। ८३ ।।
विचार आला त्यांच्या मनात । जावयास जगन्मातेप्रत ।
हाही एक असावा पंथ । उत्कंठा मनात वाढली ।। ८४ ।।
लीलामयी श्रीजगन्माता । व्यापुनि उरली समस्त पंथा ।
देशकालही नाही रिता । सर्वत्र अस्तित्व कोंदले ।। ८५ ।।
सर्वत्र तिचाच आविर्भाव । तिचेच असती पंथ सर्व ।
अभिनव क्रिस्तधर्मानुभव । यास्तव घेउनी पाहावा ।। ८६ ।।
इतुके येता त्यांच्या मनात । चमत्कार घडला अद्‌भुत ।
येशुमेरीचे चित्र क्षणात । जाहले जिवंत ज्योतिर्मय ।। ८७ ।।
येशुक्रिस्ताच्या अंगामधुन । पडले बाहेर तेज:किरण ।
रामकृष्णांच्या अंगात शिरुन । करिती परिवर्तन भावांचे ।। ८८ ।।
मनातील ते हिंदु संस्कार । नष्ट होउनी गेले पार ।
अपरिचित अनिवार संस्कार । उत्पन्न जाहले मनामधे ।। ८९ ।।
मग विनविती जगदंबेला । काय करिसी न कळे मजला ।
प्रबळ वेग नवसंस्काराला । व्यापिले मनाला पूर्णपणे ।। ९० ।।
येशूच्या संप्रदायावर । भक्तिविश्वास वाढला फार ।
दिसले येशूच्या मूर्तीसमोर । बसलो आहोत चर्चमधे ।। ९१ ।।
धूपदीप तयाला दावुन । करिती प्रार्थना व्याकुळ होउन ।
येशुक्रिस्ताचे घडावे दर्शन । तळमळ मनाला लागली ।। ९२ ।।
मंदिरास आले परतून । तरिही चालले तेच चिंतन ।
जगदंबेचे व्यावे दर्शन । विस्मरण पडले तयाचे ।। ९३ ।।
ऐसे लोटता दिवस तीन । पंचवटीत करिता भ्रमण ।
दिसला पुरुष गौरवर्ण । तेज:संपन्न रूप तयाचे ।। ९४ ।।



भव्य पुरुष तो दृष्टि स्थिर । येउ लागला बाबांसमोर ।
कोणीतरी हा विदेशी नर । असावा ऐसे जाणवले ।। ९५ ।।
नेत्र तयाचे असती विशाल । नासिक चपटे ओष्ठ लाल ।
तेजःपुंज मुखमंडल । विशाल भाल शोभतसे ।। ९६ ।।
वाटले पुरुष हा असे कोण । तंव तो समीप ठेपला येउन ।
ध्वनी निघाला अंतरातुन । येशूक्रिस्त हाच असे ।। ९७ ।।
रामकृष्णांना आलिंगुन । शरीरात पावला अंतर्धान ।
ठाकुर जाहले समाधिमग्न । क्रिस्तधर्मसाध्य साधले ।। ९८ ।।
क्रिस्तधर्माचे साध्य साधुन । क्रिस्ती जनांना मार्गदर्शन ।
करावयाला श्रीभगवान । आधुनिक काळात लाभले ।। ९९ ।।
आधुनिक विज्ञान काळात । संदेहशील मानवमनात ।
क्रिस्तधर्मही आहे सत्य । स्थापिला सिद्धान्त स्वानुभवे ।। १०० ।।
क्रिस्तधर्माचे अंतिम ध्येय । तीनच दिवसांत साध्य होय ।
रामकृष्ण झाले श्रद्धेय । क्रिस्ती जनांना सांप्रत ।। १ ।।
पुढती जमता शिष्य सगळे । त्यास बाबांनी विचारिले ।
तुम्ही बायबल असे वाचले । सांगा येशू कसा असे ।। २ ।।
शिष्य सांगती बायबलात । वर्णन येइना पाहाण्यात ।
जन्मला यहुदी वंशात । यास्तव असावा गौरवर्ण ।। ३ ।।
असावे त्याचे नेत्र विशाल । नाक असावे लांब सरळ ।
बाबा सांगती तत्काळ । नाक मी चपटे पाहिले ।। ४ ।।
कोणीही शिष्याने यावर । त्यांना दिधले नाही उत्तर ।
तथापि मनात करिती विचार । स्वमतच सत्य असावे ।। ५ ।।
रामकृष्ण भावावेशात । पाहते झाले येशुक्रिस्त ।
मूर्ति कशी ती प्रत्यक्षात । येशुसारखी असावी ।। ६ ।।



परंतु कालांतरे करुन । शिष्य जनांना आले कळुन ।
प्रचलित असती मते तीन । येशुक्रिस्ताच्या स्वरूपाची ।। ७ ।।
त्यांतील मत एक विशेष । चपटे नाक असे येशूस ।
अवलोकिताच आश्चर्यास । सीमा न राहिली शिष्यांच्या ।। ८ ।।
रामकृष्णांचा असे विश्वास । येशुक्रिस्त अवतारी पुरुष ।
श्रीकृष्ण जाहला द्वापारास । येशुक्रिस्त तोचि जाहला ।। ९ ।।
तोच परम पुरुष महान । भारतात झाला श्रीकृष्ण ।
पश्चिमेकडे बाहेर निघुन । येशुक्रिस्त तोचि जाहला ।। ११० ।।
सांगती ते बुद्धदेव । साक्षात ईश्वर स्वयमेव ।
तारावयासाठी मानव । धरिला अवतार अवनीस ।। ११ ।।
सांगती जगन्नाथपुरीस । बुद्धदेवाचा असे प्रकाश ।
जातिभेदभावनानाश । होतसे गेल्यास त्या क्षेत्री ।। १२ ।।
जगन्नाथाचा प्रसाद ग्रहण । करिता पवित्र होतसे मन ।
यास्तव आपुल्या शिष्यांलागुन । देती प्रसाद भक्षावया ।। १३ ।।
विषयी जनांच्या संगतीत । काही काळ होता व्यतित ।
जगन्नाथाचा प्रसाद घेत । प्राशन करिती गंगाजल ।। १४ ।।
गिरीश घोषांनी लिहिलेले । बुद्धचरित्रावर रचलेले ।
ठाकुरांनी नाटक पाहिले । म्हणती बुद्धदेव अवतार ।। १५ ।।
बुद्धदेव उपदेशित जे मत । आणि वैदिक ज्ञानमार्गात ।
फरक नाही यत्किंचित । बुद्धदेव साक्षात भगवान ।। १६ ।।
जगन्नाथपुरीला जावयाला । अति उत्कंठा ठाकुरांला ।
परि आवरती स्वमनाला । विचार करुनी रामकृष्ण ।। १७ ।।
ठाउक त्यांना आपुले शरिर । पुरीला नाही टिकणार ।
आपुला आत्मा स्वरूपी सत्वर । मिळेल जगन्नाथाच्या ।। १८ ।।



म्हणुनी जगन्नाथपुरीला कधिही । रामकृष्ण गेले नाही ।
अविचल श्रद्धा होती पाही । बुद्धदेवांवर ठाकुरांची ।। १९ ।।
श्रद्धा असे जैनधर्मावर । शिखधर्मही मानिती थोर ।
इतर चित्रांच्या बरोबर । तसबीर खोलीत क्रिस्ताची ।। १२० ।।
महावीर तीर्थंकर । चित्र तयांचे खोलीवर ।
इतर देवांच्या बरोबर । धूपदीप तयांना ओवाळिती ।। २१ ।।
प्रत्यक्ष करुनी अनुष्ठान । सर्व धर्म घेतले जाणुन ।
सकळांचे ध्येय साध्य करुन । अधिकार वाणीने सांगती ।। २२ ।।
पंथ जरी भासती अनेक । सर्व धर्मांचे ध्येय एक ।
एकाच ठिकाणी जाती साधक । सकळ धर्मांत विरोध नसे ।। २३ ।।
मते तितुके असती पंथ । कोणताहि करिता मार्ग क्रमित ।
श्रद्धा असता भक्तमनात । ईश्वर प्राप्त होऊ शके ।। २४ ।।
स्वानुभवाच्या बळावर । सिद्धान्त ठेविला जगासमोर ।
विरोध वितळुनी गेला पार । वितंडवाद सकळ लोपला ।। २५ ।।
ठाकुर सांगती विशिष्टाद्वैत । द्वैत अद्वैत निराळे नव्हत ।
असती तीन पायऱ्या सत्य । त्या आध्यात्मिक उन्नतीच्या ।। २६ ।।
या तीनही पायऱ्यांवरुन । प्रत्येकास अवश्य गमन ।
ऐसा स्वानुभवावरुन । सिद्धान्त मांडती श्रीठाकुर ।। २७ ।।
उपनिषदादी शास्त्रांत । तीनहि असती प्रतिपादित ।
तथापि तयाने धर्ममार्गात । गोंधळ उडाला जनांचा ।। २८ ।।
आपुल्या मताचे करणे मंडण । अन्य मतांचे करणे खंडण ।
याचाच करू लागती प्रयत्न । संप्रदायांचे आचार्य ।। २९ ।।
उलटे सुलटे करुनी अर्थ । करिती स्वमत प्रतिपादित ।
धर्म मार्गात गुंतागुंत । जाहली बहुत त्यायोगे ।। १३० ।।



कोणता करावा शास्त्रविचार । केवि जाणे सामान्य नर ।
अविश्वास उपजुनी शास्त्रावर । अवनति झाली धर्माची ।। ३१ ।।
यास्तव सांप्रत युगावतार । अनुभवोनि ते सर्व प्रकार ।
जगास सिद्धांत सांगती थोर । विरोध कोठेही असेना ।। ३२ ।।
विषयीजन जे साधारण । द्वैतभाव तयांना छान ।
मनबुद्धीचे साह्य घेउन । विशिष्टाद्वैत जाणता ये ।। ३३ ।।
असे तया अवस्थेत । ज्याप्रमाणे ईश्वर सत्य ।
सत्य तैसेचि जीवजगत । मानिती साधक त्या मतांचे ।। ३४ ।।
अद्वैतभाव असे अंतिम । वाङ्मनातीत अवस्था परम ।
अवस्था असे ती अनुपम । अशक्य वर्णन तियेचे ।। ३५ ।।
असती परस्परांची पोषक । मते ही नसती विरोधक ।
ऐसा महान सिद्धांत एक । कळला प्रथमच जगताला ।। ३६ ।।
एकदा तयांचे घेई मन । चैतन्यदेवांचे संकीर्तन ।
असे कसे जग मनमोहन । आपणास मिळावे पाहावया ।। ३७ ।।
येउनी खोलीच्या बाहेर । पंचवटीकडे फेकता नजर ।
दिसला जनसमुदाय अपार । भजन करित जात असे ।। ३८ ।।
समुदायाच्या त्या मध्यात । गौरांग भावावेषात ।
नित्यानंद आणि अद्वैत । असती समवेत तयांच्या ।। ३९ ।।
गाती भजन करिती नृत्य । देहभान विसरले समस्त ।
हरिनाम गर्जती आनंदात । मेळावा नाचत चालतसे ।। १४० ।।
मेळाव्यात जन असती अमित । न कळे कोठे आरंभ होत ।
मेळाव्यास दिसेना अंत । विशाल अद्भुत जनमेळा ।। ४१ ।।
काही जण त्या मेळाव्यात । दिसले राहिले लक्षात ।
पुढे येऊ लागता भक्त । ठाकुरांनी ओळखिले ।। ४२ ।।



ग्राम एक श्यामबाजार । वैष्णव तेथे असती फार ।
ईशान मल्लिक भक्तवर । नेतसे तेथे बाबांना ।। ४३ ।।

भजनसमयी रामकृष्ण । भावावेशात होती मग्न ।
अपूर्व नृत्य मधुर गायन । होती तल्लिन भजनात ।। ४४ ।।

अद्‌भुत भजनाची त्या काळी । कीर्ती सर्वत्र पसरली ।
फारच गर्दी होउ लागली । भजन तयांचे परिसावया ।। ४५ ।।

वृत्त पसरले आसमंतात । असे एक अद्‌भुत भक्त ।
भजन करता होई मृत । होतसे जिवंत पुनरपी ।। ४६ ।।

झुंडिने येऊ लागले जन । घ्यावया ठाकुरांचे दर्शन ।
वंदावयाला त्यांचे चरण । जन होउनी गेले वेडे ।। ४७ ।।

ऐसा प्रकार तीन दिवस । बाबांस भोजन करावयास ।
अथवा विश्रान्ती घ्यावयास । अवकाश मुळिही मिळेना ।। ४८ ।।

हृदयने मग चलाखी करुन । मागिल दाराने रामकृष्ण ।
आणिले शिहडगावालागुन । तेधवा गर्दी ती थांबली ।। ४९ ।।

शिहडवरुनी श्रीरामकृष्ण । येती दक्षिणेश्वरलागुन ।
आता साधना जाहली पूर्ण । आरंभ होतसे गुरुभावा ।। १५० ।।

श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५१ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा एकविसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय बाविसावा

जगाचे कराया कल्याण । निर्गुण ब्रह्म झाले सगुण ।
घेतले नररूप रामकृष्ण । नम्र नमन माझे तया ।। १ ।।

सकळ साधना झाल्या पूर्ण । गुणसंचय असाधारण ।
अध्यात्माचे कराया दान । गुरुभाव प्रकाश उद्धवला ।। २ ।।

बाबा म्हणती साचा तयार । या हो मुमुक्षू नारीनर ।
आपापुली जीवने सत्वर । त्यात घालुनी घडवा हो ।। ३ ।।

हिंदू क्रिस्ती मुसलमान । यहुदी पारसी बुद्ध जैन ।
सकळ मानवजातीस महान । दिसे आदर्श आपुलाला ।। ४ ।।

कर्मयोग भक्ती ज्ञान । जे जे इच्छी जो जो जन ।
तयाचे पूर्ण समाधान । होईल निश्चये या ठायी ।। ५ ।।

ईशलाभाचा वेध लागुन । जे जे येती मुमुक्षू जन ।
तयांचे मनोरथ होती पूर्ण । साधका सिद्धता लाभेल ।। ६ ।।

आजन्म कष्ट करुनी मानव । एक दोन प्राप्त करी भाव ।
येथे एकोणिसही सर्व । भाव परिपूर्ण विकासले ।। ७ ।।

सर्वांहि सिद्धी पायी लोळती । प्राप्त कर्तुमकर्तुम् शक्ती ।
सकळ सामर्थ्याची मूर्ती । रामकृष्णरूपाने प्रकटली ।। ८ ।।

परि गर्वाचा नसेचि अंश । प्राणिमात्रात दिसे परमेश ।
म्हणती मी तर तुमचा दास । केसच तुमच्या अंगाचा ।। ९ ।।

प्राण्यात पाहुनी परमेश्वर । पदधूली तयांची सत्वर ।
घेती आपुल्या मस्तकावर । म्हणती जाहलो धन्य मी ।। १० ।।



कधी असावा सर्वात्मभाव । मनचि होउनी जावे विश्व ।
ब्रह्मांडातिल वस्तू सर्व । एकत्व पावाव्या तयांसी ।। ११ ।।

एकदा गवत हिरवेगार । उगवले कुरणात सुंदर ।
तिकडे पाहात असता ठाकुर । एकरूप झाले दुर्वांशी ।। १२ ।।

इतुक्यात त्या गवतावरुन । एक पुरुष गेला चालुन ।
जावा कोणी छातीवरुन । तेवि वेदना जाहल्या ।। १३ ।।

छाती तयांची काही वेळ । होउनि गेली लाल लाल ।
दृष्टि होतसे अति विशाल । सर्वात्मभाव प्रकटता ।। १४ ।।

उत्पन्न व्हावेत अभिनव । अनेक वेळी अनेक भाव ।
काया मन बदलुनी सर्व । एकत्व पावती भावासी ।। १५ ।।

एकदा गंगेच्या घाटावर । सहज उभे होते ठाकुर ।
दोन नौका प्रवाहावर । तयांना दिसल्या येताना ।। १६ ।।

नौका घाटाला लावुन । त्यातुनी उतरले कोळी दोन ।
कडाक्याचे जुंपले भांडण । मारामारी सुरू जाहली ।। १७ ।।

भावावेशात तन्मय होउन । पाहात होते रामकृष्ण ।
पाठ लाल गेली होउन । अंगावरती वळ उठले ।। १८ ।।

ठाकुर आरडाओरड करिती । हृदय धावला त्वरित गती ।
म्हणाला कोणी तुम्हाप्रती । मारिले ठोकतो तयाला ।। १९ ।।

भावावेश जाता उतरुन । वृत्तांत सांगती रामकृष्ण ।
हृदय चकित गेला होउन । कळता कारण वळांचे ।। २० ।।

सर्वात्मभावाच्या स्थितीतुन । जेव्हा खाली येतसे मन ।
तेव्हा म्हणती मी संतान । अथवा दास श्रीअंबेचा ।। २१ ।।

ऐसे तयांचे भावांतर । सहज होतसे निरंतर ।
अनंत लीलामय अवतार । तारावयाला जगताला ।। २२ ।।



अज्ञानाने जे अंध झाले । जे का भवरोगाने पिडले ।
त्रिविध तापांनी पोळलेले । त्राते तयांचे रामकृष्ण ।। २३ ।।
असहाय दीन दुबळे अनाथ । अशांना द्यावयाला हात ।
दाखवावयाला भक्तिपंथ । करुणाघन प्रभू पातले ।। २४ ।।
कधी कधी विशिष्ट काळात । प्रकटे शक्ती अत्यद्भुत ।
अलौकिक सामर्थ्य अंगात । होतसे व्यक्त गुरुरूपे ।। २५ ।।
तेजे झळकत असे वदन । कल्पतरूच बसती होउन ।
हस्तस्पर्शाने कोणालागुन । अध्यात्मानुभव ते देती ।। २६ ।।
अथवा इच्छामात्रेकरुन । दूर करिती मनोमालिन्य ।
करिती शुद्ध अंत:करण । लाविती समाधी कोणाला ।। २७ ।।
कोणाच्या हृदयामाजी महान । करिती भगवद्भक्ति उत्पन्न ।
ईश्वराच्या चिंतनी तल्लिन । करुनि टाकिती कोणाला ।। २८ ।।
कधी ते म्हणती भक्ताप्रत । काय हवे सांग तुजप्रत ।
जणु भक्तांच्या इच्छा समस्त । बसले पूर्ण करावया ।। २९ ।।
जड जगतात चमत्कार । करू शके सिद्धिप्राप्त नर ।
रामकृष्णांचा अधिकार थोर । चमत्कार अध्यात्मजगी त्यांचे ।। ३० ।।
केवळ इच्छामात्रेकरुन । अध्यात्माचे करिती दान ।
अविद्यापट तो दूर करुन । स्वरूप साधका दाखविती ।। ३१ ।।
मनाचे उन्मन देती करुन । साधकास देती सिद्धपण ।
समाधिही देती लावुन । सच्छिष्यास देती पूर्णत्व ।। ३२ ।।
रामकृष्ण असती सांगत । सच्छिष्याची काय मात ।
सद्गुरूवर त्याची प्रीत । यात नवल काय असे ।। ३३ ।।
सेवक सद्गुरुचा भेटता । अपार आदर उपजे चित्ता ।
एवढी भक्तिची सखोलता । नमस्कार करिल तयाला ।। ३४ ।।



दिसेना गुरूत एकही दोष । सर्वत्र दिसतसे परमेश ।
जेवी काविळ मानवास । होता पिवळेच दिसतसे ।। ३५ ।।
सद्गुरूभक्त साधकास । आध्यात्मिक तत्त्वे विशेष ।
तीही कळती यथावकाश । संशय गळुनी जात असे ।। ३६ ।।
होता पवित्र शुद्ध मन । गुरूपरि करी मार्गदर्शन ।
मन होउनी बसे साधन । ईश्वरशक्ती प्रकटावया ।। ३७ ।।
यास्तव शुद्ध करावे मन । मग सद्गुरू येई धाउन ।
सच्छिष्याला बोध करुन । देई सिद्धत्व साधकाला ।। ३८ ।।
जेव्हा रामकृष्णांचे मन । जातसे देहभान सोडुन ।
उच्चावस्थेस आरोहण । तेव्हा दर्शने प्राप्त होती ।। ३९ ।।
परंतु जेधवा त्यांचे मन । अद्वैतभावात होतसे लीन ।
तेव्हा बंद पडती पूर्ण । सर्व व्यापार इंद्रियांचे ।। ४० ।।
बुबुळा स्पर्शिता न मिटे नयन । हृदयाचेही थांबे स्पंदन ।
मृतवत देह राहे पडुन । समाधी उतरेपर्यंत ।। ४१ ।।
पृथ्वीवरच्या गोष्टी समस्त । त्यांचे विस्मरण त्यांना होत ।
साधारण अवस्था होता प्राप्त । न पटे ओळख तयांची ।। ४२ ।।
नित्य परिचयाच्याही व्यक्ती । तयांनाही ते नोळखती ।
जणु ते नविनच सृष्टी बघती । अद्वैतातुनि आल्यावर ।। ४३ ।।
करू लागती आठवण । दिसतसे तो पदार्थ कोण ।
काय पूर्वी याचा आपण । अनुभव घेतला होता का ।। ४४ ।।
मग खात्री पटावी म्हणुन । कोणाला तरी करिती प्रश्न ।
काय हा राखाल निरंजन । हे धोतर हा गडू काय ।। ४५ ।।
होय ऐसे येता उत्तर । ओळख त्यांना पटे सत्वर ।
नेहमीप्रमाणे त्यानंतर । करिती ठाकुर इतर गोष्टी ।। ४६ ।।



माणुस पशू वृक्ष पर्वत । सामान्यासम दिसे समस्त ।
तथापि दिसतसे या सर्वांत । सच्चिदानंद भरलेला ।। ४७ ।।

ज्या ज्या वस्तू तयांना दिसती । निरनिराळ्या खोळी भासती ।
सच्चिदानंद आदी अंती । दिसतसे अखंड भरलेला ।। ४८ ।।

घेउनि निरनिराळ्या चादरी । जगज्जननी अंगावरी ।
डोकावुनि पाहते बाहेरी । ऐसे तयांना दिसत असे ।। ४९ ।।

म्हणती वेश्येप्रमाणे नटुन । आईने दिधले समजावुन ।
वेश्याहि माझेच रूप जाण । मजविण अन्य काही नसे ।। ५० ।।

ईश्वराच्या स्वरूपावाचुन । एकहि पदार्थ न दिसे अन्य ।
बाणले अद्वैतज्ञान पूर्ण । ब्रह्ममय जाहले चराचर ।। ५१ ।।

पशुपक्षीही दुःखित होता । होतसे दुःख तयांच्या चित्ता ।
म्हणती काय अशी अवस्था । तुझी भगवंता झाली असे ।। ५२ ।।

एकदा मदिरालयाजवळुन । येत असता त्यांचे वाहन ।
करिताना जन सुरापान । गर्दी तयांनी पाहिली ।। ५३ ।।

मद्यपी तेथे बेहोश होउन । करीत होते नृत्य गायन ।
आनंद तयांचा अवलोकुन । रामकृष्ण उभे राहिले ।। ५४ ।।

ब्रह्मानंदाचे उद्दीपन । होउनि म्हणती वा छान ।
पाहता पाहता समाधिमग्न । होउनि गेले भगवंत ।। ५५ ।।

मनाचे पावित्र्य असे अद्भुत । बरे वाइट जे असे जगात ।
सर्वत्र तयांना असे भासत । स्वरूपचि जगज्जननीचे ।। ५६ ।।

अहंकार निमाला पूर्ण । ईश्वरासी एकत्व होउन ।
अद्वैतभाव बाणला पूर्ण । पृथगस्तित्व विसरले ।। ५७ ।।

इच्छा ठाकुरांच्या मनाची । ईश्वरेच्छाच झाली साची ।
म्हणती जशी जगन्मातेची । इच्छा असे ते घडेल ।। ५८ ।।



ईश्वरशक्ती प्रकटावयाचे । यंत्रच झाले शरीर त्यांचे ।
नाव न राहे असंपूर्णतेचे । दिव्यभाव पूर्ण प्रकटला ।। ५९ ।।

दुसऱ्यास केवळ स्पर्श करुन । अथवा दृष्टिक्षेपेकरुन ।
दूर करिती मनोमालिन्य । इच्छामात्रेकरूनिया ।। ६० ।।

बाबा म्हणती एखाद्याप्रत । का बरे मी लावितो हात ।
परिवर्तित होई त्याचे मत । मान्य करी सिद्धान्त बाबांचा ।। ६१ ।।

कोणी बसती वाद घालित । ठाकुर हळूच लावितो हात ।
तुम्हास कारण नसे माहित । यास्तव सांगतो स्पष्टपणे ।। ६२ ।।

अविद्याशक्तीने त्याचे मन । गेले होते आच्छादुन ।
तो पट दूर व्हावा म्हणुन । स्पर्श मी केला तयाप्रत ।। ६३ ।।

अविद्यापटाचे आच्छादन । जेव्हा नि:शेष पडे गळुन ।
तेव्हाच घडते सत्यदर्शन । यास्तव अविद्या नासावी ।। ६४ ।।

तेथे येती जे भक्तजन । त्यांना म्हणती करा ध्यान ।
त्यांच्या वक्षस्थळालागुन । अथवा जिव्हेस स्पर्शिती ।। ६५ ।।

त्या पवित्र स्पर्शेकरुन । नष्ट होतसे विषयचिंतन ।
मन अंतर्मुख जाई होउन । घडतसे दर्शन अत्यद्भुत ।। ६६ ।।

विवेकानंद म्हणती नवल । दक्षिणेश्वरच्या देवळातिल ।
अशिक्षित हा पुजारी केवळ । केवढे सामर्थ्य असे त्याचे ।। ६७ ।।

मातीच्या गोळ्यास कुंभार । देतसे इच्छी तो आकार ।
तेवी जनमना हा नरवर । देतसे आकार स्वेच्छेने ।। ६८ ।।

विचारप्रवाह मनातिल । बदलुनि टाकितो तत्काळ ।
ज्या दिशेने त्यास वाटेल । त्याच दिशेने नेत असे ।। ६९ ।।

इतुका अद्भुत चमत्कार । कोठे न देखिला पृथ्वीवर ।
हिंडलो जरी मी जगभर । तीर्थक्षेत्रे गिरिगुहादी ।। ७० ।।



ज्या दिवशी जो पर्वकाळ । त्यास असे जो भाव अनुकुल ।
उदय पावतसे तत्काळ । ठाकुरांच्या मनामधी ।। ७१ ।।

शाक्तपर्वात शाक्तभाव । वैष्णवपर्वात वैष्णव ।
ऐसे भावान्तर अभिनव । न कळता तयांचे होत असे ।। ७२ ।।

भावावेशात शरीरज्ञान । जातसे संपूर्ण लोपुन ।
अवयव हात पाय मान । जाती होउनी वाकडे ।। ७३ ।।

शरीर हालू लागे समस्त । भय वाटे आता पडतात ।
त्वरित जवळपासचे भक्त । सावरुनी धरिती तयांना ।। ७४ ।।

वाकडे झाले जे अवयव । हळुहळु सरळ करिती सर्व ।
ज्या देवतेचा असे भाव । तियेचे नाव उच्चारिती ।। ७५ ।।

समाधी हळूहळू उतरुन । भानास येती रामकृष्ण ।
जोवर असती समाधिमग्न । तोवर थांबती सर्व क्रिया ।। ७६ ।।

बाबांस म्हणे गौरीपंडित । तुमचे अनुभव असती अद्‌भुत ।
मागे टाकुनी वेदवेदान्त । गेले निघुनी फार पुढे ।। ७७ ।।

एकदा डाक्याला विजयकृष्ण । घराचे दार बंद करुन ।
करीत बसला असता ध्यान । झाले दर्शन बाबांचे ।। ७८ ।।

आपुल्या समोर रामकृष्ण । बसले आहेत आले दिसुन ।
पाहता तयांना स्पर्श करुन । खात्रीच पटली तयाची ।। ७९ ।।

मग तो कलकत्त्याला येउन । रामकृष्णांचे घेई दर्शन ।
सर्वांस त्याने केले कथन । डाक्यास दर्शन घडलेले ।। ८० ।।

सांगे देश विदेश हिंडुन । पर्वत पहाड ओलांडुन ।
साधु महात्मे संतजन । अनेक ठिकाणी पाहिले ।। ८१ ।।

तथापि मजला कोठे कधिही । ठाकुरांसमान दिसला नाही ।
ज्या भावांचा यांच्या ठायी । पूर्ण प्रकाश दिसत असे ।। ८२ ।।



कोठे दोन पैसे दिसला । पाच दहा पैसे आढळला ।
याहुनि जास्त नाही दिसला । प्रकाश मजला कोठेही ।। ८३ ।।
यांचा साधाभोळा भाव । गोंधळात त्याने पडती सर्व ।
यांच्या थोरवीचा ठाव । लागत नाही कोणासही ।। ८४ ।।
यांचे दर्शन घ्यावया काही । विशेष खर्चही लागत नाही ।
उपलब्ध असती या ठायी । नौका गाड्या ही वाहने ।। ८५ ।।
जरी राहते रानावनात । अथवा दूर गिरिकंदरात ।
तरीच कळली असती किंमत । आम्हा सामान्य लोकांना ।। ८६ ।।
एवढा थोर अधिकार असुन । मानिती स्वत:स बालक सान ।
जगदंबाच असे सर्वज्ञ । आपण अज्ञ बाळ तिचे ।। ८७ ।।
जगदंबा सकळशक्तिमती । सर्वच कळते तिजप्रती ।
तियेची आपण करावी भक्ती । जे करणे ते तीच करो ।। ८८ ।।
ठाकुर सांगती नामस्मरण । शुद्ध करितसे अंत:करण ।
नामासारिखे सोपे साधन । कलियुगात दुसरे नसे ।। ८९ ।।
रामकृष्ण रोज सकाळी । तेवि सूर्यास्ती सायंकाळी ।
नाचत गात वाजविती टाळी । करिती प्रार्थना भक्तिभरे ।। ९० ।।
वाटे साक्षात नारायण । प्रेममय नरदेह घेउन ।
आला द्यावयाला शिकवण । प्रार्थना करावी कोणे रीती ।। ९१ ।।
मानिती आईच्या हातातिल । आपण तर यंत्र केवळ ।
ती ज्याप्रमाणे वागविल । त्यापरि आपण वागायचे ।। ९२ ।।
अशा भावाने त्यांच्या मनात । नुरे अभिमान यत्किंचित ।
कर्त्री करविती समस्त । वाटे एक श्रीजगदंबा ।। ९३ ।।
आपुल्या आईला आहे ज्ञान । आपण तिचे बाळ अजाण ।
यास्तव येता काही अडचण । जाती धाउनि आईकडे ।। ९४ ।।



धर्मपिपासू मंडळी येउन । करिता तयांचे समाधान ।
फुरसद मिळेना एक क्षण । ऐसी जाहली परिस्थिती ।। ९५ ।।
प्रेमे म्हणती जगन्मातेला । जमविसी ही गर्दी कशाला ।
खाण्यास अथवा बसावयाला । थोडीहि फुरसद मिळेना ।। ९६ ।।
शरीर फुटके ढोलगे सान । सारखी काढिसी धोपटुन ।
तर ते केव्हाच जाईल फुटुन । काय मग करसील जगदंबे ।। ९७ ।।
आता माते असे कर । महेन्द्रनाथ राम केदार ।
यांना शक्ति दे थोडी फार । जातील जन त्यांच्याकडे ।। ९८ ।।
धर्मतत्त्वे त्यांच्याकडुन । लोक घेतील समजावुन ।
मग होता येथे गोष्टी दोन । समाधान होइल लोकांचे ।। ९९ ।।
अहंकाराचा अल्पहि लेश । न शिवे ठाकुरांच्या मनास ।
सर्वच कळते जगदंबेस । तीच देतसे प्रेरणाही ।। १०० ।।
सांगती माता उशाकडे । आणुनी कीर्तीचे गाठोडे ।
मजला म्हणे घे एवढे । म्हणुनी पाठीस लागली ।। १ ।।
तथापि त्या बोचक्यावर । ज्या क्षणी माझी पडली नजर ।
मनात किळस उपजली फार । कीर्तीचे बोचके नाकारले ।। २ ।।
म्हणालो मजला नको कीर्ती । बहुत विनविले मातेप्रती ।
हासुनि आई झाली जाती । घेउनि कीर्तीचे गाठोडे ।। ३ ।।
ऐसा निरहंकारी स्वभाव । असुनि थोरवी नसेचि गर्व ।
सरलता बालक स्वभाव । स्थायीभाव ठाकुरांचा ।। ४ ।।
अवतार म्हणुनी झाली ख्याती । विद्वान पंडित दर्शना येती ।
तथापि अहंभाव त्यांच्या चित्ती । किंचित नाही उद्भवला ।। ५ ।।
येता कोणीही दर्शनासी । प्रथम नमस्कार करिती त्यासी ।
'मी' वस्तुच नसे मानसी । सन्मान कोण मग घेणारा ।। ६ ।।



सकळचालक असे आई । आपणाकडुनी जे घडे काही ।
ते ते तीच करवुनी घेई । आपण केवळ यंत्रमात्र ।। ७ ।।

एकदा डॉक्टर सरकार । बागेत पाहुनी श्रीठाकुर ।
समजला बागेतिल नोकर । आज्ञा केली तयांप्रती ।। ८ ।।

उद्यानातिल फुले सुंदर । तोडुनी दे मज दोन चार ।
नम्रपणे बाबा सत्वर । देती कुसुमे तोडूनिया ।। ९ ।।

पुढती कित्येक दिवसांनी । डॉक्टरांस प्रमाद आला कळुनी ।
फारच दु:खित होउनी मनी । क्षमा बाबांची मागितली ।। ११० ।।

ऐसे ठाकुर निरभिमानी । मानापमान नसती मनी ।
वंदो कोणी निंदो कोणी । लक्ष नसेची तयाकडे ।। ११ ।।

कोणी भक्ताने एक दिन । ठाकुरांस केले आमंत्रण ।
भक्तमंडळी सवे घेउन । गेले भजनास त्याच्याकडे ।। १२ ।।

कोणी तरी मोठी मंडळी । तयाच्याकडे होती आली ।
त्यांच्या व्यवस्थेत त्यावेळी । गढुनी गेला यजमान ।। १३ ।।

देव राहिला उपेक्षून । देवळाचेच चाले पूजन ।
एक भक्त मग रागावुन । म्हणे ठाकुर चला आता ।। १४ ।।

बाबा बोलती तयालागुन । काय उपयोग रागावुन ।
गाडीभाडे देईल कोण । तुझ्या खिशात पैसा नसे ।। १५ ।।

आधी तयांची व्यवस्था होइल । सोय आपुली मग लावील ।
ऐसे निरभिमानी निर्मळ । अंत:करण ठाकुरांचे ।। १६ ।।

एक साधू अत्यंत तामसी । आला होता दक्षिणेश्वरासी ।
विस्तव पाहिजे चिलमीसी । म्हणुनी खोलीत पातला ।। १७ ।।

साधुला येताना पाहुन । उभे राहिले रामकृष्ण ।
नम्रतेने हात जोडुन । करिती आदर तयाचा ।। १८ ।।



येथे निखारा नाही म्हणुन । तयाला सांगे एकजण ।
साधु रागाने गेला निघुन । रामकृष्ण नंतर बैसले ।। १९ ।।
भक्तजनांना अनुलक्षुन । सांगते झाले रामकृष्ण ।
हा तमोमुख नारायण । त्याचाही आदर करावा ।। १२० ।।
न ठेविल्यास त्यांचा मान । आईला राग येतो जाण ।
यास्तव अशांचा आपण । आदर ठेविला पाहिजे ।। २१ ।।
एकदा बाबांना भेटण्याला । नैय्यायिक पंडित आला ।
नमस्कारिती बाबा तयाला । प्रतिवंदन तो करीना ।। २२ ।।
उलट बाबांना पुसता झाला । काय आपण प्रणम्य मजला ।
रामकृष्ण म्हणती तयाला । मी सकळांचा दास असे ।। २३ ।।
प्रणम्य मजला सर्वजण । मी तर सकळांहुनी हीन ।
पंडित म्हणाला माझे भाषण । समजले नसावे तुम्हाला ।। २४ ।।
जयास नाही यज्ञोपवित । न करी विप्र तया प्रणिपात ।
परंतु यज्ञोपवित विरहित । संन्यासी प्रणम्य ब्राह्मणाला ।। २५ ।।
यास्तव विचारतो तुम्हासी । काय आपण असा संन्यासी ।
बाबा उत्तर देती तयासी । प्रणम्य मजसी सर्वजण ।। २६ ।।
संन्यासी आहोत आपण । न वदवे त्यांना असे वचन ।
यापरि असे असाधारण । निरभिमानता बाबांची ।। २७ ।।
प्रत्यक्ष चैतन्याचा कोंभ । असती सद्वस्तु स्वयंभ ।
कैसा तेथे राहावा दंभ । सरलता बालकासारिखी ।। २८ ।।
काही मारवाडी मंडळी । एकदा दक्षिणेश्वराला आली ।
तयांनी हृदयजवळ केली । रामकृष्णांची चौकशी ।। २९ ।।
तया श्रीमंत लोकांजवळी । हृदयने बाबांची स्तुती केली ।
इतुक्यात ठाकुर त्या स्थळी । येउनी बोलणे ऐकती ।। १३० ।।



म्हणती निर्भर्त्सना करुन । पंचायती तुज सांगतो कोण ।
ही श्रीमंत मंडळी पाहुन । भलते तयांना सांगसी ।। ३१ ।।
तुज वाटते गप्पा सांगुन । काही तरी मिळवावे धन ।
आपुला लाभ घ्यावा करुन । यास्तव प्रयत्न तुझा असे ।। ३२ ।।
आई अशा या लोभी जनाला । ठेवितेस तरि येथे कशाला
सांगती मग त्या मंडळीला । याचा बोल मानू नका ।। ३३ ।।
याचे ऐकू नका काही । यापरि माझी योग्यता नाही ।
परि जगदंबा माझी आई । तिजला भजतो निष्ठेने ।। ३४ ।।
आणि हा करितो जैसे कथन । तैसी योग्यता इच्छी मन ।
आश्चर्यचकित झाले जन । पाहुनी आचरण बाबांचे ।। ३५ ।।
तयांच्या बाह्यवेशावरुन । हे संन्यासी जाणेल कोण ।
एकदा एक अति विद्वान । पंडित पातला मंदिरास ।। ३६ ।।
कळले तेथे पंडितास । येथे असती परमहंस ।
आला रामकृष्णांच्या खोलीस । पाहिले ठाकुर बसलेले ।। ३७ ।।
पलंगावर होते ठाकुर । भक्त बसले होते समोर ।
थाट पाहुनी पंडित फार । आश्चर्यचकित जाहला ।। ३८ ।।
पंडिताने बिछाना पाहुन । मच्छरदाणी अवलोकुन ।
म्हणे वाहवा छान छान । नवल पाहिले आजला ।। ३९ ।।
तंव स्वत: रामकृष्ण । चपला देती दाखवून ।
पंडित आश्चर्यप्रदर्शन । अधिकाधिक करित असे ।। १४० ।।
आणखीही वस्तू बहुत । बाबा तयाला दाखवीत ।
पंडित झाला आश्चर्यचकित । वस्तू समस्त पाहूनिया ।। ४१ ।।
बाबांच्या जवळ पलंगावर । पंडित येउनी बसला सत्वर ।
म्हणे परमहंस आज फार । छान मिळाले पहावया ।। ४२ ।।



मग लोकांच्याकडे वळुन । म्हणे दिसता भोळे जन ।
येथे येता इतुक्या दुरुन । भोळी भक्ती धरूनिया ।। ४३ ।।
तुम्ही सपशेल फसला खास । अहो हे कसले परमहंस ।
शास्त्रोक्त लक्षणे मंडळीस । सांगितली परमहंसाची ।। ४४ ।।
म्हणे आजचा दिवस सगळा । व्यर्थच आम्ही घालविला ।
संध्याकाळची झाली वेळा । संध्या करितो गंगातिरी ।। ४५ ।।
गंगेच्या घाटावर जाउन । पंडित करी संध्यावंदन ।
इष्ट देवतेचे मग ध्यान । पंडिताने आरंभिले ।। ४६ ।।
ध्यानात काय दृष्टांत झाला । ठाऊक नसे हे कोणाला ।
परि पटकन पंडित उठला । पळत पातला बाबांकडे ।। ४७ ।।
तेथवा खोलीत रामकृष्ण । झाले होते समाधिमग्न ।
पंडित त्यांच्या समोर येउन । उभा राहिला अत्यादरे ।। ४८ ।।
आपुले जोडिले दोन्ही कर । बाबांस मानुनी परमेश्वर ।
स्तुती करू लागला फार । नाना प्रकारे बाबांची ।। ४९ ।।
आपण प्रत्यक्ष परमेश्वर । असा केवळ जगदाधार ।
मानवाची करुणा अपार । म्हणुनी नरदेह घेतला ।। १५० ।।
सच्चिदानंदचि साकार । झाले कराया जगदुद्धार ।
मी तर असे पढिक पामर । वाहतो भार विद्वतेचा ।। ५१ ।।
साखरेची गोडी खर । केवि चाखेल वाहुनी भार ।
अभ्यासूनहि वेदान्तशास्त्र । अहंकार मात्र वाढवला ।। ५२ ।।
काय पोपटपंची करुन । वेदान्ततत्त्व येईल कळुन ।
न जाणिले महिमान । म्हणुनि व्यर्थ मी बडबडलो ।। ५३ ।।
मम बुद्धीचा प्रान्त सान्त । आपुले स्वरूप असे अनंत ।
अज्ञानाने वदलो मात । क्षमा करावी दयानिधे ।। ५४ ।।



परमेश्वराचे महिमान । कसे जाणू मी अज्ञान ।
यास्तव पुन:पुन्हा वंदन । केले भक्तीने भगवंता ।। ५५ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५६ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा बाविसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय तेविसावा

नरदेह घेउनी नारायण । होउनि आले रामकृष्ण ।
आत्महितार्थ करितो नमन । भक्तिभराने भगवंता ।। १ ।।

रामकृष्णांची करुणा महान । राहे व्यापुनी विश्व पूर्ण ।
न दुखो कोणाचेही मन । यास्तव घेती काळजी ।। २ ।।

एकदा देवी सारदामणी । पुसती ठाकुरांलागुनी ।
विक्रेता आला फळे घेउनी । घेऊ काय फळे काही ।। ३ ।।

बाबा म्हणती फळे कशाला । देवी खिन्न होउनी गेल्या ।
दु:ख झाले रामकृष्णांला । खिन्न पाहुनी देवींना ।। ४ ।।

म्हणती आपुल्या शिष्याला । त्वरित जाउनी सांग तिजला ।
जितुकी पाहिजे असतील तुजला । तितुकी फळे तू खरीदावी ।। ५ ।।

म्हणती मजमुळे तियेच्या नयनी । जर का कधी येइल पाणी ।
तर माझी भक्ती ढासळुनी । जगज्जननीवरिलही जाइल ।। ६ ।।

आपुल्यापासुनी कोणालाही । त्रास होऊ नये काही ।
दुसऱ्याकडुनी होवो कितिही । त्रास सहन ते करिती ।। ७ ।।

सांगती सज्जनाचा राग । जसा पाण्याचा पडे डाग ।
ओला असे तो वेगळा रंग । नि:शेष होई सुकल्यावर ।। ८ ।।

रामकृष्णांना क्रोध नसे । आल्यासारखा कधी भासे ।
तोही क्षणामाजी नासे । फार वेळ तो टिकेचना ।। ९ ।।

त्यांना दिसतसे परमेश्वर । भरुनि राहिला चराचर ।
अशा स्थितीत कोणावर । राग करावा कोणी कसा ।। १० ।।



जे जे काही घडुनी येई । ईश्वरेच्छा वाटे सर्व ही ।
दृढ धारणा तयाच्या हृदयी । कर्ता करविता परमेश ।। ११ ।।
मथुरच्या मृत्यूनंतर । त्रैलोक्यबाबू तयाचा पुत्र ।
पाहु लागला कारभार । व्यवस्था कालीमंदिराची ।। १२ ।।
हृदयवर खप्पा मर्जी होउन । त्याने तयाला दिधले काढुन ।
आणि रागात गेला बोलुन । बाबांचेही काम नसे ।। १३ ।।
रामकृष्णांना कळता मात । होते तैशाच अवस्थेत ।
खोली सोडुनी निघाले त्वरित । फाटकापर्यंत पोहोचले ।। १४ ।।
परि बाबूच्या आले मनात । बाबांचा दोष नसे किंचित ।
ते जाताच आपुले अहित । होईल क्षणात निश्चये ।। १५ ।।
पाठोपाठ बाबू धावला । विनवी जाऊ नका बाबांला ।
रामकृष्णांना राग कसला । परतले हासत हासत ते ।। १६ ।।
बाबांचा सरळ स्वभाव । प्रसिद्धीची नसेचि हाव ।
म्हणती नाशिवंत हे सर्व । ब्रह्म सत्य जगन्मिथ्या ।। १७ ।।
केशवचंद्र सेन विद्वान । सुलभ समाचारात लिही लिखाण ।
केले रामकृष्णांचे वर्णन । बहुत जन आकृष्ट जाहले ।। १८ ।।
निरनिराळ्या वृत्तपत्रांत । ठाकुरांविषयी लेख येत ।
कधी कधी स्तुति यावी बहुत । निंदाहि येतसे कधी कधी ।। १९ ।।
एकदा ठाकुरांचा भक्त । म्हणाला वर्तमानपत्रात ।
तुमची निंदा आली बहुत । तव बाबा सांगती तयाला ।। २० ।।
जैसे जयाला दिसुनी येइल । तैसे तो वृत्तपत्रात लिहिल ।
आपुले चरित्र असावे उज्ज्वल । उपेक्षावी निंदास्तुती ।। २१ ।।
एकदा केशवचंद्र आला । रामकृष्ण वदले तयाला ।
काय रे केशव, सन्मानाला । हपापलेला मी असे ।। २२ ।।



म्हणुनी तू माझी हकीकत । लिहितोस वर्तमानपत्रात ।
यापुढे असले काही वृत्त । वृत्तपत्रात लिहू नको ।। २३ ।।

स्तुतिनिंदेसी उदासीन । असती जरी रामकृष्ण ।
तथापि तयांना होइना सहन । निंदा जगज्जननीची ।। २४ ।।

पूर्वी करीत असता साधन । जाती करण्या पुराणश्रवण ।
ग्रंथ अध्यात्मरामायण । श्रवणास जाती श्रीठाकुर ।। २५ ।।

पुराणिकबुवा बोले सत्वर । करिता रामनामोच्चार ।
निर्मळ होउनी जाई नर । लक्षात ठाकुर ते ठेविती ।। २६ ।।

मग एकदा पुराणिकाला । शौचास जाताना पाहिला ।
त्यांच्या मनाचा गोंधळ झाला । आठवुनी भाषण बुवाचे ।। २७ ।।

मग तयाच्याकडे जाउन । म्हणती नामोच्चार करुन ।
निर्मळ झाला नाही अजुन । शौचास आपण जात असा ।। २८ ।।

बालकासारिखा सरल प्रश्न । ठाकुरांचा तये ऐकुन ।
पाण्याने भरुनि आले नयन । उत्तर देइ तो बाबांला ।। २९ ।।

रामनामाचा उच्चार करुन । निर्मळ होउनी जाई मन ।
देहातिल मलास तेणेकरुन । परिणाम काही होत नसे ।। ३० ।।

उत्तर तयाचे परिसून । बाबा पावले समाधान ।
शांत झाले तयांचे मन । सरळ स्वभाव यापरी ।। ३१ ।।

कोणी येता महापंडित । धडकीच भरावी हृदयात ।
वाटे आपुले शिक्षण किंचित । काय बोलावे त्याच्याशी ।। ३२ ।।

कारण याचे एकमेव । बालकासमान त्यांचा स्वभाव ।
अपरिचित कोणी येता मानव । जेवि बालक संकोचे ।। ३३ ।।

तथापि होता थोडा परिचय । कोठल्या कोठे पळे भय ।
खांद्यावरही आरूढ होय । केसहि ओढे बालक ।। ३४ ।।



तैसी रामकृष्णांची स्थिती । नवख्या पंडितास संकोचती ।
रामकृष्ण स्वत: सांगती । हकिकत एका दिवसाची ।। ३५ ।।
शशधर तर्कचूडामणी । यावयाचे होते ते दिनी ।
भय वाटले माझ्या मनी । कैसे होईल आपुले ।। ३६ ।।
येथे वस्त्राची शुद्ध नाही । मग त्यासवे बोलणे काई ।
आता जगदंबे माझे आई । सांभाळ अपुल्या बालकाला ।। ३७ ।।
मग भक्तांना म्हणालो सकळ । तुम्ही येथे राहा जवळ ।
म्हणजे मजला धीर येइल । पंडित पातला तितुक्यात ।। ३८ ।।
पंडित माझ्यासमोर बसला । इतुक्यात आई दाखवी मजला ।
वाचुनी शास्त्रपुराणाला । उपयोग काही होत नसे ।। ३९ ।।
विवेक वैराग्य असल्याविण । काय करिल कोरडे वाचन ।
अशाने न सुटे अज्ञान । ते पाहुनी भीती पळाली ।। ४० ।।
आत उसळू लागले ज्ञान । बाहेर पडले मुखातुन ।
पंडित चकित गेला होउन । नयनातुनि अश्रू पाझरले ।। ४१ ।।
एकदा केशवचंद्र सेन । कुकसाहेबास आला घेउन ।
मजला दिधले आमंत्रण । नौकाविहार करावया ।। ४२ ।।
तेव्हा भय वाटले फार । परंतु बोलत बसलो सत्वर ।
मंडळी म्हणाली किती सुंदर । बोध मिळाला आम्हाला ।। ४३ ।।
एकदा रस्त्यामधे पडुन । हात गेला दुखावून ।
एक गृहस्थ कलकत्त्याहुन । दर्शन घ्यावया पातला ।। ४४ ।।
बाबा सहज पुसती त्याला । आलात देवळे बघण्याला ।
तो म्हणे महाराज आपणाला । पहावयाला आलो मी ।। ४५ ।।
ठाकुर म्हणाले तयाप्रत । आता काय बघसी मजप्रत ।
मोडला आहे माझा हात । म्हणत रडाया लागलो ।। ४६ ।।



बुचकळ्यात पडला गृहस्थ । काय बोलावे बाबांप्रत ।
म्हणाला करावया समजुत । बरा होईल कर लवकर ।। ४७ ।।
मग एखाद्या मुलाप्रमाणे । विचारू लागले उत्कंठेने ।
खरेच माझा हात त्वरेने । होईल काय बरा ।। ४८ ।।
ज्याला त्याला मग सांगती । बाबू कलकत्त्याहुनि येती ।
हात बरा होईल म्हणती । समाधान झाले बाबांचे ।। ४९ ।।
आयुष्यभर बालकस्वभाव । ठाकुरांचा असे अपूर्व ।
मनात किंचित नसे गर्व । अभूतपूर्व सरलता ।। ५० ।।
थोर थोर विद्वान पंडित । दर्शनासाठी येती सतत ।
एकदा आले त्यांच्या मनात । पंडित असावे आपणही ।। ५१ ।।
भावावस्थेत मग ते दिनी । म्हणती आई जगज्जननी ।
निरक्षर मूर्ख अडाणी । का गे केले मजलागी ।। ५२ ।।
असणे अशिक्षित अज्ञानी । ही तर गोष्ट लाजिरवाणी ।।
जगन्माता ते परिसुनी । चमत्कार करिती जाहली ।। ५३ ।।
तेधवा केरकचऱ्यासमान । विद्येचा ढीग आला दिसुन ।
बोट त्याकडे दाखवून । जगज्जननी बोलतसे ।। ५४ ।।
इथे असे विद्येचा डोंगर । तुज पाहिजे का सांग सत्वर ।
पाहताच किळस आली फार । वदलो मग जगदंबेला ।। ५५ ।।
असली विद्या मजला न लगे । तव पादपद्मी भक्ति दे गे ।
म्हणजे मजला मिळाले अवघे । ऐकुनी हासली जगदंबा ।। ५६ ।।
तन्मय राहुनी ईशचिंतनात । झाले मन पवित्र अत्यंत ।
कायेस केवढे पावित्र्य येत । पाहुनी चकित मन होई ।। ५७ ।।
करीत असता गोष्टी गहन । मध्येच त्यांना लागता तहान ।
लक्ष नसावे पाणी कोण । ठेवी आणुनी प्यावयाला ।। ५८ ।।



तथापि कोणी चारित्र्यहीन । नर ठेविता पाणी आणुन ।
तर कर जातसे आखडून । जलपान अशक्य होत असे ।। ५९ ।।
जणू तयांच्या शरीराने । स्पर्शदुष्ट ते पाणी पिणे ।
नाकारावे निग्रहाने । तनमनी ऐसी पवित्रता ।। ६० ।।
कोणी तरी अन्य भक्ताने । करावे लागे पाणी आणणे ।
तरच तयांनी स्वीकारणे । शक्य होतसे ते उदक ।। ६१ ।।
एकदा घडला असा प्रकार । चिकित्सक नरेन्द्रासमोर ।
तयाने करुनी शोध फार । माहिती मिळविली मनुजाची ।। ६२ ।।
तेव्हा तयाला आले कळुन । जयाने दिधले उदक आणुन ।
अनैतिक असे त्याचे वर्तन । स्पर्शदोष घडला पाण्याला ।। ६३ ।।
अग्रभाग आधी खाउन । खाद्यपदार्थ करिता अर्पण ।
बाबांकडुनी तयाचे सेवन । होउ शकेना कदापिही ।। ६४ ।।
वर्तमानपत्रांमधे सतत । प्रापंचिक गोष्टी असतात ।
यास्तव वृत्तपत्राला हात । कधी न लाविती रामकृष्ण ।। ६५ ।।
कोणाच्या घरास करिता गमन । करण्यापूर्वी आसनग्रहण ।
प्रथम ॐ कार उच्चारुन । स्पर्श करिती आसनाला ।। ६६ ।।
वैराग्य अत्यंत धगधगीत । भोगवासना नसे मनात ।
तयांच्या चारित्र्याचा होत । मूलमंत्र त्याग हा ।। ६७ ।।
जयाचे ग्रहण असे करणे । करिती कायावाचामने ।
त्यजावयाचे तेहि त्यजणे । काया मनाने सर्वथा ।। ६८ ।।
त्याग होतसे मानसिक । तैसाच करिता येई कायिक ।
ऐसे जगास कळाया विवेक । आचरुनी त्यांनी दाखविला ।। ६९ ।।
नकळत पैशास होता स्पर्श । जीव होतसे कासावीस ।
व्हावा वृश्चिकाचा दंश । होती वेदना त्यापरी ।। ७० ।।



पैशाची तर राहोच मात । धातुपात्रास लागता हात ।
वेदना तयांना होती बहुत । ऐसी अवस्था ठाकुरांची ।। ७१ ।।
एकदा कपड्याने झाकुन । गडवा घेतला उचलून ।
झाल्या वेदना अति दारुण । कळा लागल्या हाताला ।। ७२ ।।
म्हणाले जगज्जननी आई । पुनरपि ऐसे करणार नाही ।
एवढी वेळ क्षमा देई । तेव्हाच वेदना थांबल्या ।। ७३ ।।
ऐसी अवस्था झाली म्हणुन । केळीच्या पानावर भोजन ।
मृत्तिकापात्री पाणी घेउन । सेवन करिती श्रीठाकुर ।। ७४ ।।
असता पूजकपदावर । दिव्योन्माद जाहला थोर ।
स्वाक्षरी पगारपटावर । करणेही अशक्य जाहले ।। ७५ ।।
रघुवीराच्या नावे जमिन । रजिस्टरपत्र करावे म्हणुन ।
कामारपुकुरास रामकृष्ण । गेले होते एकदा ।। ७६ ।।
केशवसेनाचे गुरू म्हणुन । कोर्टात त्यांचा केला मान ।
रजिस्टरावर स्वाक्षरी करुन । द्यावयास सांगे अधिकारी ।। ७७ ।।
बाबा म्हणाले माझ्याकडुन । स्वाक्षरी करणे अशक्य जाण ।
कसे म्हणू मी माझी जमिन । जमेना करणे स्वाक्षरी ।। ७८ ।।
मंडळींनी केला आदर । आंबेहि दिधले बरोबर ।
तथापि ते कसे नेणार । संचय करणे उचित नसे ।। ७९ ।।
एकदा महेन्द्रनाथ आला । जाताना तो रामलालला ।
पाच रुपये देउनि गेला । नव्हते ठाउक ठाकुरांना ।। ८० ।।
रामलालदादा वदला । महेन्द्र पैसे देउनि गेला ।
बाबा म्हणती प्रथम मजला । बरे वाटले ऐकून ।। ८१ ।।
दुधाचे पैसे टाकू देउन । परंतु भलते गेले होउन ।
डोळा लागताच झोपेतुन । धडपडत जागा जाहलो ।। ८२ ।।



जणु कोणीतरि छातीवर । वाटे ओरबाडते मांजर ।
रामलालकडे गेलो सत्वर । वदलो तेधवा तयाप्रती ।। ८३ ।।
आताच्या आता जाउन । ये तू पैसे परत करुन ।
जेधवा वापस केले धन । तेधवा लाभली स्वस्थता ।। ८४ ।।
भक्ताच्या घरी एक दिवस । गेले भजन करावयास ।
त्या भक्ताच्या आले मनास । द्यावी मिठाई बाबांना ।। ८५ ।।
तयाने आग्रह केला फार । मिठाई न्यावया बरोबर ।
सविनये त्यास म्हणती ठाकुर । बाबू मजला करा क्षमा ।। ८६ ।।
घ्यावा जिन्नस बरोबर । यात मजला दोष फार ।
संचय न करावा अणुमात्र । कधिही संन्यासि लोकांनी ।। ८७ ।।
साधुसंत आणि संन्यासी । कधिही न करिती संचयासी ।
माझी तर असे अवस्था ऐसी । काहि न नेता येई सवे ।। ८८ ।।
पाने बटव्यामधे घालुन । नेणे अशक्य मजला जाण ।
शौचास गेलो तर तेथुन । आणता येइना मृत्तिका ।। ८९ ।।
वस्त्रास गाठ मारावयाची । सोय नसे सर्वथा साची ।
कारण गाठीत संचयाची । कल्पना सहजचि येत असे ।। ९० ।।
अजाणताही पडता गाठ । श्वासोच्छ्वास न होई नीट ।
परिणाम होतसे वोखट । वाकडे होती हातपाय ।। ९१ ।।
केवढा त्याग हा विलक्षण । ठाकुर त्यागाचा ज्वलंत कृशान ।
आश्चर्यचकित होतसे मन । त्याग पाहुनी बाबांचा ।। ९२ ।।
बाबा जाणती बाल्यापासुन । काम हा शत्रू असे महान ।
ईश्वरलाभात त्याची अडचण । यास्तव काम तो त्यजावा ।। ९३ ।।
आरंभिला उपाय अभिनव । स्त्रीपुरुष हाच भेदभाव ।
मनातुनी नाहिसा व्हावा सर्व । स्त्रीवेशात यास्तव राहिले ।। ९४ ।।



पुरुषजन्म आपुला होय । हे स्मरण्याचिही नसे सोय ।
जीवन झाले स्त्रीभावमय । सहज लाभली जितेंद्रियता ।। ९५ ।।

अवचित होता स्त्रियेचा स्पर्श । व्हावा वृश्चिकाचा दंश ।
तैशा वेदना कायेस । होती अवयव वाकडे ।। ९६ ।।

कधी एकटे खोलीत असावे । इतुक्यात कोणा स्त्रीने यावे ।
ठाकुरांस तेधवा वाटावे । अपत्य आपण ती माता ।। ९७ ।।

रामकृष्णांना स्त्रियांची स्वरुपे । भासती आनंदमयीची रूपे ।
निरनिराळी कुरुपे सुरुपे । दिसतसे नटली जगदंबा ।। ९८ ।।

सर्वत्र जगदंबेचे दर्शन । ऐसी अवस्था गेली होउन ।
सहजचि काम गेला गळुन । केवी थोरवी वर्णावी ।। ९९ ।।

एकदा एक वेश्या सुंदर । गिरिकंदरे फिरुनी फार ।
हिंडुनि तीर्थक्षेत्री अपार । दक्षिणेश्वराला पातली ।। १०० ।।

हिंडली आश्रम मठ बहुत । परि कामकांचनत्यागी संत ।
नाही आढळला तिजप्रत । कीर्ती ऐकिली ठाकुरांची ।। १ ।।

दक्षिणेश्वराला परमहंस । राहतात हे कळता तीस ।
तयांची परीक्षा पाहावयास । कालीमंदिरात पातली ।। २ ।।

भक्तमंडळींबरोबर । बोलत होते तेव्हा ठाकुर ।
वेश्या करुनी नमस्कार । उभी राहिली बाजूला ।। ३ ।।

नंतर शौचास लागली म्हणुन । सकळ बोलणे बंद करुन ।
उठले भगवान रामकृष्ण । हे त्या स्त्रियेने पाहिले ।। ४ ।।

तव ती स्त्री अत्यंत चतुर । पाणी घेउनी गडवाभर ।
निघाली ठाकुरांबरोबर । उभी राहिली बाजूला ।। ५ ।।

रामकृष्ण आपुल्या नादात । तोंडाने काही गुणगुणत ।
पाहुनी झाली अति विस्मित । तव मागती पाणी ठाकुर ।। ६ ।।



मग तिच्याशी गोष्टी करित । आपुल्या खोलीस आले परत ।
तिला वाटले इंद्रियजित । उगीच परीक्षा पाहिली ।। ७ ।।
मग बाबांच्या चरणांवर । मनोमन करुनी नमस्कार ।
क्षमायाचना करुनी सत्वर । गमन केले त्या महिलेने ।। ८ ।।
भक्तांस सांगती महाभाग । लहान वासनांचा त्याग ।
करावा घेउनी उपभोग । परंतु मनाला शिकवावे ।। ९ ।।
योग आणि ऐहिक भोग । परस्पर विरोधी दोन भाग ।
कधीतरि भोगापासुनी सांग । मना मिळे का परमेश ।। ११० ।।
पुरे आता भोग भोगणे । विचारपूर्वक साधकाने ।
तत्काळ कायावाचामने । भोग वर्जावा सर्वथा ।। ११ ।।
बाबा करीत असता साधन । एकदा तयांचे इच्छी मन ।
भरजरी पोषाख आपण करुन । गुडगुडीत तमाखू ओढावा ।। १२ ।।
मथुरबाबूस बोलता मात । त्याने पोषाख करविला त्वरित ।
तमाखू चांदीच्या गुडगुडीत । आणुनी दिधला बाबांना ।। १३ ।।
मग भरजरी पोशाख करुन । हातामधे गुडगुडी धरुन ।
ऐटीत बसुनी रामकृष्ण । ओढु लागले तंबाखू ।। १४ ।।
एकदा या इकडे बसुन । एकदा त्या तिकडे जाउन ।
झुरके मारिती वरुन खालुन । समाधान करिती मनाचे ।। १५ ।।
म्हणाले मना आता सारी । तुझी इच्छा मी केली पुरी ।
जरीचे कपडे काढुनी सत्वरी । तुडवुनि टाकिले पायांनी ।। १६ ।।
म्हणती मना हा मूल्यवान । पोषाख वाढवी रजोगुण ।
दूर असावे याच्यापासुन । होइना याने ईशलाभ ।। १७ ।।
आणि ते सांगती भक्तजनांना । परि ज्या असती मोठ्या वासना ।
विवेक बोध करुनी मना । भोग न घेताच त्यागाव्या ।। १८ ।।



भोगणे मोठ्या वासनांना । होतसे कारण अध:पतना ।
यास्तव उद्‌भवताच तयांना । विवेक करुनिया टाळावे ।। १९ ।।
जैसा तयांचा सरल स्वभाव । जैसे असे पावित्र्य अभिनव ।
कामकांचन त्याग सर्व । तैसीच तयांची सत्यनिष्ठा ।। १२० ।।
होउनि गेली अद्‌भुत अवस्था । सत्यनिष्ठेची पराकाष्ठा ।
असत्य भाषण कधिही सर्वथा । येउ शकेना मुखातुनी ।। २१ ।।
एकदा वदता जेथे जाइन । करावेच लागे तेथे गमन ।
एकदा म्हणता काम करिन । घडलेच पाहिजे ते कार्य ।। २२ ।।
ते सांगती बोलता सहज । जेवणार मी नाही आज ।
भूक लागली तरिही मज । सोय नसे मग खाण्याची ।। २३ ।।
जे काम जयाला सांगितले । तयानेच ते पाहिजे केले ।
दुसऱ्याने जर करतो म्हटले । स्वीकार तयाचा करवेना ।। २४ ।।
एखाद्याला मागता पाणी । दिले पाहिजे त्याने आणुनी ।
आणुनि जर दे अन्य कोणी । ते पिणे अशक्य होत असे ।। २५ ।।
सांगती भगवान रामकृष्ण । सदा बोलणे सत्य भाषण ।
हेच कलियुगी तपाचरण । श्रेष्ठ साधन सत्यनिष्ठा ।। २६ ।।
सत्यनिष्ठेच्या बळावर । ईश्वरलाभ होई सत्वर ।
सत्यनिष्ठा नसता नर । जातसे सर्वनाशाकडे ।। २७ ।।
बारा वर्षेपर्यंत पूर्ण । नित्य सत्याचे करिता पालन ।
कायावाचामने करुन । तर नर सत्यसंकल्प होई ।। २८ ।।
जगन्माता तयाचे भाषण । मिथ्या होऊ देइना जाण ।
जे जे तयाच्या मुखातुन । निघे ते सत्य होत असे ।। २९ ।।
सत्यनिष्ठेचा एवढा महिमा । सत्यास नाही अन्य उपमा ।
पावावयासी कैवल्य धामा । आधार असे सत्यनिष्ठा ।। १३० ।।



जगन्मातेला फुले वाहता । म्हणालो आई ने शुचिताशुचिता ।
बरेवाईट धर्माधर्मता । पापपुण्य तुझे तू नेई ।। ३१ ।।
तथापि सत्यासत्य नेई । ऐसे म्हणू शकलो नाही ।
सत्य त्यागुनी करू काई । सत्य ब्रह्मस्वरूप असे ।। ३२ ।।
रामकृष्णांच्या मुखातून । जे जे बाहेर पडे वचन ।
तैसे प्रत्यक्ष येतसे घडुन । अतर्कित सत्य होत असे ।। ३३ ।।
असत्य संकल्प त्यांच्या मनात । कधिही होऊ न शके उदित ।
जी जी इच्छा उत्पन्न होत । तत्काळ पूर्ण ती होत असे ।। ३४ ।।
एकदा ठाकुर आजारात । म्हणाले चव नाही किंचित ।
बरे वाटेल मज सांप्रत । मिळता आवळा चघळावया ।। ३५ ।।
ते नव्हते आवळ्याचे दिन । स्वस्थ राहिले सर्वजण ।
तथापि भक्त दुर्गाचरण । नाग महाशय चिंतितसे ।। ३६ ।।
इच्छा जर करितात ठाकुर । कुठेतरी आवळे असणार ।
त्याविण आवळ्यांचा विचार । कैसा येइल बाबांना ।। ३७ ।।
नागमहाशय निघे तेथुन । बगीचे बहुत काढिले धुंडुन ।
ऐसे फिरता दिवस तीन । एक उद्यान आढळले ।। ३८ ।।
त्या बागेतिल झाडावर । आवळे दिसले तीन चार ।
महाशयाने तोडुनी सत्वर । अर्पिले श्रीरामकृष्णांना ।। ३९ ।।
भक्तजनांसी असता बोलत । म्हणाले इच्छा झाली मनात ।
कचोरी गरम खुसखुशीत । खावयास आता मिळावी ।। १४० ।।
इच्छा तयांची परिसून । भक्तजनांतिल एकजण ।
म्हणे कलकत्त्याला जाउन । कचोरी घेउनी मी येतो ।। ४१ ।।
ठाकुर म्हणती तू मुद्दाम । जाउनी काय होईल काम ।
कचोरी कशी राहील गरम । आणता इतुक्या दूरवर ।। ४२ ।।



यापरी ते असता बोलत । इतुक्यात आला एक भक्त ।
गरम कचोरी ठाकुरांप्रत । द्यावया तयाने आणिली ।। ४३ ।।
सत्यसंकल्प तयांचे मन । वाचेत असे सत्यभाषण ।
सत्याचेच होतसे पालन । देहाकडुनी बाबांच्या ।। ४४ ।।
देहाकडुनही सत्यपालन । कैसे होतसे उदाहरण ।
जगतापुढे श्रीरामकृष्ण । आपण वर्तुनी ठेविती ।। ४५ ।।
शंभुचंद्रबाबू मल्लिक । रामकृष्णांचा भक्त एक ।
कालीमंदिराजवळ सुबक । बगिचा होता तयाचा ।। ४६ ।।
दवाखाना त्या बगिच्यात । शंभु मल्लिक चालवीत ।
बाबा कधि कधि जाती तेथ । ईश्वरीय गोष्टी करावया ।। ४७ ।।
एकदा ठाकुर गेले असता । उद्‌भवली त्यांच्या उदरी व्यथा ।
शंभु बोलला तुम्हास आता । दोन गोळ्या देईन मी ।। ४८ ।।
बराच वेळपर्यंत तेथ । रंगुनि गेले ते गोष्टीत ।
विसरती दोघे त्या नादात । गोष्ट गोळ्यांची पूर्णपणे ।। ४९ ।।
गप्पागोष्टी झाल्यावर । परत जाण्यास निघती ठाकुर ।
चालुनि जाता थोडे अंतर । गोष्ट गोळ्यांची आठविली ।। १५० ।।
परत फिरले रामकृष्ण । शंभु गेला होता निघुन ।
तयांनी कंपाउंडरापासुन । गोळ्या मागुनी घेतल्या ।। ५१ ।।
तथापि परत येत असता । तयांना दिसेना पुढील रस्ता ।
नाल्याच्याच बाजुसी आता । पाय ओढती बाबांचे ।। ५२ ।।
मार्ग चुकलो संशय येउन । मागिल रस्ता पाहती वळुन ।
तव स्पष्ट दिसे तो संपूर्ण । फाटकापर्यंत बागेच्या ।। ५३ ।।
फाटकापर्यंत जाउनी परत । पाहुनि घेतला मार्ग समस्त ।
पुनरपि चालत रस्त्यात । पूर्वीसारखी गत झाली ।। ५४ ।।



रस्ताच तयांना सापडेना । कारण काय तेही कळेना ।
परंतु सरळ चालणे घडेना । निराश होउनि ते बसले ।। ५५ ।।
विचार करिती रामकृष्ण । शंभु म्हणाला मजपासुन ।
घेउनि जाव्या गोळ्या दोन । विपरीत वर्तन परि घडले ।। ५६ ।।
आपण कंपाउंडरापासुन । मागुनि आणिल्या गोळ्या दोन ।
यास्तव जगन्माता येथुन । जाउ देइना मजलागी ।। ५७ ।।
शंभु म्हणाला मी देईन । दुसऱ्याकडुनी आणिल्या आपण ।
चोरी आणि असत्य वचन । गोळ्या नेण्यात दोष असे ।। ५८ ।।
यास्तव आई करुणामयी । मजला जाऊ देत नाही ।
अडकवुनि ठेविले याच ठायी । विचार मनात आले असे ।। ५९ ।।
परत पातले औषधालयात । कंपाउंडरही नव्हता तेथ ।
गोळ्यांची पुडी टाकुनी आत । बाबा बोलले मोठ्याने ।। १६० ।।
तुमच्या गोळ्या केल्या परत । वापस मग फिरले त्वरित ।
दिसू लागला रस्ता समस्त । पायहि चालति नीटपणे ।। ६१ ।।
ठाकुर म्हणती आईवर । जयाने आपुला टाकिला भार ।
तयाचे पाउल अणुमात्र । कधिही बेताल पडेना ।। ६२ ।।
जगन्माताच काळजी घेई । सांभाळुनी तयाला नेई ।
निजभक्ताला न चुकू देई । करुणामयी आई जगदंबा ।। ६३ ।।
जगज्जननीने ज्याला धरिले । तयाला भय नाही उरले ।
मी तर तिच्यावर ओझे टाकिले । करावयाचे ते ती करो ।। ६४ ।।
सद्गुरूंच्याकडुनी ऐकिले । परमेश्वराच्या अंशे सगळे ।
एवढे ब्रह्मांड उत्पन्न झाले । यातच आले तत्त्वज्ञान ।। ६५ ।।
काही नाही कळत मजला । सकळ कळतसे जगदंबेला ।
जैसे येई तिच्या मनाला । आपल्याला ठेवो तसे ।। ६६ ।।



जगन्मातेला म्हणत असे । माते मी तर अजाण असे ।
वेदशास्त्रात काय असे । समजावुनि दे मजलागी ।। ६७ ।।
माझी आई करुणामयी । समजावुनि ती मजला देई ।
आणिक नलगे करणे काही । काळजि घेई जगन्माता ।। ६८ ।।
आपणास काय असे हवे । ते ते आईला सांगावे ।
योग्य असे ते तिने करावे । ऐसे निर्भर बाबा असती ।। ६९ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १७० ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा तेविसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय चोविसावा

रामकृष्णमय व्हावे जीवन । ऐसी इच्छा करितसे मन ।
करुणार्द्र भगवंताला नमन । विनम्र भावे करित असे ।। १ ।।

सांगत असती रामकृष्ण । नीट परीक्षा केल्यावाचुन ।
कधिही कोणालाही आपण । भक्तमंडळीत घेत नाही ।। २ ।।

जगज्जननी दाखवी मजला । धर्मलाभ होइल कोणाला ।
होणार नाही कोणकोणाला । आणि कोणाला झाला किती ।। ३ ।।

सद्गुरू भवरोगवैद्य होत । वाक्यात या असे अर्थ ।
रामकृष्णांच्या वर्तनात । यथार्थता याची दिसत असे ।। ४ ।।

ईश्वरलाभाच्या मार्गात । साधकास अवस्था होता प्राप्त ।
सद्गुरू तत्काळ ओळखतात । अनुकूल अथवा प्रतिकूल ।। ५ ।।

अनुकूल असता तयाप्रत । उच्चतर अवस्था व्हावी प्राप्त ।
उपाय यास्तव योजितात । चिंतितात हित शिष्यांचे ।। ६ ।।

अनिष्ट गोष्टींच्यापासुन । काय काय उपाय योजुन ।
कसे करावे भक्तरक्षण । श्रीरामकृष्ण ते जाणिती ।। ७ ।।

भक्तांचे सूक्ष्म निरीक्षण । सदैव करिती श्रीभगवान ।
साधकजनांचे अकल्याण । होउ न देती कधिही ते ।। ८ ।।

येणाऱ्यांची ते परीक्षा करुन । योग्यतेप्रमाणे सांगती साधन ।
इतरांस म्हणती जाई येथुन । खा पी चैन करी जरा ।। ९ ।।

वासनेने लडबडलेला । जीव कळतसे ठाकुरांला ।
उपदेश दिधला नाही अशाला । घेतला नाही मंडळीत ।। १० ।।



जी जी परीक्षा तयांनी केली । ती ती सर्वदा योग्य ठरली ।
परीक्षा तयांनी केलेली । नाही चुकली कदापिही ।। ११ ।।
एका साधकाचे मन । बाह्य शौचाचारात गुंतुन ।
ईश्वराचे करिता चिंतन । एकाग्र होऊ शकत नसे ।। १२ ।।
ठाकुर सांगती तयालागुन । मलमूत्रविसर्जनाचे स्थान ।
तेथेच मुद्रा धारण करुन । कर तू ध्यान ईश्वराचे ।। १३ ।।
एकाजणास करिता भजन । उद्दामभाव होती उत्पन्न ।
प्रतिकूल ते असती म्हणुन । रामकृष्ण म्हणती तयाप्रत ।। १४ ।।
अर्धा छटाकहि दूध नाही । तापवावयाला मोठी कढई ।
सांग हाती काय येई । जाळ लावता दणकून ।। १५ ।।
नुसती कढईच माखण्यात । संपून जाईल दूध समस्त ।
अशा रितिने कशी यथार्थ । भक्ति लाभावी तुजलागी ।। १६ ।।
एकदा काही वैष्णवजन । एका मुलाला आले घेउन ।
सांगती करिताना कीर्तन । याची अशी स्थिति झाली ।। १७ ।।
तयाची छाती आणि वदन । गेले होते आरक्त होउन ।
अत्यंत दीनभावेकरुन । पदधूली घेतली सर्वांची ।। १८ ।।
करिता ईश्वरनामोच्चारण । त्याच्या अंगास कंप सुटुन ।
वाहती धारा नयनांतुन । उभे राहती रोमांचही ।। १९ ।।
डोळे सुजुनी होती लाल । नसे देही लक्ष बिलकुल ।
ईश्वरदर्शनाची तळमळ । भूक झोपही न लागती ।। २० ।।
बाबा म्हणती त्याला पाहुन । मधुरभावाचा आरंभ जाण ।
परि ही अवस्था त्याच्याकडुन । नाही टिकविली जाणार ।। २१ ।।
ही अवस्था राखणे कठिण । केवळ स्त्रीच्या स्पर्शेकरुन ।
अवस्था ही नष्ट होउन । जातसे एकाच क्षणामधे ।। २२ ।।



रामकृष्णांचे ऐकुनी वचन । जन ते पावले समाधान ।
समजले मुलाला निदान । नसे लागले वेड तरी ।। २३ ।।
लोक तेथुनी निघुनी गेले । ठाकुरांनी जे सांगितले ।
तसे खरोखर घडुनी आले । नष्ट झाला भाव त्याचा ।। २४ ।।
सांगती श्रीरामकृष्ण । भावावेग करणे धारण ।
कार्य असे हे अतीव कठिण । अध:पतन नातरी होत असे ।। २५ ।।
मनामाजी वसणे वासना । बाधक होतसे साधकांना ।
सांगती शास्त्रे पुराणे नाना । वासना समूळ उन्मळावी ।। २६ ।।
रामकृष्ण भावावेशात । उभे असता मंदिरात ।
पाहती भैरवस्वरूपात । गिरीश घोषास एकदा ।। २७ ।।
तेव्हापासुनी गिरिशाप्रत । मानिती भैरव साक्षात ।
तयाची बोलणी भगवंत । हासत हासत साहती ।। २८ ।।
गिरिशासारखा दुसरा जन । करू लागताच भाषण ।
थांबविती ते निषेध करुन । म्हणती भाव हा तुझा नसे ।। २९ ।।
सांगती काचेच्या कपाटात । वस्तू समस्त दिसतात ।
तेवि माता दावी मजप्रत । जनांच्या हृदयात काय असे ।। ३० ।।
माणसाच्या काठीवरुनी । अथवा त्याची छत्री पाहुनी ।
रामकृष्णांना येतसे कळुनी । स्वभाव तत्काळ मनुजाचा ।। ३१ ।।
आपुल्याकडे जो येई जन । करिती तयाचे निरीक्षण ।
नाना प्रकारे परीक्षा करुन । मग मत आपुले ठरविती ।। ३२ ।।
जन जाणण्याचे इतुके उपाय । आणिले कोठुनी न कळे सोय ।
अवलोकन शक्ती असंशय । अलौकिक असे ठाकुरांची ।। ३३ ।।
शरीराची परीक्षा करुन । जो नर होत असे उत्तीर्ण ।
योगसामर्थ्य मग वापरुन । जाणुनी घेती पूर्ण तया ।। ३४ ।।



दर्शनास कोणी येता नर । लक्षपूर्वक पाहती ठाकुर ।
आकृष्ट त्याकडे झाल्यावर । बोलणे तयासी आरंभिती ।। ३५ ।।
न कळता निरीक्षण करिती । आचार विचार जाणुनि घेती ।
अवयवांची घडण पाहती । यावया सांगती पुनरपी ।। ३६ ।।
म्हणती पद्मपत्र नयन । सात्त्विक वृत्तिचे असे लक्षण ।
डोळे असता बैलासमान । काम प्रबळ असे तेथे ।। ३७ ।।
असती ऊर्ध्वदृष्टिसंपन्न । योगीजनांचे आरक्त नयन ।
देवचक्षू नसती महान । परंतु लांब ते असती ।। ३८ ।।
जो पाहतो न्याहाळुन । तो असे विशेष बुद्धिमान ।
जड हात ज्यांचा तो दुर्जन । चपटे नाक बरे नव्हे ।। ३९ ।।
शंभुचंद्रबाबू मल्लिक । चपटे असे तयाचे नाक ।
असूनही तो ज्ञानी साधक । वृत्ती त्याची सरळ नसे ।। ४० ।।
हात आखुड मोठे कोपर । हे लक्षण तर वाईट फार ।
मांजरासारखे घारे नेत्र । असणे हेही बरे नसे ।। ४१ ।।
एक डोळा असो आंधळा । तथापि तिरळा नसे भला ।
दुष्ट वाईट वृत्ति तयाला । म्हणुनी टाळला पाहिजे तो ।। ४२ ।।
हृदयच्याकडे माणूस एक । येउनी म्हणे मी असे नास्तिक ।
तू तर आहेस रे आस्तिक । वाद कर मग माझ्याशी ।। ४३ ।।
तयाला पाहिले न्याहाळुन । तव मार्जारासम घारे नयन ।
कोडे उलगडले तत्क्षण । नास्तिकपणाचे तयाच्या ।। ४४ ।।
हात पाय चालणे पाहुन । पाहुनी शरिराची ठेवण ।
मजला तत्काळ येई कळुन । स्वभाव तयाचा कसा असे ।। ४५ ।।
त्यागीजनांचे उच्छ्वास । आणि भोगीजनांचे श्वास ।
पडती वेगळ्या तऱ्हेने खास । कळतसे माणुस त्यावरुनी ।। ४६ ।।



नरेन्द्राची परीक्षा करुन । तत्काळ मजला आले कळुन ।
सर्व लक्षणे फारच छान । असती माझ्या नरेन्द्राची ।। ४७ ।।
परंतु झोपेत निःश्वास । पडे जोराने वाईट खास ।
योगी म्हणतात असा पुरुष । होतसे खचित अल्पायू ।। ४८ ।।
उतरता बाबांच्या परीक्षेत । घेती तयाला मंडळीत ।
नाना प्रकारे उपदेश देत । दोष दाविती भक्ताला ।। ४९ ।।
गृहस्थ कोणास ठेवावा । अथवा कोणास संन्यास द्यावा ।
आधीच ठरवुनी बोध करावा । अनुरूप त्याच्या आश्रमाला ।। ५० ।।
विचारिती ते प्रत्येकाला । काय रे तुझा विवाह झाला ।
कोण कोण असती घराला । निर्वाह कैसा चालतसे ।। ५१ ।।
विचारिती ते अविवाहिताला । काय विवाह आवडे तुजला ।
आवडे करणे चाकरीला । जाणुनि घेती त्याची स्थिती ।। ५२ ।।
अध्यात्ममार्गाचा अधिकारी । कळता करितो तो चाकरी ।
अथवा कळता विवाह करी । तर दुःख भारी होत असे ।। ५३ ।।
विशेष कारण असल्यावाचुन । मिळवण्यासाठी पैसा मान ।
कोणी नोकरी करितो पाहुन । वाटे शक्तीचा अपव्यय ।। ५४ ।।
बाबांचा एक बालभक्त । नोकरी स्वीकारी कळली मात ।
ठाकुर झाले अति दुःखित । परंतु नंतर समजले ।। ५५ ।।
तयाची आई असे म्हातारी । तिच्यासाठी करी नोकरी ।
तो भक्त येता दक्षिणेश्वरी । वदले ठाकुर तयाप्रती ।। ५६ ।।
मातेस्तव तू नोकरी करिसी । यात नसे रे दोष तुजसी ।
उगीच नोकरी करतासी । तर तोंड तुझे पाहवते ना ।। ५७ ।।
असुनही भक्त अधिकारी थोर । कुटुंबाचा ते करिती विचार ।
म्हणती कुटुंब पोसणार । कोणीतरी असला पाहिजे ।। ५८ ।।



बाबा जयाला शरद म्हणती । भक्त शरच्चंद्र चक्रवर्ती ।
सारदानंद म्हणुनी ख्याती । जयाची झाली जगामधे ।। ५९ ।।
एकदा शरद दक्षिणेश्वराला । धाकट्या भावास घेउनी आला ।
पाहुनी बाबांस आनंद झाला । म्हणती भाऊ काय तुझा ।। ६० ।।
मुलगा हा तर फार छान । दिसतो अतिशय बुद्धिमान ।
हात तयाचा हातात घेउन । म्हणती ही तर सद्‌बुद्धी ।। ६१ ।।
म्हणती शरदला अनुलक्षुन । यालाहि घेऊ काय ओढुन ।
संसारातुनि काढुनी मन । ईश्वरचरणी लावू काय ।। ६२ ।।
शरद म्हणाला हे तर छान । अवश्य घ्यावा याला ओढुन ।
ठाकुर क्षणभर विचार करुन । म्हणती आता हा नको ।। ६३ ।।
आधीच तू इकडे आला । आता जर हा दुजा घेतला ।
कष्ट होतील मातापित्याला । यास्तव ऐसे करणे नको ।। ६४ ।।
कष्टविल्या मी माउल्या बहुत । बाळे तयांची करुनी भक्त ।
पुरे जेवढे कष्ट दिलेत । आता आणिक देणे नको ।। ६५ ।।
भगवान असती करुणामय । कुटुंबाचीही पाहती सोय ।
जरि असे तयांचे मुख्य ध्येय । प्रसार करावा धर्माचा ।। ६६ ।।
बाबा पुसती एका मुलाला । का रे विवाह नाही केला ।
सैण होईन तो बोलला । लग्न करताच सांप्रत ।। ६७ ।।
यास्तव असे माझा बेत । प्रथम मी व्हावे कामजित ।
नंतर होईन विवाहित । काय वाटते आपणाला ।। ६८ ।।
रामकृष्ण देती उत्तर । कामजित तू झाल्यावर ।
गरजहि नाही पडणार । तुजला विवाह करण्याची ।। ६९ ।।
म्हणती एका भक्तालागुन । कमरेभोवती प्रयत्न करुन ।
टिकेना धोतर पडते गळुन । तथापि माझे लक्ष नसे ।। ७० ।।



एवढा वृद्ध मी होऊनही । नागडेपणाची लाज नाही ।
कोण आपणाकडे पाही । शुद्ध मुळिही त्याची नसे ।। ७१ ।।
परंतु आता कोणी बघेल । तयालाच लाज मग वाटेल ।
यासाठी मी धोतर केवळ । कसे तरी ते गुंडाळितो ।। ७२ ।।
सांग तूही माझ्यासमान । दाखविसी का नागडा फिरुन ।
भक्त म्हणाला त्यागिन वसन । जर का आपण सांगाल ।। ७३ ।।
तयाला म्हणती रामकृष्ण । धोतर डोक्यास गुंडाळुन ।
ये मग चक्कर मारून । अंगणात देवळाच्या ।। ७४ ।।
तो म्हणाला माझ्याकडुन । होणार नाही फिरणे अंगण ।
तथापि तुमच्यासमोर वसन । निश्चयाने मी त्यागू शके ।। ७५ ।।
बाबा म्हणती वदती नर । लाज न वाटे तुमच्यासमोर ।
तथापि लाज वाटते इतर । जनांसमोर नग्नपणाची ।। ७६ ।।
पाहती निजभक्ताच्या मनात । श्रद्धा वसत असे कितपत ।
प्रश्न करुनी श्रीभगवंत । श्रद्धा जोखिती तयांची ।। ७७ ।।
एकदा म्हणाले निजभक्ताला । राम अवतार म्हणतो मजला ।
काय वाटते सांग तुजला । खरे असे का स्पष्टपणे ।। ७८ ।।
भक्त म्हणाला वाटे मजला । राम कमीच लेखितो तुम्हाला ।
अवतार म्हणती ईश्वरांशाला । आपण साक्षात परमेश्वर ।। ७९ ।।
शंकराचे कराया ध्यान । तुम्ही सांगितले मजलागुन ।
तथापि मिटता माझे नयन । आपुली मूर्ती दिसत असे ।। ८० ।।
मग शिवाचे करणे ध्यान । याचे मुळीहि न राहे भान ।
तुम्हास सदाशिव समजून । मग मी ध्यान करितसे ।। ८१ ।।
हासुनी म्हणती रामकृष्ण । मी तर केसाहुनही लहान ।
तुझी चिंता वाटे महान । दूर जाहली आज ती ।। ८२ ।।



शिष्यपरीक्षा करण्याप्रती । अनेक प्रश्न ते विचारिती ।
म्हणती एका भक्ताप्रती । लक्षणे तुझी मी पाहिली ।। ८३ ।।
तव देहाच्या लक्षणावरुन । मजला निश्चित आले कळुन ।
मिळेल तुजला पुष्कळ धन । करशिल कल्याण लोकांचे ।। ८४ ।।
सांग काय तुझ्या मनात । व्हायचे का तुज श्रीमंत ।
तयांना उत्तर देई भक्त । धर्ममार्गात नको धन ।। ८५ ।।
धन तर ईश्वरलाभातला । मोठा अडथळा मानला गेला ।
काय करू मी घेउनी त्याला । कृपा करुनि धन देऊ नका ।। ८६ ।।
भक्ताचे उत्तर ऐकून । ठाकुर पावले समाधान ।
भक्तपरीक्षा करिती कसुन । सुटेना तीतून एकही ।। ८७ ।।
बाबांच्या शिष्यमंडळीत । हरीश होता सशक्त शांत ।
घरचा असे तो श्रीमंत । विवाहित होता तो शिष्य ।। ८८ ।।
ठाकुरांकडे तो असे येत । मनात वैराग्य झाले उदित ।
सेवा जपध्यान करण्यात । वेळ घालवी दक्षिणेश्वरी ।। ८९ ।।
घरची माणसे तेथे येउन । पाहती पुष्कळ समजावुन ।
पत्नीने सोडिले अन्नसेवन । रागावुनी पाहती तयावर ।। ९० ।।
तयाची परीक्षा पाहावी म्हणुन । तयाला म्हणती रामकृष्ण ।
पत्नी करितसे दु:ख महान । का न भेटसी तिजलागी ।। ९१ ।।
हरिश बोलला भगवान । हे दयेचे नसेचि स्थान ।
नातरि मोहात सापडून । विसरेन ध्येय क्षणामधी ।। ९२ ।।
हरीशचे भाषण ऐकुन । प्रसन्न झाले रामकृष्ण ।
गोष्ट ही इतरांस सांगुन । प्रशंसा करिती हरीशची ।। ९३ ।।
जशी इतरांची परीक्षा घेती । स्वत:सही ते परीक्षू देती ।
भक्तजनांना सदा सांगती । परीक्षा करावी साधूची ।। ९४ ।।



साधुजनाला दिवसा पहावे । रात्रीही त्याला निरीक्षावे ।
नंतर त्यावर विश्वासावे । उत्तीर्ण झाल्यास परीक्षा ।। ९५ ।।

उपदेश करी जो दुसऱ्याप्रत । तयाची वागण्याची रीत ।
यात असे का तफावत । हेही पाहावे शिष्यांनी ।। ९६ ।।

फरक आढळता बोलण्यात । आणि साधूच्या वर्तनात ।
नका विश्वास ठेवू किंचित । असल्या ढोंगी साधूवर ।। ९७ ।।

रामकृष्णांचे शिष्य शिक्षित । पाश्चात्त्यविद्याविभूषित ।
चिकित्सा केल्यावाचुनी स्वस्थ । न राहती ते कदापिही ।। ९८ ।।

दृढ कराया भक्तिविश्वास । ठाकुरांनाहि देती त्रास ।
बुद्धिमंत तयांचे शिष्य । समाधान होता विश्वासती ।। ९९ ।।

ठाकुरांना होते माहित । शिष्य त्रास जो देतात ।
सद्धेतुमूलक असे समस्त । म्हणुनी साहती प्रसन्न मने ।। १०० ।।

शिष्य उतरला परीक्षेत । बाबा काळजी वाहती समस्त ।
मग शिष्याचा धरुनी हात । सत्पथ तयाला दाखविती ।। १ ।।

शिष्य घेताच पारखून । त्यांच्यावर प्रेम विलक्षण ।
झटती बाबा मनापासुन । तयांचे कल्याण करावया ।। २ ।।

रामकृष्णांचे बाल्यापासुन । असे प्रेमळ अंत:करण ।
चित्त सहानुभूतिसंपन्न । असाधारण ठाकुरांचे ।। ३ ।।

अभूतपूर्व तपस्येनंतर । आरुढ होता गुरुपदवीवर ।
सहानुभूतिला आला पूर । क्लेश दूर करू म्हणती ।। ४ ।।

जे जे आपण घेतले अनुभव । ते ते इतरांस मिळावे सर्व ।
शिष्यस्नेह असे अपूर्व । इच्छिती पूर्णत्व द्यावया ।। ५ ।।

पारमार्थिक हिताबरोबर । ऐहिकाचाही करिती विचार ।
एका जणाचे उत्पन्न फार । कमी झालेले समजले ।। ६ ।।



इतर भक्तांना बाबा म्हणती । मदत करा रे तयाप्रती ।
कोणाची ठीक नसता प्रकृती । काळजी करिती रामकृष्ण ।। ७ ।।
त्यांच्या दर्शना येती भक्त । कोण गरीब कोण श्रीमंत ।
कोण पायी कोण गाडीत । येती माहित असे त्यांना ।। ८ ।।
भाड्याचीही नसता ऐपत । तयाला श्रीमंताच्या गाडीत ।
बसवुनि देती श्रीभगवंत । सांगती न्यावे सांभाळुन ।। ९ ।।
कुणाला जाण्यास नौकेतुन । पैसाच नाही ते पाहुन ।
भाडे तयाला देती आपण । अंत:करण द्रयार्द्र त्यांचे ।। ११० ।।
जमले असता शिष्यजन । सकळ चौकशी करिती पूर्ण ।
कोण करितसे ध्यान भजन । जप कोणाचा कसा चाले ।। ११ ।।
भक्तांस वाटे दृढ विश्वास । प्राप्त कराया दर्शन विशेष ।
उच्च अवस्था मिळवावयास । हट्ट धरावा बाबांकडे ।। १२ ।।
ठाकुर जर का कृपा करिती । काय कठिण मग अनुभूती ।
परंतु बाबा अजमाविती । तळमळ मनाची भक्ताच्या ।। १३ ।।
आस्था दिसता भक्तीप्रती । काय करावे बाबा सांगती ।
अवस्था मिळेतो भक्ताप्रती । चैनच पडेना बाबांना ।। १४ ।।
निरनिराळ्या भक्तजनांना । पाहुनी त्यांची योग्यता भावना ।
प्राप्त करुनी देती नाना । अवस्था तयांना जगद्गुरू ।। १५ ।।
पाहुनि म्हणती बालभक्ता । का वाटे मज यांची चिंता ।
एकहि पैसा खिशात नसता । खर्च कराया मजसाठी ।। १६ ।।
कोणी न येता दोन दिवस । प्राण होतसे कासाविस ।
कधी एकदा भेटेन त्यास । ऐसे होउनि जात असे ।। १७ ।।
एकच असे त्याचे कारण । येथे असे शुद्ध सत्त्वगुण ।
विटाळ झाला नाही अजुन । तयांना कामकांचनाचा ।। १८ ।।



तयांचे लक्ष जर लागेल । ईश्वर तयांना लाभेल ।
यास्तव मज लागे तळमळ । कल्याणाची या भक्तांच्या ।। १९ ।।

हाजरा एकदा मजला म्हणाला । कसा तुमचा स्वभाव झाला ।
तुम्हास चिंता पाहिजे कशाला । एवढी या युवकांची ।। १२० ।।

आपण आहात परमहंस । समाधि लावावी अहर्निश ।
असल्या उठाठेवी कशास । निष्कारण तुम्हास असाव्या ।। २१ ।।

तेव्हा वाटले माझ्या मनाला । हाजरा नाही खोटे बोलला ।
काय करावयाचे मजला । काळजी करुनि या मुलांची ।। २२ ।।

परि जाता मंदिराबाहेर । जगन्माता दाखवी समोर ।
एवढे मोठे कलकत्ता शहर । लोक तयातिल दाखविले ।। २३ ।।

सारे जन कामकांचनात । दिसले गटांगळ्या खातात ।
दु:खे दारुण भोगतात । पाहुनी दया मग उद्‌भविली ।। २४ ।।

वाटले अपार कष्ट सोसुन । दारुण दु:खे दूर करुन ।
करावे जनांचे कल्याण । कष्ट कितीही पडोत मग ।। २५ ।।

शुद्ध सात्त्विक बालभक्त । तयांना जनकल्याणार्थ ।
बोध करुनी करावे समर्थ । मार्गदर्शनार्थ जनतेच्या ।। २६ ।।

आपुल्या शिष्यमंडळींवर । अपार प्रेम करिती ठाकुर ।
आणि असती इतर नर । त्यावर अपार दया त्यांची ।। २७ ।।

कितिही कोणास असोत दुर्गुण । असोत कितिही दोष दारुण ।
तरिही न करिती अवमान । न करिती कधिही तिरस्कार ।। २८ ।।

चुका ज्या घडती जनांकडुन । म्हणती ते मनाचे दुर्बलपण ।
ते अज्ञान टाकिता काढुन । कृपा होतसे ईश्वराची ।। २९ ।।

एकदा मल्लिक मनमोहन । सांगे बाबांकडे येउन ।
पुत्र माझा पावला मरण । कर्ता सवरता एकुलता ।। १३० ।।



पुत्रनिधनाचे वृत्त ऐकुन । पाहुनी तयाचे म्लान वदन ।
करुणामय श्रीरामकृष्ण । जाहले दु:खित अंतरी ।। ३१ ।।
अर्धबाह्यदशा प्राप्त होउन । ठाकुरांनी केले गायन ।
समाधी जाताच उतरून । करिती सान्त्वन तयाचे ।। ३२ ।।
तयास म्हणती रामकृष्ण । पुत्रजन्म या देहापासुन ।
यास्तव तनय पावता मरण । आठवण त्याची राहणार ।। ३३ ।।
तथापि जयाने आपुला भार । सोपविला आहे ईश्वरावर ।
येता कसाही प्रसंग घोर । तो नर धीर राखितसे ।। ३४ ।।
लाटा उसळता गंगानदीत । मचव्यांची त्रेधा उडे बहुत ।
वाटे आता ते बुडतात । एखाद्यात तर पाणी शिरे ।। ३५ ।।
तथापि लाटा येता गलबत । दोन चार हेलकावे खात ।
आणि लगेच होतसे शांत । मार्ग आपुला चालतसे ।। ३६ ।।
परि गलबतासहि दोन चार । हेलकावे मात्र पडणार ।
नाही टाळता ते येणार । तशी गत असे भक्तांची ।। ३७ ।।
बा रे संसार अनिवार । आशेने कराया पाहे नर ।
होता लग्न मुले चार । समाधान फार वाटतसे ।। ३८ ।।
काही दिवस तो बरा वाटला । मग कोणीतरी बीमार झाला ।
कोणाचा तर धंदा बसला । सुटली नोकरी कोणाची ।। ३९ ।।
भानगडी या सुरू होउनी । संसार काय हे येई कळुनी ।
तथापि त्यातच अडकुनी । बसला सुटून जाता न ये ।। १४०।।
याप्रमाणे उपदेश करुन । अनित्यता भवाची पटवुन ।
मणिमोहनाचे समाधान । करुनी तयाला शांतविले ।। ४१ ।।
तो वदे माझ्या हृदयात । ज्वाला पेटता आलो धावत ।
वाटले होणार नाही शांत । आल्यावाचुनी या ठायी ।। ४२ ।।



गरिब जनांची दु:खे पाहुन । कळवळती श्रीरामकृष्ण ।
बुभुक्षिताला मिळता अन्न । आनंद तयांना वाटतसे ।। ४३ ।।
येता कोणीही भिक्षेकरी । देववियी ते काहीतरी ।
एक दिवस दक्षिणेश्वरी । उठली होती पंगत ।। ४४ ।।
झाल्यावर ते पंक्तिभोजन । उरले होते जे का अन्न ।
भिकाऱ्यांना टाकिता वाटुन । गर्दी फारच वाढली ।। ४५ ।।
गर्दीत एका म्हातारीला । अन्नाचा कण नाही मिळाला ।
भिकाऱ्यांचा समुदाय गेला । रडत बैसली म्हातारी ।। ४६ ।।
पहारेकरी आला तिकडुन । म्हातारीला धक्के देउन ।
देता झाला हाकलून । विषाद वाटला बाबांला ।। ४७ ।।
म्हणती जगन्माते आई । काय अवस्था तुझ्या गृही ।
वृद्धेस अन्न मिळाले नाही । धक्केच खावे लागले ।। ४८ ।।
म्हातारीची करुणा येउन । रुदन करिती रामकृष्ण ।
त्रैलोक्यबाबूला वर्तमान । कळता व्यवस्था लागली ।। ४९ ।।
म्हातारीप्रति बोलावुन । पोटभर खाऊ घातले अन्न ।
एक रुपया दिधला दान । पाहुनी आनंद बाबांला ।। १५०।।
आनंदाच्या त्या भरात । जगदंबेची स्तुती करित ।
नाचु लागले श्रीभगवंत । एवढी करुणा भूतमात्री ।। ५१ ।।
एकदा भक्तजनांना ठाकुर । सांगती वैष्णव धर्मावर ।
थोडक्यात त्या मताचे सार । तीन गोष्टींमधे असे ।। ५२ ।।
नामावरती प्रेम महान । करावे वैष्णवांचे पूजन ।
जीवमात्रावर दया पूर्ण । गोष्टी तीन या पाळाव्या ।। ५३ ।।
नाम आणि श्रीभगवान । अभिन्न असती हे जाणुन ।
परमेश्वराचे नामस्मरण । करित असावे सदोदित ।। ५४ ।।



भक्त भगवान वैष्णव कृष्ण । एक असती हे समजुन ।
साधुसत्पुरुषांचे सेवन । श्रद्धा ठेवुनी करावे ।। ५५ ।।
श्रीकृष्णाचा जगत्संसार । असे सर्व हे चराचर ।
यास्तव दया जीवावर । म्हणताच समाधी लागली ।। ५६ ।।
अर्धबाह्यदशा प्राप्त होउन । स्वत:शीच करिती भाषण ।
कीटकानुकीटक क्षुद्र असुन । काय दया तू दाखविसी ।। ५७ ।।
असा कोण तू गेलास लागुन । असे का तुजवर अवलंबुन ।
जगतातिल जिवांचे जीवन । की त्वा दया दाखवावी ।। ५८ ।।
जिवावर तू दया करावी । काय एवढी तुझी थोरवी ।
शिवज्ञानाने करीत जावी । स्वहितार्थ सेवा जिवांची ।। ५९ ।।
शिवज्ञानाने जीवसेवा । उद्‌गार जिवांच्या गौरवा ।
यात प्रेमाचा अपार ठेवा । उदारतेचे रहस्य असे ।। १६० ।।
शिवज्ञानाने जीवसेवा । जगतास मिळाला मंत्र नवा ।
की हा अमृताचा ठेवा । जनास मेवा मिळाला हा ।। ६१ ।।
जीवमात्रावर करणे प्रीती । आजवर ही मानिती नीती ।
दया करणे जन समजती । पुण्यकारक गोष्ट असे ।। ६२ ।।
आता जिवांना शिव मानुन । सेवा करणे झाले पूजन ।
मोक्षाचे ते झाले साधन । झाले अनुष्ठान तपश्चर्या ।। ६३ ।।
श्रीरामकृष्ण परमहंस । देती आधुनिक जगतास ।
कल्याण जनांचे करावयास । संदेश बहुमोल सेवेचा ।। ६४ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६५ ।।
।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा चोविसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय पंचविसावा

मन्मानसहंसविशेषा । श्रीरामकृष्ण परमहंसा ।
निजजनमानसकमलाधीशा । श्रीजगदीशा नमोऽस्तुते ।। १ ।।

रामकृष्णांचा सहवास । हेच शिक्षण असे विशेष ।
तयांच्या प्रत्येक उक्तिकृतीत । असे पूर्णार्थ भरलेला ।। २ ।।

तयांचे सामान्य आचरण । नसावे कधीही अर्थहीन ।
त्यांच्याकडे जे येती जन । मिळविती शिक्षण अनायासे ।। ३ ।।

प्रथमपासुनी प्रेम करुन । आपुलासा टाकिती करुन ।
गोड शब्दांनी बोध करुन । सिद्धांत वाक्य उपदेशिती ।। ४ ।।

स्वभावाचे वैगुण्य जाणुन । दूर कराया तो अवगुण ।
कधी पाहती रागावुन । मृदु वचनांनी कधी बोधिती ।। ५ ।।

तेथे येती जे भक्तजन । निरनिराळ्या धर्मांचे असुन ।
असुनही मते पंथ भिन्न । समाधान सर्व ते पावती ।। ६ ।।

म्हणती संसारी माणसाला । जयाने सर्वस्व त्याग केला ।
तो तर भजणार ईश्वराला । काय पौरुष त्यात असे ।। ७ ।।

परंतु असुनही संसारी । नामस्मरण जो सदा करी ।
त्याचीच मानावी मातब्बरी । खरी बहादुरी त्याची असे ।। ८ ।।

संसाराची कर्मे करुन । ईश्वराकडे जो लावी मन ।
तो तर किल्ल्यामधे राहुन । लढाई करितो समजावे ।। ९ ।।

बाहेर कितिही असो सैन्य । न चाले तयाचे आक्रमण ।
तैसा संसार किल्ल्यासमान । सुरक्षित स्थान समजावे ।। १० ।।




ईश्वराकडे लाविता मन । करिता भगवन्नामस्मरण ।
कितिही संकटे येवोत दारुण । तरिही तयांचे चालेना ।। ११ ।।
जेव्हा बालभक्तांना सांगती । त्यागवैराग्याची महती ।
गृहस्थ कोणी सन्निध नसती । तेव्हाच करिती उपदेश ।। १२ ।।
आपुल्या तेजस्वी वाणीतुन । सांगती तयांना समजावुन ।
त्याग वैराग्य असल्यावाचुन । मिळेना कदापी परमेश्वर ।। १३ ।।
असता वासनेचा लेश । दर्शन होउ शकेना तयास ।
ईश्वरलाभाची इच्छा जयास । वासना त्यजावी तयाने ।। १४ ।।
असता भोगवासना स्वार्थ । संसारत्यागात नाही अर्थ ।
साधावयाप्रती परमार्थ । वासनाक्षय अवश्य असे ।। १५ ।।
रामकृष्ण सांगती वरचेवर । श्रद्धा असल्यावाचुनी थोर ।
साधकाची नाही होणार । उन्नती धर्ममार्गामधे ।। १६ ।।
जर निष्कामबुद्धी ठेवुन । ईश्वरचरणी मन लावुन ।
कर्मे करिती संसारीजन । तर भोगवासना निरसेल ।। १७ ।।
भोगवासना नष्ट होई । तेव्हाच हृदयी वैराग्य येई ।
मग मन आपोआप जाई । तयाचे परमेश्वराकडे ।। १८ ।।
कळेना श्रद्धेचा यथार्थ अर्थ । भलताच समजती काही भक्त ।
विश्वासती प्रत्येक गोष्टीत । कोणत्याही मनुजावर ।। १९ ।।
धर्मभय दावुनी वाण्याप्रत । एकाने घमेले घेतले विकत ।
घरी जाउनी पाहतात । तव ते दिसले फुटलेले ।। २० ।।
रामकृष्णांना कळता मात । तिरस्कारुनी तयाप्रत ।
म्हणती ठीक रे असणे भक्त । विचार परि का सोडावा ।। २१ ।।
काय वाण्याने आपुले दुकान । धर्म कराया मांडले म्हणुन ।
न बघता त्यावर विश्वासुन । घमेले घरी त्वा आणावे ।। २२ ।।



श्रीरामकृष्ण परमहंस यांचे गृहस्थ शिष्य



श्री. 'म' (महेंद्रनाथ गुप्त)



नाग महाशय



बलराम बसू



गिरीशचंद्र घोष



शंभुचरण मल्लिक



रामचंद्र दत्त



लक्ष्मीदेवी



गोपालच्या आई (अघोरमणी देवी)



सुरेंद्रनाथ मित्र




योगिन मा



गोलापमा (गोलाप सुंदरी देवी)



गौरी मा



संन्यस्तशिष्यषोडशी – श्रीरामकृष्ण परमहंस यांचे सोळा संन्यस्त शिष्य

१. स्वामी विवेकानंद
२. स्वामी ब्रह्मानंद
३. स्वामी योगानंद
४. स्वामी प्रेमानंद
५. स्वामी निरंजनानंद
६. स्वामी शिवानंद
७. स्वामी सारदानंद
८. स्वामी रामकृष्णानंद
९. स्वामी अभेदानंद
१०. स्वामी अद्‌भुतानंद
११. स्वामी तुरीयानंद
१२. स्वामी अद्वैतानंद
१३. स्वामी त्रिगुणातीतानंद
१४. स्वामी सुबोधानंद

ऐसे पुनरपि करू नकोस । विकत घेणे असता जिन्नस ।
चार दुकाने फिरुनी सरस । आढळेल तेथुनी आणावा ।। २३ ।।
श्रद्धा असणे अतिशय छान । तथापि तुम्हाला माझे कथन ।
सदसद्विचार गुंडाळुन । कोणते कर्म करू नका ।। २४ ।।
रामकृष्ण नेहमी सांगती । लज्जा घृणा आणिक भीती ।
तीन गोष्टी या आड येती । सिद्धीच्या म्हणुनी त्यागाव्या ।। २५ ।।
मजला कोणी नावे ठेविल । अथवा कोणी चेष्टा करिल ।
सोडुनि विचार याचा सकळ । भक्ति करावी ईश्वराची ।। २६ ।।
मध्यरात्रीला एक दिवस । भरती येउनी समुद्रास ।
गंगानदीच्या प्रवाहास । चालली भिंत पाण्याची ।। २७ ।।
प्रवाहावर विरुद्ध दिशेने । पाण्याच्या भिंतीचे चालणे ।
स्वच्छ पडलेले होते चांदणे । दृश्य ते असे दर्शनीय ।। २८ ।।
भरतीचा आवाज ऐकुन । बाबा उठले बिछान्यावरुन ।
म्हणती चला रे सगळेजण । गंमत पाहण्या भरतीची ।। २९ ।।
घाटावर ठाकुर जाउनी । प्रवाहाविरुद्ध ती भिंत पाहुनी ।
आनंदाने बेहोश होउनी । बालकासारिखे नाचती ।। ३० ।।
लाट ती जाता ओसरून । रामकृष्णांना आले भान ।
भक्तांस म्हणती कशी छान । मजा पाहिली लाटेची ।। ३१ ।।
तयांना सांगती भक्तजन । आलो धोतरे सावरून ।
तोवर लाट गेली निघुन । नाही दिसली ती आम्हाला ।। ३२ ।।
बाबा म्हणती धिक्कार करुन । यायचे होते धोतराविण ।
लाट थांबेल काय म्हणुन । नेसण्यासाठी धोतरे ।। ३३ ।।
कधी आपुल्या शिष्यांप्रती । चर्चेसाठी विषय देती ।
आपण अलिप्त राहुन पाहती । गंमत वादविवादाची ।। ३४ ।।



ज्याला जेवढे असे माहित । सांगता यावे व्यवस्थित ।
वादविवाद लावण्यात । हेतू हा श्रीरामकृष्णांचा ।। ३५ ।।
कोणी चुकीचे करिता विधान । तयाचे बोलणे थांबवून ।
चूक देती ते दाखवून । वास्तव तयाला कळावया ।। ३६ ।।
कधी चर्चेत घेती भाग । वादास तर मग चढे रंग ।
कठिण विषय होती सरलांग । गूढ तत्त्वेही स्पष्ट होती ।। ३७ ।।
इतर कोणी कवी असती । तत्त्वज्ञानात कुणाची गती ।
विज्ञानामधे काही रमती । राहती स्वविषयात ते दंग ।। ३८ ।।
इतर विषयांत ते रस न घेती । वेड्यासारिखे वर्तन करिती ।
विक्षिप्तपणाने वावरती । व्यवहारी ते जगताच्या ।। ३९ ।।
तशी बाबांची गोष्ट नव्हती । ईश्वरचिंतनी सदा रमती ।
प्राप्त होता सामान्य स्थिती । लक्ष देती व्यवहाराकडे ।। ४० ।।
एकजण पुष्कळ तूप खाई । तयाला म्हणती कमी घेई ।
निद्राधीन पुष्कळ काळ होई । तयाला म्हणती कमी करी ।। ४१ ।।
वैद्यकी शिकतसे एकजण । त्याला सांगती सोड शिक्षण ।
देणे एकेक वासना सोडुन । ईश्वरलाभार्थ अवश्य असे ।। ४२ ।।
वासनांचा त्याग करुन । आपण मुक्त करावे मन ।
अधिकाधिक तुम्ही गुरफटुन । जाळ्यात पडता मायेच्या ।। ४३ ।।
असती भक्तजन संसारी । म्हणती असा रे काटकसरी ।
कधिही होऊ नये ऋणकरी । शक्त्यनुसार करा खर्च ।। ४४ ।।
वस्तु तयांच्या खोलीतिल । जेथल्या तेथे असती सकळ ।
तयांची खोली असे निर्मळ । खपेना तयांना गलिच्छता ।। ४५ ।।
ठाकुरांच्या या गुणांमुळे । सहवासात येती जे सगळे ।
त्यांना नेटकेपणा कळे । मावळे गबाळेपण त्यांचे ।। ४६ ।।

एकदा दक्षिणेश्वराहुन । बलराम बसूच्या गृहालागुन ।
जावया निघाले रामकृष्ण । फाटकापर्यंत पोहोचले ।। ४७ ।।

विचारती ते भक्ताप्रत । घेतला काय पंचा सोबत ।
तो म्हणे विसरलो खोलीत । दुसरा देईल बलराम ।। ४८ ।।

ठाकुर म्हणती रागावुन । बलराम देईल काय म्हणुन ।
म्हणेल भिकारी आले कोठुन । तयास त्रास का द्यावा ।। ४९ ।।

आताच जाई तू परतुन । पंचा आण तू खोलीतुन ।
पंचा आणता करिती गमन । टापटीप त्यांची अशी असे ।। ५० ।।

म्हणती असती जे श्रीमंत । बरोबर नेती वस्तु समस्त ।
तयांच्यापासुनी कोणाप्रत । किंचित त्रास होत नसे ।। ५१ ।।

परंतु कोणी अव्यवस्थित । भिकारड़ा जेव्हा असे येत ।
तेव्हा परोपरीने होत । त्रासच घरच्या सकलांना ।। ५२ ।।

आणखी त्यांची असे गंमत । जेव्हा काहीच नसते घरात ।
तेव्हाच नेमके उपस्थित । करंटे लोक व्हावयाचे ।। ५३ ।।

शिष्यांची नीट परीक्षा करुन । योग्य दिशेने देती शिक्षण ।
गहन विषयही समजावुन । सोप्या भाषेत सांगती ।। ५४ ।।

व्यवहारातिल एक दोन । मार्मिक दृष्टांत तयाला सांगुन ।
वेदान्ताचे हृद्‌गत गहन । प्रमेये कठिण समजाविती ।। ५५ ।।

श्रोतयांचा गोंधळ उडेल । ऐसे कधिही न बोलती बोल ।
असूनहि विषय अत्यंत सखोल । सोपा करिती कळेल असा ।। ५६ ।।

प्रश्न करिता कोणी भक्त । मथितार्थ आणुनी लक्षात ।
सांगती तयाला सिद्धांत । स्पष्ट करिती दृष्टांताने ।। ५७ ।।

श्रोत्यांस सांगती रामकृष्ण । एका गोष्टीत घेणे जाणुन ।
तर तुम्ही या ठिकाणी येउन । करावे श्रवण श्रद्धेने ।। ५८ ।।



परंतु वादविवादा करुन । भले मोठे व्याख्यान ऐकुन ।
घ्यायचे असेल समजुन । तर जा केशवचंद्राकडे ।। ५९ ।।
रामकृष्ण म्हणती आईवर । भक्ताने जर टाकिला भार ।
तर आईच तयाचे पाहे समग्र । अंतरात वास्तव्य करोनिया ।। ६० ।।
ती स्वत:च त्याच्याकडुन । बोल घेतसे बोलवुन ।
ज्ञानभांडार तयाचे शून्य । होउ देइना कधीही ती ।। ६१ ।।
कितिही खर्च तो करो ज्ञान । आई ज्ञानाच्या राशी आणुन ।
भरतसे तयाचे अंत:करण । यास्तव ते रिते होत नसे ।। ६२ ।।
कारखान्यातिल शिपाई जन । प्रश्न करिती मजलागुन ।
संसारामधेही राहुन । कसा करावा धर्मलाभ ।। ६३ ।।
इतुक्यात माझ्या नयनास । उखळाचेच दिसले दृश्य ।
सांगुनी ते उदाहरण तयांस । दिधले उत्तर प्रश्नाचे ।। ६४ ।।
स्त्रिया कांडत असता भात । बोलतात त्या आपसांत ।
मुसळापासुनी आपुला हात । सांभाळिती सावध राहती ।। ६५ ।।
तेवि असताहि संसारात । सावधगिरी असावी मनात ।
मग त्या पुरुषास बंधनात । सापडण्याची भीती नसे ।। ६६ ।।
संसारात असुनही दक्ष । ठेवावे ईश्वराकडे लक्ष ।
प्रपंचाचे होउ नये भक्ष्य । अलिप्तपणाने वर्तावे ।। ६७ ।।
द्यावयाचा असता दृष्टांत । आई दाखवी मजप्रत ।
प्रसंगास अनुरूप अत्यंत । चित्रे माझ्या डोळ्यापुढे ।। ६८ ।।
दृष्टांत असती समर्पक । सहजासहजी देती अनेक ।
समाधान पावती लोक । संशय समूळ जात असे ।। ६९ ।।
सांख्यशास्त्रातील वाद । प्रकृति पुरुषांचा संबंध ।
सहजपणे करिती विशद । कळेल ऐसा सकलांना ।। ७० ।।



प्रकृति करिते कामे सारी । पुरुष अकर्ता काही न करी ।
साक्षिरूपाने सकळांवरी । देखरेख मात्र त्याची असे ।। ७१ ।।
तथापि यातही असे गंमत । एकटी प्रकृती नसे समर्थ ।
पुरुषावाचुनि प्रकृतिप्रत । करिता येइना काहीही ।। ७२ ।।
ऐकणारे वकील डॉक्टर । छोटे मोठे ऑफीसर ।
कोणी करणारे व्यापार । आणिक कोणी विद्यार्थी ।। ७३ ।।
कोणास काहीच नाही कळले । रामकृष्णांनी ते जाणिले ।
म्हणती येथे आश्चर्य कसले । विलक्षण यात काही नसे ।। ७४ ।।
लग्नघरी जो असे घरधनी । नुसता लोडास बसे टेकुनी ।
गुडगुडी ओढित आज्ञा देउनी । स्वस्थ बसलेला दिसत असे ।। ७५ ।।
तथापि बिचारी मालकीण । तिच्या जिवाला नसे चैन ।
क्षणात पाकगृहात जाउन । व्यवस्था तेथील पाहतसे ।। ७६ ।।
क्षणात जाउनी कोठीघरात । सांगे जिन्नस आणा विकत ।
क्षणात जाउनी मंडपात । स्वागत करितसे आगतांचे ।। ७७ ।।
घरधन्याकडे मग येउन । अहवाल देई ती संपूर्ण ।
घरधनी मान हालवून । म्हणे ठीक, हूं, चालू द्या ।। ७८ ।।
तेचि प्रकृतीच करिते सकळ । पुरुष साक्षी मात्र केवळ ।
असा विश्वाचा चाले खेळ । मेळे प्रकृति पुरुषांच्या ।। ७९ ।।
इतुके स्पष्ट केल्यावर । प्रमेय असुनी कठिण फार ।
समजू शकले सकळ नर । संबंध प्रकृति पुरुषाचा ।। ८० ।।
श्रोत्यात सर्व तऱ्हेचे लोक । उदाहरणे देउनी अनेक ।
समजू शकती सकळीक । ऐसे अलौकिक प्रतिपादन ।। ८१ ।।
म्हणती वेदोपनिषदे सांगती । ब्रह्म आणि ब्रह्मशक्ती ।
पुरुष प्रकृती एक असती । नसती भिन्न पदार्थ हे ।। ८२ ।।



जैसा सर्प कधी चाले । कधी घालितसे वेटोळे ।
स्वस्थ अणि सरकता वेगळे । नसती सर्प एक असे ।। ८३ ।।
पुरुषभाव स्वस्थ बसुन । तेथवा पुरुषात प्रकृती लीन ।
काही एक कार्य उत्पन्न । पुरुषभावात होत नसे ।। ८४ ।।
तोच सर्प जैसा चालत । तैसा प्रकृतिभाव असत ।
प्रकृति जई असे कार्यरत । कार्योत्पत्ती तई होई ।। ८५ ।।
एक भक्त मग प्रश्न करी । जर असे मायाशक्ती ईश्वरी ।
ईश्वरामधे ती वास करी । सर्वदा जर हे मानावे ।। ८६ ।।
तर आमुच्यासारखा काई । मायाबद्ध असे ईश्वरही ।
बाबा म्हणती तशी नाही । गोष्ट परमेश्वराची ।। ८७ ।।
सर्पमुखात विष असुन । त्याच मुखाने करी भक्षण ।
परि विषबाधा तयालागुन । कदापिही होत नसे ।। ८८ ।।
तथापि साप जयाला चावे । तत्काळ तो नर मृत्यू पावे ।
तद्वत आपण समजावे । मायाबद्ध नसे ईश ।। ८९ ।।
एकाजणास लागला नाद । करी वेदान्तावरी वाद ।
करू लागला चर्चा बहुविध । कळले श्रीरामकृष्णांना ।। ९० ।।
तो येता घेण्यास दर्शन । तयाला म्हणती रामकृष्ण ।
वेदान्तचर्चा तू निशिदिन । करितोस ऐसे ऐकिले ।। ९१ ।।
त्याला काही नाही हरकत । पण काय असे रे वेदान्तात ।
जगन्मिथ्या ब्रह्म सत्य । एवढेच अथवा अन्य असे ।। ९२ ।।
प्रथम आपण वचन ऐकिले । मनात सतत ते घोळविले ।
मिथ्यास पाहिजे त्यागिले । केले ध्यान सद्वस्तुचे ।। ९३ ।।
वेदान्ततत्त्व जाणावयास । श्रवण मनन निदिध्यास ।
साधनेविण न येति कामास । चर्चा वादविवादादी ।। ९४ ।।



न करिता मिथ्यावस्तुचा त्याग । आणिक घेता विषयोपभोग ।
नुसते श्रवण वाचन सांग । उपयोगास येतील का ।। ९५ ।।
रामकृष्णांचे दिव्य वचन । ऐकुनी भक्त करी कथन ।
तयांनी नयनी घातले अंजन । माझे लोचन उघडिले ।। ९६ ।।
असे वेदान्तचर्चा वाचन । सत्य मिथ्या कळावे म्हणुन ।
मग करावे लागे साधन । व्हावयासाठी आत्मलाभ ।। ९७ ।।
साधे सोपे दृष्टांत देउन । विशद करिती तत्त्वे गहन ।
काळजी करिती रामकृष्ण । सकळांस भाषण कळावे ।। ९८ ।।
सांगती वारि ॲक्वा पाणी । जल वॉटर म्हणती कोणी ।
पदार्थ एकमात्र असुनी । नामे बहुत असती तया ।। ९९ ।।
त्यापरि कोणी ईश्वराला । म्हणती राम गॉड अल्ला ।
एकाच सच्चिदानंदाला । बाहती अनेक नामांनी ।। १०० ।।
तोच भरलेला जगतात । सर्व प्राण्यांत मनुष्यांत ।
उशा गाद्यांच्या सर्व खोळींत । जसा कापुस भरला असे ।। १ ।।
कोणी कुरुप अथवा सुरुप । कोणी रंक असो वा भूप ।
भरला सच्चिदानंद अमाप । सुष्टदुष्टात सारखा ।। २ ।।
एकदा प्रश्न करी भक्त । ईश्वर पाहतो सकळांप्रत ।
विद्यमान असुनही नाही दिसत । कधिही कोणास हे कसे ।। ३ ।।
सांगती चोरकंदिल घेउन । पहारेकरी पाहे जन ।
अंधारात परंतु आपण । दिसू शकेना कोणाला ।। ४ ।।
तथापि तयाने स्वत:वर । पाडताच प्रकाश सत्वर ।
तयाला पाहू शकती नर । त्यापरी आहे ईश्वराचे ।। ५ ।।
पाहतो जरी तो सकलांस । तरिही दिसेना कोणास ।
कृपा करुनी जर प्रकाश । पाडला त्याने स्वत:वर ।। ६ ।।



तरच ईश्वराचे दर्शन । घेऊ शकती सभाग्य जन ।
शेवाळाने जैसे जीवन । झाकले म्हणुनी दिसत नसे ।। ७ ।।
हवे पाणी आपणाला । तर शेवाळ करावे बाजूला ।
तेवि मायापट हा पडला । दिसेना त्यामुळे परमेश्वर ।। ८ ।।
पाहावयाचा जर ईश्वर । मायापट हा करावा दूर ।
माया नाहिसी होता सत्वर । जगदीश दर्शन होत असे ।। ९ ।।
मायेस जाणल्याबरोबर । नष्ट होतसे ती सत्वर ।
मालक उठता जैसा चोर । सत्वर पळुनी जात असे ।। ११० ।।
रामकृष्ण असती सांगत । सहस्र जन्मांचे पाप समस्त ।
ईश्वरदर्शन होताच प्राप्त । एका क्षणात नष्ट होई ।। ११ ।।
त्यावर बोलला एक भक्त । कैसी पटावी मज ही मात ।
गुरुदेव म्हणती असे गुहेत । अंधार हजारो वर्षांचा ।। १२ ।।
तेथे दीपक नेता क्षणात । अंधार नाहिसा होई समस्त ।
तैसी ईशदर्शनाची मात । पापपर्वत भस्म करी ।। १३ ।।
एक म्हणाला गुरुदेव । कसा संभवे सोऽहंभाव ।
शिवस्वरूप होतसे जीव । सांगावे कवणया प्रकारे ।। १४ ।।
सांगती तयाला श्रीठाकुर । यात काय नवल फार ।
कोणी एखादा जुना नोकर । करिता चाकरी धन्याची ।। १५ ।।
पाहुनी तयाची कामगिरी । मालक होता खूष भारी ।
बसवुनी तयाला शेजारी । इतर जनांना सांगतसे ।। १६ ।।
याच्यात आणि माझ्यात । भेद मानू नका किंचित ।
असावे याच्याहि आज्ञेत । आजपासुनी सर्वांनी ।। १७ ।।
त्याप्रमाणे श्रीभगवान । प्रेमभक्तीने प्रसन्न होउन ।
भक्तास विभूतिसंपन्न । करुनी बसविती आसनावर ।। १८ ।।



कसे जाणावे पुसे भक्त । बद्ध मुमुक्षू आणि मुक्त ।
उत्तर देती श्रीभगवंत । मासे तीन प्रकारचे ।। १९ ।।

कोळ्याच्या जाळ्यात सापडुन । भिन्न प्रकारे वर्तती मीन ।
काही तसेच राहती पडुन । कळेना संकटी सापडलो ।। १२० ।।

काही सुटाया करिती प्रयत्न । तथापि मार्ग येइना दिसुन ।
काही बहाहर जाळे तोडुन । जाती निसटुनी तत्काळ ।। २१ ।।

तेवि या प्रपंचपाशात । असती बद्ध मुमुक्षू मुक्त ।
समाधान पावला भक्त । ऐकुनी उत्तर ठाकुरांचे ।। २२ ।।

भक्त म्हणाला परमेश्वर । साकार असे वा निराकार ।
ठाकुर तयाला देती उत्तर । निराकार साकार तो असे ।। २३ ।।

एकच पदार्थ बर्फ नीर । पाण्यास परी नसे आकार ।
बर्फ घनवट साकार । तेवी ईश्वर समजावा ।। २४ ।।

अखंड सच्चिदानंदात । भक्तिप्रेमाचे लागता शीत ।
ठिकठिकाणी उपजतात । हिमवत स्वरूपे साकार ।। २५ ।।

भक्त विचारी महाराज । सद्गुरूंची असे का गरज ।
गुरुवाचुनी परमार्थकाज । नाही का साधु शकणार ।। २६ ।।

बाबा सांगती गुरुवाचून । साधक योग्य साधना करुन ।
ध्येय गाठू शकतो जाण । परि मार्ग सुगम करी गुरू ।। २७ ।।

इतुक्यात बाबांना भागिरथीत । दिसले एक मोठे गलबत ।
बाबा पुसती हे गलबत । चिनसुऱ्यास केव्हा पोहोचेल ।। २८ ।।

भक्त म्हणे संध्या समयास । जहाज तेथे पोहोचेल खास ।
ठाकुर म्हणती गलबतास । होडी आहे बांधिलेली ।। २९ ।।

तीही गलबताबरोबर । पोहोचेल त्याच वेळेवर ।
तथापि होडीचा सोडता दोर । एकटी केधवा पोहोचेल ।। १३० ।।



भक्त वदे होडी वल्हवत । नेता चिनसुऱ्यापर्यंत ।
उद्या सकाळच्या आत । पोहोचणार नाही त्या ठायी ।। ३१ ।।
तयाला म्हणती रामकृष्ण । साधक एकटा करिता साधन ।
होऊ शकते त्यास दर्शन । परंतु विलंब लागतसे ।। ३२ ।।
तथापि उदय पावता दैव । लाभता तयाला गुरुदेव ।
प्रवास सुलभ होई सर्व । उरके अति अल्प काळात ।। ३३ ।।
ठाकुरांस विचारी एक जण । नेति नेति विचार करुन ।
कोण्या रीतीने ज्ञानविज्ञान । प्राप्त होतसे सांगावे ।। ३४ ।।
बाबा सांगती अंधारात । समज कोणी असे निद्रित ।
दुसरा तयाचा शोध करित । त्या खोलीत प्रवेशला ।। ३५ ।।
दिसेना म्हणुनी चाचपू गेला । तव खुर्ची लागली हाताला ।
हे नव्हे तो वदता झाला । टेबल लागले तदनंतर ।। ३६ ।।
हे नव्हे हे नव्हे ऐसे म्हणत । पदार्थ जाई चाचपत ।
यापरी तयाने त्या खोलीत । शोध पुढती चालविला ।। ३७ ।।
हे नव्हे म्हणजे नेति नेति । मग गृहस्थ लागता हाती ।
हाच तो मोदे बोल निघती । इति इति म्हणती तयास ।। ३८ ।।
तया पुरुषाचे झाले ज्ञान । नंतर तयाला उठवून ।
गोष्टी करणे हे विज्ञान । विशेष रूपाने जाणायचे ।। ३९ ।।
दुधाचे नाव ऐकती कोणी । कोणी ते पाहती नयनांनी ।
चाखिलेले असते कोणी । तीन प्रकार हे असती ।। १४० ।।
कोणी ईश्वर ऐकुनी असती । कोणी प्रत्यक्ष त्याला पाहती ।
कोणी तयासी गोष्टी करिती । अज्ञानी ज्ञानी ते विज्ञानी ।। ४१ ।।
बाबांस सांगे स्त्रीभक्त । नामस्मरण करावे सतत ।
ऐसे वाटत माझ्या मनात । प्रत्यक्षात परंतु घडेना ।। ४२ ।।



ठाकुर सांगती तिजप्रत । महामायेचा प्रभाव अद्‌भुत ।
ज्याला कोणिही नसे जगात । अडकवी जाळ्यात त्यालाही ।। ४३ ।।

पाळी तो एखादे मांजर । दुधास्तव फिरे दारोदार ।
म्हणे काय करू मार्जार । खाइना भाकर दुधाविना ।। ४४ ।।

स्त्रियेने पती होता गत । का अडकावे संसारात ।
काय तिजला असे हरकत । ईश्वराकडे मन लावावया ।। ४५ ।।

परंतु विधवा भजेना माधवा । जाउनी भावाचिया गावा ।
कारभार करी तेथे नवा । सांगत सुटे ती जगताला ।। ४६ ।।

जर मी येथे नसते आले । दादास खावया नसते मिळाले ।
मीच तयाचे बघते सगळे । नातर त्याचे कसे होते ।। ४७ ।।

आपुला सुटला संसार । भावाचा बघे कारभार ।
महामायेचा प्रभाव थोर । त्यातुनि कोणिही सुटेना ।। ४८ ।।

काढण्या त्यातुनी बाहेर । एक भगवत्कृपा मात्र ।
यास्तव प्रभुची प्रार्थना कर । सुटावया मायाबंधनातुन ।। ४९ ।।

विषय कितिही असो कठिण । सोपा करिती रामकृष्ण ।
अनभिज्ञ नरही जेणेकरुन । सहज समजू शकत असे ।। १५० ।।

सांगती आहे वेदान्तात । वर्णन भूमिकांचे सप्त ।
कुंडलिनी होउनी जागृत । जातसे सुषुम्ना मार्गाने ।। ५१ ।।

सामान्यांच्या मनाची गती । गुह्य लिंग नाभीप्रती ।
खाणेपिणे उपभोग घेती । असती तयांचे व्यवहार ।। ५२ ।।

चतुर्थ भूमी हृदयापर्यंत । जेव्हा कुंडलिनी असे जात ।
ज्योतिदर्शन होतसे तेथ । परि मन तेथुनी उतरू शके ।। ५३ ।।

पंचम भूमी कंठ असत । कुंडलिनी जाता तेथपर्यंत ।
ईश्वरीय कथा प्रिय होतात । गोष्टी अप्रिय प्रपंचाच्या ।। ५४ ।।



साधनकाळी माझी अवस्था । झाली होती अशी सर्वथा ।
संसारातिल गोष्ट निघता । मस्तकात तडाखा बसावा ।। ५५ ।।
मग ते लगेच सोडुनी स्थान । पंचवटीस मी जाई धाउन ।
दृष्टीस पडता विषयी जन । भयाने लपुनी बसत असे ।। ५६ ।।
दिसताच आपुले नातलग । वाटे खड्ड्यात पडलो मग ।
होतसे मनाची तगमग । प्राण सवेग जाऊ पाहे ।। ५७ ।।
परंतु एकदा कंठ सोडुनी । भ्रुकुटीपर्यंत जाता चढुनी ।
पतन पावावयाची तेथुनी । साधकाला भीती नसे ।। ५८ ।।
तेथे परमात्म्याचे दर्शन । समाधिसुख लाभ होउन ।
साधक साधे स्वकल्याण । दर्शनसुख घे निरंतर ।। ५९ ।।
ती भूमि आणि सहस्रारात । पारदर्शक पट असे अद्‌भुत ।
साधकाला एकत्व प्राप्त । तेथे सुद्धा होत नसे ।। १६० ।।
राहुनी समाधिमधे अविरत । तो पट फाटे अकस्मात ।
जीव परमात्मा होतात । सहस्रात एकरूप ।। ६१ ।।
करुणामय श्रीभगवान । साधण्या निजजन कल्याण ।
योग अत्यंत सोपा करुन । बोध करिती अध्यात्माचा ।। ६२ ।।
भगवच्चरित्र परम पावन । आपण त्याचे मनन करुन ।
सकळ भावे जावे शरण । आत्मकल्याण साधावया ।। ६३ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६४ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा पंचविसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय सव्विसावा

षड्गुणैश्वर्यसंपन्न । आदिपुरुष नारायण ।
अवतारवरिष्ठ रामकृष्ण । केला प्रणाम प्रभुराया ।। १ ।।

अध्यात्मसाधना होता पूर्ण । इच्छिती मग रामकृष्ण ।
अध्यात्मविद्येचे वितरण । पात्र पुरुषांना करावे ।। २ ।।

तयांना कळले वर्तमान । ब्राह्मोसमाजाचा नेता महान ।
प्रसिद्ध केशवचंद्र सेन । भेटु इच्छिती तयाप्रती ।। ३ ।।

बेलघरिया विभागात । जयगोपालाच्या उद्यानात ।
निमग्न साधनभजनात । केशवचंद्र सेन असे ।। ४ ।।

हृदयरामास सवे घेउन । बाबा गेले गाडीत बसुन ।
दुपार गेली होती टळुन । तेथवा गाडी पोहोचली ।। ५ ।।

इतर मंडळींबरोबर । केशव होता पुष्करणीवर ।
हृदयने करुनी नमस्कार । निवेदन केले तयाप्रती ।। ६ ।।

माझ्या मामास हरिगुणागान । आवडत असे मनापासुन ।
भगवंताचे नाम ऐकुन । त्यांना समाधी लागतसे ।। ७ ।।

आपुली कीर्ती परिसुनी । ईश्वरीय कथा आपल्याकडुनी ।
आले ऐकावयालागुनी । त्यांना घेउनि येऊ काय ।। ८ ।।

केशव बोलला यावे घेउन । रामकृष्ण करिती आगमन ।
अलौकिक पुरुष असामान्य । मंडळीस नाही वाटले ।। ९ ।।

रामकृष्ण म्हणती केशवाला । ऐकले दर्शन होते तुम्हाला ।
तरी त्याविषयी मजला । काही माहिती सांगावी ।। १० ।।



सुरू जाहला मग संवाद । रामकृष्ण गाऊ लागले पद ।
पसरला अपार आनंद । समाधि लागली बाबांची ।। ११ ।।

ठाकुरांची समाधी पाहुन । ही आध्यात्मिक अवस्था महान ।
नाही वाटले मंडळीलागुन । वाटले ढोंग असावे हे ।। १२ ।।

तेज झळके मुखावर । हृदय करी प्रणवोच्चार ।
थोड्याच वेळात श्रीठाकुर । अर्धबाह्य दशेत पातले ।। १३ ।।

आध्यात्मिक सिद्धान्त गहन । सांगु लागले सोपे करुन ।
व्यवहारातिल दृष्टान्त देउन । तटस्थ होउनी ते ऐकती ।। १४ ।।

भान विसरले सर्वजण । न कळे जाहला मध्यान्ह ।
करावयाचे आहे भोजन । विस्मरण जाहले तयाचे ।। १५ ।।

तन्मयावस्था तयांची पाहुन । हासत बोलती रामकृष्ण ।
कळपात पशू येता अन्य । गाई धावती मारावया ।। १६ ।।

तथापि येता दुसरी गाय । प्रेमे तियेची चाटती काय ।
तसाच प्रकार येथे होय । तुम्हा सकळ मंडळींचा ।। १७ ।।

केशवास म्हणती रामकृष्ण । तुझी शेपटी पडली गळुन ।
अर्थ कुणाला कळेना म्हणुन । स्पष्ट करुनी ते सांगती ।। १८ ।।

शेपटी असता बेडकाप्रत । राहू शके तो फक्त जलात ।
जेधवा शेपटी गळुन पडत । राहतो पाण्यात भूमीवर ।। १९ ।।

अविद्याशेपटी असेपर्यंत । माणुस असतो संसारात ।
गळता संसार परमार्थात । दोहींत विचरण करू शके ।। २० ।।

तुझ्या मनाची तैशी गत । यास्तव असताहि संसारात ।
मन रमे सच्चिदानंदात । ऐकुनी कळले सकळांना ।। २१ ।।

यापरी बाबा गोष्टी करुन । सोपे सोपे दृष्टांत देउन ।
सुलभ करिती अध्यात्मज्ञान । आले परतुनि दक्षिणेश्वरा ।। २२ ।।



तयांना कळता यथार्थ भक्त । त्याकडे जाती कराया मदत ।
करिती साह्य साधनेत । तळमळ लोकोन्नतीची ।। २३ ।।
होईल मान वा अपमान । याची काळजी करील कोण ।
मानापमान झाले शून्य । लोककल्याण मात्र दिसे ।। २४ ।।
कळता कोणी करी साधन । अहेतुक करुणाघन ।
त्याकडे जाती रामकृष्ण । मार्गदर्शन करावया ।। २५ ।।
तेव्हापासुनी केशवाप्रती । ठाकुरांवर जडली भक्ती ।
रामकृष्णांच्या दर्शनाप्रती । वेळ मिळताच येत असे ।। २६ ।।
कधी कधी आपुल्या घरास । घेउनी जाई ठाकुरांस ।
इच्छी तयांचा सहवास । आत्महित साधावयाला ।। २७ ।।
दोघांत प्रेम उत्पन्न होउन । भेटीवाचुनी न पडे चैन
दक्षिणेश्वरास केशव येउन । दर्शन उपदेश घेत असे ।। २८ ।।
कधी केशव जहाजात । येउनी अनुयायांसोबत ।
रामकृष्णांना घेउनी जात । गंगेवर सहल करावया ।। २९ ।।
बाबांच्या मुखकमलामधुन । अमृतमय उपदेश ऐकुन ।
सर्वजणांनी आपुले जीवन । धन्य जाहले समजावे ।। ३० ।।
केशव सेन असे विख्यात । पाश्चात्त्य विद्याविभूषित ।
इंग्रजीत आणि बंगालीत । वृत्तपत्रात लिहित असे ।। ३१ ।।
वक्तृत्व त्याचे असाधारण । हालवोनि सोडी सभा महान ।
तटस्थ होती सकल जन । ऐकुनि भाषण केशवाचे ।। ३२ ।।
ब्राह्मो समाजाचा महान । नेता असे केशव सेन ।
ठाकुरांस जातसे घेउन । वार्षिकोत्सवाला समाजाच्या ।। ३३ ।।
न घेई रिक्तहस्ते दर्शन । फळे मिठाई घेई घेउन ।
नम्रपणाने करी नमन । पायाजवळ बसत असे ।। ३४ ।।



ठाकुरांचा बोध ऐकुन । मानी आपण झालो धन्य ।
जडली श्रद्धा असाधारण । रामकृष्णांवर केशवची ।। ३५ ।।

विनोदे वदती रामकृष्ण । केशव तू तर भाषण करुन ।
सभा सोडितोसि हालवून । मलाही सांग काहीतरी ।। ३६ ।।

नम्रपणे केशव वदला । लोहाराच्या दुकानाला ।
कसा बसू सुई विकण्याला । आपण बोला मी ऐकतो ।। ३७ ।।

आपुल्या मुखकमलामधुन । चार गोष्टी ऐकुन घेउन ।
त्याच इतरांना करितो कथन । तयाने हुरळुनि ते जाती ।। ३८ ।।

ठाकुर एकदा त्याला वदले । ब्रह्माचे अस्तित्व स्वीकारले ।
तर शक्तीस पाहिजे मानले । कारण अभेद ते असती ।। ३९ ।।

केशवला हे कळले वचन । पुढे सांगती रामकृष्ण ।
भागवत भक्त भगवान । रूपे तीन ही एकाची ।। ४० ।।

केशवला हे आले कळुन । आणखी सांगती रामकृष्ण ।
गुरु वैष्णव आणि कृष्ण । नव्हेत तीन हे एकची ।। ४१ ।।

तव केशव म्हणे महाराज । विवरण याचे नको आज ।
आतापर्यंत ऐकले गुज । तेवढेच सध्या पुरे असे ।। ४२ ।।

माझ्या मतीची मजल तेथ । आताच पोहोचू नाही शकत ।
पुढल्या खेपेस मजला मात । कृपा करुनि ही सांगावी ।। ४३ ।।

चालतसे मोकळा संवाद । गहन तत्त्वे होती विशद ।
असे दोघांचा गोड संबंध । मिळतसे बोध केशवला ।। ४४ ।।

रामकृष्णाची संगती थोर । केशवचंद्राच्या जीवनावर ।
परिणाम झाला उत्तरोत्तर । धर्ममते तयाची बदलली ।। ४५ ।।

वैदिक धर्माची रहस्ये नीट । केशवचंद्रास कळली स्पष्ट ।
धर्ममते जी असती अनिष्ट । पार बदलली तयाची ।। ४६ ।।



विशेष आघात झाल्यावाचुन । सामान्य मानवाचे मन ।
असार संसारातून उठुन । लागत नाही ईश्वराकडे ।। ४७ ।।

केशवचंद्र आपुली दुहिता । राजकुळात झाला देता ।
ब्राह्मसमाजाच्या होता । नियमाविरुद्ध विवाह तो ।। ४८ ।।

विवाह झाला नियमाविरुद्ध । काही मंडळी झाली क्रुद्ध ।
खळबळ उडाली मोठा वाद । उपस्थित झाला तेथवा ।। ४९ ।।

काही मंडळी त्यातुनी फुटुन । नविन समाज केला स्थापन ।
ब्राह्मसमाज साधारण । ठेविले अभिधान संस्थेला ।। ५० ।।

परस्परांच्या विरुद्ध होउन । तंटे भांडणे त्यांची पाहुन ।
विषाद करिती रामकृष्ण । म्हणती अनुचित असे हे ।। ५१ ।।

विवाह खाजगी बाब लहान । अशा क्षुल्लक कारणावरुन ।
दोन समाजांत व्हावे भांडण । अयोग्य असे हे सर्वथा ।। ५२ ।।

जन्म मृत्यू आणिक लग्न । असती या गोष्टी ईश्वराधिन
त्यासंबंधी केशव सेन । कशाला नियम करू गेला ।। ५३ ।।

केशव तरी संसारी माणुस । कन्या दिधली महाराजास ।
कल्याण तियेचे करावयास । वाईट विशेष काय इथे ।। ५४ ।।

परि यापरी आघात होउन । केशवचंद्र सेनाचे मन ।
संसारातुनि गेले विटुन । लागले परमार्थमार्गाला ।। ५५ ।।

रामकृष्णांवर त्याची भक्ती । उत्तरोत्तर झाली वाढती ।
मानुनी साक्षात धर्ममूर्ती । आपुल्या घराला नेत असे ।। ५६ ।।

फिरवी सर्व खोल्यांतुन । ईशचिंतनाच्या जागेतुन ।
म्हणतसे जेथे लागले चरण । ते स्थान पावन जाहले ।। ५७ ।।

पवित्र झाले सकळ सदन । होइल मजला ईश्वरस्मरण ।
होणार नाहीच विस्मरण । लागेल ध्यान बसेन तेथे ।। ५८ ।।



मस्तकी रामकृष्णांचे पाय । धरुनी म्हणे विधानेर जय ।
ईश्वर मानुनी नमिता होय । मानी उपाय परमार्थाचा ।। ५९ ।।
ठाकुरांनाहि वाटे प्रीती । जगज्जननीला ते विनविती ।
सहस्रपट वाढु दे कीर्ती । दिगंती माझ्या केशवची ।। ६० ।।
जनांना रामकृष्णांची माहिती । केशवाकडून कळली होती ।
तयांस वाटे मिळावी संगती । कळावे विचार नवे नवे ।। ६१ ।।
यास्तव केशवचंद्र सेन । अनुयायांना येई घेउन ।
ठाकुरांचे विचार ऐकुन । घेती सर्वजण आनंदे ।। ६२ ।।
सांगे केशवचंद्र सेन । रामकृष्णांचे विचार ऐकुन ।
वर्तमानपत्रात करितो लेखन । व्याख्यानातुनि मी सांगतो ।। ६३ ।।
ठाकुरांच्या उक्ती समस्त । सांगतो ब्राह्मसमाजात ।
दक्षिणेश्वरी अनुयायांप्रत । नेतो उन्नती साधावया ।। ६४ ।।
केशवादिक ब्राह्मजन । खरे साधक असती म्हणुन ।
ठाकुर करिती मार्गदर्शन । साधनभजन करावया ।। ६५ ।।
अशा मंडळींशी बोलण्यात । बाबांस आनंद वाटे बहुत ।
कधी कधी जाती समाजात । हित साधकांचे साधावया ।। ६६ ।।
कधी उपासना असता होत । ठाकुर यावेत अकस्मात ।
उपासना मग थांबे त्वरित । जमती समस्त भोवताली ।। ६७ ।।
ब्राह्मजन मग सर्व मिळुन । रामकृष्णांचे ऐकती भाषण ।
बोधामृत स्रवतसे मुखातुन । करिती पान ते अत्यादरे ।। ६८ ।।
ईश्वरावर जे प्रेम करिती । त्यांची बाबांस अत्यंत प्रीती ।
तयांची सत्वर व्हावी प्रगती । यास्तव झटती रामकृष्ण ।। ६९ ।।
पुढारी ब्राह्मसमाजात । पाश्चात्त्य विद्याभूषित ।
म्हणुनी तयांच्या उपासनेत । बाह्य दिखाऊपणा असे ।। ७० ।।



रामकृष्ण म्हणती तेधवा । बाह्य दिखाऊपणा नसावा ।
अंतरात उमाळा असावा । ध्यास लागावा ईश्वराचा ।। ७१ ।।

एकदा प्रार्थनामंदिरात । रामकृष्ण आले अकस्मात ।
एक वक्ता होता सांगत । ऐश्वर्य परमेश्वराचे ।। ७२ ।।

आपुले व्याख्यान संपवुन । म्हणाला आता करू ध्यान ।
ठाकुरांस वाटले सर्वजण । करितील ध्यान दीर्घ काळ ।। ७३ ।।

दोन मिनिटांत संपता सकळ । ठाकुरांना वाटले नवल ।
म्हणती अशाने कशी होइल । प्राप्ती परमेश्वराची ।। ७४ ।।

केशवचंद्रास बाबा म्हणती । यांतिल कित्येक ध्यान करिती ।
पाहुनि स्मरण होई मजप्रती । वानरांच्या कळपाचे ।। ७५ ।।

दक्षिणेश्वरी कपींचा कळप । झाडावर असतो गुपचुप ।
पाहणारास वाटते खूप । सभ्य दिसतात वानरे ।। ७६ ।।

वरवर जरी दिसती शांत । तरी बागांचा विचार मनात ।
कोणत्या झाडास लागलीत । चिंचा बोरे पेरू फळे ।। ७७ ।।

मग ते सर्व एका क्षणात । हुपहुप करुनी उड्या घेत ।
बागेत शिरुनी उडवितात । फन्नाच सगळ्या फळांचा ।। ७८ ।।

येथिल पुष्कळजणांचे ध्यान । त्यांच्याच सारखे होते म्हणुन ।
सहज मज आली आठवण । सकळ ऐकुनी हासले ।। ७९ ।।

रामकृष्णांचा पडुनी प्रभाव । परमेश्वराचा मातृभाव ।
आई ऐसे प्रेमळ नाव । स्वीकारले ब्राह्मसमाजाने ।। ८० ।।

ठाकुर म्हणती केशव सेना । तुम्ही करिताना उपासना ।
ईश्वराचे ऐश्वर्य नाना । तऱ्हेने वर्णन का करिता ।। ८१ ।।

बापासमोर बसुनी सुत । म्हणे का बाप श्रीमंत ।
बागबगिचे तयाचे बहुत । वाडे दुकाने सेवक जन ।। ८२ ।।



पुत्र म्हणेल पिता थोर । अपार प्रेम करी मजवर ।
मीही प्रेम जनकावर । केले पाहिजे मनोभावे ।। ८३ ।।
असे खरा जो भक्त महान । प्रेम तो करी तन्मय होउन ।
ईश्वराचे करी चिंतन । सर्वस्व मानुनी आपुले ।। ८४ ।।
ईश्वरास म्हणे हट्ट घेउन । मला दिले पाहिजे दर्शन ।
अन्य विषयांसी विसरुन । साधनभजन करित असे ।। ८५ ।।
करिता ऐश्वर्याचे चिंतन । वाटेल ईश्वर केवढा महान ।
कितीतरी क्षुद्र असू आपण । उपजेल भीती तयामुळे ।। ८६ ।।
ज्याच्या हृदयात वसते भीती । तेथे वास न करी प्रीती ।
कशी व्हावी ईश्वरप्राप्ती । उत्पन्न न होता जिव्हाळा ।। ८७ ।।
ब्राह्मसमाजी जनांप्रत । रामकृष्णांच्या संगतीत ।
अनेक गोष्टी कळल्या यथार्थ । निमाल्या भ्रामक कल्पना ।। ८८ ।।
पाश्चात्त्य धर्मोपदेशकाकडुन । आणि इंग्रजी पुस्तके पाहुन ।
समजुत त्यांची गेली होउन । निराकार निर्गुण ईश असे ।। ८९ ।।
ईश्वराला मूर्तीत पाहुन । तेथे तयाचे करणे पूजन ।
महापाप आहे दारुण । असे जाहले मत त्यांचे ।। ९० ।।
परंतु बाबांच्या संगतीत । बदलले ते तयांचे मत ।
ठाकुर कल्पना देती यथार्थ । ईश्वरस्वरुपाची तयांना ।। ९१ ।।
म्हणती निराकार पाण्यात । भक्तिची थंडी लागता त्वरित ।
साकार रूप होतसे प्राप्त । सच्चिदानंद स्वरूपाला ।। ९२ ।।
वकील दिसताच न्यायालय । दूध दिसता आठवे गाय ।
तद्वत् मूर्तिरूपाने होय । स्मरण सच्चिदानंदाचे ।। ९३ ।।
भजता मूर्तीला साकार । ईश्वराचा साक्षात्कार ।
भक्तास होतसे साचार । प्रतिमा प्रतीके यासाठी ।। ९४ ।।



परमेश्वर असे साकार । तसा तो असे निराकार ।
साकारनिराकारा पार । कसा तो कोण जाणू शके ।। ९५ ।।
ईश्वराच्या रूपाची इति । करिता न ये कोणाप्रती ।
जसा दिसे तो जयाप्रती । तयाने तसा तो उपासावा ।। ९६ ।।
कुचबिहारच्या राजास । केशव देता कन्यकेस ।
ब्राह्मसमाजी वाद विशेष । होउनि पडले दोन भाग ।। ९७ ।।
भारतवर्षीय समाजाचा । नेता केशव सेन साचा ।
साधारण ब्राह्मसमाजाचा । नेता विजयकृष्ण गोस्वामी ।। ९८ ।।
साधारण ब्राह्मसमाजनेता । शिवनाथशास्त्री देखिल होता ।
दुभंगल्यापासुनी होता । दोन सामाजांत दुरावा ।। ९९ ।।
परि दोन्ही समाजांचे जन । रामकृष्णांना देती मान ।
नित्य दक्षिणेश्वरी येउन । घेती दर्शन ठाकुरांचे ।। १०० ।।
एक दिवस केशव सेन । अनुयायांना आला घेउन ।
आला घेउनि विजयकृष्ण । त्या दिनी तयाचे अनुयायी ।। १ ।।
गाठ पडता अकस्मात । दोघेहि झाले संकोचित ।
रामकृष्णांच्या लक्षात । गोष्ट त्वरित ती आली ।। २ ।।
मग सांगती हासत हासत । शंकर आणी रामचंद्रात ।
तंटा होउनि उपस्थित । युद्ध जुंपले घनघोर ।। ३ ।।
तथापि दोघे असती थोर । शंकराचे गुरू रघुवीर ।
रामचंद्राचे गुरू शंकर । म्हणुनी समेट झाला त्वरे ।। ४ ।।
म्हणुनि सांगतो तुम्हालागुन । व्हाववाचे ते गेले होउन ।
आता स्वच्छ करावे मन । तेढ काढुनी टाकावी ।। ५ ।।
ठाकुरांच्या उपदेशापासुन । केशव आणि विजयकृष्ण ।
करू लागले संभाषण । यापरि भांडण संपविले ।। ६ ।।



करावयाला साधन भजन । पुष्कळ वेळ मिळावा म्हणुन ।
नेतृत्व सोडी विजयकृष्ण । साधारण ब्राह्मसमाजाचे ।। ७ ।।
विजयकृष्णाच्या मागुन । शिवनाथ शास्त्र्यावर पूर्ण ।
जबाबदारी पडली येउन । साधारण ब्राह्मसमाजाची ।। ८ ।।
रामकृष्णांची संगती मिळुन । उन्नती करी विजयकृष्ण ।
त्याच्या मागुनी समाज सोडुन । गेले पुष्कळ अनुयायी ।। ९ ।।
शिवनाथशास्त्री तेव्हापासुन । घ्यावया ठाकुरांचे दर्शन ।
येइना दक्षिणेश्वरालागुन । सदस्यास सांगे जाऊ नका ।। ११० ।।
तयाला वाटे जर सर्वजण । जातिल घ्यावयाला दर्शन ।
तर बाबांचा उपदेश ऐकुन । समाज सोडुनि जातील ते ।। ११ ।।
रामकृष्णांच्या संगतीपासुन । उपदेश तयांचा परिसून ।
केवढा थोर परिणाम होउन । बदलली मते समाजाची ।। १२ ।।
पूर्वी धर्म म्हणजे काय । जाणण्याचीहि नसे सोय ।
धर्मलाभास करणे उपाय । माहित काय हे कोणाला ।। १३ ।।
थाटमाटाचा सर्व बाजार । बाह्यविधीवर असे भर ।
ध्यानधारणा प्रार्थना समग्र । थेर बाहेर दाखविण्या ।। १४ ।।
रामकृष्णांचे दर्शन होउन । सकळ ते गेले बदलुन ।
कशाला म्हणती धर्मजीवन । आले कळून बहुतांना ।। १५ ।।
मते तितुके असती पंथ । रामकृष्णांचा हा सिद्धांत ।
नवीनच कळला जगतात । सहानुभूती प्राप्त झाली ।। १६ ।।
रामकृष्णांच्या कार्यालागुन । आरंभ ब्राह्मसमाजापासुन ।
यास्तव संक्षिप्त विवरण । केले ब्राह्म समाजाचे ।। १७ ।।
समाजाच्या सदस्यांकडुन । जन जे सर्वसाधारण ।
रामकृष्णांची माहिती कळुन । दर्शनास येऊ लागले ।। १८ ।।



समाजसदस्यांच्या सदनी । रामकृष्ण कधी कधी जाउनी ।
रमती भजन नामकीर्तनी । कृतार्थ करिती सकळांस ।। १९ ।।

सांगत असती रामकृष्ण । कलियुगामधे नामस्मरण ।
ह्यासारखे सोपे साधन । दुसरे असेना कोणतेही ।। १२० ।।

मानव करिता नामस्मरण । शुद्ध होतसे त्याचे मन ।
शरीर शुद्ध जाई होउन । महिमान यापरी नामाचे ।। २१ ।।

एकदा मणि मल्लिकाच्या घराला । ब्राह्मसमाजाचा उत्सव झाला ।
आमंत्रण होते ठाकुरांला । म्हणुनि राहिले उपस्थित ।। २२ ।।

संध्याकाळच्या समयाला । आरंभ करिती भजनाला ।
जनसमुदाय इतुका लोटला । गर्दी झाली द्वारातही ।। २३ ।।

कोणी कोणी त्या गर्दीतुन । आपुल्या माना उंचावुन ।
पाहत ऐकत होते भजन । भक्तियुक्त अंतःकरणांनी ।। २४ ।।

टाळमृदुंगवीणावादन । आनंदाचे उठले तुफान ।
अद्‌भुत होतसे संकीर्तन । तन्मय जन सर्व जाहले ।। २५ ।।

मध्यभागी रामकृष्ण । भक्तमंडळी भवतालुन ।
उन्मत्तापरि करिती नर्तन । गाती कीर्तन श्रीहरिचे ।। २६ ।।

कोणि हासती कोणी रडती । उद्दाम होउनी नृत्य करती ।
भूमीवरती देह टाकिती । गडबडा लोळती कित्येक ।। २७ ।।

कोणी अत्यंत विव्हळ होउन । उन्मत्तापरि करिती वर्तन ।
भावावेशात रामकृष्ण । मध्यभागी विराजती ।। २८ ।।

ठाकुर नृत्य करित करित । येती पुढे पुढे सरकत ।
पुन्हा मागे मागे सरत । जाती पूर्विच्या स्थानाला ।। २९ ।।

चित्कार गर्दी तेथे असुन । लोक देती वाट करुन ।
रामकृष्णाचे अपूर्व नर्तन । भारावुनि जाती सकळीक ।। १३० ।।



सुहास्य वदन दिसे सुंदर । अपूर्व तेज मुखमंडलावर ।
जणू निथळती पृथ्वीवर । मधुरता आणि कोमलता ।। ३१ ।।
नृत्यास तुलना नसे काही । अवडंबर तर नसेच मुळिही ।
बळे बळे खटाटोप नाही । अंगविक्षेप करण्याचा ।। ३२ ।।
हृदयातिल स्फूर्तिने होत । स्वाभाविक ती क्रिया समस्त ।
चांगल्या स्वच्छ जलाशयात । जसा का मासा सोडवा ।। ३३ ।।
आनंदे तो क्रीडा करित । भरभर अथवा पोहतो शांत ।
स्वच्छंद पोहतो पाण्यात । विहरतो चारी बाजूसही ।। ३४ ।।
तसेच आनंदसागरात । बाबा बुड्या मारिती बहुत ।
अपार सुख जे हृदयात । होतसे व्यक्त ते नृत्याने ।। ३५ ।।
नृत्य करिताना मधुन मधुन । होउनि जाती संज्ञाशून्य ।
नेसलेले धोतर गळुन । पडता त्याकडे लक्ष नसे ।। ३६ ।।
लगबग मग कोणी येउन । कसेतरी देई गुंडाळुन ।
देवदुर्लभ नृत्य गायन । संकीर्तन असे बाबांचे ।। ३७ ।।
भावावेशात संज्ञाशून्य । झाल्यास कोणी भक्तजन ।
बाबा वक्षस्थळ स्पर्शुन । सचेतन करिती तयाप्रती ।। ३८ ।।
वाटे बाबांच्या अंगातुन । दिव्यानंदाचा प्रवाह निघुन ।
चारहि दिशांना पसरे पूर्ण । बुडवुनि टाके सकळांस ।। ३९ ।।
कोणास होतसे इष्टदर्शन । कोणास वैराग्य प्राप्त होउन ।
विषयी पुरुषाचे मन । क्षणभर विसरे आसक्ती ।। १४० ।।
कोणास आध्यात्मिक मार्गात । अग्रेसर व्हावया सामर्थ्य प्राप्त ।
भावावेशाच्या प्रवाहात । सर्वचि लोक सापडले ।। ४१ ।।
त्या प्रवाहाच्या पवित्रतेने । धुतली जाती तयांची मने ।
सहज होतसे आरोहणे । अध्यात्माच्या मार्गावर ।। ४२ ।।



कित्येक ब्राह्मसमाजमंडळी । भावविष्ट होउनी गेली ।
काही संज्ञाशून्य जाहली । विसरली कालस्थलभाव ।। ४३ ।।
काय महापर्वणी आली । अमृताची वृष्टी झाली ।
किंवा कल्पवृक्षाची पडली । सावली सकल लोकांवर ।। ४४ ।।
आटोपल्यावर संकीर्तन । उपदेश करिती रामकृष्ण ।
रूपरसादी विषयांमधुन । मनाला बाहेर काढावे ।। ४५ ।।
परमेश्वराच्या मग सेवेत । मन गुंतवावे अविरत ।
म्हणजे परम शान्ती प्राप्त । त्वरित जिवाला होत असे ।। ४६ ।।
स्त्रीपुरुषांनी अनेक गहन । अध्यात्मावर केले प्रश्न ।
त्यांची समर्पक उत्तरे देउन । बाबांनी जन तोषविले ।। ४७ ।।
मग गोस्वामी विजयकृष्ण । आला करावयाला नमन ।
तयाला पाहुनी रामकृष्ण । चेष्टा करिती तयाची ।। ४८ ।।
विजयला संकीर्तनाविण । सुचेना काही विषय अन्य ।
ते सारे ठीक आहे पण । नर्तन पाहुनी धडकी भरे ।। ४९ ।।
एक साधू शिष्याच्या घरी । माडीवरती कीर्तन करी ।
कडीपाट भंगुनि त्याची स्वारी । आली तळमजल्यावर ।। १५० ।।
म्हणुनी मजला वाटते भीती । त्याचीच होईल पुनरावृत्ती ।
तशीच आपुली व्हायची स्थिती । ऐकुनी हासती सकळीक ।। ५१ ।।
भगव्या रंगाचेच वेड । विजयला लागले आहे गाढ ।
कपड्यांचा तर काय पाड । जोडाहि भगव्याच रंगाचा ।। ५२ ।।
तथापि त्यात वाइट नाही । एकदा अशी अवस्था होई ।
तेव्हा भगव्यावाचुनी काही । इतर रंगही आवडेना ।। ५३ ।।
भगवा रंग त्यागाची खूण । ईश्वरप्राप्ती व्हावी म्हणुन ।
सर्वस्वत्यागाची आठवण । देतसे करुनी साधकाला ।। ५४ ।।



नमन करी मग विजयकृष्ण । ठाकुर देती आशीर्वचन ।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः म्हणुन । प्रसन्न मनाने विजयला ।। ५५ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५६ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा सव्विसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय सत्ताविसावा

जय जय श्रीपरमधामा । जय प्रत्यक्ष परब्रह्मा ।
नमन रामकृष्णनामा । सगुण पुरुषोत्तमाप्रती ।। १ ।।
ईश्वरलाभ मानुनी परम । सर्वस्वाचा केला होम ।
त्यागाची मूर्तीच अनुपम । रामकृष्णरूपाने अवतरली ।। २ ।।
मानवजन्माप्रती येउन । प्राप्तव्य प्राप्त करुनी पूर्ण ।
आत्मानंदात सदा निमग्न । भगवान राहू लागले ।। ३ ।।
आता अवतार प्रयोजन । ज्यास्तव नरदेह केला धारण ।
स्वानुभवाचे साधकालागुन । वितरण कराया सिद्ध झाले ।। ४ ।।
जाहले कमल प्रफुल्लित । निजानंदमधु सेवण्याप्रत ।
भक्तभ्रमर यावेत बहुत । याचीच काळजी लागली ।। ५ ।।
मिळवावयाचे राहिले काय । आता राहती जनहिताय ।
कार्य आता बहुजनसुखाय । उपाय दुःख निवारण्या ।। ६ ।।
तळमळ लागली अंतरात । खरे खरे साधक यावेत ।
त्यांना मिळाला पाहिजे समस्त । लाभ आपुल्या अनुभवांचा ।। ७ ।।
व्याकुळतेने प्रार्थना करिती । माते पाठव भक्तांप्रती ।
ज्यांच्यात असे त्याग विरक्ती । विविध अवस्था सांगावया ।। ८ ।।
मग मी तयांच्या बरोबर । मोकळे करिन मनाचे द्वार ।
ईश्वरीय गोष्टी करिन अपार । लुटिन आनंद त्यांच्यासवे ।। ९ ।।
करिती चिंतन सर्वकाळ । आई कोणास पाठवील ।
गृहस्थाश्रमी त्यांना ठेविल । अथवा देईल संन्यास ।। १० ।।



भक्तांची भेट व्हावी म्हणुन । तळमळू लागे अंत:करण ।
मनास वेदना होती महान । बेहोष होउनी मग पडती ।। ११ ।।
मग मनाची समजूत करुन । कसातरी घालविती तो दिन ।
तथापि संध्याकाळ होउन । आरत्या जेव्हा सुरू होती ।। १२ ।।
तेव्हा मनात विचार दाटे । एक दिवस तर लागला वाटे ।
अजुनी कोणी कसे न भेटे । वाटे हृदय फाटे जणू ।। १३ ।।
मग गच्चीवरती जाउन । मोठमोठ्याने ओरडून ।
म्हणावे कोठे आहात कोण । ते सर्वजण या रे या ।। १४ ।।
गळा काढुनी बसती रडत । वाटे वेड लागले सांप्रत ।
लोटता दिवस या तळमळित । एकेक भक्त मग पातला ।। १५ ।।
आधीच भावावस्थेत । तयांनी पाहिले होते भक्त ।
म्हणुनी ओळख पटे त्वरित । चित्त तयांचे शांत जाहले ।। १६ ।।
शेवटी आला भक्त पूर्ण । माता म्हणे ते दाखवून ।
यावयाचे ते सर्वजण । आता परिपूर्ण जाहले ।। १७ ।।
या प्रकारचे आता कोणिही । भक्त येणे राहिले नाही ।
बोट दाखवुनी म्हणाली आई । अंतरंग भक्त हे तुझे ।। १८ ।।
अंतरंग भक्तांशिवाय इतर । भक्त येऊ लागले फार ।
प्रत्येकाच्या जीवनावर । पडला प्रभाव ठाकुरांचा ।। १९ ।।
केशवचंद्राचे लिखाण । वर्तमानपत्रात वाचून ।
येउ लागले बहुत जन । धर्मलाभास्तव बाबांकडे ।। २० ।।
ठाकुरांचा गृहस्थ भक्त । नामे रामचंद्र दत्त ।
मनमोहन मित्रासमवेत । दर्शनास आला बाबांच्या ।। २१ ।।
वैष्णवांचे घराणे दत्त । वैष्णवसंस्कार परंपरागत ।
रामचंद्राच्याही आचारात । होत्या रूढी वैष्णवांच्या ।। २२ ।।



त्यास मिळाले पाश्चात्त्य शिक्षण । अर्थार्जनाचे ते साधन ।
त्यामुळे साशंक असे मन । विचार निरीश्वरवाद्यापरी ।। २३ ।।
पौर्वात्य संस्कार आचारात । विश्वास पाश्चात्त्य विचारात ।
याचाच संघर्ष चाले मनात । काही केल्या तो मिटेना ।। २४ ।।
त्याच्या दुहितेस तितुक्यात । मृत्यू आला अकस्मात ।
प्रश्न उद्भवे त्याच्या मनात । मरणोत्तर अस्तित्वाचा ।। २५ ।।
वाटे असे काय ईश्वर । पाहू शके का तयाला नर ।
कोणी पाहिला परमेश्वर । तव नाव कळले बाबांचे ।। २६ ।।
मग तो नौकेमाजी बसुन । आला दक्षिणेश्वरालागुन ।
विचारपूस देवळात करुन । खोलीस पातला बाबांच्या ।। २७ ।।
तव लोटलेले होते द्वार । पाश्चात्त्य रीति तो पाळणार ।
कसे उघडावयाचे दार । म्हणुनी गंगातीर गाठले ।। २८ ।।
तेथे तयाला सांगितले । दार उघडुनी पाहिजे गेले ।
औपचारिकत्व तेथे कसले । दर्शन घ्याया बाबांचे ।। २९ ।।
मग ते खोलीमधे शिरले । उभे राहुनी हात जोडिले ।
खोलीभीतरी खाली बसले । उपदेश तयांचा ऐकावया ।। ३० ।।
तेथे ऐकुनी संभाषण । मोहुनि गेले दोघेजण ।
पहिल्याच भेटीत संपूर्ण । आले शरण ठाकुरांला ।। ३१ ।।
येथे रामचंद्र दत्तास । अंधारात दिसला प्रकाश ।
मग प्रत्येक रविवारास । दर्शनास येऊ लागला ।। ३२ ।।
रामचंद्र असता निद्राधीन । रात्री तयाला पडिले स्वप्न ।
आपण तळ्यात केले स्नान । रामकृष्ण दिसले त्या ठायी ।। ३३ ।।
तयांनी आपणालागुन । एक मंत्र दिधला सांगुन ।
स्नानोत्तर असता ओले वसन । शतवार जपाया सांगितले ।। ३४ ।।



मग दक्षिणेश्वराला आला । स्वप्न सांगितले ठाकुरांला ।
बाबा म्हणती अनुभव चांगला । आला यास्तव अभिनंदन ।। ३५ ।।
येणे प्रकारे तयाचे मन । पावले काहिसे समाधान ।
पुनरपि वाटे हे तर स्वप्न । केवळ कल्पना मनाची ।। ३६ ।।
एक दिवस मनाची स्थिती । सांगत असता मित्राप्रती ।
तेथे एक भव्य व्यक्ती । अकस्मात येउनी बोलली ।। ३७ ।।
तू का करितोस एवढी चिंता । घडुनी येइल वेळ येता ।
आणि ती व्यक्ती पाहता पाहता । निघुनी अदृश्य जाहली ।। ३८ ।।
रामकृष्णांना सांगता मात । म्हणती यासारखे दृष्टान्त ।
तुला येणार आहेत बहुत । ऐकुनी तोषत रामचंद्र ।। ३९ ।।
अशा दोलायमान स्थितित । राहु लागले तयाचे चित्त ।
केव्हा अस्थिर केव्हा शांत । ऐसिया स्थितीत मन राहे ।। ४० ।।
एकदा ठाकुरांना म्हणाला । काहीच मिळाले नाही मजला ।
व्यथित चित्ताने सांगता झाला । तक्रार आपुली बाबांना ।। ४१ ।।
करुनि तयाचा तिरस्कार । काय करू मी वदती ठाकुर ।
हरिची इच्छा जशी असणार । घडुनी येणार त्याप्रमाणे ।। ४२ ।।
मजकडे नसे रे तुझे ऋण । तुझे तू घेइ रे पाहुन ।
जर तुझे इच्छित असेल मन । तर ये अथवा येऊ नको ।। ४३ ।।
ठाउक होते रामचंद्राला । रागातही या अनुराग भरला ।
उच्च प्रेमास व्यापार कसला । करितील हित श्रीसद्गुरू ।। ४४ ।।
बाहेर पडला खोलीतुन । पडवीस आंग दिले लोटुन ।
रामकृष्ण नाम उच्चारण । भक्तिभावाने आरंभिले ।। ४५ ।।
थोडा वेळ जाता लोटुन । रामचंद्राची दया येउन ।
श्रीरामकृष्ण जवळ बसुन । दुःख दूर करिती तयाचे ।। ४६ ।।



रामचंद्र होता कृपण । बाबा सांगती वेलची आण ।
तयाने वाळकी वेलची आणुन । दिधली एकाच पैशाची ।। ४७ ।।
आपुल्या सदनास भक्तजन । श्रीरामकृष्णांना नेउन ।
अनेक भक्तांना पाचारुन । संकीर्तन करिती आनंदे ।। ४८ ।।
रामचंद्राची पाळी येता । आमंत्रण तर झाला देता ।
तथापि वाटे तयाच्या चित्ता । खर्च करावा लागणार ।। ४९ ।।
बाबा म्हणती संकीर्तनाला । करू वैशाखी पौर्णिमेला ।
बोलवी भक्तजनांचा मेळा । आनंद करू मग सर्वजण ।। ५० ।।
रामचंद्राने केला प्रयत्न । दुसऱ्या कोणी घ्यावा तो दिन ।
परंतु विफल जाहले यत्न । उत्सव झाला त्याच्या घरी ।। ५१ ।।
समारंभ यशस्वी जाहला । रामचंद्राला अनुभव आला ।
आध्यात्मिक उन्नती करावयाला । उत्सव केला ठाकुरांनी ।। ५२ ।।
मग त्या दिवसापासुन । सोडुन देई तो कार्पण्य ।
स्वत:स मानू लागला धन्य । सेवा घडता सद्गुरुची ।। ५३ ।।
रामचंद्राने वैद्यकीत । मिळविला होता पैसा बहुत ।
वकीलवैद्यापासुनी किंचित । न घेती धन रामकृष्ण । ।। ५४ ।।
वाटु लागले रामचंद्राला । पैसा जमविला व्यर्थ झाला ।
व्यथा सांगता ठाकुरांला । म्हणती चिंता करू नको ।। ५५ ।।
भक्तांची तू सेवा करी । मज ती पावेल निर्धारी ।
तेव्हापासुनी खर्च करी । भक्तांस्तव तो बाबांच्या ।। ५६ ।।
रामचंद्र मानी श्रीचैतन्य । होउनी आलेत रामकृष्ण ।
बाबा म्हणती गेली सांगुन । भैरवी ब्राह्मणी यापरी ।। ५७ ।।
बोलती जे रामकृष्ण । रामचंद्राने एकत्र करुन ।
तत्त्वसार पुस्तक छापुन । प्रसिद्ध केले अविलंबे ।। ५८ ।।



ठाकुरांना कळता मात । म्हणती माझ्या हयातीत ।
करू नकोस ऐसी गोष्ट । नातरी जीवित संपले हे ।। ५९ ।।
मनमोहन आणि राम दत्त । आणती दक्षिणेश्वराप्रत ।
आपुले सुहृद आणि आप्त । तयांचे कल्याण करावया ।। ६० ।।
या दोघांच्या प्रयत्ने बहुत । आले बाबांचे अंतरंग भक्त ।
पुढे झाले अति विख्यात । धर्मप्रसार करिती जे ।। ६१ ।।
तैसाच महेन्द्रनाथ गुप्त । यानेहि आणिले अनेक भक्त ।
सदाचारी दिसता त्वरित । तयास घेउनि येत असे ।। ६२ ।।
मुख्याध्यापक तो शाळेत । मुलांशी संबंध असे येत ।
वाटे तयाला व्हावे हित । आपुल्यासमवेत इतरांचे ।। ६३ ।।
तो प्रसिद्धिपराङ्मुख म्हणुन । 'एम' नावाने करी लिखाण ।
मास्टर महाशय सर्वजण । आदरे म्हणती तयाला ।। ६४ ।।
रामकृष्णांची बोधवचने । वेळोवेळी लिहिली तयाने ।
धर्मपिपासू जनाकारणे । नवजीवन जी जाहली ।। ६५ ।।
हजारो जनां स्फूर्ति मिळाली । साशंकता अवघी पळाली ।
धर्ममार्गात प्रगती झाली । झाले कल्याण बहुतांचे ।। ६६ ।।
ज्यास ज्यास हा बोध लाभला । धर्ममार्ग तयाला कळला ।
कळली साधनाची कला । कृतार्थ झाले साधकजन ।। ६७ ।।
या बोधवचनाच्या प्रकाशे । साधकांची अविद्या नासे ।
सवेचि निजात्मरूप गवसे । सच्चिदानंद भासे सर्वत्र ।। ६८ ।।
रामकृष्णवाक्सुधा मधुर । प्रसिद्ध करुनी जगतावर ।
केले अनंत उपकार । महेन्द्रनाथ गुप्ताने ।। ६९ ।।
बोधवचने अमृतवृष्टी । करुनी पावन करिती सृष्टी ।
संसारतप्तजन दुःखी कष्टी । दिव्य दृष्टी मिळे तया ।। ७० ।।



भक्त महेन्द्रनाथ गुप्त । केशव सेनाचा तो आप्त ।
राहतसे तो उपस्थित । उपासनेस केशवच्या ।। ७१ ।।

केशव सेनाकडुनी तयाला । रामकृष्णांचा वृत्तान्त कळला ।
म्हणुनी दक्षिणेश्वराला गेला । दर्शन घ्यावयाला बाबांचे ।। ७२ ।।

तेथे मंडळी होती ऐकत । रामकृष्णांचा बोध अद्‌भुत ।
परिसुनि भाषण महेन्द्र गुप्त । दास जाहला बाबांचा ।। ७३ ।।

ऐकुनि जाई तो भारावुन । एकमेव गुरु रामकृष्ण ।
तयास वाटुनी आकर्षण । वारंवार येउ लागला ।। ७४ ।।

त्यास वाटत होते आपण । आहोत सुशिक्षित विद्वान ।
अनेक ग्रंथ काढिले वाचुन । तत्त्वज्ञान कळत असे ।। ७५ ।।

कांट, हेगेल, हॅमिल्टन । स्पेन्सरादी काढिले वाचुन ।
मिळवुनि बुद्धिगम्य ज्ञान । सर्वस्व मिळाले वाटतसे ।। ७६ ।।

भेटता तयाला श्रीठाकुर । अनंत ज्ञानाचे सागर ।
तयाला कळुनी आले सत्वर । आपण पामर राहिलो ।। ७७ ।।

बाबा म्हणती अनुभव घेउन । ईश्वरा जाणणे हेच ज्ञान ।
इतर सर्व असे अज्ञान । इंद्रियबद्ध मर्यादित ।। ७८ ।।

बुद्धिची क्षमता असे किंचित । इंद्रिय निगडित मर्यादित ।
जाणू शके ती कशी अनंत । अमर्याद अखंड असे जे ।। ७९ ।।

म्हणुनि कराया ईश्वरप्राप्ती । करावी लागते सत्संगती ।
सद्‌गुरुनाथावाचुनी सद्‌गती । असे अति दुर्लभ समजावे ।। ८० ।।

महेन्द्रास श्रीरामकृष्णांत । सद्‌गुरू गवसला अति अद्‌भुत ।
जयांनी प्रत्यक्ष अनुभविले सत्य । समाधि स्वभाव जयांचा ।। ८१ ।।

वाटे भेटले सद्‌गुरुराव । अर्पावे तयांच्या चरणी सर्व ।
तयांच्या चरणी ठेवुनी भाव । साधावे आपुले कल्याण ।। ८२ ।।



ठाकुरांनी प्रथम भेटित । जाणिले सामर्थ्य असे यात ।
साधक असे हा महेन्द्रनाथ । आध्यात्मिकता यात असे ।। ८३ ।।

बाबा वदले तयालागुन । पाहुनी तुझ्या भुवया नयन ।
वदन तुझे अवलोकुन । कळले योगी अससी तू ।। ८४ ।।

दिसतोस ध्यान आटोपुन । आताच आला आसन सोडुन ।
तुजला होइल आत्मज्ञान । करावे साधन सुनिश्चये ।। ८५ ।।

बाबांनी भावसमाधित । चैतन्यांच्या शिष्यजनांत ।
पाहिला होता महेन्द्रनाथ । म्हणाले तुजला ओळखिले ।। ८६ ।।

विवाहित असे महेन्द्रनाथ । पुत्रहि झाला होता प्राप्त ।
परिसुनि रामकृष्णांप्रत । चिंता प्रथम वाटली ।। ८७ ।।

आपुले कार्य करावयास । तयार करणे आहे यास ।
ऐसा धरुनी मनि उद्देश । उपदेश देणे आरंभिले ।। ८८ ।।

महेन्द्र विचारी ठाकुरांप्रत । कैसे राहावे या जगतात ।
बाबा वदले काम करित । असता ईश्वर आठवावा ।। ८९ ।।

पुत्र पत्नी माता पिता । सर्वांची कामे करीत असता ।
संबंध असे हा तात्पुरता । ऐसे चित्तात धरावे ।। ९० ।।

संसारातिल कर्म करावे । चित्त ईश्वरावरी असावे ।
नित्य तयाला आठवावे । गुणगान गावे श्रीहरिचे ।। ९१ ।।

जेवि धन्याच्या घरी दाई । बालक खेळवावयास घेई ।
माझा बाबा माझी बाई । ऐसे गाई ती परोपरी ।। ९२ ।।

परंतु तिजला असते माहित । आपुले बाळ आपुल्या घरात ।
चित्त त्याकडे सदोदित । असते ज्यापरी दाईचे ।। ९३ ।।

सकळ कर्मे असता करित । आपुले चित्त असावे अलिप्त ।
परमेश्वरावर सदोदित । लक्ष केंद्रित करावे ।। ९४ ।।



होता ईश्वरप्रीती प्राप्त । मानव असुनही संसारात ।
अलिप्त राहू शकतसे चित्त । नवनीत जलात ज्यापरी ।। ९५ ।।

परमेश्वराची प्रार्थना करुन । एकान्तामधे करुनी ध्यान ।
मिळतसे ईश्वराचे ज्ञान । मग मन न बुडे संसारी ।। ९६ ।।

अध्यात्माचा अधिकारी थोर । महेन्द्र असे जाणती ठाकुर ।
याच्याकडुनी होइल प्रचार । जाणती आपुल्या वचनांचा ।। ९७ ।।

स्वशिष्यांची चिंता वाहती । भावावेशात आईला म्हणती ।
का गे दिधली महेन्द्राप्रती । एकच कला त्वां शक्तीची ।। ९८ ।।

समजावी मग जगन्माता । म्हणती माते कळले आता ।
पुरेल तुझिया कामाकरिता । एवढीच शक्ती तयाला ।। ९९ ।।

गुप्तपणाने येणे रीती । जगन्मातेसी गोष्टी होती ।
कोणास किती द्यायची शक्ती । धर्मप्रसार करावया ।। १०० ।।

महेन्द्राला आवडे निर्गुण । निराकाराचे उपासन ।
रामकृष्णांना येता कळुन । प्रोत्साहन देती तयासी ।। १ ।।

योग्य सूचना तयाला देउन । तलावावर गेले घेउन ।
सांगती कसे करावे ध्यान । निराकार ईश्वराचे ।। २ ।।

जेवि मासा अथांग जलात । स्वच्छंदे अनिरुद्ध पोहत ।
मोदे सर्वत्र विहार करित । निराकारात तैसे रमावे ।। ३ ।।

संकुचित असती पंथभेद । न धरावा अशांचा संबंध ।
केवळ माझाच पंथ शुद्ध । इतर अशुद्ध न मानावे ।। ४ ।।

नाना पंथ असती इतर । न करावा तयांचा तिरस्कार ।
सर्वांचाच असावा आदर । सर्वत्र ईश्वर वसत असे ।। ५ ।।

हळुहळु महेन्द्राला देती । साकारोपासनेची माहिती ।
साकार होउनी भक्ताप्रती । ईश्वर दर्शन देत असे ।। ६ ।।



प्रचारक जे होतील भावी । संकुचितता त्यांत नसावी ।
उदार बुद्धी मनी वसावी । यास्तव काळजी घेती ते ।। ७ ।।
एकदा बाबांनी विचारिले । किती आणे मज ज्ञान झाले ।
महेन्द्राने उत्तर दिधले । आणे न जाणे मी काही ।। ८ ।।
परि ऐसे ज्ञान ऐसी प्रीती । असला त्याग अलिप्त वृत्ती ।
अन्यत्र देखिली नाही जगती । ऐकुनी हासले रामकृष्ण ।। ९ ।।
आणिक दुसरा प्रश्न केला । काय मजसंबंधी वाटे तुजला ।
ऐकुनी महेन्द्रनाथ बोलला । मजला ऐसे वाटतसे ।। ११० ।।
ईश्वराने स्वहस्ते तुम्हाला । बनविले असावे वाटते मजला ।
आणि यंत्रातुनि इतरांला । बनविले असावे वाटतसे ।। ११ ।।
ईश्वराची शक्ती तुम्हांत । पूर्णपणाने जाहली व्यक्त ।
ठाकुर पुसती तयाप्रत । काय प्रमाण त्या शक्तीचे ।। १२ ।।
महेन्द्रनाथ गुप्त म्हणे । शक्तिचे प्रमाण काही नेणे ।
परंतु दिसे मज स्पष्टपणे । मूर्तिमंत जाहली ती शक्ती ।। १३ ।।
मजला वाटते निश्चयेकरुन । येशु, चैतन्य आणि आपण ।
एकच आहात तिघेजण । यात शंकाच नसे मला ।। १४ ।।
अवतारांच्याविषयी माहिती । देत असता बाबा सांगती ।
जेवि भिंतीस खिडक्या असती । त्यातुनी प्रकाश पसरतसे ।। १५ ।।
सच्चिदानंदाचा प्रकाश पावन । अवतारांच्या खिडक्यांतुन ।
जगतास मिळत असे म्हणुन । अवतार असती आवश्यक ।। १६ ।।
त्यावर बोलला महेन्द्रनाथ । महाद्वार आपण असा तेथ ।
सच्चिदानंदाचा अनंत । प्रकाश येथुनी फाकतसे ।। १७ ।।
ठाकुर तयाला थोपटून । म्हणती तुजला आले कळुन ।
हे तर फारच झाले छान । समाधान मी पावलो ।। १८ ।।



महेन्द्र बोले आवडे मना । अव्यक्ताची उपासना ।
तयाला अव्यक्ताची साधना । रामकृष्णांनी सांगितली ।। १९ ।।

महेन्द्र म्हणे व्यक्त वस्तूत । मजला प्रिय असे सर्वांत ।
मानवदेहात भगवंत । व्यक्त झालेला पाहणे ।। १२० ।।

ठाकुर वदते झाले तयाला । इतुकेच पुरे असे तुजला ।
आणि तू तर बघतोस मजला । ऐकुनी तोषले महेन्द्रनाथ ।। २१ ।।

मग तया दिवसापासुन । महेन्द्र न जाणे काही अन्य ।
तयाने तन मन बुद्धी प्राण । रामकृष्णांना अर्पियले ।। २२ ।।

वाटे बाबांस कधी भेटेन । कधी तयांची सेवा करिन ।
कधी बोध तयांचा ऐकेन । ऐसे होउनि गेले तया ।। २३ ।।

रामकृष्णांवर तयाचे प्रेम । श्रद्धा भक्ती असे अनुपम ।
रामकृष्ण झाले परमधाम । महेन्द्रनाथ गुमाला ।। २४ ।।

ठाकुर म्हणती तयाप्रत । असे माझ्यात आणि तुझ्यात ।
पितापुत्रांचा संबंध सत्य । येइल कळुनी तुजलागी ।। २५ ।।

जोवर आला नव्हतास येथे । तोवर विस्मरण पडले होते ।
आता तू कोण कळेल तूते । अलिप्त राहा तू संसारी ।। २६ ।।

मग विनविती जगदंबेला । ठेव संसारी महेन्द्राला ।
त्यागी करू नकोस त्याला । तयाला पूर्णता दे अंती ।। २७ ।।

घडवी दर्शन मधुन मधुन । नातरी मन अस्थिर होउन ।
त्याग करिल हा संपूर्ण । संसारमय जीविताचा ।। २८ ।।

एकदा महेन्द्रनाथ म्हणाला । त्यागितो मी सर्वस्वाला ।
रामकृष्ण बोलती त्याला । ईश्वरमय तू झालास ।। २९ ।।

ईश्वर ठेवितो संसारात । प्रचारक जो असतो भक्त ।
नातरी जगदीश्वराची मात । कोण जगतात सांगेल ।। १३० ।।



यास्तव तुजला महेन्द्रनाथा । संसारी ठेवी जगन्माता ।
कार्य तियेचे करण्याकरिता । संसारात त्वां असावे ।। ३१ ।।
कधी रामकृष्ण जाती । निजभक्तांच्या गृहाप्रती ।
कीर्तन भजन नृत्य करिती । बोध करिती श्रोतेजना ।। ३२ ।।
उपदेश करिता श्रीठाकुर । आनंद सरितेस येई पूर ।
मुग्ध होउनी जाती नर । परिसुनि भाषण बाबांचे ।। ३३ ।।
वेदान्ताचे नवे नवे । सिद्धान्त तेथे उलगडावे ।
धर्मरहस्य सकळा कळावे । ज्ञानयज्ञ व्हावा अविरत ।। ३४ ।।
निर्गुण ब्रह्म सगुण जाहले । निराकार ते साकारले ।
मानवरूपात अवतरले । श्रीरामकृष्ण भगवान ।। ३५ ।।
वेदवचने नम्रता धरुन । बाहेर पडती मुखातून ।
तप्त सृष्टीस सुधासिंचन । करुनी ताप ती शमविती ।। ३६ ।।
जे जे बोलिती ते ते वेद । सहज बोलिती तोचि बोध ।
सर्वशास्त्रे होती विशद । आचरणाने ठाकुरांच्या ।। ३७ ।।
उपनिषदे ती बसली ओठी । जगत्कल्याण साधण्यासाठी ।
धर्मतत्त्वे करिती दाटी । प्रतिष्ठा आपुली वाढविण्या ।। ३८ ।।
भजन कीर्तनानंतर । करिती ऐसा उपदेश थोर ।
लय पावावा अज्ञानतिमिर । सर्वहि संशय लोपति ते ।। ३९ ।।
ज्ञानदीपांची उजळे दिवाळी । प्रकाशात परम तत्त्वे आली ।
कोण भाग्यवान मंडळी । श्रवणलाभ ज्या होत असे ।। १४० ।।
जन्मोजन्मी सत्कर्म केले । तयाचे जे पुण्य संचिले ।
काय येधवा उदया आले । श्रवण घडले म्हणूनिया ।। ४१ ।।
वचनामृत ते असे मधुर । अमर अव्यय निरंतर ।
यात कायसे नवल थोर । सूज्ञ साचार जाणती ।। ४२ ।।



जयांची तेथे उपस्थिती । तयांवर व्हावी अमृतवृष्टी ।
पुढिल अनंत पिढ्यांप्रती । काय असावे अवर्षण ।। ४३ ।।
भगवंताची योजना अद्‌भुत । अगम्य सामान्य जनांप्रत ।
निमित्त करुनी महेन्द्रगुप्त । वाक्सुधा शाश्वत जाहली ।। ४४ ।।
महेन्द्र म्हणे मी संसारात । व्यग्र प्रापंचिक कार्यात ।
यास्तव मज मिळता फुरसत । स्मरावया वचने बाबांची ।। ४५ ।।
साधावयास स्वकल्याण । वचनांचे मी केले टाचण ।
करिता यावे सदा मनन । आचरण घडावे त्यापरी ।। ४६ ।।
साधावयाला आत्महित । जे जे बोलिले श्रीभगवंत ।
महेन्द्रे लिहुनी ठेविले समस्त । न व्हावे विस्मृत यासाठी ।। ४७ ।।
परमेश्वराच्या प्रेरणेने । प्रसिद्ध झाली बोधवचने ।
रामकृष्णवचनामृताने । तृप्त जाहले जग सारे ।। ४८ ।।
यास्तव महेन्द्रनाथ गुप्त । आदरणीय असे सकलांप्रत ।
ज्याच्या प्रयत्नाने प्राप्त । वचनामृत जाहले जगताला ।। ४९ ।।
दिधला तयाने कल्पतरू । मायानदी तराया तारू ।
अविद्यातिमिरी ज्ञानभास्करू । उपकार केला जगताला ।। १५० ।।
भगवंतांची बोधवचने । मनन करिता शुद्ध मनाने ।
होई आत्मकल्याण साधणे । त्वरा करा हो सकळीक ।। ५१ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५२ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा सत्ताविसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय अठ्ठाविसावा

जय जय श्रीज्ञानभास्करा । भक्तिरसाच्या सागरा ।
योगविद्येचिया आगरा । नमन श्रीरामकृष्णांना ।। १ ।।
जयांनी घेउनी संन्यास । धर्मप्रचार केला विशेष ।
रामकृष्णांचे त्यागी शिष्य । येउ लागले त्यांच्याकडे ।। २ ।।
विद्यार्थी महाविद्यालयीन । तेजस्वी तरुण बुद्धिमान ।
धर्मज्ञानपिपासा लागुन । येउ लागले बाबांकडे ।। ३ ।।
तरुण त्यागी त्या शिष्यांत । राखालचंद्र घोष विख्यात ।
प्रथम दक्षिणेश्वराप्रत । पातला दर्शना बाबांच्या ।। ४ ।।
रामकृष्णांचे शिष्यरत्न । स्वामी ब्रह्मानंद म्हणुन ।
धर्मकार्य केले महान । राखाल बालपणीचे ते ।। ५ ।।
राखाल येण्याच्या अगोदर । भावावस्थेत असता ठाकुर ।
जगन्माता येउनी समोर । मांडीवर देई बालकाला ।। ६ ।।
अंबा म्हणे बाबांलागुन । तुझा मुलगा असे जाण ।
भयचकित होती रामकृष्ण । रोमांच उभे राहिले ।। ७ ।।
बाबा म्हणती जगदंबेसी । मी तर असे गे संन्यासी ।
मुलगाबिलगा कुठला मजसी । काय बोलसी न कळे मला ।। ८ ।।
जगन्माता म्हणे हसुन । काय कळले नाही अजुन ।
तुझा मानसपुत्र महान । थोर त्यागी होइल हा ।। ९ ।।
ठाकुरांना धीर आला । समाधान वाटे मनाला ।
लोटता थोड्याच दिवसांला । राखाल आला दक्षिणेश्वरी ।। १० ।।



राखालचंद्रा पाहता क्षणी । जाणुनी घेतले ठाकुरांनी ।
अंबा देई जो दाखवुनी । तोचि मुलगा हा आहे ।। ११ ।।
आनंदमोहन घोष पिता । गावचा जमिनदार होता ।
राखालची भाविक माता । भक्त होती कृष्णाची ।। १२ ।।
वास्तव पुत्रास अभिधान । राखालचंद्र देई ठेवुन ।
गाईचे जो करी राखण । बालमित्र श्रीकृष्णाचा ।। १३ ।।
रामकृष्णांना एक दिन । झाले होते अद्‌भुत दर्शन ।
सहस्रदलकमल वाहुन । येताना दिसले गंगेत ।। १४ ।।
तया पद्माचा प्रकाश बहुत । उजळुनि गेला आसमंत ।
श्रीकृष्णाचा धरुनी हात । त्यावर बालक उभा असे ।। १५ ।।
राखालचंद्रा पाहता क्षणी । जाणिले त्वरित ठाकुरांनी ।
श्रीकृष्णाचा हात धरुनी । उभा होता हा कमलात ।। १६ ।।
सांगत असती रामकृष्ण । जगन्माता देई दाखवुन ।
राखाल व्रजातिल गोप जाण । सवंगडी हा कृष्णाचा ।। १७ ।।
राखालचा बालकभाव । सान शिशुसमान स्वभाव ।
ठाकुर वागविती सदैव । तयाला मुलाच्या सारिखे ।। १८ ।।
राखाल येत असे धावुन । त्यांच्या मांडीवर बसे येउन ।
तयाला वाटे आता येथुन । घरी कधीही जाऊ नये ।। १९ ।।
बाबा तयाला मधुन मधुन । बळेच घरास देती धाडुन ।
न यावा पित्यास राग म्हणुन । येणे थांबविल ना तरी ।। २० ।।
बाबांकडे न जावे म्हणुन । पिता करू पाहे प्रयत्न ।
पुढे तयाला आले कळुन । बहुत जन येती त्या ठायी ।। २१ ।।
विद्वान, श्रीमंत, अधिकारी । सतत येतात दक्षिणेश्वरी ।
हे पाहुनी पिता न करी । विरोध मुलाच्या जाण्याला ।। २२ ।।



राखाल होता विवाहित । सासरची मंडळी समस्त ।
दक्षिणेश्वरास येती नित्य । नव्हता विरोध तयांचा ।। २३ ।।
मनमोहन मित्राची भगिनी । होती राखालची पत्नी ।
एकदा तिजला सवे घेउनी । तियेची माता पातली ।। २४ ।।
संशय ठाकुरांच्या मनी । राखालच्या भक्तिची हानी ।
करिल काय त्याची पत्नी । म्हणुनी तिजला न्याहाळिले ।। २५ ।।
राखालपत्नीची परीक्षा करुन । रामकृष्ण पावले समाधान ।
म्हणती दैवीशक्ति ही महान । भयाचे कारण काही नसे ।। २६ ।।
राखालास हिच्यापासुन । काही येणार नाही अडचण ।
आनंदले तयांचे मन । सारदादेवीला बोलाविले ।। २७ ।।
म्हणती पाहुनी घेई सून । रुपया खाउसाठी देऊन ।
करी तियेची बोळवण । फार छान सून मिळाली ।। २८ ।।
बाबांस पाहता देहभान । राखाल जातसे विसरून ।
बालकभाव होइ उत्पन्न । मनात राखालचंद्राच्या ।। २९ ।।
ठाकुर भावाविष्ट होती । दूध लोणी तयास देती ।
खांद्यावरही कधी घेती । खेळविती पुत्राप्रमाणे ।। ३० ।।
राखाल सान बाळापरी । खोड्याहि करी दक्षिणेश्वरी ।
ठाकुर तंबी देती भारी । करिती शिक्षा कधी कधी ।। ३१ ।।
एकदा प्रसादाचे लोणी । भूक लागली होती म्हणुनि ।
राखाल टाकी सारे भक्षुनी । बाबा तयाला रागावले ।। ३२ ।।
तयाला म्हणती रामकृष्ण । लोभ सोडावा येथे येउन ।
तू तर नवनीत खाशी पूर्ण । काय म्हणावे तुजलागी ।। ३३ ।।
मग त्या दिवसापासुन । राखाल देई लोभ सोडुन ।
परि मनी असे अभिमान । लाडके आपण ठाकुरांचे ।। ३४ ।।



तेथे येती जे भक्त इतर । त्यांवर प्रेम करिती ठाकुर ।
राखालच्या मनात मत्सर । उत्पन्न होतसे तेधवा ।। ३५ ।।
बाबांस भीती वाटे मनात । आई इथे जे आणिते भक्त ।
द्वेष तयांचा करिता अहित । व्हावयाचे खचित राखालचे ।। ३६ ।।
त्याकाळी मग एक दिवस । अंबा दाखवी ठाकुरांस ।
दूर नेई ती राखालास । वाईट वाटले बाबांना ।। ३७ ।।
मग विनविती अंबेलागुन । माझा राखाल असे लहान ।
अजुनी बाळक असे अजाण । यास्तव अभिमान करितसे ।। ३८ ।।
हळुहळु तयाला येइल कळुन । सकळ अभिमान जाइल गळुन ।
जेथे नेसिल तेथे पूर्ण । सुखात तयाला असू दे ।। ३९ ।।
राखालचे स्वास्थ्य बिघडुन । हवापालट करावी म्हणुन ।
वृन्दावनास तयालागुन । नेले तयाच्या पितयाने ।। ४० ।।
तेथे ठीक नाही प्रकृती । कळता हे ठाकुरांप्रती ।
तयाची चिंता करिती चित्ती । जाणत असती रामकृष्ण ।। ४१ ।।
राखाल गोप हा व्रजातिल । गोष्टी आठवी जर मागिल ।
देह तत्क्षणी तो त्यागिल । म्हणुनी मातेला प्रार्थिती ।। ४२ ।।
प्रसन्न होउनि जगन्माता । म्हणे कशाला करिसी चिंता ।
आपुले कार्य करण्याकरिता । राखाल परत येईल ।। ४३ ।।
मग काही दिवसांनंतरी । राखाल आला दक्षिणेश्वरी ।
रामकृष्णांची चिंता सारी । नाहिसी झाली तत्काळ ।। ४४ ।।
रामकृष्ण लक्ष लावुन । राखालला देती शिक्षण ।
अतिसूक्ष्म तयांचे निरीक्षण । भाव जाणती सकलांचा ।। ४५ ।।
चूक घडताच कोणाकडुन । तत्काल जाणती रामकृष्ण ।
कान उघडणी त्याची करुन । मार्गास लाविती भक्ताला ।। ४६ ।।



एकदा राखाल दर्शना आला । रामकृष्ण पुसती तयाला ।
काळी छाया तुझ्या मुखाला । आली कोण्या कारणाने ।। ४७ ।।
वाटे काहीतरी विपरित । तुजकडुनी घडली मात ।
ऐकुनि राखाल झाला चकित । तयाला काही आठवेना ।। ४८ ।।
म्हणाला अनिष्ट मजकडुन । स्मरेना काय गेले घडुन ।
बराच वेळ करिता प्रयत्न । आठवण झाली तयासी ।। ४९ ।।
केवळ गंमत करावी म्हणुन । दिली होती थाप ठोकुन ।
बाबा म्हणती असत्य भाषण । विनोदातही करू नये ।। ५० ।।
बाबांस वाटे भक्त तरुण । आत्मोन्नती तयांनी करुन ।
समर्थ व्हावे यथार्थ ज्ञान। करण्या वितरण जगताला ।। ५१ ।।
कधी कधी रामकृष्णदेव । पाहुनी निजभक्ताचा भाव ।
आपुल्या कृपेचा वर्षाव । करिती अवचित भक्तावर ।। ५२ ।।
एकदा कालीसमोर बसुन । राखाल करीत असता ध्यान ।
सहज पातले रामकृष्ण । पाहती ध्यान राखालचे ।। ५३ ।।
मग तयाला स्पर्श करुन । म्हणती हा तुझा मंत्र जाण ।
इष्ट दैवत देती सांगुन। ऐकुनी राखाल संतोषला ।। ५४ ।।
इष्ट देवाचे घडले दर्शन । राखाल तत्काळ गेला मोहुन ।
आनंद जाई गगन भेदुन । अनपेक्षित कृपा बाबांची ।। ५५ ।।
ठाकुरांच्या जवळ राहुन । राखाल करू लागला साधन ।
तयाची प्रगती असाधारण । वेगेकरुनी होत असे ।। ५६ ।।
होउनि जातसे ध्यानात मग्न । देहाचेही न राहे भान ।
जगताची जाणीव संपूर्ण । लुप्त होउनी जात असे ।। ५७ ।।
रामकृष्ण मग तेथे येती । करावयाला सामान्य स्थिती ।
उपाय करुनी खाली आणिती । जाणीव करविती जगताची ।। ५८ ।।



निजभक्ताची असाधारण । अध्यात्मस्थिती अवलोकुन ।
प्रसन्न होउनी रामकृष्ण । करिती प्रशंसा राखालची ।। ५९ ।।

राखाल राहे रात्रंदिन। ईश्वराच्या ध्यानात मग्न ।
करितसे सदैव नामस्मरण । चिंतन परमेश्वराचे।। ६० ।।

राखालचंद्राप्रती पाहुन । ठाकुर होती समाधिमग्न ।
मुदित होतसे अंत:करण । थोरवि पाहुनि शिष्याची ।। ६१ ।।

राखालची योग्यता पाहुन । त्यास शिकविती रामकृष्ण ।
राजयोग विद्या गहन । प्रमेये अध्यात्ममार्गाची ।। ६२ ।।

राखाल प्रसिद्धिपराङ्मुख। येऊनही अनुभव अनेक ।
कोणास न सांगे राहे मूक । बाणला विवेक अंगात ।। ६३ ।।

तेज झळके वदनावर। सदाचरण आणि सुविचार ।
भाषण येत असे मधुर। अंत:करण त्यामुळे कळे ।। ६४ ।।

स्वभावातहि झाला बदल । हृदय झाले अति कोमल।
भूतमात्रांसी दयाशील । सहनशीलता उद्भविली ।। ६५ ।।

तथापि अध्यात्ममार्ग गहन। मार्गात विघ्ने येती महान ।
भल्याभल्यांना येइ अडचण । साधना करित असता ते ।। ६६ ।।

एकदा कालीच्या मंदिराला। राखाल ध्यान करावा बैसला ।
बहुत काळ प्रयत्न केला। लावावयाला ध्यान तये ।। ६७ ।।

परंतु लागले नाही ध्यान । इकडे तिकडे भटके मन ।
पूर्णपणे मग निराश होउन । विचार करु तो लागला ।। ६८ ।।

येथे पवित्र वातावरण । सद्गुरु प्रत्यक्ष रामकृष्ण ।
इतुकी अनुकुलता मज असुन। ध्यान का बरे लागू नये ।। ६९ ।।

की मी अध्यात्ममार्गालागुन। काय अपात्र असेन अजुन ।
बहुत विषण्ण होउनी मन। ध्यानासन सोडुनी तो उठल।। ७० ।।



चमत्कार घडला तितुक्यात । ठाकुर तेथे आले फिरत ।
विचारती तू इतुक्यात । ध्यानासन का सोडिले ।। ७१ ।।
राखाल स्पष्टपणाने बोलुन । मोकळे करी आपुले मन ।
गंभीर झाले रामकृष्ण । जवळ तयाला बोलाविले।। ७२ ।।
म्हणती उघड तुझे वदन । मंत्र अस्पष्ट उच्चारुन ।
त्याच्या जिभेवर दिधला लिहुन । म्हणती ध्यान करी आता ।। ७३ ।।
ऐसी अवचित कृपा होता । तत्काळ निमाली अस्थिरता ।
चित्तात आनंदाची सरिता । वाहु लागली तयाच्या ।। ७४ ।।
तत्काळ एकाग्र झाले मन। विसरुनि गेला देहभान ।
चित्त विसरले विषयचिंतन। अभूतपूर्व ध्यान लागले ।। ७५ ।।
रामकृष्णांची अपार शक्ती। ज्याच्यावर ते कृपा करिती ।
तयास अध्यात्माची प्राप्ती। अत्यंत सुलभ होत असे ।। ७६ ।।
आपुल्या हस्तस्पर्शेकरुन । अथवा दृष्टिक्षेप करुन ।
केवळ इच्छामात्रेकरुन। अध्यात्मदान ते करिती ।। ७७ ।।
ईश्वराची शक्ती पूर्ण । भूमीवर झाली अवतीर्ण।
नाम घेउनी रामकृष्ण । अवनी पावन करावया ।। ७८ ।।
राखालचंद्र आल्यानंतरी। दोन तीन महिन्यांभीतरी ।
नरेन्द्रनाथ दक्षिणेश्वरी । आश्रया आला ठाकुरांच्या ।। ७९ ।।
पुढती हेच नरेन्द्रनाथ । स्वामी विवेकानंद विख्यात ।
धर्मप्रचार जगतात। करुनी कीर्ती गाजविली ।। ८० ।।
नरेन्द्रास सांगती भगवान । राखालची योग्यता महान ।
चालवावया राज्य विस्तीर्ण । सामर्थ्य आहे तयाला ।। ८१ ।।
नरेन्द्र गेला समजून। राखालची योग्यता महान ।
नरेन्द्रादि तेव्हापासुन । म्हणती 'राजा' राखालला ।। ८२ ।।



रामकृष्णांचे शिष्य तरुण । पुढती संन्यास करिती ग्रहण ।
राखालचंद्र करी धारण । नाम स्वामी ब्रह्मानंद ।। ८३ ।।

ब्रह्मानंद स्वामींची थोरवी। केवि ती वाणीने वर्णावी ।
सामान्यांची दृष्टि न जावी । एवढे उत्तुंग स्थान त्यांचे ।। ८४ ।।

बेलुर मठाचे प्रथमाध्यक्ष। कर्तव्यास अत्यंत दक्ष।
ब्रह्मानंद स्वामी प्रत्यक्ष । आदर्श कर्मयोग्यांचे ।। ८५ ।।

रामकृष्ण मठ आणि मिशन। अध्यक्षत्व तयांचे करुन ।
करिते झाले मार्गदर्शन । सकळ साधकजनांप्रती।। ८६ ।।

रामकृष्णांचे लाडके बाळ। प्रत्यक्ष व्रजातिल राखाल ।
श्रीकृष्णाचा लडिवाळ । मित्र बाळपणीचा हा ।। ८७ ।।

ठाकुर कधी कधी सांगती। राखाल नरेन्द्रादी मूर्ती ।
अवनीवरती अवतरती। केवळ जगदुद्धारास्तव ।। ८८ ।।

तरुण मुले ही नित्यमुक्त । प्रत्यक्ष ईश्वरकोटी होत ।
यांच्याद्वारे जगतात । ईश्वरशक्ती प्रकाश दे ।। ८९ ।।

कठोर तपस्या आचरुन । करुनी पूर्णत्व संपादन ।
करिती अध्यात्मज्ञानदान। ब्रह्मानंद जगताला ।। ९० ।।

ब्रह्मानंद म्हणती आपण । आपुल्या मनाला करावा प्रश्न ।
सर्व शक्ती एकवटुन । अध्यात्मसाधन करतो का ।। ९१ ।।

रात्री पुसावे स्वये स्वत:ला । परमेशप्राप्ती व्हावयाला।
केवढा वेळ खर्च केला । खर्चला केवढा अन्यत्र ।। ९२ ।।

ईश्वर प्राप्तीसाठी केवळ । खर्च झाला नाहि जो काळ ।
तो तर व्यर्थ गेला सकळ । थोर हानि ती समजावी ।। ९३ ।।

अवतार श्रेष्ठ रामकृष्ण । तयांचे कार्य कराया पूर्ण ।
राखालचंद्र घेई जनन। मार्गदर्शन करी जगताला ।। ९४ ।।



रामकृष्णांचा दुसरा भक्त । नागमहाशय विख्यात ।
असुनही गृहस्थाश्रमात। थोर त्यागी तो असे ।। ९५ ।।
श्रद्धा तयाची असे अनन्य । करुणापूर्ण तदंत:करण ।
नम्रता असे असाधारण । लवलेश नसे अहंतेचा ।। ९६ ।।
रामकृष्णदेवांचे वचन। मानितसे तो वेदासमान ।
नाम तयाचे दुर्गाचरण । नाग उपनाम कुळाचे ।। ९७ ।।
होमिओपथीचा तो डॉक्टर । त्या शास्त्रात प्रवीण फार ।
लोकांवर करी उपकार । फुकट उपचार गरिबांना ।। ९८ ।।
कोणी असताही श्रीमंत । औषधीची न मागे किंमत।
कपडे द्रव्य तो असे देत । गरजेप्रमाणे गरिबांना ।। ९९ ।।
एकदा एका रुग्णाला । काही नव्हते पांघरायला।
पाहुनी लोकरी ब्लँकेट त्याला । देउनी टाकिले महाशये।। १०० ।।
एका श्रीमंताचा दुर्धर । महाशय करी रोग दूर ।
द्रव्य देऊ लागता अपार । न करी स्वीकार धनाचा ।। १ ।।
म्हणाला माझी जेवढी झाली । तेवढी फी पाहिजे घेतली ।
बाकीची रक्कम परत केली । राग मग आला जनकास ।। २ ।।
नाग महाशय असे उदार । प्रपंचाची न करी फिकिर।
कसातरी चालवी संसार । सदाचार परंतु सोडीना ।। ३ ।।
केशवचंद्र सेनाकडुन । रामकृष्णांचे वर्तमान ।
कळता आले दोघेजण । सुरेश आणि महाशय ।। ४ ।।
दक्षिणेश्वराला आले चालुन । कोणी चुकीने त्यालागुन ।
सांगितले तेथे वर्तमान । रामकृष्ण गेले शहरात ।। ५ ।।
निराश झाले दोघेजण । इतुक्यात जावे परतून ।
तव दिसले खूण करुन । बाहत आहे कोणीतरी ।। ६ ।।



जव जाउनी पाहती आत । तव रामकृष्ण साक्षात ।
कराया जाता प्रणिपात। वारिती तयाला रामकृष्ण ।। ७ ।।
वाटले नाग महाशयास । पवित्र पदांना स्पर्शावयास ।
आपण शुद्ध नाही खास । यास्तव स्पर्शू न देती ।। ८ ।।
ऐसा मनात येता विचार । तयाला दुःख वाटले फार ।
वाटे होउनी अधिक पवित्र । व्हावे पात्र पदस्पर्शाला ।। ९ ।।
रामकृष्ण पुसती तयाला । काय तुमचा विवाह झाला ।
म्हणती हरकत नाही त्याला । परंतु अलिप्त असावे ।। ११० ।।
संसारात जरी असावे । संसाराचे मात्र नसावे ।
परमेश्वराला आठवावे । सर्वकाळ आपुल्या अंतरी ।। ११ ।।
आपण जगतामधे असुन। स्पर्शु न द्यावी जगाची घाण ।
पद्मपत्र पाण्यात राहुन । जळापासुनी अलिप्त असे ।। १२ ।।
नाग बाबास टक लावुन। पाहता पुसती रामकृष्ण।
काय बघसी न मिटविता नयन । तो म्हणे दर्शन घेत असे ।। १३ ।।
तयांना सांगती रामकृष्ण । पंचवटीत तुम्ही जाउन ।
थोडा वेळ ध्यान करुन । मग परतुनी या येथे ।। १४ ।।
परत आले करुनी ध्यान। गेले बाबांचा निरोप घेउन ।
परि नागमहाशयाचे मन। जडले चरणी ठाकुरांच्या ।। १५ ।।
तयास वाटे असती कोण । सत्पुरुष अथवा योगी महान ।
किंवा थोर त्याच्याहीहुन। रामकृष्णदेव असती का ।। १६ ।।
आपुल्या अवस्थेचा संशय । येउनि मनात उद्भवे भय ।
अशा स्थितीत नागमहाशय । पुनरपि आला दक्षिणेश्वरा ।। १७ ।।
तयाला प्रेमाने रामकृष्ण । आपुल्यापाशी घेती बसवुन ।
म्हणती का भीतोस महान । उच्च अवस्था असे तुझी ।। १८ ।।



पंचवटीत आता जाउन । थोडा वेळ तू करी ध्यान ।
सुरेशला करिती कथन । प्रज्वलित अग्नी नाग असे ।। ११९ ।।
पुनरपि दक्षिणेश्वराला । एकटा नाग महाशय आला ।
समाधि लागली ठाकुरांला। महाशयाला पाहताच ।। १२० ।।
पाहुनि बाबांची ती स्थिती । नाग घाबरला चित्ती।
तव ठाकुर तयाला म्हणती। तू तर आहेस डॉक्टर ।। २१ ।।
काय झाले मम पायाला । तपासुनी तू सांग मजला ।।
काहि न झाले म्हणता तयाला । बाबा म्हणती पुन्हा पाहा ।। २२ ।।
पुनरपि करी तो निरीक्षण । काही येइना आढळून।
तयाला मग आले कळुन । अपूर्व संधी दिली मला ।। २३ ।।
स्पर्शू दिले नाही पदाला। खेद झाला होता मजला।
आज भाग्याची आली वेला । परिपूर्ण केले मनोरथ ।। २४ ।।
महाशय म्हणे ठाकुरांप्रती। मनातिल सर्व गोष्टी कळती।
ज्यास जे लागे त्यास ते देती । मागण्याची गरज नसे ।। २५ ।।
दोन तीन भेटींनंतर । मजला कळून आले ठाकुर ।
परमेश्वराचा ते अवतार । सांप्रत भूवर अवतरले ।। २६ ।।
हजारो वर्षे तपस्या करुन । ईश्वरास जाणणे कठिण ।
तयाची कृपा होता पूर्ण । मानव तयाला जाणु शके ।। २७ ।।
मजवर त्यांची कृपा जाहली । म्हणुनि मज ही गोष्ट कळली ।
रामकृष्णरूपे या काळी । येई प्रत्यक्ष परमेश ।। २८ ।।
एकदा बाबांनी प्रश्न केला । मी कोण आहे वाटे तुजला ।
महाशय वदे कळले मजला । सर्व तुमचीच कृपा असे ।। २९ ।।
महाशयाचे उत्तर ऐकुन । ठाकुर झाले समाधिमग्न ।
तयांनी आपुला उजवा चरण । ठेविला त्याच्या छातीवर ।। १३० ।।



त्या चरणांचा होताच स्पर्श । हृदयात पडला दिव्य प्रकाश ।
दिसले वस्तु ज्या आसपास। समस्त धुवुनी निघाल्या ।। ३१ ।।
यापरी विविध अद्‌भुत अपूर्व। महाशयाला आले अनुभव ।
जडला तयाचा अनन्य भाव। रामकृष्णांच्या चरणांवर ।। ३२ ।।
महाशय असता बसलेला। तितुक्यात नरेन्द्र तेथे आला।
रामकृष्ण सांगती नरेन्द्रला । खरी नम्रता याची असे ।। ३३ ।।
ढोंग अथवा अहंकार । याचे जवळ नसे अणुमात्र ।
अति शुद्ध असे व्यवहार । नाग महाशय भक्ताचा ।। ३४ ।।
तेथे थोड्याच वेळात । चर्चा निघाली दोघाजणांत ।
नाग महाशय प्रतिपादित । ईश्वराधीन सर्व काही ।। ३५ ।।
अज्ञ बोलितो अजाणता । मीच सर्व गोष्टींचा कर्ता ।
न कळे तयास असे सत्ता। कर्तृत्व परमेश्वराचे ।। ३६ ।।
त्या काळात नरेन्द्रनाथ । अद्वैत साधन असे करित।
वदला नागमहाशयाप्रत । यावर माझी श्रद्धा नसे ।। ३७ ।।
मीच असे या वस्तू समस्त । जाहलो विश्व व्यक्ताव्यक्त ।
माझ्यावाचुनी यत्किंचित। विश्वात ठाव रिता नसे ।। ३८ ।।
नाग महाशय वदला त्यास । काळ्याचा एकही पांढरा केस ।
करिता येइना मानवास । काय कथा मग विश्वाची ।। ३९ ।।
झाडावरचे एकही पान । न हाले त्याच्या आज्ञेवाचुन ।
कर्ता करविता एक भगवान । व्यर्थ अभिमान मानवाचा ।। १४० ।।
नरेन्द्र वदला माझी शक्ती । चालवी चराचर वस्तूंप्रती ।
चंद्रसूर्यात माझी दीप्ती । काहीच मजवीण असेना ।। ४१ ।।
वाद करिती जो दोघेजण । ठाकुर ऐकती लक्ष देउन ।
आनंदले वाद ऐकुन । सांगती नागमहाशया ।। ४२ ।।



नरेन्द्र अग्नी प्रज्वलित । शोभते हे त्याच्याच मुखात ।
महाशयाची पटली समजुत । कळली थोरवी नरेन्द्राची ।। ४३ ।।
एकदा ठाकुर गेले बोलुन । दलाल वकील वैद्यजन ।
धर्म लाभ अशांना होणे कठिण । घेइ ऐकुनी महाशय ।। ४४ ।।
तयाने आपुल्या घरी येउनी। औषधे पुस्तके गुंडाळुनी ।
गंगानदीत दिली फेकुनी । सोडिला धंदा वैद्यकीचा ।। ४५ ।।
वार्ता कळताच पितयाला। बहुत प्रयत्न तयाने केला।
महाशयाने नाही बदलला। निश्चय केलेला एकदा ।। ४६ ।।
पित्यास चिंता लागली थोर । चालविल कसा हा संसार ।
आपुली नोकरी त्यास सत्वर । मालकाकडुनी देवविली ।। ४७ ।।
एकदा महाशयाच्या मनी । तीव्र वैराग्य उत्पन्न होउनी ।
वाटले संसारत्याग करुनी । संन्यास घ्यावा अविलंबे ।। ४८ ।।
ऐसा विचार असता मनात। दक्षिणेश्वराला आला त्वरित ।
बाबा भावसमाधीत । पाहताच म्हणती तयासी ।। ४९ ।।
राहावयाला संसारात। काय तुजला असे हरकत ।
ईश्वरचरणी असावे चित्त। मग भीती काही असेना ।। १५० ।।
जनकासमान संसारात । असुनही राहावे अलिप्त ।
आदर्श गृहस्थजनांप्रत । होउनि असावे आता त्वा ।। ५१ ।।
ठाकुरांचे वचन ऐकुन। मानुनी त्यांचा शब्द प्रमाण ।
संन्यासाचा विचार सोडुन । परत फिरला गृहाप्रती ।। ५२ ।।
गाय बांधिली गोठ्यात । वेल होती अंगणात ।
गाय खावया धडपडत। परंतु पुरेना तोंड तिचे ।। ५३ ।।
महाशयांनी धडपड पाहुनी । गाईला मोकळे दिले करुनी ।
तिने वेल टाकिली खाउनी । पाहुनी पिता रागावला ।। ५४ ।।



वदला कमाई नाही करित । उलट आणिसी तोट्यात ।
वैद्यकी सोडुनी बससी स्वस्थ । काय खाशील कळेना ।। ५५ ।।
पुत्र पित्याला झाला वदता । करु नये तुम्ही त्याची चिंता ।
ईश्वर आहे माझा त्राता । काळजी करिल तो माझी ।। ५६ ।।
पिता म्हणाला आले कळुन। फिरसिल तू नंगा होउन ।
राहशील बेडकांना खाउन । न देई उत्तर महाशय ।। ५७ ।।
परि तो उठला ते ऐकुन । सर्व कपडे टाकिले काढुन ।
मृत मंडुक एक आणुन । कचकचा दातांनी चावला ।। ५८ ।।
मग तो म्हणाला पितयाला । दोन्ही आज्ञा तुमच्या पाळिल्या।
माझी चिंता मनी आपुल्या। कृपा करुनी करू नका ।। ५९ ।।
पिता मनामधे समजला। विरोध करणे व्यर्थ याला ।
सांगे मग आपुल्या सुनेला । करु द्या याला करिल तसे ।। १६० ।।
एकदा ठाकुरांकडे येउन । नाग महाशय करी कथन ।
मनात वसतो अभिमान। ईश्वरशरण नाही झालो ।। ६१ ।।
धगधगित वैराग्य त्याचे पाहुन । बाबा करिती समाधान ।
सांगती तुझ्याकडे पाहुन । सर्वजन आश्चर्य करितील ।। ६२ ।।
तुवा असावे संसारात । जगास व्हावे आदर्शभूत ।
माया तुजला यत्किंचित । करू शकेना स्पर्शही ।। ६३ ।।
आजारी असता श्रीठाकुर । देहाचा दाह होतसे फार ।
नाग महाशय होता समोर । तयाला जवळ बोलाविले ।। ६४ ।।
दाह शमावा बाह्य कारण । परंतु कृपा करावी म्हणुन ।
बराच वेळ आलिंगन। दिधले नागमहाशया ।। ६५ ।।
महाशय आला एके दिवशी । त्या दिनी होती एकादशी।
उपवास होता महाशयासी । ठाउक नव्हते भक्ताला ।। ६६ ।।



तयाने भोजन घ्यावयाला । आग्रह केला महाशयाला ।
नाग म्हणे उपवास आजला । तरिही अन्न घेइन मी ।। ६७ ।।
जर ठाकुर कृपा करुन । खाद्यपदार्थांना स्पर्शुन ।
पवित्र करतिल तर ते अन्न । सेवन करिन मी आनंदे ।। ६८ ।।
महाशयाचा भाव जाणुन । अन्न स्पर्शिती रामकृष्ण ।
आनंदित मग नाग होउन । सत्वर बसला भोजनास ।। ६९ ।।
तयाने भक्षण केले अन्न । एकही उरू नेदी कण ।
मग खाऊ लागला पान । ज्यावर अन्न होते ते ।। १७० ।।
रामकृष्णांचा स्पर्श होउन । अति पवित्र झाले पान ।
वाटे कैसे द्यावे टाकुन । अवमान होइल प्रसादाचा ।। ७१ ।।
महाशयाच्या जीवनात । आश्चर्यकारी घटना अमित ।
ऐकुनि वाटते आपुल्या मनात। शक्य असे का जीवन हे ।। ७२ ।।
नाग महाशयाचे चरित । आमूलाग्र असे अद्‌भुत ।
परि ते कथिले थोडक्यात । संबंधात रामकृष्णांच्या ।। ७३ ।।
रामकृष्णांची कृपा होउन । महाशयाचे जीवन धन्य ।
गृहीभक्ताचे उदाहरण । सापडणे कठिण यापरी ।। ७४ ।।
गिरिश म्हणाला दोघेजण । जयांना माया न करी बंधन ।
विवेकानंदांचे विशालपण । बंधन पुरेना मायेचे ।। ७५ ।।
दुसरे नागमहाशय । नम्रतेने सान होय ।
जाळ्यातून निसटुनी जाय । माया मग कशी बांधेल ।। ७६ ।।
विवेकानंद गेले बोलुन । नागमहाशये जन्म घेउन ।
पूर्व बंगाल देश पूर्ण । केला पावन वास्तव्ये ।। ७७ ।।
रामकृष्णांचे भक्त अनेक । जयांचे स्मरणही क्षण एक ।
करिता भस्म होतसे पातक । ठेवितो मस्तक तच्चरणी ।। ७८ ।।



श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १७९ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा अठ्ठाविसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय एकोणतिसावा

ॐ नमो श्रीआनंदकंदा । रामकृष्णविवेकानंदा ।
कलीत तारावया जनवृन्दा । नर नारायण अवतरले ।। १ ।।
रामकृष्ण विवेकानंद । काय येथे म्हणावे द्वंद्व।
एकचि तत्त्व झाले द्विविध। लोककल्याण करावया ।। २ ।।
प्राचीन भारत झाले एक । एक जगत हे आधुनिक ।
अनुभूती आणि विवेक। झाले एक जनकल्याणा ।। ३ ।।
दोन बाजू एक नाणे । एक माणिक एक सोने ।
अलंकार तो एक होणे । गानवादनी लय एक ।। ४ ।।
एक प्रतिनिधी प्राचीनाचा। एक आधुनिक जगताचा ।
हृदयंगम संगम दोघांचा । कल्याण कराया विश्वाचे ।। ५ ।।
जगन्नायक श्रीभगवान । नामरूपे घेउनी दोन ।
जगात जाहला अवतीर्ण । उणीव दूर करावया ।। ६ ।।
पूर्वीचा जो नरेन्द्रनाथ। पुढती संन्यासदीक्षेत ।
विवेकानंद हे नाम घेत। विख्यात जगतात जे झाले ।। ७ ।।
विवेकानंदांचे चरित्र अगाध । व्यक्तिमत्त्व थोर बहुविध ।
जीवन आमूलाग्र शुद्ध । अबुद्धे केवि ते वानावे ।। ८ ।।
विवेकानंदांचे चरित अपार । परी रामकृष्णांचा जेथवर ।
संबंध आला तयाचे सार । थोडक्यात पुढती सांगतसे।। ९ ।।
नरेन्द्राविषयी बाबा म्हणती । अनेक लोक येथे येती ।
परी नरेन्द्रासारखा निश्चिती । एकही त्यातील असेना ।। १० ।।



कोणी दशदल षोडशदल। फार तर कोणी असे शतदल ।
परंतु नरेन्द्र सहस्रदल । विकसित कमल असे हा ।। ११ ।।
कोणी गडवा कळशी असती। फार फार तर घागर होती ।
परी नरेन्द्र असे निश्चिती । भला थोरला हंडाच ।। १२ ।।
कोणी असे डबके विहिर । तलाव कोणी फार तर ।
तथापि नरेन्द्र सरोवर । त्यासम दुसरा कोणी नसे ।। १३ ।।
दत्त घराणे कलकत्त्यात । होते अतिशय विख्यात ।
वकिलीचा धंदा दत्त । राममोहन करित असे ।। १४ ।।
आपुल्या धंद्यात असे कुशल । पैसा मिळविला पुष्कळ ।
दुर्गाचरण तयाचा बाळ । धर्माकडे कल तयाचा ।। १५ ।।
संसारात नसेचि मन । होताच एक पुत्ररत्न ।
संसाराचा त्याग करुन । तीर्थाटनास तो गेला ।। १६ ।।
तयाचा पुत्र विश्वनाथ । तो असे वकिल विख्यात ।
तयाने आपुल्या धंद्यात । पैसा बहुत कमाविला ।। १७ ।।
विश्वनाथ दत्ताची पत्नी । भुवनेश्वरी देवी नाम्नी ।
स्वरूपसुंदर असे सद्गुणी । भक्तिपरायण बुद्धिमती ।। १८ ।।
नव्हती ती शिकली फार । परी बहुश्रुत असे अपार ।
रामायण महाभारत थोर । ग्रंथ अवगत तिज होते ।। १९ ।।
सहिष्णु आणि धैर्यशालिनी । करुणार्द्र असुनही तेजस्विनी ।
कामात दक्ष स्वभाव मानी । ऐसी जननी नरेन्द्राची ।। २० ।।
विश्वनाथ दत्त आप्तवत्सल । उदार, खर्चिक आणि दयाळ ।
अंत:करण असे कोमल । शांत गंभीर स्वभाव असे ।। २१ ।।
अशा आइबापांच्या पोटी । तीन चार मुलींच्या पाठी ।
नरेन्द्र जन्मला यासाठी । लाडका असे तो दोघांचा ।। २२ ।।



आईने पुत्रासाठी नवस। वीरेश्वराला केला काशिस ।
पूर्व पुण्य आले फळास । आला जन्मास नरेन्द्रनाथ ।। २३ ।।
नवसास पावला वीरेश्वर । स्वत:च घेतला अवतार।
युगप्रवर्तन अवनीवर। उद्‌भवले पूर्तता करावया ।। २४ ।।
नरेन्द्र असाधारण बुद्धिमान । विषय कितीही असो कठिण ।
सहज लीलेने आकलन । तयाची बुद्धी करू शके ।। २५ ।।
सहज संपवी आपुला पाठ । निश्चिंत खेळे असे धीट ।
अत्यंत मधुर असे कंठ । सशास्त्र गायन तो शिकला ।। २६ ।।
वर्तन त्याचे असे प्रेमळ । अंत:करण अति कोमल ।
पाहुनी दु:खी दरिद्री दुर्बळ । कळवळ तयांची वाटतसे ।। २७ ।।
बाल्यात असे रागिट फार । क्रोधे आंग कापे थरथर ।
भयभीत होती जन इतर । येता क्रोध नरेन्द्रला ।। २८ ।।
आई म्हणे याच्यासाठी । मी विनविला होता धूर्जटी ।
काय तयाने माझ्यासाठी । भूतच्च जवळचे पाठविले ।। २९ ।।
नाहीतर कोणी रागावुन । करिल का असे आचरण ।
मग तियेने काढिले शोधुन । औषध तयाच्या क्रोधावर ।। ३० ।।
नाव घेउनी वीरेश्वर। थंड पाणि ओते डोक्यावर ।
तत्काळ क्रोध होउनी दूर । नरेन्द्र शांत होत असे ।। ३१ ।।
एक दिवस नरेन्द्र बदला। धर्मकर्म लागता करण्याला ।
काही मिळो वा न मिळो मजला । परंतु जिंकिला क्रोधरिपू ।। ३२ ।।
नरेन्द्रला बाल्यापासुन । फार आवडे करणे ध्यान।
इतुका तन्मय जाई होउन । उरेना भान शरिराचे ।। ३३ ।।
निजावयाच्या वेळेस । तेजोगोल दिसे तयास ।
तयाला होत असे भास । तो गोल फेकितो कोणीतरी ।। ३४ ।।



गोल येताचि सन्निधानी । आपण त्यात जातो बुडुनी ।
बाह्यसंज्ञेचा लोप होउनी । झोप तयाला लागतसे ।। ३५ ।।
कितितरि दिवस वाटे तयाला । अशीच झोप लागे सकला ।
पुढे कळुनी आले त्याला । तेजोगोल न दिसे कोणास ।। ३६ ।।
नरेन्द्र विद्यार्थी दशेत । जातसे ब्राह्मसमाजात ।
धर्मग्रंथांच्या अभ्यासात । गोडी तयाला वाटतसे ।। ३७ ।।
निरनिराळी मते पाहुन । वादविवाद त्यांचे ऐकुन ।
त्याची अधिकच गेली वाढुन । जिज्ञासा सत्य जाणण्याची ।। ३८ ।।
एकदा तयाची अकल्पित । रामकृष्णांशी झाली भेट ।
सुरेशचंद्र मित्र वसत । तयाच्या घराशेजारी ।। ३९ ।।
सुरेश ठाकुरांचा भक्त । तयांच्या दर्शना जाई नित्य ।
रामकृष्णांच्या सहवासात । अति आनंद मानितसे ।। ४० ।।
रामकृष्णांना घरी नेउन । सुरेश त्यांचे करी पूजन ।
त्यांच्या बोधामृताचे पान । अत्यानंदे करित असे ।। ४१ ।।
एकदा तयाच्या गृहाकारणे । रामकृष्णांचे झाले येणे ।
उपस्थितात चांगले गाणे । म्हणता न येइ कोणाला ।। ४२ ।।
सुरेशबाबुने शेजाऱ्याला। विश्वनाथ दत्ताच्या मुलाला ।
बोलाविले नरेन्द्राला । गावयाला भक्तिपदे ।। ४३ ।।
नरेन्द्राने तेथे येउन । भक्तिगीते गाइली छान ।
विवेकानंद रामकृष्ण । यापरी प्रथम भेटले ।। ४४ ।।
ठाकुरांनी जवळ जाउन । आंगावरील लक्षणे पाहुन ।
नरेन्द्रास म्हणती एक दिन । येई अवश्य दक्षिणेश्वरी ।। ४५ ।।
नरेन्द्राविषयी बाबांस बहुत । झाली होती दर्शने प्राप्त ।
त्यांतली काही ठाकुर सांगत । पुढे भक्तांना कधी कधी ।। ४६ ।।



म्हणती कलियुगी पृथ्वीवरी । नरेन्द्रासारखा अधिकारी ।
जाहला नाही आजवरी । नरेन्द्र ईश्वरकोटी असे ।। ४७ ।।

पूर्वी श्रीनरनारायण । जगत्कल्याण करावे म्हणुन ।
आचरती तपश्चर्या गहन । नरेन्द्र त्यांतील एक ऋषी ।। ४८ ।।

वैराग्य शुकदेवासमान। असमर्थ माया कराया बंधन ।
न लिंपे कमलदलासी जीवन । त्यापरी नरेन्द्र अलिप्त असे ।। ४९ ।।

एकदा रामकृष्ण भगवान। सहज सांगती आपुले दर्शन ।
समाधिस्थितीत होतो मग्न । उच्च स्थितीत मन गेले ।। ५० ।।

ज्योतिर्मयमार्ग अवलंबुन । अधिकाधिक उंच जाई मन ।
अनेक दृश्ये येती दिसुन । वरवर गमन मन करता ।। ५१ ।।

चंद्रसूर्यनक्षत्रमंडित। ओलांडिले हे स्थूल जगत ।
अतिसूक्ष्म भावजगतात । माझे मन मग प्रवेशिले ।। ५२ ।।

उच्च भावभूमिकेमधुन । प्रवास करीत असता मन ।
देवदेवतांच्या भावघन । विचित्र मूर्ती आढळल्या ।। ५३ ।।

हळुहळु संपले भावजगत। असे ज्योतिर्मय पडदा तेथ।
पलीकडे अखंड असे समस्त । देहधारी कोणिही दिसेना ।। ५४ ।।

देवता दिव्यदेहधारी । तेथे न तयांची मातब्बरी ।
क्षितितरी खालच्या प्रदेशावरी। अधिकार आपुला गाजविती ।। ५५ ।।

दिसले थोड्याच वेळात । अखंडाच्या प्रदेशात ।
दिव्यदेहधारी सात । समाधिमग्न श्रेष्ठ ऋषी ।। ५६ ।।

ज्ञान पुण्य त्याग प्रेम । यांच्या मूर्तीच अप्रतिम ।
देवतांपेक्षा श्रेष्ठ परम । मानवाची काय कथा ।। ५७ ।।

त्यांच्या थोरवीचा विचार । करिता नवल वाटले फार ।
ज्योतिर्मंडल होते समोर । अंश तयाचा घनवटला ।। ५८ ।।



प्रकाशाचे बालक बनले । दिव्य स्वरूप असे आगळे।
रांगत रांगत बाळ गेले । अविलंबे एका ऋषीपाशी ।। ५९ ।।
अती कोमल स्वहस्तांनी । ऋषीच्या गळा मिठी घालुनी ।
मुखकमलातुनि अमृत वाणी । काढुनी हाका मारितसे ।। ६० ।।
हाका मारिता त्या काळी । ऋषीची समाधी उतरली ।
ऋषीची प्रेमळ दृष्टी पडली । तत्क्षणी दिव्य बाळावर ।। ६१ ।।
ऋषीची दृष्टी अति स्नेहाळ । त्याचे जीव की प्राण ते बाळ ।
बाळास वाटला आनंद फार । उतरता ऋषीची समाधी ।। ६२ ।।
बालक बोलले अवनीवर । जात आहे मी समोर ।
तुम्ही मागुनी यावे सत्वर । मजबरोबर कार्य करावया ।। ६३ ।।
रुकार ऋषीने देउन । पुनरपि झाले समाधिमग्न।
बालक पावले अंतर्धान । शांतता पसरली सर्वत्र ।। ६४ ।।
मग चमत्कार घडला विशेष। ऋषीच्या देहमनाचा अंश ।
ज्योतिरूपाने अवनीस । दिसला उतरत असलेला ।। ६५ ।।
पाहताक्षणीच नरेन्द्रासी । ओळखिले मी हा तो ऋषी ।
कलियुगी आला अवनीसी। धर्मकार्य करावया ।। ६६ ।।
ऐसे झाले अद्‌भुत दर्शन । तयाने सकळांस आले कळुन।
विवेकानंद श्रीरामकृष्ण । कोण कासया अवतरले ।। ६७ ।।
परब्रह्मस्वरूप प्रकाश । बालक झाले परमेश ।
रामकृष्णरूपे अवनीस। तारावयास अवतरले ।। ६८ ।।
पाळावयास तयांचा शब्द । ऋषिश्रेष्ठास अति आनंद ।
होउनि आले विवेकानंद । नरेन्द्र नाम पूर्वीचे ।। ६९ ।।
गुरुशिष्य दोघे सत्स्वरूप। धर्मकार्याचा करण्या व्याप ।
घेउनि आले मानवरूप । युगप्रयोजन पूर्ण केले ।। ७० ।।



जनरल असेंब्लीज संस्थेत । कॉलेजच्या प्रथम वर्षात ।
शिकत असता नरेन्द्रनाथ । हेस्टी असे प्रिन्सिपाल ।। ७१ ।।

तयाची विद्वत्ता शुद्धाचरण । शिष्यप्रेम सद्गुण पाहुन ।
नरेन्द्रास आदर महान। तयाच्याबद्दल वाटतसे ।। ७२ ।।

वर्ड्स्वर्थ शिकविताना । उदाहरणे देउनी नाना ।
भावसमाधीची कल्पना । विशद केली आपुल्यापरी ।। ७३ ।।

सांगे पावित्र्य असता पूर्ण । एकाग्र होऊ शकते मन ।
अशी अवस्था असाधारण । पुरुषास प्राप्त होत असे ।। ७४ ।।

ऐसे पुरुष असती क्वचित । माझ्यातरी पाहण्यात ।
दक्षिणेश्वरी मंदिरात । असती एक परमहंस ।। ७५ ।।

जाउनी दक्षिणेश्वरास । पाहता तयांच्या अवस्थेस ।
मजला वाटते तुम्हास । माहिती विशेष मिळू शके ।। ७६ ।।

ऐसे ऐकुनी वर्तमान । नरेन्द्र त्या दिवसापासुन ।
इच्छी दक्षिणेश्वरी जाउन । पाहावे समाधी काय असे ।। ७७ ।।

परंतु परीक्षा झाल्यावर । विश्वनाथबाबू करी विचार ।
नरेन्द्राचा आता सत्वर । विवाह उरकुनी टाकावा ।। ७८ ।।

तथापि विवाह करण्याला । नरेन्द्रने नकार दिधला ।
कळले रामचंद्र दत्ताला । कारण याला धर्मप्रेरणा ।। ७९ ।।

मग तो म्हणे नरेन्द्रला । धर्मलाभ जर घेणे तुजला।
उगीच ब्राह्मसमाजाला । जाण्यात काही लाभ नसे ।। ८० ।।

धर्मलाभ करावयास। तू जाई दक्षिणेश्वरास ।
तेथे वसतात परमहंस। आश्रय घे तू तयांचा ।। ८१ ।।

म्हणताच नरेन्द्रला चल। तो तत्काळ झाला कबुल ।
मग निघाली मंडली सकळ । पातली दक्षिणेश्वराप्रती ।। ८२ ।।



ठाकुर सांगती नरेन्द्रनाथ । दिसला येताना खोलीत ।
देहाकडे आणि पोषाखात। बाह्यवस्तूत लक्ष नसे ।। ८३ ।।
इतरांहुनी तो दिसे वेगळा । निरखिता तयाच्या नयनाला ।
वाटे कोणी त्याच्या मनाला । करुनि ठेविले अंतर्मुख ।। ८४ ।।
गंगाजलाची होती घागर। तेथे बसला सतरंजीवर ।
असाधारण शुद्ध पवित्र । अंत:करण दिसे त्याचे ।। ८५ ।।
वाटले विषयीजनांचे आगर। असुनी हे कलकत्ता शहर ।
एवढा सत्त्वगुणी थोर। अधिकारी आला कोठुन ।। ८६ ।।
अत्यंत तन्मय मन होउन। नरेन्द्राने केले गायन ।
भावावेश प्राप्त होउन । मजला समाधी लागली ।। ८७ ।।
याच भेटीचा वृत्तान्त । सांगता झाला नरेन्द्रनाथ ।
रामकृष्णांनी धरुनी हात । नेले पडवीत उत्तरेच्या ।। ८८ ।।
पडवीस पडदे होते लाविले । खोलीचे दारही बंद केले।
पडवीत कोणी बसलेले । दिसत नव्हते इतरांना ।। ८९ ।।
तेव्हा वाटले माझ्या मनाला । एकीकडे ते नेउनी मजला ।
करितील काही उपदेशाला । परि घडला वेगळा प्रकार ।। ९०।।
माझे हात धरुनी हातात । एकसारिखे अश्रू गाळित ।
बोलु लागले हुंदके देत । परिचित माणसासारिखे ।। ९१ ।।
अति प्रेमाने म्हणती मजला । किती वेळ केलास यावयाला ।
इथे उत्कंठा लागुनी मनाला। वाट तुझी मी पाहतसे ।। ९२ ।।
येथे वसती विषयी जन । भाकड कथा तयांच्या ऐकुन ।
माझे कान गेले किटुन । आले बेतात जळण्याच्या ।। ९३ ।।
मनातिल गोष्टी सांगावयाला । कोणी मिळाले नाही मजला ।
त्या गोष्टी जिरुनी पोटाला । आतल्या आत आली सूज ।। ९४।।



कितितरि वेळ असे बोलुन। माझ्यासमोर करिती रुदन ।
उभे राहिले हात जोडुन । म्हणू लागले हे प्रभो ।। ९५ ।।
मजला ठाउक पुरातन। अससी ऋषी नारायण ।
जिवांची दुर्गती निवारण । करण्यास देह हा घेतला ।। ९६ ।।
असा हा प्रकार पाहुन । आश्चर्यचकित गेलो होउन ।
कुणाचे घ्यावया आलो दर्शन । गाठ कुणाची पडली इथे ।। ९७ ।।
विश्वनाथ दत्तांचा मी सूत। मग असे कसे हे म्हणतात ।
उन्मादवायुचा यांच्यात । वाटते संचार जाहला ।। ९८ ।।
तथापि उघड काहि न म्हणत। त्यांचे बोलणे बसलो ऐकत ।
मग ते जाउनी आले खोलित। आणिली मिठाई मजसाठी ।। ९९ ।।
घेउनी मिठाई स्वहस्तात। घालु लागले माझ्या मुखात ।
वदलो द्या मला मी खोलीत । खाईन मित्रांबरोबर ।। १०० ।।
परि ते कसले ऐकतात । मिठाई खावया लाविती तेथ ।
पुनरपि धरुनी माझा हात । म्हणती एकटा लवकर ये ।। १ ।।
तयांचा आग्रह पाहून। म्हणालो मी पुन्हा येइन ।
त्यांच्या बरोबर परत येउन । खोलीत बसुनी राहिलो ।। २ ।।
परंतु तयांच्या वर्तनात। उन्माद दिसेना यत्किंचित ।
इतरांना जो बोध करित । वाटले दुर्लभ असे हा ।। ३ ।।
उपदेश तयांचा ऐकून। भावसमाधी त्यांची पाहुन ।
वाटे ईश्वरासाठी महान। सर्वस्व त्याग यांनी केला ।। ४ ।।
करीत असता उपदेश । म्हणती जसा बघतो तुम्हास ।
तसा पाहतो परमेशास। करितो तयासी संवाद ।। ५ ।।
परंतु ईश्वराचे दर्शन। घ्यावया इच्छाच करितो कोण ।
द्रव्यनाश होता रडुन रडुन । आपुले डोळे सुजविती ।। ६ ।।



नातेवाइक कोणी मरती। तर धाय मोकलुनी रडती ।
परंतु होइना ईश्वरप्राप्ती । म्हणुनी कोणीही रडेना ।। ७ ।।
अत्यंत व्याकुळ होउनी मन । म्हणता ईश्वरा दे दर्शन ।
तर तयाचे मनोरथ पूर्ण। खचित भगवंत करितसे ।। ८ ।।
यापरी त्यांचा बोध ऐकुन । वाटे नसती हे साधारण ।
परमेश्वराचे दर्शन घेउन । सांगती अनुभव आपुला ।। ९ ।।
तथापि पुन्हा होई स्मरण । मघाचे विचित्र आचरण ।
कळेना कसा द्यावा घालुन । मेळ बोधास आताच्या ।। ११० ।।
पुनरपि वाटतसे मनाला । सर्वस्वाचा त्याग केलेला ।
कठोर तपस्या आचरलेला । असा हा पुरुष दुसरा नसे ।। ११ ।।
याप्रमाणे विचार येउन । गोंधळुनि गेले माझे मन ।
ठरविले हे परम पावन । द्यावया मान योग्य असती ।।१२।।
ऐसा विचार मनी येउन । मस्तक ठेवुनी वंदिले चरण ।
त्या दिवशी निरोप घेउन । परत पातलो घराप्रती ।। १३ ।।
ठाकुरांस दिले होते वचन । एकटाच मी पुन्हा येइन।
म्हणुनी नरेन्द्र पायी चालुन । आला दक्षिणेश्वराला ।। १४ ।।
ठाकुर एकटे होते खोलीत । आला पाहुनी नरेन्द्रनाथ ।
झाले अत्यंत आनंदित । जवळ तयाला बोलाविले ।। १५ ।।
भावावेश प्राप्त होउन । नरेन्द्रास बघती टक लावुन।
अस्पष्ट मंत्रोच्चारण करुन । सरकले मग तयाकडे ।। १६ ।।
पूर्वीच्या गोष्टीची आठवण । नरेन्द्राच्या मनात येउन ।
तयास वाटले आचरण । विपरित होईल पूर्वीपरी ।। १७ ।।
इतुक्यात ठाकुर सव्यचरण। त्याच्या अंगावर देती ठेवुन ।
तव चमत्कार घडला महान । स्पर्श होताच श्रीपदाचा ।। १८ ।।



नरेन्द्र म्हणे मज आले दिसुन । ती खोली त्या वस्तू पूर्ण ।
क्षणात झाल्या वेगवान । फिरू लागल्या सभोवती ।। १९ ।।
मग त्या पावती अंतर्धान । सकळ विश्व होतसे विलिन ।
सर्वग्रासी महाशून्य । ग्रासला माझा अहंकार ।। १२० ।।
अतिशय भयभीत झाले मन । वाटले हे तर असे मरण ।
माझा धीर गेला सोडुन। ओरडुनी वदलो ठाकुरांस ।। २१ ।।
तुम्ही मजला काय करता । मजला आहेत मातापिता ।
रामकृष्ण हासले ऐकता । म्हणती तर मग आता नको ।। २२ ।।
मम वक्षाला लावुनी हात । बोलती ते छाती चोळत ।
घडावयास नको इतुक्यात । हळुहळु घडेल सर्व काही ।। २३ ।।
लाविता वक्षस्थळाला हात । निमाले अद्भुत दृश्य समस्त ।
देहभान मज होउनी प्राप्त । झालो पूर्वीच्यासारखा ।। २४ ।।
मनात खळबळ गेली उडुन । हा पुरुष असावा तरी कोण ।
काय हिप्नॉटिझम करुन । भान माझे हरविले ।। २५ ।।
परि ते न माने माझे मन । दुर्बळ मनाचे असती जन ।
हिप्नॉटिझमचा परिणाम घडुन । त्यांच्यावरच येत असे ।। २६ ।।
मजला होता अभिमान। बलिष्ठ आहे माझे मन ।
इच्छाशक्ती प्रबळ महान । का मग घडुनी यावे असे ।। २७ ।।
काय म्हणावे या पुरुषाला । कुंभार मातीच्या गोळ्याला ।
आकार देइ जो येइ मनाला । आकार तसा हा देत असे ।। २८ ।।
इच्छित होते रामकृष्ण । नरेन्द्रास अध्यात्मदान करुन ।
तत्काळ करावा ज्ञानी पूर्ण । युगप्रयोजन साधावया ।। २९ ।।
परि शब्द तयाचे परिसुन । बाबा बेत देती सोडुन ।
जाणिले ज्ञान कराया ग्रहण । आज तयारी नसे याची ।। १३० ।।



घाई करण्यात नसे अर्थ । सावकाश घडेल समस्त ।
ठाकुर देउनी खाद्य पदार्थ । करिती लाड नरेन्द्राचे ।। ३१ ।।
संध्याकाळ झाली पाहुन । नरेन्द्र वदे मी आता जाइन ।
ऐकुनि ठाकुर होउनी खिन्न । म्हणती पुन्हा लवकर ये ।। ३२ ।।
नरेन्द्र देई आश्वासन । मी पुनरपि लवकर येइन ।
रामकृष्णांचे वंदुनी चरण । निरोप घेउनी निघाला ।। ३३ ।।
सात आठ उलटता दिवस । नरेन्द्र आला दक्षिणेश्वरास ।
त्याने निश्चय केला मनास । बळकट करुनी बसावे ।। ३४ ।।
ठाकुरांच्या इच्छाशक्तिचा । प्रभाव नाही पडू द्यायचा ।
पक्का निश्चय करुनि मनाचा । खोलीत त्यांच्या प्रवेशला ।। ३५ ।।
त्या दिनी दक्षिणेश्वराप्रत । आले होते लोक बहुत ।
म्हणुनी ठाकुर नरेन्द्राप्रत । गेले घेउनि फिरावया ।। ३६ ।।
मिळाला पाहिजे एकान्त । यदुमल्लिकाच्या बागेत ।
एक बंगला असे तेथ । दिवाणखान्यात प्रवेशले ।। ३७ ।।
रामकृष्ण झाले समाधिमग्न । नरेन्द्रनाथ दंग होउन ।
उत्सुकतेने निरीक्षण । करी बाबांच्या अवस्थेचे ।। ३८ ।।
आता सावधगिरी घेउन । नरेन्द्र बळकट करी मन ।
तव जवळ येउनी रामकृष्ण । स्पर्श करिती नरेन्द्राला ।। ३९ ।।
बाबांचा स्पर्श शक्तिमान । नरेन्द्राचे लोपले भान ।
विचारिले मग अनेक प्रश्न । रामकृष्णांनी नरेन्द्राला ।।१४०।।
रामकृष्ण सांगती तयास । विचारले कोण आहेस ।
कशाला जन्म घेतलास । किती दिवस राहसी इहलोकी ।। ४१ ।।
अंतर्मुख तयाने होउन । जी उत्तरे केली कथन ।
आणि मज जे झाले दर्शन । ताळा मिळाला तयांचा ।। ४२ ।।



त्याने दिलेली उत्तरे ऐकुन । माझे झाले समाधान ।
तथापि तयांचे करणे कथन । निषेधार्ह असे सर्वथा ।। ४३ ।।

परंतु सांगतो एक खूण । नरेन्द्रास कळेल आपण कोण ।
योगमार्ग तेव्हा अवलंबुन । त्याग करिल तो देहाचा ।। ४४ ।।

नरेन्द्र ध्यानसिद्ध पुरुष । अखंडाचे राज्यातिल माणुस ।
दैवीशक्तिसंपन्न विशेष । धर्मकार्यास अवतरला ।। ४५ ।।

नरेन्द्र गेला चकित होउन । यांच्या शक्तिचा प्रभाव महान ।
वाटे एवढी दक्षता घेउन । गेले होउनी भावांतर ।। ४६ ।।

जाणिव झाली नरेन्द्राप्रती । रामकृष्णांची प्रचंड शक्ती ।
आपुली अत्यल्प शक्ती मती । कळुनी आली स्वानुभवे ।। ४७ ।।

आपुल्या इच्छामात्रेकरुन । कोणाचेही फिरविती मन ।
अध्यात्ममार्गाचे आक्रमण । सहज लीलेने करविती ।। ४८ ।।

नसती हे मानव सामान्य । अत्यंत दैवीशक्तिसंपन्न ।
महापुरुष हे असामान्य । खात्रीच पटली तयाची ।। ४९ ।।

अशा विभूतिचे आपुल्यावर । असे केवढे प्रेम अपार ।
याचा मनात येता विचार । धन्यता वाटली तयाला ।। १५० ।।

बाबांविषयी त्याच्या मनात । पूज्य बुद्धी झाली उदित ।
तरिही चिकित्सा स्वभावात । मुळातच होती तयाच्या ।। ५१ ।।

नरेन्द्राने ठरविले मनात । रामकृष्णांची प्रत्येक गोष्ट ।
करूनिया परीक्षा नीट । ग्रहण करावी तदनंतर ।। ५२ ।।


ठाकुरांची घडुनी संगती । कळुनी आले नरेन्द्राप्रती ।
होणार नाही ईश्वरप्राप्ती । कोणाप्रतीही त्यागाविण ।। ५३ ।।

लाभुनि ठाकुरांची संगती। नरेंद्राची झाली प्रगती ।
कथाभाग तो मधुर अती । होइल साफल्य जन्माचे ।। ५४ ।।





केवळ पदस्पर्शाने श्रीरामकृष्णांनी नरेन्द्रला दिलेली विश्वात्मक भावाची अनुभूती



श्रीरामकृष्ण आपल्या शिष्यांना संन्याशाची भगवी वस्त्रं प्रदान करून स्वतःच रामकृष्ण संघाची स्थापना करतात.

श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा एकोणतिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय तिसावा

जय जय जगदानंदकंदा । रामकृष्णा सच्चिदानंदा।
धर्मस्थापनेसाठी मुकुंदा । येशी गोविंदा नमन तुला ।। १ ।।
नरेन्द्रला पाहिल्यापासुन । प्रेम करिती रामकृष्ण ।
जाणिती हा धर्मकारण । पूर्ण करण्यास जन्मला ।। २ ।।
प्रथम पाहताच नरेन्द्रास । जाणुनी हा अधिकारी पुरुष ।
आपुले सर्व अनुभव यास । द्यावयास योग्य असे ।। ३ ।।
वाटले समाधीचे पूर्ण। अनुभव टाकावे देउन ।
देउनी आध्यात्मिक ज्ञान । सिद्ध तत्काळ करावा हा ।। ४ ।।
अंबेचे कार्य करावयास । धर्मज्ञान द्यावया जगतास ।
आरंभ करील म्हणुनी त्यास । पूर्णत्व द्यावे अविलंबे ।। ५ ।।
ठाकुरांचा असा विचार । नरेन्द्रचे ऐकुनी उद्‌गार ।
वाटले झाला नाही पात्र। अजुनी पूर्णता मिळवावया ।। ६ ।।
त्यांनी तो बेत थांबवून । म्हणती यास अध्यात्मज्ञान ।
यापुढे सावकाश देउन । क्रमश: उन्नती करावी ।। ७ ।।
आधीच जाणती रामकृष्ण । हा असे सामर्थ्यसंपन्न ।
याला यथार्थ तत्त्वे पूर्ण । येती काळजी कळावया ।। ८ ।।
म्हणत असती रामकृष्ण । जेथे वाहू शकेना जीवन।
तेथेच डबकी साचत जाउन । शेवाळ लव्हाळी उद्‌भवती ।। ९ ।।
तेवि आध्यात्मिक जगतात । अंशास मानता पूर्ण सत्य ।
नवीन पंथ होतात उदित। पूर्ण सत्य काय न कळेचि ।। १० ।।



नरेन्द्रा अर्धवट मिळता ज्ञान । तो इतर प्रचारकांसमान ।
धर्मपंथ काढील नविन । मिळवील मान मान्यता ।। ११ ।।
तथापि हे युगप्रयोजन । सांप्रत करावयाला पूर्ण ।
पुरणार नाही असा अपूर्ण । म्हणुनी घेती ते दक्षता ।। १२ ।।
याला आले पाहिजे कळुन । ईश्वर जीव जगत हे कोण ।
आले पाहिजे यथार्थ समजुन। ध्येय मानवजीवनाचे ।। १३ ।।
तयाला करावयाला पूर्ण । ठाकुर देऊ लागले शिक्षण ।
संशय शंका यांचे निरसन । करिती तत्काळ गुरुदेव ।। १४ ।।
रामकृष्णांचे अनुपम । नरेन्द्रावर असे प्रेम ।
तयाची प्रतिमा अप्रतिम । करावयाला झटती ते ।। १५ ।।
नरेन्द्रच्या भेटीसाठी । करिती जिवाची आटापिटी ।
अंतरी तळमळ लागे मोठी । तयाची गाठी पडावया ।। १६ ।।
नरेन्द्र जवळ आल्यावर। आनंदास येतसे पूर ।
पुनरपि नरेन्द्र जाता दूर । तळमळ भेटीची लागतसे ।। १७ ।।
एकदा सात आठ दिवस । नरेन्द्र आला नव्हता भेटिस ।
रामदयाल येता तयास । पुसती कुशल नरेन्द्रचे ।। १८ ।।
म्हणती तयाला एक दिवस । सांगा इकडे यावयास ।
फार इच्छा वाटे मनास । भेटावयाची तयाप्रती ।। १९ ।।
नरेन्द्र आला नाही भेटिस । चैन नच पडे ठाकुरांस।
रात्री रामदयालबाबुस । बोलू उठवुनी लागले ।। २० ।।
नरेन्द्र मज भेटावा म्हणुन। कासाविस होतात प्राण ।
लवकर निरोप दे सांगुन। भेटीस सत्वर यावयाला ।। २१ ।।
नरेन्द्र शुद्ध सत्त्वगुण । तो असे साक्षात नारायण ।
तयाला भेटल्यावाचुन । जगणे कठिण मज जाहले ।। २२ ।।



रामदयालबाबू वदला । पहाटेच सांगतो नरेन्द्रला ।
लवकर येथे यावयाला । घ्यावयाला भेट त्वरे ।। २३ ।।
त्या दिवशी मग रात्रभर । चालला होता असा प्रकार ।
निद्रा आली नाही क्षणभर । तळमळ फार ठाकुरांना ।। २४ ।।
एकदा वैकुंठ संन्याल । आला त्याला आपुली तळमळ ।
ठाकुर बोलुनी दाविती सकळ। म्हणती नरेन्द्र सत्त्वगुणी ।। २५ ।।
अखंड राज्यातिल तो ऋषी । अंत नसेचि त्याच्या गुणांसी ।
मला भेटावयाला त्यासी। फार लागली उत्कंठा ।। २६ ।।
तळमळ झाली नाही सहन । मुलासारिखे करिती रुदन ।
नंतर पडवीमधे जाउन । मुक्तपणे रडू लागले ते ।। २७ ।।
म्हणती हे जगदंबे आई । नरेन्द्र काही भेटला नाही ।
माझ्याने हे सहन न होई । म्हणत परत रडती ते ।। २८ ।।
आले खोलीत परतुन। म्हणती कासाविस झाले प्राण ।
वाटे काळिज निघते पिळुन । परि नरेन्द्र नाही भेटला ।। २९ ।।
एकदा तयांच्या जन्मोत्सवाला। सकाळी नरेन्द्र नव्हता आला ।
ध्यास लागला ठाकुरांला। त्या शुभकाळी नरेन्द्राचा ।। ३० ।।
भक्तमंडळींनी मिळुन। नेसविले वस्त्र नूतन।
चंदनाची उटी लावुन । पुष्पमालाही घातिल्या ।। ३१ ।।
मंडळींसमवेत रामकृष्ण । ऐकत होते संकीर्तन ।
नरेन्द्र आला नाहि का अजुन । म्हणुनी ठाकुर विचारिती ।। ३२ ।।
दोन प्रहराच्या समयाला । एकदाचा नरेन्द्र आला।
वंदन करुनी श्रीपदकमला। बसला सन्निध ठाकुरांच्या ।। ३३ ।।
रामकृष्ण मग आनंदले । खांद्यावर त्याच्या बसले।
समाधिमग्न होउनि गेले । समाधी उतरली नंतर ।। ३४ ।।



नरेन्द्रासी गोष्टी करुन । त्याच्याच लाडात झाले मग्न ।
तेवढेच राहिले संकीर्तन । एवढे प्रेम नरेन्द्रवर ।। ३५ ।।
नरेन्द्रला आले कळुन । असाधारण शक्तिसंपन्न ।
महापुरुष श्रीरामकृष्ण । करिती प्रेम आपणावर ।। ३६ ।।
दर आठवड्याला जाउन। सद्गुरूंचे घेतसे दर्शन ।
राहात असे मधुन मधुन । दोन तीन दिवस दक्षिणेश्वरा ।। ३७।।
परि एखादा चुकता हफ्ता । ठाकुरांस वाटे अस्वस्थता ।
कलकत्त्यास जाउनी स्वत: । घेती भेट नरेन्द्रची ।। ३८ ।।
नरेन्द्र अतिशय चिकित्सक । घेई परीक्षुन गोष्ट प्रत्येक ।
श्रीसद्गुरुही अलौकिक । कशिही घेउद्या परीक्षा ।। ३९ ।।
एकदा शिष्यांस रामकृष्ण । करविती बोधामृताचे पान ।
म्हणती त्याग केल्यावाचुन । प्राप्त होइना परमेश ।। ४०।।
कायावाचामनेकरुन । त्याग झाला पाहिजे पूर्ण ।
तरीच होय यथार्थ ज्ञान । होतसे लाभ ईश्वराचा ।। ४१ ।।
इतुक्यात रामकृष्ण दयाळ । बाहेर गेले काही वेळ ।
नरेन्द्रनाथ मग तत्काळ । काढी रुपया खिशातुनी ।। ४२ ।।
खोलीत कोणी नाही पाहुनी । गादीखाली देई ठेवुनी।
काय प्रकार येतो घडुनी । म्हणुनी वाट पाहतसे ।। ४३ ।।
गादीवर बसताच रामकृष्ण । उठले किंकाळी फोडुन ।
झटकन उतरुनी गादीवरुन । उभे राहिले बाजूला ।। ४४ ।।
अंगास वेदना झाल्या परम। दरदरून आला घाम ।
परि नरेन्द्राविण ते वर्म । ठाऊक नव्हतेच कोणाला ।। ४५ ।।
पाहु लागले सर्व मिळुनी । गादीवर विंचू, सुई, टाचणी ।
गादी काढिली झटकुनी । तव पडला रुपया बाहेर ।। ४६ ।।



नरेन्द्र बाजुला उभा राहुन । ते सर्व पाहे चोरासमान ।
विस्मित झाला प्रकार पाहुन । तव दृष्टी पडली बाबांची ।। ४७ ।।
त्यांच्या लक्षात आला प्रकार । याच्या मुळाशी असे नरेन्द्र ।
प्रिय शिष्याचे कौतुक फार । वाटले परीक्षा घेण्याचे ।। ४८ ।।
म्हणती मी सांगतो यास्तव । मानू नका त्या गोष्टी सर्व ।
आधी पारखा घेउनी अनुभव । नंतर विश्वास ठेवा तुम्ही ।। ४९ ।।
अनुभवाने पटता तुम्हास । तुम्ही ठेवावा विश्वास ।
साधुची परीक्षा रात्रंदिवस । करुनी विश्वास ठेवित जा ।। ५० ।।
पैशाची तर गोष्टच सोडा । भांड्यास लागता हात थोडा ।
त्वरित होउनि जाई वाकडा । असह्य वेदना उद्‌भवती ।। ५१ ।।
लाविणे पडता भांड्यास हात । तर झाकिती ते फडक्यात ।
म्हणुनी ते होते वापरत । व्यवहारात भांडी मातीची ।। ५२ ।।
यापरी त्यांचा त्याग पाहुन । नरेन्द्र चकित गेला होउन ।
बाबांचे काया वाचा मन। आले दिसुनी एकरूप ।। ५३ ।।
कधी कधी म्हणती रामकृष्ण । ही सगळीच मुले छान।
परंतु नरेन्द्रच्या समान। दिसेना कोणी एकही ।। ५४ ।।
नरेन्द्र गायनवादनात । प्रवीण बोलण्याचालण्यात ।
विद्येत वादविवादात । धार्मिक विषयात गती त्याची ।। ५५ ।।
करावयाला बसतो ध्यान । सकाळ होते रात्र उलटुन ।
तरिही तयाला न राहे भान। खणाण नाणे नरेन्द्र असे ।। ५६ ।।
पाहावे इतर मुलांकडे । ती हाडांची करुनी काडे ।
कसेबसे मग बापुडे । उत्तीर्ण होतात परीक्षा ।। ५७ ।।
नरेन्द्रचा अभ्यास समस्त । लीलेने होई हसत खेळत ।
इतर बहुविध कामे करित । परीक्षा आमलक हाताचा ।। ५८ ।।



ब्राह्म समाजी असे जाउन। परि नाही इतर जनांसमान ।
करितसे तेथे ध्यान भजन। ब्रह्मज्ञानी तो खरा खरा ।। ५९ ।।
नरेन्द्र करीत असता ध्यान। तयाला होई ज्योतिर्दर्शन ।
उगीच काय मजलागुन । नरेन्द्र एवढा आवडतो ।। ६० ।।
एकदा केशवचंद्र सेन । आणि गोस्वामी विजयकृष्ण ।
ऐसी मोठी मंडळी येउन । करिती पान बोधामृताचे ।। ६१ ।।
इतरहि ऐकत होते भक्त । मंडळीत होता नरेन्द्रनाथ।
रामकृष्णांना तेवढ्यात । भावसमाधी लागली ।। ६२ ।।
भावावेशात रामकृष्ण । पाहती केशवचंद्र सेन ।
आपुली दृष्टी वळवून । नरेन्द्राकडे पाहती ।। ६३ ।।
तयांच्या अंत:चक्षुलागुन । भविष्यकाळ आला दिसुन ।
नरेन्द्रचे भावी जीवन। उज्ज्वल पाहुनी आनंदिले ।। ६४ ।।
बडी मंडळी गेली निघुन । शिष्यांस सांगती रामकृष्ण ।
भावावेशात आले दिसुन । एकच शक्ती केशवला ।। ६५ ।।
ज्या शक्तीच्या बळावर । केशव जगद्विख्यात थोर ।
तसल्या अठरा पुरेपूर। शक्ती दिसल्या नरेन्द्रला ।। ६६ ।।
केशवविजयकृष्णांचे ज्ञान । दिसले दिव्याच्या ज्योतीसमान ।
पाहिले नरेन्द्रचे ज्ञान । प्रखर भास्करासारिखे ।। ६७ ।।
नरेन्द्रचे सरळ मन । वदला आश्चर्यचकित होउन ।
कोठे विख्यात केशव सेन । य:कश्चित विद्यार्थी मी कोठे ।। ६८ ।।
कृपा करुनि माझी त्यांच्याशी । करू नका कधी तुलना अशी ।
बाबा प्रसन्न चित्ते तयासी । म्हणती काय मी करू रे ।। ६९ ।।
तुला काय वाटते सकळ । आपण होउनी बोलितो बोल ।
जगन्मातेचा सर्व खेळ । ती दाखवी ते बोलतसे ।। ७० ।।



जगदंबेची आजवरी । प्रत्येक गोष्ट झाली खरी ।
मग हीच एक तेवढी तरी । का बरे खोटी होईल ।। ७१ ।।
नरेन्द्र करी स्पष्ट भाषण । दर्शनाचा संशय घेउन ।
म्हणे आई देई दाखवुन । की खेळ आपुल्या मनाचा ।। ७२ ।।
मजला होते असे दर्शन । तर मी असतो समजून ।
माझ्याच मनाचा खेळ पूर्ण । अनुभव खोटा इंद्रियाचा ।। ७३ ।।
आपुले प्रेम आहे मजवर । सदा इच्छिता व्हावा थोर ।
यास्तव असली दर्शने फार । होत असावी आपणाला ।। ७४ ।।
बाबांचा असे नरेन्द्रवर । प्रथमपासुनी विश्वास फार ।
वाटले सत्यसंकल्प नर । मिथ्या विचार करिल कसा ।। ७५ ।।
मग मनाचा गोंधळ होउन । जगदंबेला पुसती प्रश्न ।
जगन्माता करी सांत्वन । आपुल्या लाडक्या बाळाचे ।। ७६ ।।
ती म्हणे लक्ष देऊ नकोस । नरेन्द्र अजुनी आहे बालिश ।
येईल अनुभव सावकाश । सर्व गोष्टी मानिल तो ।। ७७ ।।
जगन्मातेचे वचन ऐकुन । समाधान पावती रामकृष्ण ।
एवढा नरेन्द्रवर महान । विश्वास असे ठाकुरांचा ।। ७८ ।।
एकदा पुष्कळ काळ गेला । तथापि नरेन्द्र नाही आला ।
चैन पडेना ठाकुरांला । वाट पाहुनी थकले ते ।। ७९ ।।
मग ठरविले कलकत्त्यास । नरेन्द्रच्या जावे भेटिस ।
रविवारचा होता दिवस । ब्राह्मसमाजाच्या प्रार्थनेचा ।। ८० ।।
नरेन्द्र ब्राह्मसमाजात । आज असणार उपस्थित ।
ऐसे वाटुनी करिती बेत । ब्राह्मसमाजात जाण्याचा ।। ८१ ।।
ब्राह्मसमाजाचे लोक । मानिती केशवादि अनेक ।
समाज सोडण्यास कारण एक । सहवास रामकृष्णांचा ।। ८२ ।।



त्यामुळे समाज रोडावला । ऐसा समज तयांचा झाला।
म्हणुनी बाबांवर रोष सगळा। होता ब्राह्मसमाजात ।। ८३ ।।
फिकीर न करिती रामकृष्ण । की असताना केशव सेन ।
जैसा मिळत होता मान । तैसाच आता मिळेल का ।। ८४ ।।
समाजात करिती आदर। अथवा होईल अनादर।
विचार न करिती ठाकुर । प्रार्थनागृहात प्रवेशिले ।। ८५ ।।
या बसा म्हणण्याचा मानवी । शिष्टाचार कोणी न दावी ।
ठाकुरांच्या ते नसे गावी । वेदीपर्यंत पोहोचले ।। ८६ ।।
तेथे जाताच रामकृष्ण । समाधिमग्न गेले होउन ।
नरेन्द्र तयांच्या जवळ येउन । तत्काळ उभा राहिला ।। ८७ ।।
एकच गडबड तेथे उडाली । उपासना तत्काळ थांबली ।
समाधी पाहावयास मंडळी । सरसावू लागली समोर ।। ८८ ।।
भोवती बहुत गर्दी झाली । एकच झुंबड तेथे उडाली ।
नरेन्द्रनाथा चिंता पडली । कैसे न्यावे ठाकुरांना ।। ८९ ।।
नरेन्द्रने चलाखी करुन । दिवे टाकिले मालवून ।
तेथुनी ठाकुरांना घेउन । हळूच पडला बाहेर ।। ९० ।।
रामकृष्णांचा अपमान । नरेन्द्रास झाला नाही सहन ।
खोलवर ती गेली लागुन । गोष्ट मनाला नरेन्द्रच्या ।। ९१ ।।
नरेन्द्र वदला ठाकुरांस । आपण भलत्याच स्थानास ।
कशाला तिन्हाइत जागेस। माझ्या भेटीस पातला ।। ९२ ।।
बाबा लक्ष न देती बिलकुल । हासण्यावर नेती सकळ ।
नरेन्द्र म्हणाला केवळ । माझेच चिंतन बरे नव्हे ।। ९३ ।।
लागला होता भरतास। हरिणाच्या पिलाचा ध्यास ।
गेला मग मृगजन्मास। तैसे तुमचेही न होवो ।। ९४ ।।



बाबा म्हणती गंभिर होउन । तू म्हणसी ते सत्य जाण ।
काय करू तव भेटीवाचुन । होतात प्राण कासाविस ।। ९५ ।।
दक्षिणेश्वरी आल्यावर । गाठले जगन्मातामंदिर ।
समाधि लागुनी गेली गंभिर । तयात जाहला उलगडा ।। ९६ ।।
समाधि जाताच उतरून । हासत खोलीत करिती गमन ।
नरेन्द्रास म्हणती तुझे वचन । मानणार नाही आता मी ।। ९७ ।।
आई म्हणते नरेन्द्रालागुन । समजसी साक्षात नारायण ।
यास्तव तो तुजलागुन । आवडत असे एवढा ।। ९८ ।।
परंतु ज्या दिवशी तयास । नारायण समजणार नाहीस।
तेव्हा तुज त्याचे मुखास । न वाटेल पाहावे असे ।। ९९ ।।
नरेन्द्र सांगे अशा रीतिने । रामकृष्णांनी माझे बोलणे।
उडविले एका फटकाऱ्याने । प्रकार घडला यापरी ।। १०० ।।
भोजनालयात एकदा जाउन । नरेन्द्र आला अखाद्य खाउन ।
रामकृष्णांना तसे सांगुन। बसला जाउनि एकीकडे ।। १ ।।
वाटले होते नरेन्द्रला । योग्य न स्पर्शिणे बाबांला ।
ठाकुर म्हणती त्यात तुजला । काही एक दोष नसे ।। २ ।।
जो अखाद्य भक्षण करुन । हरीकडे लावू शके मन ।
तयाचे ते अखाद्य भक्षण । हविष्यान्नतुल्य असे ।। ३ ।।
नातरी कंदमुळे खाउन । विषयचिंतनी ठेवी मन ।
तयाचे ते फलाहार अशन । गोमांसतुल्य निषिद्ध असे ।। ४ ।।
तू अखाद्य भक्षण केले । त्याचे काहीच नाही वाटले ।
इतर कोणी जर ते खाले । तर स्पर्शही न करू शके ।। ५ ।।
रामकृष्ण जे नियम पाळिती । इतरांनाही पाळा म्हणती ।
नरेन्द्रास ते लागू नसती। स्पष्ट सांगती रामकृष्ण ।। ६ ।।



म्हणती ज्ञानाग्नि नरेन्द्रात । पेटलेला धगधगीत ।
आहारादींचे दोष समस्त । भस्म होतात त्यामधे ।। ७ ।।
ज्ञानखड्गाने मायाबंधन । नरेन्द्र टाकित असे तोडुन ।
महामायेचा प्रभाव म्हणुन । पडू शकेना त्याच्यावर ।। ८ ।।
ठाकुरांकडे जे भक्त येती । त्यात विद्वान पंडित असती।
त्यांचा वाद लावुनि देती । नरेन्द्रनाथाबरोबर ।। ९ ।।
एकदा महेन्द्रनाथ गुप्त । आला असता दर्शनाप्रत ।
लावुनि देती वाद दोघांत । पाहती गंमत मग आपण ।। ११० ।।
नरेन्द्रास वदती हासत । तू तर आहेस बी. ए. त ।
एम. ए. असे महेन्द्रनाथ । बघू दे विद्या बुद्धी तुझी ।। ११ ।।
चर्चा झाली बहुत विषयांत । निघून जाता महेन्द्रनाथ ।
ठाकुर म्हणती भक्तांप्रत । काय उपयोग शिकण्याचा ।। १२ ।।
एम. ए. होउनि महेन्द्रनाथ । स्त्रियांसारखा बोले लाजत ।
धड बोलतही नाही येत। वाद केवि तो करू शके ।। १३ ।।
रामकृष्णांचा गृही भक्त । चट्टोपाध्याय केदारनाथ।
भक्तिमान असे अत्यंत । सरळ प्रेमळ स्वभावाचा ।। १४ ।।
ऐकत असता भजन कीर्तन । अश्रु वाहती नयनांतुन ।
कोमल तयाचे अंत:करण । म्हणुनी बाबांना प्रिय असे।। १५ ।।
एकदा केदारनाथ आला। नरेन्द्र तेथे होता बसला।
वादविवाद त्यांचा लाविला । गंमत पाहती रामकृष्ण ।। १६ ।।
केदार सद्भक्त असे महान । वादात असे अत्यंत प्रविण ।
नरेन्द्रचा कोटिक्रम तीक्ष्ण । तयापुढे हरला केदार ।। १७ ।।
केदारनाथ गेल्यावर । नरेन्द्रला पुसती ठाकुर ।
पाहिलास कैसा हा केदार । कैसी भक्ती असे त्याची ।। १८ ।।



देवाचे नाव पडता कानी । अश्रू निघतात नेत्रांतुनी ।
नरेन्द्रचा स्वभाव मानी । न मानी असला प्रकार तो ।। १९ ।।
म्हणाला पुरुषासारिखे पुरुष । स्त्रियांसम करिती आचारास ।
मुळुमुळु रडुनी ईश्वरास । प्राप्त करू ते इच्छिती ।। १२० ।।
पुरुषत्वाचा हा अपमान । उचित असावे आचरण ।
करूनिया आत्मसमर्पण । ईश्वरदर्शन साधावे ।। २१ ।।
आपण जाणता तदंत:करण । म्हणुनी म्हणता भक्तिमान ।
परंतु रडारडीवरुन । बरे वाईट कळत नसे ।। २२ ।।
केवळ पाहता टक लावुनी । नयनांमध्ये जमते पाणी ।
स्वस्त्रीविरह स्मरिती कोणी । परिसुनि गाणी राधेची ।। २३ ।।
परि ज्यास नसे तो अनुभव । असा माझ्यासारखा मानव ।
सोडणार नाही मनाचा ठाव । कित्येक गाणी ती ऐकुन ।। २४ ।।
अति शुद्ध नरेन्द्रचे मन । सदैव बोले स्पष्ट वचन ।
भगवान त्यावर असती प्रसन्न । पाहुनी हा गुण नरेन्द्रचा ।। २५ ।।
राखाल आणि नरेन्द्रनाथ । परस्परास होते परिचित ।
पूर्वीपासुनी असती जात । ब्राह्मसमाजात दोघेही ।। २६ ।।
तेथिल अंगिकार पत्रावरी । दोघांनीही केली स्वाक्षरी ।
निर्गुणोपासना मात्र खरी । मूर्तिपूजा त्याज्य असे ।। २७ ।।
येउनि बाबांच्या संगतीत । राखालच्या अंत:करणात ।
सगुण भक्ती झाली जागृत । घेतसे दर्शन मूर्तीचे ।। २८ ।।
एकदा ठाकुरांसमवेत । राखाल दिसता दर्शन घेत।
नरेन्द्रास वाटले विपरीत । आला राग राखालचा ।। २९ ।।
अंगिकारपत्राचे स्मरण देउन । म्हणे हे कैसे तुझे वर्तन।
प्रतिज्ञापत्र दिधले लिहुन । निर्गुणोपासना करण्याचे ।। १३० ।।



नरेन्द्रे खरडपट्टी काढली । राखालला धडकी भरली ।
तयाला भीती वाटु लागली । नरेन्द्रासमोर येण्याची ।। ३१ ।।
रामकृष्णांना कळता मात । नरेन्द्रा बोलविले त्वरित ।
म्हणती तू या बाबतीत । बोलू नकोस राखालला ।। ३२ ।।
तुझ्यासारखी सकलांना । जमत नाही निर्गुणोपासना ।
अधिकारपरत्वे लोक नाना । उपासनामार्ग आचरती ।। ३३ ।।
साकारोपासनेस अनुकूल। सध्या तयाचा आहे कल।
म्हणुनी करितसे राखाल। सगुणोपासना योग्य असे ।। ३४ ।।
तेव्हा समजले नरेन्द्रला । मग तयाने राखालला।
कधिही दोष नाही दिधला । साकारोपासना करिताना ।। ३५ ।।
जाणत असती रामकृष्ण । नरेन्द्र आहे भक्तिमान ।
मृदुता दया आणि गुण । स्वभावात असती तयाच्या ।। ३६ ।।
नरेन्द्रास येताना पाहुन । वदते झाले रामकृष्ण।
शुष्क ज्ञानीजनाचे नयन। कधी तरी असे असती का ।। ३७ ।।
ज्ञानाबरोबर नरेन्द्रात । असे भक्तिही अंतरात ।
वसते श्रद्धा अपरिमित। नयनांवरुनी हे कळत असे ।। ३८ ।।
भाव जयाचा पुरुषोचित । तयाच्या स्तनाजवळील प्रांत ।
कधिही काळा नाही असत । तसेच आहे नरेन्द्राचे ।। ३९ ।।
पूर्वीही युगात द्वापार । अर्जुन झाला महावीर।
असेच होते त्याचे शरिर । अवतार खरा तो नराचा ।। १४० ।।
नरेन्द्रच्या सत्यनिष्ठेवर । रामकृष्णांचा विश्वास फार ।
अत्यंत सत्यपरायण नर । अधिकार थोर नरेन्द्रचा ।। ४१ ।।
वाटे तयाच्या मुखातुन । अशक्य येणे मिथ्या भाषण ।
यास्तव पुसती तयालागुन । सत्यासत्यता गोष्टीची ।। ४२ ।।



एखादी गोष्ट आहे सत्य । ठाकुरांस असुनही माहित।
नरेन्द्रने म्हणता असत्य । उपजे संशय त्यांच्या मनी ।। ४३ ।।
चातकाची गोष्ट निघता । नरेन्द्रनाथ झाला सांगता ।
चातकास नदीचे पाणी पिता । मी तर स्वत:च पाहिले ।। ४४ ।।
चातक पितो ढगांचे पाणी। केवळ कल्पना असे जुनी।
मी तर आपुल्या डोळ्यांनी । पाहिले ते मी सांगतसे ।। ४५ ।।
त्यावर म्हणती रामकृष्ण । तूच स्वत: करिसी कथन ।
तर मग सत्य असेल जाण । असेल चुकीचा मम समज ।। ४६ ।।
यावर लोटता काही दिवस । नरेन्द्र सांगे ठाकुरांस ।
पाहा पाहा त्या चातकास । पीतसे पाणी सरितेचे ।। ४७ ।।
ठाकुर पक्ष्याकडे पाहुन । म्हणती नरेन्द्रा अससी अजाण ।
पाणी पितो तो चातक नसून । वटवायुळ केवळ ते ।। ४८ ।।
उगिच तू सांगितल्यापासुन । विचारात पडले माझे मन ।
तुझ्या गोष्टीवर संपूर्ण । ठेवणार नाही विश्वास ।। ४९ ।।
यापरी त्यांचा संबंध मधुर । अकृत्रिम प्रेम नरेन्द्रावर ।
प्राणापेक्षाही प्रिय फार । असे नरेन्द्र बाबांना ।। १५० ।।
नरेन्द्र सांगे माझ्यावर । ठाकुरांचा विश्वास फार ।
प्रत्यक्ष माझे मातापितर । विश्वास एवढा न ठेविती ।। ५१ ।।
नरेन्द्रनाथाकडे पाहुन । होई ईश्वरभावोद्दीपन।
ठाकुर होती समाधिमग्न । भावावेश प्राप्त होई ।। ५२ ।।
देहभान मग आल्यावर । तयाला करिती बोध थोर ।
नरेन्द्रचा कंठ मधुर । सांगती गाणी गावयाला ।। ५३ ।।
ऐकुनी नरेन्द्रचे गायन । पुनरपि होती समाधिमग्न ।
रामकृष्णांचे असाधारण । प्रेम होते नरेन्द्रावर ।। ५४ ।।



श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा तिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय एकतिसावा

श्रीरामकृष्णा प्रभुवरा । जय जय श्री जगदाधारा ।
नमन माझे ज्ञानभास्करा । भक्तिसागरा दयाघना ।। १ ।।
जाणत असती श्रीठाकुर । नरेन्द्र घेउनी नरशरीर ।
कशाला आला पृथ्वीवर । अधिकार काय असे त्याचा ।। २ ।।
अद्वैत तत्त्वाचा उपदेश । करावयाला योग्य पुरुष ।
अष्टावक्रसंहितादि खास । देती तयास वाचावया ।। ३ ।।
रामकृष्णांच्या आग्रहावरुन । ग्रंथ तर काढिले वाचुन ।
परंतु म्हणे हे प्रतिपादन । विलक्षण मजला वाटतसे ।। ४ ।।
या ग्रंथातिल विषयांत । नास्तिकता असे ओतप्रोत ।
जन्ममरणशील पदार्थ । आपण समस्त परमेश्वर ।। ५ ।।
उत्पन्न केलेला जो जीव । म्हणे मी उत्पन्नकर्ता शिव ।
याच्यापेक्षा अधिक गर्व । जगात कोणता असू शके ।। ६ ।।
ऋषींची डोकी फिरली म्हणुन । ठेविले असावे असे लिहुन ।
नाहीतर यापेक्षा महान । अपमान कोणता ईश्वराचा ।। ७ ।।
मग ठाकुर म्हणती अरे । तुज हे पटत नसेल सारे ।
तर तू मानू नकोस खरे । परी का निंदिसी ऋषींना ।। ८ ।।
ईश्वराच्या स्वरूपाची इती । करू नकोस अशा रीती ।
प्रार्थना करिता तुजप्रती । येइल प्रत्यय स्वरुपाचा ।। ९ ।।
ज्याचा तुज येईल अनुभव । त्या रूपावर विश्वास ठेव ।
ऐकुनि बाबांचा बोध सर्व । उपहास करावा नरेन्द्राने ।। १० ।।



परि बाबांना येइना राग । म्हणती तयाला पडेल उमग ।
धर्मतृष्णेचा प्रबल आवेग । अंतरी तयाच्या वसतसे ।। ११ ।।
नरेन्द्रवर विश्वास पूर्ण । की हा पुरुष असे महान ।
सद्धर्माचे पुनरुत्थान । कराया भूवरी जन्मला ।। १२ ।।
मंदिराच्या परिसरात । प्रतापचंद्र हाजरा राहात ।
बराच वेळ जपध्यानात । घालवित असे दररोज ।। १३ ।।
तयाची सांपत्तिक स्थिती । फारच खालावली होती ।
तयास वाटे ईश्वर भक्ती । करुनी संपत्ती मिळवावी ।। १४ ।।
ईश्वरापाशी तोटा नाही । प्रार्थना करुनी मागता काही ।
धन वैभव इच्छिता देई । लवलाही तो भक्ताला ।। १५ ।।
तयाची भक्ती असे सकाम । ठाकुर म्हणती करी निष्काम ।
परि बाबांचा हितबोध परम । न रुचे हाजरा महाशया ।। १६ ।।
रामकृष्णांचे घ्यावया दर्शन । अमित लोक येती दुरुन ।
आपणाकडेही तसेच जन । यावे हाजरा इच्छितसे ।। १७ ।।
यास्तव तेथे येती जे जन । तयांवर छाप बसावी म्हणुन ।
वेदान्ताच्या चार दोन । गप्पा हाजरा मारितसे ।। १८ ।।
शिष्यांस सांगती रामकृष्ण । ऐकू नका तयाचे वचन ।
दिशाभूल तो देइल करुन । यास्तव सावध तुम्ही असा ।। १९ ।।
नरेन्द्र करित असता भाषण । हाजरा ऐके लक्ष देउन ।
नरेन्द्रची मर्जी म्हणुन । बसली होती त्याच्यावर ।। २० ।।
पाश्चात्त्य तत्त्वज्ञांचे मत । येतसे दोघांच्या चर्चेत ।
परंतु दोघांच्या विवादात । हाजरा हार खात असे ।। २१ ।।
नरेन्द्रास सांगती गुरुदेव । जीव ब्रह्माचा एक भाव ।
नरेन्द्रने ऐकिले सर्व । तथापि पटेना तयाप्रती ।। २२ ।।



हाजराच्याकडे जाउन । अद्वैतमताचा उपहास करुन ।
हाजरास नरेन्द्र करी कथन । केवढी विलक्षण गोष्ट ही ।। २३ ।।
काय तर म्हणे हे घरदार । नदी पर्वत वृक्ष मंदिर ।
तुम्ही आम्ही सर्व ईश्वर । कधीतरी शक्य असे काय ।। २४ ।।
पशुपक्षी नर सरिता सागर । आणि जलचर खेचर भूचर ।
सर्वच असती परमेश्वर । किती विचित्र गोष्ट असे ।। २५ ।।
नरेन्द्र यापरी करिता कथन । दोघे हसले खो खो करुन ।
भावावस्थेत रामकृष्ण । ऐकती हसणे दोघांचे ।। २६ ।।
धोतर बगलेखाली घेउन । बाहेर आले रामकृष्ण ।
म्हणती तुम्ही दोघेजण । काय भाषण करता रे ।। २७ ।।
ऐसे हसत हसत म्हणुन । नरेन्द्राच्या जवळ येउन ।
समाधिमग्न रामकृष्ण । करिती स्पर्श नरेन्द्राला ।। २८ ।।
सांगत असे नरेन्द्रनाथ । ठाकुरांचा स्पर्श अद्‌भुत ।
भावांतर मम झाले क्षणात । अकस्मात घडला चमत्कार ।। २९ ।।
मला खरोखर आले दिसुन । ब्रह्मांडात ईश्वरावाचुन ।
एकही पदार्थ नसे अन्य । ईश्वर सर्वत्र संचलेला ।। ३० ।।
पाहावे ठरविले मनासी । किती वेळ टिकते स्थिती अशी ।
तथापि अवस्था त्या दिवशी । किंचित नाही कमी झाली ।। ३१ ।।
नंतर परत आलो घरास । तेथेहि तेच दिसे दृश्य ।
ताट भात भाजी रस । दिसे ईश्वर सर्वकाही ।। ३२ ।।
करणारा मी भोजन । पात्रात जे जे वाढिले अन्न ।
प्यावयाला दिलेले जीवन । सर्व भगवान दिसत असे ।। ३३ ।।
घास घेतले एक दोन । पुढे अशक्य झाले जेवण ।
आई वदली न घेता भोजन । स्वस्थ का असा बसलास ।। ३४ ।।



पुनरपि येउनी भानास । आणखी घेतले दोन घास ।
इच्छाच होइना मनास । अन्न सेवन करण्याची ।। ३५ ।।
सर्वदा मनाला वाटावे । ईश्वरमय हे असे आघवे ।
जणू भुताने पछाडावे । दुसरा विचार येत नसे ।। ३६ ।।
चालत असता रस्त्यातुन । दिसता गाडी येई पुढुन ।
बाजुस व्हावे न इच्छी मन । ईश्वरमय हे विश्व दिसे ।। ३७ ।।
वाटे काय आहे हरकत । गाडीत आणि आपुल्यात ।
भेद नाही यत्किंचित । ईश्वर भासत चोहीकडे ।। ३८ ।।
हात पायही पडले ढिले । तृप्ती नसे जरि कितिही भक्षिले ।
वाटे मी तर नसे भक्षिले । सेविले दुसऱ्या कोणी तरी ।। ३९ ।।
चार घास खाण्यास बसावे । तव निद्रेने पछाडावे ।
पुन्हा उठावे पुनरपि खावे । असे चालावे सर्वकाळ ।। ४० ।।
कधी इतुके खावे फार । न ठेवावा काही सुमार ।
परंतु उदरात अणुमात्र । नवल बिघाड होत नसे ।। ४१ ।।
ऐसी अवलोकुनी स्थिती । आईच्या मनाला वाटे भिती ।
म्हणे काय होते तुजप्रती । का न सांगसी स्पष्टपणे ।। ४२ ।।
काय होतसे टाक सांगुन । भयभीत झाले तिचे मन ।
तिला वाटे वाचणे कठिण । नरेन्द्र अशा अवस्थेत ।। ४३ ।।
असा असे सर्वात्मकभाव । कमी होता वाटे रूप नाव ।
स्वप्नभास हे जगत सर्व । मिथ्या सकळ पदार्थ हे ।। ४४ ।।
रेलवेचे लोखंडी रूळ । न कळे खरे वा स्वप्नातिल ।
बळे आपटावे भाळ । खरे वा खोटे पाहावया ।। ४५ ।।
हातापायात नसे शक्ती । अर्धांगवायुची वाटे भीती ।
ऐसे कितीतरी दिवस जाती । भाव हळु हळु मग गेला ।। ४६ ।।



तेव्हा कळले अद्वैतभाव । तयाचा थोडासा अनुभव ।
देती दयाळू श्रीगुरुराव । तर मग भाव हा खोटा नसे ।। ४७ ।।
मग त्या दिवसापासुन । संशयरहित झाले मन ।
अद्वैततत्त्व सत्यपूर्ण । पटले प्रत्यक्ष स्वानुभवे ।। ४८ ।।
एकदा मित्रांच्या समवेत । फिरत असता नरेन्द्रनाथ ।
फार फार होती खुषित । स्वारी आज नरेन्द्रची ।। ४९ ।।
रामकृष्णांच्या संगतीत । अनुभव जे जे झाले प्राप्त ।
तयातिल काही मित्रांप्रत । सांगत होता नरेन्द्र ।। ५० ।।
आपुल्यावर केवढा महान । परिणाम गेला असे होउन ।
सांगतसे त्याचे वर्णन । तल्लिन होउनि सुहृदांसी ।। ५१ ।।
मग गाइले एक गान । प्रेमधन वाटतो चैतन्य ।
यारे या रे सकळ जन । घागरी भरुनी ओतितसे ।। ५२ ।।
घागरीने ओतता सतत । प्रेमसाठा नाही संपत ।
तयाच्या प्रेमप्रवाहात । असे वाहत सर्व काही ।। ५३ ।।
गाणे गाइले ते घोळुन । स्वत:सी मग करी भाषण ।
खरोखर लयलूट मांडली जाण । गौरांगदेवे प्रेमाची ।। ५४ ।।
कोणास वाटतो प्रेम भक्ती । कोणास देतसे ज्ञान मुक्ती ।
केवढी अद्‌भुत असे शक्ती । वाटतो प्रेम श्रीगौरांग ।। ५५ ।।
काल रात्री कडी लावुन । बिछान्यावर पडलो येउन ।
इतुक्यात केले आकर्षण । शरीरात असे जो तयाप्रती ।। ५६ ।।
आकर्षिले कलकत्त्यास । उपस्थित केले दक्षिणेश्वरास ।
किती तरी वेळ तिथे उपदेश । ज्ञानदान केले प्रेमभरे ।। ५७ ।।
उपदेश केल्यावर तेथुन । केली परत पाठवण ।
घरास पोहोचविले फिरुन । केवढी अद्‌भुत शक्ती असे ।। ५८ ।।



दक्षिणेश्वराच्या गौरांगाला । जे काय येई तयाच्या मनाला ।
करिता येतसे ते ते तयाला । अगम्य सामर्थ्य त्यांचे असे ।। ५९ ।।
कलकत्त्यास कोठे माझे घर । कोठे दक्षिणेश्वरचे मंदिर ।
कसे मजला केले हजर । अपार सामर्थ्य ठाकुरांचे ।। ६० ।।
विचार करिता करिता मन । होउनि जातसे आश्चर्यमग्न ।
नम्रत्वे मग होतसे लीन । पदांबुजी रामकृष्णांच्या ।। ६१ ।।
धर्मजिज्ञासेच्या भरात । नरेन्द्र वाचन करी बहुत ।
पाश्चात्त्य तत्त्वज्ञांचे ग्रंथ । वाचुनी टाकिले तयाने ।। ६२ ।।
डेकार्टचा अहंवाद । ह्युमबेनांचा नास्तिकवाद ।
स्पिनोझाचा चिद्वस्तुवाद । उत्क्रान्तिवाद डार्विनचा ।। ६३ ।।
अज्ञेयवादी स्पेन्सर । फिक्टे कांट शोपेनहॉवर ।
मिल हेगेल यांचे अपार । ग्रंथ वाचले नरेन्द्रने ।। ६४ ।।
शरीररचना कळावी म्हणुन । मेडिकल कॉलेजात जाउन ।
व्याख्याने तेथील ऐकुन । बहुश्रुतता प्राप्त केली ।। ६५ ।।
एवढा भारी खटाटोप करुन । तयाला पक्के आले कळुन ।
ईश्वरप्राप्ती व्हावया करुन । ती मते असती असमर्थ ।। ६६ ।।
तयाला हे कळल्यापासुन । अधिकच अशांत झाले मन ।
परंतु अनुभव घेतल्यावाचुन । न ठेवी विश्वास कोणावर ।। ६७ ।।
रामकृष्णांच्या आध्यात्मिक । परीक्षिल्या अवस्था अनेक ।
परंतु सद्गुरू अलौकिक । केले निरसन संशयांचे ।। ६८ ।।
न करिते संशयनिरसन । तर संशयात त्याचे मन ।
कोठे राहते भटकून । कोण कसे सांगू शके ।। ६९ ।।
रामकृष्णांनी दिधली ग्वाही । ईश्वराला पाहता येई ।
स्पर्शसुद्धा करिता येई । बोलणे ऐकता येत असे ।। ७० ।।



ईश्वररूपे असती अमित । हे जरी न मानिसी सत्य ।
तरिही काही नाही हरकत । परंतु श्रद्धा असू द्यावी ।। ७१ ।।
की जगताचा नियामक । कोणीतरी आहे एक ।
कसा असे तो नसे ठाउक । यास्तव प्रार्थना करावी ।। ७२ ।।
न कळे मज तू कसा कोण । मला तूच दे समजावुन ।
अंतर्यामि असे भगवान । प्रार्थना ऐकतो भक्ताची ।। ७३ ।।
तोच संशय करुनी छिन्न । दाखविल स्वरूप भगवान ।
परिसुनी ऐसे आश्वासन । शांत झाले मन नरेन्द्राचे ।। ७४ ।।
वडिलांच्या होते मनात । वकील व्हावा नरेन्द्रनाथ ।
लग्न उरकावयाचा बेत । मुली पाहणे आरंभिले ।। ७५ ।।
त्या दिवसांत रामकृष्ण । नरेन्द्रच्या घरी जाउन ।
देती तयाला उत्तेजन । साधनभजन करावया ।। ७६ ।।
कळता तयाचे ठरविती लग्न । बेचैन झाले रामकृष्ण ।
वाटे संसारी जनासमान । साधारण जन होइल हा ।। ७७ ।।
वडिलांचे मन दुखेल म्हणुन । कदाचित नरेन्द्र करिल लग्न ।
अशी भीती मनी वाटुन । गडबडून गेले श्रीठाकुर ।। ७८ ।।
ते सांगती नरेन्द्रालागुन । बारा वर्षेपर्यंत पूर्ण ।
ब्रह्मचर्याचे करिता पालन । मेधानाडी उघडतसे ।। ७९ ।।
बुद्धी अतिशय होउनी तीक्ष्ण । सूक्ष्म विषयांचे करी आकलन ।
अशा बुद्धीचे साह्य घेउन । ईश्वरप्राप्ती होऊ शके ।। ८०।।
ऐसा बोध करिती तयाला । आणि प्रार्थिती जगन्मातेला ।
माते माझ्या नरेन्द्रला । संसारात जखडू नको ।। ८१ ।।
अंबा देई आश्वासन । होणार नाही त्याचे लग्न ।
ठाकुर पावले समाधान । चिंता समूळ निमाली ती ।। ८२ ।।



नरेन्द्रनाथ करी कथन । संन्याशाची संगती लागुन ।
मी ही संन्यासदीक्षा घेइन । ऐसे वाटे बडिलांला ।। ८३ ।।
यास्तव पुष्कळ खटपट करुन । ठरवु पाहती माझे लग्न ।
परंतु समर्थ रामकृष्ण । इच्छा बलवती त्यांची असे ।। ८४ ।।
त्यांच्या इच्छेविरुद्ध जाउन । कैचे सफल होती प्रयत्न ।
काही क्षुल्लक कारण घडुन । लग्न मोडुनी जात असे ।। ८५ ।।
रामकृष्णांच्या सहवासात । दिवस लोटती आनंदात ।
साध्यासाध्याही गोष्टीत । वितरती अत्युच्च शिक्षण ।। ८६ ।।
कोणाचेही न दुखविता मन । दोष देती ते दाखवून ।
लहानसाही दिसता गुण । प्रशंसा करुनी वाढविती ।। ८७ ।।
वासनेमाजी सापडून । न बिघडो कुणाचे जीवन ।
यास्तव शिष्याचे आचरण । बारकाईने निरीक्षिती ।। ८८ ।।
परि कोणाला येइना कळुन । की बाबा देतात शिक्षण ।
दिसतसे वर्तन साधारण । असामान्य कौशल्य बाबांचे ।। ८९ ।।
पंचवटीत शिष्य जमती । ध्यान धारणा तेथे करिती ।
अनेक खेळ तेथे खेळती । गप्पाहि चालती त्या ठायी ।। ९० ।।
तेथे येताच रामकृष्ण । आनंदाचे उठे तुफान ।
कधी कधी स्वत: पाक करुन । शिष्यजन जेवती त्या ठायी ।। ९१ ।।
एक दिवस नरेन्द्रनाथ । स्वयंपाक असता करित ।
ठाकुर येउनी अकस्मात । म्हणती भोजन घेइन मी ।। ९२ ।।
जाणत होते सर्वजण । ब्राह्मणाने शिजविता अन्न ।
रामकृष्ण करिती ग्रहण । अन्न अन्यांचे न सेविती ।। ९३ ।।
यास्तव तयांच्यासाठी वेगळी । व्यवस्था होती केलेली ।
परि ते म्हणती या वेळी । हेच अन्न मी खाणार ।। ९४ ।।



नरेन्द्र सत्त्वगुण संपन्न । त्याच्या हातचे खाता अन्न ।
दोष नसेच ऐसे म्हणुन । करिती भोजन आनंदे ।। ९५ ।।
दिवस जाती आनंदात । परी पुढे घडले विपरित ।
नरेन्द्रच्या पितयाप्रत । अकस्मात जाहली देवाज्ञा ।। ९६ ।।
विश्वनाथबाबूने धंद्यात । पैसा मिळविला होता बहुत ।
स्वभाव खर्चिक अत्यंत । मागे शिल्लक काही नसे ।। ९७ ।।
उत्पन्नाचे नसे साधन । खर्च तसाच होतसे म्हणुन ।
कुटुंबावर फार दारुण । प्रसंग तेधवा ओढवला ।। ९८ ।।
बी.ए.च्या परीक्षेप्रत । बसला होता नरेन्द्रनाथ ।
कुटुंबचि पडले पेचात । सकळ मिळकत थांबली ।। ९९ ।।
नरेन्द्र असुनही धैर्यवान । किंकर्तव्यमूढ गेला होउन ।
सर्वत्र अंधार येई दिसुन । उपाय सुचेना तयाप्रती ।। १०० ।।
कोठे चाकरी मिळावी म्हणुन । नरेन्द्रनाथ करी प्रयत्न ।
न दिसे मिळेल ऐसे चिन्ह । तीन चार महिने लोटले ।। १ ।।
तयाच्या कुटुंबाची स्थिती । अधिकच खालावली होती ।
रामकृष्ण हळहळ करिती । म्हणती काय प्रसंग हा ।। २ ।।
सांगती जो येई तयास । नोकरीस लावा नरेन्द्रास ।
आश्चर्य वाटे सकळांस । रामकृष्णांच्या म्हणण्याचे ।। ३ ।।
स्वत:विषयी रामकृष्ण । असूनहि अत्यंत उदासीन ।
नरेन्द्राविषयी वसे महान । आस्था तयांच्या अंतरी ।। ४ ।।
नरेन्द्र अत्यंत स्वाभिमानी । रुचत नसे हे तयाच्या मनी ।
म्हणे य:कश्चित मी असुनी । काय तुम्ही हे चालविले ।। ५ ।।
आपुल्या सारख्या नि:स्पृहाप्रत । तोंड वेंगाडणे नाही शोभत ।
आपण सदैव काढता सांप्रत । गोष्ट माझ्या नोकरीची ।। ६ ।।



नरेन्द्रचे ऐकुनी वचन । अश्रूंनी भरुन आले नयन ।
बाबा म्हणती झोळी घेइन । गरज पडता तुझ्यासाठी ।। ७ ।।
एवढी गोष्ट काढावयाला । काय कमीपणा आहे मजला ।
माझी काहीही करावयाला । तयारी असे रे तुजसाठी ।। ८ ।।
नरेन्द्रावर एवढे प्रेम । ठाकुर करिती अकृत्रिम ।
तयांचा संबंध अप्रतिम । निष्काम प्रेम ठाकुरांचे ।। ९ ।।
सांगत असे नरेन्द्रनाथ । चाकरी मिळविण्या त्या दिवसांत ।
हिंडहिंड हिंडुनी उन्हात । हताश होउनी परतावे ।। ११० ।।
नोकरीसाठी इतुके हिंडुन । मिळावयाचे दिसेना चिन्ह ।
अत्यंत निराश मन होउन । विचारचक्र सुरू होई ।। ११ ।।
दरिद्र्यासाठी नसे संसार । याचा कर्ता नसावा ईश्वर ।
सैतानाची रचना समग्र । असावी ऐसे वाटतसे ।। १२ ।।
साह्य करण्यास असती अधिर । तेच आता पळती दूर ।
दाट संबंध असुनही नर । मुद्दाम टाळू लागले ।। १३ ।।
एकदा ऊन असता प्रखर । हिंडता थकुनी गेले शरीर ।
पायास फोड आले फार । सावलीत क्षणभर बैसलो ।। १४ ।।
तेथवा माझ्याबरोबर । एक दोन होते मित्र ।
मजला यावा म्हणुनी धीर । एक मित्र गाऊ लागला ।। १५ ।।
देव असे अति दयाघन । तुझे दुःख करील निरसन ।
वेदना झाल्या ते ऐकुन । घराची स्थिती आठवली ।। १६ ।।
घरी आई भाऊ बहिण । तयांची अवस्था अतीव दीन ।
तयांची येउनी आठवण । एकदम मी ओरडलो ।। १७ ।।
उदर भरण्याची नसता चाड । अशी गाणी वाटती गोड ।
ज्यास मिळेना अन्न धड । त्यास असे हे वेडावणे ।। १८ ।।



माझा तो भडिमार ऐकुन । बिचारा मित्र झाला खिन्न ।
कशी तयाला यावी कळुन । माझ्या मनाची अवस्था ।। १९ ।।

नरेन्द्र प्रातःसमयास । समजू न देता कोणास ।
पुरेसे अन्न खावयास । आहे काय पाहातसे ।। १२० ।।

घरात पुरेसे नसता अन्न । देतसे आईला सांगुन ।
एका मित्राकडे भोजन । आज मजला करायचे ।। २१ ।।

लगेच मग बाहेर पडुन । खाई पैशाचे पोहे घेउन ।
कधी तरी उपाशिही राहुन । नरेन्द्र दिवस काढितसे ।। २२ ।।

दुःखात एवढे सुख होय । ईश्वर आहे मंगलमय ।
याविषयी कधिही संशय । मनात नाही उद्भवला ।। २३ ।।

नरेन्द्र प्रातःकाळी उठुन । प्रथम करितसे नामस्मरण ।
एकदा आई ते ऐकुन । म्हणाली कारट्या पुरे कर ।। २४ ।।

अगदी बाळपणापासुन । करितोस भगवान भगवान ।
त्यानेच दशा ही दिली करुन । ते शब्द झोंबले नरेन्द्राला ।। २५ ।।

त्याच्या मनात येई विचार । देव असे का खरोखर ।
काकुळतीची प्रार्थना ईश्वर । कसा ऐकत नाही मग ।। २६ ।।

ईश्वरचंद्र विद्यासागर । म्हणती जर दयामय ईश्वर ।
तर त्याच्या सृष्टीत अपार । दुःख दारिद्र्य का असावे ।। २७ ।।

यापरी विचार मनी येउन । संशयग्रस्त झाले मन ।
कोणतीही गोष्ट चोरुन । ठेवणे न ठावे नरेन्द्रला ।। २८ ।।

म्हणे जगतात ईश्वर नाही । आणि जरी तो असलाही ।
तथापि अर्थ नसे काही । आळविण्यात तयाप्रती ।। २९ ।।

मग उघड उघड ही गोष्ट । जनात बोलू लागला स्पष्ट ।
ज्याची ज्याची होतसे भेट । त्यास तो सांगू लागला ।। १३० ।।



मग बोलू लागले लोक । नरेन्द्रनाथ झाला नास्तिक ।
अधःपतन पाहण्यास अनेक । येती भक्तही ठाकुरांचे ।। ३१ ।।
तयाची अशी अवस्था हीन । पाहाण्यास येता भक्त जन ।
वादविवाद त्यांच्याशी करुन । सांगतसे नसे परमेश्वर ।। ३२ ।।
तयास वाटे हे भक्तजन । आपुले झाले अधःपतन ।
याची खात्री जाता पटुन । करितिल कथन ठाकुरांसी ।। ३३ ।।
वाटे नरेन्द्रच्या मनात । मानवाच्या मतास किंमत ।
काय आहे या जगतात । कळू द्या श्रीरामकृष्णांना ।। ३४ ।।
रामकृष्णांचे वाईट मत । झाले तरिही नसे हरकत ।
प्रत्यक्षात घडले विपरित । कळता वार्ता ठाकुरांना ।। ३५ ।।
प्रथम सर्वांचे परिसून । काही न बोलती रामकृष्ण ।
आपुले मत न करिती कथन । करिती उपेक्षा वार्तेची ।। ३६ ।।
तथापि जेधवा भवनाथ । ठाकुरांकडे गेला रडत ।
वदला न वाटले स्वप्नात । अधःपात होइल नरेन्द्राचा ।। ३७ ।।
एकदम त्याच्या आंगावर । ओरडून म्हणाले ठाकुर ।
गप्प बसा तुम्ही अज्ञानी नर । न कळे काही तुम्हाप्रती ।। ३८ ।।
जगन्माता सांगते मजला । नरेन्द्र कधिही कुमार्गाला ।
लागणार नाही यास्तव त्याला । दोष पुनरपी देऊ नका ।। ३९ ।।
तुम्ही कोणीही मजलागुन । पुन्हा जर असे कराल कथन ।
तर कधीही तुमचे वदन । पाहाणार नाही समजावे ।। १४० ।।
बाबांना नरेन्द्रचा उज्वल । दिसतसे भूत भविष्यकाळ ।
शंकासुद्धा कशी येईल । नरेन्द्राबद्दल तयांप्रती ।। ४१ ।।
रामकृष्णांच्या दर्शनापासुन । अनुभव जो मिळाला महान ।
त्यामुळे नरेन्द्रचे मन । स्वीकारू शकेना नास्तित्व ।। ४२ ।।



ईश्वर नसेल जर जगतात । तर काय अर्थ संसारात ।
कशासाठी असावे जिवंत । वाटे असावा परमेश्वर ।। ४३ ।।
येवोत दुःख कष्ट दारुण । तरिही घ्यावया त्याचे दर्शन ।
काढिला पाहिजे मार्ग शोधुन । दोलायमान मन होई ।। ४४ ।।
तथापि कोणतीही गोष्ट । जोवर स्वतःस न कळे नीट ।
ती न स्वीकारी ऐसा धीट । स्वभाव असे नरेन्द्रचा ।। ४५ ।।
प्रत्यक्ष अनुभव घेतल्यावाचुन । न माने केवळ करिता कथन ।
स्पष्टपणे तो टाके सांगुन । यावर आपुली श्रद्धा नसे ।। ४६ ।।
रामकृष्णदेव तयाप्रती । आपुले जे अनुभव सांगती ।
तो तयांचीही पाहे प्रतीती । त्याविण विश्वास ठेवीना ।। ४७ ।।
ठाकुरांच्या आध्यात्मिक । अवस्था अनुभव अनेक ।
ते सांगती जो विवेक । तयांचिही परीक्षा करित असे ।। ४८ ।।
रामकृष्णांसारखा उदार । संशयच्छेदक समर्थ थोर ।
न मिळता तयाला गुरुवर । तर काय होते कोण जाणे ।। ४९ ।।
कदाचित नरेन्द्राचे मन । संशयसागरात भटकून ।
काढिला असता पंथ नविन । कर्तृत्ववान नरेन्द्रने ।। १५० ।।
परंतु ठाकुर जाणती पूर्ण । नरेन्द्रनाथ असे कोण ।
उर्वीवर का घेई जनन । काय कार्य असे त्याचे ।। ५१ ।।
नानाविध पंथांचे पूर्ण । विविध धर्मांचे देउनी ज्ञान ।
श्रीरामकृष्ण भगवान । पूर्णता देती नरेन्द्रला ।। ५२ ।।
श्रीरामकृष्ण कथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५३ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा एकतिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय बत्तिसावा

जय जयाजी जगत्कारणा । विश्वंभरणा दयाघना ।
नररूपधारी नारायणा । रामकृष्णा नमोऽस्तु ते ।। १ ।।

एकदा नोकरीसाठी हिंडुन । नरेन्द्र अत्यंत गेला थकुन ।
डोळ्यांपुढे अंधेरी येउन । घरी जाणे अशक्य झाले ।। २ ।।

एका ठिकाणी पडवींत । पडुनि राहिला नरेन्द्रनाथ ।
चित्तपटावर होती उमटत । अनेक चित्रे त्या वेळी ।। ३ ।।

नरेन्द्र सांगे इतुक्यात । माझ्या मनावरचे पट ।
दिसले कोणी बाजूस करित । उलगडा होतसे तयामुळे ।। ४ ।।

ईश्वर असे अन्यायी न्यायी । सृष्टींत विषमता का असे ही ।
कोणीतरि समजावुनि देई । त्यामुळे होई समाधान ।। ५ ।।

अस्थिर मन मग झाले स्थिर । सर्व संशय झाले दूर ।
आनंदाने भरला ऊर । विलक्षण हुषारी वाटली ।। ६ ।।

सर्व थकवा नष्ट झाला । मग उठुनी आलो घराला ।
थोडा अवकाश होता राहिला । संपावयाला ती रात्र ।। ७ ।।

मग मी त्या दिवसापासुन । निंदास्तुतीविषयी पूर्ण ।
होउनि गेलो उदासीन । विश्वास मनाला वाटला ।। ८ ।।

जन्मास आलो नाही आपण । केवळ करावया अर्थार्जन ।
किंवा करावा कुटुंबपोषण । ध्येय नव्हे हे जीवनाचे ।। ९ ।।

आज्ञाप्रमाणे संसार सोडुन । वाटे गुपचुप जावे पळुन ।
इतुक्यात कळले रामकृष्ण । येणार आहेत शहरात ।। १० ।।



वाटले जावे घेउनी दर्शन । भक्ताच्या घरी केले गमन ।
भेट होताच रामकृष्ण ! म्हणती चाल दक्षिणेश्वरा ।। ११ ।।
मी तर आढवेढे घेतले । ठाकुरांनी नाही ऐकिले ।
काय तयांनी सर्व जाणिले । म्हणुनी नेले स्वत:सवे ।। १२ ।।
ठाकुरांना जाताच खोलित । भावावेश झाला प्राप्त ।
माझ्या गळ्यात घालुनी हात । गाती गाळित ते अश्रू ।। १३ ।।
बोलावे तर वाटते भीती । न बोलताही तीच गती ।
संशय येतसे माझ्या चित्ती । तुला गमावून बसेन मी ।। १४ ।।
यापरी तयांचे परिसुनी गान । न राहे ताब्यात माझे मन ।
माझाहि कंठ आला दाटुन । नयनातुनि अश्रू वाहती ।। १५ ।।
माझी खात्रीच गेली पटुन । ठाकुरांस सर्व आले कळुन ।
न लपे काही त्यांच्यापासुन । कितिही प्रयत्न जरि केले ।। १६ ।।
रात्री सवाँस बाजुला करुन । मला घेतले बोलावुन ।
ते म्हणती मी असे जाणुन । कशास आलास इहलोकी ।। १७ ।।
जगज्जननीचे कार्य थोर । करावया आलास पृथ्वीवर ।
जाणतो नाहीस राहणार । संसारात तू कधीही ।। १८ ।।
परंतु मी असे तोपर्यंत । माझ्यासाठी तरी संसारात ।
त्वा राहिले पाहिजे येथ । अश्रु गाळीत ते बोलिले ।। १९ ।।
ठाकुरांचा निरोप घेउन । नरेन्द्र आला परतून ।
पुनरपि सुरू केले भ्रमण । शोधावयाला नोकरी ।। २० ।।
मग एका वकिलाच्या घरी । कारकुनाचे काम धरी ।
पुस्तकांचा अनुवाद करी । मिळवी द्रव्य थोडेसे ।। २१ ।।
परि चरितार्थापुरते साधन । न मिळे पुष्कळ प्रयत्न करुन ।
मग मनात झाला खिन्न । सुचेना काय करावे ते ।। २२ ।।



तेव्हा मनात आला विचार । ठाकुरांचे ऐकतो ईश्वर ।
त्यांनाच आता जोडुनी कर । एवढी विनंती करावी ।। २३ ।।
म्हणावे घरच्या मंडळींना । अन्नवस्त्रसुद्धा मिळेना ।
तरी आपण करावी प्रार्थना । निवारावयाला कष्ट त्यांचे ।। २४ ।।
उद्‌भवताच ऐसा विचार । मनास हुरूप वाटला फार ।
वाटले एवढी गोष्ट ठाकुर । जरूर करतील मजसाठी ।। २५ ।।
मग दक्षिणेश्वराला गेला । सांगितले सर्व ठाकुरांला ।
म्हणाला माझ्या कुटुंबाला । अन्नवस्त्र मिळाले पाहिजे ।। २६ ।।
तेवढी व्यवस्था करावयाला । तुम्ही विनवा जगदंबेला ।
घरच्या माणसांचे मजला । हाल होतात बघवेना ।। २७ ।।
यावर म्हणती रामकृष्ण । असली गोष्ट माझ्याकडुन ।
बोलवणार नाही जाण । का न सांगसी तूच तिला ।। २८ ।।
मानित नाहीस जगदंबेस । म्हणुनी तुजला होतसे त्रास ।
आज मंगळवार दिवस । करी तू सांगतो तैसेची ।। २९ ।।
मंदिरात आईच्या जाउन । भावे करुनी तिजला नमन ।
मागावयाचे ते घे मागुन । निश्चित देइल जगदंबा ।। ३० ।।
चिन्मयी ब्रह्मशक्ती आई । तिच्या इच्छेने सर्व होई ।
निर्माण करी हे ब्रह्मांडही । काय करिता न ये तिला ।। ३१ ।।
प्रहर रात्र झाल्यावर । मंदिरात जा वदले ठाकुर ।
नरेन्द्र सांगे निघालो सत्वर । जणु गुंगी आली मन्मनाला ।। ३२ ।।
आता होइल आईचे दर्शन । आनंदाने भरले मन ।
त्या आनंदात विस्मरण । झाले सकळ काळज्यांचे ।। ३३ ।।
प्रवेश करिता मंदिरात । आई दिसे चिन्मयी जिवंत ।
कारुण्य लावण्य निथळत । होते अंगातुनी जननीच्या ।। ३४ ।।



भक्तिप्रेमाचा पूर येउन । हृदय आले उचंबळुन ।
झाले सद्गदित अंत:करण । केले नमन पुन:पुन्हा ।। ३५ ।।
वदलो आई मजलागुन । देई विवेक वैराग्य ज्ञान ।
देई भक्ती जेणेकरुन । निरंतर दर्शन होई तुझे ।। ३६ ।।
मनास प्राप्त झाली शांती । महदानंद भरला चित्ती ।
परत येताच ठाकुर पुसती । आईला काय मागितले ।। ३७ ।।
जागे करावे हालवून । तेवी प्राप्त झाले भान ।
वाटले गेलो विसरून । आता काय करायचे ।। ३८ ।।
ठाकुर वदले फिरुनि जा आता । पुनरपि प्रार्थी जगन्माता ।
माग जे जे येइल चित्ता । निश्चित मिळेल तुजलागी ।। ३९ ।।
पुन्हा जाउनी घेता दर्शन । विसरुनि गेलो देहभान ।
आईस भक्ति वैराग्य ज्ञान । मागुनी पुनरपी परतलो ।। ४० ।।
परत येताच रामकृष्ण । पुसती काय घेतले मागुन ।
तयांना वृत्तान्त केला कथन । ऐकुनी ठाकुर हासले ।। ४१ ।।
म्हणती क्षुल्लक गोष्ट ही असुन । घेता आली नाही मागुन ।
जा आता सावध राहुन । प्रार्थना करुनी परत ये ।। ४२ ।।
मग मंदिरी करिता प्रवेश । लाज वाटू लागली मनास ।
काय जगज्जननीस । य:कश्चित गोष्ट मागावी ।। ४३ ।।
राजाधिराज होता प्रसन्न । काय भोपळा घ्यावा मागुन ।
हाही प्रकार तयासमान । विचार करी मन यापरी ।। ४४ ।।
ऐसे विचार मनात येउन । जगन्मातेला केले नमन ।
वदलो आई दे भक्ति ज्ञान । दुसरे काही मला नको ।। ४५ ।।
खोलीस येताच परतून । गुंगी ती गेली उतरून ।
वाटले तीन वेळा जाउन । कसे विसरलो मागावचे ।। ४६ ।।



तत्काळ खात्री गेली पटुन । खेळ हा करिती रामकृष्ण ।
इच्छाशक्ती तयांची महान । ते इच्छिती ते घडत असे ।। ४७ ।।
ठाकुर सर्वशक्तिसंपन्न । त्यांची इच्छा नव्हती म्हणुन ।
घेता आली नाही मागुन । सुख संपत्ती अंबेला ।। ४८ ।।
रामकृष्णांच्या इच्छेवाचुन । शब्द न निघे तोंडातुन ।
मनावर त्यांचाच ताबा पूर्ण । इच्छेने मन ते फिरविती ।। ४९ ।।
त्यांनी केवळ आणिता मनात । निरसतील संकटे समस्त ।
देणे वैभव धन संपत । असे हातात ठाकुरांच्या ।। ५० ।।
मग बसलो धरणे धरुन । जगन्मातेला सांगा आपण ।
ठाकुर म्हणती तोंडातुन । बाहेर येइना गोष्ट अशी ।। ५१ ।।
एवढी साधी गोष्ट तुला । मागता येइना अंबेला ।
काय करू तव नशिबाला । संसारसुख ते असेना ।। ५२ ।।
तथापि मी म्हणालो ठाकुर । आज मी नाही सोडणार ।
आणल्यास आपण मनावर । सर्व काही होऊ शके ।। ५३ ।।
करुणार्द्र होउनी ठाकुर । बोलते झाले शब्द मधुर ।
तुम्हाला नाही पडणार । अन्नवस्त्रांची कमतरता ।। ५४ ।।
तेव्हा त्या दिवसापासुन । कधिही माझ्या कुटुंबालागुन ।
भासली नाही अडचण । अन्नवस्त्रादिकांची ।। ५५ ।।
नरेन्द्राच्या जीवनात । या गोष्टीस महत्त्व बहुत ।
पूर्णपणाने तयाप्रत । कळले साकार सत्य असे ।। ५६ ।।
यापूर्वी साकारावर । विश्वास नव्हता अणुमात्र ।
देवदेवतांची अपार । टिंगल करावी तयाने ।। ५७ ।।
रामकृष्णांच्याही समोर । देवीस नावे ठेवी फार ।
एकदा तर शान्तिसागर । ठाकुर त्यावर रागावले ।। ५८ ।।



म्हणाले निघुनि जाई येथुन । माझ्या मातेस देसी दूषण ।
लाज कशी ती तुजलागुन । न वाटे निंदिता मातेला ।। ५९ ।।
नरेन्द्रला आले कळुन । आज मर्यादा उल्लंघुन ।
आपण बोलुन गेलो वचन । गुपचुप बसला कोपऱ्यात ।। ६० ।।
यावर लोटता काही क्षण । तयास बघती रामकृष्ण ।
दिसले म्लान तयाचे वदन । उचंबळले मन ठाकुरांचे ।। ६१ ।।
मग प्रेमाने म्हणती तयाला । कितिही नावे ठेवी मजला ।
परि निंदू नकोस आईला । सहन मजला होत नसे ।। ६२ ।।
नरेन्द्राचे होते मत । मूर्तिपूजा करणे व्यर्थ ।
मानिती साकाररूपाप्रत । केवळ अज्ञानी जन मात्र ।। ६३ ।।
निराकारवादी नरेन्द्राला । साकाराचा अर्थ कळला ।
आता पूर्ण विश्वास बसला । साकाररूपावर ईश्वराच्या ।। ६४ ।।
नरेन्द्रचे परिवर्तन । पाहुनी तोषले रामकृष्ण ।
व्हावयाचे त्याच्याकडुन । धर्मप्रवर्तन सांप्रती ।। ६५ ।।
विश्वव्यापक उदार धर्माचा । जर का प्रचार करावयाचा ।
घडविला गेला पाहिजे साचा । सकळ आंगोपांगासह ।। ६६ ।।
जर यापरी नाही घडले । नरेन्द्रास अर्धसत्य कळले ।
तर धर्मप्रयोजन उद्भवलेले । करण्यास होइल असमर्थ ।। ६७ ।।
यास्तव इच्छिती रामकृष्ण । नरेन्द्रास व्हावे पूर्ण ज्ञान ।
तयास साकार आले कळुन । म्हणुनी ठाकुर आनंदले ।। ६८ ।।
सांगत असती रामकृष्ण । ईश्वर निराकार निर्गुण ।
तसाच असे साकार सगुण । आणि पार या सर्वांच्या ।। ६९ ।।
ईश्वराच्या रूपाची इती । करिता न ये कोणाप्रती ।
भगवान संतोष पावले चित्ती । साकार कळता नरेन्द्राला ।। ७ ।।



जगदंबेच्या कार्याप्रती । अवश्य सर्व धर्मांची माहिती ।
ती प्राप्त व्हावी नरेन्द्राप्रती । यास्तव झटती रामकृष्ण ।। ७१ ।।

ठाकुरांना आनंद जाहला । सांगती जो येईल त्याला ।
नरेन्द्र आता जननीला । मानु लागला बरे का ।। ७२ ।।

तारापद घोष तेथे आला । ठाकुर सांगू लागले तयाला ।
येथे एक मुलगा निजला । फार चांगला तो आहे ।। ७३ ।।

नरेन्द्र दत्त नाव त्याला । मानित नव्हता जगन्मातेला ।
कालपासुनी मानु लागला । फार चांगले झाले हे ।। ७४ ।।

नरेन्द्रची घरची स्थिती । अत्यंत वाइट झाली होती ।
कथन करिता ती मजप्रती । तयाला मी सांगितले ।। ७५ ।।

जाउनि आईच्या मंदिरात । मागुनि घे जे तुझे इच्छित ।
नाही मागू शकला दौलत । म्हणे वाटली लाज मला ।। ७६ ।।

भक्ति वैराग्य आणि ज्ञान । एवढे आईस घेतले मागुन ।
म्हणे परतता मंदिरातुन । शिकवा गाणे अंबेचे ।। ७७ ।।

त्यास शिकविले एक गीत । रात्रभर बैसला गुणगुणत ।
आताच ते गीत गात गात । झोप लागली तयाला ।। ७८ ।।

सांगती नरेन्द्र अखेरीस । मानु लागला जननीस ।
छान झाली ही गोष्ट खास । म्हणुनी आनंद प्रदर्शिती ।। ७९ ।।

त्या दिवशी त्यांच्या बोलण्यात । दुसरा विषय नव्हता येत ।
नरेन्द्र मानितो मातेप्रत । सांगती येईल तयालागी ।। ८० ।।

नरेन्द्र सांगे अप्रतिम । ठाकुर करू शकती प्रेम ।
कसे करावे प्रेम निष्काम । तेच जाणू शकतात ।। ८१ ।।

प्रेम करितात इतर जन । वरवरचे ते प्रदर्शन ।
स्वार्थच त्यात असे भरुन । रामकृष्ण तयाला अपवाद ।। ८२ ।।



ठाकुर सांगती नरेन्द्रला । ईशदर्शनाची चित्ताला ।
तळमळ असावी सर्व वेळा । त्याविण काही सुचू नये ।। ८३ ।।
एका खोलीत सुवर्णगोळा । दुसऱ्या खोलीत चोर असला ।
वार्ता समजता तयाला । खोलीत स्वस्थ बसवेल का ।। ८४ ।।
अस्थिर होइल त्याचे मन । तो जीव धोक्यात घालुन ।
सोने मिळवावयाचा प्रयत्न । केल्याविण नाही राहणार ।। ८५ ।।
तशीच साधकाची स्थिती । झाली पाहिजे शीघ्रगती ।
तरच होतसे ईश्वरप्राप्ती । माझी स्थिती होती तशी ।। ८६ ।।
नरेन्द्र करीत असता ध्यान । एकदा तयाला आला दिसुन ।
प्रचंड ज्योतिर्मय त्रिकोण । जिवंत भासला प्रत्यक्ष ।। ८७ ।।
मग दक्षिणेश्वराला येउन । रामकृष्णांना करी कथन ।
ठाकुर म्हणती झाले दर्शन । ब्रह्मयोनीचे तुजप्रती ।। ८८ ।।
साधनकाळी मजलागुन । बेलाखाली करिता ध्यान ।
झाले होते तिचे दर्शन । आणिक दिसले तेथवा ।। ८९ ।।
ब्रह्मयोनी जिवंत असुन । अनंत ब्रह्मांडे प्रतिक्षण ।
प्रसवित आहे आले दिसुन । तुजला दर्शन झाले तिचे ।। ९०।।
एके दिवशी नरेन्द्राप्रत । दूरदर्शनाची अकस्मात ।
दूरश्रवणाची शक्ती प्राप्त । झाली ध्यानात असताना ।। ९१ ।।
तयास करीत असता ध्यान । दूरदूरचे येई दिसुन ।
कोण काय बोलतो दुरुन । समजू लागले तयाप्रती ।। ९२ ।।
तीन दिवस प्रकार घडला । गोष्ट बोलला ठाकुरांला ।
ते म्हणती सिद्धी तुजला । प्राप्त झाली समजावे ।। ९३ ।।
ईश्वरलाभाच्या मार्गातिल । या सिद्धी अडथळे केवळ ।
न करी ध्यान काही काळ । नष्ट होईल मग सिद्धी ।। ९४ ।।



साधक साधना असता करित । कधी कधी त्याला अकस्मात ।
अशा सिद्धी होतात प्राप्त । लक्ष न द्यावे त्यांच्याकडे ।। ९५ ।।
साधक सिद्धीमागे पळती । त्याची आध्यात्मिक उन्नती ।
खुंटली म्हणुनि समजा चित्ती । म्हणुनी त्याज्य त्या समजाव्या ।। ९६ ।।
जगन्मातेने मजलागुन । आधीच दिधले दाखवून ।
सिद्धी असती विष्ठेसमान । म्हणुनी किळस मज त्यांची ।। ९७ ।।
चिज्जड वस्तूची जी ग्रंथी । तिलाच अहंकार म्हणती ।
त्याग बाणला पाहिजे चित्ती । हृदयग्रंथी छेदावया ।। ९८ ।।
खरे खरे जे त्यागी जन । सिद्धीकडे न बघती ढुंकुन ।
अहंकार ज्यांचा जाई गळुन । आत्मलाभ त्यांना होत असे ।। ९९ ।।
रामकृष्णदेव म्हणती । ईश्वराची अलौकिक शक्ती ।
ऐश्वर्यदर्शन घ्यावयाप्रती । इच्छा न करावी भक्ताने ।। १०० ।।
ऐश्वर्यदर्शनाने मनात । भय उत्पन्न होतसे बहुत ।
प्रेमभक्तीचा नाही राहात । भाव मनात भक्ताच्या ।। १ ।।
वाटे ईश्वर केवढा श्रेष्ठ । आपण अगदीच कनिष्ठ ।
उपजतो भिन्नतेचा तट । तुटतसे संबंध प्रेमाचा ।। २ ।।
ईश्वराला मी तू करणे । तयाला जेवू खाऊ घालणे ।
आणिक त्याचे लाड पुरिवणे । अशक्य होई त्या स्थितीत ।। ३ ।।
यास्तव ऐश्वर्य दर्शन व्हावे । भक्ताने कधी न इच्छावे ।
भगवंत भजावा जिवेभावे । करावे प्रेम त्याच्यावर ।। ४ ।।
रामकृष्णांनी सांगितलेला । साधनमार्ग अवलंबिला ।
त्या प्रभावाने नरेन्द्रला । महान सामर्थ्य प्राप्त झाले ।। ५ ।।
कळले आपुल्या आंगात । दिव्य शक्ती झाली प्राप्त ।
इच्छा झाली नरेन्द्राप्रत । प्रयोग शक्तीचा करावया ।। ६ ।।



धर्मभाव जो निज आंगात । तो भाव दुसऱ्या भक्ताप्रत ।
करिता येतसे संचारित । केवळ स्पर्श करूनिया ।। ७ ।।
शिवरात्रीचा आला दिवस । वदला कालीप्रसादास ।
स्पर्श करुनी मम देहास । थोडा वेळ थांब येथे ।। ८ ।।
नरेन्द्र ध्यानात झाला मग्न । काली बसला स्पर्श करुन ।
हात पावू लागला कंपन । तयाने स्पर्श केलेला ।। ९ ।।
थोडा वेळ ध्यान करुन । नरेन्द्राने ते संपवुन ।
कालीस पुसे तुजलागुन । सांग अनुभव आलेला ।। ११० ।।
कालीप्रसाद सांगे मात । बॅटरी धरावी हातात ।
विद्युतप्रवाह शिरे अंगात । ऐसा भास झाला मला ।। ११ ।।
कंप सुटला सर्वांगाला । हात कापू न देण्याला ।
मी बराच प्रयत्न केला । परि व्यर्थ झाला तो सर्व ।। १२ ।।
द्वितीय प्रहराची पूजा होता । काली बसला ध्यानाकरिता ।
विसरुनि गेला बाह्य जगता । ध्यान अपूर्व लागले ।। १३ ।।
सकाळ होताच नरेन्द्रला । शशी बोलवावयाला आला ।
म्हणे ठाकुरांनी तुजला । बोलाविले ये लवकर ।। १४ ।।
निरोप मिळता नरेन्द्र उठला । ठाकुरांच्या खोलीस गेला ।
नम्रपणाने प्रणाम केला । उभा राहिला समोर तो ।। १५ ।।
भगवान म्हणती नरेन्द्रास । जराशी शक्ती जमावयास ।
लागताच तू करतोस । सुरुवात खर्च करावया ।। १६ ।।
प्रथम तू स्वत:च्याच ठायी । नीट संचय होऊ देई ।
समजावुनि मग देइल आई । कसा खर्च करायचा ।। १७ ।।
भाव कालीच्या अंगात । करुनि दिला तू संचारित ।
तयाचे केवढे अपरिमित । नुकसान केले पाहा बरे ।। १८ ।।



ज्या भावे तो असे चालत । तो नष्ट झाला आहे समस्त ।
सहा महिन्यांचा गर्भपात । व्हावा तैसेच झाले हे ।। १९ ।।
असो झाले ते गेले होउन । करू नकोस भलते फिरुन ।
नरेन्द्र म्हणाला हे ऐकुन । चकित होउनि गेलो मी ।। १२० ।।
आम्ही इकडे काय केले । ठाकुरांनी तिकडे जाणिले ।
कानउघाडणीने झाले । अपराध्यासमान मन माझे ।। २१ ।।
कालीप्रसादचा भाव । पूर्वीचा नष्ट झाला सर्व ।
रामकृष्णांनी अद्वैतभाव । बोध करणे आरंभिले ।। २२ ।।
रामकृष्णांच्या सहवासात । ईशदर्शनाची नरेन्द्राप्रत ।
तळमळ लागली अत्यंत । व्यवहार अशक्य जाहला ।। २३ ।।
वकिलीच्या परीक्षेला । जमवी फी तो बसावयाला ।
तोच तीव्र वैराग्य त्याला । प्राप्त झाले अकस्मात ।। २४ ।।
त्या भरात तो अनवाणी । फक्त एक धोतर नेसुनी ।
चालत आला शहरापासुनी । धरिले चरण ठाकुरांचे ।। २५ ।।
अत्यंत व्याकुळ झाले मन । दुर्लक्षिले निद्रा भोजन ।
रात्रंदिवस ध्यान भजन । यातच निमग्न तो असे ।। २६ ।।
ठाकुरांनी केला कथन । त्या मार्गाचे अवलंबन ।
घरच्या स्थितीस उदासीन । गेला होउनि नरेन्द्रनाथ ।। २७ ।।
घ्यावयासाठी ईश्वरदर्शन । व्याकुळता झाली उत्पन्न ।
उत्साह त्याचा अवलोकुन । रामकृष्ण करिती प्रशंसा ।। २८ ।।
पाहुनि संसाराचा शकट । चालु लागला आहे नीट ।
निवारण झाले सकळ संकट । नरेन्द्र निश्चिंत जाहला ।। २९ ।।
आता कराया साधनभजन । करावयाला ग्रंथवाचन ।
करू लागला कालक्रमण । इतर विषय नाठवती ।। १३० ।।



रामकृष्णांचे घ्यावया दर्शन । वेळ मिळता येई धावुन ।
अडचणीचे निवेदन । ठाकुरांस त्याने करावे ।। ३१ ।।
अति प्रेमाने रामकृष्ण । तयास करिती मार्गदर्शन ।
करावयाला साधनभजन । उत्तेजन देती अधिकाधिक ।। ३२ ।।
रामकृष्ण सद्गुरू थोर । नरेन्द्रचा थोर अधिकार ।
काय उणे मग असणार । साधकास सिद्ध व्हावयाला ।। ३३ ।।
नरेन्द्रची तळमळ वाढुन । ईशदर्शनाविण न पडे चैन ।
वाटे मनास रामकृष्ण । आणता अशक्य काही नसे ।। ३४ ।।
मनी आणती रामकृष्ण । तर समाधी ईश्वर दर्शन ।
हेही मिळविणे नसे कठिण । धरावे धरणे त्यांच्याकडे ।। ३५ ।।
ऐसा विचार मनी येउन । धरिले ठाकुरांचे चरण ।
म्हणाला अनुभव मजलागुन । द्या निर्विकल्प समाधीचा ।। ३६ ।।
उत्तर देती मग भगवंत । ते काय माझ्या हातात ।
जगन्माता सर्वसमर्थ । तिच्या इच्छेने घडत असे ।। ३७ ।।
यावर नरेन्द्रनाथ वदला । जर इच्छा होईल तुम्हाला ।
तर ती होइल जगदंबेला । निश्चित मजला वाटतसे ।। ३८ ।।
यावर वदते झाले ठाकुर । घाई करुनी काय होणार ।
काय बीज पेरता सत्वर । झाड उगवुनी फळे येती ।। ३९ ।।
तशी वेळ आल्यावाचुन । काहिच येऊ शकेना घडुन ।
नरेन्द्र वदला धिटाई करुन । केव्हा येणार वेळ अशी ।। १४० ।।
आपण गेल्यानंतर कोण । करू शकेल मार्गदर्शन ।
ऐकुनि ठाकुर चकित होउन । न देती उत्तर नरेन्द्राला ।। ४१ ।।
मग यानंतर एक दिवस । बसता ध्यान करावयास ।
तव अकस्मात नरेन्द्रास । गभीर समाधी लागली ।। ४२ ।।



त्याचे गुरुबंधू काहीजण । तेही करीत होते ध्यान ।
तयांनी ध्यान आटोपुन । पाहिले नरेन्द्रनाथाला ।। ४३ ।।

नरेन्द्र स्थिर बसलेला । दृष्टी लागली नासिकाग्राला ।
श्वासोच्छ्वास बंद जाहला । हालचाल थांबली देहाची ।। ४४ ।।

प्राण असल्याची काही खूण । तयांना आली नाही दिसुन ।
काय हे असे न ये कळुन । गांगरून गेले सकळीक ।। ४५ ।।

त्यांतील एक दोघेजण । गोष्ट ही करावयाला कथन ।
जेथे होते रामकृष्ण । गेले धावत त्या ठायी ।। ४६ ।।

अंथरुणावर होते स्वस्थ । रामकृष्णांची मुद्रा शांत ।
वदनावर गांभीर्य झळकत । तयांना वृत्त सांगितले ।। ४७ ।।

शांतपणाने सकळ ऐकुन । वदते झाले रामकृष्ण ।
अलीकडे माझ्यामागे लागुन । डोके पिकवले होते तये ।। ४८ ।।

नरेन्द्रास त्या अवस्थेत । राहु द्या काही वेळपर्यंत ।
यापरी उत्तर ऐकुनी शांत । झाले चकित भक्तजन ।। ४९ ।।

त्यांची खात्री गेली पटुन । हे सर्व जाणती रामकृष्ण ।
नरेन्द्रच्या जिवालागुन । अपाय काही झाला नसे ।। १५० ।।

मग ते आले परतून । नरेन्द्राजवळ राहिले बसुन ।
पुष्कळ वेळ लोटता भान । प्राप्त जाहले नरेन्द्राला ।। ५१ ।।

अंत:करण आले भरुन । अश्रु वाहती नयनातून ।
शांती दिव्यानंद महान । हृदयात भरुनी राहिला ।। ५२ ।।

रामकृष्णांना उद्देशुन । नम्रपणाने केले नमन ।
मग त्वरेने तेथुनी उठुन । धाव घेतली बाबांकडे ।। ५३ ।।

रामकृष्णांचे होता दर्शन । समोर घातले लोटांगण ।
नरेन्द्र दोन्ही हात जोडुन । उभा राहिला त्यांच्यापुढे ।। ५४ ।।



कृतज्ञता आनंद शांती । भरुनि राहिली त्याच्या चित्ती ।
शब्दहि बाहेर नच येती । नरेन्द्रच्या मुखातुनी ।। ५५ ।।
आपुल्या पट्टशिष्यास पाहुन । आनंदाचे उठले तुफान ।
अवस्था तयाची अवलोकुन । रामकृष्ण तयाला सांगती ।। ५६ ।।
जगन्मातेने तुजलागुन । सर्वच दिधले दाखवून ।
तुझ्या पेटीची किल्ली जाण । मात्र ठेविली माझ्याकडे ।। ५७।।
तुला मिळाला आहे अनुभव । तो नीट जतन करुनी ठेव ।
टाळत जावे जनसमुदाय । फारसे बोलत जाऊ नको ।। ५८ ।।
काही दिवस आता भोजन । करी स्वहस्ते पाक करुन ।
जगदंबेच्या मंदिरी जाउन । तिजला नमन करुनी ये ।। ५९ ।।
यापरी आला अभिनव । निर्विकल्प समाधीचा अनुभव ।
कृपासागर सद्गुरुराव । नरेन्द्र थोर अधिकारी ।। १६० ।।
रामकृष्णांची कृपा होउन । सार्थ जाहले मानवजीवन ।
नरेन्द्रनाथ झाला पूर्ण । लाभले ध्येय जीवनाचे ।। ६१ ।।
महापुरुषांच्या संगमातुन । झाले धर्माचे पुनरुज्जीवन ।
सकळ जग निघाले न्हाउन । बोधामृतसागरामधे ।। ६२ ।।
नरेन्द्र झाला पुरुष महान । पुढती संन्यासदीक्षा घेउन ।
विवेकानंद हे अभिधान । हालवुनी सोडिले जग सारे ।। ६३ ।।
सद्धर्म कळविला जगताला । धर्ममतांतिल विरोध गेला ।
खऱ्या धर्माचा झेंडा उभविला । देशी विदेशी दिगंतरी ।। ६४ ।।
असो या गुरुशिष्यांचे कोण । करू शके यथार्थ वर्णन ।
नम्रभावे केले नमन । युगपुरुषांना स्वहितार्थ ।। ६५ ।।
रामकृष्णांच्या संबंधात । विवेकानंदांचे अल्प चरित ।
कथन केले करील हित । निश्चित भक्तजनांचे ।। ६६ ।।



श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६७ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा बत्तिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय तेहतिसावा

अध्यात्मज्ञानभास्करा । योगविद्येच्या कोठारा ।
भक्तिरसाच्या सागरा । रामकृष्णा नमोऽस्तुते ।। १ ।।
रामकृष्णदेवांपासुन । साधकांनी प्रेरणा घेउन ।
जयांनी जीवने केली धन्य । असंख्य ऐसे स्त्रीपुरुष ।। २ ।।
त्यांतुनी भगवान रामकृष्ण । निवडुनि काही वेचक तरुण ।
विशेष प्रकारे देती शिक्षण । युगप्रयोजन साधावया ।। ३ ।।
जगदंबेचे कार्य महान । ते करावयासाठी पूर्ण ।
शिष्यजनांना आकार देउन । जीवने त्यांची घडविली ।। ४ ।।
उद्‌भविलेल्या प्रयोजनाप्रत । पूर्ण करावयाला समर्थ ।
ऐसे काही अति अद्‌भुत । शिष्य जवळ मिळविले ।। ५ ।।
मुख्य पुढारी नरेन्द्रनाथ । विवेकानंद जगविख्यात ।
ज्यांनी धर्मपरिषदेत । विचार आपुले मांडिले ।। ६ ।।
विवेकानंदांचे विचार ऐकुन । पाश्चात्त्य गेले भारावुन ।
सद्धर्माची आली कळुन । सनातन तत्त्वे जगताला ।। ७ ।।
एकमेकांच्या नसती विरुद्ध । धर्म हे तयांनी केले सिद्ध ।
विविध धर्मांचे संबंध । पूरक असती सांगितले ।। ८ ।।
करुनी वेदान्तप्रतिपादन । सत्यधर्म केला कथन ।
परमेश्वराचे कार्य महान । जगभर त्यांनी पसरविले ।। ९ ।।
ते शिष्यश्रेष्ठ नरेन्द्रनाथ । तयांची संक्षिप्त हकीगत ।
रामकृष्णांच्या संबंधात । गताध्यायात सांगितली ।। १० ।।



रामकृष्णांचे शिष्यजन । असती अनेक असामान्य ।
साधावया युगप्रयोजन । घेती जनन बाबांसवे ।। ११ ।।
ठाकुर ईश्वरकोटी म्हणती । सांगती नित्यसिद्ध ते असती ।
जगन्मातेच्या कार्याप्रती । येती जगती युगायुगी ।। १२ ।।
त्यांच्यापैकी बहुतेक जन । पुढे संन्यासदीक्षा घेउन ।
घेती धर्मकार्यास वाहुन । मूर्तिमंत पुतळे त्यागाचे ।। १३ ।।
शिष्य असती ब्रह्मज्ञानी। जन्मास आले महर्षी मुनी।
धर्म सांगितला प्राचीनांनी। पुनरपि विशद करावया।। १४ ।।
रामकृष्णांनी निवडून। शिष्य घेतले जे ओढुन।
सर्वजण ते असामान्य । आमरण करिती धर्मकार्य ।। १५ ।।
पारखुनी एक एकाला । रत्नेच तयांनी केली गोळा।
रामकृष्णजवाहिऱ्याला । पाहताच पारख होत असे ।। १६ ।।
मानवतेची सेवा करुन । निघुनी गेले ते शिष्यजन ।
तथापि मानवजाती पूर्ण । कृतज्ञ तयांना चिरकाल ।। १७ ।।
रामकृष्ण केवढे कलावंत । घडवुनी शिष्यजन अद्‌भुत ।
देणगी आधुनिक जगताप्रत । देती कौशल्य तयांचे ।। १८ ।।
नरेन्द्र स्वामी विवेकानंद । राखाल स्वामी ब्रह्मानंद ।
बाबुराम स्वामी प्रेमानंद । योगीन्द्र योगानंद स्वामी ।। १९ ।।
निरंजनानंद निरंजन । पूर्णचंद्र घोष गृहस्थ जाण ।
विज्ञानानंद हरिप्रसन्न । सारदानंद शरच्चंद्र ।। २० ।।
तारकनाथ शिवानंद । शशिभूषण रामकृष्णानंद ।
कालीप्रसाद अभेदानंद । अद्‌भुतानंद लाटू असे ।। २१ ।।
गोपालदा अद्वैतानंद । हरिनाथ स्वामी तुरियानंद ।
सारदाप्रसन्न त्रिगुणातीतानंद । अखंडानंद गंगाधर ।। २२ ।।



सुबोधचंद्र सुबोधानंद । अंतरंग हे भक्तवृंद ।
पुढारी स्वामी विवेकानंद । अत्यंत प्रिय ठाकुरांना ।। २३ ।।
पूर्णचंद्र घोष सोडुन । सर्व संन्यास करिती ग्रहण ।
कठोर तपस्या तयांनी करुन । पूर्णत्व मिळविले जीवनात ।। २४ ।।
मिळविल्यावर अध्यात्मज्ञान । देशी विदेशी प्रवास करुन ।
करिते झाले ज्ञानवितरण। अज्ञानजनता तारावया ।। २५ ।।
रामकृष्णांचे गृही भक्त । पूर्णचंद्र घोष विख्यात ।
नागमहाशय महासंत । शंभु मल्लिक सुरेन्द्र मित्र ।। २६ ।।
आणिक श्रीबलराम बोस। नाटककार गिरीश घोष ।
महेन्द्रनाथ गुप्त विशेष । रामचंद्र दत्त शिष्य त्यांचे ।। २७ ।।
रामकृष्णांच्या स्त्रीशिष्यांत। अघोरमणी रमणीसंत ।
गोपाळची आई म्हणत । सकळ शिष्य तिजलागी ।। २८ ।।
योगिनमा आणि गोलापमा। मृडानी अथवा गौरीमा ।
लक्ष्मीदेवी असे अनुपमा । महिलाशिष्या ठाकुरांच्या ।। २९ ।।
एकेकाचे अद्‌भुत चरित। देवदेवता असती समस्त ।
रामकृष्णांचा वरदहस्त । अनेक विद्युत चमकविल्या ।। ३० ।।
प्रत्येकाचे चरित्र पूर्ण । येथे नसे करणे कथन ।
भगवंताचे कार्य महान । आजीवन करित राहिले ।। ३१ ।।
रामकृष्णांच्या सहवासात । कैसी जीवने घडली अद्‌भुत ।
एवढे मात्र संक्षिप्तात । सांगावयाचे या ठायी ।। ३२ ।।
राखालचंद्राच्या वर्गात । बाबुराम घोष असे शिकत ।
राखालकडुनी कळले वृत्त । रामकृष्णांचे तयाला ।। ३३ ।।
वडिल भावाने बाबुरामास । कथिले होते दक्षिणेश्वरास ।
असतात एक परमहंस । गौरांगासमान श्रेष्ठ ते ।। ३४ ।।



करीत असता नामस्मरण । विसरुनि जातात देहभान ।
बाबुरामास हे ऐकुन । फार वाटली उत्सुकता ।। ३५ ।।
बाबुरामला असे माहित । राखाल तेथे जातो सतत ।
मग दोघांनी रचिला बेत । दक्षिणेश्वराप्रत जाण्याचा ।। ३६ ।।
बाबुराम बसला खोलीत । रामकृष्ण होते देवळात ।
राखाल तेथे जाउनी त्वरित । घेउनि आला ठाकुरांना ।। ३७ ।।
रामकृष्ण भावावेशात । राखाल आधार देउनी नेत ।
मार्गदर्शन करित करित । आणिले खोलीत बाबांना ।। ३८ ।।
मग थोड्याच अवधीत । बाबांस संज्ञा झाली प्राप्त ।
पाहुनी बाबुरामाप्रत । विचारू लागले रामकृष्ण ।। ३९ ।।
बलराम बसूच्या तो नात्यात । कळता म्हणती आमुचा आप्त ।
निरखुनि पाहती तयाप्रत । वजन करिती हाताचे ।। ४० ।।
तळहात तयाचा अवलोकुन । ठाकुर पावले समाधान ।
ठाकुर म्हणाले छान छान । दोघे थांबले त्या रात्री ।। ४१ ।।
प्रातःकाळी घेताच दर्शन । ठाकुर वदले तयालागुन ।
पंचवटी तू येई पाहुन । ऐकुनि बाबुराम निघाला ।। ४२ ।।
बाबुराम पंचवटी पाहुन । होउनि गेला आश्चर्यमग्न ।
अगदी परिचित वाटले स्थान । प्रथमच जरी ते पाहतसे ।। ४३ ।।
तयाला बाळपणापासुन । पडत होते एक स्वप्न ।
एका वनात येई दिसुन । आश्रमस्थान संन्याशाचे ।। ४४ ।।
त्याला स्वप्नात जे दिसे स्थान । ते पंचवटीच आले कळुन ।
होउनि मनाचे समाधान । परत आला बाबांकडे ।। ४५ ।।
त्यास पुसती रामकृष्ण । कसे आहे पंचवटीस्थान ।
बाबूराम म्हणाला छान । रमणीय स्थान ते आहे ।। ४६ ।।



बाबुरामला आले कळुन । रामकृष्ण आणि आपण ।
यांचा संबंध तात्पुरता नसुन । असे पुरातन काळाचा ।। ४७ ।।
पूर्वीच बाबांनी भावावस्थेत । पाहिले बाबुरामाप्रत ।
देवतेच्या स्वरूपात । पुष्पहार गळ्यात असलेल्या ।। ४८ ।।
जाणत असती रामकृष्ण । बाबुराम पूर्वजन्मी कोण ।
म्हणती याचे पवित्र मन । शिवेना अपवित्र विचारही ।। ४९ ।।
बाबुराम पवित्र म्हणुन । तयाला सवे जाती घेउन ।
अधिकार त्याला असे पूर्ण । सेवा करावया बाबांची ।। ५० ।।
दक्षिणेश्वराला तो राहुन । रामकृष्णांची सेवा करुन ।
करू लागला जपध्यान । अध्ययन तयाने सोडिले ।। ५१ ।।
ठाकुरांच्या सहवासात । अनेकांस भाव होतो प्राप्त ।
देहभान भुलती कीर्तनात । बाबुरामने अवलोकिले ।। ५२ ।।
ठाकुरांना झाला वदता । मजला द्यावी भावावस्था ।
बाबा म्हणती सांगते माता । ज्ञानच मिळेल तुजलागी ।। ५३ ।।
प्रताप हाजरा बाबुरामला । मिस्किलपणे एकदा वदला ।
काही तरी शक्ति तू स्वत:ला । ठाकुरांना मागुनि घे ।। ५४ ।।
रामकृष्णांना आले कळुन । हाजरा भुलवी मुलांचे मन ।
बाबुरामला बोलावुन । सांगु लागले प्रेमभरे ।। ५५ ।।
जे जे काही मी मिळविले । तुमच्यासाठीच आहे सगळे ।
मजला पाहिजे मागितले । अशी अवस्था तुझी नसे ।। ५६ ।।
ओळख तुझे माझे नाते । सोडुनि दे तू इतर भाषिते ।
तर तू पावसी पूर्णतेते । संशय येथे नसे मला ।। ५७ ।।
बाबुराम करी मनापासुन । रामकृष्णांची सेवा अनन्य ।
पूर्णत्व घेतले मिळवून । इतरांस प्रदान करावया ।। ५८ ।।



अनेकांची जीवने घडविली । मानवतेची सेवा केली ।
असामान्य व्यक्ती होउनि गेली । प्रेमानंद स्वामीमहाराज ।। ५९ ।।

रामकृष्णांचा अंतरंग भक्त । असे चौधरी योगीन्द्रनाथ ।
संन्यास घेउनी धारण करित । योगानंद नाम आपुले ।। ६० ।।

केशवचंद्राचे लिखाण वाचुन । कळले बाबांचे वर्तमान ।
येउ लागला तो चोरुन । न कळविता मातापितयांसी ।। ६१ ।।

असती तयाचे जनकजननी । ब्राह्मण कर्मठ सनातनी ।
पूर्वापार येती चालुनी । पाळती ते सर्व रूढी ।। ६२ ।।

जातिनियम रामकृष्ण । कर्मठपणे न पाळती म्हणुन ।
योगीन्द्रने करणे गमन । बाबांकडे त्यांते नावडे ।। ६३ ।।

परंतु कळले पितरांप्रत । रामकृष्णांच्या प्रभावात ।
पूर्ण गेला योगीन्द्रनाथ । उपाय काहीच दिसेना ।। ६४ ।।

लक्ष नसे अभ्यासात । वेळ घालवी जपध्यानात ।
संसाराकडे करण्या प्रवृत्त । लग्न तयाचे ठरविले ।। ६५ ।।

मातापित्यांच्या इच्छेला । विरोध नाही करू शकला ।
विवाहाचा सोहळा उरकला । परी शरमला योगीन्द्र ।। ६६ ।।

योगीन्द्र दक्षिणेश्वराला । जावयासी टाळु लागला ।
परंतु ठाकुरांनी त्याला । निरोप धाडुनी बोलाविले ।। ६७ ।।

म्हणाले त्याचा धरुनी दंड । होउ देइ रे विवाह उदंड ।
न पडे आत्मोन्नतीत खंड । परम दयाळू परमेश्वर ।। ६८ ।।

घेउनि ये तू तव पत्नीला । मी बदलवून टाकिन तिजला ।
तिचेहि साह्य मिळेल तुजला । करावयाला आत्मोन्नती ।। ६९ ।।

ऐकुनि बाबांचे आश्वासन । योगीन्द्र पावला समाधान ।
जणु ओझे गेले उतरुन । डोक्यावरचे योगीनच्या। ।। ७० ।।



योगीन्द्रच्या स्वभावात । मृदुतेचे प्रमाण असे जास्त ।
रामकृष्ण होते इच्छित । कठिणता थोडीसी आणावी ।। ७१ ।।
पाहिजे धर्मप्रसाराकरिता । मृदुतेप्रमाणे कठिणता ।
केवळ एकांगी माणुस असता । तयाकडुनि कार्य होत नसे ।। ७२ ।।
एकदा एक झुरळ निघाले । याला मार बाबा वदले ।
योगीन्द्रने बाहेर नेले । सोडुनि दिधले तयाप्रती ।। ७३ ।।
त्यास वाटले बाब लहान । कशाला पुसतील रामकृष्ण ।
रामकृष्णांनी मुद्दाम जाणुन । प्रश्न तयाला विचारिला ।। ७४ ।।
काय रे त्वा झुरळ मारिले । तो वदला मी सोडुनि दिधले ।
ऐकताच ठाकुर रागावले । म्हणती वदलो मारावया ।। ७५ ।।
तरिही त्वा झुरळ सोडिले । महत्त्वाच्या कामात असले ।
करशिल तर ते नसे भले । पुनरपि ऐसे करू नको ।। ७६ ।।
आणिक एकदा नावेत बसुन । येत असता भक्त योगिन ।
नावेत असलेले काही जन । निंदा करिती ठाकुरांची ।। ७७ ।।
विचार करू लागला योगिन । या तर गोष्टी असती सान ।
हे लोक आहेत अज्ञान । निंदा स्तुती समान बाबांला ।। ७८ ।।
मग दक्षिणेश्वराला येउन । ते वृत्त योगिन करी कथन ।
रागावुनि म्हणती रामकृष्ण । असा कसा रे शिष्य तू ।। ७९ ।।
गुरुनिंदा ऐकल्याबरोबर । शिष्याने करावा प्रतिकार ।
नाहीतर ते स्थळ सत्वर । सोडुनी गमन करायचे ।। ८० ।।
यांतील काहीच नाही केले । गुरुनिंदेते श्रवण केले ।
पुनरपि करू नकोस असले । श्रवण गुरूच्या निंदेचे ।। ८१ ।।
एकदा ठाकुरांनी तयाला । सांगितली वस्तु आणावयाला ।
दुकानदारे योगीन्द्रला । धार्मिक आहोत भासविले ।। ८२ ।।



न पाहता ती तपासून । योगीन्द्र वस्तू आला घेउन ।
वस्तू पाहताच रामकृष्ण । म्हणती फसविले तुजलागी ।। ८३ ।।
माणसाने धार्मिक व्हावे । मूर्ख बावळट मात्र नसावे ।
बारकाईने पारखुनि घ्यावे । उपयोग करावा बुद्धीचा ।। ८४ ।।
यापरि व्यावहारिकही शिक्षण । शिष्यांस देती रामकृष्ण ।
शिष्य व्हावेत गुणसंपन्न । ऐसा उद्देश बाबांचा ।। ८५ ।।
एकदा ठाकुरांच्या खोलीत । झोपला असता योगीन्द्रनाथ ।
जाग येउनी जव तो पाहत । नसती खोलीत रामकृष्ण ।। ८६ ।।
त्याच्या मनात आला विचार । पत्नीकडे तर नसती ठाकुर ।
येउनि त्वरित मग बाहेर । पाहे नौबतखान्याकडे ।। ८७ ।।
रामकृष्णदेव तेवढ्यात । पंचवटीकडुनी आले तेथ ।
तयांना दिसला योगीन्द्रनाथ । पाहत नौबतखान्याकडे ।। ८८ ।।
ठाकुरांस पंचवटीकडुन । परत येत असता पाहुन ।
योगीन्द्र झाला लज्जायमान । वाटे संशय व्यर्थ केला ।। ८९ ।।
प्रत्यक्ष पावित्र्याची मूर्ती । रामकृष्णदेव असती ।
मनात माझ्या का उद्‌भवती । विचार असले घाणेरडे ।। ९० ।।
तयास वाइट वाटले चित्ती । रामकृष्ण ते जाणुनि म्हणती ।
करु नकोस मनात खंती । सर्व काही हे ठीक असे ।। ९१ ।।
रात्रंदिवस निरीक्षण करुन । साधूस घ्यावे पारखून ।
मगच विश्वास परिपूर्ण । टाकावा आपण त्याच्यावर ।। ९२ ।।
कोणी पाहता परीक्षा करुन । नच रागावती रामकृष्ण ।
उलट तयाला उत्तेजन । देउनि करिती कौतुक ते ।। ९३ ।।
ऐसे ठाकुर फार उदार । अंत:करण तयांचे थोर ।
परंतु गोष्ट ती लागली फार । मनास योगीन्द्रनाथाच्या ।। ९४ ।।



एकदा पुसता झाला योगिन । कामत्याग घडावा म्हणुन ।
काय केले पाहिजे साधन । म्हणजे निश्चित काम झडे ।। ९५ ।।
तयाला सांगती रामकृष्ण । ईश्वराची प्रार्थना करुन ।
त्यागता येतसे काम पूर्ण । सुलभ साधन हेच असे ।। ९६ ।।
योगीन्द्राची अपेक्षा होती । ठाकुर यौगिक क्रिया सांगती ।
यास्तव पटले नाही चित्ती । प्रार्थना करणे साधारण ।। ९७ ।।
हठयोगी त्या समयाला । आला होता दक्षिणेश्वराला ।
योगीन्द्र तयाच्याकडे गेला । ऐकु लागला बोध त्याचा ।। ९८ ।।
त्रिकालज्ञ श्रीरामकृष्ण । त्याच वेळी तेथे जाउन ।
योगीन्द्राचा दंड धरुन । आले घेउनि खोलीकडे ।। ९९ ।।
रामकृष्ण तयाला सांगती । हठयोगाच्या करिता कृती।
मन जडेल देहावरती । न मिळे भगवंत अशाने ।। १०० ।।
परि योगिनच्या वाटे चित्ती । ठाकुर साधुचा द्वेष करिती ।
तयांना वाटत असावी भीती । शिष्य जातिल साधूकडे ।। १ ।।
परि जे सांगती रामकृष्ण । एकदा ते पाहावे करुन ।
काही दिवस प्रार्थना करुन । विषयवासना जिर्किली ।। २ ।।
यापरी शिष्य चिकित्सक सर्व । त्यांना अनुभव दिले अपूर्व ।
तेव्हाच तयांचा जडला भाव । रामकृष्णांच्या पादपद्मी ।। ३ ।।
मथुरबाबूंच्या वेळेपासुन । फलमूलमिठाई भरुन ।
ताटे देत होते आणुन । खोलीत रामकृष्णांच्या ।। ४ ।।
ठाकुर तयातिल अंश घेउन । जे भक्त येती घ्याया दर्शन ।
तयांना प्रसाद देती वाटुन । ऐसा प्रघात असे तेथे ।। ५ ।।
फलहारिणिपूजेच्या उत्सवात । जमले ठाकुरांचे भक्त ।
उत्सव असे देवालयात । आनंदात असती रामकृष्ण ।। ६ ।।



करिती आईचे नामस्मरण । आनंदाने करिती नर्तन ।
भावावेश होतसे मधुन । केला आनंद रात्रभर ।। ७ ।।
दुसरा दिवस उजाडला । परंतु प्रसाद नाही आला ।
बोलावुनि रामलालाला । कारण काय विचारिती ।। ८ ।।
रामलाल पुजारी वदला । दप्तरखान्यास प्रसाद नेला ।
परंतु ठाउक नाही मजला । नाही पाठविला का येथे ।। ९ ।।
उत्तर यापरी परिसून । चिंता करिती रामकृष्ण ।
खजिनदाराकडे जाउन । करिती कथन तयाप्रती ।। ११० ।।
त्या खोलीचा प्रसाद अजुन । आला नाही काय कारण ।
झाले असल्यास विस्मरण । अन्यायाची गोष्ट असे ।। ११ ।।
खजिनदार वदे वरमुन । देतो प्रसाद पाठवून ।
विचार करू लागला योगिन । काय स्वभाव ठाकुरांचा ।। १२ ।।
हे तर प्रसादातील काही । एक कणही घेत नाही ।
का असावी धडपड ही । प्रसादासाठी ठाकुरांची ।। १३ ।।
योगींद्राचे कुळ थोर । त्यास वाटे पुजारी नोकर ।
देवालयातिल खजिनदार । य:कश्चित नर ते असती ।। १४ ।।
या लोकांसी नुसते बोलणे । थोर जनांना आणी उणे ।
प्रसादासाठी एवढे झगडणे । न पटे तयाच्या मनाला ।। १५ ।।
मग तो वदला ठाकुरांला । न येवो प्रसाद नाही आला ।
आपण शिवत नाही कशाला । एवढी चौकशी का करता ।। १६ ।।
तो विचार करी मनात । कसेही कठिण प्रसंग येवोत ।
यांची शांतता नाही ढळत । मग का अस्वस्थ हे व्हावे ।। १७ ।।
मग ठरविले मनाभीतरी । जन्मले पुजाऱ्याच्या घरी ।
कुळाचा गुण तो काहीतरी । यांच्यात उतरला असावा ।। १८ ।।



बापरी विचार येता मनात । त्याकडे पाहुनी भगवंत ।
जाणुनी त्याचे विचार समस्त । म्हणती काय समजसी ।। १९ ।।
राणी रासमणी गेली निघुन । एवढी संपत्ती मागे ठेवुन ।
देवदेवतांचे व्हावे पूजन । घडावी सेवा सज्जनांची ।। १२० ।।
प्रसाद येतो या खोलीत । भक्तमंडळी तो खातात ।
तयाने कारणी लागते संपत । होतसे सार्थक दानाचे ।। २१ ।।
इतरत्र जो प्रसाद जाई । त्यांतिल विकती काही काही ।
कोणी ठेवल्यात वेश्याही । प्रसाद अशांना घालिती ।। २२ ।।
अंशत: तरी सार्थक व्हावे । दान कारणी लागावे ।
यास्तव लागते झगडावे । प्रसाद यावा म्हणूनिया ।। २३ ।।
ऐकुनी एवढे उच्च विचार । योगीन्द्र लज्जित झाला फार ।
कळले ठाकुर पुरुष थोर । आपुले विचार मूर्खपण ।। २४ ।।
रामकृष्णांच्या सान्निध्यात । साधना तपस्या करुनी बहुत ।
पूर्णत्व पावला योगीन्द्रनाथ । लोकहितार्थ तो झिजला ।। २५ ।।
रामकृष्णांची सेवा करुन । योगीन्द्रनाथ झाला धन्य ।
मग संन्यास करुनी ग्रहण । योगानंद अभिधान घेतले ।। २६ ।।
ईश्वरकोटी दुसरा शिष्य । असे नित्यनिरंजन घोष ।
निरंजनानंद नाम तयास । दिधले संन्यास आश्रमी ।। २७ ।।
तयाला म्हणती रामकृष्ण । नित्यसिद्ध असे निरंजन ।
यत्किंचितही यात अंजन । म्हणजे दोष नसे मुळी ।। २८ ।।
काही लोकांची संगती लागुन । पिशाच्चास करणे पाचारण ।
शिकला होता निरंजन । काही दिवस त्यात घालविले ।। २९ ।।
रामकृष्णांची कीर्ती ऐकुन । दक्षिणेश्वरी आला निरंजन ।
विचारपूस त्याची करुन । सांगती भगवान तयाप्रती ।। १३० ।।



भुताखेतांचा विचार करिसी । तर तू भूतपिशाच्च होसी ।
जर तू भगवंताला भजसी । तर तू पावसी दिव्य जीवन ।। ३१ ।।

तुजला व्हावयाचे कोण । । आताच मजला दे सांगुन ।
यावर वदला निरंजन । दिव्य जीवन हवे मला ।। ३२ ।।

तयाला म्हणती रामकृष्ण । पिशाच्चांचा संबंध सोडुन ।
ईश्वराकडे लावी मन । निरंजन ते कबुल करी ।। ३३ ।।

दुसऱ्या वेळी निरंजन आला । रामकृष्णांनी कवटाळिला ।
अत्यंत प्रेमाने मग तयाला । उपदेश केला ठाकुरांनी ।। ३४ ।।

दिवसामागे जाती दिवस । केव्हा जाणसी परमेश्वरास ।
त्याच्याविण या जीवितास । काय अर्थ मग उरतो ।। ३५ ।।

फार वाटते माझिया चित्ता । तुवा भजावे भगवंता ।
अंत:करण लावी आता । केवळ परमेश्वराकडे ।। ३६ ।।

प्रेमरसाने ओथंबिलेले । निरंजनाने शब्द ऐकिले ।
त्याच्या अंत:करणास भिडले । येउ लागला दक्षिणेश्वरा ।। ३७ ।।

निरंजन असे वक्ता स्पष्ट । मोकळे मन मनी धारिष्ट्य ।
ठाकुर म्हणती गुण हे श्रेष्ठ । लाभती पूर्वपुण्याईने ।। ३८ ।।

अंगी असता ऐसे गुण । ईश्वरलाभास होती कारण ।
पवित्र असे हा निरंजन । अंगात हे गुण तयाच्या ।। ३९ ।।

निरंजनाचे कोमल मन । असुनही काही घडता कारण ।
अत्यंत उग्र जातसे होउन । न करी पर्वा परिणामाची ।। १४० ।।

नावेत बसुनी निरंजन । येत असता घ्यावया दर्शन ।
त्या नावेतिल काहीजण । निंदा करिती ठाकुरांची ।। ४१ ।।

निरंजन ऐकल्याबरोबर । देउ लागला प्रत्युत्तर ।
तथापि त्याचा करुनि अव्हेर । ते नर निंदा चालविती ।। ४२ ।।



उग्ररूप धरुनी निरंजन । म्हणाला नौकाच बुडविन ।
त्याचा धिप्पाड देह पाहुन । निंदक झाले भयभीत ।। ४३ ।।
निरंजनाची क्षमा मागुन । गप्प राहिले निंदकजन ।
ठाकुरांस कळता वर्तमान । निरंजनाला ते म्हणती ।। ४४ ।।
तू का व्हावेस क्रोधायमान । क्रोध तर असे शत्रु महान ।
आपण कशाला व्हावे अधिन । अशा पापरूप शत्रूच्या ।। ४५ ।।
असतात काही मूर्ख जन । बेजबाबदार करिती विधान ।
आपण दुर्लक्ष करावे पूर्ण । त्यांच्या बडबडण्याकडे ।। ४६ ।।
नौका टाकतास बुडवुनी । तर काय केले त्या कोळ्यांनी ।
इतर त्रयस्थ असतील कोणी । त्या बिचाऱ्यांनी काय केले ।। ४७ ।।
अज्ञानाने काही जन । करतात भलभलते विधान
तथापि आपण आपुले मन । बळी न द्यावे क्रोधाला ।। ४८ ।।
निरंजनाने नोकरी धरिली । वार्ता ठाकुरांना कळली ।
परमावधि दु:खाची झाली । तेधवा मनी ठाकुरांच्या ।। ४९ ।।
ठाकुर म्हणती निरंजन मेला । ऐसी वार्ता कळता मजला।
न होते जेवढे दु:ख मनाला । तेवढे जाहले वार्तेने ।। १५० ।।
परि बाबांना आले कळुनी । तयास आहे वृद्ध जननी ।
तियेचे पोषण व्हावे म्हणुनी । निरंजन नोकरी करितसे ।। ५१ ।।
ऐसे कळताच वर्तमान । ठाकुर पावले समाधान ।
म्हणती दोष नसे जाण । नोकरी करिता मातेस्तव ।। ५२ ।।
स्वत:साठीच निरंजन । जर राहता चाकरी करुन ।
तर मग मजला त्याचे वदन । कदापि नसते पाहवले ।। ५३ ।।
परंतु निरंजन फार दिवस । न करू शके नोकरीस ।
येई सेवा करावयास । आजारात रामकृष्णांच्या ।। ५४ ।।



घेउनि बाबांचे मार्गदर्शन । साधना करुनी निरंजन ।
पूर्णत्व घेई मिळवून । संन्यास तयाने घेतला ।। ५५ ।।
निरंजनानंद नाम धारण । करिता जाहला निरंजन ।
मानवतेची सेवा करुन । धन्य जीवन सफल केले।। ५६ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५७ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा तेहतिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय चौंतिसावा

जयाची वळता कृपादृष्टी । परमामृताची होई वृष्टी ।
श्रीरामकृष्ण परमेष्टी । अत्यादरे मी वंदिले ।। १ ।।

शरच्चंद्र चक्रवर्ती । ठाकुर त्याला शरद म्हणती ।
संन्यासदीक्षा घेतल्यावरती । सारदानंद नाम जाहले ।। २ ।।

रामकृष्णांची सेवा करुन । करुनि तपस्या साधनभजन ।
रामकृष्णांचे चरित लिहुन । झाला धन्य शरच्चंद्र ।। ३ ।।

बाळक आले जन्मास । तो शनिवार होता दिवस ।
चिंता पडली मातापित्यांस । भवितव्य काय या मुलाचे ।। ४ ।।

परंतु ज्योतिषी म्हणे मूल । इतुके थोर हे होईल ।
प्रकाशवील आपले कुल । आपुल्या थोर कृतींनी ।। ५ ।।

आंगाने शरद मजबूत । असे धार्मिक बाळपणात ।
दया तयाच्या अंतरात । भूतमात्रांविषयी असे ।। ६ ।।

सांगितले कोणी तयाप्रत । इंडियन मिरर पत्रिकेत ।
केशवचंद्र सेन लिहित । दक्षिणेश्वरात संत असे ।। ७ ।।

आपुला भाऊ शशिभूषण । समागमे त्याला घेउन ।
दक्षिणेश्वराला आगमन । करिती दर्शन ठाकुरांचे ।। ८ ।।



ठाकुर तयांना उद्देशुन । म्हणती पुत्र असता लहान ।
तयाचे करुनी टाकिती लग्न । बळेच त्याचे मातापिता ।। ९ ।।

शिक्षण संपण्याच्या आत । तयांना मुलेही होतात ।
चालवावयाला चरितार्थ । फिरती शोधार्थ नोकरीच्या ।। १० ।।

एक श्रोता म्हणे ऐकुन । वाईट असे का करणे लग्न ।
कैसे होइल प्रजोत्पादन । चालावयाची सृष्टी कशी ।। ११ ।।
ठाकुर वदले करुनी स्मिता । तुम्ही न करावी त्याची चिंता ।
परमेश्वराची समर्थ सत्ता । रक्षिते जगता निरंतर ।। १२ ।।
मी जे काही वदलो आता । ते या तरुण मुलांच्याकरिता ।
तुमच्या जैसे येइल चित्ता । खुशाल तैसे वागा तुम्ही ।। १३ ।।
या मुलांचा वर्ग विशेष । घेउनि आपुला अधिकार खास ।
आले आहेत हे जन्मास । करायास कार्य अंबेचे ।। १४ ।।
ऐसे ऐकुनी शशी शरद । त्यागतत्त्व होउनी विशद ।
पटुनी अंत:करणी बोध । पडले प्रेमात ठाकुरांच्या ।। १५ ।।
करीत असताना चर्चेला । गणपतीचा विषय निघाला ।
ठाकुर वाखाणावयाला । लागती चारित्र्य गणेशाचे ।। १६ ।।
असे श्रीसिद्धिविनायक । विषयवासनापराङ्मुख ।
दुर्गामातेवर निष्ठा एक । असे बुद्धिमान गणेशाची ।। १७ ।।
बसुनी कैलासपर्वतावरती । मातेस विचारी गणपती ।
माते स्त्रिया कशा असती । म्हणे पार्वती अंश माझा।। १८ ।।
स्त्रिया असती माझ्यासमान । मातेचे हे ऐकुनी वचन ।
ठरवुनि टाकी गजानन । लग्नच नाही करायचे ।। १९ ।।
मंगलमूर्ती मंगलदाता । बुद्धिदाता विघ्नहर्ता ।
सकळ शिवगणांचा नेता । आनंदकर्ता भक्तांचा ।। २० ।।
काय वर्णावे त्याचे गुण । सिद्धिदाता तो भगवान ।
आयुरारोग्य यश:श्रीधन । निर्वाण गजानन देत असे ।। २१ ।।
शरद वदला ठाकुरांस । मज आवडतो देव गणेश ।
तो असे मम ध्येयविशेष । त्यावर म्हणती रामकृष्ण ।। २२ ।।



तुझे ध्येय नसे गणेश । दैवत तुझे शिवपरमेश ।
शंकराचेच गुणविशेष । आढळतात तुझ्या ठायी ।। २३ ।।
शिव मानत जा स्वत:ला । आणि शक्ती मान तू मजला ।
तुझ्या शक्तिचा ठेवा सगळा । माझ्याजवळ वसत असे ।।२४।।
जाणत असती रामकृष्ण । तेथे येती जे शिष्यजन ।
कोणत्या देवाचा अंश असुन । मार्गदर्शन कसे करावे ।। २५ ।।
एकदा शरदास रामकृष्ण । पुसती करीत असता ध्यान ।
कोणते आवडे तुला दर्शन । शरद त्यावर उत्तरला ।। २६ ।।
मला नावडे विशिष्ट दर्शन । चराचरात राहिला भरुन ।
प्राणिमात्रात व्यक्त होउन । असलेला मज आवडतो ।। २७।।
ठाकुर म्हणती ती अंतिम । अध्यात्मातिल अवस्था परम ।
तुला लाभणे एकदम । यावेळी ते शक्य नसे ।। २८ ।।
शरद म्हणाला त्याविण काही । कमी मजला लागत नाही ।
प्राप्त करिन अवस्था ही । करुनी खडतर तपस्या ।। २९ ।।
ठाकुर सांगती शरच्चंद्राला । एकदा भेट नरेन्द्राला ।
मुलगा तो असे फार चांगला । शरद गेला त्याच्याकडे ।। ३०।।
नरेन्द्राच्या भेटीपासुन । दोघे मित्र गेले होउन ।
न राहे वेळेचेही भान । बोलता बोलता दोघांसी ।। ३१ ।।
एकदा तयांच्या चर्चेला । रामकृष्णांचा विषय निघाला ।
नरेन्द्रनाथ अनुभव अपुला । सांगु लागला शरदास ।। ३२ ।।
शरद, शशी होते ऐकत । ऐकुनि झाले आश्चर्यचकित ।
इतुके दिवस होते समजत । संतच असती रामकृष्ण ।। ३३ ।।
आता त्यांना आले कळुन । पूर्वी झाले अवतार महान ।
त्यांच्यासमान रामकृष्ण । अवतार सांप्रत काळाचे ।। ३४ ।।



ठाकुरांना जेव्हा कळले । नरेन्द्रास शशिशरद भेटले ।
सख्य तयांचे दाट जाहले । वाढले प्रेम त्यांच्यामधे ।। ३५ ।।
म्हणती अत्यंत आनंदुन । गृहिणी जाणत असे पूर्ण ।
कोणत्या भांड्यास झाकण । कोणते लावणे योग्य असे ।। ३६ ।।
एकदा सहज रामकृष्ण । शरदच्या मांडीवर बसुन ।
म्हणती पाहतो अजमावुन । करिसी सहन भार किती ।। ३७ ।।
देती या कृतीने दाखवुन । पुढिल कार्य जे असे महान ।
त्याचा भार वाहण्यालागुन । शरच्चंद्र योग्य असे ।। ३८ ।।
रामकृष्ण मठ आणि मिशन । यांचे कार्यवाहक होउन ।
सारदानंद देती दाखवुन । योग्यच निवड ठाकुरांची ।। ३९ ।।
शरदचा पिता होता इच्छित । डॉक्टर व्हावा आपुला सुत ।
घातला मेडिकल कॉलेजात । परंतु विपरीत दैव असे ।। ४० ।।
रामकृष्णांच्या आजारात । शरच्चंद्र खपला दिनरात ।
करू लागला सेवा सतत । श्रद्धा भक्तिने ठाकुरांची ।। ४१ ।।
शरदच्या पित्यास कळता मात । विषाद पावला तो चित्तात ।
परंतु त्याने रचिला बेत । शरदला परत आणावया ।। ४२ ।।
त्याचा कुलगुरू विद्वान थोर । जगन्नाथ तर्कालंकार ।
होता पंडित प्रसिद्ध फार । तंत्रसाधन जाणतसे ।। ४३ ।।
वाटे तयाला कुलगुरूस । घेउनि जाता दक्षिणेश्वरास ।
तर अशिक्षित रामकृष्णांस । अशक्य होइल भाषणही ।। ४४ ।।
त्या दोघांची चर्चा होउन । रामकृष्णांचे अल्प ज्ञान ।
शरदास स्पष्ट येइल कळुन । वाटेल आपण केली चूक ।। ४५ ।।
रामकृष्णांना देइल सोडुन । कुलगुरूकडे लावील मन ।
यापरी बेत मनात रचुन । आला घेउन कुलगुरुला ।। ४६ ।।



परंतु थोड्या चर्चेनंतर । कुलगुरू समजला पुरेपुर ।
रामकृष्ण ज्ञानभास्कर । आपण खद्योत त्यांच्यापुढे ।। ४७ ।।

ठाकुर असती ज्ञानकृशान । त्यापुढे आपण केवळ तृण ।
काय उपयोग वाद घालुन । पुस्तकी विद्या केवी टिके ।। ४८ ।।

आपण ग्रंथवाचन करुन । करितो केवळ अनुमान ।
महापुरुष हा प्रत्यक्ष ज्ञान । अनुभव घेउनी पूर्ण जाहला ।।४९।।

रामकृष्ण ज्ञानाचे सागर । आपण बिंदू त्यांच्या समोर ।
ते प्रकाश आपण अंधार । पंडित समग्र समजला ।। ५० ।।

शरदच्या पित्याला एकांतात । नेउनि सांगुनि टाकी पंडित ।
सद्गुरू लाभला अद्भुत । धन्य तव सूत समजावा ।। ५१ ।।

नंतर पित्याने शरदला । रामकृष्णांकडे जाण्याला ।
कधिही अडथळा नाही केला । शरद राहिला सेवेस ।। ५२।।

अनन्य भावे सेवा करुन । आजारात शुश्रुषेस राहुन ।
गुरुकृपा करुनी संपादन । पावला पूर्णत्व शरच्चंद्र ।। ५३ ।।

पुढती संन्यास केला ग्रहण । सारदानंद नाम घेउन ।
भगवंताचे कार्य महान । सेवाव्रत घेउनी चालविले ।। ५४ ।।

रामकृष्ण मठ आणि मिशन । यांचा कार्यभार सांभाळुन ।
अनेकांस करुनी मार्गदर्शन । सन्मार्गगामी जन केले ।। ५५ ।।

रामकृष्णांचे अद्भुत चरित । सारदानंद लिहिती समस्त ।
लाभ घडविला जगताप्रत । थोर उपकार स्वामीजींचा ।। ५६ ।।

सारदानंदांचे चरित महान । येथे अल्पमात्र केले कथन ।
घेतली रत्ने पारखून । रामकृष्णांनी निजसंनिधी ।। ५७ ।।

रामकृष्णांचा शिष्य भक्त । असे घोषाल तारकनाथ ।
स्वामी शिवानंद विख्यात । नाम संन्यासाश्रमाचे ।। ५८ ।।



रामकानाई घोषाल । पिता कायदेपंडित वकिल ।
तांत्रिक विद्येत असे कुशल । उत्पन्न पुष्कळ मिळवितसे ।।५९।।
अत्यंत उदास असे अंतरी । साधुसंताना साह्य करी ।
पंचवीस तीस त्याच्या घरी । असती निराश्रित विद्यार्थी ।।६०।।
रासमणीचा सल्लागार । म्हणुनी परिचित झाले ठाकुर ।
उत्पन्न झाला अत्यादर । दर्शनावाचुनी परतेना ।। ६१।।
साधना करिता ठाकुरांला । अंगदाह होता उद्भवला ।
दाद देइना औषधाला । सांगती तयाला रामकृष्ण ।। ६२।।
रामकानाई तयांना वदला । धारण करा इष्टकवचाला ।
ठाकुरांनी तो उपाय केला । तत्काळ थांबला अंगदाह ।। ६३।।
त्या काळात जाती अनेक । ब्राह्मसमाजात शिक्षित लोक ।
समाजसेवक सुधारक । शिक्षक आणिक विद्यार्थी ।। ६४।।
इतर जनांच्या समवेत । तेथे जातसे तारकनाथ ।
एकाग्र चित्ते असे ऐकत । समाजातील व्याख्याने ।। ६५।।
उत्सुकता मग फार वाटली । आपण समाधी पाहिजे पाहिली।
तव तयाला माहिती मिळाली । वार्ता कळली ठाकुरांची ।। ६६।।
रामचंद्र दत्ताच्या घराप्रती । कळले ठाकुर येत असती ।
उत्सुकता लागली चित्ती । कधी पाहतो ठाकुरांना ।। ६७।।
एकदा तेथे ठाकुर आले । दर्शनास पुष्कळ लोक जमले ।
भावावस्थेत बोलु लागले । बाबा जनांना उद्देशुन ।। ६८।।
तारक इच्छी मनोभावे । समाधीसंबंधी ऐकावे ।
विषय तो रामकृष्णदेवे । स्पष्ट करुनी सांगितला ।। ६९।।
इच्छित विषय ऐकण्या मिळाला । तारकानाथा आनंद झाला।
मग तयाने निश्चय केला । दक्षिणेश्वराला जाण्याचा ।। ७०।।



ठाकुरांना पाहता क्षणी । जणू वाटले आपुली जननी ।
प्रेमळपणाने रामकृष्णांनी । विचारपूस केली त्याची ।। ७१ ।।
म्हणती काय मानितोस । साकार अथवा निराकारास ।
तारक म्हणाला ठाकुरांस । निराकारावर असे श्रद्धा ।। ७२ ।।
रामकृष्ण तयाला वदले । ईश्वरशक्तीस पाहिजे मानिले ।
कालीमंदिरी ठाकुर गेले । भगवतीस नमिले साष्टांग ।। ७३ ।।
रामकृष्णांच्या समवेत । मंदिरी गेला तारकनाथ ।
मूर्तिपूजन नव्हता मानित । सदस्य ब्राह्मसमाजाचा ।। ७४ ।।
ब्राह्मसमाजी तारक जाई । म्हणुनि मनात विचार येई ।
कालीस नमावे अथवा नाही । तव प्रकाश पडला मनामधे ।। ७५ ।।
का यावा मज क्षुद्र विचार । सर्वव्यापक परमेश्वर ।
मूर्तिमधेही तो असणार । मग साष्टांग नमन केले ।। ७६ ।।
बाबांनी पाहिल्याबरोबर । जाणुनि तारकचा अधिकार ।
म्हणाले येत जा वारंवार । तारक नित्य येत असे ।। ७७ ।।
एकदा म्हणाले रामकृष्ण । न पुसतो असतो कोठे कोण।
पाहतो फक्त अंत:करण । येथे येती जन त्यांचे ।। ७८ ।।
तथापि तू आहेस इथला । तुझा वृत्तान्त सांग मजला ।
तो वदे घोषाल नाम कुळाला । रामकानाई पिता असे ।। ७९ ।।
ठाकुर म्हणती आनंदुन । तव पित्याने सूचना करुन ।
माझा अंगदाह केला शमन । तुज पाहुनि झाला आनंद ।। ८० ।।
रामकानाईची भक्ती । रामकृष्णांवर विशेष होती ।
येता दक्षिणेश्वराप्रती । दर्शन घेउनि जात असे ।। ८१ ।।
एकदा ठाकुर समाधीत । त्याच्या मस्तकी पाय ठेवित ।
हातांनी तो घट्ट धरित । रामकानाई अश्रु गाळी ।। ८२ ।।



यापरी तारकनाथचा पिता । रामकृष्णांना मानित होता ।
विरोध न करी आपुल्या सुता । जाण्यास ठाकुरांच्याकडे ।। ८३ ।।
एकदा तारक तेथे आला । रामकृष्ण सांगती तयाला।
जीभ बाहेर काढावयाला । तीवर लिहिला मंत्र त्यांनी ।। ८४ ।।
तारकास भासे काही भाव । हृदयात शिरती घेती ठाव ।
इंद्रियगम्य जग हे सर्व । डोळ्यादेखत वितळतसे ।। ८५ ।।
आत ओढले जातसे मन । अज्ञातात होतसे लीन ।
ऐसा अनुभव असाधारण । प्राप्त जाहला तयाप्रती ।। ८६ ।।
तारकाची तेव्हापासुनी । अध्यात्मतृष्णा फार वाढुनी ।
तळमळ करी तो रात्रंदिनी । उच्चतर अनुभव यावयास ।। ८७ ।।
एकदा देवीसमोर बसुन । मुक्तपणाने करी रुदन ।
तयास पाहुनी रामकृष्ण । म्हणती तयाला प्रेमाने ।। ८८ ।।
ईश्वरासाठी करितो रुदन । त्यावर कृपा करी भगवान ।
त्या अश्रूंनी जाते वाहुन । पातक मागिल जन्मांचे ।। ८९ ।।
एक दिवस पंचवटीत । तारक असता ध्यान करित ।
ठाकुर येउनि अकस्मात । दृष्टि टाकिती त्याच्यावर ।। ९० ।।
तारक सांगे माझे नयन । आसवांनी गेले भरुन ।
अंगास कंप सुटला पूर्ण । वाटे शिरतसे आत काही ।। ९१ ।।
ती अवस्था लाभली म्हणुन । ठाकुर करिती अभिनंदन ।
मग आपुल्या खोलिस नेउन । खाउ घातले मजलागी ।। ९२ ।।
रामकृष्णांची शक्ती अद्‌भुत । केवळ एका दृष्टिक्षेपात ।
अध्यात्मभाव करिती जागृत । केवढे सामर्थ्य असे त्यांचे ।। ९३ ।।
तारकनाथास आले कळुन । स्वप्न पाहात होतो आपण ।
प्रत्यक्षात ते येते घडुन । सान्निध्यात ठाकुरांच्या ।। ९४ ।।



ठाकुर सर्व धर्मांचे सार । अध्यात्मतत्त्वाचे सागर ।
रामकृष्ण असती उदार । अध्यात्मज्ञान दान देती ।। ९५ ।।

न जाणे ठाकुर असती नर । अथवा प्रत्यक्ष परमेश्वर ।
त्यागाचा मूर्तिमंत अवतार । प्रेमस्वरूप रामकृष्ण ।। ९६ ।।

सांगत असती रामकृष्ण । नामरूप उपजती जेथुन ।
तारक आला असे तेथुन । अत्युच्च स्थान तारकाचे ।। ९७ ।।

तारकनाथ घोषाल अनन्य । रामकृष्णांची सेवा करुन ।
स्वामी शिवानंद झाले धन्य । करिती सेवा मानवतेची ।। ९८ ।।

चक्रवर्ती शशिभूषण । ठाकुरांचा शिष्य महान ।
सेवा तयाने केली अनन्य । श्रीरामकृष्णादेवांची ।। ९९ ।।

शरदचा चुलत भाऊ शशी । दोघे येती दक्षिणेश्वरासी ।
रामकृष्ण पुसती तयासी । श्रद्धा कशावर असे तुझी ।। १०० ।।

मानसी साकार निराकार । शशी उत्तर देई त्यावर ।
खात्री नाही अस्तित्वावर । परमेश्वराच्या मजप्रती ।। १ ।।

साकार निराकार यांत । काय आवडे मजला जास्त ।
हे तर सांगूच नाही शकत । उत्तर देत तो स्पष्टपणे ।। २ ।।

सरळ उत्तर त्याचे ऐकुन । आनंद पावले रामकृष्ण ।
शशिभूषण गेला मोहुन । व्यक्तिमत्त्वाने ठाकुरांच्या ।। ३ ।।

रामकृष्णदेव म्हणती । शरद आणि शशी चक्रवर्ती ।
पूर्व जन्मी हे दोघे असती । अनुयायी येशुख्रिस्ताचे ।। ४ ।।

पारसी भाषेचे अध्ययन । करीत होता शशिभूषण ।
हाक मारुनी रामकृष्ण । बोलावू लागले तयाप्रती ।। ५ ।।

हाक मारुनी दोन वेळा । शशिभूषण नाही आला ।
तिसऱ्या हाकेस उभा राहिला । येउनी समोर ठाकुरांच्या ।। ६ ।।



काय करित होतास म्हणुन । तयाला पुसती रामकृष्ण ।
उत्तर देई शशिभूषण । गढलो होतो पुस्तकात ।। ७ ।।
ठाकुर म्हणती अध्ययनात । विसरशील कर्तव्य समस्त ।
तर हानी होइल भक्तीप्रत । जाण निश्चित शशिभूषणा ।। ८ ।।
शशीने ते शब्द ऐकुनी । सगळी पुस्तके गोळा करुनी ।
गंगेमधे दिली फेकुनी । कळली किंमत शिक्षणाची ।। ९ ।।
शशी बी.ए. च्या वर्गात । कॉलेजात होता शिकत ।
रामकृष्ण पडता आजारात । न करी पर्वा शिकण्याची ।। १० ।।
सर्व अभ्यास दिला सोडुन । करितसे शुश्रुषा रात्रंदिन ।
आपुले शरीर मन प्राण । वाहिले सेवेस सद्गुरूंच्या ।। ११ ।।
न ठावी तयाला विश्रान्ती । प्रकृतीची न करी क्षिती ।
सेवा करितसे दिनराती । तुच्छ त्यापुढे सर्व कर्मे ।। १२ ।।
साधन भजन दिले सोडुन । सोडिली तपस्या जपध्यान ।
एक सद्गुरूवाचून । जाणत नसे तो अन्य काही ।। १३ ।।
पूर्णत्व तयाने मिळवून । संन्यास दीक्षा केली ग्रहण ।
रामकृष्णानंद अभिधान । चतुर्थाश्रमात घेतले ।। १४ ।।
नरेन्द्र इच्छी मनोभावे । रामकृष्णानंद नाम घ्यावे ।
शशिने सेवा जिवेभावे । जाणे केली श्रीगुरूंची ।। १५ ।।
नरेन्द्रनाथे विचार केला । तेच नाम योग्य शशीला ।
विवेकानंद नाम स्वत:ला । धारण केले नरेन्द्राने ।। १६ ।।
रामकृष्णानंद झाले थोर । महान तयांचा अधिकार ।
कष्ट तयांनी घेतले फार । अपार प्रेम मानवतेचे ।। १७ ।।
आणिक शिष्य ठाकुरांचा । कालीप्रसाद नावाचा ।
विद्यार्थी तत्त्वज्ञानाचा । कॉलेजात शिकत असे ।। १८ ।।



तो असे अत्यंत बुद्धिमान । शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान ।
भगवद्गीतादि ग्रंथ महान । अनेक त्याने अभ्यासिले ।। १९ ।।
आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानी । तयांचे ग्रंथ अभ्यासुनी ।
अध्यात्माची तृष्णा मनी । उत्पन्न जाहली तयाच्या ।। १२० ।।
शशधर तर्कचूडामणी । पंडिताची भाषणे ऐकुनी ।
योगाभ्यासाची त्याच्या मनी । तीव्र तळमळ उद्भवली ।। २१ ।।
वाचु लागला योगग्रंथ । मित्र सांगती तयाप्रत ।
उपयोगास नाही येत । पुस्तकी विद्या कोणाला ।। २२ ।।
पुस्तकावरुनी योगाभ्यास । करणे कारण संकटास ।
मग शोधु लागला गुरूस । मार्गदर्शन घेण्याला ।। २३ ।।
एक मित्र सांगे त्यास । त्वा जावे दक्षिणेश्वरास ।
तेथे असतात परमहंस । मार्गदर्शन करितिल ते ।। २४ ।।
काली दक्षिणेश्वराला आला । वदता झाला ठाकुरांला ।
योगविद्या शिकवा मजला । निर्विकल्प समाधी लागावी ।। २५ ।।
त्याला पाहताच ठाकुर । जाणती हा अधिकारी थोर ।
मनात आनंद झाला फार । सांगु लागले तयाप्रती ।। २६ ।।
पूर्वजन्मी तू योगी महान । तुझा अंतिम हा जन्म जाण ।
आनंदाने तुज शिकविन । सकळ योगाच्या प्रक्रिया ।। २७ ।।
यापरी बोलुनि रामकृष्ण । जिभेवर मंत्र देती लिहुन ।
त्याच्या हृदयी दिला ठेवुन । त्यांनी आपुला सव्य हस्त ।। २८ ।।
दिव्य स्पर्श होताच त्वरित । क्रान्ती घडुनि आली मनात ।
गाढ ध्यानात लोपले चित्त । नवल अद्भुत वर्तले असे ।। २९ ।।
कालीप्रसाद तेव्हापासुन । करू लागला योगसाधन ।
रामकृष्णांचे मार्गदर्शन । येती असामान्य अनुभव ।। १३० ।।



आता कालीस आले कळुन । उच्चतम असे जे तत्त्वज्ञान ।
विश्वधर्म जो असे महान । रामकृष्ण मूर्तीच तयाची ।। ३१ ।।
ठाकुर सांगती तयाप्रत । द्वैत विशिष्टाद्वैत अद्वैत ।
विरोध नसे तीन मतांत । पूरक ते एकमेकांचे ।। ३२ ।।
अधिकारपरत्वे अवस्थात्रय । असती जनांना आचरणीय ।
अंती अव्यक्तात लय । होउनि जाय सकलांचा ।। ३३ ।।
कालीप्रसादाचा होय । नरेन्द्रनाथासी परिचय ।
चर्चेत येउ लागती विषय । पौर्वात्य पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे ।। ३४ ।।
विद्वान असती दोघेजण । चर्चेत येती विषय गहन ।
रामकृष्णांची कृपा होउन । कालीप्रसाद सिद्ध झाला ।। ३५ ।।
पुढे त्याने संन्यास घेउन । अभेदानंद नाम केले धारण ।
रामकृष्णांचा संदेश महान । पाश्चात्त्य देशात पोहोचविला ।। ३६ ।।
रामकृष्णांची करणी अद्‌भुत । रखतुराम असुनी अशिक्षित ।
ठेउनि आपुला वरदहस्त । अद्‌भुतानंद त्याला बनविले ।। ३७ ।।
भगवंताचे सामर्थ्य महान । परिस लोहास लागता तत्क्षण ।
लोखंडाचे होतसे सुवर्ण । तैसेच वर्तले यावेळी ।। ३८ ।।
ग्रंथातिल जे अध्यात्मज्ञान । व्यर्थ असे ते अनुभवाविण ।
पोपटपंची नव्हेच ज्ञान । केवळ अज्ञान ते आहे ।। ३९ ।।
पुस्तकी विद्या अनुभवाविण । अहंकारास होई कारण ।
रखतुरामाचा दिधला करुन । संबंध सत्यज्ञानासी ।। १४० ।।
रखतुराम थोर झाला । अद्‌भुतानंदांच्या शब्दाला ।
जमती विद्वान ऐकावयाला । चाखावयाला बोधामृत ।। ४१ ।।
सांगत असती रामकृष्ण । त्याच्या तेजाचा एक किरण ।
उजळुनि टाकितो अंत:करण । पुस्तकी विद्या व्यर्थ असे ।।४२ ।।



रखतुरामाला लाटू म्हणती । फार गरिबी त्याची होती ।
त्यात बाळपणीच मरती । मातापितर लाटूचे ।। ४३ ।।

चुलता काम मिळवावयास । लाटूस आणी कलकत्त्यास ।
रामचंद्र दत्ताच्या घरी त्यास । ठेविले घरकाम करावया ।। ४४ ।।

श्रीमान रामचंद्र दत्त । रामकृष्णांचे असती भक्त ।
रामकृष्णांची हकीगत । कळली तेथेच लाटूला ।। ४५ ।।

दक्षिणेश्वरास जावयाला । लाटू फार उत्सुक झाला ।
संधी मिळताच तो आला । दर्शनाला ठाकुरांच्या ।। ४६ ।।

पाहताच त्याला रामकृष्ण । जाणती हा भक्त महान ।
आकर्षिले लाटूचे मन । उपजले प्रेम दोघांमधे ।। ४७ ।।

फलमुलमेवामिठाई देउन । धनी पाठवी तयालागुन ।
लाटूस आनंद होतसे महान । दर्शन घडता ठाकुरांचे ।। ४८ ।।

घरकामात न रमे मन । म्हणे चाकरी देतो सोडुन ।
घरचे म्हणती तुझे कोण । करिल पोषण दक्षिणेश्वरी ।। ४९ ।।

परंतु सर्वज्ञ रामकृष्ण । जाणुनि लाटूची अडचण ।
मार्ग काढिती तयातून । पूर्णत्व प्रदान करावया ।। १५० ।।

म्हणती रामचंद्र दत्तास । मला पाहिजे कोणी माणुस ।
माझे काम करावयास । येथे कोणिही दिसेना ।। ५१ ।।

जर शक्य होईल तुजला । पाठव तू रखतुरामाला ।
रामचंद्र कबूल झाला । लाटू आला दक्षिणेश्वरी ।। ५२ ।।

बहु दिवसांचे त्याचे वांच्छित । यापरी फळले अकस्मात ।
लाटू झाला आनंदित । करितसे सेवा ठाकुरांची ।। ५३ ।।

रामकृष्णांचा येताच शब्द । प्रमाण मानी जैसा वेद ।
सेवा करण्यात अत्यानंद । लाटूलागी वाटतसे ।। ५४ ।।



जसा हनुमान रामचंद्राला । तसा लाटू रामकृष्णांला ।
सद्गुरु सेवेवाचुनी त्याला । अन्य काहीही प्रिय नव्हते ।। ५५ ।।
रामकृष्णांची सेवा करुनी । तयांची कृपा संपादुनी।
पूर्णत्व घेतले मिळवुनी । उदाहरण ठेविले जगापुढे ।। ५६ ।।
एकदा लाटूस संध्याकाळी । थकुनी झोप लागुनी गेली ।
रामकृष्णदेव त्या वेळी । सहज आले त्या ठायी ।। ५७ ।।
लाटूस म्हणती रामकृष्ण । अशा वेळी राहसी झोपुन ।
केव्हा करशील जपध्यान । खडबडून लाटू उठे ।। ५८ ।।
लाटू त्या दिवसापासुन । दिवसास थोडी झोप घेउन ।
रात्री करितसे जागरण । ध्यानात रात्र घालवी तो ।। ५९ ।।
गीतेत सांगती भगवंत । सामान्य जनांची जी रात ।
योगिजनांना उजाडे तेथ । तैसी लाटुची स्थिति जाहली ।।१६०।।
साधनेत काही येता अडचण । स्पष्टपणे तो दाखवी बोलुन ।
रामकृष्ण देती समजावुन । तयाची अडचण निवारिती ।। ६१ ।।
लाटू अध्यात्मचर्चेत । कधीही भाग नसे घेत ।
म्हणतसे चर्चा असे व्यर्थ । कृती मात्र कामास येत असे ।। ६२ ।।
एकदा वदते झाले ठाकुर । सुईतुनि उंट काढितो ईश्वर ।
लाटूस आनंद झाला फार । शब्द ऐकुनी ठाकुरांचे ।। ६३ ।।
त्याला तत्काळ आले कळुन । अक्षमता आपणामधे असुन ।
ईश्वर राहिला बनवून । कृपापात्र आपणाला ।। ६४ ।।
एकदा लाटू करिता ध्यान । गंगेस पूर आला महान ।
स्वत: धावले रामकृष्ण । वाहुनि जाइल म्हणूनिया ।। ६५ ।।
तयाला आणुनी भानावर । त्यासह परत आले ठाकुर ।
आणिक देवळात एकवार । लाटू बसला ध्यानास ।। ६६ ।।



पुष्कळ वेळ चालले ध्यान । घाम निघतसे अंगातुन ।
रामकृष्णांनी ते पाहुन । वारा घालणे आरंभिले ।। ६७ ।।
लाटूस येता देहभान । ठाकुर वारा घालती पाहुन ।
अत्यंत लज्जित झाले मन । रामकृष्ण मग समजाविती ।।६८।।
ठाकुर सांगती ईश्वरस्मरण । भक्ताने करावे रात्रंदिन ।
रात्रंदिवस नामस्मरण । करू लागला मग लाटू ।। ६९ ।।
लाटुने गुरुकृपा संपादुन । पूर्णत्व घेतले मिळवून ।
मार्गदर्शन बहुतांस करुन । अद्‌भुतानंद धन्य जाहले ।। १७० ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १७१ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा चौतिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय पस्तिसावा

जय जय जगद्गुरुवर्या । रामकृष्णा अध्यात्मसूर्या ।
प्रकट झालात धर्मकार्या । नमन तुम्हाला साष्टांग ।। १ ।।

हरिनाथ चट्टोपाध्याय । रामकृष्णांचा शिष्य होय ।
उपनिषदे गीता वाचनीय । ग्रंथ तयाने अभ्यासिले ।। २ ।।

शंकराचार्यांचे ग्रंथ वाचुन । अद्वैताकडे झुकले मन ।
वेदान्ताप्रमाणे आचरण । ठेवू पाहे हरिनाथ ।। ३ ।।

एकदा स्नान करिता गंगेत । मगरी दिसली अकस्मात ।
क्षणभर वाटले तयाप्रत । त्वरित बाहेर पडावे ।। ४ ।।

परंतु मनात करी विचार । मी जर नाहीच हे शरिर ।
ब्रह्मरूप मी असे जर । भय मग कसले जगतात ।। ५ ।।

त्याने सोडिले नाही स्थळ । इतर लोक जे होते जवळ ।
म्हणती मृत्युसी खेळतो खेळ । मूर्ख केवळ दिसतो हा ।। ६ ।।

परंतु परमेश्वराचे रक्षण । विघ्न ते झाले निवारण ।
तयाकडुनी कार्य महान । भगवंताचे होणे असे ।। ७ ।।

हरिनाथ आपुला विश्वास । लावुनी पाहतसे कसास ।
कशी कळावी इतरे जनांस । अवस्था तयाच्या मनाची ।। ८।।

रामकृष्णांचे होता दर्शन । आकर्षित जाहले त्याचे मन ।
भक्तिने भरले अंत:करण । येउ लागला दक्षिणेश्वरा ।। ९ ।।

एकदा म्हणाला ठाकुरांस । बरे न वाटते कलकत्त्यास ।
परंतु येता दक्षिणेश्वरास । मनास उल्हास वाटतसे ।। १० ।।



रामकृष्ण म्हणती तयास । तू तर अससी हरिचा दास ।
कोणत्याही स्थळी हरिदासास । दुःख कधीही होत नसे ।। ११ ।।
ठाकुरांस वदला हरिनाथ । हरिदास मी हे नसे जाणत ।
ठाकुर वदती नसे सत्य । जाणण्यावर अवलंबून ।। १२ ।।
तू जाणसी वा नाही जाणत । तथापि मजला असे माहित ।
तू हरिचा दास सत्य । ऐकुनी हरिनाथ आनंदला ।। १३ ।।
तेधवा हरिनाथाच्या मना । स्त्रियांविषयी वाटे घृणा ।
कळता श्रीरामकृष्णांना । म्हणती अससी तू मूर्ख ।। १४ ।।
जगदंबेचे स्वरूप व्यक्त । असती जाण स्त्रिया समस्त ।
मातेप्रमाणे असावे मानित । आदर करावा महिलांचा ।। १५ ।।
हाच मार्ग असे थोर । विजय मिळविण्या कामावर ।
जर तू करिसी तिरस्कार । तर पडसील जाळ्यात मायेच्या ।। १६ ।।
यापरी परिसुनी दिव्य वचन । हरिनाथ गेला बदलून ।
संपूर्ण बदलला दृष्टिकोन । आदर उपजला महिलांचा ।। १७ ।।
कोणास काय पाहिजे जाणुन । सूचना करिती रामकृष्ण ।
शिष्यांच्या उणिवा निरखून । ठाकुर दूर करिती त्या ।। १८ ।।
हरिनाथ पुसे कामावर विजय । मिळविण्याला उपाय काय ।
सांगते झाले श्रीगुरुराय । लक्ष असावे ईश्वराकडे ।। १९ ।।
ईश्वरचिंतनी कामकल्पना । शिवू शकेना आपुल्या मना ।
जळुनी जाई कामवासना । सदैव चिंतिता भगवंत ।। २० ।।
कळले श्रीरामकृष्णांस । वेदान्तशास्त्राचा अभ्यास ।
हरिनाथ करितसे अहर्निश । करिती उपदेश तयाप्रती ।। २१ ।।
वेदान्ताचा तू अभ्यास । कळले करितोस अहर्निश ।
हे तर चांगले असे खास । परि एक गोष्ट ऐक माझी ।। २२ ।।



सांगते वेदान्तशास्त्र जाण । केवल ब्रह्म सत्य असुन ।
इतर जे जे येतसे दिसुन । चराचर सकळ मिथ्या असे ।। २३ ।।
जाणुनी वेदान्ताचे सार । सद्गुरूचा करावा स्वीकार ।
कायावाचामनानी सत्वर । मिथ्या वस्तु त्या त्यागाव्या ।। २४ ।।
मिथ्यावस्तुचा न करिता त्याग । चर्चेचा काय तो उपयोग ।
हरिनाथाला पडला उमग । दिशा मिळाली विचारांना ।। २५ ।।
ठाकुर आले कलकत्त्यास । पाचारिले हरिनाथास ।
तो येईपर्यंत ठाकुरांस । भावावेश प्राप्त जाहला ।। २६ ।।
ठाकुर अर्धबाह्यदशेत । जनांना उपदेश होते करित ।
मिथ्या जग हा सिद्धान्त । जाणणे हे सोपे नसे ।। २७ ।।
भगवंताच्या कृपेवाचुन । अशक्य आहे मिळणे ज्ञान ।
केवळ मानवाचा प्रयत्न । येथे तोकडा पडत असे ।। २८ ।।
मानवप्राणी लहान किती । मर्यादित असे त्याची शक्ती ।
अमर्याद वस्तू जाणण्याप्रती । बुद्धी कोती मनुजाची ।। २९ ।।
यापरी उपनिषदांचे सार । सहज बोलते झाले ठाकुर ।
हरिनाथ करू लागला विचार । उपदेश थोर हा मला असे ।। ३० ।।
एकदा लोटले पुष्कळ दिवस । आला नाही दक्षिणेश्वरास ।
नंतर येता हरिनाथास । सद्गद बोलती रामकृष्ण ।। ३१ ।।
का न येसी दक्षिणेश्वरास । मज आवडे तू यावास ।
कारण ईश्वराच्या कृपेस । विशेष पात्र अससी तू ।। ३२ ।।
नाही तर नसे तुझ्यापासी । मी आलो तर तुझ्या घरासी ।
जमिनीवर आंथरावयासी । चटई अथवा सतरंजी ।। ३३ ।।
आणि तरीही तुझ्यावर । माझे प्रेम आहे फार ।
यास्तव येथे यावया उशिर । यापुढे कधिही करू नको ।। ३४ ।।



नित्य येथे तू येशिल । तर तू सर्व मिळवसील ।
वाटे इतरत्र लाभ होइल । तर तू जाई त्या ठायी ।। ३५ ।।
एक इच्छा असे मनात । तू या सांप्रत जन्मात।
जाणावे परमेश्वराप्रत । जावे पलीकडे दु:खाच्या ।। ३६ ।।
परंतु मजला सांगते आई। विशेष यत्न न करिता काही।
केवळ येथे येता होई। ईश्वरलाभ तुजलागी ।। ३७ ।।
हरिनाथाचे असे प्रेम। रामकृष्णांवर निरुपम।
होता झाला पूरितकाम। कृपाप्रसादे ठाकुरांच्या ।। ३८ ।।
पुढती त्याने संन्यास घेउन। तुरीयानंद हे अभिधान।
देशीविदेशी केली महान। तयांनी सेवा जनतेची ।। ३९ ।।
आणि सारदाप्रसन्न मित्र। अंत:करण परम पवित्र।
ठाकुरांच्या कृपेला पात्र। झाला आपुल्या वर्तनाने ।। ४० ।।
सारदाप्रसन्न होता शिकत। मेट्रोपोलिटन शाळेत।
मुख्याध्यापक महेंद्रनाथ । असे त्या विद्यालयाचा ।। ४१ ।।
सारदा असे बुद्धिमंत। वाटे मॅट्रिकच्या परीक्षेत।
विद्यावेतन मिळविल निश्चित। पूर्वी मिळविली बक्षिसे।। ४२ ।।
तथापि घडले विपरीत। दुसऱ्या दिवशी परीक्षेत।
सोन्याचे घड्याळ हारपत। झाला दु:खित सारदा ।। ४३ ।।
हळहळ फार वाटली मनात। अस्वस्थ झाले तयाचे चित्त।
प्रीती करितसे महेन्द्रनाथ। हुशार विद्यार्थी म्हणुनी ।। ४४ ।।
दु:ख हलके करावयास। महेन्द्राने आणिले त्यास।
ठाकुरांकडे दक्षिणेश्वरास। अगम्य लीला ईश्वराची ।। ४५ ।।
घड्याळ जाणे गोष्ट सान। परंतु घटना घडली महान।
रामकृष्णांचे होता दर्शन। तयाचे जीवन बदलले।। ४६ ।।



सारदाचे अंत:करण । अत्यंत पवित्र होते म्हणुन।
सहजच झाले आकर्षण । तयाचे रामकृष्णांकडे ।। ४७ ।।
आपण उच्च कुळाचे म्हणुन । सारदास होता अभिमान।
वाटे कामे असति जी हीन। चाकरांनी ती करावी ।। ४८ ।।
हे जाणुनी श्रीरामकृष्ण। तयाला म्हणती पाणी आण ।
धुवूनि काढ माझे चरण । ऐकुनी सारदा हादरला ।। ४९ ।।
तेथवा त्याचे मित्र बहुत। बसले होते मंडळीत।
त्याला लज्जा वाटली मनात। काय करावे समजेना ।। ५० ।।
परंतु ठाकुर होते इच्छित। अभिमान गळाला पाहिजे समस्त।
पुनरपि सांगती तयाप्रत। चरणप्रक्षालन करावया ।। ५१ ।।
आता पाय धुतल्यावाचुन। त्याला मार्ग दिसेना अन्य।
धुतले रामकृष्णांचे चरण। सारदाने निजहस्ते ।। ५२ ।।
सारदा सांगे तेव्हापासुन। गळाला माझा अभिमान।
सेवाव्रत हा धर्म महान। पटले तत्क्षणी मजलागी ।। ५३ ।।
रामकृष्णांच्या संगतीत। वैराग्य उदय पावले मनात।
न रमे चित्त अभ्यासात। मातापिता मग घाबरले ।। ५४ ।।
तयांनी विचार केला मनी। याचे लग्न द्यावे करुनी।
म्हणजे याच्या अंत:करणी । संसारासक्ती उद्भवेल ।। ५५ ।।
सारदास हे कळता वृत्त। त्याने घर सोडिले त्वरित।
येउनि सांगे ठाकुरांप्रत। जगन्नाथपुरीस जातो मी ।। ५६ ।।
परंतु मातापित्यांच्या चोरुन। पुरीस जात आहो आपण।
हे मात्र ठेविले लपवुन। ठाकुरांपासुनी सारदाने ।। ५७ ।।
प्रवासात गेले दिवस दोन। जवळ काहीच नसे अन्न।
भूक लागली सपाटून। वाटे मिळेल गाव पुढे ।। ५८ ।।



परंतु जसजसा घाट चाले। तसतसे ते वन दाट झाले।
चालुनी हातपाय गळाले। पाउल पुढे टाकवेना ।। ५९ ।।
झाला निबिड अंधकार । एका झाडाच्या फांदीवर।
अगतिक होउनी बसला सत्वर। भुकेला झाला सारदा ।। ६० ।।
तयाला झोप आली थकुन। इतुक्यात त्याला हाक मारुन।
कोणीतरी त्याला उठवुन। दिधले अन्न खावयाला ।। ६१ ।।
मग तो प्रभातसमयाला। चोहीकडे पाहु लागला।
तथापि कोठे नाही लागला। ठावठिकाणा वस्तीचा ।। ६२ ।।
मग तो मनात करी विचार। परम दयाळू असती ठाकुर।
म्हणुनी घडला चमत्कार। अन्न वनात मला दिले ।। ६३ ।।
पित्याने त्याचा शोध करुन। जगन्नाथपुरीप्रती जाउन।
सारदाला समजावुन। आणिले परत घराप्रती ।। ६४ ।।
वैराग्य त्याचे असाधारण। रोधवेल कैसे सरिताजीवन।
रामकृष्णांचे मार्गदर्शन। पुनरपि घेऊ लागला ।। ६५ ।।
पुढती साधना तपस्या करुन। पूर्णत्व घेतले मिळवून।
संन्यासदीक्षा त्याने घेउन। त्रिगुणातीतानंद जाहले ।। ६६ ।।
देशिविदेशी जाऊन। बहुतांना केले मार्गदर्शन।
करिती जगताचे कल्याण। स्वामी त्रिगुणातीतानंद ।। ६७ ।।
आणि गंगाधर घटक। रामकृष्णांचा शिष्य एक।
धर्मग्रंथांचा अभ्यासक। साधक अध्यात्ममार्गाचा ।। ६८ ।।
हरिनाथाच्या बरोबर। आला होता गंगाधर।
रामकृष्णांनी रात्रभर। तयाला ठेवुनी घेतले ।। ६९ ।।
बोध तयाला केला बहुत। दुसरे दिनी होता प्रभात।
ठाकुर म्हणती तयाप्रत। वारंवार येत जा येथे ।। ७० ।।



गंगाधराला आले कळुन। त्यागतत्त्व आहे महान।
असे श्रेष्ठ ते सेवासाधन। रामकृष्ण असती परमेश्वर ।। ७१ ।।
त्याला म्हणाले रामकृष्ण। नरेंद्राकडे येई जाउन ।
अंतर्मुख असे त्याचे मन। टपोर नयन पाहुनि ये ।। ७२ ।।
रोज खातो पाने शंभर। खातसे तो जे येई समोर।
परंतु पाहतो परमेश्वर। सर्व वस्तूंत जगातील ।। ७३ ।।
त्याकडे जाता गंगाधर। नरेन्द्र वाचनात दिसला चूर।
मोठमोठाली पुस्तके समोर। नेत्र टपोर असती त्याचे ।। ७४ ।।
वाटले तयाचे असे मन। अलिप्त सर्व जगापासुन।
प्रेम मैत्री तेव्हापासुन। उत्पन्न जाहली दोघांमधे ।। ७५ ।।
रामकृष्णकृपा संपादुन। घेतले पूर्णत्व मिळवून।
पुढती संन्यास ग्रहण करुन। स्वामी अखंडानंद जाहले ।। ७६ ।।
अनेक तीर्थयात्रा करुन। गिरिजनांची दु:खे पाहुन।
द्रवले तयांचे अंत:करण। सेवा केली दु:खितांची ।। ७७ ।।
रामकृष्णांचा शिष्य अन्य। चट्टोपाध्याय हरिप्रसन्न।
विज्ञानानंद नाम घेउन। प्रसिद्ध जाहला जगतात ।। ७८ ।।
तो शरच्चंद्रासमवेत। आला दक्षिणेश्वराप्रत।
तयास पाहुनि आनंद बहुत। जाहला श्रीरामकृष्णांना ।। ७९ ।।
रामकृष्णांचे होता दर्शन। आनंद पावला हरिप्रसन्न।
कळले ठाकुर असामान्य। महापुरुष निश्चित ते ।। ८० ।।
मणिमल्लिकाच्या घरी ठाकुर। नेती आपुल्या बरोबर।
तेथे बराच झाला उशिर। नंतर परतला घराप्रती ।। ८१ ।।
माता वाट पाहुनी थकली। हरिप्रसन्नला म्हणाली।
इतुका वेळ कोणत्या स्थळी। सांग उगाच घालविसी ।। ८२ ।।



तयाने वृत्त करिता कथन। माता म्हणाली रागावुन।
दक्षिणेश्वराचा वेडा ब्राह्मण। कशाला गेलास त्याच्याकडे ।। ८३ ।।
त्याने तर आजपर्यंत। बुद्धिभ्रष्ट केली मुले बहुत।
तू काय त्या बुद्धिभ्रष्टांत। सामिल होऊ इच्छितोस ।। ८४ ।।
पुढे हा प्रसंग आठवून। विज्ञानानंद करिती कथन।
प्रेमप्रवाहात वाहतो अजुन। दक्षिणेश्वराच्या वेड्याच्या ।। ८५ ।।
न पडतो जर त्या प्रवाहात। तर मी संसारसागरात।
कोठे गेलो असतो वाहत। कल्पनाहि त्याची करवेना ।। ८६ ।।
एकदा हरिप्रसन्न आला। ठाकुर ठेवुनि घेती त्याला।
देती चटई झोपावयाला। मच्छरदाणिही लाविती ।। ८७ ।।
प्रसन्न आडवा झाल्यावर। त्याच्याजवळ आले ठाकुर ।
अंत:करणात प्रीती फार। बोलु लागले तयाप्रती ।। ८८ ।।
आहे काय तुला माहिती। तुमच्यावर का करितो प्रीती।
आईने दाखविले मजप्रती। इथली खास तुम्ही मुले ।। ८९ ।।
काही वेळाने रामकृष्ण। टाळ्या वाजवित तेथे येउन।
काही अक्षरे उच्चारुन। फिरू लागले सभोवती।। ९० ।।
पाहुनि त्यांचे विचित्र वर्तन। विचार करी हरिप्रसन्न ।
यांना वेडे काहीजण। मानती ते खरे काय ।। ९१ ।।
नंतर सांगे हरिप्रसन्न। त्या दिवशीच मजलागुन ।
जे काय द्यायचे ते देउन। टाकिती कृपाळू गुरुराय ।। ९२ ।।
तरुण मुले जी असती खास। त्यावर करिती प्रीती विशेष ।
न येता कोणी काही दिवस। निरोप तयांस पाठविती ।। ९३ ।।
एके वेळी हरिप्रसन्न । आला नव्हता बहुत दिन।
शरदबरोबर निरोप देउन। ठाकुर तयाला बोलाविती ।। ९४ ।।



दक्षिणेश्वराला आल्यावर । त्याला सांगू लागले ठाकुर ।
तुजला नाही काय फिकिर । नित्य या स्थळी येण्याची ।। ९५ ।।
सांग करतोस काय ध्यान । उत्तर देई हरिप्रसन्न ।
पुष्कळ करितो मी प्रयत्न । तथापि ध्यान जमत नसे ।। ९६ ।।
जवळ आले रामकृष्ण। जिभेवर मंत्र दिला लिहुन।
सांगती पंचवटीत जाउन । करावे ध्यान त्वा आता ।। ९७ ।।
रामकृष्णांचा स्पर्श जाहला। हरिप्रसन्न बदलुनी गेला।
अर्धबाह्य अवस्था त्याला। प्राप्त जाहली पंचवटीत ।। ९८ ।।
तेथे गाढ लागले ध्यान। बाह्य जग गेला विसरुन ।
विसरला आपुले देहभान। ध्यानात पुष्कळ वेळ गेला ।। ९९ ।।
मग येताच भानावर । त्याला समोर दिसले ठाकुर ।
प्रेमाने तयाच्या अंगावर। हात फिरवीत विचारती ।। १०० ।।
आज कैसे लागले ध्यान । उत्तर देई हरिप्रसन्न।।
अनुभव मजला आला महान। ध्यान छान मज लागले ।। १ ।।
रामकृष्ण सांगती त्यास। कामाचा नसावा लवलेश ।
या मुद्द्यावर भर विशेष । दिला पाहिजे साधकाने ।। २ ।।
मजला सांगते जगज्जननी। तिनेच तुम्ही मुले निवडुनी।
दिधली मजकडे पाठवुनी । कार्य तियेचे करावया ।। ३ ।।
पुष्कळ गोष्टी तुमच्याकडुन। अंबा घेणार आहे करुन ।
यास्तव तुम्ही सर्व तरुण । ठेवा वर्तन अतिशुद्ध ।। ४ ।।
रामकृष्णांचे शिष्य तरुण। त्यासवे क्रीडती भगवान।
सहज बोलता विनोद वचन । अत्युच्च ज्ञान ते देती ।। ५ ।।
हरिप्रसन्नाबरोबर । एकदा कुस्ती खेळले ठाकुर।
तो तरुण त्याचे धिप्पाड शरिर। देह कृश असे बाबांचा ।। ६ ।।



ठाकुरांचा देह कोमल । जणु ते असती केवळ बाळ।
हरिप्रसन्न उचली तत्काळ। सहज लीलेने ठाकुरांना ।। ७ ।।
दिव्य स्पर्श होता तत्क्षणी । प्रसन्नास येई आढळुनी।
ठाकुरांपासुनी शक्ती निघुनी । शिरतसे आपुल्या अंगात ।।८।।
गोष्ट दिसण्याला साधारण । केवळ खेळ विनोदपूर्ण ।
केवढे कृपाळू भगवान । शक्तिदान करिती खेळात ।। ९ ।।
तसेच केवळ विनोदात । हासत खेळत बोलण्यात।
ज्ञानदान ते करिती नित्य। अद्‌भुत रीत शिकविण्याची ।। ११० ।।
पुढती संन्यास धारण करुन । विज्ञानानंद नाम घेउन।
अनेकांना सन्मार्गी लावुन। सेवा केली मानवांची ।। ११ ।।
रामकृष्णांचे अंतरंग भक्त। चरिते तयांची असती अद्‌भुत।
वैराग्यपावक प्रज्वलित । जीवने तयांची त्यागमय ।। १२ ।।
भगवंताच्या बरोबर । लीला कराया अवनीवर।
देवगण घेउनी अवतार। उद्धार कराया प्रकटले ।। १३ ।।
ठाकुरांचे शिष्य गृहस्थ। त्यांचीही चरिते अत्यद्‌भुत।
पूर्णचंद्र घोष त्यांच्यात। प्रिय अत्यंत ठाकुरांना ।। १४ ।।
ईश्वरकोटी ज्यांना म्हणती। त्यात पूर्णाचंद्राची गणती ।
ईश्वरीय कार्य करण्याप्रती। नित्यसिद्ध येती जन्माला ।। १५ ।।
पूर्वकर्माचे फळ म्हणुन । इतरे जन घेतात जनन।
नित्यसिद्धांना नसे कारण । जन्म घेण्याचे कर्मामुळे ।। १६ ।।
पापकर्मे कधी न करिती। ईश्वरावर त्यांची प्रीती।
अवतारिकासवे जन्मती । कार्यपूर्ती करावया ।। १७ ।।
रामकृष्णदेव म्हणत। नारायणांश असे पूर्णात।
सत्त्वगुण विशेष असे त्यात। पूर्ण जीवनमुक्त असे ।। १८ ।।



आई देई दाखवून। ईश्वरकोटी असती कोण।
भावावेशात सर्वांस पाहुन । एकेक येताच ओळिखले ।। १९ ।।
जेधवा येथे पूर्ण आला। आईने दाखवुनी दिले मजला।
ईश्वरकोटी भक्तांचा मेळा। पूर्ण जाहला आता इथे ।। १२० ।।
महेन्द्राने विचारिले। पूर्णास मिथ्यत्व कसे कळले ।
ठाकुर म्हणती त्याला आले। ज्ञान पूर्विच्या जन्मांचे ।। २१ ।।
मी या तरुण मुलांवर। का करतो प्रेम अपार।
अंश रूपाने ते ईश्वर। भावावेशात पाहिले ।। २२ ।।
एकदा भावावेशात। आलिंगावया जगन्नाथ।
जाता खाली पडलो त्वरित। कोडे तेधवा उलगडले ।। २३ ।।
कोणीतरी मज सांगितले। नरदेहधारण आता केले।
यास्तव प्रेम पाहिजे केले। मानवरूपात ईश्वरावर ।। २४ ।।
महेन्द्रनाथाच्या शाळेत। पूर्णचंद्र होता शिकत।
प्रीती करितसे महेन्द्रनाथ। भक्ती पाहुनि पूर्णावर ।। २५ ।।
महेन्द्र देई पूर्णाप्रत। वाचावयाला चैतन्यचरित।
म्हणे चैतन्यासमान अद्‌भुत। परमहंस असे दक्षिणेश्वरी ।। २६ ।।
पूर्णाचा पिता विख्यात। रायबहादुर दीनानाथ।
गणना तयाची कलकत्त्यात। थोर लोकांत होत असे ।। २७ ।।
तयाला केवि आवडावे। पुत्राने पुजाऱ्याकडे जावे।
पूर्णास कळेना काय करावे। जावे न जावे दक्षिणेश्वरास ।। २८ ।।
आठवले मग त्याला एक । आपुलाच नातेवाईक ।
दक्षिणेश्वरी झाला स्थायिक । हरकत काय जाण्याला ।। २९ ।।
यापरी मनात विचार करुन । महेन्द्रासवे आला पूर्ण ।
त्याला भावावेशात पाहुन। ठेविला होता ठाकुरांनी ।। १३० ।।



आता दृष्टीस पडता पूर्ण। ओळखुनि झाले समाधिमग्न।
प्राप्त होताच देहभान। देती मिठाई खाण्याला ।। ३१ ।।
सारदादेवीकडे नेउन। ठाकुर ओळख देती करुन ।
म्हणती याला हार घालुन। चंदन लाव कपाळाला ।। ३२ ।।
सारदादेवीने तसेच केले। खाद्य पदार्थ त्याला वाढले।
कढी वाढ ठाकुर वदले। आणि पदार्थ उत्तमोत्तम ।। ३३ ।।
त्याचे जेवण झाल्यावर । पाणी ओतिले हातावर।
एक रुपया दक्षिणा नंतर। ठाकुर सांगती द्यावयाला ।। ३४ ।।
रामकृष्णांचे होता दर्शन। आकर्षित झाला पूर्ण।
येउ लागला अधुनमधुन । पूर्णचंद्र घोष बाबांकडे ।। ३५ ।।
पूर्णचंद्रावर अती प्रीती । रामकृष्णदेव करिती ।
फलमुलमिठाई पाठविती। खावयासाठी तयाकडे ।। ३६ ।।
ठाउक होते ठाकुरांस। पूर्णचंद्र नारायणाचा अंश ।
यास्तव खाऊ घालिती त्यास । मिठाई आपुल्या हातांनी ।। ३७ ।।
एकदा पुसती ते पूर्णास । मी कोण वाटे तुझ्या मनास ।
तो वदे प्रत्यक्ष परमेश। नररूपधारी असा तुम्ही ।। ३८ ।।
तेरा वर्षांचा बाळ पूर्ण । कसे कळले तत्त्व गहन।
स्पष्ट सांगती समजावुन। श्रीरामकृष्ण भक्तांसी।। ३९ ।।
पूर्णाच्या पवित्र चित्तात। पूर्वज्ञान जे गतजन्मात।
होतसे स्वभावे प्रतिबिंबित। त्यामुळे तयाने जाणिले ।। १४० ।।
ठाकुर येता कलकत्त्यास। बोलावित पूर्णचंद्रास।
मेवामिठाई देउनी त्यास। करिती उपदेश परोपरी ।। ४१ ।।
महेन्द्रास ठाकुर विचारिती। पूर्णाची किती झाली प्रगती ।
महेन्द्र सांगे ठाकुरांप्रती । प्रगती पुष्कळ दिसत असे ।। ४२ ।।



ईश्वराचे होता स्मरण। अश्रु वाहतात नयनातुन ।
वाटते साधक असाधारण। पूर्णचंद्र घोष असावा ।। ४३ ।।
रामकृष्ण म्हणती अत्यद्भुत। तयाची अवस्था असे उन्नत।
मला करावा लागला बहुत। कल्याणास्तव जप त्याच्या ।।४४।।
यापरी दयाळू रामकृष्ण। भक्ताचे कराया कल्याण।
काळजी करिती रात्रंदिन। घालिती गळ जगज्जननीला ।। ४५ ।।
ते पुसती पूर्णास समाधी । लागते काय कधी कधी ।
महेन्द्र म्हणाला वृत्ति साधी । बाह्यव्यक्ती त्याची नसे ।। ४६ ।।
त्यावर वदते झाले ठाकुर। बाह्यव्यक्त त्याचे नसणार।
वेगळा आहे त्याचा प्रकार। तयाची लक्षणे अत्युत्तम ।। ४७ ।।
रामकृष्णांचे घ्यावया दर्शन। वेळोवेळी येतसे पूर्ण।
महेन्द्र देतो उत्तेजन। समजले तयाच्या पितयाला ।। ४८ ।।
पितयाने त्या शाळेतुन। पूर्णचंद्रास घेतले काढुन ।
दक्षिणेश्वरी न जावा म्हणुन । दुसऱ्या शाळेत घातले ।। ४९ ।।
तरिही संधी मिळताच पूर्ण । ठाकुरांचे घेई दर्शन ।
यापरी अद्भुत आकर्षण । असे तयाला बाबांचे ।। १५० ।।
दर्शन घेण्यास येता पूर्ण। बोध करिती रामकृष्ण।
पुष्कळ काळ करी साधन। नित्य नेमे पूर्णचंद्र ।। ५१ ।।
पुत्र संन्यास घेईल म्हणुन । पित्याने करुनी दिले लग्न ।
विचित्र परिस्थितीत पडुन । विवाह झाला पूर्णाचा ।। ५२ ।।
संन्यासी शिष्य मार्गदर्शन । करिती देशी विदेशी फिरुन ।
पूर्णचंद्र राहिला होउन। आदर्श गृहस्थाश्रमाचा ।। ५३ ।।
पूर्णचंद्र घोष परोपरी। दुःखितांची सेवा करी।
रामकृष्णांना सदा स्मरी । महाज्ञानी पूर्ण असे ।। ५४ ।।



श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा पस्तिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय छत्तिसावा

रामकृष्णा दयासागरा। भवाब्धीतुनी मजला तारा।
केवळ तुमचा मज आसरा। नमस्कारा मी करितो ।। १ ।।

रामकृष्णांचा शिष्य गृहस्थ। असे मल्लिक शंभुनाथ।
ईश्वरनामावर अत्यंत । श्रद्धा असे मल्लिकाची ।। २ ।।

तो असे श्रीमंत गृहस्थ। शंभुनाथास नसे अपत्य।
केशव सेनाचा तो दोस्त । ब्राह्मसमाजात जात असे ।। ३ ।।

असुनही अत्यंत धनवान । सामान्यासमान आचरण।
पायीच कलकत्त्यापासुन । दक्षिणेश्वराला येत असे ।। ४ ।।

कलकत्त्यास असे सदन । दक्षिणेश्वरी असे उद्यान ।
उद्यानात बंगला छान । दवाखाना असे तेथे ।। ५ ।।

तेथुनी केवळ शंभर मीटर । कालीमातेचे असे मंदिर ।
त्या परिसरात राहती ठाकुर । यास्तव परिचय होय त्यांचा ।।६।।

रामकृष्णांनी शंभुनाथाला । भावावेशात होता पाहिला ।
जगन्मातेने दाखविला । दुसरा रसदार हा असे ।। ७ ।।

तो मथुरनाथानंतरी । रामकृष्णांची काळजी करी ।
जी लागे ती वस्तू सत्वरी । आणुनी देतसे बाबांना ।। ८ ।।

कलकत्त्याला गाडी करुन । जेधवा जाती रामकृष्ण ।
तयांचे गाडीभाडे देउन। टाकित असे शंभुनाथ ।। ९ ।।

तयाची पत्नी भक्तिमती। रामकृष्णांवर करी प्रीती ।
सारदादेवीला घराप्रती। नेउनी पूजन करित असे ।। १० ।।



धर्मासंबंधी अति उदार । शंभुनाथाचे असती विचार ।
बायबलादी ग्रंथ इतर । घरी असती मल्लिकाच्या ।। ११ ।।
उद्यानातिल त्याच्या घराला । ठाकुर जाती कित्येक वेळा ।
आवडे म्हणुनी शंभुनाथाला । अध्यात्मचर्चा होत असे ।। १२ ।।
बायबलचे त्याच्यापासुन । ठाकुरांनी मिळविले ज्ञान ।
शंभुनाथ मल्लिक अनन्य । भक्त जाहला ठाकुरांचा ।। १३ ।।
मंदिराजवळील एक स्थान । शंभुनाथाने विकत घेउन ।
पुढे बांधुनी दिले सदन। सारदामणीस राहावया ।। १४ ।।
शंभुनाथ होता उदार । धार्मिक गोष्टीत लक्ष फार ।
गरिबांवर करी उपकार । काढिले धर्मार्थ दवाखाने ।। १५ ।।
रामकृष्णांना करी विनंती । आशीर्वाद द्या मजप्रती ।
जेणे व्यय मम द्रव्याप्रती । होइल सेवेत लोकांच्या ।। १६ ।।
रामकृष्णांच्या होते मनात । त्याला धर्म कळावा यथार्थ ।
उच्च आध्यात्मिक अवस्थेप्रत । करावे उन्नत तयासी ।। १७ ।।
यास्तव त्याला म्हणती ठाकुर । जर तुज दिसला परमेश्वर ।
काय तयाला मागणार । काढुदे काही दवाखाने ।। १८ ।।
ईश्वराची सृष्टी महान । दवाखाने चार दोन ।
काय होणार आहे काढुन । किती जन त्याचा लाभ घेती ।। १९ ।।
ईश्वरलाभ झाल्यावाचुन। धर्मार्थ कर्मे करिता महान ।
उगीच होतो अभिमान । न कळे कर्ता भगवंत ।। २० ।।
यास्तव आपुला स्वार्थ त्यागुन। सोडुनी मनाचा अभिमान ।
निज कर्तव्ये करावी पूर्ण । मग नारायण तोषतसे ।। २१ ।।
कर्मे करिता ईश्वरार्पण । कर्तृत्वाचा गळे अभिमान ।
अलिप्त राहिले पाहिजे मन । कर्मफळाची इच्छा नको ।। २२ ।।



कामकांचन आणि कीर्ती । आत्मोन्नतिच्या आड येती ।
यास्तव तेथे असावी विरक्ती । करावी भक्ती ईश्वराची ।। २३ ।।
सेवाधर्म असे साधन। साध्य नव्हे हे घ्यावे जाणुन ।
ईश्वरलाभ घेणे करुन । एकमात्र ध्येय असावे ।। २४ ।।
शंभुनाथ गेला समजुन । कार्य कितिही असो महान ।
तेथे अडकवू नये मन । असावे ध्यान ईश्वराकडे ।। २५ ।।
लोकोपयोगी कामे महान । तो करी सोडुनी अभिमान ।
रामकृष्णांची सेवा करुन । शंभुनाथ धन्य जाहला ।। २६ ।।
आणिक सुरेन्द्रनाथ मित्र । बाबांचा तो रसद्दार ।
रामकृष्णांची सेवा फार । केली थोर भक्त जाहला ।। २७ ।।
नोकरी ब्रिटिश कंपनीत । मासिक वेतन होते बहुत ।
आनंद नव्हता आयुष्यात । अस्वस्थ चित्त असे त्याचे ।। २८ ।।
शेजारी रामचंद्र दत्त । ठाकुरांचा परम भक्त ।
तयास सांगे सुरेन्द्रनाथ । आयुष्यात गोडी नसे ।। २९ ।।
तीस वर्षांचा सुरेन्द्र तरुण । मजबूत बांधा गौरवर्ण ।
बाह्यात्कारी उद्धट वर्तन । अंत:करण कोमल असे ।। ३० ।।
परिस्थितिचा परिणाम होउन । लागले होते काही दुर्गुण ।
करितसे तो मदिरापान । तयाचे मन अस्वस्थ असे ।। ३१ ।।
मनमोहन मित्र राम दत्त । दोघांस सुरेन्द्र सांगे समस्त ।
न कळे तयांना याचे चित्त । असावे अस्वस्थ का बरे ।। ३२ ।।
मग ते म्हणती सुरेन्द्रास । चाल तू दक्षिणेश्वरास ।
तेथ असतात परमहंस । उपाय काही करितील ते ।। ३३ ।।
सुरेन्द्र म्हणाला तुम्ही भाविक । मानता परमहंस अलौकिक ।
तुम्हा सकळ हंसात बक । एक नास्तिक दिसेन मी ।। ३४ ।।



आणि जर का परमहंस । करतील भलताच बकवास ।
मी तयांच्या कानशिलास । गरम करीन अविलंबे ।। ३५ ।।
ना हो करिता करिता अखेर । सुरेन्द्र येण्यास झाला तयार ।
मग ते तिघे निघाले सत्वर । दक्षिणेश्वराला पातले ।। ३६ ।।
सुरेन्द्राने रामकृष्णांला । साधा नमस्कार नाही केला ।
नाही शिष्टाचार पाळिला । जाउनी बैसला एकीकडे ।। ३७ ।।
रामकृष्णांच्या सभोवती । अनेक भक्त बैसले असती ।
ठाकुर विशद करुनी सांगती । ईश्वरप्राप्ती केवी होय ।। ३८ ।।
बोल अत्यंत मधुर असती । साधेच हृदयापासुनी निघती ।
तत्काळ ते जाउनि भिडती । चित्ती सुरेन्द्रनाथाच्या ।। ३९ ।।
तेव्हा सांगत होते ठाकुर । भक्तजनांचे दोन प्रकार ।
काहींचा भर कर्तृत्वावर । ईश्वरावर भार दुसऱ्यांचा ।। ४० ।।
वानरीचे पिलू लहान । स्वत: मातेस राहे धरुन ।
तैसे स्वत: साधना करुन । मिळवू पाहती ईश्वराला ।। ४१ ।।
मांजराचे पिलू सान । ओरडते म्यांव म्यांव करुन ।
केवळ हाक मातेस मारुन । भार तिच्यावर टाकितसे ।। ४२ ।।
मांजरी जेथे धरुनी नेइल । तेथेच पिलू ते राहिल ।
आईची मर्जी, ती ठेविल । मालकाच्या मंचकावरी ।। ४३ ।।
ठेवो कठिण दगडावर । पिलू त्याचा न करी विचार ।
राहावयाला असे तयार । जेथे ठेविल तया ठायी ।। ४४ ।।
त्यापरी भक्त ईश्वरावर । टाकिती आपुला सर्व भार ।
ईश्वरासाठी निरंतर । रडुनी करिती आकांत ।। ४५ ।।
मग तो ईश्वर दयामय । भक्तापासी धावुनी जाय ।
परोपरी करितसे साहा । असहाय स्थितीतुनि काढितसे ।। ४६ ।।



परमेश्वरावर टाकिता भार । त्याची चिंता करितो ईश्वर ।
का बरे जन मग त्याच्यावर । अवलंबुनी न राहती ।। ४७ ।।

सुरेन्द्रनाथास वाटे चित्ती । जरी ठाकुर सर्वांस सांगती ।
बोध असे हा मला सांप्रती । यात संशय काही नसे ।। ४८ ।।

सुरेन्द्र विजय मिळविण्या गेला । परी पराभव घेउनी आला ।
निरोप घेताना ठाकुरांला । केला साष्टांग प्रणिपात ।। ४९ ।।

आपणालाच उद्देशुन । वाटे बोलले रामकृष्ण ।
निश्चित मिळाले आश्वासन । त्यांनी घेतला सर्व भार ।। ५० ।।

सांगु लागला आनंदुन । माझा सद्गुरू नसे सामान्य ।
उपटण्या गेलो तयांचे कान । माझेच देउनी परतलो ।। ५१ ।।

रामकृष्णांची अद्भुत शक्ती । भक्तजनांना माहित होती ।
आश्चर्य वाटले त्यांच्या चित्ती । का न बदलला सुरेन्द्र ।। ५२ ।।

तयांना वाटे सुरेन्द्रनाथ । एकाच रात्रीत व्हावा संत ।
बाबांस म्हणे केदारनाथ । सुरेन्द्रावर दया करा ।। ५३ ।।

बुडत आहे सुरेन्द्र बिचारा । भवसागरातुनि तयाला तारा ।
कृपा करुनि त्याला उद्धारा । कृपासागरा रामकृष्णा ।। ५४ ।।

मी काय करू बाबा म्हणती । ती काय असे माझी शक्ती ।
जगज्जननी इच्छिते चित्ती । तैसेचि घडुनी येत असे ।। ५५ ।।

यापरी बोलुनी रामकृष्ण । थोडे दूर गेले निघुन ।
अलिप्तपणे राहिले बसुन । बकुळवृक्षाच्या तळासी ।। ५६ ।।

सुरेन्द्रास टाकिता झिडकारुन । मग तो करू लागला रुदन ।
अश्रु वाहती नयनातुन । अभिमान सर्वही गळाला ।। ५७ ।।

जवळ जाउनी रामकृष्ण । तयास देती आशीर्वचन ।
जगज्जननी तुजलागुन । देवो संपूर्ण सुख सदा ।। ५८ ।।



सत्य झाले आशीर्वचन । सुरेन्द्राच्या जीवनात पूर्ण ।
आश्चर्यकारक घटना घडुन । आल्या कृपेने बाबांच्या ।। ५९।।
वेळ सापडताच तयास । येउ लागला दक्षिणेश्वरास ।
कधी सोडुनी आपुले ऑफिस । दर्शनासाठी येत असे ।। ६०।।
एकदा वाटले आकर्षण । घ्यावयाला आला दर्शन ।
जाणार होते रामकृष्ण । कलकत्त्याला त्याच वेळी ।। ६१ ।।
रामकृष्ण म्हणती त्यास । जातसे मी तुझ्या घरास ।
सीमा न उरली आश्चर्यास । कळले कारण आकर्षणाचे ।।६२।।
एकदा सुरेन्द्रे हार आणिला । ठाकुरांना अर्पावयाला ।
परि बाबांनी फेकुन दिधला । फार मोलाचा तो हार ।। ६३ ।।
रामकृष्णांची कृती पाहुन । डिवचला त्याचा अभिमान ।
सत्वर तो बाहेर येउन । भक्तजनांना सांगतसे ।। ६४ ।।
किती मोलाचा असे हार । त्यास्तव पैसे खर्चिले फार ।
खेड्यातिल ब्राह्मण ठाकुर । केवी किंमत कळेल त्यांना ।। ६५ ।।
लगेच आला दुसरा विचार । काय म्हणुनी परमेश्वर ।
मानिल द्रव्यालागी थोर । सर्वेश्वर जो जगताचा ।। ६६ ।।
मग सत्वर आत आला । पाहुनी आश्चर्यचकित झाला ।
घेउनि हार तो फेकलेला । नृत्य करिती रामकृष्ण ।। ६७ ।।
आता समजला सुरेन्द्रनाथ । गळावयाला गर्व समस्त ।
कळावयाला धनाची किंमत । ते कृत्य केले ठाकुरांनी ।। ६८ ।।
रामकृष्ण काळजी घेती । करावया सुरेन्द्राची प्रगती ।
लक्ष ठेविती त्याच्यावरती । म्हणती नित्य ये या ठायी ।। ६९ ।।
तोतापुरिने ठेविले सांगुन । घासले पाहिजे भांडे प्रतिदिन ।
नातरी जातसे ते गंजुन । सत्संग यास्तव करावा ।। ७० ।।



गृहस्थाने मधुन मधुन । एखादे निवांत स्थळ पाहुन ।
केले पाहिजे जपध्यान । प्रार्थना करावी ईश्वराची ।। ७१ ।।

गृहस्थाचा त्याग देख । असावा लागतो मानसिक ।
कारण व्यवहारात अनेक । वस्तू आवश्यक असतात ।। ७२ ।।

तू जी सर्व करिसी कमाई । धर्मकार्यात खर्च होई ।
यास्तव देसी ते मी घेई । नातर काही न घेतो तुझे ।। ७३ ।।

सुरेन्द्र सांगे बाबांलागुन । मजला लागत नाही ध्यान ।
जाणत असती रामकृष्ण । तेवढे उन्नत मन नाही ।। ७४ ।।

मग ठाकुर त्याला पुसती । स्मरसी काय ईश्वराप्रती ।
सुरेन्द्र वदला दिनराती । स्मरण करितसे देवाचे ।। ७५ ।।

ठाकुर म्हणती तयाप्रत । तेवढेच तुला पुरे सांप्रत ।
अहर्निशी जगन्मातेप्रत । मनापासुनी स्मरत रहा ।। ७६ ।।

पूर्वी अश्रद्ध सुरेन्द्रनाथ । रामकृष्णांच्या संगतीत ।
बनला श्रद्धावान भक्त । बदलुनि गेला पूर्णपणे ।। ७७ ।।

करी विचार तयाचे मन । जगन्मातेचे भक्त आपण ।
ठाकुरांचे मज आकर्षण । काय संबंध असे त्यांचा ।। ७८ ।।

नंतर घराचे लावुनी द्वार। ध्यान करी कालीसमोर ।
तेव्हा तयाला दिसले ठाकुर । पडला प्रकाश मनामधे ।। ७९ ।।

तयाला कळले पुरेपुर । एकच जगन्माता ठाकुर ।
आपुले मत कोणाही समोर । बोलु लागला उघडपणे ।। ८० ।।

वर्ष प्रतिपदेच्या दिवशी । कालिपूजेच्या समयासी ।
पूजावयास रामकृष्णांसी । सामग्री घेउनी पातला ।। ८१ ।।

म्हणे जगज्जननी काली । स्वये रामकृष्ण जाहली ।
पूजिता तयांना या काळी । कालीपूजन सहज घडे ।। ८२ ।।



झाले सुरेन्द्राचे सदन । भक्तजन जमावयाचे स्थान ।
कित्येकदा रामकृष्ण । आले घरी सुरेन्द्राच्या ।। ८३ ।।

सुरेन्द्राच्या सदनाला । पदे गावया नरेन्द्र आला ।
प्रथम दर्शनाचा तयाला । लाभ झाला ठाकुरांच्या ।। ८४ ।।

भक्तिगीते ऐकावयाला । इच्छा जाहली ठाकुरांला ।
सुरेन्द्राने नरेन्द्राला । बोलाविले गावयास ।। ८५ ।।

महापुरुषांचा हृदयंगम । तयाच्या सदनी जाहला संगम ।
म्हणुनी सुरेन्द्राचे नाम । इतिहासात अमर जाहले ।। ८६ ।।

सुरेन्द्रावर प्रीती भारी । ठाकुर येती तयाच्या घरी ।
जमती भक्तमंडळी सारी । करिती आनंद कीर्तनाचा ।। ८७ ।।

रामकृष्ण निरीक्षिती । किती कोणाची झाली प्रगती ।
काय करावे तेही सांगती । चिंतिती हित सकळांचे ।। ८८ ।।

जसा जयाला लागे बोध । तसा तयाला करिती विशद ।
अंत:करण राहावे शुद्ध । म्हणुनि काळजी ते करिती ।। ८९ ।।

सुरेन्द्रावर असुनही प्रीती । उणिवा तयाला दाखविती ।
शीघ्र तयाची व्हावी उन्नती । हेच इच्छिती रामकृष्ण ।। ९०।।

सुरेन्द्र वृन्दावनावरुनी । परतला होता यात्रा करुनी ।
सहज बाबांस गेला बोलुनी । बहुत भिकारी त्या ठायी ।। ९१ ।।

क्षेत्रोपाध्याय तेथिल लोचट । तयांना द्यावयाला चाट ।
वदलो उद्या घेईन भेट । परंतु परतलो त्या दिवशी ।। ९२ ।।

बाबा म्हणती असत्य भाषण । करणे योग्य नसे जाण ।
टाळावयाला वाक्ताडण । विषय बदलला सुरेन्द्राने ।। ९३ ।।

म्हणाला साधू वैष्णवजन । पाहिले करीत असता ध्यान ।
तयासी पुसती रामकृष्ण । काय त्वा दिधले तयांप्रती ।। ९४ ।।



तयाचा ऐकताच नकार । चूक केली म्हणती ठाकुर ।
आपुलेच कल्याण होणार । देता दान सत्पुरुषांना ।। ९५ ।।
एक दिवस म्हणाला सुरेन्द्र । जर न्यायी आहे ईश्वर ।
तर त्याने साह्य निरंतर । केले पाहिजे भक्तजना ।। ९६ ।।
ठाकुर सांगती असे जगत । ईश्वराचीच माया समस्त ।
अनाकलनीय अगणित । असती गोष्टी जगामधे ।। ९७ ।।
परमेश्वराचे खरोखर । असती मार्ग अगम्य फार ।
मानवास कैसे ते कळणार । बुद्धी सीमित मनुजाची ।। ९८ ।।
सुरेन्द्राने केला अर्पण । पुष्पहार ठाकुरांलागुन ।
रामकृष्णांनी तो काढुन । गळ्यात घातला सुरेन्द्राच्या ।। ९९ ।।
सुरेन्द्राला वाटले आपण । हार मिळता झालो धन्य ।
रामकृष्णांना केले नमन । सुरेद्रनाथे भक्तिभरे ।। १०० ।।
नंतर ठाकुर सुरेन्द्राला । सांगती पाय चेपावयाला ।
फार आनंद त्याला जाहला । अधिकार मिळाला सेवेचा ।। १ ।।
सुरेन्द्रनाथ नसे सामान्य । जगन्मातेने तयालागुन ।
रसद्दार दिला होता नेमुन । सेवा कराया बाबांची ।। २ ।।
आणिक रसद्दार भक्तिमान । बलराम बोस गेला होउन ।
तो येताच तयालागुन । रामकृष्णांनी ओळखिले ।। ३ ।।
भावावेशात एक दिन । चैतन्यदेवांचे संकीर्तन ।
पाहिले तेधवा आला दिसुन । बलराम त्यांच्या भक्तांत ।। ४ ।।
चैतन्यांच्या भक्तगणांत । मुख्य मुख्य दिसले संकीर्तनात ।
सर्व झाले होते परिचित । भावावेशात ठाकुरांना ।। ५ ।।
त्यांतिल जे जे दर्शना येती । ठाकुर तयांना ओळखिती ।
बलरामासही येणे रीती । येताच तयांनी ओळखिले ।। ६ ।।



ईश्वर असे का पुसे बोस । ठाकुर म्हणाले असे खास ।
प्रेमे प्रार्थिता परमेशास । प्रत्यक्ष दर्शन देत असे ।। ७ ।।
ईश्वरासी नाते जोडावे । पुत्रासारखे प्रेम करावे ।
आपुला समजुनी पाचारावे । जवळीक करावी तयासी ।। ८ ।।
बोधे बलराम आकर्षिला । दुसऱ्या दिवशी पुन्हा आला ।
नमस्कार करिता तयाला । म्हणती बाबा प्रेमाने ।। ९ ।।
जगन्माता देई दाखवुन । माझा रसद्दार असशी म्हणुन ।
माझ्यासाठी दिल्या ठेवुन । पुष्कळ वस्तू तुझ्या घरी ।। ११० ।।
बाबांची पदधूली घेउन । बलराम बोस गेला निघुन ।
मनी म्हणे आणित जाईन । ठाकुरांसाठी सर्व वस्तू ।। ११ ।।
तयाला समजुनी आले निश्चित । ठाकुर दुसरे कोणी नव्हत ।
चैतन्य महाप्रभू साक्षात । पुनरपि आले अवनीवर ।। १२ ।।
बाबांच्या अंतरंग भक्तांत । बलरामाची गणना होत ।
तो ज्या वस्तू अर्पण करित । त्या स्वीकारिती ठाकुर ।। १३ ।।
बलराम बोसाचे चारित्र्य । असे अत्यंत शुद्ध पवित्र ।
मन जिव्हा श्रोत्र नेत्र । असती परमेश्वराकडे ।। १४ ।।
बाबुराम घोषाची भगिनी । बलरामाची असे पत्नी ।
नाम तियेचे कृष्णभाविनी । भक्त असे ती ठाकुरांची ।। १५ ।।
तिजविषयी ठाकुर सांगत । पूर्वी कृष्णावतारात ।
कृष्णभाविनी गोकुळात । होती सखी श्रीराधेची ।। १६ ।।
बलराम थोर कुलोत्पन्न । धनवान गुणी सुखसंपन्न ।
खर्च करितसे उत्पन्न । देवसेवेत सत्कार्यी ।। १७ ।।
नसे मनात अभिमान । सेवा करी नम्रता धरुन ।
करित असे भजन पूजन । परंपरेने तो वैष्णव ।। १८ ।।



ईश्वरचंद्र विद्यासागर । पंडित समाजसेवक थोर ।
तयांच्या घरी गेले ठाकुर । एकदा भक्तांसमवेत ।। १९ ।।
ईश्वराविषयी गोष्टी सांगत । फार वेळ बसले भगवंत ।
अमृतासारखी उपदेशात । गोडी वाटत सकलांना ।। १२० ।।
बलरामाला झाला उशिर । त्याने मनात केला विचार ।
बोधामृतास अडथळा फार । येईल आत प्रवेशता ।। २१ ।।
मग बागेच्या फाटकाजवळ । बलराम थांबला पुष्कळ वेळ ।
मग झाल्यावर रात्र पुष्कळ । परत निघाले रामकृष्ण ।। २२ ।।
अंधार पडला होता फार । स्वत: पंडित विद्यासागर ।
कंदिल घेउनि चाले समोर । दाखवी मार्ग ठाकुरांना ।। २३ ।।
फाटकापाशी येता ठाकुर । मस्तक ठेवुनी चरणांवर ।
बलराम उभा राहिला समोर । हात जोडुनी त्यांच्यापुढे ।। २४ ।।
रामकृष्ण पुसती तयाला । इतुक्या रात्री येथे आला ।
तो म्हणे पुष्कळ वेळ झाला । तथापि थांबलो येथेच ।। २५ ।।
पुसता का न आलासि आत । म्हणे आलो असतो तेथ ।
तर आपुल्या बोधामृतात । आला असता अडथळा ।। २६ ।।
बलरामाच्या घराप्रती । रामकृष्ण नित्य जाती ।
भक्तमंडळी तेथे जमती । आनंद करिती कीर्तनाचा ।। २७ ।।
भोजनास बसता सर्वजण । बलरामबाबू उभा राहुन ।
सेवा करितसे सेवकासमान । कोण म्हणेल मालक हा ।। २८ ।।
रामकृष्णांची कृपा होउन । सामान्य वैधी भक्तीपासुन ।
प्रेमभक्तीचे उघडे दालन । इतुकी प्रगती होई तयाची ।। २९ ।।
दयाळू तयाचे अंत:करण । मच्छर चावती करिता ध्यान ।
मन झाले दोलायमान । मारावे वा न मारावे ते ।। १३० ।।



ते न मारता करणे ध्यान । त्याला अशक्य गेले होउन ।
दक्षिणेश्वरी आला निघुन । ठाकुरांना पुसावया ।। ३१ ।।
ठाकुरांचे होता दर्शन । आश्चर्यचकित झाले मन ।
न विचारता एकही प्रश्न । उत्तर मिळाले तयाप्रती ।। ३२ ।।
त्याच वेळी रामकृष्ण । खाटेतिल ढेकुण काढुन ।
मारुन टाकिती हे पाहुन । सीमा न राहे आश्चर्या ।। ३३ ।।
ठाकुर बलरामाला पाहुन । म्हणती त्रास देती ढेकुण ।
अस्वस्थ करुनी टाकिती मन । म्हणुनी मारुनी टाकतसे ।। ३४।।
बलराम नित्य तेथे येई । परंतु ठाकुरांना कधिही ।
ढेकुण मारिता पाहिले नाही । यास्तव वाटले आश्चर्य ।। ३५ ।।
तथापि त्याला कळुनी आले । रामकृष्णांनी कृत्य केले ।
बोलावाचुनी उपदेशिले । त्यांनी जाणिले माझे मन ।। ३६ ।।
दिसावयाला कृती सान । त्यात अर्थ भरला महान ।
अलौकिक असे अध्यापन । कधि न देखिले ऐसे असे ।। ३७।।
कलकत्त्यास त्याचे घर । तेथे नित्य जाती ठाकुर ।
भक्त आनंद करिती फार । भरे बाजार भजनाचा ।। ३८ ।।
रामकृष्णांचे लागता चरण । झाले बलरामाचे सदन ।
पवित्र तीर्थक्षेत्राचे स्थान । ठिकाण भक्तजन जमण्याचे ।। ३९।।
तेथे होतसे संकीर्तन । नामस्मरण नृत्य गायन ।
काय प्रेमाची पेठ मांडुन । ठेविली सांप्रत भगवंते ।। १४० ।।
रामकृष्णांचे अंतरंग भक्त । नरेन्द्र राखाल भवनाथ ।
वृद्ध तरुण येती समस्त । लुटती असीम आनंद ।। ४१ ।।
काय पुनरपी गोपालकृष्ण । गोकुळ करुनी बलरामसदन ।
गोपगोपींना जमवून । नृत्य गायन करीत असे ।। ४२ ।।



अथवा चैतन्यदेव येउन । वैष्णवजनांना जमवून ।
करितसे नगरसंकीर्तन । पेठ उघडुनी प्रेमाची ।। ४३ ।।
कलकत्त्याहुनी दक्षिणेश्वर । भक्तांस यावया असे दूर ।
यास्तव स्वत:च येती ठाकुर । बलरामाच्या सदनाला ।। ४४ ।।
एकदा बलरामाच्या घरास । ठाकुर सांगती नरेन्द्रास ।
काही गाणी गावयास । त्यावर नरेन्द्र बोलला ।। ४५ ।।
येथे नाही वाद्य एक । मग कैसे गाणार गायक ।
ठाकुर हासुनी म्हणती देख । असेल करावे तयामधे ।। ४६ ।।
जैसे तुजला गाता येई । तैसे वाद्यावाचुनी गाई ।
बलरामाची व्यवस्था ही । काय मग तिला पाहायचे ।। ४७ ।।
बलराम वदला जर आपण । गेलो बोटीमधे बसुन ।
अथवा गेलो खटाऱ्यातुन । तरिही स्थान ते पावतो ।। ४८ ।।
विनोदाने म्हणती ठाकुर । बलराम आपणा दिवसभर ।
घेईल नाचवुन पुरेपुर । नंतर भोजन देइल हा ।। ४९ ।।
शब्द ऐकुनी विनोदपूर्ण । हासू लागले सर्वजण ।
करिती मौज सगळे मिळुन । आनंदास भरती येत असे ।। १५० ।।
बलरामाचे सर्व उत्पन्न । सेवाकार्यात जाई खर्चुन ।
शक्य ती काटकसर करुन । आपण काळ कंठीतसे ।। ५१ ।।
बलराम वदे देह सामान्य । पंचत्वात होणार विलिन ।
यास्तव आपुले तन मन धन । सेवाकार्यास अर्पावे ।। ५२ ।।
धन्य झाला बलराम बोस । रसद्दार होउनी ठाकुरांस ।
पात्र झाला भगवत्प्रेमास । करुनी सेवा सज्जनांची ।। ५३ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५४ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा छत्तिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय सदतिसावा

रामकृष्णा प्रभुवरा । मजवरती कृपा करा ।
भवसागरी मजला तारा। करुणाकरा नमोऽस्तु ते ।। १ ।।
माणुस श्रीमंत प्रतिष्ठित फार । याची काही न करिता फिकिर ।
असो कटू अथवा मधुर । ठाकुर वदती सत्य सदा ।। २ ।।
राजा जतीन्द्रमोहन ठाकुर । एकदा भेटीस आल्यावर ।
चर्चेत सांगती श्रीठाकुर । महत्त्व त्यागवैराग्याचे ।। ३ ।।
म्हणती करा नामोच्चारण । कितिही तुम्ही रात्रंदिन ।
बाह्य विषयात गुंतता मन । लाभ तयातुन होत नसे ।। ४ ।।
जतीन्द्र म्हणे ठाकुरांला । कसे शक्य हे गृहस्थाला ।
धर्मराज थोर राजा झाला । एकदा वदला असत्य तो ।। ५ ।।
रामकृष्ण त्याला म्हणती । धर्मराज दयेची मूर्ती।
आजन्म करी सत्य उक्ती । असत्योक्तीच स्मरे तुला ।। ६ ।।
नाठवे उदार अंत:करण । शास्त्रानुसार त्याचे वर्तन ।
एकदा घडले त्याचे स्मरण । करिसी धिक्कार असो तुला ।।७।।
क्रिस्तोदास पाल नामक । वृत्तपत्राचा संपादक ।
जनतेत जयाचा लौकिक । राजदरबारी मान असे ।। ८ ।।
रामकृष्णांच्या दर्शनाला । तो आला दक्षिणेश्वराला ।
मग त्यागाचा विषय निघाला । त्यावर बोले पालबाबू ।। ९ ।।
त्याग आणि विरक्ती गाउन । देशाचे झाले अध:पतन ।
भारतीय गेले दास बनुन । सत्ता आली परक्यांची ।। १० ।।



आता काहीतरी करुन । अज्ञ जनांना शिकवून ।
भौतिक उन्नती देणे करुन । कर्तव्य सांप्रत हेच असे ।। ११ ।।
नातर धर्म धर्म करुन । त्याग विवेक प्रतिपादुन ।
अधिक होइल नुकसान । दुर्बळ होतिल जन सारे ।। १२ ।।
ज्यापरी मी केले कथन । तैसा तुम्ही बोध करुन ।
केले पाहिजे उत्थान । अधःपतित देशाचे ।। १३ ।।
रामकृष्ण तयाला म्हणती । तू दिसतोसी मंदमती ।
ज्याची महिमा शास्त्रे गाती । श्रेष्ठ सद्गुण जो आहे ।। १४ ।।
त्या त्यागास वदसी सान । दोन इंग्रजी पाने वाचुन ।
तुज वाटते जाहले ज्ञान । या संपूर्ण जगताचे ।। १५ ।।
कीटकापेक्षा असे लहान । महान विश्वात तुझे स्थान ।
कसा धजसी कराया भाषण । जगास साह्य करण्याचे ।। १६ ।।
समर्थ एक असे ईश्वर । जगाचे कल्याण करणार ।
मानवप्राणी किती क्षुद्र । करावया हित जगताचे ।। १७ ।।
दवाखाने दोन चार । काही विहिरी खोदणार ।
किंवा रस्ते बांधणार । मानणार हित ते जगताचे ।। १८ ।।
असली कर्मे करणे छान । परंतु जग केवढे महान ।
समुद्रात जणु पडावा कण । अभाव मिटेना जगताचा ।। १९ ।।
एक ईश्वर असे महान । तोच जगाचे करी पालन ।
प्रथम घेतले पाहिजे जाणुन । मानवाने ईश्वराला ।। २० ।।
मग तो देतो अधिकार । शक्तिसंपन्न होतो नर ।
तेव्हा त्याने करावा विचार । भले कराया दुसऱ्याचे ।। २१ ।।
अहंकार गळुनी जाता । करुणामयी जगन्माता ।
कार्य कराया जगाकरिता । आदेश देई मानवाला ।। २२ ।।



रामकृष्णांना कळे यथार्थ । कोणात असे किती परमार्थ ।
कोणात भरला असे स्वार्थ । जेवी काचेत पदार्थ दिसे ।। २३ ।।

महिमाचरण चक्रवर्ती । त्याच्या मनात इच्छा होती ।
दिसावी आपुली धार्मिक वृत्ती । कीर्तीची चित्ती हाव असे ।। २४ ।।

स्वधार्मिकता दाखवावया । करितसे अनेक कारवाया ।
भगवे घालुनि सजवी काया । रुद्राक्ष माळा गळ्यामधे ।। २५ ।।

बसावयाला मृगाजिन । एकतारी हाती घेउन ।
पंचवटीत लावी आसन । भाव दाखवी भक्ताचा ।। २६ ।।

घरास जाता व्याघ्राजिन । ठाकुराच्या खोलीस ठेवुन ।
महिमाचरण करी गमन । रामकृष्ण सांगती सहास्य ।। २७ ।।

मृगचर्म ठेवितो महिमाचरण । तयाचे काय असे कारण ।
कोणाचे ते पुसतील जन । आदर वाटेल तयांप्रती ।। २८ ।।

शास्त्रातील तयाप्रत । उतारे असती मुखोद्गत ।
तो ते म्हणत असे सतत । म्हणुनि आवडे ठाकुरांना ।। २९ ।।

उणिवा तयाच्या जाणती । उत्तेजन तरिही देती ।
कोणात थोडिही दिसता शक्ती । ती वाढविती रामकृष्ण ।। ३० ।।

वेदान्तचर्चा करि तो सतत । त्याचे मर्म कळावे यथार्थ ।
यास्तव त्याला बोध करित । रामकृष्ण दयाघन ।। ३१ ।।

म्हणती कोरडी चर्चा करुन । काय उपयोग शास्त्र वाचुन ।
मनुष्याने साधना करुन । प्रथम जाणावे ईश्वराला ।। ३२ ।।

श्रद्धा असावी श्रीगुरुवर । जर तुज गुरू नसे तर ।
ईश्वराची प्रार्थना कर । सांगेल मग तो कैसा असे ।। ३३ ।।

नुसती पुस्तकेच वाचुन । मिळू शकणार नाही ज्ञान ।
हाटाचा गोंगाट दुरुन । ऐकू येतो आपणाला ।। ३४ ।।



प्रवेश करिता बाजारात । वस्तू स्पष्ट दिसतात ।
शब्द ऐकू येती समस्त । व्यवहार करिता येत असे ।। ३५ ।।
तेवी ईश्वरदर्शनानंतर । ग्रंथाचीही नसे जरुर ।
वेद शास्त्रे पुराणे समग्र । अनावश्यक मग होती ।। ३६ ।।
एकदा केशवचंद्र सेन । आला दक्षिणेश्वरालागुन ।
जमिनीस डोके टेकवून । रामकृष्णांना नमन करी ।। ३७ ।।
रामकृष्णांनीही तयाला । परत तैसाच प्रणिपात केला ।
प्राप्त झाली ठाकुरांला । अर्धबाह्यदशा त्याच क्षणी ।। ३८ ।।
म्हणती जगज्जननीसी । आणितेस कलकत्तावासी ।
एवढी गर्दी का जमविसी । जणू मी देणार व्याख्यान ।। ३९ ।।
व्याख्यान नाही मी देणार । तुजला द्यायचे असेल जर ।
देइ तू तुज आवडे तर । नाही हे होणार माझ्याने ।। ४० ।।
तशा त्या दिव्य स्थितीत । वदनमंडळी झळके स्मित ।
म्हणती जगन्मातेप्रत । मी तर तुझे लेकरू ।। ४१ ।।
जगेन खेळेन फिरेन । खाईन पिईन झोपेन ।
यापरी क्षुल्लक गोष्टी करिन । व्याख्यान देऊ न शके मी ।। ४२ ।।
दिव्यभावोपशमानंतर । सामान्य स्थिती आल्यावर ।
केशवसेनास म्हणती उदार । तुजकडे आलो असताना ।। ४३ ।।
वदलास प्रार्थनामंदिरात । उडी घालुनी भक्तिसरितेत ।
सच्चिदानंद सागराप्रत । आपण सरळ प्राप्त होऊ ।। ४४ ।।
तव मी पाहिले सज्जात । केशवपत्नीसमवेत ।
अनेक ललना दिसल्या तेथ । वदलो होइल काय यांचे ।। ४५ ।।
केशव तुम्ही लोक गृहस्थ । केवी सच्चिदानंदाप्रत ।
पावाल असे अकस्मात । म्हणुनी गंमत वाटली ।। ४६ ।।



मुंगुसापरी तुमची गत । पाषाण बांधिला शेपटीप्रत ।
ते भिंतीच्या कोनाड्यात । काही घडता दडत असे ।। ४७ ।।
परि ते राहू न शके तेथ । पाषाण खाली ओढे त्वरित
उतरणे भाग भूमीप्रत। तैसी गत तुमची असे ।। ४८ ।।
आचराल तुम्ही थोडे ध्यान। परि स्त्रीपुत्रांचे वजन ।
आणिते तुम्हा खाली ओढुन। यात काही शंका नसे ।। ४९ ।।
तुम्ही भक्तीत करा स्नान । परंतु खाली येईल मन।
पुनरपि करावा लागे प्रयत्न। न लाभे सच्चित् अकस्मात ।। ५० ।।
जोवर असते मायाजाळ। तोवर माणुस कच्चे नारळ।
खोबऱ्यासह कवटी येइल । जाइना देहअहंभाव ।। ५१ ।।
परंतु नारळ पक्का होउन । खोबरे निघे कवटीपासुन।
देह अहंभाव जाता गळुन । आत्मा वेगळा दिसत असे ।। ५२ ।।
अहंकार बंधास कारण। सर्व अडचणी निघती तेथुन।
तो नष्ट करणे कठिण । मीपण जाता जात नसे ।। ५३ ।।
ज्यात ठेविला होता लसुण। काढता ते भांडे धुउन ।
वास जात नाही निघुन । त्यापरी असे अहंकार ।। ५४ ।।
इंग्रजी शिकलेले काही नर । म्हणतात नाही परमेश्वर।
परंतु जिना चढता सत्वर। एक बाबू कोसळला ।। ५५ ।।
आरडाओरड झाली फार। त्वरित बोलविला डॉक्टर।
डॉक्टर येण्याच्या अगोदर। ग्रंथ संपला बाबूचा ।। ५६ ।।
आणि हे असले बाबूलोक । म्हणती नाही जगन्नायक।
सांगत सुटती अविवेक। एकमेकांस भेटताची ।। ५७ ।।
कोणी माणुस असे सज्जन । ऐसी केवळ कीर्ती ऐकुन ।
तयाची उन्नती व्हावी म्हणुन । रामकृष्ण जाती तयाकडे ।। ५८ ।।



ईश्वरचंद्र विद्यासागर। एक विद्वान पुरुष थोर।
अपार दया गरिबांवर। शिक्षणप्रसार केला तये ।। ५९ ।।
तयाचे सद्गुण ऐकुन। करावा तयाचे कल्याण।
महेन्द्रासवे गाडीत बसुन। ठाकुर गेले त्याच्याकडे ।। ६० ।।
ठाकुर म्हणती आजवर । नद्या नाले पाहिले फार।
आज दृष्टीस पडे सागर । विद्यासागर मग बोले ।। ६१ ।।
तर मग त्या सागरातुन । खारट पाणी जावे घेउन।
त्यावर म्हणती रामकृष्ण । खारट पाणी नसे इथे ।। ६२ ।।
अविद्येचा नसे सागर। विद्यासागर नाम थोर।
तुम्ही आहात क्षीरसमुद्र। लवलेश नसे अविद्येचा ।। ६३ ।।
विद्यासागर म्हणे काही। तुम्ही म्हणा हरकत नाही ।
ऐसे बोलुनी उगाच राही। त्यावर म्हणती रामकृष्ण ।। ६४ ।।
तुम्ही न केवळ विद्वान। दयार्द्र तुमचे अंत:करण ।
हा सत्त्वजन्य रजोगुण । सात्त्विक कर्म तुमचे असे ।। ६५ ।।
दयेने प्रेरित होऊन । जे कर्म येतसे घडुन।
तयात दोष नसतो कण। वाइट त्यात काही नसे ।। ६६ ।।
हृदयात दया बाळगून । शुकदेवादी ज्ञानी महान ।
ईश्वरज्ञान द्यावे म्हणुन । लोकशिक्षेस्तव कर्म करिती ।। ६७ ।।
तुम्ही करिता विद्यादान। अन्नदान कर्मे छान।
निष्काम कर्मे करुनि भगवान। लाभतो यात शंका नसे ।। ६८ ।।
कर्म करिती कीर्तीसाठी । अथवा पुण्यसंचयापोटी ।
त्यांची असे वेगळी गोठी । निष्काम कर्म ते नव्हे ।। ६९ ।।
त्यातुनी तुम्ही सिद्ध असा । विद्यासागर पुसे कसा ।
ठाकुर म्हणती परियेसा । अग्नीत बटाटा सिद्ध होतो ।। ७०।।



आणि वांगी सिद्ध होती । तव ती अधिकच मऊ पडती ।
तशीच आहे तुमची गती। दयेने मऊ असा तुम्ही ।। ७१ ।।
विद्यासागर म्हणे किती । उडिद शिजता टणक होती ।
ठाकुर म्हणती तुम्हाप्रती । उदाहरण ते लागू नसे ।। ७२ ।।
जे असती निव्वळ पंडित। दया प्रेम नसे जेथ।
ते दाठरलेली फळे होत। ना कच्ची ना पिकलेली ।। ७३ ।।
गिधाडे उंच उडतात । सडली प्रेते धुंडाळतात।
तेवि अविद्यामय भवाप्रत। पंडित बसतात चिटकून ।। ७४ ।।
दया वैराग्य भक्ती प्रीती। विद्यामायेमधे असती ।
विद्या अविद्या माया निश्चिती। असती दुनियेत ईश्वराच्या ।। ७५ ।।
असती वाइट आणि भले । सदसद् जिवासाठी सगळे ।
तथापि ब्रह्म आहे वेगळे । काही स्पर्शू न शकते तया ।। ७६ ।।
जसे दीपकाच्या समोर। भागवत वाचे कोणी नर।
कोणी बनावट कागदपत्र । तयार करतात शंका नसे ।। ७७ ।।
परंतु दिवा अलिप्त पाही । कशाचाही परिणाम नाही ।
सुष्टास दुष्टास उजेड देई । निर्लिप्त सूर्यनारायण ।। ७८ ।।
म्हणाल दु:ख पाप अशान्ती । यांची कशी उपपत्ती ।
हे सर्व लागू जिवाप्रती। ब्रह्म निर्लिप्त त्यापासुनी ।। ७९ ।।
सर्पमुखात असते विष । तो चावताच दुसऱ्यास ।
तत्काळ मरण पावे माणुस । सर्पास होइना विषबाधा ।। ८० ।।
ब्रह्म म्हणजे असे काय । सांगण्याची नसे सोय ।
इतर सर्व उष्टे होय । अनुच्छिष्ट एक ब्रह्म असे ।। ८१ ।।
वेदपुराणे सर्व दर्शने । उच्चारिली गेली मुखाने ।
मुखातुनी आली याकारणे । उष्टी झाली सर्व शास्त्रे ।। ८२ ।।



परंतु ब्रह्माचे मात्र वर्णन । होउ शकेना मुखाकडुन ।
यास्तव एकटे ब्रह्म जाण । कोणी उष्टे न करू शके ।। ८३ ।।
विद्यासागर म्हणे छान । ब्रह्म उष्टे नसे म्हणुन ।
आज ऐकले सुंदर वर्णन । नवीनच गोष्ट मी शिकलो ।। ८४ ।।
रामकृष्ण सांगू लागले । एकास होती दोन मुले ।
आचार्याकडे पाठविले । विद्याभ्यासास तयांना ।। ८५ ।।
विद्याभ्यास संपवून । मुले ती आली परतुन ।
वडिल मुलास केला प्रश्न । पित्याने परीक्षा पाहावया ।। ८६ ।।
थोरल्यास म्हणाला बाप । सांग ब्रह्माचे स्वरूप ।
त्याने वर्णन केले खूप। श्लोक म्हटले पटापटा ।। ८७ ।।
धाकट्याला बोलावुन। पित्याने केला तोच प्रश्न ।
तयाने केले खाली वदन। मौन धरुनी बसला तो ।। ८८ ।।
त्यावर पिता झाला प्रसन्न । म्हणे तुलाच आले कळुन ।
कधिही होउ शकेना वर्णन। ब्रह्म वस्तू काय असे ।। ८९ ।।
ईश्वराला जाणणे पूर्ण । हे खचितच आहे कठिण ।
खुशीत गाजरे खाती जन । म्हणती जाणिले ईश्वराला ।। ९० ।।
साखरेच्या पहाडातुन । मुंगी एकच कण खाउन।
तोंडात धरुनी दुसरा कण । विचार करिते मनामधे ।। ९१ ।।
आता पुनरपि येथे येउन। सर्व पहाड घेउनी जाइन ।
क्षुद्र जीव या समान । विचार करितात ईश्वराचा ।। ९२ ।।
शास्त्रात कशा तऱ्हेने वर्णन । तेही टाकितो सांगून ।
एक आला समुद्र पाहुन । सांगु लागला दुसऱ्याला ।। ९३ ।।
केवढा मोठा असे सागर । केवढा कल्लोळ लाटा थोर।
यासारखे करितात शास्त्र । वर्णन ब्रह्मस्वरूपाचे ।। ९४ ।।



समाधिलाभ येतो घडुन । तेव्हा होतसे ब्रह्मज्ञान ।
माणुस चूप जातो होउन। सांगता येइना ब्रह्म कसे ।। ९५ ।।
मिठाची एक बाहुली केली । समुद्राची मोजण्या खोली ।
पाण्यात पडता विरघळली । कोण खोली सांगणार ।। ९६ ।।
मग एकाने केला प्रश्न । ज्याला जाहले ब्रह्मज्ञान ।
काय तो करित नाही भाषण । त्यावर ठाकुर सांगती ।। ९७ ।।
आद्य शंकराचार्यांनी । लोकांस ज्ञान द्यावे म्हणुनी ।
ठेविला होता राखुनी। विद्येचा अहं थोडासा ।। ९८ ।।
कच्चे असते तोवर घृत। कडकड आवाज करी सतत।
कढुनि जेथवा पक्व होत। तेथवा कडकड थांबतसे ।। ९९ ।।
त्यात पुरी पडता फिरुनी। कडकड ऐसा येतो ध्वनी ।
जेव्हा पूर्ण होते तळुनी। तेव्हा थांबतो आवाज ।। १०० ।।
समाधिसिद्ध पुरुष महान । जिवास बोध करावा म्हणुन ।
जगाचे कराया कल्याण । भाषण करितात जाणावे ।। १ ।।
मधमाशी करिते गुणगुण । परंतु फुलावरती बसुन ।
जेथवा करिते मधुपान । तेथवा गुणगुण थांबतसे ।। २ ।।
कळशी बुडविता पाण्यात । डुबडुब आवाज असे होत ।
भरली म्हणजे कळशी समस्त । आवाज बंद होत असे ।। ३।।
परंतु पुन्हा कळशीतुन । दुसरीत ओतताना जीवन ।
तसाच आवाज होतो फिरुन । तैसे भाषण ज्ञान्याचे ।। ४ ।।
भोगवासना राहिल्यास । ब्रह्मज्ञान होइना त्यास ।
देहबुद्धी असल्यास । मी ब्रह्म म्हणणे बरे नव्हे ।। ५ ।।
विषयत्याग न घडे पूर्ण । अहंकार जाइना मनातुन ।
तयाने धरावा अभिमान । ईश्वराचा मी दास ।। ६ ।।



ज्ञानी करुनी नेति नेति। विषयबुद्धी नष्ट करिती ।
तेव्हा कोठे समर्थ होती। ब्रह्मज्ञान मिळवावया ।। ७ ।।
जेवि एकेक पायरी चढुन । गच्चीवरती करिती गमन।
तेवि त्यागास अनुसरुन । ब्रह्मज्ञान प्राप्त करिती ।। ८ ।।
परि जो असतो विज्ञानी । त्यास प्रत्यक्ष येते दिसुनी ।
गच्ची झाली ज्या जिनसांनी । त्यांनीच जिना झाला असे ।।९।।
नेति नेति करित करित । ब्रह्म जे जाहले अवगत ।
तेचि जाहले जीवजगत । सगुण निर्गुण तेचि असे ।। ११०।।
ज्ञानयोगही असे खरा । भक्तियोगही आहे बरा ।
कोणताही मार्ग आचरा । मिळतो आसरा तच्चरणी ।। ११ ।।
पाहा जग हे किती विचित्र। केले चंद्र सूर्य नक्षत्र।
बरे वाइट पवित्रापवित्र । शक्ति कमी जास्त कोठे ।। १२ ।।
त्यावर पुसे विद्यासागर । काय कमि जास्त शक्ति दे ईश्वर ।
तयांना सांगती श्रीठाकुर । सर्वांभूती ईश असे ।। १३ ।।
असुनही तो किडामुंगित। तरतमता शक्तिप्रकाशात ।
एखादा शूर धैर्यवंत । दहाजणांना पुरुन उरे ।। १४ ।।
दुसरा कोणी शेळपट । एकाचीच पडता गाठ ।
पायामधे घालुनी शेपुट । दिसे वाट तिकडे पळे ।। १५ ।।
काय म्हणुनी जन समस्त । तुम्हाप्रती मानितात ।
तुम्हाला काय फुटलीत । शिंगे तुमच्या डोक्यावरी ।। १६ ।।
इतरांपेक्षा आहे जास्त । दया तुमच्या हृदयात ।
त्यामुळे लोक मानतात । विद्यासागर तव हासे ।। १७ ।।
पुढे बोलती रामकृष्ण । ईश्वरलाभाचे उपाय म्हणुन ।
कराया त्याचे आकलन । ग्रंथ वाचन करायचे ।। १८ ।।



दहादा गीता म्हटल्यावर । तागी तागी होय उच्चार ।
गीतेचे हे असे सार । त्याग करा ईश्वरासाठी ।। १९ ।।
असो साधु वा संसारी जन । आसक्ति काढुनी मनातुन ।
मानवे केला पाहिजे यत्न । घ्यावया दर्शन ईश्वराचे ।। १२० ।।
मीपण जाता जात नाही । याकारणे विज्ञानी पुरुषही ।
भक्तिचा आश्रय करुनि राही । म्हणे दास मी ईश्वरचा ।। २१ ।।
समाधी अवस्थेत पूर्ण । जरी मीपण होते विलिन ।
समाधी उतरता तत्क्षण । पुनरपि हजर होत असे ।। २२ ।।
साधारणांचा अहंकार । नाहिसा नाही होणार ।
पिंपळवृक्ष तोडिता अंकुर । पुनरपि फुटतो बुंध्याला ।। २३ ।।
ज्ञानलाभाच्याही नंतर । न कळे कैसा ये अहंकार ।
जरी स्वप्नात पाहिला व्याघ्र । जागृतीत छाती धडधडते ।। २४ ।।
अहंकार लावितो जिवास । दु:खकष्ट सोसावयास।
वासरू येउनी जन्मास। हम्मा हम्मा करू लागे ।। २५ ।।
म्हणुनी कष्टास नाही अंत। नांगराला जुंपतात ।
अंगावर ऊन पाउस घेत । काम करावे लागतसे ।। २६ ।।
हाल अपेष्टा होती बहुत । कसाई कत्तल करितात ।
चामड्यापासुनी बनवितात । तासे नगारे ढोल जोडे ।। २७ ।।
तासे नगारे बडवितात । तरिही हालास नाही अंत ।
आतड्यापासुनी काढितात । तात लाविती धनुकलीला ।। २८ ।।
मग ते हम्मा करित नाही । तुंहू तुंहू नाद देई ।
तेव्हाच कोठे सुटका होई। अहंकारात दु:ख असे ।। २९ ।।
म्हणावे ईश्वरा तू मालक । मी तर तुझा असे सेवक ।
असा भाव असावा एक । कर्ता करविता परमेश्वर ।। १३० ।।



मी माझे हे अज्ञान । तू तुजे हे असे ज्ञान ।
कुटुंब परिवार सत्ता धन । सर्व वस्तू ईश्वराच्या ।। ३१ ।।
जगात प्राणी जन्म घेई । मृत्यूनंतर न राहे काही ।
येथे कर्म करण्या येई । परतुनि जाई स्वस्थाना ।। ३२ ।।
खेड्यात असे ज्याचा वास । काही काम करावयास ।
जसा येतसे शहरास । काम संपता परततसे ।। ३३ ।।
रखवालदार जातो बोलुनी। आमुची बाग ही पुष्करिणी ।
त्यास काढुनी टाकता धनी। बागेत शिरणे शक्य नसे ।। ३४ ।।
दोन प्रसंगी भगवंताला । खचित येते हासावयाला ।
वैद्य सांगतो जड आईला । बाळास बरे करितो मी ।। ३५ ।।
ईश्वर म्हणे मी तारणारा । आणि सकळांस मारणारा ।
वैद्यबुवा तोडतो तारा । कर्ता समजुनी स्वतःला ।। ३६ ।।
आणि जेधवा बंधू दोन । जमीन घेतात विभागून ।
म्हणे तो तुझा हिस्सा जाण । इकडचा हिस्सा माझा असे ।। ३७ ।।
तेधवा हासती भगवान । ईश्वराचे ब्रह्मांड असुन ।
उगीच म्हणतात अज्ञान । माझी तुझी भूमी असे ।। ३८ ।।
तर्क चालवुनी ईश्वराप्रत। कोणी नाही जाणू शकत ।
श्रद्धाभक्तिने होतो प्राप्त । श्रीभगवंत मनुजाला ।। ३९ ।।
रामनामी श्रद्धा ठेवुन। समुद्र उल्लंघे हनुमान।
श्रीराम स्वये भगवान। सेतू बांधणे पडे तया ।। १४० ।।
श्रद्धामय असता हृदय । पातकाचे नाही भय ।
सहज ईश्वरलाभ होय । भगवान भक्तिचा विषय असे ।। ४१ ।।
मग बाबांनी केले गायन । गाताचि झाले समाधिमग्न ।
अर्धोन्मीलित झाले नयन । आश्चर्यमग्न जन बघती ।। ४२ ।।



भानावर मग येता म्हणती । एकच ब्रह्म आणि शक्ती ।
वेदात ज्याला ब्रह्म म्हणती । त्यालाच म्हणती महाकाली ।। ४३ ।।
निष्क्रिय ऐसा बोध होतो । तेव्हा ब्रह्म तयाला म्हणतो ।
जेव्हा सृष्टि स्थिति लय होतो । आद्याशक्ती म्हणतो तदा ।। ४४ ।।
ब्रह्म शक्ती असती अभिन्न। जेवी दाहिकाशक्ती कृशान ।
एकास मानता होते ज्ञान । आपोआप दुसऱ्याचे ।। ४५ ।।
अति प्रेमाची वस्तू म्हणुन । ईश्वराला संबोधुन ।
आई म्हणतात भक्तजन। परमप्रेम जननीचे ।। ४६ ।।
अनुराग होइना उत्पन्न । तोवर पूजा होम हवन।
प्रेममय होता अंत:करण । कर्मकांडाची गरज नसे ।। ४७ ।।
जोवर वारा नाही वाहत। पंखा लागतो तोपर्यंत ।
एकदा सुटता दक्षिणवात। पंख्याची मग जरुर नसे ।। ४८ ।।
तुम्ही जे जे करिता कर्म । ते सर्व आहे सत्कर्म ।
परि ते असावे निष्काम । मी कर्ता हा भाव नको ।। ४९ ।।
निष्काम कर्म आचरिता। भक्तिप्रेम उपजते चित्ता ।
प्राप्त करु शके भगवंता। साधक निष्काम कर्माने ।। १५० ।।
गर्भार होता सूनबाई । सासू काम कमी देई ।
नवमास भरता एकही । करू देइना काम तिला ।। ५१ ।।
तेवि ईश्वरप्रेम वाढत । तो तो कर्म जाते घटत।
कृपा करितो भगवंत । देतो दर्शन भक्ताला ।। ५२ ।।
निष्काम भावे कर्म करित। चित्तशुद्धी होते त्वरित ।
उपजते शुद्ध चित्तात। प्रेम परमेश्वराचे ।। ५३ ।।
जगतावरती उपकार । काय करू शकेल नर।
कर्ता करविता ईश्वर । चंद्रसूर्य त्याने घडविले ।। ५४ ।।



आइबापांच्या हृदयात । वात्सल्य उत्पन्न केले बहुत ।
उदारचरितपुरुषात । संचार केला दयेचा ।। ५५ ।।
जगाचे कराया कल्याण । समर्थ एक नारायण ।
कामनाशून्य कर्म करुन । हित साधितो नर स्वतःचे ।। ५६ ।।
आत हिरण्यनिधी छपला । त्याचा पत्ता नसे तुम्हाला ।
वरती मातीचा थर बसला । दूर केला पाहिजे तो ।। ५७ ।।
पाहता येतसे ईश्वरासी। भाषण करिता येते त्यासी ।
आता बोलतो तुमच्यासी । त्यापरी त्यासी बोलता ये ।। ५८ ।।
हे सहज वदलो गंमत। तुम्हास सर्व आहे माहित।
जाणिव झाली नाही फक्त । तेवढी करुनी देत असे ।। ५९ ।।
वरुणराजाच्या भांडारात। कितीतरी रत्ने आहेत।
परि वरुणाला नसे माहित । कोठे काय पडले असे ।। १६० ।।
विद्यासागर म्हणे हासुन । बोलणारास अडविल कोण ।
त्यावर म्हणती रामकृष्ण । अनेक श्रीमंत असतात ।। ६१ ।।
त्यांना पुरते नसते ठाउक। कोण कोठे असती सेवक ।
मूल्यवान वस्तू अनेक। असुनी गावी नसे त्यांच्या ।। ६२ ।।
तशी तुमची आहे गत । ऐकुनी हासती समस्त ।
सर्व झाले आनंदित। भाषण ऐकुनि बाबांचे ।। ६३ ।।
सहास्य म्हणती रामकृष्ण । रासमणीच्या बगिचालागुन ।
एकदा पायधूळ झाडा आपण। रम्य स्थान ते आहे ।। ६४ ।।
विद्यासागर वदे आपण । येथे आलात स्वतः होउन ।
परत भेटी मी देइन । रामकृष्ण म्हणती छी छी ।। ६५ ।।
माझ्या भेटीसाठी कशाला । पंडित वदला आम्हाला।
कळू द्या ऐसे का बोलला । ठाकुर सांगती विनोदाने ।। ६६ ।।



आम्ही भोयांचे डोंगे लहान। तुम्ही असा जहाज महान।
आम्हास नदीनाल्यातुन। जाता येतसे स्वच्छंदे ।। ६७ ।।
तुम्ही जहाज पडलात । रेतीत फसाल कदाचित ।
ऐकुनि हासू लागले समस्त । विद्यासागर स्मित करी ।। ६८ ।।
पुनरपि ठाकुर सांगत। तथापि आता या दिवसांत ।
जहाज येऊ शकेल तेथ । विद्यासागर मग बोले ।। ६९ ।।
पावसाळ्याचा मोसम म्हणुन । जहाजाचेही आगमन ।
शक्य आहे हे ऐकुन। महेन्द्रनाथ मनी म्हणे ।। १७० ।।
नवानुरागाच्या वर्षावात। मानापमान नाही टिकत ।
ठाकुर मंडळी समवेत। निरोप घेउनी निघाले ।। ७१ ।।
कंदिल घेउनी रस्ता दावित। विद्यासागर पुढे चालत।
बागेत येताच एक गृहस्थ । साष्टांग नमी ठाकुरांना ।। ७२ ।।
उठुनि उभा राहिल्यावर। तयाला ओळखुनी ठाकुर ।
म्हणती बलराम येथवर। एवढ्या रात्री आले कसे ।। ७३ ।।
बलराम वदला मी येउन । बराच वेळ गेला होउन ।
भाषणात न यावे विघ्न । म्हणुनि येथेचि थांबलो ।। ७४ ।।
मग ठाकुर गाडीत बसुन। दक्षिणेश्वरी करिती गमन ।
जेथे दिसे सत्पात्र सज्जन । तेथे जाउनि बोध करिती ।। ७५ ।।
श्रीरामकृष्णकथामृत। प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १७६ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा सदतिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय अडतिसावा

रामकृष्ण देवाधिदेव । करोत कृपेचा वर्षाव ।
मनात भरोत भक्तिभाव । नमन सदैव त्यांना असे ।। १ ।।

कृपा करिता भगवंत । पातकीही होतसे संत ।
उदाहरण याचे साक्षात । गिरीशचंद्र घोष असे ।। २ ।।

उदय पावले सुभाग्य म्हणुन । रामकृष्णांचे घडले दर्शन ।
अनीतीच्या गर्तेमधुन। त्यांनी काढिले गिरीशला ।। ३ ।।

गिरीश म्हणाला नसे एक । जे मी केले नाही पातक ।
परंतु सद्गुरू अलौकिक । कृपा करुनी वाचविले ।। ४ ।।

ईश्वराकडे तो नाही गेला । ईश्वर गिरीशकडे आला ।
अगम्य भगवंताची लीला। कोण तियेला जाणू शके ।। ५ ।।

गिरीश होता फार नास्तिक । लोकलज्जा नसे ठाउक ।
मदिरापान करी नि:शंक । पातके कित्येक आचरली ।। ६ ।।

ठाकुरांकडे येती लोक । त्यांचे प्रकार असती अनेक ।
एकेक असे प्रातिनिधिक । सार्वजनिक स्वभावाचा ।। ७ ।।

कोणी स्वच्छ कोणी घाण । नदीनाले पाणी घेउन ।
गंगेस मिळता होती पावन । परम पवित्र गंगोदक ।। ८ ।।

कोणी लोह कोणी सुवर्ण । परिस लागता एक वर्ण ।
आले पातकी पुण्यवान । आश्रय देउनी उद्धरिले ।। ९ ।।

गिरीश घोष असे नास्तिक । जड जगताच्या मागे एक ।
असे शक्ती नियामक । गिरीश मानत नव्हता हे ।। १० ।।



त्यासी वादविवाद करुन। ईश्वराचे अस्तित्व पटवुन ।
द्यावयाचा करण्या प्रयत्न । कोणीही थजू शकत नसे ।। ११ ।।
गिरीश नि:शंक पापे करी । गृहस्थिती त्याची होती बरी ।
परी स्वस्थता त्याच्या अंतरी। तिळमात्रसुद्धा असेना ।। १२ ।।
नट आणि नाटककार । म्हणुनी कीर्ती गाजली फार ।
बांधिले स्टार थिएटर । परी मन अस्थिर राहिले ।। १३ ।।
पुढती आली महामारी । गिरीश पडला आजारी ।।
आप्तमंडळी जमली सारी । रडू लागले सर्वजण ।। १४ ।।
उपाय सर्व करुनी झाले । आशा नसेच डॉक्टर वदले ।
देहभान गिरीशचे हारपले । तेव्हा घडला चमत्कार ।। १५ ।।
गिरीशला स्वप्नी महिला दिसली । लाल किनारी साडी ल्याली ।
दयार्द्र होउनि जवळी आली । बोलु लागली प्रेमाने ।। १६ ।।
जगन्नाथाचा प्रसाद आणुन । तुजसाठी मी आले घेउन ।
तो आता तू करी भक्षण । म्हणजे व्याधी शमेल ही ।। १७ ।।
ऐकुनि तिचे मधुर भाषण । तत्काळ प्रसाद केला ग्रहण ।
तेथवा त्याचे संपले स्वप्न । देहभान गिरीश पावला ।। १८ ।।
यावर लोटली वर्षे सोळा । सारदादेवीचे तयाला ।
दर्शन होताच सांगे मजला । दिधला प्रसाद यांनी तो ।। १९ ।।
गिरीश उठला आजारातुन । दोलायमान झाले मन ।
काय दिव्य शक्ती येउन । माझे प्राण वाचविले ।। २० ।।
परंतु गतायुष्यात पूर्ण । नास्तिकवादी असे मन ।
संशय आणि श्रद्धा दोन । भाव मनात उद्‌भवले ।। २१ ।।
गिरीशचंद्र करी कथन । काळ तो होता विलक्षण ।
नास्तिक म्हणवितसे जो जन । मान्यता पावे समाजात ।। २२ ।।



सभ्य लोकांत चर्चा करुन । निरीश्वरवाद प्रतिपादुन ।
करणे आस्तिकमत खंडण । यात अभिमान मानिती ।। २३ ।।
श्रद्धा ठेवणे ईश्वरावर । मानिती मूर्खपणा फार ।
म्हणती कल्पनेचा प्रकार । निराधार विचार धर्माचा ।। २४ ।।
अनिष्ट गोष्टीचे निवारण । जनांनी करावे सद्वर्तन ।
म्हणुनी कोणाच्या डोक्यातुन । धर्म निर्माण झाला असे ।। २५ ।।
धर्मनिष्ठेची निंदा करुनी । रूढीवर ताशेरे ओढुनी ।
स्वतंत्र विचार करितो म्हणुनी । पावे जन मानमान्यता ।। २६ ।।
आस्तिकवाद बावळटपण । समजत होते शिक्षित जन ।
ऐसे असे वातावरण । गिरीशही होता नास्तिकची ।। २७ ।।
मानवी क्षमतेच्या बाहेर । काही घटना घडती थोर ।
पाहुनि गिरीश करी विचार । खरोखर ईश्वर आहे का ।। २८ ।।
आपुल्या मित्रांकडे जाउन । सांगे अस्वस्थ असे मन ।
ते म्हणती सद्गुरूवाचुन । स्वस्थता मिळेना मनासी ।। २९ ।।
गुरूचा महिमा असे थोर । अवनीवर तो असे ईश्वर ।
गिरीशास नाही पटला विचार । देव मानणे मानवाला ।। ३० ।।
करितसे केशवचंद्र सेन । इंडियन मिरर पत्रातुन ।
रामकृष्णांविषयी लिखाण । वाचनात आले गिरीशच्या ।। ३१ ।।
केवळ उत्सुकता म्हणुन । वाटले पाहावे रामकृष्ण ।
कलकत्त्याला एक दिन । समजले ठाकुर आलेले ।। ३२ ।।
दीनानाथ बसूचे सदन । तेथे आले रामकृष्ण ।
त्यांना नव्हते देहभान । भावावेशात ते होते ।। ३३ ।।
संध्याकाळ गेली उलटुन । तरिही त्यांना नव्हते भान ।
भक्तास पुसती रामकृष्ण । संध्याकाळ झाली का ।। ३४ ।।



गिरीश होता तया स्थानी । ठाकुरांचा प्रश्न ऐकुनी ।
मनी म्हणे यापेक्षा कोणी । असंबद्ध बोलू शकत नसे ।। ३५ ।।
रामकृष्णांचे शब्द ऐकुन । मूर्खपणाची सीमा मानुन ।
तत्काळ सोडुनि गेला स्थान । प्रथम भेटिचा प्रकार हा ।। ३६ ।।
ठाकुर काही दिवसांनी । आले बलरामाच्या सदनी ।
गिरीशचंद्र परिचित म्हणुनी । त्यास बोलावी बलराम ।। ३७ ।।
गिरीश तयाच्या घरी आला । वेगळाच भाव त्याला दिसला ।
पाहताच श्रीरामकृष्णांला । वाटे वेगळा हा साधू ।। ३८ ।।
रामकृष्णांचे साधेपण । प्रेमळपणा स्पष्ट भाषण ।
बोलती तसेच त्यांचे वर्तन । पाहुनि झाला परिणाम ।। ३९ ।।
आणिक एकदा रस्त्यातुन । भक्तांसह जाता रामकृष्ण ।
गिरीशच्या घरासमोरुन । त्यांस गिरीश दाखविला ।। ४० ।।
ठाकुरांनी त्याला पाहुन । हात जोडुनी केले नमन ।
आपुल्या पंथे केले गमन । बलरामाच्या घराकडे ।। ४१ ।।
इकडे गिरीशचंद्राचे मन । बाबांकडे आकर्षित होउन ।
तत्काळ निघाला त्यांच्यामागुन । बलरामसदनास पातला ।। ४२ ।।
गिरीश बसला जवळ येउन । रामकृष्णांना केला प्रश्न ।
सांगा गुरू म्हणजे कोण । उत्तर देती श्रीठाकुर ।। ४३ ।।
गुरू माध्यम असतो जाण । शिष्यास करितो मार्गदर्शन ।
जातसे ईश्वराकडे घेउन । भेट घडवुनी आणतसे ।। ४४ ।।
प्रेमे म्हणती गिरीशला । तुझा गुरू आधीच ठरला ।
गिरीश म्हणाला मंत्र बोला । हरिनाम सांगती रामकृष्ण ।। ४५ ।।
ठाकुर म्हणाले गिरीशाला । प्रल्हादचरित नाटकाला ।
यावयाचे आहे मजला । पाहावयाला कधीतरी ।। ४६ ।।



अवश्य यावे म्हणे गिरीश । नाटक पाहण्या एक दिवस ।
घेऊनि आपुल्या भक्तजनांस । थिएटरास गेले रामकृष्ण ।। ४७ ।।
गिरीशने आत नेउन । ठाकुरांस दिले बसवुन ।
बाबा म्हणाले तुझे मन । अजुनहि आहेच वाकुडे ।। ४८ ।।
वक्रता मनाची जावयास । काय करावे पुसे गिरीश ।
रामकृष्ण सांगती त्यास । श्रद्धा हृदयात असावी ।। ४९ ।।
एकदा तर गिरीश नशेत । रामकृष्णांना थिएटरात ।
अर्वाच्य बोलला अत्यंत । ऐकुनी कोपले भक्तजन ।। ५० ।।
गिरीशावर ते रागावुन । करू पाहती तयाला ताडण ।
आवरुनी तयांना रामकृष्ण । परत गेले दक्षिणेश्वरा ।। ५१ ।।
मानापमान तुच्छ मानुन । मनोभावे भगवान ।
इच्छिती तयाचे कल्याण । अंत:करण उदार त्यांचे ।। ५२ ।।
रामकृष्णांना असे माहिती । कोण कशासाठी जन्मती ।
पुढे कोणते कार्य करिती । सहानुभूति त्यांची सर्वांना ।। ५३ ।।
कधी कोणाचा येइना राग । शिव्या देताहि येइना उबग ।
सकळांविषयी अनुराग । असे तयांच्या मनामधे ।। ५४ ।।
त्यातुनी गिरीशचंद्र घोष । गोष्ट तयाची असे विशेष ।
भावावेशात पाहिले त्यास । एकदा श्रीरामकृष्णांनी ।। ५५ ।।
नग्न बाळ आले चालत । मदिरापात्र असे काखेत ।
अमृतपात्र उजव्या करात । केस वाढले डोक्यावर ।। ५६ ।।
त्याला पुसती रामकृष्ण । सांग बाळा अससी कोण ।
तो म्हणे मी भैरव असुन । आलो कराया तुझे कार्य ।। ५७ ।।
पुढे गिरीश जेधवा आला । रामकृष्णांनी ओळखिला ।
म्हणती भैरवरूपात याला । पाहिले पूर्वी मंदिरात ।। ५८ ।।



भक्तजनांचा विरोध असुनी । ठाकुर गेले तयाच्या सदनी ।
गिरीश बसला खिन्न होउनी । लागेना मन कशातही ।। ५९ ।।
गिरीशचंद्रास धीर देउनी । ठाकुर बोलती अमृतवाणी ।
खिन्न होऊ नकोस मनी । विसरुनि जाई झालेले ।। ६० ।।
तुझ्यात बदल येईल घडुन । जीवनौघ जाईल बदलुन ।
आश्चर्यचकित होतिल जन । चिंता मुळिही करू नको ।। ६१ ।।
रामकृष्णांचे ऐकुनी वचन । गिरीशचे झाले समाधान ।
जेवी वैद्य उपचार करुन । व्याधी शमवितो रोग्याची ।। ६२ ।।
एके दिवशी दारुच्या नशेत । जाउनी नटीच्या घराप्रत ।
गिरीश झोपला निश्चिंत । प्रभात होताच निघाला ।। ६३ ।।
वाटले वर्तलो विपरीत । दक्षिणेश्वराला जाण्याप्रत ।
निघाला तो बसुनि गाडीत । मदिरापात्रही घेतले ।। ६४ ।।
धरुनी ठाकुरांचे चरण । उच्च स्वरे तो करी रुदन ।
मदिरापात्र गाडीमधुन । ठाकुरांनी आणविले ।। ६५ ।।
भावना जेधवा ओसरली । दारू पिण्याची हुक्की आली ।
परंतु गाडी निघुनी गेली । वाटले गेली बाटलीही ।। ६६ ।।
परि बाबांनी बाटली आणुन । ठेवताच मद्य केले प्राशन ।
काय केले येथे आपण । वाटुनी लज्जित तो झाला ।। ६७ ।।
ठाकुर म्हणती घे भोगुन । थोडे दिवस राहिल व्यसन ।
जसे बोलले रामकृष्ण । तसेच घडले प्रत्यक्ष ।। ६८ ।।
ठाकुरांना पुसे गिरीश । सांगता सत्य बोलावयास ।
बोलतो असत्य वचनास । कसा मी होईन सत्यवादी ।। ६९ ।।
तयाला वदते झाले ठाकुर । होऊ नकोस चिंतातुर ।
सत्यासत्य यांच्या पार । गिरीश तुझे स्थान असे ।। ७० ।।



गिरीशला म्हणाले ठाकुर । इतर कामांच्या बरोबर ।
परमेश्वराचे स्मरण कर । सकाळसंध्याकाळासी ।। ७१ ।।
हे तर करण्यास सोपे फार । गिरीश त्यांना देई उत्तर ।
माझ्यामागे कामे अपार । निश्चित वेळ नसे मला ।। ७२ ।।
न करी निश्चित वेळी भोजन । परमेश्वराचे करणे स्मरण ।
खचित जाईन विसरुन । कैसे वचन मी द्यावे ।। ७३ ।।
बाबा म्हणती करिसी भोजन । अथवा होतोस निद्राधिन ।
त्यापूर्वी त्वा करावे स्मरण । तेही गिरीशास कबुल नसे ।। ७४ ।।
म्हणाला माझ्या आयुष्यात । कशाची नाही लागली शिस्त ।
नियमपालन करणे मजप्रत । अशक्य गोष्ट वाटतसे ।। ७५ ।।
त्यावर ठाकुर म्हणती हेही । तुजला जर होणारच नाही ।
अधिकार तुझे मजला देई । जबाबदारी घेईन मी ।। ७६ ।।
तुजला काही न लागे करावे । तुजसाठी मी करिन आघवे ।
आता त्वा निश्चिंत असावे । ऐकुनि तोषला गिरीशचंद्र ।। ७७ ।।
म्हणे आता मी झालो मुक्त । ठाकुरांची शक्ती अनंत ।
मला मिळणार आहे निश्चित । सुख संपूर्ण मन:शांती ।। ७८ ।।
एकदा कोणती गोष्ट निघुन । गिरीश म्हणाला मी हे करिन ।
चूक दाखविती रामकृष्ण । म्हणती तयाला तत्काळ ।। ७९ ।।
कदाचित हे तुझ्याकडुन । करणे होणार नाही म्हणुन ।
म्हणावे ईश्वरेच्छेने करिन । नको अभिमान कर्तृत्वाचा ।। ८० ।।
गिरीशला तेव्हा समजले । ठाकुरांना अधिकार दिले ।
आपण कळसूत्र बाहुले । राहावे त्यांच्या इच्छेत ।। ८१ ।।
गिरीशवर प्रेम महान । करीत होते रामकृष्ण ।
प्रीती मातेची पुत्रालागुन । पडतसे अपुरी तुलनेत ।। ८२ ।।



एखाद्या लहान बाळापरी । त्याला भरविती आपुल्या करी ।
प्रीती तयावर असे भारी । पाणी पाजती निजहस्ते ।। ८३ ।।
गिरीश म्हणे मज वाटतसे । आईच मजला भरवितसे ।
जणू बाळ मी लहानसे । विसरुनि जातसे थोरपण ।। ८४ ।।
कृपा तयांची आठवून । वेडे होतसे माझे मन ।
खरेच घडले अथवा स्वप्न । संभ्रम उत्पन्न होत असे ।। ८५ ।।
रामकृष्णांची कृपा होउन । काम क्रोध गेले गळुन ।
मनाला लाभले समाधान । साफल्य जाहले जीविताचे ।। ८६ ।।
गिरीश झाला नाटककार । साहित्य निर्मिती केली थोर ।
रामकृष्णांचे दिव्य विचार । प्रतिबिंबित झाले लेखनात ।। ८७ ।।
ईश्वरावरिल विश्वास अत्यंत । भरला प्रत्येक पानात ।
गिरीश साहित्यिक विख्यात । सार्थक जाहले जन्माचे ।। ८८ ।।
रामकृष्णांच्या स्त्रीभक्तांत । अघोरमणी असे विख्यात ।
वात्सल्यभाव धरुनी मनात । भक्ती करितसे कृष्णाची ।। ८९ ।।
कृष्णास आपुला बाळ मानुनी । भक्ती करितसे अघोरमणी ।
गोपाळाची आई म्हणुनी । तिजला बोलती अत्यादरे ।। ९० ।।
विवाह झाला बाळपणी । पती लवकर गेला मरुनी ।
ती भावाच्या घरी राहुनी । घालवू लागली आयुष्य ।। ९१ ।।
तिचा भाऊ मुखोपाध्याय । दत्तांचा तो कुलोपाध्याय ।
गंगाकिनारी देवालय । तेथिल पूजक तो होता ।। ९२ ।।
दत्तकुळातिल विधवा रमणी । त्या मंदिराची असे स्वामिनी ।
तीही भक्तिमती असुनी । अघोरमणिची सखी असे ।। ९३ ।।
मंदिराभोवती बाग सुरेख । पवित्र गंगाप्रवाह अभिमुख ।
मंदिरातिल खोली एक । वास्तव्याला तिला दिली ।। ९४ ।।



वातावरण तेथिल शांत । पावित्र्य असे आसमंतात ।
अघोरमणी असे करित । दिनरात जप त्या ठायी ।। ९५ ।।

वात्सल्यभक्ती मनी धरुन । करित असे ती जपध्यान ।
तीस वर्षे लोटली पूर्ण । भक्ती करिता कृष्णाची ।। ९६ ।।

तीन चार किलोमीटर । तेथुनी असे दक्षिणेश्वर ।
आली तयांच्या कानावर । कीर्ती श्रीरामकृष्णांची ।। ९७ ।।

दोघी मैत्रिणी नावेत बसुन । आल्या घ्यावयाला दर्शन ।
दारात उभे रामकृष्ण । पाहात होते वाट त्यांची ।। ९८ ।।

गोपालेर मा येते म्हणुन । जाणत होते रामकृष्ण ।
आपुल्या खोलीत त्यांना नेउन । भक्तिगीते ऐकविली ।। ९९ ।।

सांगती आपुल्या जीवनात । परमेश्वरास करणे प्राप्त ।
याविण दुसरी गोष्ट जगात । वांच्छनीय काही नसे ।। १०० ।।

त्या परतता निरोप घेउन । पुन्हा या म्हणती रामकृष्ण ।
अघोरमणिला आकर्षण । विशेष वाटले बाबांचे ।। १ ।।

तथापि तिजला नसे माहित । जयाची ती असे भक्त ।
तो गोपाळच प्रत्यक्षात । रामकृष्णरूपे अवतरला ।। २ ।।

एकदा करीत असता ध्यान । प्रबळ इच्छा उत्पन्न होउन ।
घ्यावया रामकृष्णांचे दर्शन । एकटी निघाली त्यांच्याकडे ।। ३ ।।

अत्यंत गरिबी असे म्हणुन । पातली शिळी मिठाई घेउन ।
ठाकुरांचे घेताच दर्शन । ते मागती खावयाला ।। ४ ।।

अघोरमणिला वाटे मनात । उत्तम वस्तू आणिती समस्त ।
कशी द्यावी खाण्याप्रत । शिळी मिठाई ठाकुरांना ।। ५ ।।

कसा हा जगावेगळा संत । पाहिल्याबरोबर मजप्रत ।
खावयाला मागतो पदार्थ । येती मनात विचार असे ।। ६ ।।



परी मनाचा निश्चय करुनी । शिळी मिठाई दिली ठेउनी ।
आनंदाने मिठाई घेउनी । खाउन टाकिती ठाकुर ।। ७ ।।
अघोरमणिसी श्रीठाकुर । वागति जेवी मातेसि किशोर ।
बालक आपुल्या आईसमोर । हट्ट धरुनी मागतसे ।। ८ ।।
रामकृष्ण तिला म्हणती । कढी आवडते मजप्रती ।
स्वत: तयार करुनी पुढती । आण कढी ती मजसाठी ।। ९ ।।
अघोरमणी करी विचार । साधुचा हा कोणता प्रकार ।
बोलण्यामधे येइना ईश्वर । सदा मागतो खावयाला ।। ११० ।।
आपण आहोत गरिब फार । जे जे काही मागती ठाकुर ।
कसे तयांना पुरविणार । ऐसा विचार पडला तिला ।। ११ ।।
आता पुन्हा कधिही आपण । येऊ नये घ्यावया दर्शन ।
ऐसा विचार मनात करुन । तत्क्षणी तेथुनी निघाली ।। १२ ।।
यापरी विचार करी मन । परंतु अद्‌भुत आकर्षण ।
पाय न काढवे निघाया तेथुन । तथापि परतली कशीबशी ।। १३ ।।
यावर थोड्याच दिवसांत । कढी घेउनी आली परत ।
बालकाप्रमाणे आनंदात । भक्षिली कढी ठाकुरांनी ।। १४ ।।
कित्येक महिनेपर्यंत । असाच क्रम राहिला चालत ।
अघोरमणी आणी नित्य । कढी करुनी ठाकुरांसाठी ।। १५ ।।
मनात म्हणे हे गोपाळा । का तू येथे आणिसी मजला ।
हा साधू तर खावयाला । नित्य मजला मागतसे ।। १६ ।।
आता पुनरपि मी काही । कधिही येथे येणार नाही ।
अदृश्य शक्ती परि लवलाही । आकर्षण तिजला करीतसे ।। १७ ।।
दूर जाता ठाकुरांपासुन । त्यांचाच विचार करी मन ।
अखंड त्यांचेच होई स्मरण । पडेना चैन तिजलागी ।। १८ ।।



एकदा स्वत: रामकृष्ण । खोलीवर तियेच्या जाउन ।
तिच्या हातचे भोजन करुन । परत आले दक्षिणेश्वरा ।। १९ ।।
अघोरमणी सकाळी उठुन । एकदा करीत असता ध्यान ।
दिसले प्रत्यक्ष रामकृष्ण । डाव्या बाजूस बसलेले ।। १२० ।।
जसे पाहिले दक्षिणेश्वरी । तसेच दिसती येथे घरी ।
मग ती मनात विचार करी । भलत्या प्रहरी आले कसे ।। २१ ।।
झाली अत्यंत आश्चर्यमग्न । स्मित करिती रामकृष्ण ।
जव ती हात पाहे लावुन । आला घडुनी चमत्कार ।। २२ ।।
शरिरातुनी त्यांच्या किशोर । श्रीकृष्ण आले बाहेर ।
रामकृष्णांचा आकार । गुप्त सत्वर जाहला ।। २३ ।।
गोपाळापरी रांगत येउन । एक हात वर उचलुन ।
म्हणाला आई मजलागुन । देई खावया नवनीत ।। २४ ।।
अघोरमणिच्या मनाची स्थिती । न वर्णवे ती कशी होती ।
रडत बोलली बाळाप्रती । गरीब दुर्दैवी मी अबला ।। २५ ।।
तुजला लोणी देऊ कोठुन । परंतु विचित्र गोपाल सान ।
मुळिच घेइना तिचे ऐकुन । हट्टचि घेउनि तो बसला ।। २६ ।।
मग ती एका मडक्यातुनी । शिळे पेढे देई काढुनी ।
तेच गोपाळाने खाउनी । आपुला आनंद व्यक्त केला ।। २७ ।।
ती करू पाहता जपध्यान । तो मांडीवर बसे येउन ।
जपाची माळच हिसकावुन । तिच्याशीच तो खेळतसे ।। २८ ।।
काही वेळाने होता प्रभात । निघाली दक्षिणेश्वराप्रत ।
गोपाळ म्हणाला येतो तेथ । बसला कडेवर मातेच्या ।। २९ ।।
गोपाळाचे गुलाबी चरण । लोंबती तियेच्या छातीवरुन ।
भक्तासाठी श्रीभगवान । लीला अगम्य दावितसे ।। १३० ।।



जेव्हा दक्षिणेश्वराला आली । गोपाळ गोपाळ हाक दिधली ।
रामकृष्णांना समाधी लागली । अघोरमणिला पाहताच ।।३१।।
ठाकुर जणू बालक सान । तिच्या मांडीवर ठेविती मान ।
तिने जवळचे नवनीत काढुन । रामकृष्णांना भरविले ।। ३२ ।।
यापरी काही लोटता क्षण । समाधी तयांची उतरून ।
रामकृष्ण प्राप्त होउनी भान । बैसले आपुल्या आसनावर ।। ३३ ।।
भक्तिमती अघोरमणी । दिव्य भावात होती अजुनी ।
आनंदाची परिसीमा होउनी । नाचु लागली वेड्यापरी ।। ३४।।
तिचा गोपाळ तिला दिसत । रामकृष्णांच्या शरीरात ।
बाहेर येई पुन्हा क्षणात । बसे खेळत मांडीवर ।। ३५ ।।
सांगु लागली ठाकुरांला । माझ्याजवळ गोपाळ बसला ।
तुमच्या शरीरात प्रवेशला । आला बाहेर पुनरपी ।। ३६ ।।
म्हणतसे मत्प्रिय गोपाळा । माझ्याजवळ येई बाळा ।
तव माता मी गरीब अबला । चालला प्रकार यापरी ।। ३७ ।।
अघोरमणिचे समाधान । करिते झाले रामकृष्ण ।
गोपाळाची आई म्हणुन । तेव्हापासुनी प्रसिद्ध झाली ।। ३८ ।।
रामकृष्णांना गोपाळ म्हणुन । बाहतसे ती तेव्हापासुन ।
मातापुत्रांचे होई उत्पन्न । नाते यापरी दोघांत ।। ३९ ।।
रामकृष्णांजवळ तो दिन । घालवुनी तिने संपूर्ण ।
संध्याकाळ होते पाहुन । परतावयाला निघाली ।। १४० ।।
गोपाळास घेउनी खांद्यावर । तिने गाठिले आपुले घर ।
संध्याकाळ उलटल्यावर । बसली ध्यान करावया ।। ४१ ।।
तथापि गोपाळ हट्ट धरुन । तिजला करू देइना ध्यान ।
मांडीवर तो खेळे येउन । सोडुनी आसन ती उठली ।। ४२ ।।



पसरिले आपुले आंथरूण । गोपाळाला जवळ घेउन ।
निजवू जाता तक्रार करुन । म्हणे बिछाना रुतत असे ।। ४३ ।।

डोक्याखाली घ्यावयाला । उशी दिधली नाही मजला ।
गोपाळ हट्ट धरुनी बसला । उशीविण नाही झोपणार ।। ४४ ।।

माता सांगे समजावुन । उदयीक सकाळ होता आपण ।
कलकत्त्याच्या हाटातुन । घेऊ आणुनि मऊ उशी ।। ४५ ।।

दुसरा दिवस उजाडता । स्वयंपाक करी बाळाकरिता ।
गोपाळ येउनि मागोता । हे घे ते घे करित असे ।। ४६ ।।

यापरी दोन महिने पूर्ण । सतत तिजसवे बाळकृष्ण ।
अष्टौप्रहर राहुन फिरुन । झाले जीवन गोपालमय ।। ४७ ।।

भक्ती परिपक्व होता पूर्ण । होतसे भगवंताचे दर्शन ।
सहस्रात कोणी भाग्यवान । पात्र होई प्रभुकृपेला ।। ४८ ।।

अघोरमणिची भक्ती पाहुन । ईश्वर गोपाळरूप घेउन
तिच्याकडे प्रत्यक्ष येउन । खेळे बागडे तिच्यासवे ।। ४९ ।।

दोन महिने लोटल्यावर । गोपाळ न दिसे दिवसभर ।
थोडेसे ध्यान केल्यावर । रूप तयाचे दिसत असे ।। १५० ।।

एकदा ठाकुरांकडे येउन । गोपालमाता करी प्रश्न ।
मजला का बरे रात्रंदिन । आता गोपाळ दिसत नसे ।। ५१ ।।

समजाविती मग रामकृष्ण । यापरी सतत होता दर्शन ।
शरीर राहू शकेना टिकुन । तुझी अवनती झाली नसे ।। ५२ ।।

ती असताना दक्षिणेश्वराला । एकदा नरेन्द्रनाथ आला ।
रामकृष्णांनी बेत केला । थोडी गंमत करण्याचा ।। ५३ ।।

वदले गोपालमातेला । तुझे अनुभव सांग याला ।
टाळाटाळ करिता तियेला । आग्रह केला ठाकुरांनी ।। ५४ ।।



गोपालमाता खेडवळ । अशिक्षित भोळी स्वभाव सरळ ।
व्रतवैकल्ये जप तप सकळ । यावर विश्वास असे तिचा ।। ५५ ।।
पदवीभूषित नरेन्द्रनाथ । पाश्चात्त्य विचार जाणे समस्त ।
मूर्तिपूजा तो नसे मानित । बुद्धिमान अत्यंत तो असे ।। ५६ ।।
अघोरमणिचा भाव द्वैत । साकारावर श्रद्धा बहुत ।
नरेन्द्राचा भाव अद्वैत । उपासक निराकाराचा ।। ५७ ।।
अशी दोघांची जमता जोडी । संभाषणाची चाखण्या गोडी ।
अपूर्व संधी मिळता तातडी । ती न दवडिती रामकृष्ण ।। ५८ ।।
गोपालमा सांगे अनुभव । तिज झालेली दर्शने अपूर्व ।
ती सांगुनी संपता सर्व । विचारी तयाला साधेपणे ।। ५९ ।।
तू बुद्धिमान आणि शिक्षित । मी तर अडाणी अशिक्षित ।
सांग माझी दर्शने सत्य । असती अथवा कल्पनाच ।। १६० ।।
स्पष्ट वक्ता नरेन्द्रनाथ । तार्किकता असे विचारात ।
उपास्य तयाचे अव्यक्त । परी हृदयात मृदुता असे ।। ६१ ।।
वृत्तान्त तियेचा परिसून । पाहुनी सरलता साधेपण ।
नरेन्द्रास आले कळुन । सत्य भाषण तिचे असे ।। ६२ ।।
तयाचे हृदय आले भरुनी । अश्रु वाहती नयनातुनी ।
आश्वासन तिजला देउनी । म्हणाला सत्य दर्शने तुझी ।। ६३ ।।
अघोरमणिला नव्हते माहित । कसा भजावा भगवंत ।
भक्तिभाव असे हृदयात । स्मरण सतत श्रीहरिचे ।। ६४ ।।
तियेचे चित्त अति निर्मळ । स्वभाव अत्यंत उदार सरळ ।
म्हणुनि भगवंत झाला बाळ । संतुष्ट होउनी भक्तीने ।। ६५ ।।
भाग्य तिचे उदयाला आले । रामकृष्णांचे दर्शन झाले ।
साधनेस त्वरित फळ आले । जाहले साफल्य जन्माचे ।। ६६ ।।



श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्‌भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६७ ।।
।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा अडतिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय एकोणचाळिसावा

जय जय रामकृष्णदेवा । मजला आपुल्या चरणी ठेवा ।
तोच ठाव माझिया जिवा । होवो विसावा चिरकाल ।। १ ।।

योगिन् नामक भक्तिमती । रामकृष्णांची शिष्या होती ।
आली दक्षिणेश्वराप्रती । बलराम बोसाबरोबर ।। २ ।।

थोड्याच दिवसांत तिच्यावर । कृपा करिती श्रीठाकुर ।
होउ लागली तिची सत्वर । गती अध्यात्ममार्गात ।। ३ ।।

दक्षिणेश्वराला येतसे नित्य । थांबे नौबतखान्यात ।
सारदादेवींसमवेत । उपदेश ऐके ठाकुरांचा ।। ४ ।।

एकदा तिच्या घरी जाउन । रामकृष्णांनी केले भोजन ।
पवित्र जयांचे अंत:करण । करिती पावन घर त्यांचे ।। ५ ।।

तिला म्हणती रामकृष्ण । घेतले तू सर्व मिळवुन ।
पाहुन आणी खाऊ घालुन । सेवा केली या देहाची ।। ६ ।।

मिळविले अनुभव महान । बहुत काळ करुनी ध्यान ।
समाधि घेतली मिळवून । गाठले ध्येय जीवनाचे ।। ७ ।।

योगिनमाचे अनुपम । सारदादेवीवर असे प्रेम ।
जीवनाचे ध्येय परम । लाभले कृपेने बाबांच्या ।। ८ ।।

गोलापमा नामे भक्तिमती । ठाकुरांची शिष्या होती ।
मृत्यू पावला तिचा पती । कन्यापुत्रही निवर्तले ।। ९ ।।

असता अशा दु:खित स्थितित । योगिनमाने तिजप्रत ।
आणिले दक्षिणेश्वराप्रत । रामकृष्णांच्या दर्शनाला ।। १० ।।



हकीगत तियेची परिसून । समाधान करिती रामकृष्ण ।
ज्याला नसती आप्तजन । त्यास भगवान साहा करी ।। ११ ।।
ठाकुरांचे शब्द ऐकुन । तिला वाटले आश्वासन ।
जाहले पूर्ण समाधान । अस्वस्थ मन शांत झाले ।। १२ ।।
दुसऱ्या वेळी दर्शना येता । ठाकुर सांगत होते भक्ता ।
जन्ममृत्युची रहस्यकथा । म्हणती जीवित अनित्य असे ।। १३ ।।
काय मिळते होउनि दु:खित । ईश्वरच एक आहे सत्य ।
त्यास जाणावे करावी प्रीत । म्हणजे स्वहित होत असे ।। १४ ।।
एकदा तियेच्या घरी जाउन । रामकृष्णांनी केले भोजन ।
गगनी न मावे ऐसा महान । आनंद तियेला जाहला ।। १५ ।।
सारदादेवीने पाक करुन । गोलापमाला ताट देउन ।
रामकृष्णांसाठी भोजन । पाठविले त्यांच्या खोलीमधे ।। १६ ।।
ठाकुर करीत असता भोजन । पाहु लागली लक्ष देउन ।
पाहता आश्चर्यमग्न होउन । गोलाप हासू लागली ।। १७ ।।
तिला पुसती रामकृष्ण । कोण खात असे हे अन्न ।
ती म्हणे तुमच्या मुखातुन । कोणीतरी ते खात असे ।। १८ ।।
जाताच कवळ मुखाजवळ । एक लांब प्राणी कोमळ ।
अन्न खातसे तत्काळ । म्हणुनी नवल मज वाटे ।। १९ ।।
ठाकुर म्हणती तुज साक्षात । दिसले तेच बोलसी सत्य ।
पाहिले जाणिले प्रत्यक्षात । भाग्य अमित तुझे असे ।। २० ।।
पुढे गोलाप करितसे कथन । रामकृष्णांनी कृपा करुन ।
कुंडलिनी जी शक्ति महान । तिचे दर्शन मज दिधले ।। २१ ।।
सारदादेवीला रामकृष्ण । सांगती तुझी ही मैत्रिण ।
तुझ्याबरोबर राहून । पुढे करिल सेवा तुझी ।। २२ ।।



आणिक गौरीमा भक्तिमती । रामकृष्णांची शिष्या होती ।
गीतादि ग्रंथात तिची गती । वाचले भारत रामायण ।। २३ ।।
पितर सनातनी ब्राह्मण । तियेचे करू पाहती लग्न ।
ती म्हणे भगवंतावाचुन । विवाह न करी कोणासी ।। २४ ।।
आपुले ते करितील लग्न । म्हणुनि पळाली घरातुन ।
संन्यासिनीचा वेष घेउन । बरीच केली तीर्थयात्रा ।। २५ ।।
असता जगन्नाथपुरीला । तिला बलराम बोस भेटला ।
रामकृष्णांचा सांगितला । तयाने तिजला वृन्तात ।। २६ ।।
मग आली दक्षिणेश्वराला । रामकृष्णांच्या दर्शनाला ।
पाहताच परमहंसदेवाला । म्हणाली हे तर चैतन्य ।। २७ ।।
उद्धार जनांचा करावया । चैतन्यदेवांस येउनी दया ।
पुनरपि घेतली मानवकाया । नर तारावा भवाब्धीतुन ।। २८ ।।
एकदा ठाकुरांसमोर बसली । तोच तिची समाधी लागली ।
म्हणजे ठाकुरांनी केली । कृपा चैतन्यदेवापरी ।। २९ ।।
महिलांची दु:स्थिती पाहुन । त्यांना द्यावयाला शिक्षण ।
शारदाश्रम तिने काढुन । केली सेवा महिलांची ।। ३० ।।
रामकृष्णदेवांची पुतणी । नाव तिचे लक्ष्मीमणी ।
ठाकुर पुसती तिजलागुनी । कोणते दैवत आवडते ।। ३१ ।।
वदली दैवत राधाकृष्ण । ठाकुर जिभेवर मंत्र लिहुन ।
कानात करुनी उच्चारण । देती दीक्षा तिजलागी ।। ३२ ।।
अकरा वर्षे होता वयाला । लक्ष्मीमणिचा विवाह झाला ।
वृत्त कळताच ठाकुरांला । म्हणाले विधवा होईल ती ।। ३३ ।।
आक्षेप घेउनी बोलण्यावर । हृदयराम वदला सत्वर ।
भाषण असे अशुभ फार । म्हणती ठाकुर काय करू ।। ३४ ।।



जगन्मातेने दाखविले । तेचि माझ्या मुखातुनि आले ।
तथापि भाग्य होई उदेले । वैधव्यामधे लक्ष्मीचे ।। ३५ ।।

लक्ष्मी शीतला देविचा अंश । तिचा पती तर मर्त्य माणुस ।
याकारणे वैधव्य तियेस । येईल यात शंका नसे ।। ३६ ।।

रामकृष्ण जैसे बोलिले । त्याप्रमाणे घडुनी आले ।
जे का विधिघटनेने ठरले । त्यास उपाय काय असे ।। ३७ ।।

ठाकुर सांगती गिरीशास । पेढे आणुनि एक दिवस ।
अर्पण करी लक्ष्मीमणिस । शीतलादेवीस ते पावती ।। ३८ ।।

शीतलादेविने ठाकुरांस । सांगितले होते माझा वास ।
लक्ष्मीमणीत या काळास । अर्पिता तिजला मला मिळे ।। ३९ ।।

लक्ष्मीला म्हणती रामकृष्ण । जर देवदेवीत न रमे मन ।
तर माझ्यावर लावी ध्यान । तेवढे तुजला पुरे असे ।। ४० ।।

लक्ष्मीदेवी होती जाणत । आपण ध्यातो तेच दैवत ।
रामकृष्ण असती साक्षात । एवढी श्रद्धा तिची असे ।। ४१ ।।

लक्ष्मी गेली असता पुरीस । जगन्नाथाच्या दर्शनास ।
जगन्नाथासमोर तियेस । उभे दिसले रामकृष्ण ।। ४२ ।।

तत्काळ तिजला आले कळुन । जगन्नाथ आणि रामकृष्ण ।
एकच असती, नसती दोन । कळली थोरवी सद्गुरूंची ।। ४३ ।।

पाहिले तिने समाधीत । आपण आलो विष्णुलोकात ।
रामकृष्णलोक हाच असत । ऐसे तिजला आढळले ।। ४४ ।।

जगन्नाथपुरीला समुद्रात । लक्ष्मी स्नान असता करित ।
लाट येउनी जोरात । वाहुनि गेली दूरवर ।। ४५ ।।

जगण्याची आशाच संपली । एक गुराखी अशा वेळी ।
येउनि त्याने उडी टाकिली । तिला आणिले तीरावर ।। ४६ ।।



तेथुनी मग ती गेली चालत । जगन्नाथाच्या मंदिरात ।
तेथे दर्शन झाले अद्‌भुत । आश्चर्यचकित ती झाली ।। ४७ ।।
ज्याने काढले समुद्रातुनी । तो उभा बलरामाच्या स्थानी ।
पाहात आहे स्मित करुनी । आपणाकडे दिसले तिला ।। ४८ ।।
तिची खात्रीच गेली पटुन । बलराम स्वये आला धावुन ।
काढिले आपणा समुद्रातुन । आपुले प्राण वाचविले ।। ४९ ।।
अत्युत्तम ती करी कीर्तन । कामधामही विसरती जन ।
लक्ष्मी कीर्तनी रंगून । देहभान विसरत असे ।। ५० ।।
करी सुंदर नृत्यगायन । बलरामदादा कधी होउन ।
कधी होउनी राधाकृष्ण । सकळ जन मुग्ध करित असे ।। ५१ ।।
लक्ष्मी स्वतः शीतला देवी । थोरवी काय वर्णावी ।
गुरू रामकृष्ण गोसावी । कीर्ती गावी केवी तिची ।। ५२ ।।
रामकृष्णांचे शिष्य अद्‌भुत । देवतांचे अंश साक्षात ।
भगवंताच्या समवेत । येती जनदुःख निवारण्या ।। ५३ ।।
एकेकाचे कार्य अद्‌भुत । पाहुनी मन होई चकित ।
स्वामी विवेकानंद विख्यात । पुढारी सकळ शिष्यांचे ।। ५४ ।।
बाबांचे शिष्य असती ऋषी । कोणी गृहस्थ कोणी संन्यासी ।
आधार द्यावया बुडत्यांसी । येती अवनीस अवतार ।। ५५ ।।
रामकृष्णांच्या संबंधात । त्यांच्या चरित्राचा सांप्रत ।
अत्यल्पभाग संक्षिप्तात । वर्णन केला या ठायी ।। ५६ ।।
अल्पही भाग पडता कानी । प्रकाश पडे अंतःकरणी ।
सकलांस होई हितकारिणी । कथा पावनी परिसता ।। ५७ ।।
सन अठराशे पंचाऐंशीत । रामकृष्णांना उन्हाळ्यात ।
होउ लागला त्रास बहुत । व्यवस्था केली बर्फाची ।। ५८ ।।



बर्फमिश्रित थंडगार । प्रतिदिनि पिऊ लागले नीर ।
बालकस्वभाव श्रीठाकुर । करिती आनंद प्रदर्शित ।। ५९ ।।
परंतु थोड्याच दिवसांत । वेदना होउ लागल्या गळ्यात ।
दिवसेंदिवस जाती वाढत । झाले चिंतित भक्तजन ।। ६० ।।
बराच वेळ बोलल्यावर । आणि समाधीच्या नंतर ।
वेदना वाढू लागल्या फार । यास्तव डॉक्टर बोलाविला ।। ६१ ।।
तयाने आतुन बाहेरुन । लेप लावावयाला देउन ।
म्हणाला कमी करा भाषण । समाधिमग्न होऊ नका ।। ६२ ।।
ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशीस । पानिहाटी नामक गावास ।
गोस्वामी रघुनाथ दास । यांचा उत्सव होत असे ।। ६३ ।।
चैतन्य महाप्रभूंचे शिष्य । होते श्रीरघुनाथ दास ।
वैष्णवजन त्या उत्सवास । येत असती दूरदुरुन ।। ६४ ।।
दिवसभर होतसे कीर्तन । भजन पूजन नामस्मरण ।
कितीतरि वेळा रामकृष्ण । गेले होते उत्सवाला ।। ६५ ।।
यंदा जावे आले मनात । म्हणती भक्तमंडळींप्रत ।
आनंदाचा बाजार समस्त । उत्सवात भरत असे ।। ६६ ।।
यंग बंगाल तुम्ही मंडळी । ऐसी मजा नसेल पाहिली ।
येत असाल जर यावेळी । तर जाउया उत्सवाला ।। ६७ ।।
रामचंद्र दत्त आदि भक्त । ऐकुनि झाले आनंदित ।
काही म्हणती न जावे तेथ । दुखणे पाहुनि ठाकुरांचे ।। ६८ ।।
तयांना समजाविती गुरू । आपण येथेच फराळ करू ।
थोडे थांबुनि परत फिरू । राहू सावध दुखण्याला ।। ६९ ।।
पायि निघाले काहीजण । काहि निघाले नौका करुन ।
काहि भक्तांसह रामकृष्ण । निघाले स्वतंत्र नौकेत ।। ७० ।।



नौकेत बसताच नरेन्द्रनाथ । बलराम रामचंद्र दत्त ।
गिरीश घोष महेन्द्रनाथ । सांगती श्रीरामकृष्णांना ।। ७१ ।।
भजनी मंडळींमध्ये मिसळुन । आपण करू नये भजन ।
आपण विसरता देहभान । समाधिमग्न मग होता ।। ७२ ।।
मात्र अशाने विनाकारण । दुखणे होइल वर्धमान ।
यास्तव काळजी घ्यावी आपण । भजनात तेथे रमू नये ।।७३।।
नौका लागल्या घाटास । झिमझिम वर्षत होता पाउस ।
सर्वत्र होतसे नामघोष । उत्सवस्थान फुलुनी गेले ।। ७४ ।।
देवळात जाताच ठाकुरांस । प्राप्त झाला भावावेश ।
दर्शन घ्यावया त्या ठायांस । भजनी दिंड्या पातल्या ।। ७५ ।।
दिंडी येउनि देवळात । वाळवंटी जाई परत ।
तेथे बसती भजन करित । ऐसा प्रघात असे त्यांचा ।। ७६ ।।
एक दिंडी तेवढ्यात । तेथे आली भजन करित ।
उभे राहुनि मंडपात । भजन ऐकती रामकृष्ण ।। ७७ ।।
इतुक्यात शिरला त्या दिंडीत । जटाधारी मुद्रामंडित ।
हातामधली माळ जपत । डुलत डुलत बोवाजी ।। ७८ ।।
भावाविष्ट झाल्यासमान । करी हातवारे नाचुन ।
त्याकडे पाहुनी रामकृष्ण । स्मित करुनी बोलती ।। ७९ ।।
म्हणती पाहा पाहा ढंग । कसे बुवाने आणिले सोंग ।
ऐकण्यात भक्त होते दंग । तेहि लागले हासावया ।। ८० ।।
भावाविष्ट नाहित ठाकुर । मंडळींस आनंद वाटे फार ।
बाबाजींकडे बघण्यात चूर । होते सकळ भक्तजन ।। ८१ ।।
इतुक्यात भावाविष्ट होउन । भजनी मेळ्यामधे जाउन ।
उभे राहिले रामकृष्ण । देहभान त्यांचे हारपले ।। ८२ ।।



आकस्मिक हा प्रकार पाहुन । गडबडून गेले भक्तजन ।
भजनी मेळ्यामधे जाउन । रामकृष्णांना घेरले ।। ८३ ।।

थोडे भान होता प्राप्त । सिंहबळ येउनी करिती नृत्य ।
निचेष्ट असता समाधीत । धरुनि ठेविती भक्तजन ।। ८४ ।।

झोक जाऊन पडू नयेत । म्हणुनी धरुनी ठेविती भक्त ।
समाधि उतरता करिती नृत्य । ऐसा प्रकार सुरू झाला ।। ८५ ।।

नृत्य करिती तालावर । मागे पुढे सरती भरभर ।
मासोळीसारखा संचार । करिती आत्मानंदात ।। ८६ ।।

वाटे स्वच्छंद पोहतात । सच्चिदानंद सागरात ।
विहार करितात मनसोक्त । आनंदाब्धीत रामकृष्ण ।। ८७ ।।

कोमलता माधुर्य विश्वास । जडले तयांच्या आंगास ।
उद्दाम उत्साहाचा विशेष । भाव त्यांच्यात दिसत असे ।। ८८ ।।

दिव्य त्या भावावेशात । देहभान हारपे समस्त ।
तन्मयतेने करिती नृत्य । मधुर सौंदर्य दाटले ।। ८९ ।।

त्यांच्या वदनी तेज फाकले । भावोल्हासाने देह डोले ।
त्यांचे शरीर भासु लागले । आनंदोदधीचा तरंग ।। ९० ।।

वेषधारी बोवाजीला । मंडळींनी बाजूस केला ।
घेरुनी श्रीरामकृष्णांला । नाचु लागले भजनीजन ।। ९१ ।।

यापरी दिव्य आनंदात । पुष्कळ काळ झाला व्यतित ।
देहभान बाबांस होता प्राप्त । ठरवुनी टाकिती भक्तजन ।। ९२ ।।

राघवपंडिताच्या घरात । राधाकृष्ण मूर्ती आहेत ।
तयांचे रामकृष्णांप्रत । दर्शन आता करवावे ।। ९३ ।।

बसुनि तेथुनी नौकेत । कलकत्त्याला जावे परत ।
बाबांस सल्ला पडला पसंत । सकळ निघाला मेळावा ।। ९४ ।।



भजनीही निघाले बरोबर । हरिनामाचा पुनरपि गजर ।
भोवती भक्त मधे ठाकुर । नृत्य भजन करिती ते ।। ९५ ।।

चार पाउले जाता चालुन । बाबांचे हारपे देहभान ।
मंडळी तेथेच उभी राहुन । भजन करित थांबतसे ।। ९६ ।।

पुनरपि भान होता प्राप्त । सकळ क्रमू लागती पंथ ।
भावावेश होता समस्त । थांबती गाती हरिनाम ।। ९७ ।।

रामकृष्णांचे दिव्य दर्शन । प्रभा फाके शरीरातुन ।
उज्वल अंगकांतीः दिसुन । तेजःपुंज तनू जाहली ।। ९८ ।।

भावावेश प्राप्त होउन । देहाचें एवढे विलक्षण ।
क्षणात होतसे परिवर्तन । कल्पना येइना तयाची ।। ९९ ।।

देह दिसतसे अति विशाल । तेजाने झळके मुखमंडल ।
उजळुनि जाती दिशा सकळ । भरला प्रकाश सर्वत्र ।। १०० ।।

अंगातिल ते तेज पडुन । रामकृष्णांचे भगवे वसन ।
अग्निज्वालांनी केले वेष्टण । ऐसा भास होत असे ।। १ ।।

सुहास्य तेजस्वी अत्यंत । वदनमंडळ भावोद्दीप्त ।
दर्शन तयांचे असे शान्त । आनंदित होती बघणारे ।। २ ।।

भावावेश त्यांचा पाहुन । अंगकांती देदीप्यमान ।
सकळ जाती भारावुन । गाउ लागती उत्साहे ।। ३ ।।

भान विसरूनिया समस्त । चालती तयांच्या समवेत ।
आनंद करिती भजनात । गात गात पथ आक्रमिती ।। ४ ।।

ठाकुरांकडे बोट दाउनी । 'आमादेर प्रेम दाता' म्हणुनी ।
उद्दामपणे नाचती भजनी । गाती गाणी प्रेमभरे ।। ५ ।।

उत्सवास जे आले लोक । प्रकार पाहुनि अलौकिक ।
दर्शनाला होउनि उत्सुक । जमला प्रचंड समुदाय ।। ६ ।।



ठाकुरांचे रूप सुंदर । गायन त्यांचे अत्यंत मधुर ।
नृत्य त्यांचे मनोहर । नारीनर मोहित जाहले ।। ७ ।।
स्त्रिया प्रसाद आणिलेला । देऊ पाहती ठाकुरांला ।
भोवती विशाल पाहुनी मेळा । नाइलाज झाला तयांचा ।। ८ ।।
मुद्राधारी जटावान । एका बोवाजीने पाहुन ।
प्रसाद घेतला स्त्रियांकडुन । वाट गर्दीतुनि काढिली ।। ९ ।।
जणु भावने गद्‌गद होत । घालता बाबांच्या मुखात ।
बोवाजीचा स्पर्श जधि होत । अंग तयांचे थरारले ।। ११० ।।
भावावस्थेत असता ठाकुर । अमंगल स्पर्श न साहे शरिर ।
भंग पावला भाव समग्र । प्रसाद थुंकुनी टाकिला ।। ११ ।।
मंडळींना आले कळुन । तो बोवाजी ढोंगी महान ।
त्याकडे पाहती रागावुन । तव बोवाजी सटकला ।। १२ ।।
त्या प्रचंड समुदायास । मार्ग चालण्या अर्धा कोस ।
लागले तब्बल तीन तास । पोहोचले मग मंदिराला ।। १३ ।।
रामकृष्णांनी दर्शन घेउन । थोडा वेळ आराम करुन ।
भक्तांसमवेत मग तेथुन । केले प्रयाण नौकेकडे ।। १४ ।।
कोन्नगरचा नवचैतन्य । मिश्र होता भक्तिमान ।
रामकृष्ण आले हे ऐकुन । करू लागला शोध त्यांचा ।। १५ ।।
ठाकुर नौकेत चढलेले । नवचैतन्याला दिसले ।
दर्शनास मन आतुर झाले । धावला तीरासारिखा ।। १६ ।।
त्याने नौकेत उडी मारुन । आपुला देह दिला झोकुन ।
व्याकुळतेने स्पर्शुनि चरण । म्हणाला प्रभो कृपा करा ।। १७ ।।
तयाची प्रगाढ भक्ती पाहुन । द्रवले भगवान रामकृष्ण ।
त्याच्या हृदयास स्पर्श करुन । अद्‌भुत दर्शन घडविले ।। १८ ।।



तत्काळ तयाचे रडणे थांबले । अंतःकरण आनंदले ।
ठाकुरांसमोर सुरू केले । नृत्य नवचैतन्य मिश्राने ।। १९ ।।
स्तुती करुनी वारंवार । घाली साष्टांग नमस्कार ।
जवळ तयाला घेउनि ठाकुर । पाठीवर कर फिरविती ।। १२० ।।
नाना प्रकारे उपदेश करुन । तयाचे शांत केले मन ।
अनेक दिवस वाट पाहुन । आज भेटला ठाकुरांला ।। २१ ।।
वाटे जन्म सफल जाहला । पात्र जाहलो प्रभुकृपेला ।
पारावार नाही राहिला । आनंदास त्या भक्ताच्या ।। २२ ।।
मग गोस्वामी नवचैतन्य । पुत्रास संसार सोपवून ।
गंगाकिनारी कुटी बांधुन । साधनभजनास लागला ।। २३ ।।
तयाचे जपतपानुष्ठान । ईश्वरानुराग शुद्धाचरण ।
पाहुनी अमित येती जन । सन्मार्गगामी ते केले ।। २४ ।।
असो नवचैतन्य गेल्यावर । तेथुनी नौका निघे सत्वर ।
दक्षिणेश्वरी येताच ठाकुर । घेती दर्शन अंबेचे ।। २५ ।।
रामकृष्णांना प्रणाम करुन । निरोप घेउनी गेले जन ।
नौकेत बसता सर्वजण । आली आठवण एकाला ।। २६ ।।
आपण विसरलो पादत्राण । परत आला नौकेपासुन ।
तयाला पुसती रामकृष्ण । परत का बरे आलास ।। २७ ।।
तयाचे उत्तर परिसून । हासत बोलले रामकृष्ण ।
बरे झाले आले स्मरण । आधीच नौका सुटण्याच्या ।। २८ ।।
जर का नौका आधी सुटती । आठवण नंतर आली असती ।
तर आजच्या मौजेवरती । पडले असते विरजण ।। २९ ।।
ऐसे ऐकुनी भक्त लाजला । ठाकुरांना प्रणाम केला ।
रामकृष्ण पुसती तयाला । काय रे कशी आली मजा ।। १३० ।।



हरिनामाचा झाला गजर । भक्तिचा भरला बाजार ।
धुंद झाले नारीनर । ईश्वरविचार इतर नसे ।। ३१ ।।
भक्त म्हणाला खरोखर । आज आनंद जाहला फार ।
तयास सांगती श्रीठाकुर । भावावेश जाहला भक्तांना ।। ३२ ।।
जो जयांना झाला प्राप्त । त्यांची नावे घेत घेत ।
छोट्या नरेन्द्राची मात । निघता म्हणती रामकृष्ण ।। ३३ ।।
नुकताच येथे येउ लागला । भावावेश परि होई त्याला ।
आश्चर्यकारक विकास झाला । साधक चांगला तो आहे ।। ३४।।
भावावेश त्या दिनी होउन । राहिले नाही देहभान ।
म्हणतो सांप्रत माझे मन । होतसे लीन निराकारी ।। ३५ ।।
फार छान आहे छोकरा । एकदा जाउनी त्याच्या घरा ।
तुम्ही दोघे गप्पा करा । तव भक्त म्हणाला बाबाला ।। ३६ ।।
मजला नरेन्द्र दत्त आवडे । तितुका अन्य कोणी नावडे ।
यास्तव छोट्या नरेन्द्राकडे । इच्छा होइना जाण्याची ।। ३७ ।।
त्याचा करुनी तिरस्कार । सांगती तयाला श्रीठाकुर ।
एकांगी तू दिससी फार । हीनबुद्धीचे लक्षण हे ।। ३८ ।।
नाना प्रकारचे भक्तजन । सगळ्यांत मिळून मिसळुन ।
आनंद केला पाहिजे आपण । एकांगी कधिही असू नये ।। ३९।।
ही बुद्धी देई सोडुन । छोट्या नरेन्द्राकडे जाउन ।
येई तयासी गप्पा मारुन । भक्त म्हणाला जाइन मी ।। १४०।।
त्या दिवशी श्रम झाले अपार । आंग ठणकू लागले फार ।
दाह होउनी अस्वस्थ ठाकुर । ती रात्र काढिली जागून ।। ४१ ।।
कदाचित उत्सवाच्या ठिकाणी । नाना जनांचा संपर्क येउनी ।
अपवित्र जनांचा स्पर्श होउनी । झाला असावा गात्रदाह ।। ४२ ।।



उत्सवाच्या दुसऱ्या दिनी । गंगास्नानाची होती पर्वणी ।
अनेक लोक कलकत्त्याहुनी । यातले गंगास्नानास्तव ।। ४३ ।।
पर्वणीस करुनी गंगास्नान । रामकृष्णांचे घ्यावे दर्शन ।
ऐसा उद्देश मनात धरुन । आले जन दक्षिणेश्वरा ।। ४४ ।।
एक स्त्रीही त्या लोकांत । तिच्या धनाचा बंदोबस्त ।
करावयाला होती मागत । आशीर्वाद रामकृष्णांचा ।। ४५ ।।
मनात धरुनी क्षुद्र भावना । आशीर्वाद मागे ठाकुरांना ।
त्रास होतसे रामकृष्णांना । कामकामी जवळ असता ।। ४६ ।।
दुपारी ठाकुर करिता भोजन । हालली नाही त्यांच्यापासुन ।
फारच त्रासले रामकृष्ण । धकेना भोजन तयाप्रती ।। ४७ ।।
जरा ती होताच बाजूला । म्हणाले एका स्त्रीभक्ताला ।
भक्तिप्रेम मिळवावयाला । येथे येतात सर्वजण ।। ४८ ।।
इस्टेटीचा बंदोबस्त । येउनी या ठिकाणाप्रत ।
कसा होईल नाही कळत । काय म्हणावे आता तिला ।। ४९ ।।
मनात अनेक कामना धरुन । खाद्य पदार्थ आली घेउन ।
स्पर्श करवेना मजकडुन । त्या एकाही पदार्थाला ।। १५० ।।
अशा दिवशी समाधी लागुन । होतो आनंद केवढा महान ।
भाव तो राहातो दिवस तीन । आज पहाना काही नसे ।। ५१ ।।
येता मनात धरुनी भक्ती । ठाकुर त्यावर प्रसन्न होती ।
अपवित्र वासना धरुनी येती । तयाने त्रासती श्रीठाकुर ।। ५२ ।।
रामकृष्णांची गंगेवरती । काही विशेष असे भक्ती ।
येउनि जाता विषयी व्यक्ती । पाणी शिंपिती गंगेचे ।। ५३ ।।
विषयी लोकांमधे मिसळुन । कोणी घ्यावया येता दर्शन ।
तयास म्हणती येई पिउन । पवित्र पाणी गंगेचे ।। ५४ ।।



ठाकुर गंगाजलाप्रती । ब्रह्मवारी आदरे म्हणती ।
सांगती गंगाकिनारी व्यक्ती । राहता पवित्र होत असे ।। ५५ ।।
गंगाजलाला स्पर्शणारा । जेथपर्यंत वाहतो वारा ।
तो भूप्रदेश पवित्र सारा । भाग्यवान तेथे जे वसती ।। ५६ ।।
गंगामाईच्या कृपेकरुन । पवित्र होतसे अंत:करण ।
भक्ती तपश्चर्या साधन । कराया इच्छा होत असे ।। ५७ ।।
अंत:करणी धरुनी भक्ती । शुद्ध मनाने जे जन येती ।
त्यांवर ठाकुर करिती प्रीती । उन्नतीस नेती भक्तांना ।। ५८ ।।
यास्तव शुद्ध करुनी मन । भक्तिने भजावे रामकृष्ण ।
निश्चये करितील कल्याण । श्रीभगवान कृपासिंधू ।। ५९ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६० ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा एकोणचाळिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय चाळिसावा

जय जय श्रीपरमधामा । भक्तजनांच्या कल्पद्रुमा ।
श्रीरामकृष्ण परमात्मा । आत्महितार्थ वंदिले ।। १ ।।

पानिहाटीच्या उत्सवात । स्नानयात्रापर्वणीत ।
आणि भिजुनी पावसात । त्रास जाहला ठाकुरांना ।। २ ।।

नृत्यभजनाचे श्रम बहुत । पडले रामकृष्णांप्रत ।
राहुनी भावसमाधीत । स्वास्थ्य बिघडले बाबांचे ।। ३ ।।

डॉक्टरांनी तपासून । भक्तजनांना केले कथन ।
होउ न द्यावे समाधिमग्न । नातर परिणाम बरा नसे ।। ४ ।।

रामदत्त असे डॉक्टर । बालकस्वभाव श्रीठाकुर ।
दोष देउनी त्याच्यावर । म्हणती विरोध करिता तो ।। ५ ।।

तर मग मी पानिहाटीला । कशास जातो उत्सवाला ।
एक भक्त तेधवा आला । दर्शनाला ठाकुरांच्या ।। ६ ।।

बाबांच्या गळ्यास भक्तजन । देत होते लेप लावुन ।
म्हणती नका करू भाषण । समाधिमग्न होऊ नका ।। ७ ।।

बालकास जसे शिक्षा करुनी । ठायीच ठेवावे बसवुनी ।
मग ते बसते खिन्न होउनी । तसा प्रकार ठाकुरांचा ।। ८ ।।

भक्त तयांना नमन करुन । म्हणाला असे का दिसता खिन्न ।
हलुच ठाकुर बोलती वचन । बोट दाउनी गळ्याकडे ।। ९ ।।

हे बघ दुखणे वाढले फार । बोलु नको म्हणाले डॉक्टर ।
मग तो भक्त बोले त्यावर । कळले आहे मजप्रती ।। १० ।।



पानिहाटीच्या उत्सवापासुन । दुखणे गेले फार वाढुन ।
हे ऐकताच रामकृष्ण । बोलु लागले भक्ताला ।। ११ ।।

अपराध घडता अन्याकडुन । शिक्षा होता विनाकारण ।
बालक बोले रागावुन । तैसाच भाव ठाकुरांचा ।। १२ ।।

म्हणाले पाउस पडला वरुन । ओलीचिंब खालची जमिन ।
समीरहि वाहे सपाटून । तेथे लाविले नाचावया ।। १३ ।।

भक्त म्हणाला खरोखर । रामने चूक केली थोर ।
यापुढे काळजी घ्यावी फार । म्हणजे लवकर बरे व्हाल ।। १४ ।।

भक्ताचे ते बोलणे ऐकुन । ठाकुर पावले समाधान ।
म्हणती बोलणे बंद करुन । कैसे चालेल बाबा रे ।। १५ ।।

आताच बघ इतुक्या दुरुन । येथे आलास तू चालुन ।
न करिता तुझ्याशी भाषण । कैसे परत पाठवावे ।। १६ ।।

तव समजावुनी सांगे भक्त । त्यास काही नाही हरकत ।
आनंद आपुल्या दर्शनात । फार आम्हाला होत असे ।। १७ ।।

आपण चांगले जाहल्यावर । अनुज्ञा देतील डॉक्टर ।
मग बोलता येइल तोवर । आपण बोलणे टाळावे ।। १८ ।।

परंतु तयाचे ऐकितो कोण । डॉक्टर ठेविले गुंडाळुन ।
कष्ट स्वत:चे विसरुन । उपदेश करिती तयाप्रत ।। १९ ।।

करिताही अनेक उपचार । दुखणे हटेना अणुमात्र ।
उलट वाढले उत्तरोत्तर । अन्न जाइना घशाखाली ।। २० ।।

पातळ पदार्थ करिती सेवन । डॉक्टरांनी परीक्षा करुन ।
क्लर्जीमन्स सोअर थ्रोट म्हणुन । रोग ठरविला बाबांचा ।। २१ ।।

डॉक्टर म्हणती ताकिद देउन । जर बंद न कराल भाषण ।
नित्य व्हाल समाधिमग्न । तर रोग नाही हटणार ।। २२ ।।



परि या दोन अटींचे पालन । कैसे व्हावे ठाकुरांकडुन ।
यत्किंचित होताच उद्दीपन । समाधिमग्न ते होती ।। २३ ।।
संसारतापाने तापुन । शांती मिळविण्या येती जन ।
दयार्द्र होउनी रामकृष्ण । तास तास करिती उपदेश ।। २४ ।।
महाभावाच्या प्रेरणेमुळे । फारच थोडी झोप मिळे ।
बिछान्यावर आडवे झाले । तरिही जागेच ते असती ।। २५ ।।
सकाळी चार वाजता उठुन । करीत बसती नामस्मरण ।
करिती स्तुती प्रार्थना मनन । यापरी नित्यक्रम तयांचा ।। २६ ।।
दिवसास श्रम पडती फार । अनिद्रा असावी रात्रभर ।
अनेक वर्षे असा प्रकार । होउनी प्रकृती ढासळली ।। २७ ।।
कधी कधी भावावेशात । जगन्मातेला बोलती भांडत ।
काय आहे तुझ्या मनात । एवढी गर्दी जमविसी ।। २८ ।।
फुरसत मिळेना खावयाला । थोडीहि विश्रान्ती घ्यावयाला ।
धोपटसी या ढोलग्याला । तर काय नेम ते फुटण्याचा ।। २९ ।।
इतुकी गर्दी होतसे येथ । माझ्याने सहन नाही होत ।
प्राण कासावीस होतात । तूच जाणे काम तुझे ।। ३० ।।
महेन्द्रनाथ राम केदार । शक्ति दे यांना थोडीफार ।
म्हणजे त्यांकडे जाउनी नर । समजुनी घेतिल धर्मतत्त्वे ।। ३१ ।।
मग ते येथे येता जन । एक दोन गोष्टी करिता कथन ।
त्यांचे होईल समाधान । अशी तरी व्यवस्था आता करी ।। ३२ ।।
निरहंकारी असती ठाकुर । जगन्मातेचे कार्य समग्र ।
आपण तिच्या हातचे यंत्र । ऐसा भाव असे त्यांचा ।। ३३ ।।
सांगुन टाकिती रामकृष्ण । कलकत्त्यात जेव्हा थांबेन ।
अग्रभाग दुसऱ्यास देउन । जेव्हा खाईन अवशिष्ट ।। ३४ ।।



जेव्हा येउनी पुष्कळ जन । देवासारिखा देतील मान ।
तेव्हा शरिर हे अंतर्धान । पावेल निश्चये समजावे ।। ३५ ।।

एकेक गोष्ट आली घडुन । नरेन्द्र सत्त्वगुणी म्हणुन ।
अग्रभाग त्याला देउन । केला भक्षण अवशिष्ट ।। ३६ ।।

उशीर होता परतावयास । मधुन मधुन करिती वास ।
बलराम बसूच्या घरास । कलकत्त्यास अलीकडे ।। ३७ ।।

रामकृष्णांचे घ्यावया दर्शन । येउ लागले बहुत जन ।
उपदेश त्यांचा करिती श्रवण । देवासमान मान देती ।। ३८ ।।

भक्तजन आशावादी फार । वाटे बरे होतील लवकर ।
बोलावुनी निष्णात डॉक्टर । उत्तम उपचार करविती ।। ३९ ।।

एकदा बाबांच्या हातावर । स्त्रीभक्त घालित असता नीर ।
अकस्मात म्हणती तिला ठाकुर । गळा फारच दुखत असे ।। ४० ।।

तुज येतो तो मंत्र म्हणुनी । फिरव हात गळ्यावरुनी ।
आश्चर्यचकित झाली ऐकुनी । ठाकुरांना कळले कैसे ।। ४१ ।।

मंत्रोच्चार तिने केला । गळ्यावरुनी हात फिरवला ।
वृत्तान्त सांगता सारदामणिला । त्या तिला हासुनी सांगती ।। ४२ ।।

सर्वच गोष्टी त्यांना कळती । काय असे कोणाच्या चित्ती ।
कोणता हेतू धरुनी येती । ते सर्व जाणिती मनातिल ।। ४३ ।।

एक भक्त बागबाजारात । भक्तांना करी आमंत्रित ।
ठाकुरांनाही भोजनाप्रत । बोलाविले होते तयाने ।। ४४ ।।

भक्तजन आले भोजनास । ठाकुरांकडे धाडिला माणुस ।
तो तसाच परतुनी सकलांस । निरोप तयाने सांगितला ।। ४५ ।।

ठाकुरांच्या गळ्याप्रत । आज पडले आहे क्षत ।
त्यातुनी बाहेर पडिले रक्त । येउ न शकती भोजनाला ।। ४६ ।।



भक्त बसले भोजनास । नरेन्द्र झाला अत्यंत उदास ।
कारण विचारता तयास । खिन्न होउनी उत्तरला ।। ४७ ।।
अनेक वैद्यक ग्रंथ वाचले । डॉक्टरांनाही विचारिले ।
त्यामुळे मजला निश्चित कळले । कंठरोगच हा आहे ।। ४८ ।।
असल्या कंठरोगापासुन । कॅन्सर होतसे उत्पन्न ।
आज रक्त पडिले ऐकुन । खात्री झाली याविषयी ।। ४९ ।।
असाध्य रोग असे कॅन्सर । त्याने आजारी असती ठाकुर ।
जगात अजुनी या रोगावर । उपाय नाही सापडला ।। ५० ।।
भक्तजनांनी बेत केला । ठाकुरांस न्यावे कलकत्त्याला ।
उपचार त्यावर करावयाला । घेतला बंगला भाड्याने ।। ५१ ।।
बागबाजारात होते घर । पाहताच तो निवास ठाकुर ।
राहावयाला देती नकार । गेले घरास बलरामाच्या ।। ५२ ।।
रामकृष्ण येता घराला । आनंद वाटला बलरामाला ।
म्हणे दुसरा चांगला बंगला । मिळेपर्यंत येथे राहा ।। ५३ ।।
प्रसिद्ध डॉक्टर बोलावुन । त्याकरवी करविले निदान ।
बराच वेळ परीक्षा करुन । रोग कॅन्सर ठरविला ।। ५४ ।।
न सोसे औषध ॲलोपथिक । सुरू केले होमिओपथिक ।
महेन्द्रलाल सरकार एक । प्रसिद्ध डॉक्टर बोलाविला ।। ५५ ।।
श्यामपुकुर विभागात । भाड्याने घर घेउनी तेथ ।
रामकृष्णांस नेती भक्त । तेथे उपचार करावया ।। ५६ ।।
तेथे डॉक्टर सरकार येउन । लक्षपूर्वक परीक्षा करुन ।
रामकृष्णांना औषध देउन । व्हिजिट फी त्याने घेतली ।। ५७ ।।
दुसऱ्या दिवशी डॉक्टराला । समस्त वृत्तान्त जेव्हा कळला ।
भक्त खर्च करितात सगळा । त्यांनीच आणिले ठाकुरांना ।। ५८ ।।



भक्तांची गुरुभक्ती पाहुन । डॉक्टर गेले भारावुन ।
फी घेण्यासही नकार देउन । म्हणाले साह्य मी करितो ।। ५९ ।।

तुमचे सत्कार्य असे महान । थोडीफार मदत मी करिन ।
तुमच्याचपैकी एकजण । आता समजा मजलागी ।। ६० ।।

शहरात कळले सकळांस । दक्षिणेश्वरचे परमहंस ।
इकडेच आले राहावयास । झुंडी लोटिल्या लोकांच्या ।। ६१ ।।

बोलु नका म्हणती डॉक्टर । भक्त म्हणती न बोला फार ।
दुर्लक्ष तिकडे करुनी ठाकुर । उपदेश करिती सकलांना ।। ६२ ।।

वाटे दक्षिणेश्वरालाही । येण्यास ज्यांना सवड नाही ।
तयांच्या दारीच लवलाही । पातले स्वत:च भगवान ।। ६३ ।।

अगदी सकाळी उठल्यापासुन । पुष्कळ रात्र जाई होउन ।
तोवर अविरत येती जन । तयांना करिती उपदेश ।। ६४ ।।

रामकृष्णांच्या शुश्रुषेस । सारदामणी माताजीस ।
आणिले श्यामपुकुरास । विचार करुनी भक्तांनी ।। ६५ ।।

देवी सकाळी तीनला उठुनी । सर्व विधी घेती उरकुनी ।
प्रात:काळी स्नान करुनी । बसती जाउनि खोलीमधे ।। ६६ ।।

रात्रीला अकरापर्यंत । बाबांसाठी बनविती पदार्थ ।
आणि जप तप ध्यान करित । घालविती त्या पूर्ण दिन ।। ६७ ।।

खाद्यपदार्थ तयार करुन । निरोप देती पाठवून ।
मंडळी तेथुनी जाता उठुन । घालती भोजन बाबांला ।। ६८ ।।

सारदादेवी कामे करिती । परि कोणाला नच दिसती ।
केव्हा उठती केव्हा झोपती । ठाउक होइना कोणाला ।। ६९ ।।

नरेन्द्रनाथ शशी राखाल । इत्यादि भक्त असती जवळ ।
सेवा शुश्रुषा करिती सकळ । काळजि घेती प्रकृतीची ।। ७० ।।



डॉक्टर गेले होते सांगुन । रोग असे हा संसर्गजन्य ।
भिऊ लागले कित्येक जण । जवळ जावया बाबांच्या ।। ७१ ।।

त्यामुळे बाबांच्या शुश्रुषेत । टाळाटाळ कोणी करित ।
नरेन्द्रच्या येता लक्षात । विलक्षण कृत्य तो करी ।। ७२ ।।

एकदा डॉक्टर क्षत धुवुन । रक्त पू पाणी आदि घाण ।
एका ग्लासामधे ठेवुन । गेले निघुनी दुसरीकडे ।। ७३ ।।

मंडळी तेथेच होती बसुन । नरेन्द्रने तो ग्लास घेउन ।
सर्वांसमक्ष तयाने घाण । शांतपणे पिउनी टाकिली ।। ७४ ।।

करणी तयाची विलक्षण । चकित झाले सर्वजण ।
भीती पळाली तेव्हापासुन । उदंड उत्साह संचरला ।। ७५ ।।

मग सद्गुरूंच्या सेवेत । भक्त गुंडाळुनी स्वार्थ ।
मनोभावाने सेवा करित । अहर्निश श्रीरामकृष्णांची ।। ७६ ।।

भक्तजनांनी ठाकुरांस । आणुनी ठेविले कलकत्त्यास ।
औषधोपचार करावयास । ते चालविती खर्च सारा ।। ७७ ।।

रामकृष्णांच्या भक्त जनांत । नव्हते कोणी फार श्रीमंत ।
रोग बरा होईपर्यंत । खर्च करणे अशक्य असे ।। ७८ ।।

भक्तांच्या मनात असे भीती । बाबांची आध्यात्मिक शक्ती ।
रोगासवे जर घटेल ती । तर भक्ती आटेल बहुतांची ।। ७९ ।।

एवढा खर्च चालेल कैसा । कसा उभा करावा पैसा ।
मनात विचार येउनी ऐसा । चिंता वाटे भक्तजना ।। ८० ।।

परी जैसे लोटती दिवस । तसा आध्यात्मिक विकास ।
अधिकच येता प्रत्ययास । चिंता निमाली भक्तांची ।। ८१ ।।

नवाच उत्साह संचारला । नवे बळ आले अंगाला ।
भक्तजन लागले सेवेला । स्वार्थ आपुला विसरून ।। ८२ ।।



वाटले इतर कार्यासमान । रामकृष्णांचे आजारीपण ।
असे कराया लोककल्याण । आत्मज्ञान द्यावयाला ।। ८३ ।।

रामकृष्णांनी आजारीपण । विशिष्ट कार्य करावे म्हणुन ।
घेतले असावे ओढवून । लीला अगम्य ठाकुरांची ।। ८४ ।।

प्रियतम तयांना भक्तजन । त्यांना सेवेचा अधिकार देउन ।
सकलांचे कराया कल्याण । रोगी होउनि ते आले ।। ८५ ।।

दयामय असती भगवान । त्यांचे कार्य जाणे कोण ।
कितिही दिसो ते सामान्य । जनकल्याणास्तव ते असते ।। ८६ ।।

ज्यांनी दिला सेवाधिकार । बजाविण्याचे सामर्थ्य थोर ।
आपणास देतिल श्रीठाकुर । ऐसे विचार भक्त करिती ।। ८७ ।।

कोणी म्हणती विवाहात । गृहस्थ व्यवस्था करितात ।
त्यासारखी व्यवस्था सांप्रत । करू काही काळजी नको ।।८८।।

कोणी म्हणती घरे असती । आम्ही वेळ येता निश्चिती ।
विकुनी उभारू संपत्ती । भाविती चित्ती येणेपरी ।। ८९ ।।

घरभाडे देत असे सुरेन्द्र । बलराम बोस रामचंद्र ।
गिरीश घोष आणि महेन्द्र । इतर खर्च चालविती ।। ९० ।।

येतसे डॉक्टर सरकार । करावयाला उपचार ।
रामकृष्णांचा बोध मधुर । ऐकता त्यात रमत असे ।। ९१ ।।

चार चार तासपर्यंत । बसत असे तो गोष्टी ऐकत ।
अविट गोडी बोधामृतात । उठावे ऐसेही वाटेना ।। ९२ ।।

एकदा म्हणाले रामकृष्ण । पूर्ण ज्ञान्याचे असे लक्षण ।
विवाद जातसे बंद होउन । तव बोले डॉक्टर सरकार ।। ९३ ।।

असा ज्ञानी आहेच कोण । मौनव्रत तर अजुनी आपण ।
कोठे केले आहे धारण । ठाकुर तयास उत्तरती ।। ९४ ।।



पाणीच असते स्थिर असता । पाणीच राहते कधी हालता ।
आणि त्यावर लाटा उठता । तरिही पाणीच राहतसे ।। ९५ ।।

शुद्ध बुद्धी आणि शुद्ध मन । या रूपाने श्रीभगवान ।
भूतमात्रात नारायण । अंतर्यामी वसत असे ।। ९६ ।।

मी यंत्र तो चालविणारा । मी घर त्यात तो राहणारा ।
मी चाले तो चालविणारा । भाव सारा माझा असा ।। ९७ ।।

त्यावर म्हणाला सरकार । मग का म्हणता वरचेवर ।
एवढा रोग हा बरा कर । तव ठाकुर उत्तर देती ।। ९८ ।।

घट असता सरोवरात । पाणीच असे बाहेर आत ।
एकरूप परि नाही होत । आकार जोवर घटाचा ।। ९९ ।।

मात्र घट जाता भंगुनी । घटातिल ते अल्प पाणी ।
जातसे एकरूप होउनी । जलासी सरोवराच्या ।। १०० ।।

डॉक्टर विचारी ठाकुरांला । हा मीपणा कोणी ठेविला ।
रामकृष्ण म्हणती तयाला । ठेविला आहे ईश्वराने ।। १ ।।

तसा तयाने का ठेविला । ठाउक नाही हे कोणाला ।
साक्षात्कार तुम्हास झाला । तर संशय उरत नसे ।। २ ।।

डॉक्टर दोन गोळ्या देउन । वदता झाला विनोद करुन ।
एक पुरुष ही प्रकृती अन्य । ऐकुनी भक्तजन हासती ।। ३ ।।

हासुनी म्हणाले रामकृष्ण । दोघांचे असे एकच स्थान ।
पुरुष प्रकृती असती अभिन्न । अद्वैतज्ञान होता कळे ।। ४ ।।

आणिक काय करू कथन । परमेश्वरावर ठेवा मन ।
यथाशक्ती करावे ध्यान । म्हणजे कल्याण होत असे ।। ५ ।।

एकदा डॉक्टर सरकार । गप्पा करीत बसला फार ।
गिरीश म्हणाला तास चार । येउनि झाले तुम्हाप्रती ।। ६ ।।



आज आणखी व्हिजीटला । जायचे नाही काय तुम्हाला ।
ऐकताच बेउनि भानाला । सांगु लागला सरकार ।। ७ ।।

परमहंसाची संगती लागुन । परमहंस मी गेलो होउन ।
कसची व्हिजीट कसचे रुग्ण । न राहे भानहि कामाचे ।। ८ ।।

ठाकुर म्हणती डॉक्टराप्रत । कर्मनाशा नामक नदीत ।
बुडी मारता कर्म समस्त । नाश होउनी जात असे ।। ९ ।।

मग पुनरपि त्याच्याकडुन । न होई कर्मच उत्पन्न ।
यापरी खुलासा परिसुन । सकळ भक्तजन हासती ।। ११० ।।

डॉक्टरास म्हणती रामकृष्ण । आता रोग हा झाला म्हणुन ।
करिता येइना ईशगुणगान । मजला लवकर बरे करा ।। ११ ।।

डॉक्टर म्हणाला बाबांलागुन । कशाला पाहिजे नामगुणगान ।
केवळ ध्यान करावे आपण । तेच साधन समजावे ।। १२ ।।

त्याला म्हणती रामकृष्ण । एकांगी नसावे आपण ।
मी तर करितो भजन पूजन । करितो जप ध्यान कधी कधी ।। १३ ।।

कधी करितो नामस्मरण । कधी करितसे स्तुती गायन ।
आनंदाने करितो नर्तन । कधी प्रार्थना मी करितो ।। १४ ।।

तुमचा मुलगा अमृतनाथ । अवतारास नाही मानत ।
वाइट काहीच नसे यात । श्रद्धा असावी कुठेतरी ।। १५ ।।

ईश्वर मानिता साकार । अथवा मानिता निराकार ।
अवश्य मिळतो परमेश्वर । विश्वास तयावर मात्र हवा ।। १६ ।।

मानवाची बुद्धी सांत । ईश्वर तर असे अनंत ।
शरण जाउनी तयाप्रत । धावा करावा मनोभावे ।। १७ ।।

ईश्वर अंतर्यामीच वसे । व्याकुळतेची हाक परिसे ।
पण व्याकुळता आवश्यक असे । मार्ग मग असो कुठलाही ।। १८ ।।



साखरेची केली वडी । असो वाटोळी किंवा वाकडी ।
मुखात टाकिता देई गोडी । आकाराची प्रौढी नसे ।। १९ ।।
तेवि हृदयात श्रद्धा असता । अंत:करणात व्याकुळता ।
कोणत्याही मार्गे जाता । ईश्वरप्राप्ती होत असे ।। १२० ।।
तुमचा मुलगा असे चांगला । डॉक्टर म्हणे तो तुमचा चेला
ठाकुर म्हणती कोणिही साला । माझा चेला नसे बरे ।। २१ ।।
मी सगळ्यांचा चेला सान । ईश्वराचे सर्व संतान ।
चांदोमामास जसे आपण । सर्वजण मामाच मानितो ।। २२ ।।
एकदा येउनी महेन्द्रनाथ । रामकृष्णांना सांगे मात ।
गेलो असता दवाखान्यात । डॉक्टर दिसले सुकलेले ।। २३ ।।
महिमाचरण डॉक्टरांप्रती । म्हणाला कराया तुमची फजिती ।
परमहंस आजारी होती । ऐट कशाला मारतसा ।। २४ ।।
डॉक्टर सांगती वाजता तीन । मी रात्रीस जागा होउन ।
परमहंसांचेच विचार येउन । झोप न आली त्यानंतर ।। २५ ।।
त्यांचेच विचार येती मनात । विचार करिता झाली प्रभात ।
रामकृष्णदेव म्हणती हासत । डॉक्टर इंग्रजी शिकलेला ।। २६ ।।
माझे चिंतन करीत जाई । हे सांगण्याची सोय नाही ।
आपणच चिंतन करीत राही । हे तर फार बरे असे ।। २७ ।।
एकदा डॉक्टर सरकार येउन । ठाकुरांना करी कथन ।
तुमच्या विषयीच करी चिंतन । माझे मन काल रात्रीस ।। २८ ।।
झिम झिम पाउस होता पडत । थंड हवा होती वाहत ।
वाटले खोलीची दारे सांप्रत । बंद असती वा उघडीच ।। २९ ।।
आपुली काळजी करी डॉक्टर । प्रसन्न होउनी म्हणती ठाकुर ।
जो पर्यंत हे आहे शरिर । तोवर प्रयत्न करणे असे ।। १३० ।।



तथापि मजला दिसुनी येत । देह निराळा आत्मा अलिप्त ।
कामकांचनापासुनी विरक्त । पुरुषास यापरी दिसत असे ।। ३१ ।।
नारळामधले पाणी सुकले । मग करवंटीपासुनी सुटले ।
आतले डोल निराळे झाले । वेगळी पडली करवंटी ।। ३२ ।।
तरवार ठेविली म्यानात । ती म्यान नाही होत ।
तैसा देहापासुनी अलिप्त । आत्मा भासतो त्याग्याला ।। ३३ ।।
म्हणुनी जरि या दुखण्यात । क्लेश अत्यंत पडतात ।
तरिही नाहीच काढवत । आईजवळ गोष्ट अशी ।। ३४ ।।
कांचनत्याग करावयाला । सांगितले नाही गृहस्थाला ।
त्याने मनाने पाहिजे केला । त्याग कामकांचनाचा ।। ३५ ।।
पूर्ण त्याग करी संन्यासी । मनाने त्याग गृहस्थासी ।
एक दोन मुले होता त्यासी । विषयसंग त्याने सोडावा ।। ३६ ।।
नरेन्द्रनाथ प्रणाम करुनी । ठाकुरांजवळी बैसला येउनी ।
वडिल वारले तेव्हापासुनी । होती हाल कुटुंबाचे ।। ३७ ।।
खर्च तसाच राहिला समस्त । परंतु काही नसे मिळकत ।
ज्येष्ठ पुत्र नरेन्द्रनाथ । त्यावर भार सर्व असे ।। ३८ ।।
नरेन्द्रनाथ करी प्रयत्न । अन्नवस्त्रांची व्यवस्था करुन ।
मग मोकळे व्हावे आपण । रामकृष्ण जाणती ते सर्व ।। ३९ ।।
नरेन्द्राकडे प्रेमाने पाहुन । महेन्द्रनाथाकडे वळुन ।
बोलु लागले रामकृष्ण । उच्च अवस्था नरेन्द्रची ।। १४० ।।
अशी असुनी त्याची अवस्था । का न सुटावी त्याची चिंता ।
ईश्वराकडे लक्ष लाविता । काय चिंता तो न करी ।। ४१ ।।
तीव्र वैराग्य होता प्राप्त । हाही विचार नाही राहत ।
घरचा करुनी बंदोबस्त । करीन साधना स्वस्थपणे ।। ४२ ।।



एकदा पुसे केशव सेन । घरची नीट व्यवस्था लावुन ।
कोणी म्हणेल साधना करिन । तर ते शक्य नसे काय ।। ४३ ।।
मग मी म्हणालो तयाप्रत । तीव्र वैराग्य होता प्राप्त ।
खड्ड्यासारिखा संसार भासत । आमेष्ट दिसती सापापरी ।। ४४ ।।
तेधवा विचार न करी मन । आधी पुरेसे धन मिळवुन ।
पुरेसे अन्नवस्त्र जमवुन । मग त्यागावा संसार ।। ४५ ।।
एका महिलेस एके काळी । शोकजनक वार्ता कळली ।
रडावयाची तयारी केली । काढिली नथ नाकातुनी ।। ४६ ।।
नथ नीट बांधुनी पदरात । अरे देवा रे असे म्हणत ।
धक्का न लागावा देहाप्रत । यापरी पडली भूमीवर ।। ४७ ।।
खरोखर शोक असता जरी । न राहती अशी सावधगिरी ।
नरेन्द्र स्तब्ध होता परी । गोष्ट झोंबली त्याच्या मना ।। ४८ ।।
अधिकाधिक लोक तेथे येती । ठाकुर सर्वांस बोध करिती ।
डॉक्टर बोलू नका म्हणती । क्षिती न बाळगती ते त्याची ।। ४९ ।।
इकडे प्रकृती होतसे क्षीण । क्लेशहि होती अति दारुण ।
परंतु जो जो येतसे जन । इच्छिती कल्याण तयाचे ।। १५० ।।
ठाकुर म्हणती महेन्द्रास । अमावस्या आश्विन मास ।
कालिपूजेचा आज दिवस । पूजन करू जगन्मातेचे ।। ५१ ।।
सकळ भक्तमंडळी जमली । पूजनाची तयारी केली ।
वाटले ठाकुर संध्याकाळी । करितील पूजन अंबेचे ।। ५२ ।।
सायंकाळ गेली उलटुन । तेधवा बाबा बैसले उठुन ।
रामकृष्ण करितील पूजन । म्हणुनी भक्तजनी उत्सुकता ।। ५३ ।।
भक्तास म्हणती रामकृष्ण । थोडा वेळ करा ध्यान ।
ध्यान केव्हाच गेले संपुन । परंतु पूजेला ठिकाणा नसे ।। ५४ ।।



गिरीशने मग तर्क केला । भक्तजनांनी ठाकुरांला ।
जगदंबाज्ञानाने पूजावयाला । इच्छितात काय रामकृष्ण ।। ५५ ।।
ऐसा विचार येताच मनी । भक्ती भरली अंतःकरणी ।
अकस्मात मग त्याने उठुनी । जय रामकृष्ण घोष केला ।। ५६ ।।
देविच्या करिता केली जी माला । अर्पिली श्रीरामकृष्णांला ।
महेन्द्रनाथ लगेच उठला । त्याने वाहिली गंधफुले ।। ५७ ।।
राम राखाल सर्व मंडळी । जयघोष करिती त्या काळी ।
चरणी वाहती पुष्पांजली । इतुक्यात उठला निरंजन ।। ५८ ।।
वदत वदत जय ब्रह्ममयी । साष्टांग नमन केले पायी ।
मग ते भक्तजन सर्वही । करिती जयघोष उच्चस्वरे ।। ५९ ।।
इकडे जयघोष असे होत । रामकृष्ण होते समाधीत ।
त्यांचे रूपांतर झाले अद्‌भुत । तेज विराजत वदनावर ।। १६० ।।
भक्तजनांना अभय देत । त्यापरी वरद झाला हस्त ।
ज्योतिर्मय वदनमंडळ होत । चिन्ह दिसेना रोगाचे ।। ६१ ।।
रामकृष्णांच्या शरीरात । जगन्माता झाली आविर्भुत ।
भक्तजनांची ओतप्रोत । हृदये भरली भक्तीने ।। ६२ ।।
हात जोडुनी भक्तजन । गाउ लागले स्तुतिपर गान ।
बऱ्याच वेळाने रामकृष्ण । आले देहभानावर ।। ६३ ।।
भक्त नैवेद्य दाखविती । बाबा अंश ग्रहण करिती ।
महाप्रसाद तो सकलांप्रती । भक्त वाटती अविलंबे ।। ६४ ।।
यापरी अद्‌भुत कालीपूजन । करुनी भक्तजन झाले धन्य ।
पूजिता भगवान रामकृष्ण । पूजन घडे जगदंबेचे ।। ६५ ।।
रामकृष्णांच्या शरीरात । देवदेवता वसती समस्त ।
यास्तव पूजिता भगवंत । घडतसे पूजन सकलांचे ।। ६६ ।।



ब्रह्मस्वरूप श्रीनारायण । होउनि आले रामकृष्ण ।
सहस्रधा त्यांना वंदन । मन करो चिंतन नित्य त्यांचे ।। ६७ ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १६८ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा चाळिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय एकेचाळिसावा

श्रीरामकृष्णा परमेशा । मनात उद्‌भुत झाली आशा ।
दर्शन घ्यावे पुरवा मनिषा । नमन सर्वेशा करित असे ।। १ ।।

आजार फारच वाढला । कष्ट होती ठाकुरांला ।
डॉक्टरांनी सल्ला दिला । घर बदलुनी पाहावे ।। २ ।।

भक्तजनांना म्हणती ठाकुर । काशीपुर भागात पाहा घर ।
त्या दिनी एक हवेशीर । बंगला घेतला भाड्याने ।। ३ ।।

ठाकुर आले नव्या घरात । सुधारणा दिसे प्रकृतीत ।
थोडेफार अन्न ते घेत । शक्ति आली चालण्याची ।। ४ ।।

प्रकृतीत सुधारणा पाहुन । आनंद पावले भक्तजन ।
परंतु थोडे लोटता दिन । रोगाने उचल घेतली ।। ५ ।।

डॉक्टर कित्येक बदलून । निरनिराळी औषधे देउन ।
जेधवा आला नाही गुण । भक्तजन चिंताक्रांत झाले ।। ६ ।।

मेडिकल कॉलेजचा प्रिन्सिपॉल । नामे कोट्स डॉक्टर कुशल ।
आणवुनी तयाला तत्काळ । परीक्षा करविती रोगाची ।। ७ ।।

डॉक्टर पूर्ण परीक्षा करुन । रोग असाध्य दे सांगुन ।
चिंता करू लागले जन । तथापि आशा न सोडिती ।। ८ ।।

बाबांस वेदना फार होउनी । फोड येई क्षताचे स्थानी ।
श्वासोच्छ्वास करण्यालागुनी । फारच त्रास होत असे ।। ९ ।।

अन्न जाइना पोटात । दूध पिणेही कठिण होत ।
तो फोड फुटेपर्यंत । वेदना होती प्राणांतिक ।। १० ।।



काहि दिवसांनी फोड फुटुन । पू बाहेर पडे त्यातुन ।
मग त्या वेदना अति दारुण । थोड्याफार कमी होती ।। ११ ।।

काही केल्या रोग हटेना । अत्यंत दारुण होती वेदना ।
फिकिर नव्हती ठाकुरांना । रोग बरा व्हावयाची ।। १२ ।।

ठाकुर झाले नाही उदास । वदनी झळकत असे हास्य ।
येइल त्यास करिती उपदेश । अव्याहत क्रम तो त्यांचा ।। १३ ।।

बोलू नका म्हणता भक्ताने । उत्तर देती तयाकारणे ।
देह जाणे दु:ख जाणे । मन आनंदाने भरो ।। १४ ।।

येउ लागले लोक बहुत । ते दु:ख विसरुनी क्षणात ।
ईश्वरीय गोष्टी करू लागत । करुणा हृदयात अपार असे ।। १५ ।।

एकदा महेन्द्रनाथा म्हणती । ईश्वरीय रूपांची दर्शने होती ।
भाव आणि समाधी लागती । मग हे दुखणे का बरे ।। १६ ।।

महेन्द्र म्हणाला आपणास । खरेच अत्यंत होतात क्लेश ।
तथापि त्यातही उद्देश । असावा ऐसे वाटे मला ।। १७ ।।

अवस्थेत होतसे परिवर्तन । निराकारास वळे मन ।
त्यावर बोलती रामकृष्ण । मलाही तैसेच वाटतसे ।। १८ ।।

उपदेश बंद पडे सांप्रत । आता बोध नाही करवत ।
राममय दिसू लागले जगत । वाटते बोलू मी कोणासी ।। १९ ।।

हे घर घेतल्यापासुन । कितीतरी येऊ लागले जन ।
महेन्द्र वदला येई दिसुन । आणखीही एक उद्देश ।। २० ।।


तो असे लोककल्याण । एक वर्ष तपस्या करुन ।
लाभ न होय तो भक्तजन । लाभले थोड्याच दिवसांत ।। २१ ।।

ठाकुर निरंजनाला म्हणती । काय वाटते तुझिया चित्ती ।
तो म्हणे वाटत होती प्रीती । शरणागति आता वाटतसे ।। २२ ।।





कल्पतरू श्रीरामकृष्ण



अंत्यसमयी श्रीरामकृष्णांच्या अवतारित्वाबद्दल नरेन्द्राच्या मनात संशय येताच श्रीरामकृष्ण
'जो राम झाला, जो कृष्ण झाला, तोच यावेळी ह्या शरीरात रामकृष्ण झाला आहे',
असा स्पष्ट निर्वाळा देऊन संशय दूर करतात.

ठाकुरांची समाधी लागली । काहि वेळाने ती उतरली ।
भगवान सांगती या वेळी । दिसले मजला समाधीत ।। २३ ।।

हे चराचर साकाराकडुन । निराकारात होतसे विलिन ।
वाटते पुष्कळ करावे कथन । तथापि काही न बोलवे ।। २४ ।।

निराकाराकडे मन जाय । ते काय होण्यासाठी लय ।
प्रश्न परिसुनी आश्चर्य । वाटले महेन्द्रनाथाला ।। २५ ।।

म्हणती परीक्षा तू म्हणतोस । तेच खरे आहे खास ।
जन जे सोडुनी संसारास । शुश्रुषेस येथे पातले ।। २६ ।।

ते तर भक्त अंतरंग । जे वरवर दाविती सोंग ।
कसे काय? म्हणती, ते बहिरंग । यापरि परीक्षा होत असे ।। २७ ।।

कधि प्रेमाची लयलूट । ठाकुर करिती सरसकट ।
निरंजनास म्हणती तात । बसुदे तुझिया मांडीवर ।। २८ ।।

कालीपदच्या वक्षावर । ठाकुर फिरवुनी अपुला कर ।
म्हणती चैतन्य लाभो सत्वर । तयाची हनुवटी कुरवाळिती ।। २९ ।।

करिती भक्ती मनापासुनी । अशा भक्तांना या ठिकाणी ।
आलेच पाहिजे ऐसे म्हणुनी । आपुला चरण लांबविती ।। ३० ।।

त्या पदकमलाचा स्पर्श । होताच भक्तहृदयास ।
आनंदाने होत बेहोष । बसला चरण कवटाळुन ।। ३१ ।।

अश्रु लोटले लोचनातुन । तो वदे सद्गदित होउन ।
दयासागर श्रीभगवान । केवढी कृपा ही आपुली ।। ३२ ।।

दक्षिणेश्वरी भक्तांलागुन । आधिच केले होते कथन ।
प्रथम प्रेमाचे भांडे फोडिन । मग करीन विसर्जन देहाचे ।। ३३ ।।

आता प्रेमाची मधुन मधुन । लयलूट करिती रामकृष्ण ।
अनेक जन्मांत पुण्य करुन । भगवत्प्रेम लाभतसे ।। ३४ ।।



रामकृष्णांचे भक्त तरुण । जवळ राहती रात्रंदिन ।
गृहस्थभक्त जाउन येउन । सेवा करिती ठाकुरांची ।। ३५ ।।
अठराशे शार्ऐंशी इसवी सन । जानेवारिचा पहिला दिन ।
त्या दिनी सुट्टी होती म्हणुन । बहुत भक्तजन पातले ।। ३६ ।।
श्रीरामकृष्णदेवांप्रत । थोडे बरे होते वाटत ।
तयांनी केली प्रदर्शित । इच्छा बागेत फिरण्याची ।। ३७ ।।
बागेत येताच रामकृष्ण । आनंदित झाले भक्तजन ।
हॉलमधे काही जण । काही असती बगीच्यात ।। ३८ ।।
दुपारचे वाजता तीन । धोतर नेसुनी रामकृष्ण ।
अंगरखा अंगात घालुन । चादर लपेटुनी घेतली ।। ३९ ।।
कानटोपी मस्तकास । जोडा घातिला पायांस ।
लाटूसमवेत सावकाश । फिरण्यास निघाले बागेकडे ।। ४० ।।
नरेन्द्रादी भक्त तरुण । रात्रीस झाले जागरण ।
खोलीमधे होते निजुन । इतर बहुतेक निघाले ।। ४१ ।।
ठाकुरांसवे असती जन । म्हणुनि लाटू ये परतुन ।
खोली आणि अंथरुण । साफ कराया लागला ।। ४२ ।।
कोणाला कधिही ठाकुर । म्हणू न देती अवतार ।
म्हणती यास काय कळणार । अवतार म्हणावे कोणाला ।। ४३ ।।
येथे येउनी गेले पंडित । वेदशास्त्रपारंगत ।
आयुष्य वेचिले ज्ञानार्जनात । अवतार बोलुनी ते गेले ।। ४४ ।।
आता अवतार म्हणुनी पुकार । करिती कोणी वकील डॉक्टर ।
कोणी चालविती थिएटर । कोणी नोकर शासनाचे ।। ४५ ।।
ऐसे लोक येथे येउन । अवतार म्हणती न जाणुन ।
घेणे अवतार म्हणवून । आता तुच्छ वाटतसे ।। ४६ ।।



गृहस्थभक्त गिरीश घोष । तयाचा प्रबळ विश्वास ।
तो तर साक्षात परमेश । मानितसे रामकृष्णांना ।। ४७ ।।
उघड उघड तो करी कथन । कृपाळू होउनी भगवान ।
जिवांचा उद्धार करावा म्हणुन । आले घेउनी अवतार ।। ४८ ।।
जरि निषेध करिती ठाकुर । तरिही तो न करी फिकिर ।
रामकृष्णांचा अवतार । म्हणुनी उल्लेख करितसे ।। ४९ ।।
भक्तजनांच्या समवेत । गिरीशही होता बागेत ।
रामकृष्ण फिरत फिरत । गिरीशचंद्राजवळी आले ।। ५० ।।
ठाकुर म्हणती गिरीशाला । असे काय रे कळले तुजला ।
सांगत सुटतोस ज्याला त्याला । ईश्वरावतार म्हणूनिया ।। ५१ ।।
अकस्मात तो प्रश्न ऐकिला । गिरीश नाही गोंधळला ।
लगबगीने समोर आला । श्रीरामकृष्णदेवांच्या ।। ५२ ।।
पायापासी गुडघे टेकुनी । आपुले दोन्ही कर जोडुनी ।
रामकृष्णांच्याकडे पाहुनी । सद्गदित होउनी वदला तो ।। ५३ ।।
व्यास वाल्मिकी ऋषी महान । महिमा वर्णिता गेले थकुन ।
य:कश्चित पामर मी अज्ञान । सांगु शकेन काय तेथे ।। ५४ ।।
ते श्रद्धेचे बोल ऐकुन । रोमांचित झाले रामकृष्ण ।
उचंबळले अंत:करण । उच्च भूमिला मन गेले ।। ५५ ।।
गाढ समाधी मग लागली । तेज झळके वदनमंडळी ।
गिरीशच्या भक्तीस भरती आली । घोष करी जय रामकृष्ण ।। ५६ ।।
बाबांची पदधूली सत्वर । घेउ लागला मस्तकावर ।
अर्धबाह्य दशेत ठाकुर । प्राप्त जाहले अविलंबे ।। ५७ ।।
तेज:पुंज झाले वदन । भक्तमंडळीकडे पाहुन ।
बोलु लागले रामकृष्ण । तुम्हास आणिक काय सांगू ।। ५८ ।।



तुम्हा सर्व भक्तांलागुन । आता प्राप्त होवो चैतन्य ।
यापरी वरप्रदान ऐकुन । आनंद पावली मंडळी ।। ५९ ।।
घोष करिती सर्व मिळुन । जय जय श्रीरामकृष्ण ।
कोणी घालिती लोटांगण । कोणी कुसुमे उधळिती ।। ६० ।।
कोणी पदधूली घेउन । चरणकमली मस्तक ठेवुन ।
कोणी करिती साष्टांग नमन । एकजण उभा राहिला ।। ६१ ।।
म्हणती वक्षास हात लावुन । प्राप्त होवो तुला चैतन्य ।
दुसरा उभा नमन करुन । त्याला तसाच वर देती ।। ६२ ।।
जो जो करी चरणवंदन । त्याला स्पर्श करून ।
देउ लागले आशीर्वचन । कृपाळू भगवान त्या वेळी ।। ६३ ।।
रामकृष्णांचा स्पर्श अद्‌भुत । सकल भक्तांच्या अंतरात ।
भावांतर होउनी क्षणात । आनंदाब्धीत रमती ते ।। ६४ ।।
कोणी कोणी हसु लागला । कोणी रडण्यास आरंभ केला ।
कोणी ध्यानात निमग्न झाला । कोणी टाळी वाजविती ।। ६५ ।।
रामकृष्ण कृपासागर । कृपेचा वर्षाव सर्वांवर ।
अध्यात्मधन लुटती उदार । भाग्यवान नर ते लाभती ।। ६६ ।।
कोणी मोठ्याने ओरडुन । कृपालाभाने व्हावया धन्य ।
इतरांस करी पाचारण । ऐसा प्रकार चालला ।। ६७ ।।
आरडाओरड ती ऐकुन । निजलेलेही भक्तजन ।
आले त्या स्थळी धाउन । पाहती काय जाहले तिथे ।। ६८ ।।
रामकृष्णांचे वेधुनी अंग । प्रेमवेड्यांची लागली रांग ।
भक्तजन प्याले भक्तिभांग । स्वानंदात दंग जाहले ।। ६९ ।।
तव तयांनी ताडिले त्वरित । भगवान भावावेशात ।
पूर्वी असती कृपा करित । कधी कधी विशेष भक्तांवर ।। ७० ।।



आज कृपेची करिती खैर । सरसकट सकल जनांवर ।
रामकृष्ण दयासागर । अति उदार होऊनिया ।। ७१ ।।
कित्येकांना गेले होउन । इष्ट देवतेचे दर्शन ।
आनंदाचे प्रचंड तुफान । उठले हृदयात कोणाच्या ।। ७२ ।।
कोणी बेहोष गेले होउन । कोणाचे स्थिर झाले मन ।
अद्‌भुत ज्योतिचे झाले दर्शन । मिटताच नयन कोणाला ।। ७३ ।।
कोणास आली अनुभूती । हृदयामाजी संचरे शक्ती ।
कोणाच्या मनि अपार शांती । अनुभव आले अत्यद्‌भुत ।। ७४ ।।
केवळ दुसऱ्यास स्पर्श करुन । अथवा कृपाकटाक्ष टाकुन ।
किंवा केवळ इच्छा करुन । अविद्या माया हटविती ।। ७५ ।।
एवढे सामर्थ्य असे महान । हृदयग्रंथीचे करिती छेदन ।
ऐसी शक्ती ईश्वरावाचुन । अन्यत्र कोठे असणार ।। ७६ ।।
अग्नी आणि दाहकशक्ती । हे एकच वस्तू असती ।
ईश्वर आणि त्याची शक्ती । त्यापरी अभिन्न समजावे ।। ७७ ।।
यास्तव मानवदेहि जी व्यक्ती । प्रकटवू शके ईश्वरी शक्ती ।
निश्चये ती असे अभिव्यक्ती । प्रत्यक्ष परमेश्वराची ।। ७८ ।।
अरूप ब्रह्म स्वरूप घेउन । आले रामकृष्ण होउन ।
नरदेहास केले धारण । जगत्कल्याण करावया ।। ७९ ।।
सर्वजण आले धाउन । मिळवावयाला आशीर्वचन ।
परि शरद लाटू दोघेजण । सेवाकार्यात दंग होते ।। ८० ।।
अध्यात्माचा पाउस पडला । परन्तु सोडुनि कर्तव्याला ।
नाही गेले त्या स्थानाला । म्हणती ठाकुर प्रिय आम्हा ।। ८१ ।।
ठाकुरांची सेवा करावी । एवढी गोष्ट आम्हास ठावी ।
आम्ही कशाला काळजी करावी । सर्वज्ञ असती रामकृष्ण ।। ८२ ।।



जैसे इच्छिल त्यांचे मन । ते देतील आपण होउन ।
नाही वाटत काही कारण । आम्हास चिंता करण्याचे ।। ८३ ।।
एकदा नरेन्द्राकडे पाहुन । सांगते झाले रामकृष्ण ।
आज नरेन्द्र घरापासुन । रडत पातला या ठायी ।। ८४ ।।
नरेन्द्र वदला इच्छिते मन । दक्षिणेश्वरी आता जाउन ।
बेलाखाली धुनी पेटवुन । करावे ध्यान रात्रभर ।। ८५ ।।
तयाला म्हणती रामकृष्ण । पंचवटी असे छान स्थान ।
साधु महात्म्यांनी ध्यान । जपतप केले त्या ठायी ।। ८६ ।।
परि दारूचा कारखाना । जवळच झाला असताना ।
न पेटवू देती धुनी कोणा । शिपाई कारखान्याचे ।। ८७ ।।
रात्री असतो अंधकार । आता थंडिही पडते फार ।
यास्तव तेथे जाण्याचा विचार । करू नकोस अशा वेळी ।। ८८ ।।
मग तयाला म्हणती हासत । आता पुढे का नाही शिकत ।
नरेन्द्र म्हणाला वाटे मनात । शिकलो तेही विसरावे ।। ८९ ।।
कालीपदने द्राक्षे आणिली । ठाकुरांनी नरेन्द्रास दिधली ।
राहिलेली द्राक्षे वाटिली । भक्तजनांना तेधवा ।। ९० ।।
मणीस सांगे नरेन्द्रनाथ । येथे असता ध्यान करित ।
एकाएकी मम हृदयात । कसेसेच होऊ लागले ।। ९१ ।।
इडा पिंगला स्पष्ट दिसती । मणी बोलला तयाप्रती ।
वाटते कुंडलिनी शक्ती । जागृत झाली असावी ।। ९२ ।।
रामकृष्णांकडे जाउन । नरेन्द्र तयांना करी कथन ।
प्रत्येक भक्ताने येथे येउन । काही ना काही मिळविले ।। ९३ ।।
काही मलाही टाका देउन । त्यावर म्हणती रामकृष्ण ।
घरची व्यवस्था ये लावुन । म्हणजे मिळेल सर्व काही ।। ९४ ।।



नरेन्द्र म्हणाला इच्छी मन । एकसारखे चार दिन ।
राहावे समाधिमग्न होउन । रामकृष्ण तयाला बोलती ।। ९५ ।।

तू तर हीनबुद्धी फार । त्यापेक्षाही अवस्था थोर ।
सर्वत्र दिसतो सर्वेश्वर । तुज ती अवस्था लाभेल ।। ९६ ।।

जे जे काही अस्तित्व असे । ते ते परमेश्वरच दिसे ।
वासुदेव सर्व काही असे । उच्चतम असे अवस्था ही ।। ९७ ।।

नरेन्द्रनाथ गेला घरासी । घरची मंडळी म्हणती त्यासी ।
उगीच इकडे तिकडे भटकसी । कशाला मूर्खासारखा ।। ९८ ।।

वकिलीचा अभ्यास राहिला । परीक्षेचा काळ आला ।
नुसता भटकसी तू आपुला । कितीवेळा तुला सांगावे ।। ९९ ।।

मग नरेन्द्र गेला खोलित । पुस्तक घेतले हातात ।
छाती होती धडधडत । रडू लागला एकसारखा ।। १०० ।।

पुस्तक तसेच दिधले फेकुन । धाव ठोकली रस्त्यातुन ।
पडुनी गेले पादत्राण । शुद्ध नव्हती परि त्याची ।। १ ।।

रस्त्यात पाहू लागले जन । त्याची दखल घेइल कोण ।
पोहोचला एकदाचा येउन । रामकृष्णदेवांकडे ।। २ ।।

विवेकचूडामणीतिल । श्लोक आठवुनि मन व्याकुळ ।
ईश्वराच्या कृपेने होतिल । प्राप्त तीन गोष्टी जरी ।। ३ ।।

मनुष्यत्व मिळुनी जाय । मुमुक्षुत्वाचा लाभ होय ।
महापुरुषाचा मिळे आश्रय । प्राण्यास पूर्वपुण्याईने ।। ४ ।।

शंकराचार्य जे सांगती । सर्वच मिळाले आपणाप्रती ।
रामकृष्णांसारखी विभूती । ईश्वरकृपेने प्राप्त झाली ।। ५ ।।

यापरी येता सुवर्ण क्षण । दवडणे होइल मूर्खपणा ।
ऐसा विचार मनात येउन । फार वाढली अस्वस्थता ।। ६ ।।



तयाची ती अवस्था पाहुन । बोलु लागले रामकृष्ण ।
नरेन्द्रची अवस्था महान । परिवर्तन होउनि जाहली ।। ७ ।।
केवढा घडला चमत्कार । मानित नव्हता हा साकार ।
आता प्राण व्याकुळ फार । होती ईश्वरदर्शनास्तव ।। ८ ।।
ऐसी वाढता व्याकुळता । निश्चित समजावे की आता ।
ईश्वराच्या दर्शनाकरिता । फार अवधी उरला नसे ।। ९ ।।
त्याच दिवशी नरेन्द्रनाथ । एक दोन भक्तांसमवेत ।
गेला दक्षिणेश्वराप्रत । पंचवटीत ध्यान करावया ।। ११० ।।
यावर थोड्याच दिवसांत । निर्विकल्प समाधी झाली प्राप्त ।
ती सांगितली हकिकत । अध्यायात बत्तिसाव्या ।। ११ ।।
रामकृष्णांची कृपा होता । नरेन्द्रास मिळाली पूर्णता ।
सद्धर्म जगाला सांगण्याकरिता । तयार करिती नरेन्द्रला ।। १२ ।।
एकदा ठाकुर बिछान्यात । पडले होते तळमळत ।
होत होत्या वेदना बहुत । भक्तजन जमले सभोवती ।। १३ ।।
म्हणती महेन्द्रनाथाप्रत । तुम्ही सारे बसाल रडत ।
म्हणुनि हा भोग आहे भोगत । नातर सोडतो हा देह ।। १४ ।।
ते कर्णकठोर शब्द ऐकुन । भक्तांची हृदये होती विदीर्ण ।
गिरीशचंद्र आला घेउन । डॉक्टरांना अविलंबे ।। १५ ।।
बरे वाटता थोडेफार । बोलु लागले श्रीठाकुर ।
पंचभूतांचे असे शरिर । क्लेश तयाला व्हावयाचे ।। १६ ।।
गिरीशास म्हणती भगवंत । ईश्वरीय रूपे दिसती बहुत ।
हे रूपसुद्धा असे त्यात । स्पष्ट मजला दिसत असे ।। १७ ।।
दिसतसे तोच सर्व झाला । त्यानेच व्यापिले जगताला ।
बळी, बळी मारण्याचा ठोकळा । तोच झाला मारणारा ।। १८ ।।



ऐसे बोलती रामकृष्ण । करावया जिवांचे कल्याण ।
करिती देहाचे बलिदान । हा अर्थ काय बोलण्याचा ।। १९ ।।

बोलता झाले समाधिमग्न । मग ती जाता उतरून ।
म्हणती क्लेश संपले पूर्ण । पहिल्यासारिखा मी जाहलो ।। १२० ।।

सुखदुःखातीत अवस्था पाहुन । चकित झाले भक्तजन ।
पुनरपि सांगती रामकृष्ण । ईश्वर सर्वत्र दिसत असे ।। २१ ।।

लाटुने डोक्यास लाविला हात । ईश्वर दिसे तो साक्षात ।।
राखाल आणि नरेन्द्राप्रत । कुरवाळिती अति प्रेमाने ।। २२ ।।

मग म्हणाले काही दिन । जर हा देह राहता टिकुन ।
तर अनेक जनांचे कल्याण । याचेकडुनी होते खरे ।। २३ ।।

परि देह नाही राहणार । आईच नाही ठेवणार ।
ती जाणे हा मूर्ख फार । सर्वच देइल सर्वांना ।। २४ ।।

वास्तव ती आता काही । हा देह ठेवावयाची नाही ।
राखाल वदला लवलाही । सांगा ठेवण्या काही दिन ।। २५ ।।

ठाकुर म्हणती ती इच्छी जसे । तसेच निश्चित घडतसे ।
नरेन्द्र म्हणाला मजला दिसे । अभिन्न इच्छा दोघांची ।। २६ ।।

भक्तजनांना सांगती ठाकुर । नरशरीर धारण केल्यावर ।
क्लेशहि त्याच्याच बरोबर । आलेच म्हणुनी समजावे ।। २७ ।।

पुनरपि यावे नाही वाटत । परंतु यावे लागेल निश्चित ।
येणे वायव्य दिशेप्रत । होईल दोनशे वर्षांनी ।। २८ ।।

एकदा सहज चर्चा निघाली । खर्च करितसे भक्तमंडळी ।
रामकृष्ण म्हणाले या वेळी । खर्च फार होत असे ।। २९ ।।

बोलती डॉक्टर सरकार । भक्त त्याला असती तयार ।
विनोदे म्हणती सांगा ठाकुर । कांचन पाहिजे किंवा नको ।। १३० ।।



राजेन्द्र बोलला यांची पत्नी । करितसे यांचे पथ्यपाणी ।
डॉक्टर म्हणती म्हणजे कामिनी । अवश्य पाहिजे यासाठी ।। ३१ ।।
ठाकुर वदले करुनी स्मित । मोठीच आहे पंचाइत ।
डॉक्टर म्हणती नातरि समस्त । परमहंस व्हावयाचे ।। ३२ ।।
ठाकुर सांगती डॉक्टरास । स्पर्शमात्र होता पैशास ।
बंद होतसे श्वासोच्छ्वास । हात वाकडा होत असे ।। ३३ ।।
स्पर्श होताच कोणा स्त्रीस । जणू व्हावा वृश्चिकदंश ।
तशा वेदना शरीरास । होतात अनुभव येथला ।। ३४ ।।
पैसा खर्चिता सेवेस । तर मग त्यात नसे दोष ।
कळले पाहिजे आपणास । स्त्रीरूप असे अंबेचे ।। ३५ ।।
यापरी घेता समजून । न गुंते संसारमधे मन ।
ईश्वरदर्शन झाल्यावाचुन । कळेना स्त्री ही काय असे ।। ३६ ।।
रोग आणखी वाढला फार । कधी कधी पू गळल्यावर ।
क्षतातुनि अविरत येई रुधिर । होती वेदना प्राणांतिक ।। ३७ ।।
त्या दारुण वेदना भोगुन । थोड्याच वेळात रामकृष्ण ।
क्लेश जाती विसरून । बोलती गोष्टी ईश्वरीय ।। ३८ ।।
ठाकुरांच्या असती सेवेत । राखाल योगेन नरेन्द्रनाथ ।
बाबुराम शशि बालभक्त । शरच्चंद्र लाटू गोपाल ।। ३९ ।।
गृहस्थभक्त महेन्द्रनाथ । गिरीश घोष राम दत्त ।
इत्यादी मंडळी सतत । असती येउन जाउन ।। १४० ।।
सर्वांत शशिभूषण भक्त । सेवेची पराकाष्ठा करित ।
सदैव असे तो कार्यरत । सद्गुरुसेवेत अहर्निश ।। ४१ ।।
गुरुसेवेतच त्याचे लक्ष । त्यांचे काम कराया दक्ष ।
न लगे जप तप ज्ञान मोक्ष । गुरुसेवा त्याचे सर्वस्व ।। ४२ ।।



नाही पाहिली भूक तहान । नाही पाहिले रात्र दिन ।
गुरुसेवा आणि आपण । याविण जाणत नसे काही ।। ४३ ।।
इतर जे असती भक्तजन । जे करिती जप तप ध्यान ।
शशी करी आचार्योपासन । त्याविण अन्य काही नसे ।। ४४ ।।
शशीच्या गुरुभक्तीप्रती । तुलना नाही नसे मिती ।
त्याची गुरुसेवा जे पाहती । चकित होती ते सर्व ।। ४५ ।।
रामकृष्ण होते जाणत । आता शरीर नाही टिकत ।
निरवानिरव करण्याप्रत । केली सुरुवात ठाकुरांनी ।। ४६ ।।
म्हणती पाणी जहाजात । दोन भाग आले भरत ।
भरता तिसऱ्याही भागात । समुद्रात बुडेल हे ।। ४७ ।।
इतरांस सांगुनी जाण्यास । बोलाविती मग नरेन्द्रास ।
करिती तयाला उपदेश । दिशा दाविती कार्याची ।। ४८ ।।
निर्विकल्प समाधी लाभुन । नरेन्द्र झाला होता धन्य ।
कळले कशास आपुले जीवन । कार्य कोणते करायचे ।। ४९ ।।
श्रीभगवान त्याला वदले । आईने सर्व तुजला दिधले ।
अनुभव हृदयात साठविले । किल्ली ठेविली माझ्या करी ।। १५० ।।
माझे कार्य करावयाला । नरेन्द्रा तू समर्थ झाला ।
ते पूर्ण केल्यावाचुनी तुजला । निजधामाला जाता न ये ।। ५१ ।।
जवळ बसवुनी नरेन्द्राप्रत । कार्य तयाला समजावित ।
काय त्यांचे चाले खलबत । कल्पना नव्हती इतरांना ।। ५२ ।।
कोणास आले नाही कळुन । की भगवान रामकृष्ण ।
करावयाला महाप्रयाण । करिती तयारी येणेपरी ।। ५३ ।।
भगवंतांचे चरित्र पावन । जैसे भागिरथीचे जीवन ।
मनन करिता आत्मकल्याण । निश्चित होइल जिवांचे ।। ५४ ।।



श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १५५ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा एकेचाळिसावा अध्याय ।।

❖ ❖ ❖



ॐ

।। श्रीरामकृष्णकथामृत ।।

अध्याय बेचाळिसावा

नमन रामकृष्णांच्या पायी । सर्व अस्तित्व आपुल्या ठायी ।
कोठे ठाव रिता नाही । स्वरूप सर्वत्र संचले ।। १ ।।

स्वरूप आपुले साकार । स्वरूप आपुले निराकार ।
साकारनिराकारा पार । स्वरूप अपार अतर्क्य असे ।। २ ।।

स्वरूप सगुण आणि निर्गुण । त्यांच्यापार असा आपण ।
मानवाची बुद्धी क्षीण । स्वरूप आकलन करावया ।। ३ ।।

शक्ति असे जी स्वरूपधारी । अशरीरिणीही कार्य करी ।
येणे जाणे लीलाच सारी । परमेश सर्वत्र सदा असे ।। ४ ।।

मानवाची मती सांत । परि कृपा करिता भगवंत ।
अनुभवास येतसे अनंत । यास्तव निवांत वंदिले ।। ५ ।।

रामकृष्णांची सानही कृती । कधिही अर्थशून्य नव्हती ।
प्रथम कळेना जनांप्रती । परि परिणाम थोर घडे ।। ६ ।।

दक्षिणेश्वरी स्वशिष्यास । व्यक्तिशः दिला उपदेश ।
येथे एकत्र सकलांस । केले शुश्रुषा करावया ।। ७ ।।

शिष्यजनांना आकार देउनी । आधीच टाकिले घडवुनी ।
आता काशीपुरास आणुनी । केला निर्माण बंधुभाव ।। ८ ।।

सर्वांना पुढील कार्याप्रत । ठाकुर करिती संघटित ।
येथेच कळली भक्तांप्रत । दिशा पुढील कार्याची ।। ९ ।।

काशीपुरास तरुण भक्त । राहिले गुरूच्या सेवेत ।
धर्मचर्चा करिती सतत । करिती ध्यान तपश्चर्या ।। १० ।।



नरेन्द्र राखाल लाटु योगेन । बाबुराम शरद निरंजन ।
कालि गोपाल शशिभूषण । तारक सेवेत गुरूंच्या ।। ११ ।।

रामकृष्णांच्या सेवेत । परमेश्वराचीच सेवा होत ।
ऐसा भाव असे जागृत । सदैव मनात भक्तांच्या ।। १२ ।।

येथे त्यागाचा धगधगीत । अग्नी पेटला हृदयात ।
पुढती संन्यासदीक्षा बहुत । भक्त घेती ठाकुरांचे ।। १३ ।।

करिता भूतमात्रांची सेवा । तीच पावते सदाशिवा ।
हाहि सिद्धान्त कळला नवा । भक्तजनांना याच ठायी ।। १४ ।।

तत्त्व जे असे धर्मप्राण । ते तर सर्व धर्मांत समान ।
ऐसा विशाल दृष्टिकोन । सकळांस कळला येथेच ।। १५ ।।

पुढचे कार्य करावया नीट । येथे जमविले भक्तवरिष्ठ ।
निजकार्याची गुजगोष्ट । येथेच स्पष्ट सांगितली ।। १६ ।।

पुढे कार्य जे करणे महान । त्याचे येथेच बीजारोपण ।
स्वये करिती रामकृष्ण । देउनि शिक्षण सकलांसी ।। १७ ।।

रामकृष्ण पडुनी बिमार । उपकार करिती जगतावर ।
येथेच शिष्य करिती तयार । बोध जगभर सांगावया ।। १८ ।।

अल्प कृती करिता ठाकुर । त्यात आशय असे थोर ।
आजारी का पडिले प्रभुवर । आम्ही पामर केवि जाणू ।। १९ ।।

असो रोग तो गेला वाढत । लोक येऊ लागले अमित ।
रामकृष्णांच्या दर्शनाप्रत । बोधामृतपान करावया ।। २० ।।

तेथे येती सामान्य जन । शास्त्री पंडित विद्वान ।
येती निर्धन धनसंपन्न । दर्शनास रामकृष्णांच्या ।। २१ ।।

शशधर तर्कचुडामणी । बरोबर काही मंडळी घेउनी ।
बाबांचा समाचार घ्यावा म्हणुनी । काशिपुराला पातला ।। २२ ।।



बाबास म्हणे शशधर पंडित । वाचले असे मी शास्त्रात ।
रोग बरे करू शकतात । योगीजन तुमच्यासारिखे ।। २३ ।।
रोगाच्या ठायी काही क्षण । एकाग्र करुनी आपुले मन ।
केवळ इच्छामात्रेकरुन । जातात होउनी रोग बरे ।। २४ ।।
आराम पडतो करिता चिंतन । रोग बरा जातो होउन ।
मजला वाटते एकदा आपण । करावे पाहुनि यासारखे ।। २५ ।।
तयास म्हणाले भगवंत । तुम्ही असुनही थोर पंडित ।
कशी ही गोष्ट बोललात । नाही शोभत बोलणे हे ।। २६ ।।
एकदा जे मी माझे मन । सच्चिदानंदास केले अर्पण ।
काय आता तेथुनी काढुन । लावू या तुच्छ देहाकडे ।। २७ ।।
शरीर आहे भंगलेला । केवळ हाडामासाचा सापळा ।
त्याकडे मन लावावयाला । प्रवृत्ती तरि होईल का ।। २८ ।।
यापरी शशधराचे भाषण । फटकाऱ्यात दिले उडवुन ।
तर्कालंकार पंडित विद्वान । निरुत्तर झाला यावरी ।। २९ ।।
पंडित तर मग गेला निघुन । परी ऐकिले होते भाषण ।
भक्तजनांनी लक्ष देउन । त्यांना स्वस्थ बसवेल कसे ।। ३० ।।
भक्त म्हणाले महाराज । रोग बरा जर होतो सहज ।
पंडित म्हणतात तैसे आज । केलेच पाहिजे आपण ।। ३१ ।।
आमच्याकडे तरी पाहुन । करा रोगाचे निर्मूलन ।
हट्टच घेती भक्तजन । ठाकुर त्यांना समजावितो ।। ३२ ।।
काय रे मी इच्छितो मग । की बरा होऊ नये रोग ।
काय बसावे भोगत भोग । मी खूप म्हणतो व्हावा बरा ।। ३३ ।।
परि तैसे कोठे येते घडुन । बरे करणे आईच्या स्वाधिन ।
नरेन्द्र म्हणाला मग आपण । आईलाच सांगा बरे करी ।। ३४ ।।



अर का सांगाल आईला । रोग हा बरा करावयाला ।
तर खात्रीच आहे आम्हाला । आपले ऐकते जगदंबा ।। ३५ ।।
त्यावर म्हणती रामकृष्ण । तुम्ही तर सांगता भक्तजन ।
परि ही गोष्ट मुखातुन । बाहेर पडेना काय करू ।। ३६ ।।
परि ऐकेना नरेन्द्रनाथ । रामकृष्णांचा प्रिय भक्त ।
म्हणाला जगन्मातेस मात । त्वरित आपण सांगावी ।। ३७ ।।
आग्रह फारच झाला पाहुन । तयाला म्हणाले रामकृष्ण ।
बरे बुवा तर मग बघीन । गोष्ट काढेन शक्य तर ।। ३८ ।।
यावर काही लोटता वेळ । नरेन्द्र आला ठाकुरांजवळ ।
म्हणाला गोष्ट काढिली असेल । काय म्हणाली जगन्माता ।। ३९ ।।
तयाला सांगती रामकृष्ण । गळ्याकडे बोट दाखवुन ।
रोगामुळे जाइना भोजन । म्हणालो जगज्जननीला ।। ४० ।।
दोन घास जातील उदरी । ऐसे कर तू काहीतरी ।
यावर जगन्माता सत्वरी । दाखवी बोट तुम्हाकडे ।। ४१ ।।
दाखवुनी सगळे भक्तजन । म्हणाली इतुक्या मुखातुन ।
करित नाहिस का तू भोजन । ऐकुनि लाज मज वाटे ।। ४२ ।।
धडधड करू लागली छाती । बोलुच शकलो नाही जास्ती ।
आश्चर्यचकित भक्त होती । ऐकुनि विवरण बाबांचे ।। ४३ ।।
देहबुद्धीचा अभाव अद्‌भुत । अद्वैतज्ञानाची सीमा होत ।
सर्वजण जे जेवतात । तेच भोजन स्वतःचे ।। ४४ ।।
प्रत्यक्षात पातळ पदार्थांविण । काहीच करिता न ये अशन ।
परंतु वाटे होतसे भोजन । भक्तजन संतृप्त होताच ।। ४५ ।।
ब्रह्मानंदात गेले रंगुन । कसे राहील देहभान ।
एकात्मभाव बाणला पूर्ण । सर्वत्र आत्मा दिसत असे ।। ४६ ।।



ठाकुर दूरदृष्टी फार । संपण्यापूर्वीच अवतार ।
भक्तजनांना करिती तयार । धर्मप्रसार करावया ।। ४७ ।।

सकळ लज्जा नष्ट व्हावी । अंगी लीनता बाणावी ।
त्यागाची थोरवी कळावी । यास्तव उपाय ते करिती ।। ४८ ।।

रामकृष्णदेवांचा भक्त । गोपालदा तयाला म्हणत ।
तयाने संन्यासाश्रमात । अद्वैतानंद नाम घेतले ।। ४९ ।।

एकदा वदला ठाकुरांना । वाटत आहे माझ्या मना ।
भगवे कपडे साधुजनांना । आपण अर्पण करावे ।। ५० ।।

तयाला म्हणती रामकृष्ण । येथे असती भक्त तरुण ।
तुजला त्यांच्यापेक्षा छान । साधुजन कोठे मिळतील ।। ५१ ।।

जे तू इच्छिसी करावे दान । या भक्तांना करी अर्पण ।
सत्पात्र असती भक्तजन । यथार्थ होईल दान तुझे ।। ५२ ।।

गोपालदाने कपडे आणुनी । ठाकुरांसमोर दिले ठेवुनी ।
भगवे कपडे भक्तांलागुनी । रामकृष्णांनी वाटले ।। ५३ ।।

या कृतीने रामकृष्ण । करिते झाले बीजारोपण ।
त्यांनी पायाच दिला घालुन । पुढच्या महान कार्याचा ।। ५४ ।।

रामकृष्णमठ पुढे निघाला । संदेश जगाला द्यावयाला ।
आरंभ तयाचा असा केला । स्वतः सर्वज्ञ ठाकुरांनी ।। ५५ ।।

ठाकुरांचे भक्त तरुण । सांगती तयांना एक दिन ।
घरोघरी तुम्ही जाउन । भिक्षा मागुनी आणावी ।। ५६ ।।

शिष्य गुरुवचनी तत्पर । भिक्षेसाठी निघाले सत्वर ।
ते तरुण सुशिक्षित हुशार । अति सुंदर ते असती ।। ५७ ।।

मुले ही थोर कुलातील । कसे लपवू ते शकतील ।
पाहताच जाणती सकळ । उच्च कुलातिल ते असती ।। ५८ ।।



मुलांना त्या पाहुनी चित्ती । नरनारी हळहळ करिती ।
कोवळ्या वयात कशी उपरती । झाली म्हणती कोणी जन ।। ५९ ।।
कोणी कोणी दया दाविती । विचारपूस आस्थेने करिती ।
कोणी म्हणती शेवटाप्रती । साधूपण हे जाईल का ।। ६० ।।
कोणी म्हणती भीक मागसी । लाज कशी न वाटे तुजसी ।
चांगला धडधाकट दिससी । करवेना काय काम तुला ।। ६१ ।।
करिता येइना काम इतर । तर हो ट्रामचा कंडक्टर ।
नाना जनांचे नाना प्रकार । दाविती विविध प्रतिक्रिया ।। ६२ ।।
परंतु शिष्य होते खंबिर । तयांनी सोडिला नाही धीर ।
भिक्षा मागुनी घरोघर । आणिती पाळिती गुर्वाज्ञा ।। ६३ ।।
पुढील कार्यावर लक्ष ठेवुन । शिक्षण देती श्रीभगवान ।
पुढती हेच शिष्य महान । धर्मकार्य करिती जगतात ।। ६४ ।।
एकदा प्रकृती फार बिघडली । भक्तमंडळी भवती जमली ।
अंतकाळ दिसे जवळी । शोकाकुल झाले सर्वजण ।। ६५ ।।
एक भक्त गेला बोलुन । ठाकुर आम्हास आधार कोण ।
अत्यंत क्षीण आवाज काढुन । रामकृष्ण तयाला सांगती ।। ६६ ।।
नरेन्द्र तुम्हाला शिकविल । तो सर्वांची काळजी घेइल ।
नरेन्द्र तेथेच होता जवळ । तत्काळ म्हणाला ठाकुरांना ।। ६७ ।।
जबाबदारी असे ही थोर । माझ्या सामर्थ्याबाहेर ।
मजला नाही झेपवणार । कार्य महान हे आपुले ।। ६८ ।।
नरेन्द्रनाथास एक क्षण । निरीक्षुनी बोलिले रामकृष्ण ।
तू काय नाही बोलिसी वचन । हाडेसुद्धा करितील तुझी ।। ६९ ।।
रामकृष्णांनी एक दिवस । बाहेर धाडिले सकलांस ।
हाक मारिली नरेन्द्रास । खोलीत बसविले ध्यानस्थ ।। ७० ।।



नरेन्द्र कराया बसला ध्यान । लोपले बाह्य जगाचे भान ।
रामकृष्णांनी जवळ बसुन । सर्व सिद्धींचे दान केले ।। ७१ ।।
काही वेळ जाता लोटुन । नरेन्द्राचे संपले ध्यान ।
रामकृष्णांच्या नयनातुन । वाहु लागले प्रेमाश्रू ।। ७२ ।।
तयाला वदले रामकृष्ण । मजजवळ होते ते संपूर्ण ।
आज तुजला टाकिले देऊन । फकीर झालो मी खराखरा ।। ७३ ।।
तुजला जी दान केली शक्ती । तुला कामास पडेल पुढती ।
धर्मप्रचार करण्याप्रती । उपयोग होइल शक्तीचा ।। ७४ ।।
ठाकुरांनी केले दान । सकळ सिद्धींचे हे पाहुन ।
कृतज्ञतेने आले भरुन । नयन नरेन्द्रनाथाचे ।। ७५ ।।
रामकृष्णांचा रोग वाढुन । प्रकृति झाली अत्यंत क्षीण ।
सर्वजणांना आले कळुन । अंतकाळ जवळ पातला ।। ७६ ।।
भक्तजन म्हणती वारंवार । आपण घेतल्याविण मनावर ।
रोग बरा नाही होणार । त्यावर ठाकुर सांगती ।। ७७ ।।
देहाच्या या पिशवीला । भोक पडिले न पर्वा मजला ।
अशा गोष्टीची कासयाला । उगीच काळजी करायची ।। ७८ ।।
एकदा दुखणे वाढुनी विशेष । ठाकुरांस होती अत्यंत क्लेश ।
वेदुनी तयांच्या बिछान्यास । उभे राहिले भक्तजन ।। ७९ ।।
क्लेश नव्हते पाहवत । जवळच होता नरेन्द्रनाथ ।
क्षणभर नरेन्द्रच्या मनात । संशय उत्पन्न जाहला ।। ८० ।।
ठाकुर सांगत असतात । राम झाला त्रेतायुगात ।
श्रीकृष्ण झाला द्वापारात । रामकृष्ण होऊनि तो आला ।। ८१ ।।
तथापि यांचे क्लेश पाहुन । शंकित होतसे माझे मन ।
आता जर ते करितिल कथन । तरच मानेन सत्य असे ।। ८२ ।।



एवढा विचार येता मनात । तयाकडे पाहुनी भगवंत ।
त्याच्या मनातिल भाव त्वरित । जाणुनी म्हणती नरेन्द्रला ।। ८३ ।।
काय अजुनही शंका तुजला । पक्की खूणगाठ बांध मनाला ।
जो राम आणि कृष्ण झाला । तोचि झाला रामकृष्ण ।। ८४ ।।
वेदान्तदृष्टिचा नसे विचार । प्रत्यक्ष त्याचाच अवतार ।
शब्द हे पडताचि कानावर । चकित जाहले भक्तजन ।। ८५ ।।
परि विशेषत: नरेन्द्रनाथ । झाला फारच आश्चर्यचकित ।
म्हणे विचार येताच मनात । जाणिला त्वरित ठाकुरांनी ।। ८६ ।।
सन अठराशे शाऐंशीस । सोळा तारिख ऑगस्ट मास ।
रविवारचा होता दिवस । त्या दिनी श्रावणी पौर्णिमा ।। ८७ ।।
एका भक्तास म्हणती ठाकुर । पंचांग पाहुनी सांग सत्वर ।
कोणता चांगला असे वासर । पंचांग पाहिले भक्ताने ।। ८८ ।।
त्या दिवसाचे पंचांग वाचुन । आता काढावा दुसरा दिन ।
तव त्यास वदले रामकृष्ण । आता पंचांग पुरे करी ।। ८९ ।।
त्या दिवशीचे व्यवहार । वेगळ्या तऱ्हेने करिती ठाकुर ।
थोड्याच वेळात आला डॉक्टर । त्यांची प्रकृती पाहावया ।। ९० ।।
डॉक्टर नाडीला हात लावुन । होउनि गेला विचारमग्न ।
तयाला पुसती रामकृष्ण । दुखणे असाध्य झाले का ।। ९१ ।।
डॉक्टर खाली मान घालुन । म्हणाला तैसे येतसे दिसुन ।
त्यावर म्हणती रामकृष्ण । इतुक्या दिवसांनी सांगतसा ।। ९२।।
उतार पडेना दुखण्यास । तर का करुनी घ्यावा त्रास ।
पूर्ण विसरले सर्व क्लेश । मुद्रा अजिबात बदलली ।। ९३ ।।
ठाकुर होते आनंदात । काहि वेळाने एक गृहस्थ ।
योगाविषयी होता पुसत । तयाला माहिती सांगितली ।। ९४ ।।



पूर्ण दोन तासपर्यंत । त्यास माहिती होते सांगत ।
मुद्रेवर तर नव्हते दिसत । किंचितहि चिन्ह रोगाचे ।। ९५ ।।
रात्रिस ते उशीला टेकुन । आंथरुणावर राहिले बसुन ।
भोवती जमले भक्तजन । बोलत बसले त्यांच्याशी ।। ९६ ।।
बाबांचे अंग होते ऊन । भक्तांस म्हणती रामकृष्ण ।
तुम्ही सर्व भक्त मिळुन । वारा घाला मजलागी ।। ९७ ।।
वारा घालित होते भक्त । तयांचे चरण नरेन्द्रनाथ ।
मांडीवर घेउनि होता चेपित । तयाला म्हणती रामकृष्ण ।। ९८ ।।
या सर्व मुलांची चांगली । काळजी त्वा पाहिजे घेतली ।
तीनचारदा ऐसे वदली । श्रीगुरुमाऊली नरेन्द्रास ।। ९९ ।।
मग दोन अडीच तास । निद्रा लागली ठाकुरांस ।
रात्री एकाच्या सुमारास । अकस्मात वळले कुशीवर ।। १०० ।।
ॐ काराचा उच्चार करुन । ब्रह्मस्वरूपात गेले मिळुन ।
अत्यंत शांत दिसे वदन । मुखमंडल झाले तेजोमय ।। १ ।।
न बघवे तो देखावा म्हणुन । नरेन्द्राने त्यांचे चरण ।
हळुच उशीवर दिले ठेवुन । धाव ठोकली जिन्याकडे ।। २ ।।
जवळ एक होता डॉक्टर । नाडी पाहू लागला सत्वर ।
पत्ता न लागे त्या बरोबर । रडू लागला जोराने ।। ३ ।।
शशी अजुनी होता समजत । ठाकुर आहेत समाधीत ।
म्हणाला तो डॉक्टराप्रत । का रे एवढा ओरडसी ।। ४ ।।
परत आला नरेन्द्रनाथ । सर्व भक्त होते समजत ।
ठाकुर असती समाधीत । नित्याप्रमाणे या वेळी ।। ५ ।।
उतरावी ती समाधी म्हणुन । हरि:ओम् हा उच्चार करुन ।
जप आरंभिती भक्तजन । प्रभात होई पावेतो ।। ६ ।।



मग डॉक्टर सरकार आले । ठाकुरांना तपासले ।
लक्षणे पाहुनी सांगितले । महासमाधी ही आहे ।। ७ ।।
तरिही काही भक्तजनांला । अजुनही संशय होता उरला ।
बोलावुनि योगी संन्याशाला । घेतली परीक्षा करवून ।। ८ ।।
योगी संन्यासी तेथे येउन । सर्वही लक्षणे अवलोकुन ।
तयांनीही केले कथन । महासमाधी ही असे ।। ९ ।।
आता संशयाला काही । अवसर मुळिही उरला नाही ।
एकच हाहाकार होई । जिकडे तिकडे क्षणार्धात ।। ११० ।।
अनाथ झाले भक्तजन । दाही दिशा वाटती शून्य ।
अफाट जगात एकटे सोडुन । गेले भगवान अकस्मात ।। ११ ।।
इहपरलोकीचा आधार । त्यांचे सर्वस्व असती ठाकुर ।
देवाधिदेव परमेश्वर । गेले सोडुनि भक्तजना ।। १२ ।।
सुंदर मंचक तयार केला । पुष्पमालांनी शृंगारिला ।
पवित्र देह आणुनी ठेविला । त्यावर श्रीरामकृष्णांचा ।। १३ ।।
वार्ता पसरता शहरात । नारीनर आले असंख्यात ।
जनमेळावे आले बहुत । अंतिम दर्शन घ्यावयाला ।। १४ ।।
मग त्या दिवशी सायंकाळी । अखेरची यात्रा निघाली ।
रस्त्यानेही अलोट मंडळी । झाली सामिल यात्रेत ।। १५ ।।
भजनमंडळ्यांबरोबर । करिती हरिनामाचा गजर ।
रामकृष्णांचा जयजयकार । करीत महायात्रा चालली ।। १६ ।।
रामकृष्णहरी म्हणती । कोणी नाचती कोणी गाती ।
उच्च स्वराने सकळ करिती । गजर श्रीरामकृष्णांचा ।। १७ ।।
काशीपुरच्या घाटावर । भजन करिती भक्त थोर ।
चिता तयार केली सत्वर । चंदन तुलसीकाष्ठांची ।। १८ ।।



रामकृष्णांचे पवित्र शरिर । ठेविते झाले चितेवर ।
मग दिला अग्निसंस्कार । शून्य मनाने परतले ।। १९ ।।
नंतर देवी सारदामणी । बांगड्या टाकित असता फोडुनी ।
रामकृष्ण प्रकट होउनी । हात धरिले देवींचे ।। १२० ।।
त्यांना वदले श्रीभगवान । मी काय मेलो आहे म्हणुन ।
त्यागिसी तू सौभाग्यभूषण । मी तर आहे येथेच ।। २१ ।।
सारदादेवींनी त्यानंतर । ठेविले आपुल्या अंगावर ।
सौभाग्यालंकार जन्मभर । ठाकुर असती जाणूनिया ।। २२ ।।
काय म्हणावे चरित संपले । अस्तित्व सर्वत्र संचले ।
देह ठेवल्यावरही केले । केवढे कल्याण जगताचे ।। २३ ।।
भक्तजनांना रामकृष्ण । योग्य काळी देती दर्शन ।
करिती तयांना मार्गदर्शन । निवारण करिती विघ्नांचे ।। २४ ।।
या अंतिम अध्यायाला । जरि हा ग्रंथ समाप्त झाला ।
भगवंताची अनंत लीला । कसला तियेला अंत असे ।। २५ ।।
लीला होत आहे अजुन । त्या लीलेला वर्णिल कोण ।
व्यासवाल्मिकी गेले थकुन । करिता वर्णन चरितांचे ।। २६ ।।
सूर्य चंद्र तारे समस्त । लोप पावती प्रकाशात ।
तेथ काय मी खद्योत । प्रकाश पाडू कथेवरी ।। २७ ।।
भगवंताचे चरित्र अलभ्य । सकळांस त्याचा मिळावा लाभ ।
अध्यायपरत्वे पठणास सुलभ । व्हावे उद्देश ग्रंथाचा ।। २८ ।।
रामकृष्णांच्या पदकमली । वाहिली अक्षरकुसुमांजली ।
तोष पावोत भक्तमंडळी । होवो कल्याण सकलांचे ।। २९ ।।
होउनि चरितामृताची वृष्टी । संतृप्त होवो सकल सृष्टी ।
भगवंताकडे वळावी दृष्टी । व्हावी भेटी श्रीहरिची ।। १३० ।।



प्रथमाध्यायी केले कथन । अवतारधारणाचे कारण ।
दुसऱ्यात मातापित्यालागुन । दृष्टान्त झालेले सांगितले ।। ३१ ।।
भगवंतांचे झाले जनन । गदाधर ठेविले अभिधान ।
तिसऱ्यात बाळलीला कथन । वियोग झाला पितयाचा ।। ३२ ।।
चवथ्यात व्रतबंध होउनी । महाशिवरात्रीच्या दिनी ।
समाधीच गेली लागुनी । कलकत्त्यास गमन केले ।। ३३ ।।
पाचव्यामाजी कथन केले । साधनेविषयी सांगितले ।
सहाव्यात कालीमंदिर झाले । ठाकुर आले दक्षिणेश्वरा ।। ३४ ।।
सातव्यात पूजकपदग्रहण । जगन्मातेचे झाले दर्शन ।
आठव्यात दिले दाखवुन । गौरीहररूप मथुरला ।। ३५ ।।
कथिले नवव्या अध्यायाला । भावसमाधी मथुरला ।
पूजावर्णन दहाव्याला । रासमणीला शिक्षा दिली ।। ३६ ।।
अकराव्यात रामोपासन । जानकीचे झाले दर्शन ।
हलधारीचा शाप होउन । मुखातुनी रुधिर आले ।। ३७ ।।
बाराव्यात झाले लग्न । तेराव्यात ब्राह्मणी येउन ।
गात्रदाह केला शमन । विपरित क्षुधा थांबविली ।। ३८ ।।
चवदाव्यात तंत्रसाधन । ब्राह्मणी घेई करवुन ।
पंधराव्यात केली कथन । वात्सल्यभक्ती ठाकुरांची ।। ३९ ।।
आले पंडित पद्मलोचन । नारायणशास्त्री विद्वज्जन ।
तयांनी सभेत केले कथन । ठाकुर अवतार ईश्वराचा ।। १४० ।।
सोळाव्यात मधुराभक्ती । सतराव्यात तोतापुरि येती ।
निर्विकल्प समाधीची प्राप्ती । तोतापुरि मानी सगुणाला ।। ४१ ।।
अठराव्यात केले कथन । मथुरपत्निचा रोग हरुन ।
केले इस्लामधर्मसाधन । ब्राह्मणीने गमन केले ।। ४२ ।।



तीर्थयात्रा एकोणिसाव्यात । सांगितली विसाव्या अध्यायात ।
हृदयरामाची हकिकत । वृत्तान्त मथुरच्या मृत्यूचा ।। ४३ ।।
एकविसाव्यात केले कथन । सारदादेवींचे आगमन ।
संयम एकशय्या करुन । ख्रिस्तधर्मसाधन सांगितले ।। ४४ ।।
बाविसाव्यात सर्वात्मभाव । वर्णिला निरहंकार स्वभाव ।
पंडिताचा हरला गर्व । तो स्तवी परमात्मा मानुनी ।। ४५ ।।
तेविसाव्यात केला कथन । कामकांचन त्याग पूर्ण ।
चोविसाव्यात परीक्षा करुन । करिती प्रेम भक्तांवर ।। ४६ ।।
पंचविसाव्यात शिष्यशिक्षण । सव्विसाव्यात केशवसेन ।
मणिमल्लिकाकडिल महान । उत्सव ब्राह्मसमाजाचा ।। ४७ ।।
सत्ताविसाव्या अध्यायात । रामचंद्रदत्त महेन्द्रनाथ ।
रामकृष्णांचे थोर भक्त । त्यांची हकिकत सांगितली ।। ४८ ।।
अठ्ठाविसाव्या अध्यायात । राखालचंद्र मानससुत ।
नागमहाशयांची हकिकत । संक्षिप्तात सांगितली ।। ४९ ।।
पुढिल चार अध्यायांत । वर्णिला नरेन्द्रनाथ दत्त ।
पुढे झाले जगद्विख्यात । विवेकानंद या नावाने ।। १५० ।।
तेहतिसाव्यात निरंजन । बाबूराम आणि योगिन ।
चवतिसाव्यात शशिभूषण । तारक काली शरद लाटू ।। ५१ ।।
पस्तिसाव्यात हरिनाथ । गंगाधर सारदाभक्त ।
हरिप्रसन्न शिष्य समस्त । त्यांची हकिकत सांगितली ।। ५२ ।।
पूर्णचंद्र घोष गृहस्थ । छत्तिसाव्या अध्यायात ।
बलराम बोस सुरेन्द्रनाथ । शंभुनाथ मल्लिक वर्णिले ।। ५३ ।।
सदतिसाव्यात पंडित थोर । ईश्वरचंद्र विद्यासागर ।
त्याच्याकडे गेले ठाकुर । ज्ञानदान करावया ।। ५४ ।।



अडतिसाव्या अध्यायात । गिरीशचंद्राची हकिकत ।
गोपाळाच्या आईस होत । दर्शन बाळकृष्णाचे ।। ५५ ।।
एकोणचाळिसाव्यात योगिनमा । लक्ष्मीदेवी गोलापमा ।
विख्यात विदुषी गौरीमा । उत्सव पानिहाटीचा ।। ५६ ।।
अध्याय चाळिसाव्यात । रोग वाढला अपरिमित ।
ठाकुर आले कलकत्त्यात । औषधोपचार घ्यावयाला ।। ५७ ।।
एकेचाळिसाव्या अध्यायात । काशीपुरच्या बगीच्यात ।
कृपा लाभले भक्त समस्त । लाभ जाहला दर्शनांचा ।। ५८ ।।
बेचाळिसाव्यात केले कथन । सिद्धींचे नरेन्द्राला दान ।
महासमाधी घेती भगवान । कथा पावन सांगितली ।। ५९ ।।
निष्कामकर्माची केवल मूर्ती । शुद्ध प्रेमाची मंगल दीप्ती ।
आत्मज्ञानाची अंतिम गती । श्रीरामकृष्ण भगवान ।। १६० ।।
मंगलधामा पुरुषोत्तमा । अगाध असे आपुला महिमा ।
वर्णिता येइना निगमागमा । नेति वदती नम्रत्वे ।। ६१ ।।
तेथे कोण कसे काय । अनिर्वाच्यास वर्णू जाय ।
मनबुद्धीची न राहे सोय । यास्तव पाय मी वंदितो ।। ६२ ।।
प्रभूंची पदरजे लागुन । खरोखर मेदिनी झाली धन्य ।
मानववंश झाला पावन । उद्धार जाहला बहुतांचा ।। ६३ ।।
भगवच्चरित अत्यंत पावन । करिता वाचन श्रवण मनन ।
होवो जिवांचे कल्याण । शांतिसुखाचा लाभ घडो ।। ६४ ।।
मानवा कळावा सत्यधर्म । सदा घडावे निष्काम कर्म ।
वेदान्ताचे कळावे वर्म । सुगम व्हावा योगमार्ग ।। ६५ ।।
ज्ञानीजनांना मिळावी मुक्ती । कर्मयोग्यांसी परमगती ।
उपासकांना लाभो भक्ती । मनन करिता चरिताचे ।। ६६ ।।



भवसागरातिल ही नाव । मोक्षसुखाचा पावो गाव ।
जीवदशेतुनि व्हावा शिव । वासुदेव दिसावा सर्वत्र ।। ६७ ।।

जगी वाढावा प्रेमभाव । देवस्वरूप व्हावे मानव ।
अविरत शांतिचा वर्षाव । न्हावो सृष्टी निजानंदी ।। ६८ ।।

रघुपतिला काही न कळे । श्रीचरणावर यास्तव लोळे ।
उणे अधिक साहुनी सगळे । पुरवावे लळे भगवंता ।। ६९ ।।

असुनही माझी बुद्धी थोडी । धाडस करुनी घेतली उडी ।
माउलीने धाउनी तातडी । झेलिले मजला वरच्यावर ।। १७० ।।

रामकृष्ण विवेकानंद । तुमच्या कृपेचा मिळता बूंद ।
निजानंदी होइन धुंद । यास्तव वंदन करित असे ।। ७१ ।।

नरनारायण आले आता । सारदादेवी जगन्माता ।
सर्व शिष्यगण देवदेवता । जगत्कल्याणा अवतरले ।। ७२ ।।

करिता तयाचे कथागान । उपदेशाप्रमाणे आचरण ।
तर साधेल आत्मकल्याण । साफल्य होइल जन्माचे ।। ७३ ।।

रामकृष्णदेवांचे हे चरित । दुसरे श्रीमद्भागवत ।
मर्त्यांस होवो परमामृत । अमृतत्व प्राप्त होवो तया ।। ७४ ।।

अवचित कानी पडता किंचित । तुटावे भवबंधन समस्त ।
बद्ध मानव व्हावा मुक्त । परमार्थ सुलभ हो सकलांना ।। ७५ ।।

रामकृष्ण नाम उच्चारुन । सर्व पापे जातिल धुउन ।
पतित खचित होती पावन । जाती उद्धरुनी शंका नसे ।। ७६ ।।

भगवंतांनी प्रेरणा देउन । चरित्र घेतले लिहवून ।
यास्तव किंचित अभिमान । नसावा माझ्या मनामधे ।। ७७ ।।

कर्ते करविते रामकृष्ण । त्यांची आज्ञा झाल्यावाचुन ।
झाडाचेही न हाले पान । सर्वसमर्थ ते असती ।। ७८ ।।



रामकृष्णांनी सामर्थ्य देउन । चरित्र घेतले लिहवून ।
ज्यांचे त्यांना असो अर्पण । साष्टांग नमन तयांप्रती ।। ७९ ।।
लेखक वाचक आणिक श्रोते । सर्व पावोत पूर्णतेते ।
लाभोत सकल शांतिसुखाते । भगवद्दर्शन त्यांना घडो ।। १८० ।।
श्रीरामकृष्णकथामृत । प्रेमाने रघुपति सेवित ।
सद्भक्तांना पाचारित । सेवुनी धन्य व्हावया ।। १८१ ।।

।। इति श्रीरामकृष्णकथामृताचा बेचाळिसावा अध्याय ।।

।। श्रीरामकृष्णार्पणमस्तु ।।

❖ ❖ ❖



रामकृष्ण मठ, पुणे द्वारा भगवान श्रीरामकृष्णांच्या १७५ व्या जयंतीनिमित्त
विशेष सवलतीच्या किमतीत सादर

नरनारायण आले आता । सारदादेवी जगन्माता ।
सर्व शिष्यगण देवदेवता । जगत्कल्याणा अवतरले ।।

करिता तयाचे कथागान । उपदेशाप्रमाणे आचरण ।
तर साधेल आत्मकल्याण । साफल्य होइल जन्माचे ।।

रामकृष्णदेवांचे हे चरित । दुसरे श्रीमद्भागवत ।
मर्त्यांस होवो परमामृत । अमृतत्व प्राप्त होवो तया ।।

अवचित कानी पडता किंचित । तुटावे भवबंधन समस्त ।
बद्ध मानव व्हावा मुक्त । परमार्थ सुलभ हो सकलांना ।।

रामकृष्ण नाम उच्चारुन । सर्व पापे जातिल धुउन ।
पतित खचित होती पावन । जाती उद्धरुनी शंका नसे ।।



रामकृष्ण मठ

१३१/१अ, दांडेकर पुलाजवळ, पुणे - ४११०३०
दूरभाष: (०२०) २४३३३७२७, २४३२५१३२, २४३२०४५३

PP - 03

मूळ किंमत - ₹ ३००/-

सवलतीची किंमत - ₹ ७५/-